म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

~~शिल्प~~

ज्योतिष

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० [illegible]
ठाणे सन १८९

नं २०४०
सन १८९

सद्विचारिणी सभेची ग्रंथमाला
ग्रंथ ९ वा.

# सांपत्तिक कथावली.

३६५२४
ना. मो.

## भाग १ ला.

१. जंगलची वस्ती.
२. दरी व डोंगर.

मिस हारिएट मार्टिनो यांच्या
मूळ इंग्रजी ग्रंथावरून
तर्जुमा करणार
शंकर विष्णु पुराणिक बी. ए.
वडोदें.

प्रसिद्ध करणार खळे आणि मंडळी
यांनीं
हें पुस्तक ठाणें येथें
जगत्समाचार छापखान्यांत छापिलें.
नोव्हेंबर १८९७.
किंमत रु. १।।.

३६२४

# अनुक्रमणिका.

पृष्ठ

( १ ) जंगलची वस्ती.

प्रस्तावना. १

तत्वांचा सारांश. ३

भाग १ ला. उरलें काय? ९

२ रा. संपत्ति ह्मणजे काय? २८

३ रा. स्वकष्टानें मिळविलेलें खावें. ३७

४ था. हस्तकृति व बुद्धिकृति. ५१

५ वा. मनापासून केलेलें काम. ६५

६ वा. पुष्कळ लोक लावावे, लवकर काम घ्यावें. ८१

७ वा. भरभराट. ९७

८ वा. छान संध्याकाळ. ११६

९ वा. ऊर्जित काळाचीं चिन्हें. १३०

( २ ) दरी व डोंगर.

प्रस्तावना. १५१

तत्वांचा सारांश. १५३

भाग १ ला. प्रत्येकाची लहर. १५५

२ रा. थेंबें थेंबें तळें साचें. १७५

३ रा. लहरीमुळें तोटा. १८९

४ था. भरभराट. २११

५ वा. भरभराटीचा कसा उपयोग करावा २३६

६ वा. संकटें. २५४

७ वा. बेदिली. २७६

८ वा. दंगा. २९२

९ वा. पुनः सामसूम. ३१०

शुद्धिपत्र ३१९

# प्रस्तावना.

गायकवाडींत सुशिक्षित लोकांचा भरणा बराच मोठा असून त्यांच्या हातून सरकारनोकरीपलीकडे कांहीं सार्वजनिक उपयोगार्थ कृत्य होत नाहीं असा अपवाद बरेच दिवसांपासून होता; तो दूर व्हावा आणि खालसांतील स्वतंत्र उद्योग करणारे वकील, व्यापारी, ह्या लोकांसारखीं जरी मोठीं कामें हातून घडलीं नाहींत तरी मराठींत उपयुक्त व मनोरंजक ग्रंथांची वृद्धि व्हावी, हे अल्प उद्देश मनांत धरून सन १८९० चे आक्टोबर पासून बडोदे मुक्कामीं कित्येक मंडळीच्या खटपटीनें सहविचारणी सभा नांवाची संस्था स्थापन झाली. ह्या सभेने आजपर्यंत ४ ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत व आणखी चार छापत आहेत; ह्यावरून सभेचें व्हावें तशा झपाट्यानें व नियमानें काम होत नाहीं असा आक्षेप येईल. तथापि नोकरी संभाळून काम करण्याची आपल्या लोकांत किती धमक असते हें लक्षांत घेतलें ह्मणजे अशा संस्थांविषयीं केवळ उदासीनच होण्याचें कारण नाहीं. ईश्वरेच्छेनें जो कांहीं अल्पकाळ आपल्यास ह्या जगावर काढण्याचा असेल त्यापैकीं निदान थोडा भाग आपल्या व समाजाच्या उन्नत्यर्थ लाविला पाहिजे, हें कर्तव्य लक्षांत वागवून आणि भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें **"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन"** फळाची आशा न ठेवितां कर्तव्यपरायण होऊन प्रत्येक सभासद जर झटूं लागेल, तर सभेचा उद्दिष्ट हेतु अनायासें पार पडेल व वर सांगितलेला अपवाद टळेल.

हल्लीं आपल्या भाषेची संक्रमणस्थिति आहे. अशा स्थितींत साधारण प्रतीच्या मनुष्यानें स्वतंत्र ग्रंथ रचावे, किंवा इंग्रजी व इतर पाश्चात्य भाषांतील ज्ञानभांडार तर्जुमारूपानें मराठींत आणावें, ह्याविषयीं फार मतभेद होईल. माझ्या मतें स्वतंत्र ग्रंथकार होण्याची योग्यता फारच थोड्या लोकांच्या अंगीं असते, आणि कांहीं काळपावेतों ज्या

ग्रंथाचें नांव राहील असा ग्रंथ होण्यास तशाच तोडीचा ग्रंथकार लागतो, व असे ग्रंथकार अवघ्या शतकांत फारच थोडे निपजतात. तर अशा दुर्लभ पदाची जोडी मिळविण्याचा यत्न करण्यापेक्षां जे विचार इतर भाषांत आयते सिद्ध मिळतात तेच आपल्या भाषेंत आणिल्यास थोडा बहुत तरी फायदा होतोच. आतां ते विचार गोषवाऱ्याच्या रूपानें इकडील आचारविचारास विलग न भासतील अशा तऱ्हेनें आणावे, किंवा जशाच्या तसे आणावे, ह्याविषयीं माझें मत " इराण " पुस्तकाचे प्रस्तावनेंत दिलेंच आहे. तर्जुम्यानें यथार्थज्ञान होतें. गोषवाऱ्यानें तडजोडीच्या धांदलींत लपंडाव होऊन अयथार्थज्ञान होतें. कारण तसा अनिष्ट प्रकार टाळण्यासाठीं गोषवारा करणाऱ्याच्या अंगीं विषयाची पुरी माहिती व भाषांचें चांगलें ज्ञान अवश्य पाहिजे. परंतु जीं पुस्तकें इकडील आचारविचारास बसती येण्यासाठीं लंगडीलुलीं करून मराठी वाचकांपुढें मांडिलीं जातात, त्यांत किती तरी कालातिक्रम, विचारातिक्रम, कल्पनातिक्रम बहुशः झालेला असतो. ह्याची खरी कल्पना येण्यासाठीं मूळ ग्रंथ व त्याची मराठी प्रतिकृति हीं दोन्ही ताडून पाहिलीं असतां कळून येतें. अशा मूळ ग्रंथकाराची दुर्दशा उडविणें हें केवळ साहस व अन्याय्य होय. करितां होईल तों अशा ग्रंथांचे जशाच्या तसे तर्जुमे करावे हा उत्तम पक्ष; आणि ह्यामुळेंच मीं प्रस्तुत ग्रंथाचा तर्जुमा केला आहे. मात्र कित्येक मित्रांच्या सांगण्यावरून मराठी वाचकांस इंग्रजी नांवें कंटाळवाणीं न वाटावीं आणि इकडील नांवांचा उपयोग केलेला अप्रस्तुत न वाटावा ह्मणून एक दोन ठिकाणीं मूळ ग्रंथापेक्षां जास्त मजकूर घातला आहे, तो वाचकांच्या सहज लक्षांत येण्यासारखा आहे.

हा तर्जुमा जशाच्या तसा ठेविल्यानें अनेक फायदे आहेत. आफ्रिकेसारख्या देशाचें वर्णन, अर्थशास्त्राच्या प्राथमिक तत्वांची माहिती, आंग्ल लोकांच्या रीतिभाती, त्यांचें स्वावलंबन व धैर्य इत्यादि प्रशस्त गुणांची माहिती ह्या ग्रंथांत बरीच आहे; ह्मणून करमणूक, अर्थशास्त्र अगर माहिती ह्या कोणत्याही दृष्टीनें हा ग्रंथ उपयुक्त आहेच, व त्याचें श्रेय ज्या बाईनें तो लिहिला तिजकडे आहे.

## ह्या पुस्तकांत ज्या तत्त्वांचें विवेचन झालें आहे त्यांचा सारांशः—

१. ज्या जिनसा उपयोगी—ह्मणजे मनुष्य जातीला ज्यांची जरूर असते व ज्या प्रिय असतात—आहेत, त्यांचा समावेश संपत्ति ह्या शब्दांत होतो.

२. सृष्टपदार्थांवर श्रम लाविल्यानें संपत्ति उत्पन्न होते.

३. ज्याअर्थीं सृष्ट पदार्थांचा अंत होणार नाहीं, आणि श्रमाचा पुरवठा एकसारखा वाढतच जाणार असें दिसतें, त्या अर्थीं मनुष्याच्या बुद्धीला जी सीमा असेल तिनेंच कायते श्रमाचे व्यापार खुंटतील. परंतु मनुष्याच्या बुद्धीचा अंत लागेल काय?

४. उत्पादक श्रम ही कल्याण करणारी शक्ति आहे, ह्मणून त्या शक्तीला ज्यामळें व्यवस्थितपणा येतो व उत्तेजन मिळतें, त्यापासूनही कल्याणच आहे.

५. पुष्कळ प्रकारच्या अनुत्पादक श्रमापासूनही कल्याण होतें, ह्मणून पुष्कळ प्रकारचे अनुत्पादक श्रमही कल्याणकर आहेत.

६. ज्यांचा साधारण बरा असा खप आहे, अशा सर्व प्रकारच्या श्रमांना सारखाच मान दिला पाहिजे.

७. श्रम ही कल्याण करणारी शक्ति आहे, ह्मणून त्याच्या मितव्ययानेंही कल्याणच होईल.

८. श्रमाचा मितव्यय खालीं लिहिल्याप्रमाणें करितां येईल.

१. श्रमविभागानें; त्याचे तीन भेद.

अ. ज्याची मनुष्याला नेहमीं संवय असते तें तो उत्तम करूं शकतो.

ब. मनुष्य एकाच कामाच्या पाठीं लागल्यास तें तो फार लौकर करूं शकतो.

क. एकाच कामाचे निरनिराळे भाग एकाच वेळीं करण्याचें सुरू असल्यास, वेळेची बचत होते.

२. यंत्रांच्या मदतीनें; यंत्रानें

अ. मनुष्याच्या श्रमाला विसावा मिळतो;

ब. मनुष्याचे श्रम कमी होतात, ह्मणजे यंत्रें मनुष्याच्या ऐवजीं त्याचें काम करितात, त्यामुळें दुसरें काम करण्याला त्याला फुरसत मिळते.

९. श्रमाला स्वाभाविक मोकळीक देऊन त्याचें सर्वप्रकारें रक्षण केलें पाहिजेः—

१. कोणत्याही प्रकारच्या श्रमाचा पक्षपात करूं नये.

२. पूर्वीं जर असा पक्षपात झाला असेल, तर त्याचे परिणाम समूळ काढून टाकावे.

# सांपत्तिक कथावलि.

## कथा १ जंगलची वस्ती.

### कथा १. उरलें काय?

दक्षिण आफ्रिकेंत राहण्यास जशा सोई आहेत तशा सोई फारच थोडक्या देशांत असतील. गुडहोप भूशिराजवळ जो डोंगराळ प्रदेश आहे तेथील हवा स्वच्छ व निरोगी आहे. ह्याच्या उत्तरेकडील प्रांत समुद्राच्या सपाटीपासून बऱ्याच उंचीवर असून फारच सुपीक आहेत. तेथें लागवड केली असतां उत्तम पीक येतें, इतकेंच नव्हे, तर पडतर जमीनींतही नानाप्रकारच्या वनस्पती व झाडें होतात. तेथील जंगलांत निरनिराळ्या जातीचीं झाडें झुडपें व वनस्पती असून ओझेल व ज्यांचें मांस खावयास योग्य आहे अशीं पुष्कळ जनावरेंही आढळतात. ह्या सोयींमुळें युरोपांतील व विशेषतः इंग्लंदांतील पुष्कळ लोकांनीं तेथें वसाहती केल्या असत्या; परंतु तेथें एक मोठी गैरसोय आहे. ती अशी कीं, तेथें जरी सिंह, चित्ते वगैरे पुष्कळ हिंस्र पशु आहेत, तरी त्यांपासून म्हणजे विशेष धोका नसतो, कारण नीट बंदोबस्तानें राहिल्यास वसाहत करणारांस त्यांचा उपद्रव होऊं शकत नाहीं; परंतु युरोपियन लोकांच्या वसाहतींच्या उत्तरेस एका जातीचे रानटी लोक आहेत, त्यांपासून वसाहतींस मोठी भीति असते. कारण हे लोक कावेबाज असून हिंस्र पशूंपेक्षांही क्रूर असतात. ठिकठिकाणीं ज्या तुरळक वसाहती व लहानसान गांवें आहेत, त्यांवर हे लोक वारंवार हल्ले करितात, आणि तेथील लोकांस मारून त्यांचीं घरें जाळून सर्व चीजवस्त लुटून नेतात. ह्या रानटी लोकांच्या हल्ल्यांपासून बचाव करणें फारच

कठीण जातें, आणि वसाहतींत पुष्कळ लोक असल्याशिवाय चांगलासा बचाव करितां येत नाहीं, ह्मणुन जे केवळ गरीबीनें गांजले आहेत त्यांशिवाय दुसरा कोणी येथें वसाहत करण्यास धजत नाहीं. ह्यामुळें केप कॉलनीच्या उत्तरेच्या सरहद्दीवर अतिशय कंगाल व वारंवार संकटें पडून धीटावलेले अशा लोकांच्याच कायत्या थोड्या वसाहती आहेत.

वर जे रानटी लोक सांगितले त्यांस इंग्रज लोक *बुशमेन म्हणतात. वास्तविक पाहतां इंग्रज व डच ह्या लोकांचा प्रवेश होण्यापूर्वीं हेच रानटी लोक केपच्या आजूबाजूच्या सर्व प्रदेशाचे मालक होते. पुढें इंग्रज व डच यांनीं हळुहळु हा देश काबीज केला, आणि ज्याप्रमाणें हिंस्र पशूंचा पाठलाग करावा त्याप्रमाणें त्यांनीं ह्या लोकांना वागविलें. ह्या क्रूरतेमुळें बुशमेनही सूड उगविण्याविषयीं नेहमीं टपून असत, व संधि सांपडली कीं, भयंकर सूड उगवीत. ह्यांना जे हाल सोसावे लागले, त्यांचा परिणाम त्यांच्या शरीराच्या बांध्यावरही झाला आहे. ह्यांचा बांधा खुजा असून हे दिसण्यांत अगदीं कुरूप असतात, त्यावरून हीं युरोपियन लोकांपेक्षां हलक्या जातीचीं माणसें आहेत, असें सिद्धच झालें ह्मणून समजूं नये. निरनिराळ्या देशांतील लोकांवर अशा प्रकारच्या जुलुमांचा काय परिणाम झाला आहे हें लक्षांत घेतलें, ह्मणजे स्वद युरोपियन लोकांस सुधारलेल्या शहरांतून व खेड्यांतून डोंगरांवर हांकून दिलें व रानटी आयुष्क्रमाचीं दुःखें त्यांस अनुभवावीं लागलीं, तर त्यांचा बांधा खुजा होऊन ते केवळ रानटी होतील व सूड उगविण्यांत ही तसेच क्रूर होतील, ह्यांत तिळप्राय देखील संदेह नाहीं. इतकेंच नाहीं तर ज्यांनीं प्रथम देश काबीज करतांना स्वाऱ्या केल्या, त्यांच्या अपराधांचें प्रायश्चित्त मागून येणाऱ्या निरपराध लोकांना जसे हे बुशमेन भोगावयास लावीत व त्यामुळें जसें निष्कारण दुःख मात्र होई, तसेंच त्या युरोपियन लोकांनीं ही केलें असतें, असें खास वाटतें.

* शब्दशः झुडुपांतील ह्मणजे जंगली लोक.

असो. हल्लीं ह्या दुश्मनांपासून फारसा त्रास होत नाहीं; परंतु सुमारें ६०वर्षांपूर्वी ह्यांपासून एकाबसाहतीला जी आपदा भोगावी लागली, त्याबद्दल आम्ही पुढें सांगणार आहों.

इ. स. १८१८ त महाराष्ट्रांत पेशवाईचा ऱ्हास झाल्यानंतर प्रभु येशूच्या शुभवर्तमानाचा प्रसार व्हावा, ह्मणून ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे प्रयत्न पुणें, अहमदनगर वगैरे प्रांतांत सुरू झाले. त्यांच्या प्रयत्नांस प्रथम ह्मणण्यासारखें यश आलें नाहीं; परंतु पुरंदर किल्ल्याचे दक्षिणेस तीन कोसावर चामखेड नांवाचें लहान गांव होतें, तेथील बरेच लोक मिस्तर स्टोन नांवाच्या मिशनऱ्यानें बाटवून येशूच्या कळपांत आणिले. हल्लींपेक्षां त्यावेळीं आपल्या लोकांत बाटच्या मंडळीविषयीं पराकाष्ठेची तिरस्कारबुद्धि होती, व सहाजिकच अशा बाटच्या मंडळींचा अतिशय छळ होत असे. त्याप्रमाणें चामखेडकर मंडळीस फारच त्रास सोसावा लागला. त्या गांवचे जे लोक बाटले नव्हते ते गांव सोडून गेले, तरीही आसपासच्या खेड्यापाड्यांतील लोक ह्या बाटच्या लोकांशीं मुळीं देखील दळणवळण न ठेवितां, जेणेंकरून त्यांचे हाल होतील व त्यांस जीव नकोसा होईल, अशा प्रकारें वागत. असा जेव्हां छळ होऊं लागला, तेव्हां चामखेडकरांनीं स्टोनजवळ गाऱ्हाणें नेलें. ते ह्मणाले ' साहेब, आपण आह्मांला खऱ्या धर्माची ओळख करून दिली, हे उपकार जन्मांतरीही आह्मी विसरणार नाहीं. परंतु काय करावें? आमचा चोहोंकडून कोंडमारा आहे. आमचें धान्य कोणी विकत घेत नाहींत. शेत नांगरूं देत नाहींत. फौजदारी करावी, तर कोणास धरून रुजूं करावें हें समजत नाहीं. बरें पेरणी केली, तर अपरात्रीं लोक येऊन राखणारांस मारहाण करून शेत उध्वस्त करून टाकतात. सर्व लोक आमच्यावर उठले आहेत. आमच्या सावलीस देखील कोणी उभें राहत नाहींत, मग बोलणेंचालणें तर लांब राहिलें. आतां आह्मीं करावें काय? आह्मांला कांहीं देखील सुचत नाहीं. आमचीं बायका-

मुळें उपाशी मरण्याचा रंग दिसत आहे. तर कसें तरी करून आमची ह्या जुलमांतून सुटका करा!'

स्टोननें तें सर्व निमुटपणें ऐकिलें. त्यानें विचार केला 'जेथें सर्व लोक उठले आहेत' अशा धर्माच्या बाबतींत सरकार कांहीं देखील हात घालणार नाहीं.बरं, आपण तरी येथें त्यांना कितपत मदत करूं शकणार? येथें राहण्यापेक्षां ह्या सर्वांना घेऊन कोठें तरी वसाहत करून राहावें, हेंच उभयपक्षीं बरें.' हा विचार त्यानें चामखेडकरांस कळविला, परंतु त्यांस ही गोष्ट प्रथम रुचली नाहीं. त्यांनीं पुष्कळ आढेवेढे घेतले. ते ह्मणाले 'साहेब, आपण ह्मणतां तें सारें खरें, परंतु आमच्या वाडवडिलांची जागा आम्हीं कशी सोडावी? आम्ही येथें लहानाचे मोठे झालों. आमचे आप्तसोयरे, इष्टमित्र ही मंडळी ह्या प्रांतांतच आहे. आज ते आह्मांस परकी ह्मणून लेखतात, परंतु कालांतरानें ते जुन्या व वेडगळ अशा हिंदूधर्मांतील समजुती टाकून देतील व प्रभु येशूच्या दयेनें सत्य धर्माचा प्रकाश त्यांना मिळेल. अशी शुभ वेळ आली, ह्मणजे तेच आमच्यावर पूर्ववत लोभ करतील, ह्मणून आह्मांस आमचें गांव सोडून देण्यास सांगूं नका. दुसरा कांहीं तरी उपाय काढा' स्टोननें त्यांची पुष्कळ समजूत घातली. तो ह्मणाला 'बाबांनो, मला देखील तुमच्यासारखेंच वाईट वाटतें, परंतु काय करावें. दुसऱ्या ठिकाणीं गेल्याखेरीज आपल्यास सुटका नाहीं. येथें राहिल्यास आपला पिच्छा पुरविल्याखेरीज आसपासची मंडळी राहणार नाहीं; इतकेंच नाहीं, तर प्रसंगीं प्राणावर ही बेतेल. बरें हा गांव सोडून पुणें, नगर अशा शहरीं जाऊन राहूं ह्मणाल, तर तेथें येथल्यापेक्षां ही जास्त छळ होणार. ह्मणजे एकंदरीनें तुह्मांस निदान तूर्त तरी हा देश सोडून गेलें पाहिजे, असें मला खास वाटूं लागलें आहे. ह्मणून माझें ऐका आणि मी नेईन तेथें मुकाट्यानें चला. पुढें प्रभु येशू हा आपला संभाळ करणार आहे.'

हें बोलणें ऐकून बिचाऱ्या **चामखेडकारांचा** उपायच खुंटला. त्यांनीं **स्टोन**बरोबर निघण्याचें कबूल केलें; आणि **स्टोन**नें हा विचार केला कीं, ' **हिंदुस्थानां**तील एकाद्या प्रांतांत जाऊन राहिल्यास येथल्या सारखाच छळ व्हावयाचा, त्यांतून इतर प्रांतांत भाषा ही निराळी, त्यापेक्षां **हिंदुस्थान** सोडून दुसऱ्या देशांत जावें हें बरें?" असा विचार करून त्यानें **मुंबईस** आपला मित्र क्यापटन **आडाम्स** ह्यास वर्गणीनें फंड उभा करण्यासाठीं पत्र पाठविलें आणि वसाहत कोणत्या देशांत करावी अशाविषयीं सल्ला विचारिली. **आडाम्स** हा पूर्वीं आरमारांत नोकर होता. त्यानें कांहीं दिवसांपूर्वीं पेन्शन् घेतलें होतें. तो मोठा दयाळु व धाडसी होता. त्यानें खटपट करून बरीच रक्कम गोळा केली, आणि तींत स्वतःच्या पदरची भर घालून दक्षिण **आफ्रिकेंत** वसाहत करावी असें ठरविलें; कारण त्या देशांत तो पूर्वीं पुष्कळ वर्षें राहिला होता, त्यामुळें त्या देशांतील लोक, हवापाणी वगैरेची त्यास चांगली माहिती होती. हा विचार **स्टोन** ह्यासही पसंत पडला. नंतर थोड्या दिवसांनीं **आडाम्स**, **स्टोन**, **स्टोनची** बायको **आना** व लहान मुलगी **मेरी** आणि चामखेडकर सुमारें साठ मंडळी अशी **मुंबईस** जहाजांत बसून **केप कॉलनी**कडे गेली. **केप कॉलनीस** सुमारें दोन महिन्यांनीं पोंचल्यावर तेथें मुक्काम न करितां त्यांनीं उत्तरेच्या सरहद्दीवर जाऊन वसाहत केली. थोडक्याच दिवसांनीं ह्या वसाहतीचें एक लहानसें खेडें बनलें.

हें खेडें चांगलें भरभराटींत येत चाललें होतें, व सारे लोक एकंदरीनें सुखासमाधानांत दिवस काढीत होते. **सप्टेंबर** महिन्याचे एके दिवशीं सकाळीं त्या खेड्यांतील लोक एकत्र जमून आपली ददात दूर कशी करावी ह्याचा विचार करीत होते. ह्या दिवसांत तिकडे अतिशय कडक उन्हाळा असतो, म्हणून त्या दिवशीं सकाळपासूनच अंगाची लाही होऊं लागली होती. आदल्या दिवशीं संध्याकाळपावेतों जे लोक सुखी होते, तेच रात्रीं एकाएकीं रानटी लोकांचा घाला आल्यामुळें अगदीं

कंगाल झाले. रानटी लोकांनीं त्यांचीं सर्व आउतें, शस्त्रें व चीजवस्त लुटून गुरें ढोरें हांकून नेलीं, आणि झोंपड्या वगैरे सर्व जाळून टाकिलें; ह्मणून बिचारे सकाळीं पाहतात तों अंगावरच्या कपड्यांशिवाय जवळ कांहीं देखील उरलें नाहीं.

शेतांची नासधूस, ओसाड कुरणें व जळून खाक झालेल्या झोंपड्या पाहून त्यांस पराकाष्ठेचें वाईट वाटलें. दुःखांत सुख ह्मणून इतकेंच होतें कीं, रात्रीं अवचित घाला आल्यामुळें त्यांनीं शत्रूपुढें फारसा टिकाव धरिला नाहीं, त्यामुळें फारसे लोक जाया झाले नाहींत; परंतु जे लोक मरण पावले ते जात्याच मन मिळाऊ होते, आणि अशा ओसाड जागीं सर्वांवर सारखीं संकटें पडत व सर्वांना सारखेच श्रम करावे लागत, त्यामुळें त्यांवर सर्वांचा फारच लोभ जडला होता त्यांतून ते सर्वांच्या अतिशय उपयोगी पडत, ह्मणून त्यांच्या मरणामुळें वसाहतीचें फारच नुकसान झालें. रानटी लोकांनीं करवतलेल्या लांकडांचा भुसा जाळून टाकिला होता. त्या राखेंत विठू नांवाचा सुतार मेलेला सांपडला. मळ्याचे तोंडाशीं हम्बीर खोंपट बांधीत होता, त्या खोंपटाचे दाराजवळ त्याचा मुर्दा पडला होता. कांहीं मुलेंही आगींत सांपडून मेलीं होतीं. मंडळीचा शोध करण्यापूर्वी पुष्कळ प्राणहानी झाली ह्मणून प्रत्येकाला वाटत होतें, परंतु फारसे लोक कांहीं गेले नाहींत असें समजलें तेव्हां साऱ्यांचा जीव बराच खालीं पडला. कप्तान आडम्स आणि स्टोन, त्याची बायको व मुलगी ह्यांविषयीं सर्वजण मोठ्या कळकळीनें शोध करीत होते, परंतु ईश्वरकृपेनें कांहीं ही इजा न पोंचतां ते सुरक्षित सांपडले.

ह्या वसाहतींत स्टोन हा सर्वांपेक्षां सुशिक्षित होता आणि त्यास शेतकीचीही चांगली माहिती होती, ह्मणून शिकविण्याच्या व पाद्र्याप्रमाणें धर्माच्या चार गोष्टी सांगण्याच्या कामीं त्याचा फार उपयोग होत असे. त्याची बायको आना स्वभावानें गोड असून मोठी निश्चयी होती. ती नवऱ्यास शेतांत व घरीं काम करूं लागे. वसाहतींतील सर्वजण तिला

बाईसाहेब ह्मणून ह्मणत, परंतु तिला असला मान आवडत नसे. ती थोरमनाची नव्हती असें कांहीं नव्हे, परंतु ती असें ह्मणे 'जिथं सर्वांना आपलं पोट भरण्यासाठीं सारखंच राबलं पाहिजे, तिथं असला फुकाचा मानपान कशाला हवा.' तिला एक तीन वर्षांची मुलगी होती.

वसाहतीच्या सर्व कामांत पुढारीपणा **आडाम्स** हा घेत असे, शिवाय तो आरमारांत कप्तान होता असें वर सांगितलेंच आहे, ह्मणून त्यास कप्तान ह्मणत. पूर्वीं पुष्कळ वर्षें **आफ्रिकेंत** राहिल्यामुळें तेथील हवापाणी त्याच्या वळणी पडून गेलें होतें. आसपासच्या रानटी लोकांचे स्वभाव व रीतिभाती आणि रस्त्यांच्या अडचणी व हवापाणी ह्यांची त्याला चांगली माहिती होती, ह्मणून तो रानटी लोकांच्या हालचालीसंबंधीं व इतर प्रसंगींही वसाहतींतील लोकांस सल्लामसलत देऊं शके, आणि तेही सर्व कामांत त्याचा कप्तानाप्रमाणेंच मान ठेवून त्याची सल्लामसलत हुकमाप्रमाणें मानीत. वसाहतीच्या जवळच दोन टेंकाडयांच्या मध्यें थोडीशीं झाडें होतीं, त्यांच्या खालीं त्यानें त्यावेळीं बाकी राहिलेल्या सर्वांस जमविलें.

सर्वजण एकत्र जमले, पण ते इतके उदासीन होते कीं, ते एकमेकांच्या तोंडांकडेच पाहत उभे राहिले. कोणाचेंही बोलण्यास मन होईना. असा कांहीं वेळ गेल्यावर कप्तान **आडाम्स** हा बोलण्यास सुरुवात करणार, इतक्यांत एका बाईचें मूल गेलें होतें तिचें स्फुंदस्फुंदून रडणें, सुताराच्या बायकोचा आक्रोश हीं त्याच्या कानीं पडलीं; त्यामुळें तो इतका गहिंवरून गेला कीं, त्याचा गळा भरून येऊन त्याच्यानें एक शब्द देखील बोलवेना. **स्टोन** हा प्रसंगी वृत्ति स्वाधीन ठेवून आपलें धैर्य खचूं देत नसे, ह्मणून तो लागलाच पुढें सरून ह्मणाला 'झाल्या गोष्टीस कांहीं इलाज नाहीं. आतां आपण जमलों आहों, तर ह्याउपर कोणत्या प्रकारें आपलें संरक्षण करावें व चरितार्थ कसा चालवावा ह्याचा विचार केला पाहिजे. परंतु त्यापूर्वीं आपण ईश्वराचें अनन्यभावें स्मरण करावें असें

मला वाटतें. आपली जी कांहीं हानी झाली असेल त्याबद्दल यत्किंचितही शोक न करितां विरक्तता धरावी, व हल्लीं जें कांहीं आपल्या जवळ राहिलें आहे त्याबद्दल **जगन्नियंत्याचे** आपण आभार मानावे. माणसें गेल्यामुळें ज्यांस अतोनात दुःख झालें आहे, त्यांचें ह्यामुळें बरेंच सांत्वन होईल; आणि दुसऱ्याही लोकांच्या मनाची व्यग्रता जाऊन सर्वजण अशा बिकट प्रसंगीं सावधान होऊन नीट शांतपणें विचार करूं लागतील व शहाणपणानें कांहीं तरी उपाय योजतील असें मला वाटतें.'

ही गोष्ट सर्वांस रुचली, ह्मणून ते माना खालीं घालून नम्रतेनें उभे राहिले. त्यावेळीं पाद्रीबोवा कायते बोलत होते; बाकी चोहोंकडे सामसूम होती, कारण जो तो प्रेमळ अंतःकरणानें स्वतःशींच ईश्वराची प्रार्थना करीत होता.

प्रार्थना आटोपून कांहीं वेळ गेल्यावर कप्तान ह्मणाला 'आज पहिल्यानें खाण्यापिण्याची सोय व राहण्याला आडोशाची जागा ह्या दोन गोष्टींचा विचार झाला पाहिजे. आजच्या दिवसाचीच खाण्याची तजवीज लागली पाहिजे, व रात्रीकरितां फार तर निर्वात बिनधोक्याची जागा पाहिजे. नंतर येथेंच पुनः झोंपड्या बांधून कसें तरी राहावें, किंवा दक्षिणेकडे जास्त सुरक्षित अशी जागा पाहून तेथें वसाहत करावी, किंवा तिकडे जाऊन लोकांची मदत घ्यावी, ह्याचा विचार करितां येईल. ह्मणून आतां आपलपोटेपणा टाकून देऊन जी कांहीं खाण्याची बेगमी जवळ असेल ती तुम्ही हजर करा.'

आदल्या दिवशीं **स्टोन** ह्यानें एक हरिण फांस घालून पकडलें होतें तें एका आवारांत बांधून ठेविलें होतें. रानटी लोकांच्या तावडींत तें सांपडलें नाहीं, ह्मणून तें देऊन तो ह्मणाला 'माझ्या बागेंतील तयार झालेलीं फळफळावळ बहुतेक त्यांनीं नाहींशीं केलींच आहेत, आणि दुसरा बहर पिकून तयार होण्यास दिवसही बरेच लागतील. परंतु पाहूं या, कांहीं थोडीशीं फळें झाडांस चुकून राहिलीं असल्यास तीं सांगाल त्या जागीं

मी आणून देतों.' खंडू नांवाचा धनगर म्हणाला. 'माझ्या गुरांपैकीं त्या चांडाळांनीं एकही बाकी ठेविलें नाहीं. परंतु ते ज्या वाटेनें गेले आहेत त्याच वाटेनें दोनचार कोस जाऊन पाहिलें पाहिजे. म्हणजे एखादा बैल किंवा मेंढरूं कळपांतून चुकून वाटेंत राहिलें असेल तर रात्र पडण्या पूर्वीं त्यास मी आणून येथें हजर करीन.' हें ऐकतांच दोन तीन जण ह्मणाले कीं, 'तीरकमटे किंवा बंदुका आम्हांस द्याल, तर आम्ही ही शिकार आणून देऊं.' दुसरेही कांहीं जण मासे धरण्यासाठीं गळ मागूं लागले.

बंदुका, तीरकमटे, गळ किंवा दुसरीं हत्यारें मंडळीजवळ कांहीं राहिलीं नव्हतीं हें कप्तानास माहीत होतें, ह्मणून तो ह्मणाला 'अहो, आतां शिकारीच्या गोष्टी राहूं द्या. तूर्त आपल्याजवळ कांहीं खाण्याचे पदार्थ असतील, तर ते कायते पहावयाचे आहेत.'

परंतु ह्यापासून फारसें निष्पन्न झालें नाहीं. पाद्रीबोवांनें हरिण व त्यांच्या बागेंतील थोडीशीं नारिंगें, द्राक्षें व अंजीर एवढेंच कायतें मिळालें. नाहीं ह्मणायला रवणीं जवळ कांहीं अंडीं सांपडलीं, आणि रात्रीं आगीला भिऊन सुदैवानें थोडीशीं कोंबडीं व बदकें पळालीं होतीं तींही हळूं हळूं परत आलीं. एवढ्यावर ९४ लोकांचा गुजारा व्हावयाचा होता.

कप्तान ह्मणाला 'इतक्या लोकांस हें कधींही पुरणार नाहीं, म्हणून पुष्कळ जणांनीं आणखी खाण्याचें शोधून आणण्यासाठीं निघालें पाहिजे. मुक्काम हलविण्याचे सर्व विचार मात्र उद्यापावेतों बंद ठेविले पाहिजेत. आजच दुसऱ्या जागीं जाण्याजोगी आपली स्थिति नाहीं, परंतु रात्रीसाठीं जागेचा विचार आतांच झाला पाहिजे, करितां कोणास कांहीं सांगणें असेल तर त्यानें बोलावें.'

हें ऐकून बराच वेळ कोणी बोलेना. 'गरीब बिचारा विठू सुतार असता, तर ही अडचणच आपोआप दूर झाली असती, असा जो तो मनांत हळहळत होता. कांहीं वेळानें राघू नांवाचा शेतकरी म्हणाला.

ण्यासाठीं घाटाकडे गेला. कातडीं कमाविण्यास झाडांच्या साली आण-ण्याकरितां तो नेहमीं रानांत जात असे, त्यामुळें त्याला लांकडाचा चिव-टपणा व टिकाऊपणा ह्या विषयीं बरेंच कळत असे. कांहीं दिवसांपूर्वी त्यानें अशा एका झाडाची साल व फांद्या काढून टाकिल्या होत्या, त्या झाडाचीं ओबडधोबड हत्यारें बरीं होतील असें वाटून त्यानें त्या झाडाचा सोट कांहीं जणांस नेऊन दाखविला. तसेंच रानटी लोकांप्रमाणें चामड्याच्या वाद्या कमावून तयार केल्यास दोरांच्या ऐवजीं त्यांचा उपयोग करितां येईल म्हणजे दोऱ्यांची उणीव सहजीं दूर होईल असेंही त्याला वाटलें, म्हणून तावडतोब हरिणाचें चामडें तयार करण्याचें त्यानें मनांत आणिलें. त्यासाठीं कठीण लांकडाचीं ओबडधोबड हत्यारें व चामडें कमावि ।ा-करितां झाडाची साल त्यास पाहिजे होती.

यल्लापा नांवाच्या वैदूस औषधें तयार करण्याकरितां वनस्पतीं-च्या शोधासाठीं जावें लागत असे, म्हणून आसपासचा बराच भाग त्यानें पाहिलेला होता. तो म्हणाला ' येथून एका कोसावर लहान तळें आहे, त्यांतील पाणी चांगलें गोड व स्वच्छ आहे. शिवाय त्यांत रोही मासे अतोनात आहेत. एक वेळ जाळें टाकण्याचाच अवकाश कीं, सर्वांना पुरून उरतील इतके मासे एकदम मिळतील, ' हें सर्व खरें होतें. परंतु जाळें नसल्यामुळें करतात काय. यल्लापाजवळ जाळें नव्हतें, पण तें थोड्या वेळांत कसें करितां येईल हें त्यास ठाऊक होतें, म्हणून तो पुनः म्हणाला ' बरं कांहीं चिंता नाहीं. पुष्कळ जवस उगवतो असें ठिकाण मला माहीत आहे; तर मग दोन तीन हुशार माणसें मला द्या, म्हणजे तेथून जवस काढून वाळवून त्याच्या दोऱ्या वळूं, आणि नंतर त्या दोऱ्यांचें जाळें तयार करून आजपासून तीन दिवसांचे आंत रगड मासे मी तुम्हां-स धरून देईन. ' ह्या कामासाठीं यल्लापाची बायको यल्ली तिची बहीण नागा आणि तीन मुलें अशीं त्याबरोबर गेलीं.

ह्या वसाहतीस लागणारे पदार्थ विकण्याचें दुकान होतें, त्यां

दुकानाचा एक भागीदार आनंदा नांवाचा होता. हा मोठा शिकारी होता; ह्मणून तो ह्मणाला 'त्या हरामखोरांनीं आपलीं कुत्रीं जरी राहूं दिलीं असतीं तर पुष्कळ शिकार घाबरवून निदान तीं मोकळ्या जागीं तरी आणितां आली असती.'

दगड नांवाचा दुसरा भागीदार ह्मणतो 'पण खुल्या जागीं येऊन उपयोग काय? जवळ बंदुका नाहींत, तर ती थोडीच आपल्या हातीं पडणार आहे.'

सटवाजी नांवाचा कसायाचा मुलगा ह्मणतो 'त्या दिवशीं बंदुकीशिवाय मी एक तित्तर मारिला. तेव्हां आनंदराव माझ्या तीरकमटयाला हंसत होते; पण आतां असा तीरकमटा असावा, असें त्यांना कदाचित फार वाटत असेल, नाहीं बरें?'

आनंदा ह्मणतो 'मुला तें असो. पण जर तूं मला उद्या एक तसा तीरकमटा आणून देशील, तर पहिला पक्षी मारीन तो तुझा, बरें का.'

दगड ह्मणतो 'तुझ्या तीरांनीं ससे मरतील असें मला वाटत नाहीं पण तूं ससा मारून आण तर खरा, ह्मणजे तुझ्या बापाच्या लोकांची टोपी करण्यासाठीं त्याचें चामडें मी तुला देईन.'

मुलगा ह्मणतो 'तुमचें कुत्रें एखादी साळू मारतील. ती मला द्या, ह्मणजे तुह्माला मी तिचें चामडें देईन, आणि ससा देखील मारून आणून देईन, काटेउंदराच्या कांट्यांनीं फार झालें तर तित्तरासारखीं पाखरें मरतील, परंतु त्यापेक्षां मोठी शिकार मारण्यास साळूचींच पिसें पाहिजेत.'

असें ह्मणून सटवाजीनें स्टोनच्या बायकोजवळ धांवत जाऊन तिजजवळून हरणाच्या आंतड्याची तात मागून घेतली. नंतर त्यानें कमटा करण्यासाठीं चांगलेंसें लांकूड पाहून तीरासाठीं लहान लहान असे लांकडाचे बारीक तुकडे गोळा केले. एखादा पक्षी मारून त्याचीं पिसें मिळेपर्यंत तीरास हरणाचे केंसच लावण्याचें त्यानें मनात आणिलें. त्याचा तीरकमटा तयार होत आहे, तों आनंदा जवळच्या टेंकडीवर चढला. व तेथून

आपल्या कुत्र्यांना बोलावण्यासाठीं बराच वेळपावेतों त्यानें मोठ्यानें शीळ घातली. कांहीं वेळानें टिपू नांवाचा कुत्रा लंगडत लंगडत त्याजवळ आला. टिपू अतिशय थकला होता, परंतु कांटेउंदराला शोधून बाहेर काढण्या पुरती त्याच्या अंगांत धमक होती. त्यानें एक कांटेउंदीर शोधून झुडुपांतून बाहेर पिटाळिला. तो बाहेर मैदानांत येतांच मंडळींनीं त्याला मारून त्याचे कांटे काढून घेतले, आणि दुसऱ्या दिवशीं चांगल्या खाण्याच्या पदार्थांची टंचाई पडल्यास त्याचें मांस रानटी लोकांप्रमाणें तयार करून उपयोगांत आणावें ह्मणून तो उंदीर त्यांनीं कप्तानाजवळ दिला.

ह्याप्रमाणें ही मंडळी गुंतली असतां, बाकीचे लोक कप्तानांच्या देखरेखीखालीं निरनिराळीं कामें करीत होते. आपल्या मेलेल्या सोबत्यांना मूठमाती देण्याच्या कामीं कांहींजण मदत देत होते; खाडा खोदण्यास त्यांजवळ कांहीं साधन नव्हतें; परंतु कडक उन्हाळ्यामुळें प्रेतें लौकर कुजण्याची भीति होती. ह्मणून तीं पुरल्याशिवाय फार वेळ बाहेर राहूं देणें बरोबर नव्हतें. तेव्हां दुसरा खाडा खोदण्याच्या भरीस न पडतां लांकडें करवतण्यासाठीं जो पूर्वीचा खाडा होता त्यांत तीं त्यांनीं एकत्र नीट ठेविलीं आणि वर रेती व माती घालून खाडा बुजवून टाकिला. कांहीं जण दगडांचा एक प्रकारचा तंदूर ( चुला ) करण्यास लागले होते; त्यांनीं रेताड जमीनींत खरवडून पहिल्यानें लहानसा खळगा केला, त्यांत बुडाशीं एक चिरा बसवून त्याचे चोहोंबाजूस खळग्याचे बाजूस टेकून अशा दगडाच्या चिपा बसविल्या; ह्या प्रमाणें एक दगडाचें कूंडच झाल्यावर त्यांत लांकडें जळत घातलीं, व दगड चांगले तापून लालभडक होत आहेत, तों हरणाचें कातडें काढून मांस तयार करून काळ्या दगडाच्या अणीदार टोंकानें त्याचे लहान लहान तुकडे केले. नंतर त्या कुंडांतून पडलेली राख व निखारा काढून त्यांत ते तुकडे घातले व तोंडावर दुसरी एक दगडाची चीप झांकण घालून तिजवर व सभोंवतीं रसरसित निखारे घातले.

हें सर्व मुलें भवळ जमून पहात होतींच; त्यांपैकीं एकजण ह्मणाला

' पण कायहो हें मांस चांगलें भाजून तयार होईल का? याला लावायला कणीक किंवा मीठ, कांहीं नाहीं. मला नाहीं वाटत, त्यांत फारसा रस राहील.'

दुसरा ह्मणतो ' अरे रसाचें नांव कशाला पाहिजे?' जो कांहीं थो. डासा त्यांत असेल तो चट सारा दगडांच्या फटींतून जमीनींत जाईल. बरें पण, आपण आज जेवणार कशांतून? आपल्याजवळ ना बशी ना थाळा. मी नाहीं बोवा कधीं थाळीशिवाय जेवलों.'

हें ऐकून आना ह्मणाली. ' तुला जेवायला थाळीच पाहिजे, तर असें पाठीमागें हात धरून उगाच उभें राहून कां ती मिळणार आहे? एखादी मिळवीत किंवा तयार करीत कां नाहींस? ती समोर नुकतीच दगडाची खाण काढिली आहेना ? तेथें तुझा भाऊ आणि तूं असे मिळून जा, आणि पहा, थाळ्या करण्यासारखे दगड मिळतात कीं नाहींत ते. मला तर खास वाटतें कीं, सर्वांना पुरे इतके दगड तेथें मिळतीलच मिळतील.'

तो मुलगा ह्मणतो ' अहो तेथें तर नुसते स्लेटीचे दगड आहेत. ते थाळीसारखे सपाट आहेत खरे, परंतु त्यांना कांठ कोठें आहेत? आणि फार तर काय, पण टिपूच्या परळाला सुद्धां कांठ होता, तर आमच्या थाळ्या कांठाशिवाय कशा चालतील?'

ती म्हणाली ' बाबा तें सारें खरें, पण मघांसीचना तूं म्हणाला होतास कीं, ह्या मासांत रस राहणार नाहीं म्हणून, तर मग कांठाची थाळी ती कशाला हवी?' हें ऐकतांच हरी थाळा मिळविण्यासाठीं त्या खाणीकडे दौडत गेला. त्यानें पातळ पातळ असे स्लेटीचे पुष्कळ तुकडे जमवून ते गवतानें घासून साफ केले. त्याच्या भावानें कठीण दगडावर स्लेटीचे जाड तुकडे आपटून त्याचे लहान लहान तुकडे केले व त्यांपैकीं धारदार असें पाहून त्यांचा सुरीप्रमाणें उपयोग करण्यासाठीं ते घेतले.

ह्या प्रमाणें थाळ्या व सुऱ्या ह्यांची ददात कांहीं अंशीं मिटल्यावर

भाऊनें त्या मुलांस फळें गोळा करण्यासाठीं हांक मारिली. आगेंत जाऊन तीं मुलें नारिंगाच्या व सफरजंगाच्या झाडांवर चढलीं. झाडांच्या हिरव्यागार गर्द पालवींत थोडींशीं नारिंगें राहिलीं होतीं, तीं त्यांनीं तोडून तिच्या हवालीं केलीं. त्याप्रमाणेंच द्राक्षीचा वेल वराच पसरला होता; त्यावर कांहीं द्राक्षांचे घड राहिले होते, तेही तिनें तोडून घेतले, आणि कोठें कोठें बेदाणा व सफरजंग चुकून राहिलीं होतीं तींही घेतलीं. त्या मुलांची बहीण बजी म्हणून होती. खालीं पडलेलीं फळें ती वेंचीत असतां तिनें जवळच्या झाडींतून * मधुहेचा आवाज ऐकिला, त्यावरून थोड-क्या अंतरावर तो पक्षी आहे असें तिनें ताडिलें. जंगली मधमाशा मध झाडांच्या पोकळ खोडांत सांठवून ठेवितात, तो मध खाऊन हा पक्षी राहतो. ह्या पक्षाला मधुदर्शक हीं म्हटलें असतां चालेल, कारण त्याला मधाचें पोळें सांपडलें कीं, तो असा स्वर काढतो, त्यामुळें आपोआप मध कोठें आहे हें लोकांना कळतें. बजूला मधुहेचा स्वर ओळखतां येत असे, म्हणून फळें वेचण्याचें टाकून ती कोणाला न कळत झाडीकडे चालती झाली. तिचा मनांत हें कीं, ह्या पक्षामुळें मंडळी जेवल्यानंतर कांहीं चांग-लेंसें त्यांना मुखशुद्धीला देतां येईल तर पाहावें. ह्या झाडावरून त्या झाडा वर मधुहा जात असतां ती पूर्वी पुष्कळ वेळां त्याच्या मागोमाग गेली होती; आणि चांगल्या निरभ्र दिवशीं जंगली मधमाशा मध आणावयास जातात, अशावेळीं पोळ्याजवळ त्या माशा नाहींत असें पाहून ती कधीं कधीं एकाद्या पानावर त्या पक्ष्याला थोडासा मध पोळ्यांतून काढून जमी-नीवर ठेवी, आणि बाकीचा मध घरीं घेऊन जाई. हा मध पाण्यासारखा पातळ व स्वच्छ असतो. हा वेळपावेतों तो मध मिळविण्यास तिला फारसा त्रास पडत नसे; तिच्या जवळ चिताऱ्याचा रंग देण्याचा कुंचला होता; तो स्वच्छ धुवून त्यानें झाडाच्या पोकळींतून ती मध शोषून बाहेर काढी,

* इंग्रजींत ह्या पक्ष्याला Honey cucko ह्मणजे मधुकोकिल ह्मणतात. मधहा ह्मणजे जो मधु नाहींसा करतो तो पक्षी ( वाग्भट, सूत्रस्थान, अध्याय ६ श्लोक ४४ पहा. )

आणि ज्यां चिनी बशींतून ती आपली न्याहारी करी तिच्या कांठावर तो कुंचला दाबला कीं त्यांतील सर्व मध बशींत पडे. परंतु आज तिचा कुंचला जळाला होता व बशी रानटी लोक घेऊन गेले होते. त्या झाडींत जाऊन तिनें त्या पक्ष्याला गांठलें खरें; परंतु जवळ कांहीं नसल्यामुळें ती मोठी विचारांत पडली आणि पक्षी तर फारसा न थांबतां उडत उडत पुढें च जाण्याच्या रंगांत होता. कांहीं वेळ विचार केल्यावर तिनें वाळले-ल्या गवताच्या ५।६ काड्यांची जुडी करून त्यांना पीळ दिला. ह्या काड्यांनीं कुंचल्यासारखाच मध निघूं लागला, तो तिनें पानांत धरला, परंतु थोड्याच वेळांत पानावरून घसरून तिच्या बोटांतून बहुतेक खालीं गळून नाहींसा होऊं लागला. त्यामुळें एकतर मध न घेतां जावें, किंवा दुसरी चांगलीशी युक्ति काढावी अशी ती घोंटाळ्यांत पडली. भांड्याप्रमाणें किंवा टोपलीप्रमाणें उपयोग व्हावा असें कांहीं देखील तिजजवळ नव्ह-तें. धड खिसाही नव्हता; फक्त पायांत जोडे होते, परंतु अनवाणी गेल्यास पायांस कांहीं चावण्याचा अगर दुखापत होण्याचा संभव होता. शेवटीं झाडांवर कांहीं तरी खूण करावी व मधुहा गेल्यानंतर केव्हां तरी येऊन मध घेऊन जावा असा तिनें विचार केला, व तांबड्या मातीच्या ढेंकळानें मधाच्या झाडांवर ती क्रसाच्या खुणा करूं लागली. सहा झाडांवर खुणा केल्यावर तिला थकल्यासारखें वाटलें, ह्मणून त्या पक्ष्यामागें जाण्याचें सोडून देऊन जवळच एक लहानसें तळें होतें, त्याच्या कांठाशीं ती जाऊन बसली. येथें पुष्कळ लव्हाळा उगवला होता, तो तोडून त्याची एक प्रकारची करंडीच ती विणायाला लागली. खेळांत आपल्या लहान भावासाठीं लव्हाळ्याच्या टोप्या ती करीत असे, त्यामु-ळें ती गुंफण्यांत मोठी तरबेज झाली होती. ह्या वेळीं तिनें एक तशीच मोठी टोपी तयार केली आणि आंतून रानअंजिराचीं मोठमोठीं पानें पाहून त्यांचा चांगला थर देऊन तोंडाशीं दोन काटक्या एकमेकांवर आडव्या बांधल्या. त्यामळें ती परडी नीट राहिली. हें पुरें होईपर्यंत तिचा थक-

वाही नाहींसा झाला, ह्मणून पुष्कळ मध आयता तयार आहे व तो आपल्या परडींत न सांडतां नीट नेतां येईल, ह्याचा आनंद मानीत मोठ्या उल्हासानें ती परत झाडांकडे वळली. दुसरे लोक मधांत बोटें घालून तीं चोखतील, तर त्याच उष्टया मधांत आपलीं बोटें घालून चोखणें प्रशस्त होणार नाहीं असें तिला वाटलें. परंतु तिला दुसरा कांहीं उपाय सुचेना. रानटी लोक पातळ पदार्थ खाण्यासाठीं कुंचल्याचा उपयोग चमच्याप्रमाणें करितात, तसा कुंचला करितां येईल तर पाहावें. असें तिच्या मनांत आलें. ज्या झाडांचे असे कुंचले करितात तीं झाडें ह्या प्रांतीं पुष्कळ होतात, आणि तिला तीं ओळखतां येत होतीं. त्यांचा देंठ तीन चार आंगळें रुंद असून फार पातळ असतो आणि त्यांत पुष्कळ शिरा असतात. बर्जीनें अणीदार दगड घेऊन असा एक देंठ मधोमध कापला, आणि कापलेली बाजू चांगली ठेचली, त्यामुळें त्या बाजूचे तंतू तंतू मोकळे झाले. नंतर त्या बाजूनें तिनें एकवेळ मध घेऊन खाल्ला तों तोंडभरे इतका मध त्यांत येतो असें तिला कळून आलें, ह्मणून तिनें तसले सहा कुंचे तयार केले, आणि मग पाहते तों सूर्य मावळूं लागला आहे. तेव्हां आपली मधाची परडी तिनें टांगली होती त्या फांदीवरून ती घाबऱ्या घाबऱ्या घेऊन घाईनें परत जाऊं लागली. झाडींतच रात्र पडल्यास कदाचित् हिंस्र श्वापदांच्या किंकाळ्या ऐकूं येतील अशी तिला धास्ती होती. झाडींतून निघून मोकळ्या जागीं येऊन पोंचत आहे, तों जवळच्या झुडपांत तिला खुडबुडल्यासारखें वाटलें. ती ओरडली नाहीं खरी, परंत भीतीनें ती अशी गांगरून गेली कीं, तिचे पाय लटलटां कांपूं लागले एकादा चित्ता नाहीं तर एकादा सिंह खास आपल्यावर आतां उडी घालील असें तिला वाटलें. एकदांचा धीर करून झुडपांत आगीसारखे लाल भडक डोळे कोणाचे दिसतात कीं काय हें पाहण्यासाठीं तिनें हळूच मान वळविली, तों भयंकर जनावर नसून फक्त आपला धनगराचाच कुत्रा आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. तो कुत्रा तिच्या संवयीचा असल्यामुळें तिला पाहतांच

तो आनंदानें भुंकूं लागला. तेव्हां 'जनावरांच्या डुरकण्यां ऐकण्याची जी तिला धास्ती होती ती जाऊन तिला ह्या भुंकण्यानें अतोनात आनंद झाला, आणि एकदांचा तिच्या जिवांत जीव आला. त्यांच्या मागून लागलाच खंडूही खांद्यावर एक कोंकरूं घेऊन आला. एका लांब टेंकडीवर एकटेंच चरत असतां त्याला तें सांपडलें होतें.

वजी ह्मणाली. 'हा तुह्माला लाभ झाला हें बरें झालें आहे, नाहीं?' परंतु तो उत्तर देत नाहीं व फारच दिलगीर आहे असें पाहून ती विचारूं लागली 'कां कांहीं भलतें सलतें झालें काय? राघूचे राम्या व गण्या खुशाल आहेतना?'

तो ह्मणाला 'होय, ते पहा पाठीमागून एका बैलाला हांकून आणीत आहेत ते; आणि वाटेंत ह्या मोत्यानें एक ससा जात असतां त्याच्यामागें लागून त्याचे कान धरले, तो ससाही राम्या धरून आणीत आहे.'

वजी ह्मणाली 'आपलें नसीब आज चांगलेंच आहे ह्मणावयाचें. पण तुमच्या तोंडाकडे पाहिलें तर इतकें नसीब उघडलें आहे असें कोणालाही वाटणार नाहीं. कां बरें तुह्मी असें उदासीन कां?'

खंडू ह्मणाला 'कां ह्मणून, काय सांगूं? हें पहा, हें नुसतें कोंकरूंच मिळालें त्यामुळें मला फार वाईट वाटतें. ह्याबद्दल मी देवाचे आभार मानीत नाहीं, ह्मणून वाटेल तर मला कृतघ्न ह्मणोत; परंतु खरेंच सांगूं कां, माझ्या बाकीच्या गुरांची मला आठवण होऊन तीं सारीं जवळ असावींशीं वाटतात. हें एकटें मिळालें, हें एक हिशेबीं बरेंच झालें. पण आज सकाळीं आह्मी शोधासाठीं ह्मणून गेलों, तेव्हां केवळ आपल्या मंडळींना खाण्यास नाहीं तें मिळवावें ह्या विचारानेंच कायते आह्मी निघालों होतों, तेव्हां माझ्या कळपाविषयीं मनांत मुळीं देखील विचार नव्हते. पण जेव्हां कां हें कोंकरूं बें बें करीत बागडत व उड्या मारीत आलें, तेव्हां मात्र माझीं दुसरीं कोठें आहेत हा विचार आला. वाटेनें त्यांचीं पावलेंही चांगलीं

दिसत होती, त्यावरून थोड्याच वेळेपूर्वी ती पुढें गेली होती, असें दिसत होतें. परंतु त्यांची सुटका आपलें हांतून न होतां बिचाऱ्यांना दुष्ट वाटेल तसें मारून टाकतील हें मनांत येऊन मला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. काल तिनीसांजेस मी आपल्या गाई घरीं आणून बांधिल्या आणि मेंढरें व कोंकरें मेंढवाड्यांत कोंडलीं, तेव्हां आज ह्या बिचाऱ्या कोंकराशिवाय कोणीही मजजवळ राहणार नाहीं, असें मला स्वप्नीं देखील वाटलें नव्हतें.'

त्याचें कसें समाधान करावें तें बजीला कांहीं केल्या समजेना, ह्मणून तिनें मुकाट्यानें कोंवळें कोंवळें गवत तोडून कोंकरास खाऊं घातलें.

कांहीं वेळानें ते सारे मुक्कामावर गेले. त्या वेळीं मंडळी खात बसली होती. साऱ्या दिवसांत त्यांना हें पहिल्यानेंच खावयास मिळालें होतें, तरीही त्यांनीं पुष्कळ हात राखून खाल्लें,व ते बहुतेक अर्ध्यापोटींच उठले असें ह्मटलें तरी चालेल. दुसऱ्या दिवशीं खाण्यास कांहीं मिळेल कीं नाहीं ह्याची त्यांना काळजी होतीच; परंतु कोंकरूं व बैल मिळाल्याचें त्यांनीं ऐकिलें तेव्हां मात्र त्यांनीं पुनः बसून पोटभर खाल्लें. सारा दिवस मेहनत करून त्यांनीं मोठ्या सायासानें हें जेवण मिळविलें होतें, ह्मणून नेहमींसारखें जरी मांस चांगलें तयार झालेलें नव्हतें, तरीही त्यांनीं तें मोठ्या आनंदानें खाल्लें.

कोंकरूं व बैल ह्यांची व्यवस्था लाविल्याशिवाय खंडू जेवण्यास येईना. मेंढवाड्याचें कुंपण ठिकठिकाणीं मोडून टाकिलेलें होतें, ह्मणून मिळालीं तितकीं लांकडें गोळा करून कुंपणाच्या खिंडींत तीं रचून ठेवून त्या कोंकराला त्यानें आंत कांडिलें व बैलाला गोठ्याचे ठिकाणीं बांधिलें. नंतर आपल्या कळपांच्या ह्या अवशेषाकडे पाहून दुःख मानीत तो स्वतः खाऊं लागला.

बजी फार वेळ आली नाहीं ह्मणून तिची आई गुजी (लिंबाजी लोहाराची बायको) व आना अशा फार काळजी करीत होत्या. परंतु ती काय करीत होती, हें कळल्यावर त्यांच्यानें तिला रागें भरवेना

तो मध व कुंचले कप्तानाजवळ देण्यास त्यांनीं तिला सांगितलें; कारण जें जें कांहीं मंडळी घेऊन येई तें तें सर्व कोठवळ्याप्रमाणें तो घेऊन ठेवी. 'वजे उत्तम कामगीरी केलीस बरें' अशी त्यानें तिला शाबासकी दिली, आणि शिवाय आपल्या वांट्याला आलेलीं फळेंही दिलीं. त्यानें तिला आपला वांटा दिला नसता, तर तिला फळें मिळतीना, कारण सर्वांना पुरे इतकीं फळेंच नव्हतीं. ज्यांच्या वांट्याला फळें आलीं नाहींत, त्यांसाठीं त्यानें तो मध राखून ठेविला, कारण मांसाशिवाय सर्वांना सारखें कांहीं तरी मुखशुद्धीला मिळावें असा त्याचा हेतु होता. कुंचले तर फारच नामी ठरले, आणि 'प्रत्येकाला एकेक असा कुंचला असावा' असें तो ह्मणाला ह्मणून वजीनें दुसऱ्या दिवशीं पुष्कळ कुंचले तयार करण्याचा बेत केला व आपण चांगले उपयोगी पडल्याबद्दल तिला मोठा आनंद झाला.

नंतर कप्तान ह्मणाला 'चला मंडळी, आतां बरीच रात्र झाली आहे, तर निजण्याच्या जागीं जाऊं या. जानु चल तुझा टेंभा पाजळून पुढें हो. यल्लापा व राघू हे मंडळीच्या मागून दिवट्या घेऊन येतील. बाकी सर्वांनीं आपआपल्या घरचीं बायकामुलें नीट संभाळून न्यावीं. जे अद्याप परत आले नाहींत त्यांशिवाय येथें कोणीही मागें राहूं नये. राहिलेल्या मंडळीसाठीं मी ह्या आगटींत ओंडे टाकून तुमच्या मागोमाग येतोंच. आगटी विझण्यापूर्वी ते परत आले नाहींत तर मात्र आज रात्रीं त्यांची व आपली भेट होणार नाहीं.'

असें ह्मणून त्यानें टेंभा पाजळून हातीं घेतला व सर्व मंडळीस तेथून पुढें लावून आपण मोठ्या हिंमतीनें वाट पाहत एकटाच मागें राहिला. वाटेनें जात असतां स्टोन हा आपला मित्र मागून येऊं लागला असेल ह्या आशेनें वरचेवर वळून पाही; परंतु निजण्याचे जागीं जाऊन सर्वांनीं आपआपल्या जागा अडविल्यानंतर, तासाभरानें त्या घाटांत त्याच्या टेंभ्याचा टिक-टिकणारा उजेड येत आहे असें मंडळीच्या दृष्टीस पडलें.

निजण्याची जागा चांगली मिळाली, म्हणून सर्व मंडळी मोठ्या खुषींत होती. परंतु ती जागा मुक्कामापासून एक कोस लांब होती, त्यामुळें त्यांना वाटलें कीं, 'अगोदरच आपण दिवसा कामामुळें दमून भागून जाणार, त्यास ह्या जाण्यायेण्याच्या दगदगीनें भर पडणार, हें कांहीं चांगलें नाहीं.' ह्या जागेंत दोन गुहा होत्या, परंतु बाहेर एकीचेच तोंड असून दुसरी तिच्या आंत होती. दोहों ठिकाणीं ओल नसून हवा बरीच खेळत होती त्यामुळें अंग धरण्याची किंवा गुदमरण्याची भीति नव्हती. परंतु त्या सखल असल्यामुळें तेथें फार वेळ टेंभा पाजळून ठेवण्याची मुळींच सोय नव्हती, मग आगटी पेटविण्याचें तर लांबच राहिलें. ज्यांनीं ही जागा सकाळीं शोधून काढिली होती त्यांनीं त्याचवेळीं आंतील गुहा मुंजाच्या केरसुण्या करून त्या केरसुण्यांनीं चांगली झाडूनझुडून साफ केली व तळाशीं वाळलेल्या गवताचा जाड थर पसरला. ह्या ठिकाणीं बायकामुलांनीं निजावयाचें असें ठरलें होतें. पहिल्यानें ह्या गुहेंत शिरून, बाहेरच्या मोठ्या गुहेंतून आंत आपण ज्या मार्गानें गेलों, त्याशिवाय तिला दुसरा मार्ग आहे कीं नाहीं, ह्याची स्टोननें खात्री करून घेतली, नंतर बाहेर येऊन त्यानें हातांतील टेंभा आपल्या बायकोच्या स्वाधीन केला, आणि तो म्हणाला 'बायकामुलें आपआपल्या जागा पाहून नीट व्यवस्थेनें निजेपर्यंत तूं हा टेंभा दुसऱ्या कोणाही निष्काळजी मुलामाणसाचे हातीं देऊं नकोस. तीं निजल्यावर मला हा परत देऊन तूं नीज. कारण न जाणो, भर करितां ह्याची एक ठिणगी खालच्या गवतावर पडली, तर आपल्याला ही चांगली आसऱ्याची जागा सोडून खास जावें लागेल!'

मुलांचे डोळे झोंपेनें पेंगतच होते, परंतु जसा टेंभ्याचा उजेड लख-दिशी आंत पडला, त्याबरोबर त्यांनीं डोळे उघडून गुहेच्या आंतील भींतींवर व वरती डोक्यावर स्फटिकाच्या कांड्या उजेडांत चकचकत होत्या त्या पाहून तीं म्हणालीं 'वः काय छान खोली आहे. आई ती पहा मना.'

एक लेंकुरवाळी बाई ह्मणाली ' घरीं जसें गुबगुबीत व मऊ अंथरुणावर आपण सुखानें बिनधास्त निजत असूं, तशीच बाई इथं पण झोंप ज्याचाला मिळेल, पण त्या पुरुष मंडळींनीं आगटी जाऊं देतां कामा नये.'

त्या दिवशीं सकाळीं ही जागा प्रथम पाहतांना जानूला जें समजलें होतें तें जर हिला कळलें असतें, तर ती असें बोलतेना. आंतल्या धुराळ्यावर सिंहाचीं कांहीं पावलें उमटलेलीं त्यानें पाहिलीं होतीं, परंतु ही गोष्ट बाहेर फोडली नाहीं हा त्यानें एक शहाणपणा केला. 'भाजूबाजूस कोणत्याही ठिकाणीं सिंह हिंडला नाहीं अशी जागाच सांपडणें कठीण आहे, त्याअर्थी ह्या जागेंत सिंह होता एवढ्यावरूनच मोठीशी हरकत नाहीं' असा त्यानें वास्तविक विचार केला. त्यांतून गुहेच्या तोंडाशीं चांगली आगटी असल्यास हिंस्त्र श्वापदांची मुळीं भीति नसते, हें त्याला पक्कें ठाऊक होतें. बाकीचे असाच विचार करून भीणार नाहींत अशी त्याला खात्री नव्हती, ह्मणून त्यानें कप्तानाशिवाय दुसऱ्या कोणासही ही गोष्ट कळूं दिली नाहीं. कप्तानांस कळविण्याचें कारण मिळून इतकेंच कीं, उजेडपावेतों आगटी राहण्यासाठीं पुष्कळ सर्पणाचा सांठा तयार राहवा.

कप्तान येऊन पोंचल्यावर सकाळच्याप्रमाणें ह्यावेळींही स्टोननें ईश्वराचे आभार मानिले.

दोन्ही गुहांच्या दारांत मधोमध उभें राहून सर्वांस एकूं जाईल अशा स्वरानें त्यानें प्रार्थना केली. तो ह्मणाला ' हे दीनदयाळ, सर्वशक्तिमान प्रभो, तुझ्या कृपेमुळें आजच्या महत्संकटांतून आम्ही पार पडलों, ह्यामुळें आमच्यावर तुझे किती तरी उपकार झाले आहेत. ज्याप्रमाणें ही वेळ दासविलीस त्याप्रमाणेंच आज रात्रीं आमचें संरक्षण कर.'

ह्याप्रमाणें आभार मानल्यावर तो व कप्तान असे उभयतां बाहेरच्या गुहेच्या तोंडाशीं आंतले बाजूस राखण करीत बसले.

राघू व आनंदा ह्यांस मध्यरात्र झाल्यावर उठविण्याचें त्यांनीं कबूल केलें होतें, कारण नंतर त्यांचा पाहरा होता.

# भाग दुसरा.

## संपत्ति ह्मणजे काय?

ते भागटीकडे पाहत बसले असतां कप्तान स्टोनला ह्मणाला: 'कसं काय हो? आजचा हा चमत्कारिक दिवस एकदांचा पार तर पडला. आतां तुह्माला कसं वाटतें बरं?'

त्यानें उत्तर दिलें 'मला सारें स्वप्नवत् वाटतें. आपल्या आजूबाजूला नजर फेंकावी म्हणजे सकाळपासून आपल्या काय काय दृष्टीस पडलें व कोण श्रम करावे लागले त्याचा विचार येऊन आज आपण काळचेच लोक काल्च्याच युगांत राहतों कीं काय, ह्याचा संशय वाटूं लागतो. एका रात्रींत आपण आर्यावस्थेंतून समाजाच्या मूळ स्थितींत जाऊन पोंचलों आहों असें वाटतें.'

त्याचा मित्र ह्मणाला 'होय, परंतु सुधारलेल्या स्थितींत जें आपल्यास ज्ञान होतें तें मात्र कायम आहे.'

पाद्री–तें खरें, आणि म्हणूनच ही संधि दवडतां उपयोगी नाहीं; कारण समाजाची वास्तविक संपत्ति कशानें होते आणि ती उत्पन्न होण्यास कशाचेंही साह्य न घेतां मनुष्यांचे नुसते श्रम कितपत साधनीभूत होतात, हें पहाण्याची हीच वेळ आहे.

कप्तान—मला फार फार वाटतें कीं, संपत्ति ह्मणजे सोनें, रुपें, नोटा असें म्हणणारे जे आहेत, त्यांनीं एक वेळ येथें यावें आणि पाहावें, आपल्या वसाहतींत त्यांच्या पैशाची काय किंमत आहे ती. आतां तर येथें हजार रुपये देऊन ही एकादी टोपी मिळावयाची नाहीं, किंवा नोटांच्या जुडग्यानें एकादा पाव देखील विकत मिळणार नाहीं. निदान येथें तरी, पैसा ह्मणजेच संपत्ति, असें नाहीं.

पाद्री–येथेंचसें काय, पण दुसऱ्या ठिकाणीं देखील हीच गोष्ट खरी आहे. ह्याला मी सोपा दृष्टांत देतो. विलायतेंत किंवा दुसऱ्या

वाटेल त्या ठिकाणीं एकाद्या ओसाड घरांत एकाद्या माणसाला कोंडून ठेवा, आणि बेलाशक त्याजवळ पैशांनीं भरलेली अशी एक मोठी थैली ठेवून द्या. मग त्या पैशांच्या मोबदल्यांत लागतील त्या जिनसा त्याला आपण घेऊं दिल्या नाहींत तर फार नको, दोन चार दिवसांतच उपास-मार होऊन तो मरूं लागेल. पण तेंच दुसऱ्या एकाद्या अगदीं कफ-ल्लक अशा माणसाला एका खोलींत कोंडून ठेवा, मात्र तेथें खाण्याच्या पदार्थांचा चांगला पुरवठा असूं द्या, ह्मणजे एक अठवडा अथवा पंधरवडा किंवा जितके दिवस तें अन्न पुरेल तेथपावेतों त्याला निर्वाह करितां येईल इतकी संपत्ति त्याजवळ आहे, असें आपण म्हणूं. आणि नाहीं तरी साऱ्या जगत्भर चोहोंकडे हीच कसोटी लागू पडते.

**कप्तान**—परंतु जोंपावेतों सोनें व रुपें ह्यांमुळें त्यांहून जास्त मोलाच्या जिनसा आपणास मिळूं शकतात, तोंपावेतों त्यांस संपत्ति ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं.

**पाद्री**—होय, तुह्मी ह्मणतां तें एक्या अंशीं खरें, परंतु जेव्हां सोन्यारुप्याचा उपयोग होतो तेव्हांच कायतें फार झालें तर ते संप-त्तीचे प्रकार होऊं शकतात. आणि तो प्रकार म्हणाल तर मोठा नसून तिच्या पुष्कळ अंगांपैकीं एक आहे. संपत्तींत पुष्कळ वस्तूंचा समावेश होतो, असें जमीन, घरेंदारें, कपडेलत्ते, मेजखुर्च्या, खाण्याचे पदार्थ वगैरे, आणि सोन्यारुप्यांचीं नाणीं किंवा ते पदार्थ मिळविण्याचीं नाण्यासारखीं कांहीं साधनें. जें कांहीं जिवंत असतें, वाढतें, किंवा उत्पन्न करितां येतें, आणि असें असूनही जें आवश्यक आहे, उपयोगी आहे, किंवा मानवकोटीस प्रिय आहे त्यास संपत्ति असें म्हणावें.

**कप्तान**—मग तर आपल्या वसाहतींतिल सर्व मालमत्ता नाहींशी झाली नाहीं, ह्मणून आपणाजवळ थोडी बहूत संपत्ति उरली आहेच ह्मणावयाचें.

**पाद्री**—आपण वस्तुतः गरीब आहों ही गोष्ट खरी, परंतु उत्तरेस

मोठें रण आहे, त्यांत जर कां आपल्यापाशीं गाडाभर सोनें असतें तरीही आपण तेथल्यापेक्षां हल्लीं येथें अतिशय श्रीमंत आहोंत असेंच मानिलें असतें. सोनें खर्च करून ही आसऱ्याची जागा व अन्न हीं कांहीं तेथें मिळालीं नसतीं, आणि तीं तर येथें हल्लीं आपल्यास मिळत आहेत.

कप्तान—शिवाय दुसऱ्यामद्धां पुष्कळ वस्तु येथें आहेतच. जंगलांत पुष्कळ जवस उगवतो, ह्मणून कपडे तयार होतील. आपल्या तावडींत येण्यासारखीं जनावरेंही पुष्कळ आहेत. त्यांचीं कातडीं वाळवून साफ करून त्यांचे बिछाने व चोगे करितां येतील, किंवा तींच रंगवून त्यांच्या टोप्या जोडे होतील, शिवाय कपडे खराब होऊं नयेत ह्मणून कारागीर लोकांस त्यांचे तुकडेही उपयोगी पडतील. आपल्यासाठीं टेबल खुर्च्या इत्यादि लांकडी सामानही आहेच, कारण तें तयार करण्याजोगें लांकूड जंगलांत वाटेल तितकें आहेच. तसेंच—

पाद्री ( मध्येंच )—अहो जरा दमानें घ्याल कीं नाहीं ! तुह्मी तर फारच घाई करितां. मी एवढें कबूल करितों कीं, तुह्मी ज्या गोष्टी सांगितल्या त्या सर्व आपल्या हस्तगत होतील; परंतु त्या आपल्याशा होण्याकरितां ह्मणजे त्यांस संपत्तीचें स्वरूप येण्यासाठीं, आपण अद्याप एका गोष्टीचा विचार केला नाहीं आणि ती तर त्यांत मिळविली पाहिजे. श्रमाशिवाय संपत्ति उत्पन्न होऊं शकत नाहीं, हें आपण विसरतां वरें; आणि कोणत्याही हलक्या वस्तूला संपत्तीचें स्वरूप येण्याकरितां तिला श्रम लागलेच पाहिजेत.

कप्तान—हें तर खरेंच. जवस गोळा करून वाळविला पाहिजे, नंतर पिंजारून विणला पाहिजे, ह्मणजे त्याचें पेहरण करितां येईल. तसेंच जनावरें मारून त्यांच्या कातड्यावर पुष्कळ मेहनत खर्च केली तर त्या कातड्यांचा अंगांत घालण्यांत अगर बिछान्यावजा उपयोग करितां येईल. लांकडाचीही गोष्ट त्याप्रमाणेंच. झाडें तोडून करवतीनें त्यांचे तक्ते पाडिले पाहिजेत, आणि ते नीट सुकवून तयार केल्यावर आपल्यास

त्यांची टेबलें व खुर्च्या मिळूं शकतील. परंतु ही गोष्ट खाण्याचे पदार्थांचे त्याग पडते असें नाहीं; निदान कांहीं [illegible] माझ्यानें श्रम [illegible] नाहीं असें वाटतें. तळ्यांतील मासे, आ[illegible]चीं फळें, असे पदार्थ मनुष्यांना खाण्याकरितां आयते तयार असतात. आपल्या हद्दींत जंगलीं फळें वाटेल तितकीं होतात, त्यांवर मनुष्यांना श्रम करावे लागत नाहींत, परंतु तींच आपल्याला संपत्तीप्रमाणें आहेत, असा आपला दररोजचा अनुभव आहे.

**पाद्री**—ह्याचविषयीं माझा समज निराळा आहे ह्मणून माफी असावी. फळें गोळा करण्याचे श्रम नाहींतका ? नारिंग तोडण्यास जोंपर्यंत कोणी आपला हात पुढें करीत नाहीं तोंपर्यंत तें त्याला असून नसून सारखेंच. आतां तळ्यांतील माशांविषयीं विचार करणें राहतो. परंतु आज सकाळींचना यल्लापानें रोहीं माशांबद्दल माहिती दिली, तिचा काय बरें उपयोग झाला ? याचा विचार करा, ह्मणजे झालें. तें तळें अगदीं नजीक आहे व त्या माशांवर आपल्या लोकांशिवाय दुसऱ्या कोणाचाही हक्क नाहीं ही गोष्ट अगदीं खरी आहे. परंतु त्यांना धरीपर्यंत ते आपल्या संपत्तीच्या वर्गांत येऊं शकत नाहींत.

**कप्तान**—आपल्याजवळ जाळें असतें तर हा वेळपावेतों ते आपल्यास मिळालेही असते.

**पाद्री**—जाळें नाहीं ही तर उणीव आहेच, परंतु त्याखेरीज श्रमही पाहिजेत. तळ्याच्या कांठावर जाळें अगदीं तयार पडलें आहे असें क्षणभर समजा, परंतु तेवढ्यानें आपल्या हातीं मासे पडले असें होत नाहीं; कारण जाळें पाण्यांत टाकून तें बाहेर ओढण्याची खटपट कोणीं तरी केली पाहिजेच. दुसऱ्याच्या मदतीशिवाय नुसत्या श्रमानेंच केवळ आपल्यास जें हवें तें सारें मिळूं शकेल असें कांहीं माझें ह्मणणें नाहीं. परंतु कोणतीही वस्तु मिळविण्यासाठीं दगदग केल्याशिवाय ती मिळत नाहीं असें मात्र माझें ठाम मत आहे. ह्मणजे काय कीं, श्रमाशिवाय संपत्ति उत्पन्न होऊं शकत नाहीं.

कप्तान—होय, हेंच खरें. तळ्यांतील रोहीं मेहनत केल्याशिवाय हहीं आपल्या उपयोगी पडूं शकत नाहींत. त्याप्रमाणेंच जेव्हां याहुदी लोक रानांत होते तेव्हां जर त्यांनीं *माना गोळा करण्याचे श्रम घेतले नसते तर त्याचा उपयोग त्यांना झाला नसता. आ पसरतांच आपोआप अन्न येऊन पडतें असें कोठेंही घडत नाहीं.

पाद्री—आणि यदाकदाचित असें मरी येऊन अचानक पडलें असतें, तरीही त्या माणसाला मान पाठीमागें वांकवून तोंड उघडलेंच पाहिजे. म्हणून तुम्हीच पहा कीं, कोणत्याही स्थितीची कल्पना केली तरी काय निष्पन्न होतें तें.

कप्तान—पण आपल्यासाठीं जें तयार होत आहे त्या मानानें आपल्या सर्व श्रमानें आपण किती तरी थोडें करूं शकतों? सृष्टिजन्य पदार्थ आपल्या उपयोगी पडावे म्हणून श्रमाची जरूर आहे, परंतु तेच पदार्थ तयार करण्यास नैसर्गिक शक्तीचा किती प्रभाव आहे. फार लांब जावयास नको. आज जे पदार्थ आपल्यास मिळाले त्यांबद्दलच विचार करूं या. मनुष्यांच्या हातांनीं हरणाचें मांस तयार झालें नसतें, तर तें आज आपल्या खाण्याच्या कामीं येतेंना. गोष्ट खरी, परंतु तें पूर्वींच किती तयार होतें, त्याची कल्पना करा. तें हरिण जें गवत खाई त्यामुळें कोण जाणें कशाप्रकारें तरी तें पोसलें गेलें; पुढें त्याचें मांस आपलें खाद्य झालें तेंही कसें झालें हें समजत नाहीं. आणि आपलीं शरीरेंही अशींच बनलीं आहेत कीं, त्या मांसामुळें त्यांना पुष्टी यावी; हें तरी झालें कसें? त्याप्रमाणेंच आगीमुळें मांस मऊ कां व्हावें हें कळत नाहीं. बरें तें असो, पण लांकडांनीं अग्नि जिवंत कां राहावा हेंही समजत नाहीं. लांकडें, विस्तव आणि हरिण हीं तिन्हीं एकत्र करणें आणि नंतर तयार झालेलें मांस खाणें एवढेंच कायतें मानवी श्रमामुळें झालें. बाकीचें सर्व स्वाभाविकपणें तयार होतेंच.

---

*जुन्या करारांत सांगितलेलें अन्न (Exodus Chaqter 16 verse 15.)

पाद्री—आणि वजीनें मंडळींना मजेदार मध खाऊं घातला त्याची तरी गोष्ट अशीच. पृथ्वी, वायु आणि दंव ह्यांमुळें फुलें उत्पन्न झालीं, त्यांतून मध गोळा झाला. मधमाशांची अवयवरचना व प्रवृत्तिही अशीच चमत्कारिक कीं, त्यामुळें त्या मध जमवून सांठवून ठेवितात; वरें मध राहण्याजोग्या झाडांच्या ढोलीं आयत्या तयार असतात हाही एक चमत्कारच. शिवाय वजीनें ल्व्हाळें, फांद्या व पानें ह्यांचा जो उपयोग केला तसा करण्याजोगे ते पदार्थ होते हाही कांहीं लहानसान योग नाहीं. विशेष रीतीनें ह्या जिनसा एकत्र जमवाव्या एवढेंच कार्य-तें तिचें काम होतें. आणि प्रत्येक गोष्टींत देखील ह्याप्रमाणेंच असतें. आपण एकादा माल तयार करीत आहों असें वाटतें, पण आपण वास्तविक करितों काय कीं, निरनिराळे पदार्थ एकत्र करून त्यांपासून एक निराळा मिश्र पदार्थ उत्पन्न करितों; ह्यापेक्षां आपण कांहीं देखील जास्त करीत नाहीं. ल्व्हाळ्याच्या करंडीचा माल मनुष्याच्या श्रमानें उत्पन्न झाला नाहीं, परंतु कागदाच्या करंडीचा माल मानवी श्रमानें झाला आहे असें आपण ह्मणतों. परंतु जरी कागद चिंध्यांचा होतो, तरीही त्या चिंध्या जमिनींत उगवणारा जो जवस किंवा कापूस त्यांच्या केलेल्या असतात. ह्मणजे वास्तविक मूळ पाहूं जातां सृष्ट पदार्थ व सृष्टींतील नियम ह्यांशिवाय कोणतीही गोष्ट घडत नाहीं.

कसान—त्याचप्रमाणें सशाच्या कातड्याच्या वास्कुटांचा माल मानव श्रमानें उत्पन्न झाला नाहीं असें आपण म्हणतों; आणि एकाद्या ऐटबाज गृहस्थाचें मखमलीचें वास्कुट सर्व प्रकारें मनुष्यांनींच केलें आहे, असें ह्मणण्याचा मात्र प्रघात आहे. परंतु मूळाशीं सृष्ट पदार्थ असतात, असें जें तुह्मी ह्मणतां तें येथेंही अक्षरशः खरें आहे; कारण किड्यांनीं काढलेलें रेशीम विणून मखमल तयार होते.

पाद्री—वास्तविक आहे तसेंच, आणि येथपावेतोंच मनुष्याच्या श्रमाची मजल पोहोंचूं शकते. सृष्टीच्या कृत्याला मनुष्य आपली भर घा-

रतो आणि ती भर नुसती चालनात्मक असते. सृष्टीजन्य पदार्थ तो एके ठिकाणीं जमावितो, परंतु त्यांचा एकमेकांवर कोणत्या रीतीनें परिणाम होतो हें त्याला कळत नाहीं. आगीच्या जाळांत तुह्मी टेंभा धरितां आणि तो पेट घेतो. राघू जमिनींत बीं पेरतो आणि त्याला मोड येतात. एकादी मुळी तो उपटून टाकतो आणि ती वाळून जाते. यल्लापा जख-मेला एकादी वनस्पती लावितो किंवा कांहीं औषध देतो आणि रोगी बरे होतात; परंतु रोगी मेला, तर मरण कसें थांबवावें हें त्याला कळत नाहीं. सालीच्या कसल्याशा पाण्यांत फुल्या चामडें भिजवितो, किंवा त्याला सालीचा कांहीं मसाला लावितो कीं, तें मऊ व उपयोगांत वे-ण्याजोगें असें होतें. फुल्याची आई कणीक, मीठ व थोडीशी ताडी एकत्र करिते कीं, कणीक भिजून चांगली तयार होते, आणि तीच कणीक धगधगीत आगींत घातली ह्मणजे खाण्यास योग्य होते. ह्मणजे एकंदरीनें पाहतां मनुष्य पदार्थ एकत्र करितो, परंतु ते सृष्टींत प्रथम उत्पन्न होतात आणि आपआपल्या गुणधर्मांप्रमाणें त्यांचा परस्परांवर परिणाम होतो.

**कप्तान.**—ह्यावरून मनुष्याला फारच थोडें करावयाचें असतें असें होतें, परंतु तेंच थोडकें अतिशय महत्वाचें आहे.

**पार्द्री.**—ज्या अर्थी मानवकृति आवश्यक आहे त्या अर्थींच तिला महत्व येतें. आणि सृष्टींतील भौतात्मिक शक्तींची सत्ता ठरलेली नस-ल्यामुळें मनुष्याच्या कृतीलाही अटक बांधतां येणार नाहीं असें ह्मण-ण्यास कांहीं चिंता नाहीं. आजपावेतों जें झालें आहे त्याकडे नजर फेंका. पूर्वी असा कधीं तरी काळ असावा—आणि ह्याविषयीं मला बिल-कुल शंका नाहीं—कीं, जेव्हां प्रत्येक राष्ट्रांतील लोकांचे मूळपुरुष जंगली फळांवर आपला उदरनिर्वाह करून गुहेचा आसरा धरून राहत असत. ह्या पलीकडे त्यांच्यानें जास्त कांहीं करवत नव्हतें. परंतु त्यांचेच वंशज हल्लीं व्यापारासाठीं माल तयार करितात, तारवें बांधतात, टोळेजंग इमा-

रती उभारतात, डोंगरावरून रस्ते नेतात आणि अशाच प्रकारच्या गोष्टी—ज्या त्यांच्या पूर्वजांना अद्भुत चमत्कार वाटल्या असत्या—त्यांच्या हातून होतात. आणि अजूनही जे ज्ञात आहेत त्यांचें ह्मणणें आहेच कीं, आपल्यास माहीत नाहीं अशा हजारों तऱ्हांनीं श्रम कामीं लावितां येईल.

**कप्तान**.—मला वाटतें आपल्या लोकांनीं ह्या वसाहतींतच रहावें, ह्मणजे आज जे आपण प्रथमच्या रानटी अवस्थेंत जाऊन पडलों आहों, ते आपण विलायतेंत आपले देशबांधव आहेत त्यांच्या सुधारणेस केव्हां जाऊन पोंचतों, हें आपल्यास कळून येईल.

**पाद्री**.—श्रमाचा उपयोग कसा करावा हें माहीत असल्यामुळें आपण लौकरच त्या सुधारणेस जाऊन पोहोंचूं. अमकी एक गोष्ट सिद्ध करण्यासाठीं वारंवार अनुभव घेण्यांत वेळ न दवडतां कोणती सुधारणा तींत झाली पाहिजे, हें आपल्यास समजत आहे. केवळ नुसत्या श्रमानें आपण काय काय करूं शकतों ह्याची मलाही मोठी जिज्ञासा आहे, आणि केपटौनहून हत्यारें येऊन आपल्यास तीं मिळतील, तोंपर्यंत नुसत्या श्रमावरच आपल्याला अवलंबून राहिलें पाहिले. ह्मणून आपण सर्वांनीं येथेंच राहावें असें माझ्या देखील मनांत फार येतें.

**कप्तान**—हत्यारें येण्यास पुष्कळ दिवस लागतील हें खरें, पण त्यांची मला मुळींच परवा नाहीं. आपल्याजवळून लुटून नेण्यास सध्यां कांहीं नाहीं, हें बुशमेन लोकांस ठाऊक आहेच, ह्मणून पुनः आपल्यापाशीं कांहीं मालमत्ता जमेपर्यंत त्यांचा हल्ला येणार नाहीं. तुह्मी व तुमचें कुटुंब अशीं दोघेजण आज मोठ्या आनंदानें होतां हें पाहून खरोखरी मला फार फार समाधान होत आहे. मालमत्तेसंबंधीं जितकें तुमचें नुकसान झालें तितकें दुसऱ्या कोणाचेंही झालें नाहीं. मी बोलून चालून एकटा असल्यानें अशा नुकसानीची मला विशेषशी क्षिती वाटत नाहीं, हें तर स्वाभाविकच आहे. पण एवढें नुकसान होऊनही यत्किंचित खिन्न झालां आहां असें तुह्मी मुळीं देखील दाखविलें नाहीं.

**पाद्री**—खरोखर ह्मणाल तर त्याचें आह्माला दुःख वाटत नाहीं. पण विलायतेंत आणि अशा ह्या आपल्या ठिकाणीं सर्वस्व जाणें, ह्यांत किती अंतर आहे ह्याचा विचार तुह्मीच करा. येथें फारच तुरळक वस्ती असून सृष्टिजन्य पदार्थांची इतकी रेलचेल आहे कीं, ईश्वराच्या कृपेकरून हल्लीं आमच्या व आमच्या मुलीच्या गरजा भागविण्यास आणि हळु हळु आरामाचे व चैनीचे पदार्थ मिळविण्यास आह्मास कायती मेहनतच केली पाहिजे, हें आह्मी जाणत आहों. शिवाय सारेजण सारख्याच स्थितींत असल्यामुळें स्वातंत्र्य जाण्याची अगर योग्यतेस कमीपणा येण्याची येथें भीति नाहीं. विलायतेची गोष्ट निराळी आहे. तेथें जर एकाएकीं संकट पडून आह्मी समाजांत खालच्या पायरीला जाऊन पोंचलों असतों, किंवा त्याहूनही वाईट अवस्थेंत ह्मणजे आम्हांस स्वतःचा चरितार्थ चालविण्यासाठीं दुसऱ्यांवर अवलंबून राहावें लागलें असतें, तर आह्मी धीर धरून राहण्याचा यत्न केला असता, परंतु आजच्यासारखे सुखासमाधानांत मात्र नसतों.

**कप्तान**—तुह्मा दोघांचीही शरीरसंपत्ति चांगली आहे, स्वतः उद्योगी आहां आणि समाधानवृत्तिही आहे. अशा प्रसंगीं ह्याच गुणांची मोठी अपेक्षा असते.

**पाद्री**—ईश्वराच्या कृपेनें आह्मांस समाधान मानण्यासारखेंच नेहमीं घडत असतें. मेहनतीसंबंधीं फरक मिळून इतकाच कीं, हल्लीं निराळ्या तऱ्हेचा उद्योग केला पाहिजे. जो मेहनत करणार नाहीं तो पोसला जाऊं नये, असें आमचें नेहमीं ह्मणणें आहे. पूर्वीं डोकें खर्च करून आमचें बहुतेक काम होत असे, सध्यां आह्मांस हातांनींही कामें केली पाहिजेत. आह्मी दोघेंही राबण्यास मनापासून तयार आहोंतच.

**कप्तान**—आणि श्रम करण्याची शक्ति येण्यासाठीं आतां थोडा वेळ निजलें पाहिजे. तर चला ह्या आगटींत आणखी चार लांकडें टाकून आपल्या पहारेकऱ्यांना उठवूं या.

नंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं वसाहतीच्या एकंदर कामाकाजासंबंधीं सर्वांनीं विचार करण्यासाठीं कोठें व केव्हां जमावें, हें ठरवून त्यांनीं राघू व आनंदा यांस पहाऱ्यावर बसविलें आणि आपण झोंपीं गेले.

---

# भाग तिसरा.

## स्वकष्टानें मिळविलेलें खावें.

ह्या लोकांवर अरिष्ट कोसळलें त्या दिवशीं ह्यांच्या उरांत धडकी भरली ती कांहीं समूळ नाहींशी झाली नव्हती, आणि पहिल्या दिवशींच खाण्यापिण्याची ददात टळते कीं नाहीं ह्याचा प्रत्येकास संशय होता; ह्या दोन कारणांमुळें आपलपोटेपणाचे कोते विचार एके बाजूस राहून सर्वांचें हित ज्यानें होईल तें पहाण्याकडे प्रत्येकाचें लक्ष लागलें होतें. 'आतां माझं कसं होईल' असे उद्गार लहान लहान मुलांखेरीज मोठ्यांपैकीं कोणीही काढिले नाहींत. 'माझ्या थाळीला कांठ नाहीं' ह्मणून एक मुलगा कुरकुर करीत होता ह्मणून मागें सांगितलेंच आहे, आणि ह्मणतात कीं, एक ३।४ वर्षांची लहान मुलगी 'माझी बाहुली मला पाहिजे' ह्मणून हट्ट धरून रडत होती. परंतु ज्यांना थोडेसें कळूं लागलें होतें, अशा मोठ्या वयाच्या मुलांनीं ह्या प्रसंगीं आपला स्वाभाविक पोरकटपणा टाकून दिला आहे असें दिसत होतें. तत्राप ही बुद्धि फार वेळ टिकली नाहीं, कारण मनुष्याच्या आयुष्यरूपी नागमोडी प्रवाहांत जातीस्वभाव कितीही छपविला, तरीही तो वळणावळणावर मधून मधून थोडासा दिसणारच. ह्या वसाहतींतील लोकांचे स्वभाव व कामधंद्यामुळें त्यांच्या पडलेल्या संवयी नाना प्रकारच्या होत्या; ह्याबद्दल त्यांना दोष देतां येण्यासारखा नव्हता. कारण पृथ्वीवर कोठेंही जा; इतके लोकांचा समुदाय जेथें जेथें ह्मणून असेल, तेथें तेथें स्वभाव व संवयी अशाच आढळावयाच्या. ह्मणून

पहिल्यां प्रथम जी सर्वांना सारखी धास्ती होती ती जशी निघून गेली व अडचणी जशा दूर झाल्या, तसें जणूंकाय ह्यांच्यावर अरिष्ट कोसळलेंच नव्हतें त्याप्रमाणें ते मूळ स्वभावावर जात चालले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपल्या स्थितीचा एकंदर विचार करून कोणते उपाय योजावे हें ठरविण्याकरितां मंडळी जमली, तेव्हां प्रत्येकाची कशी भिन्न भिन्न चित्तवृत्ति होती व त्यांची कशी वर्तणूक होत होती, हें नीट कोणी जर पहाता तर त्यास पुष्कळ चमत्कारिक असें आढळून आलें असतें. ह्या मंडळींत स्टोनशिवाय दुसरा कोणी ह्या दृष्टीनें पहाणारा नव्हता, ह्मणून त्यासच कायत्या ध्यानांत ठेवण्यासारख्या बऱ्याच गोष्टी कळून आल्या. कित्येकांस हा प्रसंग नवीन असल्यामुळें केवळ त्या प्रसंगाच्या चमत्कारिकपणानेंच त्यांस मोठी उमेद वाटून जोखमाचें काम हातीं घ्यावें असें त्यांस वाटलें, त्यामुळें ते मोठ्या हौसेनें आले आहेत असें दिसलें. ज्यांची विशेषशी किंवा मुळींच मालमत्ता नव्हती अशा मजूरदारांचाच ह्या हिंमती मंडळींत फार भरणा होता. शिवाय त्यांत कांहीं तरुण बांडही होते. हें तर स्वाभाविकच होतें, कारण तरुणपणीं आपलें नुकसान झाल्याबद्दल हळहळत बसण्यापेक्षां कांहीं तरी अंगमेहनतीचें काम करण्याचीच प्रवृत्ति असते. कांहीं जे ह्यातारेकोतारे व अशक्त असे होते, ते उदासीन व भयभीत असे दिसत होते, कारण त्यांना जी धास्ती होती तिजमुळें बरोबर सोबत व खाण्यापिण्याची सामुग्री घेतल्याशिवाय एकटेंच दक्षिणेकडे जाण्याचें किंवा तेथेंच जंगली लोकांच्या तडाक्यांत रहाण्याचें त्यांना धैर्य होईना. कांहीं असे होते कीं, दुसऱ्या कशाचीही विशेष परवा न बाळगितां केवळ आपला मोठेपणा कायम राखण्याविषयीं ते तत्पर होते असें दिसत होतें; अशी मंडळी स्वतःचे हक्क सांगत असे, एकादें काम आपल्या योग्यतेस कमीपणा आणील असें वाटल्यास तें पत्करीत नसे, आणि अशी वेळ मानापमान पाहण्याची नाहीं असें कोणी पर्यायानें सुचविल्यास लागलीच त्यांशीं भांडण्यास तयार होई.

वर जी मंडळी सांगितली त्यांत आनंदराव नांवाचा दुकानदार हा प्रमुख होता. त्याच्या गर्विष्ठपणामुळें हा मंडळीला मुळींच आवडत नसे. ' आमच्या दुकानीं दगडोबा हा थोरापासून तों लहानापर्यंत जीं गिऱ्हाइकें येतील त्या सर्वांशीं सारखाच मिसळून वागतो हें बरोबर करीत नाहीं ' अशी भागी केल्या दिवसापासून तो दगडूविषयीं कुरकुर करीत होताच. वास्तविक पाहतां असल्या चिकित्सकानें आपल्या भागीदाराचे आणखी कांहीं दोष काढले नाहींत, हें एका प्रकारें दगडोबाच्या चांगुलपणाचीच ग्वाही देतें. गिऱ्हाइकी मिळण्याकरितां लोकांमध्यें साखर पेरण्यांत आणि ' मालाची किंमत अगदीं उतरतां येत नाहीं, धर्माला स्मरून आह्मी आपला व्यापार सचोटीनें करितों, आपला उदार आश्रय न मिळेल तर आमचा व्यापार बुडेल ' असें भांगण्यांत आनंदा अगदीं कमी करीत नसे. परंतु गिऱ्हाइकांशीं हांजी हांजी करूनही तो प्रसंगीं उद्धटपणानें वागत असे. प्रत्येकानें कसकशी कोणकोणत्या कामाकडे मेहनत करावी हें कप्तान सर्व मंडळींना ह्या दिवशीं सकाळीं सांगत असतांना तर त्यानें फारच मग्रूरी दाखविली. ' मला शिकारीवर पाठवावें, कारण शिकार करून प्रतिष्ठित लोक आपली करमणूक करितात ' असें आनंदरावाचें ह्मणणें होतें. परंतु त्याजवळ बंदुक नव्हती व तीरकमठ्यानें शिकार करण्याचा त्याला अभ्यास नव्हता, ह्मणून कप्तानानें आनंदरावास सांगितलें ' तुह्मी शिकारीकडे गुंतूं नये. तीर मारण्यांत मुलें तरबेज असल्यामुळें त्यांसच शिकार करून द्यावी, हें बरें. दुसऱ्या कामांकडे जीं माणसें गुंतलीं नसतील त्यांनीं व तुह्मीं मिळून पाण्याचे पाट काढण्याचे कामीं लागावें, कारण पाण्याशिवाय पीक होणार नाहीं. ' त्या देशांत कडक उन्हाळ्याचे दिवसांत आसपासच्या ओढ्यांतून शेतांत पाटानें पाणी आणिलें नाहीं तर पेरणी जळून जाण्याची भीति असते. रानटी लोकांनीं हल्ला करण्यापूर्वी स्टोनच्या शेतापावेतों एक मोठा पाट खोदून बहुतेक तयार झाला होता. त्या

पाटांतून लहान लहान पाट काढून शेतांत ठिकठिकाणीं पाणी न्यावयाचें होतें. परंतु दीड एक महिन्यापर्यंतों वसंतांतील पाऊस ( आपल्या वर्षाऋतूच्या दिवसांत तिकडे वसंतऋतु असतो ) सुरू होण्याची आशा नव्हती, म्हणून शेताला पाणी अवश्य पुरविलें पाहिजे होतें. ही जागा सोडून दुसऱ्या ठिकाणीं वसाहत करावी असें जरी ठरलें असतें, तरीही वाटेसाठीं कांहीं खाण्याचा पुरवठा जवळ तयार होईपर्यंत त्यांना मुक्काम हलवितां येत नव्हता; कारण अशा रानटी देशांत वाटेनें खाण्या-पिण्याची सोय मुळीं देखील नसते. म्हणून हें काम करण्यास पुष्कळ लोक तयार झाले, परंतु **आनंदराव** ह्याच्या मनांत हें काम येईना.

**आनंदराव** म्हणाला 'काय **कप्तान**, खरोखरच तुमच्या मनांतून असें आहे कीं, नांगरे व कुंपण घालणारे अशा माणसांबरोबर पाण्यासाठीं पाट खोदण्याचें काम मी करूं लागूं. माझ्या वाटचें काम माझ्या जोगतें असल्यास मी तें करण्यास इतरांप्रमाणें तयार आहें, परंतु अशा मंडळी-बरोबर काम करण्याचा प्रसंग मला कधींही आला नाहीं.

**पाद्री**—मला असा प्रसंग आला नव्हता, परंतु वेळ न दवडतां काम करण्यासाठीं मीही जात आहेंना.

**आनंदा** आपला हेका सोडीना. तो म्हणाला—परंतु माझ्या प्रकृतीला ही गोष्ट मुळीं खपावयाचीं नाहीं, कारण अशा कामाची मला संवय नाहीं.

**कप्तान**—तुमचे भागीदार **दगडोबा** ह्यांना ह्मणजे अपल्या कामाची संवय होती असें नाहीं. ते तरी तुमच्या सारखेच आहेत. पण पहा त्यांनीं काम करण्याची सुरुवात देखील केली. आज सकाळींच ते आणि **जानू** असे दोघेजण मिळून त्यांनीं एक कठीण लाकडाचा ओंडा घेऊन तो त्या पलीकडच्या खाड्यांत करवतीचा तुटका तुकडा पडला होता त्यानें कसा तरी करवतला. नंतर त्या ओंड्याला आगीनें लाल भडक केलेल्या दगडांनीं जाळून त्याला फावड्याचा आकार आणिला, आणि त्याचा फावड्यासजा लख्ख चांगला उपयोग ते पहा करीत आहेत. तुम्ही जर

जाऊन त्यांजवळ तें पाखडें मागाल तर ते तुह्माला देतील. मग तुह्मी स्वतंत्रपणें एकटेच काम करूं लागा, ह्मणजे तुमचा अपमान होत आहे, असेंही वाटणार नाहीं, आणि त्या कुंपणांचे डांभे उपटून एकमेकांवर आडवे जमिनींत मारून पलीकडे ते लोक जसे मोठ्या शि-ताफीनें मातीचीं ढेंकळें काढून पाट काढीत आहेत त्याप्रमाणें त्यांबरोबर ही तुह्मास काम करावें लागणार नाहीं.

आनंदराव—खरोखर ह्मणाल, तर तुह्मी मला हें काम सांगूं नकाच. मला साजे असें दुसरें एखादें काम कृपा करून द्या. केपटौनला कोणी तरी पाठविणार आहां, तर मलाच कां नाहीं पाठवीत? मी तेथें जाऊन जें कांहीं तुह्मां सर्वांना पाहिजे तें आणि लागतील तीं आऊतें व हत्यारें पाठवून देईन. हें काम मी आनंदानें पत्करीन, आणि आपणा सर्वांच्या निकृष्ट स्थितीबद्दल सरकारास उत्तम प्रकारें जाहीर करून तीकडून कांहीं तरी मदत होण्याबद्दल चांगली खटपट करीन.

कप्तान—आह्मांस शेतीभाती करून राहिलें पाहिजे, ह्मणून आमच्या-सारख्या कृषि करणाऱ्या मेहनती मंडळीच्या तर्फे सरकारदरबारांत बोलणें लावयाला आपल्यासारखे उपयोगी पडावयाचे नाहींत असें मला वाटतें. शिवाय हें काम करण्यास गणू तयार आहेच, ह्मणजे तुम्हाला प्रतिस्पर्धी आहेच. तो गेल्यानें अडचण होईल ही गोष्ट खरी आहे, पण तो भक्कम चालणारा असून मोठमोठ्या मजला करतो, शिवाय त्याला आऊतें वगैरेंची चांगली माहिती आहे. आणि असल्या गोष्टींचा अनुभव नाहीं असें तुह्मी तर मवांशीच ह्मणत होता, म्हणून चांगलीं वाईट आऊतें कोणतीं हें तुम्हांस समजणार नाहीं. तर, मेहरबान, आपण असे बाजूला व्हा पाहूं. मला अजून दुसरीं पुष्कळ कामें करावयाचीं आहेत. आपण वाटेल तो उद्योग करा, पण हें मी आपल्याला साफ सांगतों कीं, आमचें काम करूं लागला नाहीं तर आपल्या खाण्यापिण्याची तजवीज आपण वाटेल तशी लावा.

हें ऐकून **आनंदा** जाऊं लागला, असें पाहून एक मजूर त्यास ह्मणाला—पाहिलें महाराज, आतां तुमचा काळ बदलला बरं. आह्मी यांच्यापेक्षां प्रतिष्ठित धंदा करितों असें वाटून दोन चार दिवसांपूर्वींच तुह्मी गुर्मींत होता नाहीं बरें. आणि आतां जेव्हां सर्वांचीच कसोटीस लागण्याची पाळी आली, तेव्हां पाहिलंतना आपला काय उजेड पडला तो. माझं पुर्वींपासून ह्मणणं होतंच कीं, वाणगटापेक्षां शेतकऱ्याची योग्यता जास्त, ह्मणून शेतकऱ्याला मानही जास्त पाहिजे.

**कप्तान**—हं हं मला बरोबर ऐकूं दे, काय ह्मणतोस तें. पण गड्या, मी तुला सांगूं का? तूं अगदीं केवळ चुकतोस. हल्लीं आपण ज्या स्थितींत आहों तिजवरून दोन चार दिवसापूर्वीं आपल्यापैकीं प्रत्येकांची योग्यता होती तिचें मान ठरवितां येत नाहीं. आज आपल्याला दुकान असण्याची जरूर नाहीं, ह्मणून जेव्हां विकत देण्यास व घेण्यास आपल्याजवळ माल होता त्यावेळीं ह्मणजे दुकान असणें ही गोष्ट चांगली नव्हती असें ह्मणतां येणार नाहीं. एकाद्या शेतकऱ्यानें शेती चांगली मेहनत घेऊन तयार केली ही गोष्ट समाजास जितकी इष्ट आहे तितकेंच **आनंदरावांनीं** आपला धंदा चांगला चालविला तर इष्ट होईल. त्या दोघांच्याही नुसत्या श्रमाचाच विचार करितां दोघेही सारख्याच योग्यतेचे, ही मात्र गोष्ट खरी.

तो मजूर पुनः ह्मणाला—पण पण कांहीं कांहीं दुकानदार पोकळ डौल मिरवितात असं मला माहीत आहे. त्याप्रमाणें कांहीं शेतकरी लोक नुसती प्रतिष्ठा मिरवीत नाहींत. उगाच शेखी मिरविणें हें कांहीं सभ्यपणाचें लक्षण नाहीं, असें मला वाटतें.

**कप्तान**—मला देखील तसेंच वाटतें. परंतु दुकानदारासारखेंच कांहीं कांहीं शेतकरी आपल्या माणसांशीं मोठ्या तोऱ्यानें वागतात, असेंही पण पाहिलें आहे. मीं जें नुकतेंच सांगितलें त्याशीं ह्याचा कांहीं संबंध नाहीं. मनुष्य जसा वागेल त्याप्रमाणें तो चारचौघांना आवडतो किंवा आव-

डत नाहीं, परंतु त्यामुळें श्रमकार ह्या नात्यानें त्याची समाजांत जी योग्यता असतें तिच्यांत कांहीं कमजास्ती होत नाहीं.

श्रमकार ह्या शब्दाच्या अर्थाविषयीं आनंदाची समजूत फारच कोती होती, म्हणून कोणत्याही प्रकारें आपल्याला श्रमकार असें ह्मटलेलें त्याला फारसें रुचलें नाहीं. हें बोलणें होत असतां कांहीं मंडळी तेथें होती, त्यांपैकीं कित्येकांची देखील अशीच वेडगळ समजूत होती, असें पुढें दिसून येईल. ह्यावेळीं काम अतिशय घाईनें झालेंच पाहिजे होतें, ह्मणून मंडळींना बोलण्याचालण्याला फावलें नाहीं; परंतु निरनिराळीं कामें करण्यांत हात गुंतले असतां त्या दिवशीं जें जें कांहीं घडून येत होतें, त्याजविषयीं पुष्कळांच्या मनांत विचार घोळत होते.

निदान पावसाळा जाईपर्यंत मुक्काम हलविण्याचा विचार तूर्त करूं नये असें त्यावेळीं लागलेंच ठरलें; कारण मध्यंतरी दुसऱ्या ठिकाणीं जाऊन वसाहत करण्यास त्यांना मार्ग नव्हता. शिवाय शेतांवर इतके दिवस खपून तीं अशींच टाकून देऊन जाण्यास त्यांचें मन होईना. ह्मणून बायका, पुरुष व मुलें हीं सर्वजण आपली स्थिति सुधारावी ह्या हेतूनें मनापासून व स्वसंतोषानें काम करूं लागलीं, आणि हत्यारांचा बहुतेक अभाव व काम करणारांची कमतरता ह्यामुळें जी उणीव होती ती आपल्या नुसत्या श्रमानें दूर करण्याविषयीं यत्न करण्याचा त्यांनीं निश्चय केला.

मोठ्या करवतीचे तुकडे सांपडले, ह्मणून बजीचा बाप ( हा लोहार होता ह्मणून पूर्वीं सांगितलें आहेच ) मोठ्या आनंदांत होता. उपयोगी पडेल अशी लहानशी करवत एकाची करतां येईल आणि दुसऱ्याची कुऱ्हाड होईल असें त्याला वाटलें. पण करवतीला मूठ पाहिजे, ह्मणून त्यानें दोन लांकडाचे तुकडे घेतले. त्यांना टोकांशीं जाळून आरपार भोकें पाडलीं व मधोमध जाळून खांचे केलें. नंतर करवतीच्या एका तुकड्याचीं दोन्हीं टोकें त्या खाच्यांत बसविलीं, आणि मागें सांगितलेल्या

चामड्याची वादी, समोरासमोर जीं लांकडांचीं भोकें होतीं, त्यांतून नेऊन लांकडें त्या तुकड्याला घट्ट आवळून बांधिलीं. फुल्या चांभार हा वाद्या कमवून त्यांना पीळ देण्यांत गुंतला होता, आणि तो भराभर अशा वाद्या तयार करीत होता, कारण जितक्या तो तयार करी तितक्या साऱ्या खपून जात. त्याच्या मदतीशिवाय झोंपड्यासुद्धां बांधतां येण्यासारख्या नव्हत्या, कारण खिळ्यांच्या ऐवजीं दोरखंडाप्रमाणें वाद्यांचाच उपयोग करावा लागत होता.

घरें कशाचीं बांधावीं त्याजबद्दल मात्र बराच विचार झाला. रात्रीं निजण्यापुरत्या चालचलाऊ झोंपड्या झाल्या, म्हणजे दररोज घाटांतून गुहेपर्यंत एक कोस जाण्याचे श्रम वांचतील. पूर्वीं जशीं चांगलीं लांकडें घालून मजबूत घरें बांधलीं होतीं, तशीं आतां बांधतां येण्यासारखीं नव्हतीं व त्याचें कारणही नव्हतें. परंतु हल्यारें येईपावेतों झोंपड्या देखील बांधतां येत नव्हत्या. ह्या वसाहतीस लागणारीं मडकीं व विटा नाऱ्या कुंभार करीत असे. चिकण मातीची खाण निघाली होती, म्हणून तो विटा पाडण्यासाठीं घाई करीत होता, आणि ह्यासाठीं त्याला दगड व लांकूड येवढ्याचीच कायती जरूर होती. परंतु नवीन तऱ्हेच्या झोंपड्या बांधाव्या असें ठरलें. त्या जलद बांधतां येण्यासारख्या होत्या. तद्देशीय लोकांच्या झोंपड्यांच्या भींती वेताच्या असून ते त्यांना आंतून व बाहेरून मातीनें लिंपीत आणि त्यांचें छप्पर झाडांच्या फांद्या व गवत ह्यांचें करीत. अशा झोंपड्या ह्या वसाहतींतल्या मंडळींसाठीं करण्याचें ठरलें. ह्याप्रमाणें सर्वांना म्हणून काम होतें. कांहीं जण पाट खोदीत होते, कांहीं चामडीं कमवीत होते, व कांहीं झोंपड्यांसाठीं झाडींत मोकळी जागा पाहून ती साफ करीत होते. कारण पायासाठीं जमीन खोदतां येण्यासारखी नव्हती, म्हणून झाडांशींच झोंपड्यांचे कोपरे साधण्याची जरूर होती. मुलें जमून माती खरवडून काढून तिचा गारा तयार करण्यांत किंवा वेत कापण्यांत, किंवा तीरकमटे करण्यांत गुंतलीं होतीं.

कांहीं बायका जवस तयार करीत होत्या, कांहीं शिजविण्यांत गुंतल्या होत्या, व कांहीं मुलीं बरोबर घेऊन आगटचासाठीं व छपरांवर घालण्यासाठीं काटक्या व पाचोळा गोळा करीत होत्या. कप्तान हा तर चोहोंकडे जाऊन प्रत्येक मंडळीला सल्ला, शाबासकी अगर देववेल ती मदत देत होता.

एका मंडळीकडे मात्र त्याचें लक्ष बिलकूल गेलें नाहीं, आणि तीही त्याच्याप्रमाणेंच कोणाच्या ध्यानांतच नव्हती. आदल्या रात्रीं वजीनें आणिलेली टोपली व चमच्यावजा कुंचले ह्यांविषयीं कप्तान जें बोलला तें तिनें ध्यानांत धरून त्यावर विचार केला. आपल्याबरोबर जीं लहान मुलें आहेत त्यांना तसे कुंचले करण्याचें शिकवूं शकेन, आणि भावांची मदत घेऊन चांगली मजबूत अशी टोपली मी तयार करीन, असा तिनें विचार केला. कारण अशा टोपल्यांचीच ह्यावेळीं फार जरूर होती. पाटासाठीं चर खणीत होते त्यांतील माती दूर नेण्याला फार त्रास पडत असे, ती नेण्यासाठीं हातगाडीही नव्हती, आणि हातगाडी करण्याचीं सर्व साधनेंही नव्हतीं. ह्मणून गाडीच्या ऐवजीं टोपल्या असल्यास सर्व माती चांगले रीतीनें नेतां येईल, कारण टोपल्यामुळें गाडीसारखें झपाट्यानें काम होणार नाहीं असें तिला वाटल्यावरून ती व तिचे भाऊ असे मिळून त्यांनीं रानांत डाहाळ्या गोळा केल्या. नंतर तिनें तळ्याच्या कांठीं जाऊन लव्हाळे आणिले, आणि मग सारेजण टोपली करूं लागले.

टोपली उभी राहण्याजोगें दृढ भक्कम करण्याला आपल्याजवळ साधन नाहीं, असें तिला आदल्या दिवशीं कळलें होतें, ह्मणून ती त्यावेळीं तशी टोपली करण्याच्या भरीस पडली नाहीं. पूर्वीं ज्याप्रमाणें डाहाळ्या वाकवून टोपली तयार केली होती, त्याप्रमाणें आतांही त्या वाकवून बांधिल्या. मात्र ह्यावेळीं त्यांचा घेर मोठा होता. ही टोपली तयार झाल्यावर ती चाळणीसारखी दिसली असती. चांगली

मजबूत डाहाळी घेऊन ती वर्जीनें टोपलीच्या कडेला घातली. आणि त्या कांठाला दुसऱ्या खालच्या डाहाळ्यांचीं टोकें नीट चांगलीं जनवून बांधलीं. टोपली उचलण्यास सुलभ पडावें ह्मणून त्या कांठाला डाहाळ्यांचे दोन हात करून त्यांचीं टोकें कांठाच्या डाहाळींत नीट वेटाळून आंत अडकवून टाकिलीं, ह्यामुळें टोपली उचलतांना ते आपोआप सुटून हातांत येण्यासारखे नव्हते. लव्हाळ्याच्या पट्या डाहाळ्याच्या काड्यावरून गेल्या तेथें तिनें त्या काड्या बांधून टाकिल्या, आणि नंतर मधली सर्व जागा विणवेल तितकी विणून भरून काढली. तिचे सोबती व ती अशीं मिळून बराच वेळ डाहाळ्या वाकविण्याच्या नादांत होतीं, मग पुष्कळदां फसल्यावर त्यांना एकदांचा साधारणसा घाट देतां आला. परंतु फारींच लहान वयाचीं मुलें असल्यामुळें कांठाची डाहाळी पिळवटून चांगली मजबूत करण्याजोगी शक्ति त्यांच्या बोटांत नव्हती. एक वेळ तर ती अगदीं कांठ चांगला साधण्याच्या रंगांत होती, परंतु तिच्या लहान भावांनीं जीं टोकें हातांत घट्ट धरून ठेविलीं होतीं तीं एकदम सोडून दिलीं, आणि 'ताई आह्माला भूक लागली, आह्मी अगदीं थकून गेलों' असें ते ह्मणूं लागले. त्यावेळीं तर ती अगदीं रडकुंडीस आली; परंतु तिनें असा विचार केला कीं 'ह्यावेळीं ह्यांना थोडा वेळ विसावा घेऊं द्यावा हेंच बरें. तोंपर्यंत खाण्यासाठीं कांहीं मिळेल तर पाहावें. खाऊन थोडी हुशारी आल्यावर कदाचित पुनः मला काम करूं लागतील. आतां ह्या ठिकाणीं ह्यांच्यापेक्षां मला चांगली मदत मिळण्याचा बहुतेक वानवा दिसतो.' असा विचार करून तिनें आपल्या एका भावाला टोपलीच्या राखणीस बसविलें; कारण तेथें रानांत पुष्कळ माकडें होतीं, त्यांच्या हातांत ती टोपली सांपडली असती, तर ती मोडून तोडून पार नाहींशी होती. आणि दुसरा भाऊ बरोबर घेऊन कांहीं चांगलीं फळें मिळालीं तर गोळा करून आणावीं म्हणून गेली. थोडींशीं *स्ट्रॉबेरी अजून कांहीं कांहीं झाडांवर होतीं तीं घेऊन

* Strawberry.

नंतर *चेसनटच्या झाडांखालीं पुष्कळ फळें पडलीं होतीं तीं तिनें गोळा केलीं. जास्त फळेंही मिळण्यासारखीं होतीं. त्या झाडांवर पुष्कळ माकडें होतीं त्यांना दगड मारिले ह्मणजे चवताळून दगड फेकणारांवर उलट तीं फळेंच फेकून देत. त्याप्रमाणें त्यांनीं दगड मारून व माकडांच्या चेष्टा पाहून मनापासून हंसत हंसत बरींच फळें गोळा केलीं; नंतर फळें बरोबर घेऊन तीं परत आलीं. जे छोटे रावसाहेब आदल्या दिवशीं मासांत रस नाहीं ह्मणून खेत करीत होते, त्यांना ह्यावेळीं चांगली कडकडीत भूक लागली होती; पण त्यांनींच हट्ट घेतला कीं, 'चेसनट भाजल्याशिवाय मी फाक खाणार नाहीं जा.' खाण्यापेक्षां टोपलीकडेच बजीचें लक्ष विशेष होतें; परंतु आपला भाऊ आपल्यापेक्षां वयानें लहान आहे हें तिला समजत होतें, तशांतून ती सुस्वभावी होती, ह्मणून ती ह्मणाली 'बरं तर हीं फळें घेऊन जा आणि नवीन चुला केला आहे ना त्याजवळ हीं भाजून खा. आणि मग तुला परत यावेसें वाटलें नाहीं तर तेथेंच अस. आह्मी येथें खुशाल आहों आणि तिनीसांजे पूर्वीं आह्मी परत येऊं, ह्मणून आईला सांग बरं का! पण बाळ समजलास का, आह्मी काय करीत आहों हें मात्र कोणाला सांगावयाचं नाहीं बरं.' नंतर आपल्या दुसऱ्या भावाबरोबर कांहीं फळें देऊन ती ह्मणाली 'तीं पलीकडे मुलें कुंचले करीत बसलीं आहेत, त्यांना हीं देऊन कसा लौकर येतोस तो पाहूं'. तो गेल्यावर तिनें टोपलीकडे पाहिलें आणि आपल्या हातून ती होणार नाहीं असें वाटून तिनें उसासा टाकिला. पण तिला समोरच्या झाडींतून कोणी येत असल्याची चाहूल लागली ह्मणून वर पाहूं लागली तों **आनंदा** येत आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. तो खिशांत हात घालून मोठ्या डौलानें हळू हळू येत होता. त्याच्या मुद्रेवरून त्या दिवशीं जणूं कांय वमाहृतींत कांहीं तरीं मोठा सण असावा, असें कोणासही वाटलें असतें.

---

* Chestnut.

तो जवळ येऊन ह्मणाला–कायगे मुली, तूं काय हीं फळें खात आहेस? ह्यांतून मला थोडीशीं देशील का?

तिच्याजवळ फळांचा लहानसा ढीगच पडला होता त्याकडे बोट दाखवून ती ह्मणाली—हें काय विचारतां? तुह्मी हीं घ्या.

तो कांहीं वेळ मुकाट्यानें खात होता, नंतर तीं बहुतेक खाऊन पार केल्यावर तो ह्मणाला–हीं तुला कोठून मिळालीं?

**बजी**–त्या पलीकडच्या झाडाखालीं.

**आनंदा**–हीं फार नामीं आहेत, तर माझ्याकरितां थोडीशीं आणखीं आणून देशील का? आणि हा पहा तुझा भाऊही येत आहे. तूं फळें आणिलींस ह्मणजे तीं भाजून आणण्यासाठीं मी त्याला पाठवीन.

**बजी**—तर मग तुह्मीच हें सारं करा ह्मणजे झालें. आह्मी आतां फार कामांत आहोंत.

**आनंदा**—असं काय; पण कायग, तुमच्यासारख्या लहान मुलांना काम तें कसलें आहे? हं हं टोपली करतां होय. पण मी सांगू का, ही टोपली कधींही बसणार नाहीं, कारण हिला बूडच नाहीं.

ती ह्मणाली–उभी राहील अशी टोपली करण्याचें आमच्या मनांत नाहीं. 'पण हा आंगतूक एकदांचा जाऊन मला निवांत काम करूं देईल तर फार बरें होईल' असें तिला वाटूं लागलें.

तीं मुलें काम करीत होतीं, हें **आनंदा** स्वस्थ बसून पहात होता; पण त्यानें पाहिलें कीं बोटांत जास्त जोर असल्याशिवाय ह्यांचें काम होणार नाहीं, तेव्हां त्यानें पुढें सरसावून ह्मटलें 'थांबा मुलांनो, मी तुह्माला हात लावतों.' बजीनें मोठ्या आनंदानें त्याची मदत घेतली. पण जसजशी टोपली होऊं लागली तसतसें त्याचें मन त्या कामांत गढूं लागलें, ह्मणून टोपलीचा कांठ चांगला मजबूत होऊन टोपलीचा खोका तयार होई-पर्यंत तो त्यांना मदत देत होता.

**बजी** मोठ्या आनंदानें उडी मारून ह्मणाली 'आतां मी मोठ्या

आनंदानें तुम्हांला थोडीं फळें आणून देते. बाकीचें काम मी सहज करूं शकेन, कारण कायती आतां मधली रिकामी जागा विणून काढावयाची राहिली आहे, ती लौकर भरली जाईल. पण तुमच्याशिवाय माझ्यानें एवढी टोपली कांहीं तयार झाली नसती.'

फळें गोळा करण्यासाठीं ती गेली, तेव्हां बाकी ज्या डाहाळ्या राहिल्या होत्या त्या घेऊन आनंदा एक दुसरी टोपली करूं लागला. अगदींच रिकामें बसण्याची त्याला लाज वाटूं लागली, म्हणून आपलें खाणें स्वतःच तयार करण्याची किंवा साधारण मजुरांबरोबर राबण्यामुळें दरजा कमी होण्याची ज्यांत भीति नव्हती असें काम मिळाल्यानें त्याला आनंद झाला. माझ्या खाण्यासाठीं बजी खपत आहे त्यामुळें माझ्या मोठेपणास खलेल येत नाहीं, असें वाटून त्याला थोडें समाधान वाटलें; परंतु बिचाऱ्या बजीच्या मनांत ह्याची कल्पनाही नव्हती. त्यानें जसें आपल्यासाठीं काम केलें तसेंच आपण त्यासाठीं करीत आहों ह्यापलीकडे तिच्या मनांत कांहीं नव्हतें, आणि अशा कृतज्ञतेनेंच ती त्याचें काम आतां करीत होती.

तिन्हीसांज होऊं लागलीसें पाहून आपल्या सामानाची लौकर लौकर आटपाआटप करून तीं मुलें जाऊं लागलीं. कांहीं कांहीं गर्विष्ठ लोक भित्रे असतात, तसा कांहीं आनंदराव नव्हता. वारंवार जंगलांत संकटें पडून तो धीटावलेला होता, आणि त्याजवळ बंदूक असती तर रानटी लोक किंवा हिंस्र पशु यांच्या तडाक्यांतून आपला बचाव इतर शूर लोकांप्रमाणेंच तो सहज करूं शकला असता. अशा कामांत तो हार गेला नसता; परंतु हत्यारें जवळ नसल्यामुळें रात्र पडण्यापूर्वींच झाडींतून बाहेर पडावें, ह्यांतच शहाणपणा आहे असें त्याला वाटलें. मुलांबरोबर परत जावें हें त्याच्या मनास येईना, तसेंच त्यांचें कांहीं सामान स्वतः घेऊन जावें हें देखील त्याला आवडेना; म्हणून तीं मुलें बरीच पुढें जाईपर्यंत तो तेथेंच थांबला आणि नंतर खिशांत

हात घालून रिकामटेकड्याप्रमाणें इकडे तिकडे पहात एकदांचा मुक्कामावर दाखल झाला. ह्याच्याकडे पहाण्यास ह्मणून ज्यांना फुरसत होती, त्यांपैकीं कांहींजण स्थितीला न साजे असें ह्याचें आचरण पाहून गालां- तल्या गालांत हसूं लागले. खाणें मिळविण्यासाठीं ह्यानें यत्किंचितही श्रम केले नाहींत, असें ज्यांना वाटलें, त्यांना तर हा आपल्याबरोबर खावयास बसत आहे असें पाहून राग आला.

**कप्तान**— अहो साहेब मेहेरबानी करा आणि जरा दूर व्हा, पाहूं कसें. मला वाटतें आपण खिशांत खाना तयार ठेविला असेल. नसल्यास आपल्यास उपासी निजावें लागेल असें वाटतें. हे खाण्याचे पदार्थ मिळ- विण्यासाठीं ज्यांनीं मेहनत केली असेल त्यांसच ते खावयास मिळणार.

**मजी**—पण माझ्या टोपलीच्या कामीं **आनंदरावांनीं** मदत दिली, आणि दुसरी एक टोपली अर्धी मुर्धी त्यांनीं स्वतः देखील तयार केली आहे; ह्मणून मला वाटतें जेवणाचा माझा वांटा त्यांना मिळावा. कारण थोडी त्यांच्या वांट्याचीं व मला पुरत इतकीं फळें मला मिळालीं ह्मणून मला आतां अगदीं भूक नाहीं.

त्या लहान मुलीच्या शिफारसीवरून आपल्यास जेवण मिळावें हें **आनं- दराव**ाला न आवडून तो ह्मणाला 'चिप बस मुली, वेडी कोणी कडची. मी काय करीत होतों, ह्याच्याशीं कोणाचें आडलें आहे. हाताची व वेळेची थोडी मदत मागितली कीं, आपला वेळ कसा दवडला हें सांगण्याची पाळी मदत देणाराला यावी, ह्मणजे एक चमत्कारच ह्मणावयाचा.'

**कप्तान—आनंदराव**, मेजावर खाना खाण्यास बसल्यानें—

**आनंदा** (मध्येंच)—मेज ह्मणजे गवत होय असाचना तुमच्या बोल- ण्याचा अभिप्राय. खरोखर पवित्र शास्त्रांत ***नबुखदनेझर** ज्याप्रमाणें जेवत असे ह्मणून लिहिलें आहे त्याप्रमाणेंच आपल्याला जेवणाचा प्रसंग येण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

* **बाबेलान**चा राजा ( इ. स. पूर्वी ६०४।५६२ ).

कप्तान—तुह्मी मंडळासाठीं एकादें मेज तयार करून द्याल तर खरोखरी आम्ही सारेजण तुमचे फार फार आभारी होऊं. पण मी नुकतेंच ह्मणत होतों तें हें कीं, श्रमाशिवाय खाण्याचे पदार्थ मिळूं शकत नाहींत, ह्या सृष्टिनियमानुसार वर्तन करण्याचें ज्याअर्थी आपण सर्वांनीं कबूल केलें आहे, त्याअर्थी तुह्मी जेवण मागितल्यास तुह्मी आपल्या श्रमाचें वेतन मागतां असें होतें. जो कोणी श्रमकारांना मजूरी देतो त्याला जितपत् ते जबाबदार आहेत तितपतच तुह्मी आम्हांला जबाबदार आहां. तुमच्या जबाबदारीचा निकाल बर्जीनें आमच्याजवळ केला ह्मणून करडाच्या मांसाचा एक गोळा--गोळ्याच्या ऐवजीं तुकडा ह्मणतां यावें असें मला फार वाटतें—मी तुह्माला वाढूं कां? कां तुह्माला ससा पाहिजे?

पुनः आपल्याला सुरी व कांटा हीं केव्हां मिळतील ह्याचा मनांतल्या मनांत विचार करीत मुकाट्यानें खात आनंदराव बसला असतां एका पानावर थोडीशी स्ट्राबेरी त्याच्यापुढें मुखशुद्धीला ह्मणून बर्जीनें ठेविलीं. ह्याबद्दल त्यानें तिचे नुसते आभार मानिले असें दिसलें; परंतु कोणत्या तरी प्रकारानें जास्त उपयोगी व्हावें आणि त्यामुळें इतराप्रमाणेंच आपल्याला हक्क आहेत असें दाखवावें, किंवा जेथें कोणासच स्वतःबद्दल जबाब देण्याचें कारण राहाणार नाहीं अशा ठिकाणीं चालतें व्हावें, असा तो मनांत विचार करीत होता.

# भाग चवथा.

## हस्तकृति व बुद्धिकृति.

दोन प्रहरीं अतिशय उकडत असे, त्यामुळें फार त्रास होई, ह्मणून मागें सांगितलेंच आहे. जमीन भुसभुसीत होती, तरीही खोदण्याचीं साधनें चांगलीं नसल्यामुळें पाटाचे कामीं फारच सक्त मेहनत पडे. शेतांना पाणी पोंचलें पाहिजेच, नाहीं तर पिकाची धूळधाण होईल, हें त्या मंडळींना पूर्णपणें माहीत होते, ह्मणून सारा दिवस सकाळपासून तें

संध्याकाळपर्यंत एकसारखे पाटाकडे खपत; परंतु अशा मेहनतीनें शरीर-प्रकृति बिघडेल असें वाटल्यावरून निराळी व्यवस्था करण्यांत आली. नेहमींपेक्षां दोन तास पूर्वी उठून पहाटेस काम करावें, आणि दुपारीं तितका वेळ झाडाखालीं विश्रांती घ्यावी, असें त्यांनीं ठरविलें. ह्या विश्रांतीच्या वेळीं कांहीं निजत, आणि जे जास्त उद्योगी किंवा कटक असत ते लहानसान कामें करीत. जवस तयार करण्याचे कामीं त्यांनीं बायकांना मदत करावी, किंवा मध व फळें शोधावींत. वेताच्या काठ्या सारख्या लांबीच्या कापून झोंपड्या बांधतांना आयत्या उपयोगी पडतील असे त्यांचे भारे बांधून ठेवावे, किंवा तीरकमटे करूं लागावें. ही वेळ मोठ्या आनंदानें जाऊन मंडळीचा शीण पार नाहींसा होत असे, आणि त्याच वेळीं कायतें त्यांना एकमेकांशीं बोलायचालायला फावें; कारण कामाच्या वेळीं त्यांना फुरसत मिळत नसे, आणि रात्रीं फार थकून जात ह्मणून एकमेकांशीं बोलण्याला त्यांचें मनच होत नसे. स्टोन हा मंडळींतला होता, आणि गप्पागोष्टींसारख्या साहजिक व योग्य अशा उपायांनीं मंडळीच्या वृत्ति अवश्य उल्लसित ठेविल्या पाहिजेत, असें तो समजत असे; ह्मणून ह्या विश्रांतीचे वेळीं हा बोलूनचालून मौजेनें नेहमीं मंडळीचा वेळ घालवीत असे. मंडळीचे श्रम व्यवस्थेशीर निरनिराळ्या कामीं लागल्यानंतर थोड्या दिवसांनीं एका झाडाच्या खोडावर स्टोन कांहीं मंडळी घेऊन बसला होता. एका मोठ्या चेस्टनटाच्या झाडाखालीं हें खोड ओढून आणून टाकिलें होतें. त्यावर ऊन लागत नसे ह्मणून त्याचा काम करतांना बांकाप्रमाणेंही उपयोग होत असे. तेथें बसून ज्यांचे जोडे फाटून गेले होते त्यांच्यासाठीं तो लाकडी वाहणा करीत होता. लाकडी फळ्या घेऊन त्या करवतीनें कापवितील तितक्या पायांस बसतील अशा कापवून त्यांना वाद्यांचे तुकडे जडवून त्यानें त्या वहाणा तयार केल्या. ‘ जोडे नसल्यास अनवाणीं चालावें, कारण हल्लींच्या स्थितींत जोडे ह्मणजे ऐषआरामाचें एक कलम होणार, ’ असें

कांहींकांचें ह्मणणें होतें. परंतु स्टोनला हें कबूल होईना. तो ह्मणाला 'दादानो तरी खरें, पण येथें जमिनीवर पुष्कळ विषारी जनावरें आहेत. अनवाणी हिंडल्यास त्यांच्या दंशापासून अपाय होईल बरें.हल्लीं आपल्यापाशीं लाकडी तळवे व वरती कातडें असे जोड्यावजा पायमोजे मंडळीसाठीं करण्याइतकें चामडें नाहीं, ह्मणून पुष्कळ चामडें जमेपर्यंत जसजसे जोडे फाटतील तसतशा मी अशा वाहणा तयार करून देत जाईन. ह्या वाहणांपेक्षां लाकडी तळव्याच्या चामडी पायमोज्यांनीं बरीच ददात दूर होईल ही गोष्ट खरी, पण तोंपर्यंत तर ह्यांवरच चालविलें पाहिजे.' ह्याप्रमाणें तो बहाणा करीत असतां त्याची बायको त्याजवळच बसून त्याच्या डगल्याला मोठी चीर गेली होती ती शिवून दुरुस्त करीत होती. तिजजवळ सुई, अंगुस्तान किंवा कातरी ह्यांपैकीं कांहीं एक नव्हतें, ह्मणून कशा रीतीनें ती फाटका डगला दुरुस्त करते हें पाहण्याचीच मौज होती. स्टवाजीजवळ तीरांसाठीं साळूचीं पिसें होतीं, त्यांपैकीं एक पीस त्यानें तिला दिलें. तें पीस घेऊन तिनें चीरेच्या दोन्ही बाजूंला भोकें पाडलीं आणि त्यांतून सणाचा दोरा ओवून घेऊन कांहीं वेळानें ती चीर नाहींशी केली. ह्या दुरुस्तीनें तो चांगल्या डगल्याप्रमाणें दिसण्यांत सुबक राहिला नाहीं ही गोष्ट खरी, परंतु ह्या वेळीं ती मंडळी पोषाकासाठीं कपडे घालीत नसून फक्त शरीरें झांकण्यासाठींच घालीत होती, ह्मणून डगल्याचा थाट बिघडल्याचें कांहीं दुःख नव्हतें. आना बसली होती तिच्या पलीकडे यल्लापा बसला होता. मंडळीपैकीं कोणास अकस्मात दुखापत झाल्यास किंवा कोणी आजारी पडल्यास जवळ औषधांचा पुरवठा असावा, ह्मणून त्यानें वनस्पती व मूळें गोळा करून आणिलीं होतीं, तीं निवडून तो जातवार लावीत होता. साळूच्या पिसांचे जे तीर केले होते त्यांनीं शिकार घायाळ होई, परंतु ती खालीं आणण्याइतका जोर त्यांत नव्हता असें दिसून आल्यावरून यल्लापानें पिसांच्या टोंकांस विषाचें पाणी देण्यासाठीं एक विषदी तयार केलें. एका जातीच्या

सापाचें विष इतकें जालिम असतें की, लहानमोठें कोणतेंका जनावर असेना, त्यांत तें भिनलें कीं पुरें, लागलाच त्यावर अंमल व्हावयाचाच. हें विष तद्देशीय लोक आपल्या हत्यारावर चढविण्यासाठीं कसें पैदा करीत हें यल्लापाला माहीत होतें म्हणून त्यानें तें मिळवून जवळ नीट बंदोबस्तानें ठेविलें. अपघात होऊं नये म्हणून तो कोणालाही त्या विषाला हात लावूं देत नसे. सटवाजी हा तेथेंच जवळ बसला होता. तो जसजसे तीर तयार करी तसतसे यल्लापाजवळ देई, आणि यल्लापा त्यांचीं टोंकें विषांत बुडवून तीं चांगलीं वाळल्यानंतर ते तीर तो परत देई. सटवाजी शिकार मारून आणी आणि ती कसायाला सोंपी. नंतर शिकारीला ज्या ठिकाणीं तीर लागला असेल त्याच्या आजूबाजूचा भाग तो कसाई नीट चांगला कापून काढून टाकून देई. शिकार खालीं आणण्याची ही नामी युक्ति निघाल्यामुळें पुष्कळ तित्तर मारून आणिले होते, त्यांचीं पिसें कसायाची बायको उपटून एका बाजूला ठेवी. हीं पिसें वाळवून त्यांचे बिछाने वगैरे करण्यासाठीं ती नीट जमवून ठेवी.

ह्याप्रमाणें हे लोक काम करीत व मधून मधून एकमेकांशीं बोलत असतां त्यांनीं आनंदराव एका निशाणाला तीर मारीत दूर उभा आहे असें पाहिलें. त्याला पाहून यल्लापा म्हणाला—त्या दिवशीं कप्तान ह्या गृहस्थाला श्रमकार म्हणून म्हणाले ह्याचेंच मला आश्चर्य वाटतें.

पाद्री—आनंदारावला देखील मोठें चमत्कारिक वाटलें.मला त्याचें नवल नाहीं वाटत; पण निदान तुम्ही तरी ह्याला श्रमकार म्हणून म्हणूं द्याल असें मला वाटलें होतें. तो दुकानदार होता, ह्या दृष्टीनेंच कायती कप्तान ह्यांनीं त्या वर्गांत त्याची गणना केली होती, हें मात्र लक्षांत असूं द्या म्हणजे झालें.

यल्लापा—दुकानदार असतांना देखील त्यानें गृहस्थासारखेंच बहुतेक दिवस चैनींत घालविले असें दिसतें. त्याचा तो किरकोळ बांधा व ते नाजुक हात तर पहा, म्हणजे त्याला श्रमकार म्हणणेंच, वेडेपणा होय.

**पाद्री**—केपटौनमध्यें माल खरीद करून तो आपल्या गाड्यांत भरून आणवीत नसे काय? आणि आपल्या शेजाऱ्याजवळून धान्य वगैरे निरनिराळे जिन्नस ठोक विक्रीनें घेऊन किरकोळ विकीत नसे काय?

**यल्लापा**—होय तें खरें, पण त्यांत त्याला कोठें सक्त मेहनत करावी लागे. स्वतः डोंगरावरून गाडी हाकण्याचा प्रसंग त्याला आला असता, ह्मणजे त्याला सुख कळलें असतें. गाडीचीं चाकें एकदां गोट्यांत अडकून गाडी चालेनाशी झाली असती, ह्मणजे गाडीवानांस स्वतः जोर देऊन जशीं चाकें काढावीं लागतात तशीं ह्यालाही काढण्याचा प्रसंग कधींना कधीं तरी आला असता. तेव्हां समजलें असतें, स्वारीला काय आहे तें.

कसायाची बायको ह्मणाली—तो ज्या जनावराचें मांस विकी तें त्याला स्वतःच हलाल करावें लागलें पाहिजे होतें किंवा जें धान्य तो दुकानीं ठेवी तेंच मळणी करून तयार करण्याचा प्रसंग त्याला आला पाहिजे होता. कणसें झोडण्याचा भला जाड बडगा त्याच्यासारख्याच्या हातांत चांगला शोभता.

**पाद्री**—अशा मनुष्याला कोणत्या प्रकारच्या कामानें चांगली शिक्षा लागली असती, ह्याचा कांहीं आपण विचार करीत नाहीं. फक्त ह्याला श्रमकार म्हटलें असतां वावगें होईल कीं काय, हेंच काय तें आपल्याला तूर्त पाहणें आहे. कांहो **यल्लापा** हाताशिवाय दुसऱ्या प्रकारांनीं श्रम होऊं शकत नाहींत, ह्मणून तुह्माला वाटतें होय; आणि चांगली अंगमेहनत ज्यास लागली नाहीं व जें ओबड धोबड नाहीं अशा हाताच्या कामाला देखील श्रम लागले ह्मणून ह्मणावें कीं काय ह्याचा ही तुह्माला संशयच वाटतो, असेंचना!

**यल्लाप्पा**—माझें कांहीं असें ह्मणण नाहीं. मला वाटतें कीं मी बरीच मेहनत घेऊन काम करितों, तरी देखील त्यामुळें माझ्या हाताला घट्टे पडून ते खरमरीत होत नाहींत; कायतो ह्या वनस्पतींचा रंग मात्र

त्यांना लागतो आणि त्यावरून मी कष्ट करितों असें दिसतें. हिंदुस्थानांत पुणें शहरीं कलाबतूचें काम करणारे आहेतना? त्यांचें काम नाजूक आहे तरी ते कमी खपतात असें नाहीं.

कसायाची बायको स्टोनकडे वळून ह्मणाली—साहेब, तुमच्या मळ्याची गोष्ट एका बाजूला ठेविली, तरी देखील तुह्मी जें कांहीं करीत आहां तें पहातां तुह्मी आमच्यासाठीं रात्रंदिवस मेहनत करीत नाहीत असें जो म्हणेल त्याला खरोखरी पाप लागेल. कोणी आजारी पडला, किंवा दुःखांत असला किंवा कोणालाही रात्रीं बेरात्रीं तुमची सल्लामसलत घेण्याची असली, तर तुम्ही त्याला लागेल ती मदत देण्यास तयार असतां म्हणून तुम्हाला श्रमकार म्हटलेलें खरें वाटेल होय ?

पद्री—न वाटायाला काय झालें? हें पहा. जसे हातांनीं श्रम करावे लागतात, तसे बुद्धीचेही श्रम आहेतच. कोणीही वाटेल तें करो, मग त्यासाटीं लागणाऱ्या त्याच्या मेहनतीपुरताच विचार केला, म्हणजे तो श्रमकार आहेच.

आना—फार कशाला, पण आमच्या विलायतचा राजा देखील श्रमकार आहेच. पार्लमेंट सभेचे जे ठराव येतील त्यावर त्यानें कायती सही घातली व ह्यापलीकडे जरी कांहीं देखील केलें नाहीं तरी ही त्यानें लोकांसाठीं एक मोठीच गोष्ट केली असें म्हटलें पाहिजे; कारण त्याच्या सहीवांचून त्या ठरावाचा कायद्याप्रमाणें अंमल होऊं शकत नाहीं. जो मनुष्य—मग तो कोणीही असो—कायदे करण्यापैकीं हा एक अवश्य भाग करतो त्याला सही करतांना जरी मुळीं मेहनत झाली नाहीं, तरीही तो एक वरच्या प्रतीचा श्रमकार आहे असेंच समजलें पाहिजे.

पल्लापा—मग खरें म्हणाल, तर आनंदराव हा त्यापेक्षां पुष्कळ पटीनें जास्त मेहनत करीत असे. माल विकत घेऊन तो नीट सुरक्षित ठेवून मग विकीत असे, इतकेंच तो करीत असे असें नाहीं तर तो दुकानाच्या एकंदर देवघेवीचे हिशेबही चाख ठेवीत असे. पण कांहीं

म्हणा मला तर असें वाटतें कीं, शेतकऱ्याइतका कांहीं तो उपयोगी नव्हता, कारण शेतकऱ्यापासून आपल्याला खायाला धान्य मिळतें, आणि सर्व पदार्थांत अन्न हेंच अत्यवश्यक आहे.

**पाद्री**—ह्याच तुमच्या समजुतीप्रमाणें अंमल करण्याची ज्यांच्या अंगीं ( तुमच्यापेक्षां जास्त ) सत्ता होती त्यांनीं अशाच समजुतीनें पुष्कळ नुकसान केलें आहे. व्यापारांत जे श्रम लागतात त्यांची किंमत अर्थदृष्ट्या कृषीकर्माच्या श्रमापेक्षां कमी आहे, असें पुष्कळ राज्यांत ठरीव मत आहे. त्यामुळें झालें काय कीं, शेतकीला जास्त हक्क मिळून फाजील उत्तेजन मिळालें, आणि व्यापार व धंदे यांजवर पुष्कळ बाजी लादल्यामुळें नसत्या अडचणी उत्पन्न होऊन ते मागसले. परंतु हे राजकीय विचार अगदीं चुकीचे असून फार अन्यायाचे आहेत असें मला वाटतें. कारण दोन्ही प्रकारच्या श्रमांचें ऐक्य झाल्याशिवाय प्रजेचें कल्याण उत्तम प्रकारें साधत नाहीं. खाण्याचे पदार्थ उत्पन्न करण्याच्या कामीं मळणीकरणारा, दळणारा, व रोटीवाला हे शेतकऱ्या इतकी मदत देत नाहींत, ही गोष्ट खरी. परंतु तो जसा उपयोगी पडतो, तसेच ते देखील उपयोगी पडतात; कारण त्यांच्या मदतीशिवाय आपल्याला रोटी मिळावयाची नाहीं. ते सर्व धंदे करतात आणि त्यांतून किरकोळ रोटीविक्या तर व्यापारही करतो. एवढ्यावरूनच धान्याची पेरणी करणाऱ्या शेतकऱ्यापेक्षां त्यांची उपयोगिता कमी आहे हें म्हणणें केवळ वेडेपणाचें आहे.

**यल्लापा**--पण खाण्याच्या पदार्थांपेक्षां कमी महत्वाच्या वस्तूंची गोष्ट ह्याहून निराळी आहे, असें नाहीं तुम्हाला वाटत ? समाजांत शेतकऱ्यापेक्षां कोष्टयाची उपयुक्तता कमी नाहीं का ?

**पाद्री**—हाच आपला समाज घ्या ना. ह्यांत जे ९४ लोक आहेत त्यांपैकीं ९३ प्रत्येक दिवशीं सगळा दिवस शेतीभातींत गुंतले आहेत, आणि एक जो राहिला त्याला जवस तयार करून विणून कापड करि-

तां येत आहे व तें शिवून कपडेही करितां येतात असें समजा. आणि असा जो एक मनुष्य तो तुम्हीच आहां, असेंही घटकाभर धरून चला. तर मग तुम्हास झेंपणार इतकें काम नेहमीं राहील, आणि सारेजण तुम्हाला फार आवश्यक समजतील, असें नाहीं तुम्हाला वाटत? फार कशाला जर कां तुम्ही गेलां, तर सर्वांना गरज पडून तुमची पदोपदीं आठवण होईल. पण तेंच जर त्यांच्यापैकीं एक नाहींसा झाला, तर त्यांना आठवण राहील कीं नाहीं ह्याची शंकाच दिसते.

**यल्लापा** हंसत म्हणाला—तें खरें. पण बाकीच्या साऱ्या गोष्टींची ददात असूं द्यावयाची आणि आपल्याला लागेल त्यापेक्षां १५।२० पटीनें जास्त धान्य उत्पन्न करण्याकडे साऱ्यांनीं लागावयाचें, हा कोण मुर्खपणा?

**पाद्री**—ह्यांतकाय संशय. आणि अशा स्थितींत जर कोणी नांगर टाकून कोष्टयाचा किंवा चांभाराचा धंदा करूं लागेल, तर त्याचे सर्वजण आभार मानितील. नंतर एकानें शिंप्याचें काम करावें, असें आपल्याला वाटूं लागेल, आणि सरतेशेवटीं जेव्हां आपल्याजवळ बरेचसे आरामाचे पदार्थ होतील, तेव्हां आणखी कोणी एखादें दुकान काढील तर त्याचेही आपण आभारी होऊं; कारण दुकान असलें, म्हणजे आपल्यास पदार्थांची देवघेव करितां येईल. येथपर्यंत आपली मजल येऊन पोहोंचल्यावर शेतकरी लोकच कायते सर्वांपेक्षां जास्त उपयोगी आहेत, म्हणून त्यांना विशेष मान व हक्क असले पाहिजेत असें जर आपण ह्मणूं लागलों, तर आपला कृतघ्नपणा व मुर्खपणा होणार नाहीं काय?

**यल्लापा**—हें बोलायाला कशाला हवें? ह्या पक्षपाताचा परिणाम आपोआप दिसून येईल. यानें दुसरें तर कांहीं नाहीं, पण दुकानदाराला आपलें दुकान सोडून द्यावेंसें वाटेल, कोष्टी आपला माग टाकील आणि शिंप्याला आपल्या कातरीचा कंटाळा येईल व जो तो हातीं नांगर धरील. मग पूर्वींप्रमाणेंच आपली वाईट स्थिति होईल.

पाद्री—मोठमोठ्या राज्यांत देखील हाच परिणाम व्हावयाचा, पण लोक जास्त शहाणपणानें वागतात, म्हणून राज्यपद्धतीचा अंमल व्हावा तसा होत नाहीं. कपडेलत्ते, खुर्च्यामेजें वगैरे आरामाचे पदार्थ जसे लागतील, तसे लोक विकत घेतात. मग खाण्याच्या पदार्थांपेक्षां त्यांची कितपत कमी योग्यता किंवा उपयोगिता आहे ह्याचा ते विचार करीत बसत नाहींत.

आना—डाव्या पायापेक्षां उजव्या पायाची जास्त योग्यता आहे, असा सर्वत्र समज आहे. आणि जर एखाद्याचा एक पाय जात असेल व कोणता पाय जाऊं द्यावा, हें त्याच्या मर्जीवर अवलंबून असेल, तर तो बहुशः डाव्यावरच संक्रांत आणील. पण चालतांना जास्त उपयोगी कोणता ह्याच्याविषयीं वादविवाद केल्यानें उगाच वेळ मात्र दवडला जावयाचा.

यल्लापा—तर मग सर्व प्रकारच्या श्रमांना सारखा मान दिला पाहिजे, व एकाला दुसऱ्यावर चढवूं नये, असें ह्मणतां होय?

पाद्री—छत्. असें कांहीं माझें म्हणणें नाहीं. आपला हा सटवाजी अक्रोडाच्या कवचीच्या सुरेखशा चिमुकल्या होड्या करतो, आणि त्या होड्यांचा नाळ व वराम नीट कोरून काढून तिच्यांत लाकडाची चीप बसवून होड्यांत एक मजला करण्याची हतोटी त्याला साधली आहे, पण ती साधण्यापूर्वीं त्याला किती तरी मेहनत व वेळ घालवावी लागली असेल बरें? तेव्हां हल्लींच जर तो एका आठवड्यांत आपल्यापैकीं प्रत्येकाला अशी एकेक होडी देऊं म्हणून त्या करीत बसला, तर सात दिवस अहोरात्र कांहीं काम न करितां आळशासारखा पडून राहिल्यास त्याला खायाला मिळण्याचा जसा संभव नाहीं तसेंच त्याला होड्या करूनही उपासी राहवें लागेल. हल्लीं आपल्याला अक्रोडाच्या कवचीच्या होड्यांची गरज नाहीं, म्हणून त्याचे अकारणीं लाविलेले श्रम गुळीं न. श्रम केल्याप्रमाणें आहेत.

हें ऐकून सटवाजी म्हणाला—पण मला कप्तान सांगत होते कीं, विलायतेंत कोणत्याशा एका शहरांत जर मी तशा होड्या करून विकूं लागेन तर माझा चांगला चरितार्थ चालून चार पैसेही मिळतील. अशा होडीचे दोन तीन रुपये यावेत, असें ते म्हणत होते.

**पाद्री**—कदाचित आले असते, पण तशा वेळीं तुझे श्रमही सकारणींच लागले असते. प्रत्येक देशांत श्रीमंत लोकांना लागेल तसें खायाला अन्न, अंगांत घालायाला कपडे व रहायाला बंगले असतात, म्हणून त्यांच्या इच्छेस आल्यास असल्या नुसत्या शोभेच्या वस्तू घेण्यांत पैसे खर्च करण्याचा त्यांना अधिकार आहे. आणि अशा सामाजिक स्थितींत आवश्यक धंद्यांत आपला विशेष नसल्यानें चैनीचे पदार्थ करण्याकडेच आपले श्रमाचा उपयोग करितात, असे कांहीं श्रमकार असतातच.

**आना**—विलायतेंत कलाबतू करणारे, जवाहिरी, पच्चीगर, कांचेवर काम करणारे आणि श्रीमंतांच्या करमणुकीसाठीं काचेचे दोरे काढणारे देखील प्रतिष्ठितपणें उद्योग करीत असतात, कारण त्यांच्या कामाचा तिकडे खप आहे. पण तसे लोक येथें काम करूं लागल्यास त्यांस कांहींही प्राप्ति न होतां उलट त्यांचा उपहास मात्र होईल. समाजाच्या एकंदर स्थितीला अनुलक्षून सर्व श्रमाच्या विनियोग झाला पाहिजे. आणि असे व्यवस्थित सर्व श्रम सारखेच प्रतिष्ठित असतात.

**यल्लापा**—पण बाई तुम्ही जो हा सिद्धांत ठरविला त्यानें उत्पादक व अनुत्पादक श्रम ह्यांतील भेद बहुतेक नाहींसा झाल्यासारखा होईल असें वाटतें.

**पाद्री**—तो भेद नाहींसा होण्यासारखाच नाहीं, कारण तो भेद वस्तुतः आहे; म्हणून केवळ मतानेंच त्याचा लोप होईल असें नाहीं. ज्यामुळें संपत्ति होते, त्यापैकीं कांहीं तरी जिनसा मनुष्याच्या श्रमानें उत्पन्न होतात कीं नाहीं, ह्या कसोटीनें जो पाहील त्याला हा भेद स्पष्टपणें कळून येईल. पण ह्यावर कांहीं श्रमाचा प्रतिष्ठितपणा अवलंबून नाहीं. तुम्हाला देखील माझ्या सारखंच वाटतं कीं नाहीं?

**यल्लापा**—उत्पादक श्रमकार ह्याची योग्यता अनुत्पादक श्रमकारापेक्षां जास्त आहे अशी निदान हा वेळपावेतों माझी समजूत आहे.

**पाद्री**—योग्यता ह्या शब्दाचा अर्थ तुम्ही जो समजत असाल त्यावरून आपण म्हणतों त्याचा निर्णय होईल. उत्पादक श्रमकार हे समाजाच्या संपत्तीला भर घालतात असें जर तुमच्या म्हणण्याचा हेतु असेल तर सकृद्दर्शनींच तुमचें ह्मणणें खरें आहे, व त्याबद्दल जास्त बोलण्याचें राहत नाहीं. पण प्रत्येक सुधारलेल्या देशांत उत्पादक व अनुत्पादक श्रमकारांचें सारख्या किंवा कमी अधिक प्रमाणानें मिश्रण समाजाच्या सुखास व उन्नतीस कारणीभूत होतें, हेंही आपण पहातोंच.

**आना**—घरकाम करण्यासाठीं चाकरमाणसें नसतीं; वैद्य, वकील, धर्मोपदेशक पाद्रीलोक व फौजफाटा नसता, पार्लमेंट सभा नसती, का स्वतःचें राज्य नसतें, तर इंग्रज लोक कांहीं तरी करूं शकले असते का? त्यांच्यांत कोणीही अनुत्पादक श्रमकार नसते, व सारे जण शेतकरी, गुराखी व गवंडी असते, तर त्यांजवळ पुष्कळ धान्य व गुरेंढोरें असतीं व त्यांनीं घरेंदारें केलीं असतीं, परंतु त्यांच्या देशांत शहरें नसतीं, व्यापार नसता, कायदेकानू नसते, किंवा राजा ही नसता. एकंदरीनें ते शुद्ध रानटी लोक असते.

**सटवाजी**—आपल्या वसाहतींचे लोक कांहीं रानटी नव्हते. असें असून आपल्यांत कोणीही अनुत्पादक श्रमकार नव्हता. जो तो सक्त मेहनत करीत असे.

**पाद्री**—आपल्या लोकांनीं कितीही झटून मेहनत केली, तरीही आपल्यांत उत्पादक श्रमकार व अनुत्पादक श्रमकार असे दोन वर्ग होतेच. ह्याप्रमाणेंच सर्व सुधारलेल्या समाजांत व्यवस्था असते. तूं थोडींशीं नांवें घे, ह्मणजे कोण कोणत्या वर्गांतील आहेत हें निवडून पाहूं.

**सटवाजी**—तर मग अगदीं खालच्याच प्रतीचे लोकांपासून सुरुवात करूं या. तुमच्या व राघूच्या शेतांत खपणारीं माणसें हीं उत्पादक

श्रमकार; कारण तीं आपल्यासाठीं धान्य, घोड्यांसाठीं गवत आणि आपल्या कपड्याकरितां जवस उत्पन्न करितात. हे लोक झाल्यानंतर आतां ज्यांना मजुरीवजा पगार मिळतो अशीं चाकरमाणसें घेऊं या. कप्तानाचा निरोप पोंचविणारा **माणुस**, आणि ( **स्टोन**च्या बायकोकडे वळून ) बाई तुमची ती मोलकरीण—हल्लीं ती तुमच्या मुलाला संभाळते, पण तुमचें घर होतें तेहां ती तें झाडूनझुडून साफ करीत असे,—नंतर तो **गबाजी**, **आनंदराव** बंदुक घेऊन शिकारीला जाई तेव्हां दुकानावर बसत असे तो—

**पाद्री**—हं चालूं दे, हे जे लोक सांगितलेस ते काय उत्पन्न करीत होते तें सांग पाहूं बरें?

हातांतला कमटा खालीं ठेवून **सटवाजी** विचार करूं लागला, परंतु मागाहून ज्यांचीं नांवें त्यानें घेतलीं होतीं त्यांनीं कांहीं उत्पन्न केल्याचें त्याच्या लक्षांत येईना; ह्मणून तो म्हणाला—हें खरेंच. घरकाम करणारीं चाकरमाणसें कितीही उद्योगी व उपयोगी असलीं तरी त्यांची अनुत्पादक श्रमकारांतच गणना केली पाहिजे, हें मी कबूल करतों. बरें पण आणखी पाहूं या. **फुलाजी** जनावराच्या अंगावरचें चामडें काढून त्याचेंच तो कमाविलेलें कातडें तयार करतो असेंचना? आणि जी पूर्वीं चिकण माती असते तिच्याच ना **नारायण** विटा पाडतो. आणि **लिंबाजी**· बरें पाहूं, नालबंद काय करतो बरें? तो घोड्यांना नाल बांधतो ह्मणजे त्यामुळें निराळें कांहीं उत्पन्न होत नाहीं. तर मग अनुत्पादक आहे असें वाटतें.

**पाद्री**—नालबंद ह्या नात्यानें अनुत्पादक खरा. पण तो लोहाराचें देखील काम करितो; ह्मणून लोखंडाचा गोळा किंवा कांब होती त्या लोखंडाचेच तो नाल, खिळे आणि नानाप्रकारचीं आउतें व हत्यारें तो तयार करूं शकतो.

**सटवाजी**—ह्यावरून तो दोन्ही प्रकारचा श्रमकार आहे असें होतें हें चमत्कारिक आहे. तर मग **यल्लापा**, तुम्हीही तसेच आहां, तुम्ही

औषधें तयार करितां, पण तुह्मी रोगी पाहून औषध देतां किंवा रोग्यांचें रक्त नस्तरानें काढतां तेव्हां तुह्मी अनुत्पादक श्रमकार असतां.

**पाद्री**—अनुत्पादक असतात खरे, पण त्यांची आपल्याला हमेष फार जरूर असते ह्मणून सर्वांपेक्षां ते अवश्य आपल्यांत असलेच पाहिजेत, असा ज्यांचा उपयोग व महत्व.

आपल्याला मोठेपणा दिला असें पाहून **स्टोन** ह्याचे आभार मानण्यासाठीं **यल्लापा**नें उठून त्याला लवून सलाम केला.

**सटवाजी**—तर मग एकूण माझे बाबा देखील अनुत्पादकच आहेत असें म्हटलें पाहिजे. ह्याचें मला वाईट वाटतें, कारण कसाई कांहीं तयार करितो असें माझ्या लक्षांत येत नाहीं.

**पाद्रानें** विचारिलें—तुला कां वाईट वाटावें? **कप्तान** ज्या वर्गांत आहे त्याच वर्गांत तुझे बाबा आहेत हें विसरलास वाटतें.

**सटवाजी**—होयरे हो—हें खरें—तर मग अनुत्पादक श्रमाविरुद्ध माझें कांहीं देखील ह्मणणें नाहीं, कारण **कप्ताना**पेक्षां जास्त मेहनत कोणाला पडत आहे, आणि त्यांच्यावाचून आपलें चालेल तरी कसें?

**आनानें** आपल्या नवऱ्याला विचारिलें—बरें पण, आपण कोणत्या प्रकारचे श्रमकार आहां असें वाटतें!—

तिच्या नवऱ्यानें उत्तर दिलें—जेव्हां मी * धर्मपीठावरून धर्माच्या चार गोष्टी सांगून उपदेश करितों व शाळेंत मुलांना शिकवितों, तेव्हां मी अनुत्पादक असतों. पण मी शेतांत खपतों, त्यावेळीं मी उत्पादक श्रमकार असतों. आतां कोणत्या प्रकारानें मी जास्त उपयोगी होतों हें ठरविणें मी माझ्या मित्रांकडे सोंपतों.

**यल्लापा**—एकंदरीनें तुह्मी ह्या विषयासंबंधीं आमची स्पष्टपणें समजूत घातली. उत्पादक आणि अनुत्पादक ह्या शब्दांचा संबंध संपत्तीकडे असून उपयुक्ततेकडे नाहीं हें आतां स्पष्ट झालें. अनुत्पादक ह्या शब्दानें दोषाचा

---

* Pulpit

आरोप होतो अशी माझी समजूत होती, त्याबद्दल मला आतां वाईट वाटतें. पण अशी चूक माझ्याकडून पुनः होणार नाहीं.

**पाद्री**—ह्या दोन जातींच्या श्रमकारांचें जें प्रमाण असेल त्यावर राष्ट्राची भरभराटी अवलंबून असते, हें मी आतां सांगितलें पाहिजेच. जे लोक खाण्याचे पदार्थ उत्पन्न करितात, कपडेलत्ते तयार करितात, घरेंदारें बांधतात आणि मनुष्याच्या उद्योगानें जे कांहीं आरामाचे व चैनीचे पदार्थ होऊं शकतील, तें करितात—अशी प्रजा असणें एकपक्षीं वाईट तर खरेंच, परंतु उत्पादक लोकांच्या श्रमानें जितक्या अनुत्पादक श्रमकारांचा चरितार्थ चालू शकेल, त्यापेक्षां जास्त अनुत्पादक लोक असूं देणें म्हणजे तर जास्त वाईट.

त्याची बायको म्हणाली—आपल्याच वसाहतीची गोष्ट ध्याना. आपल्यांत जर पुष्कळ जण शिपाइगिरीच करूं लागले, दोन तीन लोक नुसते धर्मोपदेशकच बनले, चार पांच लोकांनीं शस्त्रवैद्याचाच धंदा पत्करला, आणि प्रत्येक कुटुंबांत घरकाम करण्यासाठीं बरीचशीं चाकरमाणसें ठेवूं लागले, तर वसाहतीचा लौकरच अंत होईल. जोतो आपआपल्या धंद्यांत कितीही कुशल असला, तरीही ते सारेजण मिळून आपल्या सर्व मालमत्तेचा खाण्याचे पायीं फन्ना उडवून आपल्यास भिकेस लावितील, ह्यांत काडीमात्र देखील संशय नाहीं. हें जसें खरें आहे, त्याचप्रमाणें मोठ्या राष्ट्राची गोष्ट. सर्व प्रजेच्या ज्या कांहीं गरजा व माफक इच्छा असतील त्या पुऱ्या पाडण्यासारखीं त्या देशाचीं उत्पादक साधनें असतील, तरच त्या राष्ट्राची आबादानी राहील. ( मध्येंच दचकून नवऱ्याकडे वळून ) पण बाई, तो आवाज कसचा ?

तो आवाज शिंगाचा होता. तो ऐकतांच ही सर्व मंडळी एकदम उठून उभी राहिली. आपल्यावर शत्रू चाल करून येत आहे अशीच त्यांना कांहीं वेळपावेतों भीति वाटली; पण कांहीं गडीमाणसें त्या बाजूनें जात होतीं त्यांनीं सांगितलें ' परवां तो बैल मारला की

नाहीं; त्याचीं शिंगें जपून ठेवण्यासाठीं कप्तानांनीं त्या दिवशीं सांगितलें होतें, तें नाहीं तुम्हाला आठवत? आज त्यांनीं सर्व लोकांना एके ठिकाणीं जमविण्याकरितां त्यांपैकीं एकाचा उपयोग केला; त्याचा हा आवाज.' हें ऐकतांच त्या मंडळीची भीति नाहींशी झाली. ह्यानंतर कामावर जाण्याच्या वेळीं, निजून उठण्याच्या वेळीं, व निजावयास जाण्याच्या वेळीं शिंग वाजविण्याचा प्रघात पडला.

दोन तास विश्रांति घेतल्यावर कामावर जाण्याची वेळ झाली म्हणून स्टोन हा पाट खोदण्याच्या कामाकडे गेला, व बाकीचे आपआपल्या कामाला लागले.

# भाग पांचवा.

## मनापासून केलेलें काम.

ह्यानंतर कांहीं दिवसांनीं ह्या लोकांत जे कोणी विचारी म्हणून होते, त्यांना खाण्याच्या पदार्थांची बेगमी जास्त असली पाहिजे, असें कळून आलें, म्हणून ती कशी पुरी पाडावी, ह्याचा ते विचार करूं लागले. कुंपणाची नासाडी मागें झाली होती ती जातांयेतांना परशा कसायाच्या नजरेस पडे, आणि आपलें कसब दाखविण्याला कुंपणांत गुरेंढोरें नाहींत हें पाहून त्याला वारंवार वाईट वाटे. तो आपल्या बायकोला म्हणे— एखादा बकरा किंवा बैल हलाल करण्याचा सुदिन मला केव्हां येईल कोण जाणे? फांस करण्यासाठीं आपल्याला वाद्या पाहिजेत आणि त्यांसाठीं पुरत इतकीं कातडीं मिळणार नाहींत, तोंपर्यंत आपल्याजवळ गुरांचा कळप असण्याचें नांवच नको. कातड्याचा तुकडान् तुकडा कामीं लाविला असें फुलाजी सांगतो, म्हणून आणखीं जास्त कातडीं न मिळतील तर खंडुला व मला आपले धंदे सोडावे लागतील. कारण आतां आपल्या शेतांत गुरेंढोरें कोठून असणार व आपल्याला तरी ऊन ऊन मांस खायाला कसचें मिळतें.

त्याची बायको ह्मणाली—तर मग आपण रानटी लोकांसारखें कंदमुळें, फळें व मासे खाऊन राहिलें पाहिजे. एका पक्षीं मासे खायाला चांगले तर खरेच, पण आताशीं किनई बरेंच दिवस एकसारखे मासच चालले आहेत, त्यानें वाटतें साऱ्या वर्षभर * लेंटचे उपासच पडतात कीं काय कोण जाणे.

इकडे ह्याप्रमाणें हीं नवराबायको बोलत असतां आनंदराव व कप्तान असे दोघेजण एकीकडे खलबत करीत बसले होते; त्यामुळें कसायाला बहुतेक काम मिळण्यासारखें होतें व कुंपणांतही थोडींशीं गुरें येण्याचा संभव होता, आणि कांहीं काळानें त्याच गुरांची संख्या वाढून डोंगरावर चरण्यास नेण्यासाठीं एक स्वतंत्र गुराखी ठेवण्याचीही गरज पडली असती. आपली मानखंडना होऊं न देतां प्रतिष्ठित अशी कांहीं तरी नांव घेण्यासारखी कामगारी करून वसाहतीवर आपले उपकार होतील, असें आपल्या हातून कसें घडेल, हा विचार आनंदा एके दिवशीं करीत बसला असतां त्याच्या डोक्यांत ही जंगी कल्पना आली.

एके दिवशीं सहज फिरत असतां तो एका खाड्याच्या बाजूनें गेला. तो खाडा एका मैदानाच्या मधोमध असून दिसण्यांत निरुपयोगी असा होता. तो कशासाठीं केला असावा, हें त्यावेळीं कांहीं त्याच्या लक्षांत येईना. पण कांहीं कांहीं देशांतील लोक जंगली जनावरें पकडण्यासाठीं खाडे खोदून तोंडावर घास पाला वगैरे अधांतरी घालून आजबाजूच्या जमिनीसारखीच ती जागा दिसेल अशी तयार करितात, ह्मणजे तीं जनावरें फसून त्यांत पडतात, असें कोठें तरी वाचल्याचें त्याला नंतर आठवलें. त्यावरून त्याला वाटलें ‘ ह्या युक्तीनें आपण हरणें पकडूं शकूं. फार तर काय, पण रेडा देखील पकडतां येईल. रानटी बैलापेक्षां त्याला काबूंत आणण्यास जास्त प्रयास पडतील, व तो उग्र असून

* ख्रिस्ती लोक मार्च व एप्रील महिन्यांत ४० दिवस उपास करितात त्यास लेंट म्हणतात.

त्याचे अंगांत विलक्षण शक्तिही असते, तरी त्याला आपण मऊ करून टाकूं.' आपल्या नाजूक हातांनीं स्वतः खाडा खोदावा, असें त्याच्या मनास येईना, ह्मणून कांहीं माणसें त्या कामीं लावून खाडा तयार करवावा, ह्या हेतूनें तो कप्तानाजवळ माणसांची मदत मागण्यासाठीं गेला.

कप्तान ह्मणाला—पाटाचें काम दोन दिवसांत पुरें होईल. नंतर मी माणसें देईन. पाट जरूरीनें तयार झालाच पाहिजे, त्यांत व्यत्यय येतां कामा नये. तुमचा बेत सिद्धीस जाईपर्यंत, जें जें कांहीं मिळेल त्यावर मंडळींनीं गुजारा केला पाहिजे.

हें ऐकून आमच्या शिकारी साहेबांनीं विचार केला ' मीं तयार केलेल्या तीरांचा कसा उपयोग होतो व तीर मारण्यांत हुशारी आहे कीं नाहीं हें पाहण्याची वेळ आतां बरीक आली खरी. तर पाहूं या काय होतें तें? माझी फजीती झाली, तर ती सटवाजीखेरीज दुसऱ्यास कळणार नाहीं, आणि तो तर लोकांस सांगत बसणार नाहीं अशी माझी खात्री आहे. अंडीं कशीं मिळवावीं ही युक्ति त्याला मीं सांगितली, ह्मणजे तो आपोआप गप्प राहील.

ह्यावरून त्याच्या मनांत तीन निरनिराळे बेत होते असें दिसतें. ( १ ) रानह्मशी पकडण्यासाठीं खाडा करणें, ( २ ) लहानसान शिकार मारण्यासाठीं नवीन तऱ्हेचे तीर करणें आणि ( ३ ) शहामृगाचीं मोठीं अंडीं मिळविण्याचीं युक्ति अंमलांत आणणें. खरोखरी आनंदरावानें आपल्या बुद्धीचा चांगला उपयोग केला, असें ह्मटलें पाहिजे.

तो मनांत ह्मणूं लागला 'मला यश आल्यास मी प्रत्येकाचे उपकार यथायोग्य फेडून मोकळा होईन. नाऱ्या कुंभारानें मला हे वेत दिले, हें मला कबूल आहे. नेहमींचे तीर आहेत, त्यांपेक्षां ह्या वेतांचे तीर जास्त मजबूत व उपयोगी असे होतील. हरणाच्या तंगडीचे हाडाला किती धार असते हें परश्यानें मला दाखविलें, त्याबद्दल मी त्याचाही आभारी

आहे. आतां त्या हाडांचीं तीरासाठीं फळें करण्याचें त्याच्या लक्षांत आलें नाहीं ह्याला आपण काय करावें? त्याप्रमाणेंच त्या फळांना विष चढविण्याचें यश सर्वस्वीं यल्लापाकडे आहे. बरें, जर कप्तान असें ह्मणाले कीं' ह्या सर्व गोष्टी चतुराईनें एकत्र करून त्यांचा असा चांगला उपयोग केला, हें आनंदरावाशिवाय दुसऱ्याच्या हातून झालें नसतें, '' तर मग मी पाट खोदण्याचें काम करूं लागलों नाहीं,ह्मणून मागल्या आठवड्यांत पुष्कळ जण मला हंसले, त्याबद्दल मला यत्किंचितही वाईट वाटण्याचें कारण राहणार नाहीं. मला झाडांवर चढतां येत नाहीं ह्याचें मला वाईट वाटतें. नाहीं तर दुसऱ्या कोणाचीही मदत न घेतां मी अंडीं गोळा करून आणिलीं असतीं.

ह्याप्रमाणें विचार करीत करीत शिकार मिळविण्याकरितां तो माळा-वर गेला. रानम्हशींचा कळप नजरेस पडेपर्यंत कांहीं झुडुपाआड तो लपून बसला. कांहीं वेळानें पुष्कळ ह्मशी शेपट्या उडवीत व शिंगें हलवीत कांहीं दूर गेल्यावर त्यांपैकीं कांहीं माळावर चरूं लागल्या. एकादी चुकून आटोक्यांत येईल तर तिच्यावर नेम धरावा, असा आनं-दानें बेत केला. पण बराच वेळपावेतों त्याला मनाजोगता लाभ मिळाली नाहीं, आणि अखेर इच्छिल्यापेक्षा जास्त असेंच घडून आलें, त्यामुळें इच्छा केली नसती तर बरें झालें असतें, असें त्याला वाटूं लागलें. आमचे शिकारी जेथें लपून बसले होते त्या बाजूला सर्व कळपचा कळप धांवत येऊं लागला. रेड्यांच्या पायांखालीं तुडविल्यानें व शिंगानें भोंसकल्यानें काय होतें हें त्याला ठाऊक होतें.अशा अपघातानें पुष्कळ मनुष्यास जन्माची नुकसान झाल्याचें त्यानें पाहिलें होतें व बरेच जन्मास मुकल्याचेंही ऐकिलें होतें.ह्मणून जेव्हां तो कळप त्याकडे भरधांव येऊं लागला तेव्हां जवळच्या झाडांवर चढतां येईल तर पहावें असें त्याला वाटूं लागलें. थोडा जास्त वेळ असता तर त्यानें चढण्याचा यत्न-ही केला असता. परंतु वेळ निघून गेली. ह्मणून तो त्या झुडुपांत

अगदीं अंग चोरून बसला व जीव मुठींत धरून त्यानें बचावासाठीं केवळ दैवावर हवाला ठेविला. त्या कळपापैकीं दोनच टोणगे झुडपांत शिरले व आनंद्राजवळून तडाक्यानें पुढें निघून गेले, म्हणून गरीब बिचारा बचावला व त्याच्या जिवांत जीव आला. तो भितरा नव्हता म्हणून मागें सांगितलेंच आहे. जिवावरचें संकट टळलें हें पाहतांच तो पुनः हुशार झाला व माळाकडे पाहूं लागला, तों त्याला दोन टोणगे तीराचे पल्ल्यांत चरत आहेत असें दिसलें. ही चांगली संधि दवडूं नये, असा विचार करून त्यानें आपला एक अमूल्य तीर सोडला. तो एकाचे पुठ्ठ्याला लागला परंतु चामडी जाड असल्यानें आंत न शिरतां तो मोडून खालीं पडला आणि तो टोणगा चमकून शिंगांनीं व खुरांनीं जमीन रागानें उकरीत इकडे तिकडे धांवत धांवत कांहीं वेळानें भरधांव पळत जाऊन आपल्या कळपाला मिळाला.

आनंद्रा मनांत म्हणाला.—' झालें एकदाचें. एक तीर मात्र माझा फुकट गेला. पण त्याचें फळ मिळेल तर पाहूं या.. दुसऱ्या खेपेला असल्या जाड चामड्यावर नेम धरून उपयोगी नाहीं.'

तो पुनः आपल्या जागीं जाऊन दुसरी कोणती शिकार मिळते ह्याची वाट पाहत बसला. एक दोन तासांनीं शहामृगांचे थवेच्या थवे जात असतांना त्यानें पाहिले, परंतु ते बरेच लांब होते. ते पक्षी शिडाप्रमाणें हवेंत आपलीं पंखें पसरून जात होते,. तें पाहून त्याच्या मनांत त्या पंखांच्या खालीं नाजुक जागीं तीर मारावा असें फार आलें कारण त्या ठिकाणींच शहामृगांना मारण्याचें सोपें असतें. परंतु ते आपल्या लांबून जात होते, म्हणून तो स्वतःशींच पुटपुटूं लागला ' तुम्ही माझ्या तावडींत येत नाहीं पण काय चिंता आहे? तुमचीं अंडीं घेऊन तुम्हांवर ह्याचा सूड उगवीन, समजलांत '

सरते शेवटीं एकदांचा एक सांबरांचा कळप येतांना त्याच्या नजरेस पडला. हीं सांबरें फार मोठीं होतीं. ह्यांचा बांधा बैलाइतका मोठा

असून दिसण्यांत सुरेख असतो; मात्र बैलापेक्षां हे सुटसुटीत असतात. तो कळप येत आहेसें पाहून त्याला वाटलें कीं, 'आपल्या हातीं त्यांच्यातला एक जरी सांपडेल, तरी आज शिकारीस आल्याचें चीज होईल.' त्यांची लांबी ४।५ हात असावी व उंची ३-३॥ हात असावी, अशी त्यानें नुसत्या नजरेवरून अटकळ बांधिली, आणि प्रत्येकाचें वजन सुमारें ९।१० मण असतें, हें त्याला ऐकून माहीत होतेंच. त्या कळपांत १९ सांबर होते. ते मोजून तो मनांत ह्मणूं लागला 'ह्यांपैकीं एकही माझ्या तावडींत सांपडला नाहीं तर माझें दुर्दैवच समजलें पाहिजे.' कांहीं वेळ ते एकत्र राहून उड्या मारीत, कांहीं वेळ माळावर एकएकटेच असे धांवत व नंतर पुनः एकत्र होत; अशा रीतीनें त्यांचा कळपचाकळप जवळ जवळ येऊं लागला. दम धरून धरून आनंदा अगदीं कंटाळून गेला होता; परंतु पुष्कळसें नाचणें बागडणें झाल्यावर तो कळप अगदीं त्याच्याजवळून चरूं लागला. त्यानें कमटीच्या दोरीला एक तीर लावून दुसरे दोनतीन जवळच हातांशीं ठेविले. मनांत हें कीं, एकामागून एक असे मारवतील तितके सांबर मारावे. ह्याप्रमाणें सूं करीत सोसाट्यानें पहिला तीर निघून जवळच्या एका सांबराच्या मानेला लागला. तो धडपडत थोड्याशा अंतरावर जात आहे व कळप नीट सावध होत आहे, इतक्यांत त्यानें दुसरा तीर सोडला तो दुसऱ्या एका सांबराच्या पुठ्यांत शिरला. तें बिचारें पळालें, परंतु तीराचें विष रक्तापर्यंत जाऊन पोंचल्यास थोडक्याच वेळांत ते सांबर पडेल हें आनंदाला पक्कें ठाऊक होतें. त्यानें तिसरा तीर सोडला तो मध्येंच पडला, कारण तो कळप दचकून भरधांव पळत निघून गेला. मग हातांत दगडी कुऱ्हाड घेऊन सुरीप्रमाणें तिचा उपयोग करावा ह्मणून आनंदा आपल्या जागेंतून बाहेर त्या जनावरांजवळ आला. तीं बिचारीं मृत्यूच्या वेदनांनीं तडफडतच होतीं, तरीही त्यांच्या मानेवर बसून त्यानें त्या कुऱ्हाडीनें त्यांचे गळे

आपले. जीव गेला असें पाहून त्यानें जेथें तीराचें फळ शिरलें होतें, त्याच्या आजूबाजूचा व आंतला सर्व भाग नीट कापून काढून टाकून दिला. आणि मग शिकार साधल्याच्या खुणा ह्मणून त्यांचीं शिंगें घेऊन तो मुक्कामावर जाऊं लागला. रात्र पडण्यापूर्वी शिकार मुक्कामावर जाऊन पोंचली पाहिजे होती, तेव्हां त्याला वेळ अगदीं दवडतां येत नव्हता. ह्मणून शिंगें डोक्यापासून तोडून व आपलीं हत्यारें गोळा करून तो परत घाईघाईनें आला. अशी चांगली शिकार साधल्याबद्दल वसाहतींत सर्वांना अतोनात आनंद झाला. परशानें मंडळी जमवून तट्या तयार केल्या. त्यांवर घुडांना घालून मुक्कामापावेतों ओढून आणावयाचें होते. परत येतांना रात्र पडल्यास कांहीं धोका होऊं नये, ह्मणून त्यांनीं बरोबर टेंभे घेतले. हें एक बरें झालें कारण मंडळीला परत येण्याला दोन तास रात्र झाली. तेव्हां ती सांगू लागली 'आह्मी येत असतां सगळ्या वाटेनें जनावरांचें रडणें व किंकाळ्या ऐकूं येत होत्या.' त्या शिकारीच्या सभोंवतीं आगटचा पेटविल्या आणि कुत्रे राखणीस ठेवून नीट बंदोबस्त केला, तोंपावेतों लहान लहान मुलें देखील झोंपीं गेलीं नाहींत.

दुसऱ्या दिवशीं ह्या मांसाचा पुरवठा पुष्कळ दिवस टिकण्यासाठीं तें तयार करण्याच्या कामीं जितकीं माणसें मिळूं शकलीं तितकीं सारीं लागलीं. वसाहतीपासून थोड्या अंतरावर एक तळें होतें. त्याचें पाणी फार खारट होतें, अशीं तळीं तिकडील प्रदेशांत पुष्कळ ठिकाणीं आढळतात, त्या तळ्याचें पाणी सुकवून मीठ तयार केलें होतें. जसजसा तो कसाई त्या मांसाचे तुकडे कापून देई, तसतशीं तीं माणसें लागलेंच त्या तुकड्याला तें मीठ चांगलें चोळून लावीत आणि मग ते तुकडे आगटीवर टांगून ठेवीत, व आगीच्या धगधगीनें ते नीट सुकले, ह्मणजे काढून घेत. नंतर ते तुकडे जवळच रेताळ जमिनींत एक खळगा करून आंतून दगड बसवून एक जागा केली होती तींत पुरून ठेविले,

ही शिकार कापून तयार करण्याची सर्व व्यवस्था लावण्याचें काम **कप्तानानें आनंदरावाला** मोठ्या आदरानें सांगितलें, पण तें काम नाकारून तो ह्मणाला ' मला थोडेसें रानांत जाऊन यावयाचें आहे, तर कृपाकरून तेवढ्यापुरता **सटवाजी** मजबरोबर द्या, आणि तो पलीकडे सगळ्यांच्या उपयोगासाठीं ह्मणून एक फालतू चामड्याचा थैला पडला आहे ना, तोही कांहीं वेळपर्यंत मला पाहिजे. ' **सटवाजीला** आनंदाची संगत विशेषशी आवडत होती असें नाहीं, आणि त्याबरोबर जाऊन करावयाचें काय हेंही त्याला समजेना; त्यामुळें त्याच्या मनांत घरीं राहून आपलाच काम करूं लागावें असें फार होतें. परंतु आपल्याला मदतीसाठीं मागून घेण्याचा हक्क **आनंदरावानें** मिळविला आहे असें त्याला वाटलें, ह्मणून तो कांकूं न करितां त्याजबरोबर गेला.

ते माळावर गेल्यावर ठिकठिकाणीं थोडथोडी झाडी होती त्याकडे **आनंदा** पाहूं लागला. कांहीं वेळानें तो म्हणाला ' **सटवाजी**, त्या पलीकडल्या झाडींत जें मधोमध झाड आहे तें उंच आहे किंवा पश्चिमेच्या बाजूला एकटेंचसें उगवलें आहे तें उंच आहे? हें नीट पाहून सांग बरें?'

**सटवाजी**—तें पश्चिमेकडलेंच जास्त उंच आहे. पण ह्या झाडांवर कांहीं फळें नाहींत, ह्मणून त्यांवर माकडें असण्याचा संभव कमीच.

**आनंदा**—मला तीं फळेंही नकोत, व माकडेंही नकोत. आपण राहतों तेथेंच आसपास तीं मिळण्यासारखीं आहेत. मी इतक्या लांब आलों आहे, तो शहामृगाच्या अंड्यांसाठीं बरें?

झाडांपासून लांब अशा ठिकाणीं वाळवंटांत कोठेंतरी शहामृग अंडीं घालतात, हें **सटवाजीला** ऐकून माहीत होतें ह्मणून तो थोडासा विचारांत पडला. परंतु **आनंदरावानें** सांगितलें ' बाबा, शहामृग फार भितरा असतो. त्याची मादी कोठें अंडीं घालून ठेवते, हें समजण्यास लांब बसून नीट सुगावा काढला पाहिजे. आणि लांब बसलें तरी त्या

पक्ष्यांना कळतां उपयोगी नाहीं, ह्मणून चांगल्याच अडोशाची जागा पहावी लागते. त्या पक्ष्यांची नजर लांबपर्यंत पोंचते इतकेंच नाहीं तर त्यांना लांबची देखील चाहूल लागते..

नंतर **आनंदरावानें** त्या झाडाकडे पाहून अंमळसा विचार करून म्हटलें--बरें तर **सटवाजी**, तूं असें कर. त्या झाडावर जितकें उंच चढवेल तितकें चढून जाऊन बस आणी चोहोंबाजूला लांबवर कोठें शहामृग दिसत असल्यास पहा. एकादा शहामृग गरगर घिरट्या घालीत आहे, असें दृष्टीस पडल्यास त्या जागेच्या खाणाखुणा नीट पाहून ती पक्की लक्षांत राहिली, ह्मणजे खालीं उतर. आज जसा कडक उन्हाळा पडला आहे तसा उन्हाळा असला ह्मणजे कधीं कधीं हे पक्षी अंडीं सोडून आपखुषीनेंच कोठें तरी लांब जातात. त्याप्रमाणें आज ते गेले असले, तर अनायासें आपल्याला बराच त्रास कमी होईल; पण अंड्यांजवळ जर एखादा बसला असेल, तर मी कुत्रे घेऊन जाईन व तेथें गलबा करून त्या सर्वांना तेथून पळवीन. त्यांचा पाठलाग करीत आह्मी त्यांचे मागें जाऊं, तितक्या वेळांत तूं हा थैला घेऊन तेथें जा व कांहीं अंडीं घेऊन ये.

**सटवाजी**.–अशीं आणूं तरी किती?

**आनंदा**.–हो त्यांचें कोटें कसें असतें, हें मी सांगायाचेंच विसरलों. हे पक्षी आपल्या पायांनीं जमिनींत एक खळगा करितात, त्याच्या भोंवती लहानसा मातीचा बांध असतो समजलास, आणि आंत पुष्कळ अंडीं ह्मणून तीं उभीं अशीं ठेविलेलीं असतात. जर तेथें ६।७ अंडीं असलीं तर तीं सारीं घेऊन ये, कारण तीं नुकतींच घातलेलीं असावीं. ताजीं अंडीं खाण्याला चांगलीं असतात. जर १५ पावेतों असलीं, तर बाहेरच्या थराचीं अंडीं कायतीं घेऊन ये. ह्या थरांत ८।९ पावेतों सांपडतील. जर तीसपावेतों असलीं--

आश्चर्य वाटून **सटवाजी** ह्मणाला–काय ह्मणतां, एका कोट्यांत ३० अंडीं? इतकीं अंडीं असल्याचें मीं कधींही ऐकिलें नाहीं.

**आनंदा**–नसशील ऐकिलें. ह्या पक्ष्यांची एक जात आहे ती कळप करून राहते. त्यांच्या स्वभाव असा असतो कीं, सर्व पक्षी आपलीं अंडीं एकाच कोटयांत घालतात. हें तुझ्या ऐकण्यांत नसेल, ह्मणून तुला आश्चर्य वाटतें. पण मी काय सांगत होतों तें, हो जर तेथें तीस पावेतों अंडीं असलीं, तर बांधाबाहेर कांहीं अंडीं घातलेलीं तुला आढळतील. हीं सारीं उत्तम असायाचीं, ह्मणून तीं तर घेच, पण त्यांच्या जवळच्या थरापैकीं जितकीं आणवतील तितकींही घेऊन ये.

**सटवाजी**–आणि मला कांहीं पिसें सांपडलीं तर आणूं का? तीं किफायतीनें विकतां येतील असा वेळ कधींना कधीं तरी येईल–विलायतेंत शहामृगाच्या पिसांचे पैसे नेहमीं चांगले येतात, असें ह्मणतात.

**आनंदा**–बाबा तें खरें, पण पिसांचा जेव्हां व्यापार करूं लागूं तेव्हां अशीं वेंचून घेण्यापेक्षां निराळ्याच उपायांनीं थोडा जास्त त्रास सोसून तीं मिळविलीं पाहिजेत. कोटयाजवळ पुष्कळ पिसें पडलेलीं असतील; पण तीं तशींच पडलीं राहूं दे. जेव्हां कधीं उशा करण्याचा वेळ येईल, तेव्हां फार झालें तर त्यांत भरण्यांत पिसांचा उपयोग होईल. सध्यां आपल्याला त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. इंग्रजी बाया जें सुरेखसें पांढरें पिस घालतात तें शहामृगाचें असतें. शहामृगीचीं पिसें काळीं किंवा राखेच्या रंगाचीं असतात. ह्मणून साऱ्या गोष्टींची पूर्तता होऊन आपल्या सर्व सोई लागल्यासारख्या होतील, तेव्हां आपण शहामृगांची शिकार करून एकेक पीस चांगल्या भावानें विकूं बरें; पण तूर्त आपल्याला अंड्यांचींच जास्त जरूर आहे.

कांहीं विषारी साप मारून नेल्यास यल्लापाला आवडेल, असें **आनंदा**ला वाटलें. ह्मणून **सटवाजी** झाडाच्या वरच्या खांदीवर बसून झोके खात असतां तो खालीं आजूबाजूच्या झुडुपांतून साप शोधूं लागला. मनुष्य सावध असतो, तेव्हां सापाच्या डसण्याची भीति बहुतेक नसतेच म्हटली तरी चालेल; आणि कुत्र्यांना साप धरण्याचें शिकविलें होतें,

ह्मणून फारसा त्रास न पडतां थोडक्याच अवकाशांत बरेच साप आनंदानें धरून यल्लापाला देण्यासाठीं त्यांचीं डोकीं कापून निराळीं ठेविलीं, आणि बाकीचा भाग शिजवून खाण्यासाठीं थैल्यांत टाकिला. पुष्कळ जंगली लोकांस साप वावमांशाप्रमाणेंच आवडतात, परंतु वसाहतीच्या मंडळींना खाण्याचीच टंचाई असल्यानें सापांचा देखील खाण्यासाठीं उपयोग करणें भाग पडलें. एक पिंवळट रंगाचा अंगावर काळे ठिपके असलेला वावभर लांब असा साप आनंदानें मारिला. हा साप दिसण्यांत सुरेख होता, ह्मणून झाडाजवळ जाऊन सटवाजीला दाखवूं लागला तों तो घाईघाईनें झाडावरून उतरूं लागला.

खालीं आल्यावर सटवाजी ह्मणाला—हं, चला, कुत्रे घेऊन जा लौकर.

**आनंदा**—अरे पण कोणीकडे?

**सटवाजी**—पलीकडल्या झाडीच्या डावीकडे थेट पूर्वेस जा. आणि मी पाठोपाठ येऊन कोटयांतून अंडीं घेऊन आलोंच. ती जागा येथून पुरती तीनशें कदमही नाहीं. पण थैला कोठें आहे?

आनंदानें थैला झुडुपांत ज्या ठिकाणीं ठेविला होता, ती जागा हातानें दाखवून आपल्या कुत्र्यांना शीळ घालून बोलाविलें, व लागलाच त्यांना घेऊन तो पळत गेला. शहामृगांच्या दृष्टीस तो पडतांच ते पळूं लागले. तो बरकांतीच पाठलाग करीत असल्यामुळें ते पक्षी कोणीकडे जातात, हें पाहण्याकडे त्याचें फारसें लक्ष नव्हतें. आपले आंखूड पंख व झुबक्यासारखीं शेंपटें पसरून आपल्या लांब पायांनीं शर्यतीच्या घोड्यासारखे ते पक्षी जलद रस्ता काढीत एकामागून एक असे चालले होते, हें पाहण्याचीच मोठी मौज होती; इतकेंच नाहीं तर पाहणारांस हटकून हंसें आल्यावांचून राहिलें नसतें. पक्षी लांब दृष्टीआड गेले असें पाहून शिकारी आनंदराव एकदांचे थांबले. कपाळावर आलेला घाम त्यांनीं पुसला व आपल्या कुत्र्यांना शीळ घालून परत आपल्याजवळ बोलावून घेतलें. नंतर आपला सोबती कोठें दिस-

तों कीं काय ह्मणून तो चोहोंकडे पाहूं लागला. परंतु त्याच्या नजरेस कोणी ही पडलें नाहीं; तेव्हां कदाचित् एकाद्या जमिनीच्या उंचवट्यामुळें तो दिसत नसेल, किंवा अंडीं गोळा करण्याकरितां तो वांकला असेल असें त्याला वाटलें, ह्मणून तो हळू हळू परत येऊं लागला. तो फारसा लांब आला नाहीं तोंच त्याला शहामृगाच्या अंड्याचें एक कोटें लागलें. त्यांत पुष्कळ अंडीं होतींच, शिवाय कोटच्या सभोंवतींही बरींचशीं अंडीं पडलेलीं होतीं, त्यावरून त्या कोटच्याला कोणाचाही हात लागला नाहीं, अशी त्याची खात्री झाली. बराच वेळ त्या कोटचाकडे पाहून आपण ज्या ठिकाणाहून मूळ निघालों तेथपासून तें अजमासें किती लांब असावें ह्याचा साधारण अजमास त्यानें नजरेनें केला, व तें कोणत्या दिशेस आहे ह्याचीही अटकळ बांधली. परंतु ज्या कोटच्यासाठीं आपण पाठलाग केला तेंच हें कीं काय ह्याविषयीं त्याची खात्री होईना. तो मनांत ह्मणाला ' दोन कोटीं बहुशः जवळ जवळ नसतात, पण जर का जवळ आसपास दुसरें नसेल, तर मात्र सटवार्जीला उशीर कां लागला हें समजत नाहीं. तो चलाख असून हुशारही आहे, तर मग तो थैला शोधीत इतका वेळ बसला असेल हें संभवेल तरी कसें? बरें तर, नेव-वतील तितकीं अंडीं आतां आपण घेऊन जावीं, आणि आणखीं नेण्या-साठीं त्याला घेऊन पुनः यावें, हेंच मला बरें वाटतें. इथें हीं पिसें पडलीं आहेत, तीं राखेच्या रंगाचीं असलीं ह्मणून काय झालें. त्यांपैकीं एक तर आपल्या टोपींत मी खोवणार, व आघाडी मारल्याबद्दल खुणे-साठीं ह्मणून त्याच्यासाठींही एक घेऊन जाईन. बरें हीं जनावरें येथें मरून पडलीं आहेत त्यांच्या कातड्याला फुलाजीचा कुशल हात लाग-ल्यास त्यांच्या चांगल्या टोप्या व वास्कुटें होतील, ह्मणून तींही आपण तिकडे झाडाखालीं घेऊन जावीं व त्यांचीं कातडीं काढून घ्यावींत.'

पूर्वरात्रीं ह्या कोटच्याजवळ एक कोल्हा आणि दोन रानमांजरें अंडीं खाण्यासाठीं आलीं होतीं; परंतु एकादा शहामृग रात्रीच्या वेळेस अंड्यांजवळ

राखण करीत बसत असतो, त्याच्या पायाच्या तडाक्यानें तीं मेलीं होतीं. तीं आयतींच आनंदाला सांपडलीं, ह्मणून त्यांच्या शेंपट्यांनीं एकत्र बांधून त्यांना त्यानें खांद्यावर टाकिलें. एकेक अंडें लहानशा कोहळ्याएवढें मोठें होतें, त्यांतून त्याजवळ थैला नव्हता, ह्मणून त्याच्यानें तीन अंड्यांपेक्षां जास्त घेववलीं नाहीं. तीं हातांत घेऊन तो पुढें चालता झाला, व जातां जातां वाटेनें मोठ्यानें शीळ घालीत चालला; परंतु सटवाजी कोठें आहे, हें त्याला समजून आलें नाहीं.

पहिल्या ठिकाणीं झाडाच्या छायेखालीं येऊन पोंहचतांच तो मनांत कचरला; कांहीं तरी अपघात झाला असावा, असें त्याला वाटूं लागलें. तो आणखी चार पावलें गेला नाहीं, तोंच त्याच्या नजरेस पडलें कीं, सटवाजी बिचारा पाठीवर पडला आहे, त्याच्या चर्येवरून त्याला पुष्कळ वेदना होत आहेत, आणि एका पायाला अतिशय सूज आली आहे. आनंदा आलासें पाहून त्याला थोडीशी हुशारी आली. तो म्हणाला 'माझें काय झालें हें पाहिल्याशिवाय तुम्ही परत मुक्कामावर जाणार नाहीं अशी मला खात्री होतीच.'

त्याला सांवरतो आनंदा म्हणाला—पण बाबा तुला झालें तरी काय? तुला साप डसला, कां विंचवानें नांगी मारिली, कां आणखी कांहीं झालें?

सटवाजी ( कण्हत )—तो पलीकडे पडला आहेना साप, तोच मला डसला. मी अगदीं जवळ जाईपर्यंत तो माझ्या दृष्टीस पडला नाहीं, मग म्हटलें आतां मागें हटून उपयोग नाहीं, ह्मणून ह्या देशाच्या लोकांप्रमाणें त्याच्या डोक्यावर पाय ठेवून त्याला मी मारूं लागलों. त्यानें पुष्कळ तडफड केली, तेव्हां एकदांचे माझ्या पायाखालून त्याचें डोकें निसटलें, तों पुनः मी तें पायाखालीं तुडविणार, इतक्यांत तो माझ्या पोटरीच्या येथें डसला. सरतेशेवटीं मी त्याला मारला खरा, पण मला वाटतें त्यानें माझाही जीव घेतला.

आनंदाला फारच वाईट वाटल्यामुळें त्याच्यानें कांहीं देखील बोल-

वेना. त्यानें मुकाट्यानें दांत लागला होता ती जागा पाहिली, व सुजलेल्या भागाचा ताण व दुःख कमी व्हावें, ह्मणून इजारीचा तेवढा भाग फाडून टाकिला. साप चावल्यास त्या देशचे लोक एका वनस्पतीचा पाला वाटून लावीत असत हें त्याला माहित होतें, ह्मणून त्यानें तसल्या वनस्पतीचा पाला दगडावर ठेचून तो तेथें लाविला आणि तो ह्मणाला 'बरें तर मुला ,मी आतां तुला पाठीवर घेऊन लौकर घरीं नेतों. तूं कांहीं देखील भिऊं नकोस.'

**सटवाजी** ( हलक्या स्वरानें विवळत )–पण तुमच्यानें मला दीड-दोन कोस नेववेल काय? स्वतः माझ्याच्यानें थोडेसे देखील हातपाय हालवनील असें वाटत नाहीं, तरी पण कांहीं हालवेल चालवेल तर पाहीन. आई व बाबा यांना एकदां भेटावें, असें मला फार वाटतें.

**आनंदा**– बाळ आपण मुक्कामावर पोंहचूं शकलों नाहीं, तर ते तुला भेटायला आणीन बरें. तूं कांहीं काळजी करूं नकोस. पण आतां वेळ दवडतां कामा नये; अगदीं निघालेंच पाहिजे. एकवेळ **यल्लापा** तुझा पाय पाहील तर बरें.

गरीब बिचारा **सटवाजी** उठून बसूं लागला, परंतु अंगांत मुळीं ताकदच नाहीं असें त्याला वाटलें. भोंवळ येऊन तो तसाच जमिनीवर पडला, आणि कण्हत कण्हत हलक्या आवाजानें बोलला ' दाखवून उपयोग होईल असें दिसत नाहीं.'

'माझे मानेभोंवती तुझा हात घाल, ह्मणजे मी तुला उचलून घेईन' असें **आनंदा** ह्मणाला; परंतु तो बिलकूल हलत नाहीं असें पाहून त्यानें त्याचा हात घेऊन आपल्या खांद्यावर टाकिला, तो आपोआप खालीं जमिनीवर पडला. बिचारा पोर बेशुद्ध झाला. त्याला नेण्यासाठीं **आनंदानें** पुनः एकवेळ यत्न केला.

तो ह्मणाला ' बाळ, अरे बाळ, आईला भेटायाला नाहीं कां जायचें तुला? तर मग असा पडूं नकोस. ऊठ ऊठ.'

 मो. २०

आईचें नांव ऐकतांच त्यानें डोळे उघडले, आणि थोडेसें उठून आपल्या सोबत्याच्या अंगावर धाडकन अंग टाकिलें; व मान खालीं घालून जी कांहीं अंगांत शक्ति उरली होती ती खर्चून तो त्याच्या अंगाला धरून राहिला. तेव्हां त्या मुलाचा एवढा जड भार नेववेल तितक्या घाईनें तो घेऊन जाऊं लागला. वाटेनें हवा लागली ह्मणून ह्मणा, किंवा चालण्याच्या गतीमुळें ह्मणा, त्या मुलाला थोडीशी हुशारी आली असें पाहून त्याला बरें वाटलें. त्या हुशारींत **सटवाजी** मधून मधून बोलूं लागला, आणि **आनंदाच्या** अंगाला चांगला धरूनच राहूं लागला. मध्येंच तो ह्मणाला ' **आनंदराव** '

**आनंदा**–बाळ कांबरें हांक मारिलीस ?

**सटवाजी**–तीर तयार करण्यासंबंधीं मला एक गोष्ट सुचली, ती मला सांगावयाची आहे. मला खालीं ठेवाल तेव्हां मला एक वेत आणून द्या, ह्मणजे ह्या देशचे लोक त्याला अणीदार फळ कसें लावतात हें दाखवीन. असा तीर स्वतः करण्याचें माझ्या मनांत फार होतें, पण माझ्या हातून आतां कांहीं तो होणार नाहीं, ह्मणून मी तुह्माला सांगून ठेवितों.

**आनंदा**–बाळ, त्याचें आतां काय घेऊन बसलास! पण त्याबद्दल तुझा मी आभारी आहें बरें! असा बोलत राहशील तर मात्र थकशील. ह्मणून मुकाट्यानें अस.

कांहीं वेळ गेल्यावर **सटवाजी** पुनः बोलूं लागला. तो ह्मणाला–अहो **आनंदराव** जेव्हां शेतांची मळणी होईल, घरेंदारें तयार होतील आणि गुरेंढोरें शेतांत व कुरणांत चरूं लागतील, तेव्हां पुनः एकाद्या रात्रीं त्या जंगलीलोकांचा घाला येईल असें मला वाटतें.

**आनंदा**–केपटौनहून हत्यारें व दारू आपण मागविली आहे, ह्मणून बाळ, उगाच काळजी करूं नकोस.

**सटवाजी**–तें मला ठाऊक आहे. पण सारे जण झोंपीं गेले असतील अशा वेळीं दारूगोळ्याचा कांहीं देखील उपयोग होणार नाहीं. प्रत्येक

रात्रीं तिवां चौघांनीं मिळून आळीपाळीनें पहारा करावा आणि त्यांत आपणही रखवालदार व्हावें असें माझ्या मनांत फार होतें. मजबरोबर पहारा करण्यास दुसरे जितके आले असते, तितक्यांस घेण्याचा माझा विचार होता. ही गोष्ट घडून यावी असें मला फार फार वाटतें, ह्मणून ती तुम्ही घडवून आणालना? तसेंच साऱ्या मुलांना बंदूक कशी मारावी हेंही शिकविण्याचें करालना?

**आनंदा**—सारें करीन बरें. पण तूं असा बोलत बसूं नकोस.

**सटवाजी**—मला थोडेंसें आईविषयीं बोलायाचें आहे. मग मी नाहीं बोलणार. तिला तुम्ही सांगा—

इतकें बोलून लागलीच त्यानें आपली मान **आनंदा**च्या खांद्यावर टाकिली, आणि **आनंदा**च्या अंगाला धरून राहण्याची अंगांत शक्ति न राहिल्यामुळें तो हळु हळु खालीं जमिनीवर आला. आतां एकही पाऊल त्याला पुढें नेववणार नाहीं, हें पाहून **आनंदा**ला फार वाईट वाटलें. पण उगाच दुःख करीत बसण्यांत अर्थ नाहीं हें जाणून तो ह्मणाला ' बाळ, मी पळत जाऊन तुझ्या आईला, बाबाला, आणि **यल्लापा**ला लौकर घेऊन येतों. तोंपावेतों हे कुत्रे जवळ राहून तुला संभाळतील. येववेल तितक्या लौकर मी येतोंच. हें पहा, तुझ्या उशाला हा मी थैला देतों, ह्मणजे मान अवघडणार नाहीं. कांहीं भिऊं नकोस. एका कलाकाच्या आंत आम्ही येऊन तुला भेटूं. मी जातों बरें. ईश्वर, तुझें रक्षण करो.

**सटवाजी** ( हलक्या व तुटक स्वरानें )—जरा थांबा. लहानग्या **मेरी**ला सांगा कीं, तुला मी शिटी करून देईन ह्मणून सांगितलें होतें,ती शिटी तयार झाली आहे. ती मी चेसनट झाडाच्या ढोलींत' ठेविली आहे— माझ्या फडताळांत आहे ह्मणून ह्मणा ह्मणजे ती समजेल.

आतां वेळ दवडतां उपयोगी नाहीं असें वाटून **आनंदा** जाण्याच्या घाईत होता. तो ह्मणाला 'मी परत आलों ह्मणजे जें कांहीं सांगायाचें

असेल तें सांग बरें, पण आतां मला जाऊं दे, उशीर होतो.' असें ह्मणून सटवाजीच्या कपाळाला थोडासा घाम आला होता तो पुसून टाकून त्यानें मुका घेतला. त्याचा हात आपल्या हातांत धरून हळूहळू सटवाजी आणखी बोलूं लागला 'हें पहा माझें, एवढें बोलणें ऐका आणि मग जा. जर का तुम्ही माझ्या कपाळाचा घाम पुसून मुका घेत असतांना माझ्या बाबानें पाहिलें असतें, तर तुम्ही गर्विष्ठ आहां असें त्यानें कधीं देखील ह्मटलें नसतें. ह्मणून मी सांगतों कीं, तुम्ही ह्याउपर पाद्रीबोवांच्या मुलीशीं कधींमधीं खेळत जा, तसेंच फुलाजीच्या बायकोशीं पण थोड्याश्या ममताळुपणानें बोलत जा, ह्मणजे लोकांत तुमच्याविषयीं जो समज आहे त्यांत किती तरी आपोआप तफावत होईल. निदान माझ्यासाठीं तरी मी सांगतों त्याप्रमाणें वागा. माझ्या मनांत दुसरें कांहीं नाहीं, फक्त तुमचें मन किती कोंवळें आहे, हें त्यांना कळावें. मला तर वाटतें कीं, हें सांगण्याला मी जिवंत राहत नाहीं. मी जातों, म्हणून कां तुमच्या डोळ्याला पाणी आलें? छत्! छत्! माझ्या आईला दुःख होईल, म्हणून होय तुम्ही रडतां? ईश्वर तुमचें कोटकल्याण करो. जा तर तुम्ही. माझा हा शेवटचा सलाम बरं.'

जातां जातां आनंदानें दोन तीनदां मागें वळून पाहिलें, तों अंगांत मुळीं शक्ति नव्हती तरी तें गरीब बिचारें पोर जा जा ह्मणून हातानें खूण करीत आहेसें त्यानें पाहिलें.

आनंदा ज्यांना घेऊन जाण्यासाठीं आला होता ते व ज्यांना ह्मणून हें वर्तमान कळलें ते असे सारे सटवाजीला आणण्यासाठीं ताबडतोब निघाले. उतावळ करावयाची तितकी त्यांनीं केली, परंतु ते नजीक येऊं लागले, तसें त्यांना कुत्र्यांचें रडणें ऐकूं आलें, तेव्हां अर्थातच आपण उशिरां आलों असें त्यांना वाटलें. जवळ जाऊन पाहतांच त्यांना पहिल्या प्रथम भासलें कीं, बिचारें पोर झोंपीं गेलें आहे. पण लागलीच त्यांची निराशा झाली. सटवाजीचा टिपू ह्मणून आवडता कुत्रा होता,

त्याच्या मानेभोंवती एक हात घालून व जणू काय डोळ्यांना उजेड सोसवला नाहीं, ह्मणून दुसरा हात डोळ्यावर ठेवून तो जमिनीवर पडला होता. त्याच्या मिठींतून कुत्र्याला सोडविलें, परंतु तो हलला ह्मणून नाहीं; आणि नंतरही कधीं देखील तो हलला कीं चालला नाहीं.

# भाग सहावा.

## पुष्कळ लोक लावावे, लौकर काम घ्यावें.

सटवाजीच्या मरणामुळें वसाहतींतील सर्व लोकांना लहानापासून थोरापर्यंतां सारखें दुःख झालें. तो आईबापांच्या आज्ञेंत राहत असे व तो मनमिळाऊ असे ह्मणून सर्वांना आवडत असे. शिवाय तो अतिशय मेहनती असून काम करण्यास त्याची कधींही कुरकुर नसे. ह्या प्रसंगामुळें त्या छोट्या समाजानें आरंभिलेलीं सर्व कृत्यें व बेत ह्यांना एकदम विरजण पडल्यासारखें झालें. फार तर काय, पण ज्या कामाकडे सकाळीं सगळ्यांचें लक्ष लागलेलें होतें त्याच कामाविषयींची हौस संध्याकाळ झाली नाहीं तोंच सारी नाहींशी झाली. पाट खोदून तयार झाले, त्यांच्यांतून पाणी वाहूं लागलें; परंतु पाद्री आणि एक मजूर ह्या दोघांनीं मिळून हें पाटाचें काम पुरें केलें होतें, ह्मणून त्यांशिवाय दुसरें कोणी देखील पाणी वाहत होतें त्याकडे पाहीना. इतकेंच नाहीं, पण शेतांतील रोपें पाणी नसल्यामुळें करपून जात होतीं तींच ह्या पाण्यामुळें दुसऱ्या दिवशीं सकाळीं थोडासा जोम धरीत आहेत असें दिसलें, तरीही चांगलें पीक होण्याचें हें सुचिन्ह बघून कोणाच्या देखील तोंडावर आनंद दिसला नाहीं. सारी मंडळी रात्रीं एकमेकांशीं न बोलतां मुकाट्यानें गुहेंत निजावयास चालती झाली, आणि दुसरे दिवशीं अगदीं फटफटीत उजाडलें, तरीही त्यांना उठून कामधंद्यास लागावें असें वाटेचना. ज्यांना मुलें होतीं ते जणू काय भयंकर प्रसंग जवळच येऊन ठेपला आहे

ह्या धास्तीनें आपल्या मुलांना वाचविण्यासाठींच ह्मणून त्यांचे हात गच्च आवळून धरीत, फार तर काय पण **सटवाजी**च्या मरणानंतर पुष्कळ दिवसपर्यंत वसाहतींतील बाया लहान मुलांना आपल्या दृष्टीआड जाऊं देत नसत. प्रत्येकाला **सटवाजी**ची पदोपदीं आठवण होई, ह्यामुळें तिऱ्हाईताला देखील सहज वाईट वाटण्यासारखें होतें. ह्यावरून त्या लहानशा समाजास तो किती उपयोगी होता हें स्पष्ट दिसतें. त्याचे आईबाप बिचारे मुकाट्यानें स्वतःशींच दुःख करीत; परंतु लहान लहान मुलें ह्यांना **सटवाजी**चें काय झालें ह्याचा पुरतेपणीं उमज पडेना, ह्मणून तीं वारंवार त्याची आठवण करीत.

लहानगी **मेरी** आणि तिचे छोटे छोटे खेळगडी हे दररोज ‘ आह्माला **सटवाजी** खेळायला पाहिजे. तो कोठें आहे ? ’ असा हट्ट घेऊन बसत. परंतु पुष्कळ दिवस तो त्यांच्या दृष्टीस न पडल्यामुळें त्यांना साहजिक विसर पडून तीं मुलें त्याची आठवण काढीनातशीं झालीं, पण मोठ्या माणसांना त्याची आठवण होत असे, मात्र ते उघड बोलून दाखवीत नसत. स्वतः **कप्तान** देखील मनांत वारंवार ह्मणे ‘ **सटवाजी** येथें असता, तर छान झालें असतें. ’

**सटवाजी**ला मूठमाती दिल्यानंतर कांहीं दिवसांनीं **कप्तान** हा नेहमीं-प्रमाणें लोक कामें कशीं करितात तीं पहात पहात जात होता; तेव्हां **नारायण** वेताचीं छपरें बांधीत होता त्याजवळ तो थोडा वेळ उभा राहिला. **नारायण** नाराज झाल्यासारखा दुर्मुखलेला दिसत होता.

तो म्हणाला—कप्तान सा. तुम्हाला एकदाचें सांगतों. जितकें काम माझ्या हातून व्हावें असें तुमच्या मनांतून आहे तितकें काम एकट्या-च्यानें होऊं म्हटलें तर अगदीं रास्त नाहीं. जास्त मदत मिळाल्याशिवाय पावसाळा सुरू होण्यापूर्वीं आपल्या डोक्यांवर छप्पर असावें ह्मणाल, तर माझ्या हातून होणार नाहीं व तशा आशेवर रहाणें हा केवळ वेडेपणा होय.

**कप्तान** ह्मणाला—मी देखील ह्याचाच विचार करीत होतों. आज-च सकाळीं **पाद्री** मला सांगत होते कीं, वाऱ्याची दिशा थोडीशी बदलली आहे, तेव्हां दहा दिवसांच्या आंत पाऊस लागण्याचा सुमार आहे. बरें पण तुह्माला किती मदत पाहिजे.

**नारायणानें** उत्तर दिलें—जितकी तुमच्याकडून देववेल तितकी सारी मला पाहिजे. जर आमच्याजवळ आणखीं सहा माणसें असतीं तर हल्लींच्यापेक्षां बारापट जास्त झपाट्यानें काम चाललें असतें. कारण हल्लीं एक काम करून दुसऱ्याला हात घालतां घालतांच माझा बराच वेळ मोडला जातो. माझ्या माणसाचा देखील ह्याप्रमाणेंच वेळ फुकट जातो. त्यानें पुरेसे वेत आणिले नाहींत तोंच सहज हातीं येतील असे त्या वेताचे जुडगे बांधून ठेवण्यासाठीं मी त्याला सांगतों. आणि त्यानें असे तीन चार जुडगे बांधले नाहींत तोंच जुडगे बांधण्यासाठीं वाद्या नाहींतशा होतात. बरें तें एक असो, पण जर मातीचा गारा तयार असता व कोणी गिलावा करण्यास येथें हजर असता, तर जो कूड भरून तयार झाला आहे त्यावर गिलावा होऊन तो अर्धामुर्धा सुकला देखील असता. हेंच जर मी करूं लागलों, तर तिकडूनही मला लागलेंच सांगतात कीं, पाऊस येईल ह्मणून जो कुडाचा भाग झाला आहे त्यावर पहिल्या प्रथम छप्पर झालें पाहिजे; पण छपरासाठीं गवत वगैरे किंवा लांकुड ह्यांपैकीं कांहीं तरी पाहिजे कीं नाहीं. मग छप्पर कशाचें का करीनात. पण त्यांपैकीं एकही मजजवळ तयार नाहीं ह्मणून असेंच हें काम रेंगाळत चाललें आहे.

**कप्तान**—पहिल्यांदा मीं जीं माणसें देण्याचें कबूल केलें होतें तीं दुसरी-कडेच लावावीं लागलीं त्यावेळेसच मला वाईट वाटलें, पण उपयोग काय? कारण पाट काढण्याचेंच काम मोठें महत्त्वाचें होतें हें तुम्हाला माहीत आहेच. आतां तें काम पुरें झालें आहे. आणि आज संध्याकाळीं ती मंडळी शिका-रीहून परत आली ह्मणजे मग तुम्हाला हवी तितकी मदत मिळेल.

**नारायण** ह्यानें अदबीनें सलाम केला व तो ह्मणाला—मी जरा स्पष्टपणें बोललों ह्मणून राग मात्र धरूं नये. पण खरंच ह्मणाल तर जी कांहीं थोडीशी मदत मला तुम्ही दिली होती ती देखील कोणत्या तऱ्हेनें नाहींशी झाली ह्याचा विचार आला ह्मणजे मला वाईट वाटतें. बिचारा **सटवाजी** गारा तयार करीत असे आणि ही जी भींत तयार दिसत आहे तीपैकीं बहुतेक भागावर त्यानेंच गिलावा केला होता.

जवळच एक फावडें पडलें होतें तें **कप्तान** ह्यानें स्वतः घेतलें व मातींत पाणी घालून त्यानें चांगला गारा तयार केला; मग दुसरीकडे बोलावल्या-वरून तो तेथून चालता झाला. **कप्तान** ह्यानें स्वतः मेहनत घेतली असें पाहून व उद्यां आपल्यास जास्त मदत मिळेल ह्या आशेनें **नारायण** ह्याला काम करण्यास हुशारी आली.

**कप्तान** हा ज्या शिकारीविषयीं बोलला ती उत्तम प्रकारें साधली. त्या देशांत ज्या प्रकारच्या शिकारी होतात त्या मानानें पाहिलें असतां, हिला शिकार ह्मणणें बहुतेक शोभलें नसतेंच, कारण ह्या मंडळीजवळ घोडे किंवा बंदुका ह्यांपैकीं कांहीं एक नव्हतें, फक्त त्यांजपाशीं कांहीं कुत्रे मात्र होते. त्यांनीं सावजें धरण्यासाठीं पूर्वीं खाडे खोदून ठेवून ते झाडाच्या फांद्यांनीं सावजांस न समजे अशा तऱ्हेनें नीट जमिनीबरोबर झांकून ठेविले होतेच. नंतर रानह्मशी व हरणें ह्यांचे कळप गलबल्यानें घाबरवून टाकून व धामधूम करून हळू हळू त्यांस खाड्याकडे हाकून न्यावयाचें ह्यापलीकडे ते जास्त कांहीं करूं शकले नाहींत; परंतु तेवढें मात्र त्यांनीं चांगल्या प्रकारें केलें. जनावरें घाबरून जाऊन एकसारखीं खाड्यांकडे पळत जात, मग त्यांपैकीं जरी कांहीं केंसाच्या अंतरानें वांचून जात, तरी बरींच खाड्यांत पडत. ह्याप्रमाणें रात्र पडेपर्यंत एका-मागून एक असे कळप हांकून नेल्यानंतर सातांपैकीं पांच खाड्यांत कांहींनाकांहीं शिकार सांपडली आहे असें दिसून आलें. मग मंडळींनीं टेंभे पाजळून काय काय शिकार सांपडली त्याचा शोध चालविला. दोघा-

तिघांना तर अशी आशा उत्पन्न झाली कीं, सकाळीं मैदानावर कांहीं जंगली घोडे जात होते त्यांपैकीं एखाददुसरा चुकून ह्या खाड्यांत कदाचित फसला असेल तर आपल्यास मिळेल.

पूर्वी जंगली घोड्याची जात ह्या प्रांतांत होती असा साधारण समज आहे, परंतु हल्लीं तशी जात तिकडे असल्याचें कोठें आढळून येत नाहीं. तरीही मंडळींनीं जे घोडे दौडत जातांना पाहिले होते ते बहुधा आसपासच्या एखाद्या वसाहतींतले असून त्यांच्या धन्यांनीं डोंगरावर चरावयासाठीं ह्मणून त्यांस सोडल्यानंतर तेथून पळून गेलेले असावे, किंवा वसाहतीची जागा सोडून लांबच्या ठिकाणीं जातांना बरोबर न नेतां येथेंच सोडून दिलेले असावे. तें कसें कां असेना, परंतु ह्या घोड्यांचा बांधा छान सुरेख होता व दौड अतिशय जलद असून एकसारखी होती, त्यामुळें आमच्या शिकाऱ्यांना ते जवळ असावे असें वाटूं लागलें आणि त्यांची इच्छा थोडीबहूत सफलही झाली. एका खाड्यांत एक उमदी करड्या रंगाची घोडी सांपडली. खाड्यांत पडल्यामुळें धक्का बसून कदाचित तिला इजा पोंचली असेल ही भीति होती. तिच्या डोक्यावरून मानेला एक फास चांगला नीट अटकवून दुसऱ्या फासानें तिचे पुढले दोन्ही पाय बांधून टाकिले आणि तिला खाड्याबाहेर एकदांची काढली. तोंपावेतों सारी मंडळी मोठ्या उत्कंठेनें ती शाबूत निघते कीं नाहीं हें पहात होती. तिला यत्किंचितही दुखापत झाली नव्हती व तिचा प्रत्येक अवयव शाबूत होता त्यामुळें साऱ्यांना आनंद झाला. आपले पाय मोकळ्या मैदानाला लागले असें तिला वाटतांच आपले सर्व सोबती जवळ बोलावण्यासाठींच जणूं ती खिंकाळूं लागली. तिच्या खिंकाळण्याला लागलाच एकानें जबाब दिला. तें तिचें शिंगरूं होतें. तिजजवळ इतके जरी शत्रू होते तरीही त्यांची परवा न करितां तें टणाटण उड्या मारीत तिजजवळ आलें. लागलेंच त्याला मंडळींनीं धरून ही उमदी शिकार मुक्कामावर अगोदर पोंच-

ती केली. दुसऱ्या तीन खाड्यांत तीन हरणें सांपडलीं, तीं राखून ठेवण्यासाठीं मुक्कामावर पाठविलीं. चौथ्या खाड्यांत एक टोणगा सांपडला. त्यालाच कायतें हलाल करावें असें ठरलें. त्याला लागलेंच मारून त्याचें मांस वगैरे काढून मुक्कामावर नेलें; आणि एकादें जनावर चुकून सांपडल्यास पहावें, ह्मणून ते खाडे पुनः झाडपाल्यांनीं झांकून ठेवण्याचें ठरविलें. हें सारें होतां होतां बरीच रात्र झाली, परंतु इतका वेळ राबून एकदांचें काम संपविल्यामुळें दुसऱ्या दिवशीं आणखी एखादें काम करण्यासाठीं बरीच मंडळी मोकळी होईल, हें एक समाधान मानण्यासारखेंच झालें.

ह्याप्रमाणें दिवसेंदिवस एका गोष्टीचें महत्व वाढत जात होतें तिकडे दुर्लक्ष करतां कामा नये ह्मणून रात्रींच झोंपीं जाण्यापूर्वीं **पाद्री** आणि **कप्तान** असे दोघेजण विचार करीत बसले.

**कप्तान** ह्मणाला--मला वाटतें, आपली सगळीच दिशा चुकली आहे. निदान ती चुकली होती असें आपल्याला पुढें खचीत आढळून तरी येईल असें दिसतें, कारण आपल्या कामाच्या पद्धतींत कांहीं तरी फेरफार केल्याशिवाय मला नाहीं वाटत माझ्यानें साऱ्यांच्या मागण्या पुऱ्या पाडवतील. सध्यां थोडीं का कामें सुरू आहेत आणि जो उठतो तो मदत मागायाला येतो. त्यांना वाटतें कीं मी हवीं तितकीं माणसें पुरवूं शकेन.

**पाद्री**—जितके ह्मणून राज्यकर्ते आहेत तितक्यांजवळ सर्वप्रकारची अपरिमित संपत्ति आहे असें प्रजेला नेहमीं वाटत असतेंच आणि सरते-शेवटीं तिची निराशा देखील होतेच. ह्मणून ह्याबद्दल तुह्माला कांहीं वाईट वाटायाला नको. कारण मोठेपणाचें नेहमींचेच प्रायश्चित्त कायतें तुह्माला द्यावें लागत आहे. पण ह्या आपल्या मंडळींत श्रमाचा व्यवस्थित विनियोग होतो असें तुह्माला वाटतें का?

**कप्तान**—ह्या विषयींच तर माझ्या मनांतून तुमचा विचार घ्यावयाचा

आहे. मला नाहीं वाटत कीं, आपल्या श्रमाचा व्हावा तसा उपयोग होतो. श्रम करणारांच्या मानानें पुष्कळ कामें आपण एकदम हातीं घेतलीं आहेत, असें मला वाटूं लागलें आहे.

**पाद्री**—सारा कामें एकदम हातीं घेतल्यानें तीं पुरीं होण्याचा बहुतेक संभव नसतोच. त्यापेक्षां एकच कामांत आपली सारी शक्ति खर्च केल्यास ह्याहून लौकर कामें आटपतील अशी माझी समजूत झाली आहे. त्या झोंपड्या बांधून तयार व्हाव्यात म्हणून बिचारा **नारायण** स्वतःला किती त्रास करून घेत आहे. आणि खरोखरी म्हणाल तर तो त्रासून जातो हें साहजिक आहे. ऋतु बदलत चालला आणि पावसाळा सुरू होण्याचे सुमारास तीन झोंपड्याऐवजीं आपल्यास निदान एकतरी तयार होऊन मिळते कीं नाहीं ह्याविषयीं मला संशयच वाटतो.

**पाद्र्यानें** बोलणें मध्येंच थांबवून **कप्तानानें** **नारायणाशीं** सकाळींच काय बोलणें झालें तें सारें सांगितलें. त्यावरून पहिल्याप्रथम झोपड्या तयार करण्याच्या कामीं लागलें पाहिजे असें दोघांनींही कबूल केलें. नंतर **पाद्री** म्हणाला—बाया व मुलें ह्यांनीं मिळून जेव्हां आपआपलीं नेमिलेलीं कामें करण्यासाठीं स्वतःच्या बुद्धी-प्रमाणें कशा तरी तडजोडी काढिल्या, तेव्हां श्रम वाचविल्यानें काय फायदे होतात त्याचा त्यांनीं सर्वांस उत्कृष्ट धडा घालून दिला असें मी म्हणतों. तीरकमटे व दुसरीं हत्यारें आपलीं हीं मुलें कशीं तयार करितात हें तुम्ही लक्ष देऊन पाहिलें आहे काय?

**कप्तानानें** उत्तर दिलें—तें मी पाहिलें नाहीं खरें, पण एकंदरीनें त्यांनीं जीं हत्यारें तयार केलीं आहेत त्यांच्या संख्येवरून तीं कांहीं तरी व्यवस्थित रीतीनें काम करीत आहेत असें मला दिसतें. बरें तीं करतात तरी काय?

**पाद्री**—पहिल्या दिवशीं प्रत्येकजण एका झाडाखालीं निरनिराळे बसले, आणि लांकडाचे तुकडे घेऊन कमटे करण्यासाठीं ते हवे तितके लांब व

जाड व्हावें म्हणून तासूं लागले. आपल्याजवळ कायती एक कुऱ्हाड, तिचा जेव्हां दुसरीकडे उपयोग होत नसे तेव्हां ती आपण त्यांना देत असूं. त्या कुऱ्हाडीशिवाय दुसरें हत्यार नव्हतें, म्हणून लांकडाचे तुकडे कमटच्यासाठीं तयार करणें म्हणजे कोण त्रास. शिवाय तिघांमिळून झालें काय कीं, जन्या कुऱ्हाड घेऊन काम करूं लागला आणि आपला दामू त्याकडे पहात उगाच उभा राहिला. तीर करण्यासाठीं वेत पाहिजे होते तर चिमण्याप्रमाणें ह्यानें वेत गोळा करण्यास जावें कीं नाहीं, पण तो गेला नाहीं, कारण आपल्याला कुऱ्हाड आतां मिळेल मग मिळेल असें त्याला क्षणोक्षणीं वाटे. म्हणून हातांत लांकडाचा तुकडा घेऊन तो तसाच तेथें उभा राहिला, आणि कुऱ्हाडीच्या प्रत्येक घावाबरोबर तो आशेनें आपले डोळे मिचकावी आणि जनूनें तर आपलें लांकूड चांगलें तासलें गेलें नाहींसें पाहिलें म्हणजे मान हलवून पुनः तासणें सुरूं करावें. त्याबरोबर ह्यानें पुनः निराश व्हावें. असें बरेंच वेळ झालें. मग एकदांची त्याच्या हातीं कुऱ्हाड आली, पण त्याला ती नीट चालवितां येईना. पहिल्यानें जो लांकडाचा तुकडा कापला तो फार लहान झाला. बरें तो तासला तर फारच तासला गेल्यामुळें अतिशय बारीक झाला. ह्याप्रमाणें एक तुकडा नासून गेला तों चिमण्या आला व कुऱ्हाड मागूं लागला. ‘ आतां देतों, जरा थांब ’ असें म्हणून घाईघाईनें दुसऱ्या तुकड्यावर दामूनें कुऱ्हाड चालविली, तों त्या लांकडाला वरपासून खालपर्यंत चीर जाऊन तें अगदीं निरुपयोगीं झालें. मग तर तो चिडला व चिमण्याला म्हणाला ‘ मला वाटतें माझ्याकडे असें टक लावून न पहातां तो तिकडे जनू काय करीत आहे तिकडे जाऊन उभा राहशील तर फार बरें होईल, समजलास. तर जा येथून कसा पाहूं?’ तेव्हां चिमण्या हा आपला मित्र जनू काय करीत आहे हें पहाण्यासाठीं तेथून चालता झाला.

कप्तान—बरें पण जनू तरी असें काय करीत होता?

**पाद्री**—तो तरी दामूसारखाच धडफडत होता. त्याचें लांकूड तयार झालें होतें. नंतर कमटच्याला दोरी पाहिजे ती तांतीला पीळ देऊन तयार करावयाची होती. आणि खरोखरी म्हटलें तर हें फारसें अवघड नव्हतें, पण कुऱ्हाडीनें काम केल्यामुळें जनूचा हात इतका कांपत होता कीं, पीळ देण्यापूर्वीं तांतीचा शेवट सुद्धां त्याच्यानें बांधवेना. शिवाय त्या तांतीला गांठी असून मध्येंच जाड बारीक अशी होती ह्मणून ती उपयोगांत येण्यासारखी नव्हती. इतक्यांत दामू हातचें काम त्रासानें टाकून देऊन तेथें आला. अतिशय थकल्यामुळें तो धापा टाकीतच होता, व एका हातानें आपल्या टोपीनें वारा घेत होता. जनूचें काम असें चाललेंसें पाहून तो 'ह्मणाला हात् तिच्या मी तुझ्यापेक्षां खरेंच तांतीला चांगला पीळ देऊन ती तयार करीन' हें ऐकून जनू बोलला 'तर मग माझें हें काम तूं कर आणि तुझ्यावरचें मी करीन' चिमण्याही मग जनूला ह्मणाला 'आणि तुह्मी एकमेकांच्या कामाला लागलां ह्मणजे माझ्यासाठींही लांकूड व तांत तयार करा ह्मणजे मी तुमच्यासाठीं तीर तयार करीन, कारण त्या कामाची मला संवय आहे.'

**कप्तान**—ही आपसांत त्यांनीं चांगली बोली केली.

**पाद्री**—आणि त्यापासून त्यांना फायदाही झाला. कारण स्वतःला दुखापत करून न घेतां लांकूड वगैरे सामान न बिघडवितां आणि एक काम पुरें करून दुसऱ्या कामास लागण्यांत वेळ न दवडतां ज्याला जें काम चांगलें येत होतें तेंच तो करूं लागला. ह्यामुळें दोन फायदे झाले. त्यांचे बरेच श्रम वांचले, व वेळही पुष्कळ कमी लागला. त्यांचे तीरकमटे तयार करण्यास फारच थोडा वेळ लागला असें पाहून त्या मुलांनीं आणखी कमटे तयार करण्याचें मनांत आणिलें, कारण ते देऊन त्यांच्या बदल्यांत आवडेल तें घ्यावें असा त्यांचा हेतु होता. ह्मणून आतां पहाल तर त्या पलीकडच्या मोठ्या झाडाखालीं त्यांनीं एक जणू स्वतंत्र कारखाना काढिला आहे असें दिसेल. जनूनें लांकूड तासण्यासाठीं एक

आंकडाचा ठोकळा तेथें ठेविला आहे. जवळच पीळ देण्यापूर्वी तात अडकविण्यासाठीं दामून आंकडा लाविला आहे. आणि बुंध्याच्या एका भेगेंत एक अणीदार दगड बसविला आहे, त्यावर चिमण्या वेताच्या तुकड्यांचीं टोकें अणीदार करून तीसप्रमाणें त्यांचे उलट कांटे करतो.

कप्तान—तर मग त्यांनीं ह्याप्रमाणें श्रमविभाग केल्यामुळें आपोआप त्या कामाची कशीबशीं यंत्रेंच निघालीं ह्मणावयाचीं.

त्याच्या मित्रानें उत्तर दिलें—श्रमविभागाच्या हा ठरींव परिणामच आहे. बायका ह्मणा, पुरुष ह्मणा, फार कशाला मुलांची देखील हीच गोष्ट. कोणाला का तुह्मीं एकाच प्रकारचे श्रम करावयाला सांगा, ह्मणजे त्यांना त्याच कामाकडे एकसारखें लक्ष द्यावें लागत असल्यामुळें आपोआप मेहनत कमी पडावी ह्मणून ते कांहींनाकांहीं युक्ति शोधून काढतातच. हो बरें झालें, त्यावरून आपल्या बायांनींच हल्लीं काय चालविलें आहे, त्याची मला आठवण झाली.

कप्तान—त्यांनीं बरें काय केलें?

पाद्री—मोठेंसें कांहीं नाहीं. एवढेंच कीं जिची जशी बुद्धि व संवय त्याप्रमाणें तिला काम वाटून दिलें आहे. ह्या व्यवस्थेमुळें त्यांना पुष्कळ नफे धडधडीत दिसून आले. माझीच बायको मला परवां सांगत होती. ती म्हणाली ‘ जेव्हां कनई मला एकटीलाच सारीं कामें करावीं लागत; ह्मणजे असं कीं स्वयंपाक करावा मींच, तो आटपला कीं शिवावें मींच, शिवणें झालें न झालें इतक्यांत मुलें बाहेर झाडींत फिरायाला गेलीं, ह्मणजे त्यांना संभाळावं मींच—असें केल्यानें होई काय कीं फारच थोडं काम माझ्यानं होई.

कप्तान—तुमच्या कुटुंबाची शिवण्याची तऱ्हा तरी निराळीच होती. मला तर खास वाटतें कीं, ह्या कामांत त्यांचा हात तयार व्हायला नाहीं तरी बरेच दिवस लागले असतील.

पाद्री—खरोखरीच फार दिवस लागले; आणि ह्यावरून नाहीं

का उघड दिसत कीं, जर एकावरच एखादें काम करण्याचें पडलें आणि त्याच्या कामांत दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा अडथळा आला नाहीं, तर त्या कामांत त्याचा एकदां हात नीट चालूं लागला, ह्मणजे तसेंच सर्व काम त्याच्या हातून लौकर लौकर होऊं लागलेंच. माझ्या नागूच्या मैत्रिणींनीं पाहिलें कीं, ही शिवण्याचे कामीं साळूच्या पिसाचा सुईप्रमाणें व नागाचा दोऱ्याप्रमाणें उपयोग आपल्यापेक्षां पुष्कळच चांगला करिते. ह्मणून त्यांनीं काय केलें कीं तिला सांगितलं ‘ आह्मी तुमचें तें दुसरें काम असेल तें करूं. तुह्मी मात्र आमचे व आमच्या यजमानांचे जे कपडे फाटतील ते दुरुस्त करावे. ’ तिनें ही गोष्ट मोठ्या आनंदानें कबूल केली, कारण ह्यामुळें आमची लहान पोरगी हमेष तिच्याजवळ राहूं लागली. दुसऱ्या मुलांबरोबर झाडींत जाऊन खेळण्यासारखी कांहीं आमची मुलगी मोटी झाली नाहीं हें तुम्हाला ठाऊक आहेच. ह्मणून एकंदरीनें माझ्या बायकोला ही गोष्ट आवडली.

**कप्तान**—तर मग झाडींत मुलें खेळायला गेलीं ह्मणजे बरोबर जाते कोण?

**पाद्री**—हल्लीं तर **नागू** जात असते. आणि मुलें खेळत असलीं ह्मणजे मंडळींना चटया करण्यासाठीं ती गवत विणीत असते. ह्या कामीं ती मोठी तरबेज आहे व कामही सुबक करिते. शिवाय हें काम असें आहे कीं, एके ठिकाणींच बसलें पाहिजे असें नाहीं, तर हिंडतां फिरतां देखील तें होऊं शकतें.पावसाळ्यांत ओलीपासून त्रास न व्हावा ह्मणून प्रत्येकाला अशा चटया लागतील. आणि ती त्या तयार करून ठेवीत आहे.

**कप्तान**—तरीच **राघू** वारंवार त्या झाडींत जातो. तो कामांत कांहीं चुकार नाहीं, मग ह्मटलें इतका वेळ जातो कां? मला वाटे कीं, परत येतांना एकाद्या जंगली झाडाचें सुरेखसें फूल आपल्या टोपींत खोवावें, अशी कांहीं तरी त्याच्या मनांत नवीनच टूम आली आहे ह्मणून.

**पाद्री**—पण मला वाटतें कीं, जरी **नागू** व **राघू** हीं एकमेकांशीं बोलण्यांत दिवसांतून थोडासा वेळ दवडीत असलीं तरीही तीं ह्मणजे इतरापेक्षां

कमी काम करितात असें नाहीं. बरें हें नाहीं का तुमच्या लक्षांत आलें कीं, आपल्या वसाहतींत पहिल्या प्रथम बसायाला चटई अशी त्यालाच आहे ती.

**कप्तान**—तें तर केव्हांच माझ्या लक्षांत येऊन चुकलें होतें. बरें तें असो. हल्लीं स्वयंपाकाचा कोणी पत्कर घेतला आहे?

**पाद्री**—परशाची बायको स्वयंपाक करिते, आणि तिचा नवरा जास्त मेहनतीच्या कामीं व भटारखान्यांत एकंदर टापटीप ठेविण्यांत तिला मदत देतो. हें झालें स्वयंपाकाविषयीं. आपली बजी आणि तिची आई अशा दोघीजणी मोलकरणीचें काम करितात. जेव्हां आपण सकाळीं गुहेंतून कामावर जातों, तेव्हां त्या मागें राहून ती जागा झाडून साफ करून तेथें ताजा वल्हाळा पसरतात आणि रात्रींच्या आगट्यासाठीं सर्पण हीं गोळा करून ठेवितात. ह्या श्रमविभागामुळें आणि त्याच्यांतल्या त्याच्यांत आपोआप ज्या लडजोडी निघतात त्यामुळें एकंदरीनें ह्या बायका आपली तरतूद पुष्कळ प्रकारें चांगली ठेवितात व आपणांस लागेल तें मिळूं शकतें; पण तेंच जर का प्रत्येकीला संसाराच्या सगळ्या गोष्टी कराव्या लागल्या असत्या तर मात्र आपणांस हल्लीं आहे इतकें सुख मिळालें नसतें.

**कप्तान**—तें खरें आणि जोंपावेतों प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्रपणें घरचें सुख मिळूं शकणार नाहीं तों पावेतों ह्याप्रमाणें कामाची वांटणी व्हावी हेंच सर्व प्रकारें योग्य. पण थोडेच दिवसांनीं हल्लींची स्थिति कदाचित बदलेल. मग कसें?

**पाद्री**—बदलली म्हणून काय झालें! तशा प्रसंगीं देखील जर श्रमाची किंमत उतरणार नाहीं तर हल्लींचीच व्यवस्था फायदेशीर होईल, आणि मला तर खास वाटतें कीं, आणखी कांहीं महिने तरी आतांच्या इतकीच आपल्यास श्रमाची गरज राहील. प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र घर मिळालें, ह्मणजे वाटेल तर त्या कुटुंबांतील माणसांनीं आपल्या घरीं नि-

राळें जेवावें, पण आतांच्यासारखें अन्न एके ठिकाणीं शिजविण्याला काय हरकत आहे. आतां तर नुसतें मांस तयार करावयाचें असतें. पुढें कांहीं दिवसांनीं रोट्या ही भाजण्याची वेळ येईल आणि जसजशीं आपलीं सुखाचीं साधनें वाढत जातील तसतसे श्रमही जास्त झालेच पाहिजेत. आणि ज्यांना खायला प्यायला द्यावें लागत नाहीं, किंवा संभाळावें लागत नाहीं असे श्रमकार मिळेपर्यंत आपण होतां होईल तों श्रम वाचविण्यास झटलें पाहिजे.

कप्तान—असे श्रमकार म्हणजे यंत्रें ना!

पाद्री—थोड्याच दिवसांत केपटौनहून आपल्यासाठीं जीं हत्यारें येऊं लागतील तीं साधीं यंत्रें, व नंतर त्याच हत्यारांनीं जीं बिकट यंत्रें होतील तींही आपले श्रमकारच असें मी म्हणतों: इतका श्रमाचा सांठा आपल्या जवळ जमला, म्हणजे मायेच्या माणसांनीं आपल्या इच्छेनुरूप वाटेल तर घरोघर तरतूद ठेवूं लागून चैन करावी. आपल्या समाजांतील प्रत्येक जण हल्लींपेक्षां दुप्पट पटीनें जास्त श्रीमंत जेव्हां होईल, तेव्हां मला देखील वाटूं लागेल कीं, आमची स्वतंत्र चूल असावी आणि माझ्या बायकोनें स्वयंपाकांत सुगरणपणा दाखवावा आणि तिच्या हातचें एखादें पक्कान्न खावें.

कप्तान—मोठ्या पक्कान्नांची तर गोष्ट राहूं द्या; पण एखादा *पाय सारखा पदार्थ जरी हवासा वाटला तरी तो होण्याला कितीतरी श्रमविभाग झाला पाहिजे. आपल्या शेतांत पीक येण्यासाठीं कुंपण घातलें, जमीन नांगरली, पेरणी केली, पाटानें पाणी आणिलें इतक्या गोष्टी झाल्या, त्या एका बाजूलाच राहूं द्या; पण अजून किती तरी झालें पाहिजे! कापणी झाली पाहिजे, तशीच मळणीही झाली पाहिजे, मग दळलें पाहिजे म्हणजे एकदांची कणीक मिळेल. नंतर त्या पाय साठीं मांस पाहिजे. ज्याचें मांस असणार तें तर बिचारें पलीकडल्या कुरणांत चरत आहे. त्याला घरीं आणिलें

*Pie

पाहिजे, हलाल केलें पाहिजे, आणि मग त्याच्या मांसाचा खेमा केला पाहिजे. नंतर त्या तळ्यांतून मीठ वाळवून आणिलें पाहिजे. मग त्याला मिरीं पाहिजेत. बरें मिरीं कोठून आणाल ?

पाद्री—मिरीं जलमार्गानें आलीं पाहिजेत. आणि नुसत्या मिऱ्यांक-रितां कोण श्रम करावे लागतील ते पहा. दुसऱ्या देशांत त्यांची जे लागवड करितात त्यांचे श्रम, नंतर तीं पेट्यांतून घालून जे पाठवितात त्यांचे श्रम, त्या पेट्या जहाजांतून ह्या देशांत येतात त्याची एकंदर दगदग, नंतर केपटौनपासून येथपर्यंत तीं मिरीं ज्या गाड्यांतून येतात ती मेहनत ह्यांचा विचार करा. पण ह्या साऱ्या गोष्टी झाल्याखेरीज आपल्या साध्या पायला मिरीं मिळणार नाहींत.

कप्तान—तर *'प्लम पुडींग' पक्कान्न करायला किती आयास पडतील. येथें जवळच्या जवळच फार झालें तर कणीक आणि लोणी मिळूं शकेल; परंतु एका देशांतून साखर आणिली पाहिजे, दुसऱ्यांतून मनुका आल्या पाहिजेत, तिसऱ्यांतून मसाला, चौथ्यांतून दारू असें सामान आलें पाहि-जे. हें पक्कान्न करूं ह्मटलें तर इतका श्रमविभाग झाला पाहिजे कीं, त्याची नुसती कल्पना देखील करितां येणार नाहीं.

पाद्री—हें तर खरेंच; कारण आणखी त्या पक्कान्नाला लागणाऱ्या जिनसा उत्पन्न करण्याचीं व लांबून आणण्याचीं जीं साधनें आहेत त्यांचा-ही आपण विचार केला पाहिजे. जेथून मनुका मिळतात त्या द्राक्षांच्या मळ्यांवरच कोण खपावें लागतें, ह्याचा विचार करा. ज्या सुतारांनीं आणि लोहारांनीं द्राक्षें तयार करण्याचा सांचा केला त्यांच्या मेहनतीकडे लक्ष द्या. त्या लोहारसुतारांचीं हत्यारें करण्यासाठीं ज्यां-नीं खाणींतून अशुद्ध धातू काढली, ज्यांनीं तिचा रस केला, ज्यांनीं तो ओतून हत्यारें केलीं, ज्यांनीं भट्टी बांधिली आणि जे दुसरे त्या हत्या-राचे कामीं लागले त्यांच्या श्रमाकडे पहा. तसेंच लांकुडतोड्या, सणा-

*Plum Pudding.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

चीं लागवड करणारा, रशा करणारे, शीड करणारे, जहाज बांधणारे जहाज चालविणारे खलाशी ह्या सर्वांना त्या मनुका देशीं आणण्याकरितां श्रम करावे लागले ते पहा—आणि मग—

**कप्तान** हंसत हंसत ह्मणाला—अहो आतां पुरें झालें. तुह्मी जें इतका वेळ सांगितलें त्यानें माझी खात्री झाली कीं, जें प्लम पुडींग श्रमविभागामुळें विलायतेंत एखाद्या यःकश्चित् स्वयंपाक्याला करितां येतें तें एकटा मनुष्य स्वतः श्रमविभागाशिवाय करूं ह्मणेल तर त्याचें सारें आयुष्य देखील पुरणार नाहीं. विलायतेंतील एखाद्या परटिणीच्या न्याहारीला शंभर माणसांचे श्रम लागतात असें ह्मणतांना मीं ऐकिलें आहे, तें आतां मला अक्षरशः खरें वाटतें. त्या न्याहारीपैकीं नुसत्या चहा व साखरेबद्दलच विचार केला तर हें बहुतेक लागूं पडतेंच; कारण चहा एशियाखंडांतून व साखर अमेरिकेंतून अशी लांबून येते, ह्मणून साहजिकच चहा व ऊस लावून ह्या जिनसा तयार करून विलायतेंत एखाद्या लहानशा स्वयंपाकघरांतील मेजावर येऊन पडायाला असंख्य लोक लागले असतील. श्रमविभागासारख्या मोठ्या तत्वामुळें आमच्यापैकीं यःकश्चित मनुष्याला देखील किती सुख घेतां येतें हें मात्र आमच्या लोकांच्या लक्षांत बरोबर येत नाहीं.

**पाद्री**—शिवाय विलायतेसारखी ज्या देशांत चांगली व्यवस्था नाहीं अशा कित्येक देशचे राजे देखील आपल्या जवळचे सोन्यारुप्याचे ढीगच्या ढीग देऊन त्यांच्या बदल्यांत विलायतेंतल्या साधारण रोजंदार मजूराच्या रहाणीच्या व खानपानाच्या सोई घेऊं इच्छितील हें सहसा आपल्या देशबांधवांना वाटत नाहीं. ज्यांच्या स्वतःच्या व दरबारी लोकांच्या अंगावर लागेल तितकें जवाहीर आहे आणि प्रजेवर सर्व प्रकारें ज्यांचा ताबा आहे, ह्मणजे इच्छेस आल्यास आपल्या प्रजेपैकीं वाटेल त्याला बंदींत टाकितील किंवा त्याचा जीव घेतील असें ज्यांचें वैभव व सत्ता, त्यांच्या देखील कपाळीं फार झालें तर एखादी चटई किंवा एखाद्या

जनावरांचें कातडें निजण्यासाठीं ह्मणून असतें, लांकडी परळापेक्षां कांहीं चांगलें जेवायाला नसतें किंवा नारळाच्या करवंटीशिवाय पाणी पिण्याला नसतें, आणि त्यांच्या खानपानांच्या वस्तूंविषयीं विचार केला तर राज्याची सर्व संपत्ति दिल्यानेंही 'प्लम पुडींग' सारखे किंवा 'पाय' सारखे पदार्थ मिळूं शकणार नाहींत, किंवा न्याहारीला चहा व लोणी लावून परतलेला पाव असूं शकणार नाहीं. ह्याचें कारण पाहूं जातां हेंच कीं, त्या राजांना व त्यांच्या प्रजांना श्रमविभागाविषयीं कांहीं माहीत नसतें.

**कप्तान**—बरें तें असो, सध्यां जरी चहा व पाव हे न्याहारीला मिळण्याजोगी आपली स्थिति नाहीं, तरी पण श्रमविभागानें आपल्या झोंपड्या बांधण्याचे कामीं उद्यां किती मदत होते तें पाहूं या.

**पाद्री**—आणि मग मडकींगाडगीं त्यामुळें कितपत लौकर होतात तेंही पाहूं. कुंभारकाम सुरू करण्याविषयीं **नारायण** ह्याची बरीच घाई दिसते. लांकडी थाळ्यांतून आणखी कांहीं दिवसपावेतों खायाला लागलें असतां चिंता नाहीं असें मी त्याला ह्मणत आहें, पण ओंजळीनें पाणी पिण्यापेक्षां चांगला मनासारखा घोट घेतां येईल असें कांहीं लौकर मिळाल्यास साऱ्या मंडळीला खरोखर बरें वाटेल.

---

# भाग ७.

## भरभराट.

तीन महिन्याच्या आंत वसाहतींतील बहुतेक गोष्टींच्या संबंधानें झपाट्यानें सुधारणा झाली. पीक चांगलें होऊन धान्याचा पुष्कळ पुरवठा झाला, त्यामुळें ह्या मंडळींतील जितकीं ह्मणून चांगलीं कामीं पडणारीं माणसें होतीं त्या साऱ्यांचे श्रम संसारांतील घरगुती सुखें मिळविण्याकडे

लागले; कारण लहानापासून थोराशवेतों साऱ्यांना तीं हवीं असें फार वाटूं लागलें. ह्यावेळीं त्या लोकांची कशी स्थिति होती ह्याची कल्पना विचारी पाम्राची बायको ज्या खोलींत आजारी पडली होती, त्या खोलीचें वर्णन केल्यानें होईल. अतिशय दगदग पडल्यानें व एकसारखी नवऱ्याची व आपल्या लहान मुलीची काळजी केल्यानें तिला ताप लागला. विचाऱ्या मुलीला वसाहतींतील रहाणीचे कष्ट सोसण्यासारखे नव्हते, कारण ती अतिशय लहान असून फार नाजूक होती. ह्यामुळे तिची आई नेहमीं काळजींत असे, परंतु त्या मुलीला प्रत्येक जण जपत असे, ह्मणून चांगल्या स्थितींत असून जशी ती वाढली असती तशीच ती येथेंही गुबगुबीत झाली होती. त्याप्रमाणें पाम्रोबोवाला ही ह्मणण्यासारखें कांहीं होत नव्हतें. मात्र कधींमधीं कामामुळें त्यास थकवा येई मुलीची देखील बरदास्त सर्वजण उत्तम ठेवीत असत. त्या गुहेंत मुळीं देखील थंडीवारा लागणार नाहीं अशी जागा पाहून त्यावर अंगास न रुते अशा गवताचा बिछाना त्या मुलीसाठीं अगदीं राखून ठेविलेला असे. नागूनें आपल्या प्रियकरासाठीं चटयी करण्यापूर्वीं अगोदर लहानग्या मेरीला चटई करून दिली. ती तरी दुसऱ्यांच्यासारखी साधी नसून चांगली नक्शीची व मऊ अशी केली होती, ह्मणजे मेरीच्या सुकुमार अंगाला ती रुतूं नये किंवा इजा होऊं नये अशी होती. हरिणाचें दूध काढलें कीं, पहिला घोट मेरीसाठींच. विषारी जनावरांपासून इजा पोहचूं नये, ह्मणून फुल्याच्या बायकोनें तिच्या गळ्यांत भारलेला ताईत बांधिला. ह्या बाईखेरीज असल्या छाछूवर कोणाचा देखील विश्वास नव्हता हें खरें; परंतु मेरीला डासचिलटाखेरीज दुसरें कांहीं चावलें नाहीं, ह्मणून ती ह्मातारी मोठ्या डौलानें 'माझ्या ताईताचा हा गुण बरं' असें सांगत फिरे. पुरुष मंडळी जव्हां रानांत जाई तेव्हां तिला उचलून ते खांद्यावर बसवून नेत, आणि एखादें नारिंग किंवा द्राक्षाचा घड दिसल्यास तिनें तोडून घ्यावा ह्मणून तिला हातांनीं उंच धरीत, आणि तिनें फळें तोडून

दिलीं कीं 'आपल्या मेरीनें हा मेवा दिला आहे' असें ह्मणून तीं कप्तान किंवा मेरीचे 'बाबा' ह्यांजजवळ नेऊन देत. तसेंच मुलांनीं एक माकड पाळिला होता. त्याला न चिडवितां त्याच्याशीं खेळायला त्यांनीं मेरीला शिकविलें होतें. त्याप्रमाणें ती त्या माकडाशीं खेळत असे. शिवाय एक गरीबसा कुत्रा होता, त्याला थोडेसें शिकवून ठेविलें होतें ह्मणून मुलांनीं काय करावें कीं त्याच्या पाठीवर मेरीला बसवावें व बाजूला दोघांनीं तिला धरावें, ह्मणजे तो कुत्रा तिला घेऊन जाई. ह्याप्रमाणें सकाळीं कामावर जाण्यापूर्वी व संध्याकाळीं काम आटोपल्यावर दिवसांतून दोन वेळां ती कुत्र्यावर बसून फिरून येत असे. तात्पर्य जो तो तिला अगदीं जपत असे व खेळवीत असे, त्यामुळें ती चांगली गुबगुबीत होऊन तिच्या अंगांत शक्तिही आली; आणि प्रत्येक रविवारीं—रविवाराखेरीज इतर दिवशीं पाद्रीबोवाला मुलीला बराच वेळ घेऊन बसण्याला फावत नसे—तिचे बाबा तिला जवळ घेऊन विचारीत, तेव्हां पूर्वींच्या आठवड्यांत माहित नव्हतें असें कांहींनाकांहीं तरी जास्त ती करून किंवा बोलून दाखवी. नंतर मुलीविषयीं काळजी करण्याचें आनाबाईनें सोडून दिलें, परंतु ती स्वतःच ह्या काळजीमुळें आजारी पडली. तिचें दुखणें कांहीं जिवावरचें नव्हतें, परंतु तिला दुखण्यांत कांहीं केल्यानें वेळ जाईना, व तिच्या नवऱ्याला उगीच घोर लागला. स्वतःला सुखें मिळालीं नाहींत तरी तो त्यांविषयीं विशेषशी परवा करणारा नव्हता; परंतु दुखण्यांत कित्येक गोष्टी असल्यानें ती लौकर बरी होईल आणि त्या गोष्टी तर आपल्या स्थितींत मिळण्यासारख्या नाहींत हें मनांत वारंवार येऊन त्याला वाईट वाटे. ती त्याचें नेहमीं समाधान करी व ह्मणे 'ईश्वरकृपेनें आपल्यास कित्येक गोष्टींचें सुख आहे. ह्या दुखण्यांत सारेजण माझ्यासाठीं श्रम घेतात, त्यांचे मजवर कितीतरी उपकार आहेत.' आपल्याला पुनः एक रोगी मिळाला हें पाहून यहूापाला विशेषसें वाईट वाटलें नाहीं. त्याला चांगला अनुभव होता, आणि तो काळजी घेऊन औषधपाणी देत असे. आप-

त्या रोग्यास औषधें घालून देण्याला कुप्या किंवा शिशा नाहींत हें पाहून त्याला पहिल्या प्रथम चमत्कारिक वाटलें, कारण दुखणाइताच्या खोलींत ज्याप्रमाणें औषधें असणें जरूर आहे त्याप्रमाणेंच तेथें कुप्या व बरण्या ही अवश्य असल्याच पाहिजेत असा त्याचा समज होता. परंतु चिंठी छाविलेल्या कुपींतून औषध घेतल्यानें जो गुण व्हावयाचा त्याप्रमाणेंच मातीच्या चडव्यांतून औषध घेतल्यानेंही त्या बाईला चांगली झोंप आली असें त्याला दिसून आलें, तेव्हां मात्र तिच्याप्रमाणें त्याला देखील वाटूं लागलें कीं, अशा स्थितींत औषध मिळणें हीच मोठ्या भाग्याची गोष्ट समजली पाहिजे आणि वैद्याचें महत्त्व त्याच्या घरांतल्या कुप्या, खल, शस्त्रें इत्यादींवर कांहीं अवलंबून नसतें.

आनाबाई आजारी पडण्यापूर्वीं गुहेंतून बिऱ्हाड काढलें, हें एक परी बरें झालें होतें. मंडळीसाठीं एकंदर वेताच्या तीन झोंपड्या तयार झाल्या होत्या. प्रत्येकींत ठिकठिकाणीं कूड घालून वसाहतींतील कुटुंबांसाठीं खोल्या केल्या होत्या. तिन्ही झोंपड्यांत जी मोठी झोपडी होती तिच्या मधोमध खोली होती, ती भर दुपारीं देखील थंड असे ह्मणून तेथें आनाची सोय केली होती. मऊसें कातडें पाहून तें शिवून त्याचा थैला केला व आंत भुसा भरून त्याचा चांगला मऊ बिछाना केला. एका कोपऱ्यांत चार लांकडी ठोकळे ठेवून त्यांवर एक चौकट ठेविली, परंतु ह्या खाटेला लावायाला गोणताट नव्हतें ह्मणून त्या चौकटीला कातडें जडवून त्यावर तो बिछाना टाकिला. खालीं भुईवर निजण्याची सोय नव्हती, कारण ह्या जागेंत विषारी जीवजंतूंची फार भीति होती. त्या बिछान्यावर चादरीवजा एक हलकी व मऊ अशी चटई घातली होती, ती नागूनें सुरेख विणून तयार केलेली होती. बिछान्यावर पडल्यापडल्या हातानें घेतां येईल अशा अंतरावर दोन घडवंच्यांवर एक फळी ठेवून तीजवर एक ओबडधोबड मातीचें परळ व वाडगा अशीं ठेविलीं होतीं. परळांत कांहीं अंजीर व द्राक्षें होतीं व वाडग्यांत नारिंगांचा रस

काढून त्याचें शरबत ठेविलें होतें. शरबताला स्वाद येण्यासाठीं नारिंगाची साल कुसकरून लाविली होती. जवळच कपाट ठेविलें होतें. ह्या दुखणाईत बाईस खाण्याची इच्छा व्हावी म्हणून शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं कांहीं कांहीं रुचकर पदार्थ तयार करून पाठविले होते, ते त्या कपाटांत ठेविले होते. कोणीं मध आणि निरनिराळ्या जातींचीं फळें ह्यांचे गोड पदार्थ करून पाठविले होते. कोणीं कणीक किंवा दुसऱ्या धान्याचें पीठ घेऊन त्यांत मध, नारिंगाची साल आणि निरनिराळ्या फळांच्या रुचकर बिया घालून त्याच्या रोटया केल्या होत्या त्या पाठवून दिल्या. त्याप्रमाणें रसा, आखणी व इतर मांसाचे पदार्थही पुष्कळ आले होते. एकंदरीनें त्या बाईला कोणत्याही गोष्टीची उणीव नव्हती, फक्त वाचण्यासाठीं एखादें दुसरें पुस्तक असतें तर तिच्या अगदीं मनासारखें झालें असतें. परंतु पुस्तकें मिळण्याचा मुळीं देखील संभव नव्हता हें तिला ठाऊक होतें, म्हणून ती त्यांविषयीं कांहीं देखील बोलली नाहीं. शेजारीपाजारी तिची प्रकृति पाहण्यासाठीं मोठ्या आस्थेनें वरचेवर येत आणि बाहेर जें जें कांहीं होई तें तें सांगून तिची घटका दोन घटका करमणूक करीत. तिचा नवरा देखील आपलीं इतर कामें संभाळून फावल्या वेळीं तिजजवळ अगदीं बसून असे. तिची स्मरणशक्ति चांगली असल्यामुळें तिनें वाचलें होतें त्यापैकीं जें जें म्हणून मजेदार असें वाटलें तें तें मनांत घोळवून ती वेळ घालवी, आणि त्याबद्दल ती आपल्यास मोठ्या भाग्याची असें समजे, कारण आपल्यास पुढें कधीं हें पुस्तक वाचावयास मिळणार नाहीं अशी एखादी वेळ येईल, अशी पुस्तक वाचते वेळीं तिच्या मनांत कल्पना देखील नव्हती. परंतु इतक्या गोष्टींची अनुकूलता असूनही तिला वरचेवर वाटे कीं, आपलें ज्ञानभांडार वाढविण्यासाठीं व कांहीं वेळ वाचण्यांतच मन गढून जाण्यासाठीं एखाददुसरा आपला आवडता ग्रंथ जवळ असता तर बरें झालें असतें.

एके दिवशीं ती बसली होती असें पाहून तिच्या नवऱ्याला वाटलें

कीं, आतां एखादा परकी मनुष्य भेटावयास आणिला तर हिला त्रास होणार नाहीं. म्हणून त्यानें कप्तानाला बरोबर आणिलें.

कप्तानानें आजूबाजूला नीट न्याहाळून म्हटलें—खरंच म्हणाल तर दुखणाईत माणसाच्या खोलींत येथल्यापेक्षां जास्त सामानसुमान पाहिजे आणि केवळ इच्छेवरच जर ही गोष्ट अवलंबून असेल तर तसें सामान देखील ठेवण्याची प्रत्येकजण खटपट करील; परंतु ह्याच जागेंत किती सोयी केल्या आहेत हें पाहून मला नवल वाटतें.

आना म्हणाली—तुम्ही म्हणतां पण मी तुम्हाला सांगूं का? वास्तविक ज्याची जरूर आहे तें सारं इथं आहे इतकेंच नाहीं तर कांहीं कांहीं ऐषआरामाच्या गोष्टी देखील तयार आहेत. मला नाहीं वाटत कीं, जरी मी विलायतेंतल्या अतिशय श्रीमान गृहस्थाच्या घरांतल्या उत्तम खोलींत असते तरी मी ह्मणजे ह्यापेक्षां लौकर बरी झाले असते.

तिचा नवरा म्हणाला—शरीराच्या सुखासाठीं ज्या गोष्टींची जरूर त्या सर्व येथें आहेत, ही गोष्ट खरी; पण तुला पुस्तकें देतां आलीं नाहींत, ह्यामुळें मला दररोज वाईट वाटतें. कारण पुस्तकामुळें स्वतंत्रपणानें आनंदांत वेळ घालवितां येतो. जर येथें पुस्तकें असतीं तर ज्या ज्या वेळीं मला बाहेर कामावर जावें लागे त्या त्या वेळीं तुला कंटाळवाणें वाटतें ना.

आना—पुस्तकें नसल्यानें वेळ जातां जात नाहीं, ह्याचा मला पूर्ण अनुभव येऊन चुकला आहे, व त्यावरून मला पूर्तपणीं वाटूं लागलें आहे कीं, जरी प्रत्येकास जीवाचीं बाह्य सुखें असणें हें इष्ट आहे तरी ही तीं बाह्य सुखें केवळ निराळया उन्नत अवस्थेलाच कारणीभूत असतात. शरीरासाठीं जें कांहीं पाहिजे तें एकदां आपल्याला मिळूं लागलें, ह्मणजे मनाला गुंतवून टाकणारे व्यासंग असले पाहिजेत, नाहीं तर आपली समाधानवृत्ति राहत नाहीं.

पाद्री—मन नेहमीं गुंतलेलें राहतें म्हणूनच विशेषतः उत्पादक उद्यो-

गाची उपयोगिता आहे. आणखी त्या पासून दुसराही एक हेतु सिद्धीस जातो. तो असा कीं, त्यामुळें उत्तरोत्तर अधिक योग्यतेचा व वरच्या पायरीचा असा उद्योग करण्याची स्थिति प्राप्त होते. आणि जरूर ती फुरसत व सुखाच्या गोष्टी ह्या मिळवून जर आपण उगाच स्वस्थ बसलों, तर ज्यासाठीं आपण निर्माण झालों तें देखील आपण करीत नाहींसें होतोंच.

आना—जी गोष्ट साध्य करावयाची ती ज्या साधनांमुळें वास्तविक मिळते तीं साधनेंच साध्याच्या ठिकाणीं होऊन बसतात म्हणजे काय कीं, तीं साधनेंच हस्तगत झालीं म्हणजे आपली कर्त्तव्यता आटपली असें वाटूं लागतें. असा चुकीचा ग्रह आपल्या लोकांचा होण्याची भीति आहे. आपण आपलें कर्त्तव्य करीत आहोंत हें ते समजतात—स्वतःचा व स्वतःच्या कुटुंबाचा चरितार्थ चालावा व शरीरसुखाच्या गोष्टी मिळाव्या ह्यासाठीं ते सध्यां मेहनत करीत असले, म्हणजे उत्तम रीतीनें त्यांच्या श्रमाचा व वेळेचा उपयोग होत आहे असें वाटतें आणि हा उद्योग चालू असला, म्हणजे त्यांचें मन गुंतलेलें राहून त्यांना सुख मिळतें. पण पोट भरणें व शरीरास आराम देणारे पदार्थ मिळविणें ह्या पलीकडे जास्त उन्नत अवस्थेला जाण्याचा यत्न न करितां त्याच गोष्टी आपले इच्छित हेतू आहेत असें ते मानूं लागतील ह्याचीच मोठी भीति आहे. कांहीं महिन्यांनीं आपल्याला जें जें हवें तें तें पुष्कळ सांठविलें जाईल. आणि आपल्याला जितक्याचा खप लागण्याचा संभव आहे त्यापेक्षां जास्त खाण्याची सामुग्री व कपडेलत्ते आपण सांठवून ठेवण्याचे नादीं लागलों तर जगाचा आपल्याला अनुभव आहे व पुस्तकांतून वाचलें आहे तें सारें विसरून गेल्यासारखें होईल, ही किती दुःखाची गोष्ट बरें!

कप्तान—बाई ह्याविषयीं तुम्ही निर्धास्त असा. येथून जवळ जी दुसरी वसाहत आहे तिशीं व साधल्यास केपटौनशीं देखील व्यापार करण्याचें

आपल्या मंडळीच्या मनांत आहे. आजपासून पांचवर्षांत जर आपला व्यापार चांगला भरभराटींत येऊन आपण उत्पन्न केलेला माल देऊन त्याचे बदल्यांत प्रत्यक्ष विलायतेंतील कारखान्यांत तयार झालेले पदार्थ घेऊं लागलों तर त्याचें मला नवल वाटणार नाहीं. आपल्या लोकांचें चांगलें एक मोठें गांव व्हावें, त्यांत विटांचीं किंवा दगडांचीं घरें व्हावींत, रस्ते व पूल व्हावेत, केपटौनला जाण्यासाठीं व तिकडून येण्यासाठीं नेमिलेल्या वेळीं गाड्या सुटाव्या आणि ह्या साऱ्या गोष्टींमुळें ज्या नवीन नवीन गोष्टी सहजीं आल्या पाहिजेत त्या आपल्यांत याव्यात इतक्या गोष्टी होईपर्यंत जर आपण असेच नेटानें उद्योग करीत राहिलों, तर आपल्या लोकांना निरनिराळ्या प्रकारचे व्यासंग पुष्कळ होतील असें नाहीं तुम्हाला वाटत?

**आना**—ह्यांत काय संशय, कारण जेथें म्हणून इतक्या सुधारणा होतात तेथें त्यांचे स्वाभाविक परिणाम काय काय होतात हें मी जाणते. इतक्या गोष्टी होऊं लागल्या म्हणजे साहजिक आपल्याला एक देऊळ लागेल, शाळाही होईल आणि पुस्तकालय देखील होईल. आणि आपल्या समाजाचा उद्योग कितीही वाढत गेला व त्याचे प्रकार भिन्न भिन्न होत गेले, तथापि समाजांतील प्रत्येकाला आपल्या मनाची उन्नति व्हावी ह्या हेतूनें ज्ञान वाढविण्यासाठीं जास्त जास्त फुरसद काढावी असें वाटूं लागेल.

**कप्तान**—आणि ह्यामुळें आपोआप त्यांच्या ऐहिक स्थितींतही सुधारणा होईलच. नवीन युक्त्या व शोध निघतील त्यांमुळें सुखाचे व आरामाचे पदार्थ पूर्वीपेक्षां अल्पायासानें व सतत मिळतील व हल्लीं ज्यांची स्वप्नांत देखील कल्पना नाहीं अशीं नवीन नवीन सुखाचीं साधनें आपल्याला मिळतील. ज्ञानाच्या अनुरोधानें श्रम केल्यास किती गोष्टी होतील ह्यांचा अंत लागणार नाहीं.

**पाद्री**—कप्तान, तुम्हाला आठवत असेलच, त्या रात्रीं आगटीजवळ

शेकत बसलों असतां आपलें काय बोलणें झालें तें. आपण ह्मटलें होतेंच कीं नैसर्गिक शक्त्यांमुळें सर्व पदार्थ उत्पन्न होतात, आणि मनुष्याच्या श्रमामुळें कायते पदार्थ एकत्र होतात ह्या पलीकडे मनुष्याच्या श्रमानें कांहीं होत नाहीं. आतां ह्या सृष्टींत जे पदार्थ आहेत ते सर्व कांहीं आपल्याला माहित नाहींत, तसेंच किती प्रकारांनीं ते पदार्थ एकमेकांशीं संयोग पावतात हें देखील सर्व प्रकारें आपल्याला ठाऊक नाहीं, ह्मणून मनुष्याचे श्रम काय काय करूं शकतील हें सर्व कळणार नाहीं.

कप्तान—आजपावेतों काय काम झालें आहे तेंच पहाना! बहुत-करून मनुष्यांजवळ इमारती लांकूड, कापड, आणि रशा ह्या जिनसा पुष्कळ काळपर्यंत असून त्यांनीं वाऱ्यांत किती शक्ति असते हें ही नीट पाहिलें असेल आणि मग पुष्कळ काळ लोटल्यावर ह्या जिनसा एकत्र करून त्यांनीं तारूं बांधिलें असेल, आणि तुह्मीच पहा ह्याप्रमाणें नैसर्गिक शक्त्यांचा उपयोग करून मनुष्याच्या श्रमामुळें मनुष्यांना महा-सागरावरून जातां येतें आणि त्यांच्या इच्छेस आल्यास ते पृथ्वीला प्रदक्षिणाही घालूं शकतात. ह्याप्रमाणेंच वाफेच्या यंत्राची गोष्ट, आणि ज्या कलांमुळें मनुष्याला आपली स्थिति उत्तरोत्तर चांगली करितां येते त्या साऱ्या कलांची देखील हीच गोष्ट. जगत् निर्माण झाल्या दिवसा-पासून सृष्टीजन्य पदार्थ आहेत, मात्र जसें ज्ञान वाढत गेलें तदनुसार मनुष्याचे श्रम होऊन कालमानाप्रमाणें काय तो त्यांचा जास्त जास्त उपयोग होऊं लागला.

पाद्री—जगतांत काय सुधारणा होतील हें कधींही सांगतां येण्यासारखें नाहीं, कारण ज्यामुळें सुधारणा होतात त्या साधनांचाच अंत लागण्या-सारखा नाहीं. एकंदर सृष्टीला पार नाहीं. मनुष्याच्या श्रमाची वृद्धि ह्मपाट्यानें होण्याला दुसरीं कारणें आहेतच, पण तीं तूर्त एका बाजूला जरी ठेविलीं तरी लोकसंख्या वाढत जाईल त्या मानानें ते श्रम वाढतीलच.

त्याच्या बायकोनें विचारलें—तीं वरं कोणतीं कारणें?

**पाद्री**–आतां तेंच मी सांगणार आहें. सृष्टीजन्य पदार्थ आणि मानवी श्रम ह्या दोहोंलाही अंत नाहीं आणि दुसरें जें असलें पाहिजे—श्रमाला मार्ग दाखविणारें मनुष्याचें ज्ञान—तेंही उत्तरोत्तर वाढतच जाईल असें दिसतें. ह्मणून सुधारणा ती कशी व कोठें थांबणार ?

**कप्तान**–ईश्वरी सूत्रानें हे सर्व पदार्थ उत्पन्न होतात व त्याचवेळीं त्यांच्या अंगीं तदुपयोगिताही उत्पन्न होते. ह्यामुळें सदोदित प्रगमन व्हावें आणि जे विचारपूर्वक दूरवर पाहतील त्यांस उत्तरोत्तर चांगलाच काल दिसावा असा ईश्वरी संकेत दिसतो. मनुष्याच्या ऐहिक स्थिति विषयीं एक मोठें तत्व ह्या ईश्वरीसूत्रांवरून दृष्टोत्पतीस येतें. ह्या तत्वाचा वास्तविक अर्थ समजल्यास सर्व मानव जातीच्या ऐहिक भरभराटीला ( सुधारणेला ) एकंदरींत विचार केला असतां खळ पडेल अशी मुळीं देखील भीति राहाणार नाहीं, आणि जर त्या तत्वानुसार यथायोग्य वर्तन झालें तर हल्लीं जी थोडीबहूत आपदा आहे तिचा देखील समूळ ऱ्हास होईल.

**आना**–असें तें तत्व तरी काय आहे ?

**कप्तान**–तें हें कीं मनुष्य हें एक यंत्र असून श्रम हा त्या यंत्राची शक्ति आहे, आणि मनुष्याचीं जशीं साधनें असतील त्या मानानेंच कायतो त्या शक्तीचा व्यापार कमीजास्त होईल.

**पाद्री**–**बरं कप्तान,** आतां तुह्माला हें तत्व समजलं आहे तर तुह्मी कसं काय वागणार ? तुमच्याकडे मोठ्या जबाबदारीचें काम आहे, आणि एखाद्या गोष्टीचा खरेपणा पूर्णपणें तुमच्या मनांत बिंबला ह्मणजे त्याप्रमाणें आचरण होणार नाहीं असें तुमच्या हातून कधींही होणार नाहीं.

**कप्तानानें** उत्तर दिलें–खरेंच सांगूं का ह्यासंबंधीं मीं कशाप्रकारें वागलें पाहिजे ह्याविषयीं मी पुष्कळ विचार करीत आहें. पण मानव श्रमाची जी ही प्रचंड शक्ति आहे तिला चांगलें वळण लावणें अगर

तिचा दुरुपयोग करविणें ह्या कामीं सरकाराचा किती तरी हात असतो, ह्याचा जसजसा मी विचार करतों तसतसें आपल्या वजनाचा योग्य तोच परिणाम व्हावा अशा बेतानें आपण आपला अधिकार वापरला पाहिजे असें मला वाटूं लागतें

**आना**—मला वाटत होतें कीं लोकांना, वाटेल तसें करूं दिलें ह्मणजे श्रमाला आपोआप योग्य तीच दिशा मिळेल; ह्यापलीकडे सरकारानें कांहीं हात घालण्याचें कारण नाहीं.

**कप्तान**—निरनिराळ्या प्रकारचे श्रम ह्यांपुरताच जर विचार केला तर तुमचें ह्मणणें बरोबर आहे. || सरकाराप्रमाणें माझ्या हातीं जर सत्ता आहे तर शेतकऱ्यापेक्षां दुकानदाराचे श्रम चांगले असें ह्मणण्याचें मला कांहीं कारण नाहीं. त्याप्रमाणेंच एका धंद्यापेक्षां दुसऱ्या धंद्याचे लोकांस जास्त मेहेरबानी दाखविणें किंवा उत्तेजन देणें हेंही बरोबर होणार नाहीं. परंतु मी ज्या धोरणानें आपला अधिकार वापरीन त्यावरून श्रमाची उपयोगिता कमी किंवा अधिक करणें हें मात्र माझ्या हातीं राहील.

**पाद्री**—उदाहरणार्थ पहा. जर ह्यांनीं संखेच्या मानानें श्रमविभाग जितका होऊं शकेल तितका करण्याकडे लोकांना उत्तेजन दिलें तर श्रमाची किती पटीनें तरी जास्त शक्ति वाढेल. पण तेंच जर का आपण सर्वांनीं वेगवेगळालें राहून आपल्या स्वतः पुरतेंच काम करावें अशाकडे लोकांचें मन वळविण्याच्या कामीं त्यांनीं आपल्या अधिकाराचा उपयोग केला तर आपल्या वसाहतीचें जें मुख्य साधन त्याचाच ह्यांनीं करवला तितका नाश केला असें होईल.

**कप्तान**—आणि ह्याप्रमाणें जर श्रमविभागाला उत्तेजन दिलें तर श्रमाची शक्ति अतोनात वाढेल, कारण अशा विभागानें तितक्याच श्रमापासून जास्त भरपूर उत्पन्न होतें. यंत्रकलेला उत्तेजन देण्यानें देखील हाच फायदा आहे, कारण एखाद्या कामाला जी मेहनत लागावयाची

तिला यंत्रामुळें भर पडून ती किती स्वल्प होते ह्याचा आपल्याला पूर्वी अजमास देखील करितां येत नाहीं. तसेंच श्रमाचा विस्तार कोठपर्यंत असूं द्यावा हें देखील माझ्याच हातीं राहाणार. खायाला जशीं माणसें जास्त होतील त्याचमानानें खाण्याचे पदार्थ उत्पन्न करण्यासाठीं मेहनतही झाली पाहिजे, आणि इकडे मीं लक्ष दिलेंच पाहिजे. कोणालाही आळसी राहूं देतां उपयोगी नाहीं, त्याप्रमाणेंच उत्पादक श्रमकारांच्या मानानें अनुत्पादकांची संख्या जास्त होणार नाहीं हेंही मलाच पाहिलें पाहिजे.

**आना**—तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें आपल्यासारख्या लहानशा वसाहतींत करितां येईल; परंतु मोठ्या राष्ट्रांच्या सत्ताधीशांच्या हांतून खरोखरी हें होऊं शकणार नाहीं असें मला वाटतें.

**कप्तान**—आपल्या राज्यांत कोण आळसी आहे, कोण उद्योगी आहे आणि आळसी असेल त्याला सजा करावी व उद्योगी असेल त्याला उत्तेजन द्यावें हें कांहीं इंग्रज सरकारासारख्या मोठ्या राष्ट्राचें काम नाहीं. असें पाहत बसलें तर कधींही पार येणार नाहीं.ह्यापासून राजकर्ते व प्रजा ह्या दोघांनाही त्रास व्हावयाचा.-पण हेंच करण्याला एक सोपा मार्ग आहे. राजकर्त्यांनीं उद्योगाला सर्व प्रकारें मोकळीक दिली पाहिजे आणि धंद्याचे लोकांना दुसऱ्या धंद्यांवर ज्यामुळें गैरवाजवी सरसी मिळते ती देहनगी, मनाई अशा सर्व तडजोडींचा राजकर्त्यांनीं उपयोग करूं नये, कारण उद्योगाच्या स्वैर गतीला ह्या सर्व अडचणी होत. ह्या तत्वाचाच जर बरोबर अंमल झाला तर आळशांना प्रायश्चित आपोआप मिळून उद्योगी लोकांना आपल्या मेहनतीचें फळही मिळेल, आणि समाजाच्या हितासाठीं जितके अनुत्पादक श्रमकार अवश्य असलेच पाहिजेत तितकेच राहतील.

**आना**—मेहनत करणाऱ्यांच्या मेहनतीचें चीज होईल असें जें बोलला तेथ पावेतों मला नीट समजलें, पण मी ह्मणते कीं—

तिला काय ह्मणावयाचें होतें तें पुरें होण्यापूर्वींच एकजण आंत येऊन ह्मणाला ' साहेब आपल्यासाठीं मंडळी बाहेर उभी आहे '

पात्रानें विचारिलें 'कोणासाठीं, माझ्यासाठीं कां ह्यांच्यासाठीं?' आलेल्या मनुष्यानें उत्तर दिलें ' आपण दोघांनींही बाहेर आलें पाहिजे, असें मला वाटतें. त्या पलीकडल्या चेसनटच्या झाडाखालीं आपली मंडळी जमली होती आणि त्यांच्या वतीनें कांहींजण बाहेर येऊन उभे आहेत.'

हें ऐकून आना ह्मणाली 'बरं का मला हात देण्याचं होईल, तर मी-देखील बाहेर देवडीवर बसून काय होतें तें पाहीन'. 'पण तूं थकून जा-शील असें मला वाटतें' असें तिचा नवरा ह्मणाला, त्यावर ती ह्मणाली ' वाचल्यानें जशी मला हुशारी वाटते तशीच बोलण्याचालण्यानें देखील येते, आणि सध्यां बोलण्याचालण्यांत आणखी वेळ घालवावा असें मला वाटत आहे.'

मंडळीच्या तर्फेनें जे आले होते त्यांत यल्लापा हाही होता. नवऱ्या-च्या खांद्यावर हात ठेवून आपलें आजारी कूळ चांगलें चालत चालत पुढें येत आहे असें पाहून त्याला चमत्कार वाटला. रोग्याचा कल पाहून त्याप्रमाणें वैद्यानें पथ्यापथ्याचें सांगितल्यास पुष्कळ प्रसंगीं हितच होतें हें तो जाणून होता ह्मणून त्यानें तिला ह्मटलें ' बाई, तुह्मी वाऱ्यांत बसतां खरे, पण ह्यापासून तुह्मांला बरेंच वाटेल आणि जर येथें बसून घटकाभर करमणूक करून घेण्याइतकी शक्ति अंगांत आली असेल तर येथें बसल्यानें प्रकृतीलाही मानवेल. ' वैद्यराजांचा असा सल्ला पडल्यावर मग काय लागलीच तिला देवडीवर बसण्यासाठीं सर्व सोय केली. तिला टेकण्यासाठीं पाठीशीं उशा दिल्या व पाय टाकण्यासाठीं चौरंगवजा एक लांकडाचा ओंडा पायाजवळ ठेविला आणि अमेरिकेंतल्या एखाद्या लागवड करणाऱ्या साहेबाच्या टोपीसारखी मली मोठी गवताची टोपी तिला घालायला दिली. देवडीवर कांहीं तरी गडबड चालली आहे असें छोट्या मेरीनें दुरून पाहिलें मात्र, लागलीच ती दुडदुड पळत

येऊन काय चाललें आहे तें पाहूं लागली. एका तासापूर्वीं आपल्या आईजवळ ती बिछान्यावर खेळत होती. मग ती बाहेर खेळायाला गेली त्यावेळीं आज तरी आपली आई कोठें दुसरीकडे आपल्या नजरेस पडेल असें तिला वाटलें नाहीं.

आईजवळ जाण्यासाठीं ती देवडीवर चढण्याची खटपट करूं लागली आणि मोठ्या हर्षानें ओरडूं लागली, ' आई, आई, मला मांडीवर घे, मग मी एक गोड गोड पापुली देईन. '

तिच्या बापानें तिला उचलून आईजवळ दिल्याबरोबर आईच्या खांद्यावर मान टाकून ती स्वस्थ भगदीं चिकटून बसली, आणि तिचे खेळगडी तिच्याकडे चोरून पहात व खेळायला येण्यासाठीं खुणा करीत होते तरीही ती तेथून हलेना. ती येत नाहीं असें पाहून एक एक जण पुढें येऊन हळूच आनाच्या दृष्टीस पडला आणि तिनें त्याकडे पाहून हंसून, नाहीं ह्मणून मान हलविल्याबर सारेजण पुनः खेळायला ह्मणून पळून गेले. ह्यामुळें मेरीच्या मनाप्रमाणें आईजवळ बसायला सांपडलें.

यल्लापा, नारायण आणि दगडोबा असे तिघेजण मंडळीच्या तर्फेनें आले होते, त्यांस कप्तान म्हणाला ' कसं काय तुह्मी बसाल कीं नाहीं? बसल्यावर मग सांगा कां आलां तें? '

ह्या वसाहतीवर तो अकस्मात घाला आला त्या दिवसापासून हा काळपावेतों कोणी कोणाचा फारसा मान ठेवीत नव्हता, कारण साऱ्याच जणांवर सारखा प्रसंग कोसळल्यामुळें साऱ्यांची एकच स्थिति झाली होती ह्मणून त्यांच्यांमध्यें भेद राहिला नव्हता. परंतु त्यावेळीं मात्र ते तिघेजण कांहीं केल्यानें बसेनात व आपल्या टोप्या काढून ते नम्रतेनें उभेच राहिले.

ते म्हणाले ' आमचं काम मिळून इतकंच कीं, पलीकडे आमची मंडळी जमली होती हें आपल्याला कळवायाचें. जमून हा विचार चालला होता कीं, सध्यां आपली ऐपत कशी काय आहे आणि पांग-

त्या स्थितींत आहों असें नजरेस आल्यास कप्तान साहेबांना वसाहती-वर मुख्य नेमून त्यांनीं फौजदारी सर्व काम पहावें आणि एकंदर सर्व व्यवस्था ठेवावी. त्याप्रमाणेंच स्टोन साहेबांनीं शाळामास्तरचें काम पत्करून आह्मांस पाद्य्राप्रमाणें धर्मसंबंधीं उपदेश करण्याचें कामही करावें. आणि ह्याबद्दल आपल्या दोघांचीही कांहीं तरी कायमची व्यवस्था लावून द्यावी. मग मंडळींनीं ठरविलें कीं जरूर तीं हत्यारें केपटौनहून आलीं, ह्मणजे पाहिल्यानें आपल्याला निरनिराळीं घरें बांधून द्यावयाचीं आणि नेहमींच्या पद्धतीप्रमाणें रोकड पगार देतां येण्यास येथें पैशाचें चलन सुरू झालें पाहिजे. हल्लीं मंडळीची तशी स्थिति नाहीं, परंतु पैशाचें चलन सुरू होईपावेतों येथें जें जें उत्पन्न होईल त्याचा कांहीं तरी नियमित भाग आपल्यासाठीं काढून ठेवायाचा. मंडळीची आपल्याला हीच विनंति आहे कीं, आपण हें ह्मणणें मान्य कराल व शेवटीं हा त्यांनीं निरोप सांगितला कीं आपण दोघांनींही साऱ्यांसाठीं जे श्रम केले आहेत तें उपकार आह्मी कधीं देखील विसरणार नाहीं, आणि आलीकडे आपण सर्वजण संकटावस्थेंत होतों त्या वेळीं आम्हीं आपल्याशीं बरोबरीच्या नात्यानें वागलों, ह्याबद्दल आपण आम्हाला माफी करावी, पण हल्लीं साधारण ददात दूर होऊन थोडीशी चांगली स्थिति येत चालली आहे, ह्मणून ज्यानें त्यानें आपापल्या पायरीप्रमाणें पुनः वागूं लागावें हें योग्य. ह्यासाठीं आपल्यासारख्या गृहस्थांच्या थोरपणास योग्य अशीच अदब या उपरांत आम्ही ठेवणें हें वाजवी दिसतें.'

हें ऐकून कप्तानाला थोडेंसें वाईट वाटलें ह्मणून तो झटकन उठला आणि आपली टोपी लांब टाकून म्हणाला—बाबांनो तुम्ही सारेजण अगदीं चुकतां असें मला वाटतें. खरें म्हणाल तर हें आहे काय, तुम्हीं म्हणतां काय हेंच मला समजत नाहीं. गृहस्थ म्हणतां तरी कोणाला? मी तुमच्यासारखाच एका वाण्याचा मुलगा आहे. मग

तुमच्यांत आणि माझ्यांत तफावत तो काय? तशांतून मोठेपणा येण्याला मी तसें कांहीं मोठें केलें नाहीं. मग ही गडबड पाहिजे कशाला. शिवाय मी तुम्हाला सांगतो तुम्ही कसे चुकतां तें! हें पहा, खरें म्हणाल, तर मोठेपणा पारखायला आलीकडे जी आपली स्थिति होती तीच स्थिति चांगली. आणि निदान माझें तरी मत असें आहे कीं, जेव्हां वास्तविक मोठेपणा दिसला पाहिजे तशा वेळींच जर मोठेपणा लोपून जायला लागला तर तसलें महत्व कवडी मोलाचें समजलें पाहिजे. जेव्हां आपण सारजण संकटावस्थेंत होतों तेव्हां जर सारखीच पायरी होती तर -

**यल्लापा**—पण साहेब, आपली व आमची पायरी सारखी नव्हती. हें **दगडोबांनीं** आपल्यास सांगावयाचें होतें पण ते बोलण्याच्या घाईत विसरले असें वाटलें. त्यावेळीं आपण आम्हाला नीट सल्ला मसलत देऊन मार्गाला लावीत होतां म्हणूनच आतां आम्ही आपल्या हातीं सर्व सत्ता देणार. त्यावेळीं आंम्हा सर्वांस आपण श्रेष्ठ होतां म्हणूनच आम्ही आतां आपल्याला मान देणार.

**कप्तान**—असें काय, तर मग गोष्टच निराळी. चांगल्या तत्वाला अनुसरून जर समाजांत पायऱ्या असतील तर त्यापासून समाजाचें पुष्कळच हित असतें हें मी पूर्णपणें समजतों. जो तुम्ही सर्वजण मिळून मान देत आहां तो त्या मोठ्या अधिकाराला अनुरूपच आहे म्हणून हा मान व अधिकार ह्यांचा मी मोठ्या आनंदानें स्वीकार करितों. मान व अधिकार घेण्यास मी पात्र आहें किंवा नाहीं हें पहाणें तुमचें आहे, माझें नाहीं. आणि तुम्ही जर मला पात्र म्हणून ठरविलें तर माझी योग्यता नाहीं असें म्हणून शुष्काशुष्कीं मीं विनय दाखवीत बसणें म्हणजे माझे ठायीं खरी लीनता आहे असें होत नाहीं. ह्मणून ज्यांनीं तुह्माला पाठविलें आहे त्यांना माझा हा निरोप मेहरबानी करून कळवा कीं, ' हा मान दिल्यानें सर्व जणांनीं मजविषयीं जें चांगलें

मत प्रकट केलें त्यामुळें मला फार संतोष झाला आहे, आणि तुह्मी दिलेला अधिकार व त्यासंबंधीं मजविषयीं केलेली व्यवस्था हीं मला मान्य आहेत.'

हें कप्तानाचें बोलणें ऐकून त्या तिघाजणांनीं फार लवून सलाम केला. कप्तान पुनः बोलूं लागला 'मी आपली सत्ता कोणत्या धोरणावर वापरणार हें सर्वांना कळावें, ह्मणून सर्वांची सभा जमविण्याचा माझा बेत आहे. कांहीं निर्बंध करावयाचें माझ्या मनांत आहे त्याविषयीं त्या सभेंत मंडळीची सल्ला घेईन, आणि सर्वांच्या कल्याणासाठीं कांहीं दुसरे नियम सभेनें पास करावे अशी माझी इच्छा आहे तेही सभेपुढें ठेवून त्यांची मंजुरी घेईन. केपटौनला जो आपण मनुष्य पाठविला आहे तो परत येईपर्यंत कांहीं ही सभा होणार नाहीं,कारण तो आला ह्मणजे उपजीविकेचीं व शत्रूपासून आपलें रक्षण करण्याचीं आपल्याजवळ काय काय साधनें व सामुग्री आहे तें समजेल.'

त्या तिघाजणांनीं पुनः सलाम करून पाद्री काय जबाब देतो तो ऐकण्यासाठीं ते त्याजकडे वळले. पाद्री ह्मणाला 'तुमच्या मुलांचा पंतोजी व स्वतः तुमचा धर्मसंबंधीं उपदेष्टा ह्या नात्यानें मी तुमचें काम करावें अशी विनंति ऐकून मला फार संतोष होत आहे. मला संतोष वाटण्यासारखें ह्यांत पुष्कळच आहे. आलीकडील प्रसंगामुळें तुमच्या जीवाला स्वास्थ ह्मणून नाहीं; ह्यामुळें अतिशय महत्वाच्या गोष्टींविषयींची आस्था तुमच्यांत कमी झाली नाहीं ही एक आनंदाची गोष्ट. आतां ही पारत्रिक गोष्टीविषयींची आस्था कमी तर झाली नाहींच, पण मला असें वाटतें कीं ती किंबहुना जास्तच झाली असावी, कारण संकटांत मनुष्याचें मन कठोर न होतां उलट कोंवळें होतें. ईश्वरीनेमामुळें कांहीं दुःख ओढवल्यास जर आपली संतुष्टवृत्ति नाहींशी होणार नाहीं, तर त्या दुःखामुळें आपलें लक्ष ईश्वराकडेसच जास्त लागेल. तुमच्या ह्या विनंतीनें असेंही दिसून येतें कीं,हल्लीं तुमच्या पाठीमागें पूर्वींसारखी आप-

दावस्थेची निकड नाहीं. नाहीं तर आतां तुमच्या मुलाबाळांच्या हातून मेहनत घेऊन कांहीं उत्पन्न करण्याचा विचार एकीकडे ठेवून त्यांस मी शिक्षण द्यावें व ह्याकरितां आपल्या प्राप्तीपैकीं कांहीं अंश काढून ठेवावा असें तुमच्या मनांत येतें ना. तसेंच चारचौघांत ज्या प्रकारचा लौकिक असावा ह्मणून मला मनापासून वाटतें त्याप्रमाणें माझ्या कामाची किंमत तुह्मी करीत आहां असें दिसतें. हें पाहून मला संतोष तर होत आहेच, पण तोच लौकिक कायम राहण्याबद्दल मी हमेष मनापासून झटेन. हे एकंदर विचार मनांत आणितां तुमच्या इच्छेआड जावें असें मला वाटत नाहीं, मात्र एका गोष्टीविषयीं माझें मन घेत नाहीं.'

कोणती गोष्ट ह्याला पसंत नाहीं व ती पसंत नसण्याचें कारण काय हें कळण्याची प्रत्येकाला उत्कंठा लागली. तो ह्मणूं लागला ' ती कोणती ह्मणाल, तर माझ्या कामाच्या बदल्यांत तुह्मी माझ्यासाठीं जो बंदोबस्त केला त्याविषयीं मला बोलावयाचें आहे. आपल्या हुद्याचे कामाबद्दल कप्तान साहेबांनीं कांहीं तरी तनखा घेणें वाजवी आहे, कारण अशा व्यवस्थेनें प्रत्येकजणाला जो फायदा होतो त्याचा मोबदला ठरवून तो प्रत्येकजणाकडून घेण्यास—अशा फायद्याचें प्रमाण प्रत्येक व्यक्तीमागें काय पडतें हें विभागलें जाण्यासारखें नसतें ह्मणून—साधन नाहीं. चांगल्या राज्यव्यवस्थेपासून मिळणारें सुख प्रजेला सर्वसाधारण (सारखेंच) असतेंच, ह्मणून सर्वांनीं त्या सुखाबद्दल आपल्या वांट्याचें दिलें पाहिजे, कारण अशा सरकारची प्रजा असल्यानें काय काय दुःखें ओढवत नाहींत त्याचा अंदाज कोणालाही नीटसा करतां येणार नाहीं. पण माझ्या सारख्याच्या मेहनतीची गोष्टच निराळी, ह्मणून त्या मेहनतीचें बक्षीसही निराळ्या तऱ्हेनेंच मिळालें पाहिजे. माझ्या धर्म विषयक मेहनतीनें ज्या कोणाला ह्मणून फायदा झाला असें वाटेल त्यानें आपल्या ऐहिक मालमत्तेपैकीं जें द्यावेंसें वाटेल तें मला आणून द्यावें. तसेंच ज्यांच्या मुलांना मी शिकवीन त्यांनींच कायतो माझ्या मेहनतीच्या

मानाप्रमाण तिच्या बदल्यांत आपल्या उत्पन्नाचा भाग काढून ठवावा. असें केल्यानें जर हल्लींच्या व पुढें लागणाऱ्या खर्चापेक्षां मजजवळ जास्त माल आला आहे असें दिसेल तर मी त्यापैकीं जास्त तेवढा भाग परत करीन, पण जर मजजवळ पुरेसें नसेल तर मात्र मी आणखी मागेन.'

यल्लापा ह्मणाला ' साहेब, मी जरा बोलतों ह्याच्याबद्दल माफी असावी. जोंपर्यंत तुमच्या आमच्यामध्यें ह्या गोष्टी आहेत तोंपर्यंत सारें ठीकच आहे कारण आपण एकमेकांला चांगले ओळखतों. पण इतर शाळामास्तर व पाद्री ह्यांना तुह्मी सांगता हा कायदा का लागू असतो?'

त्यानें उत्तर दिलें ' पगाराची रकम ठरींव असण्यापेक्षां जर मेहनतीच्या मानानें बदला मिळेल तर कोणत्याही हुद्याचें काम उत्तम होतें हें तुह्माला ह्मणजे मीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. पुष्कळ सरकारी व इतर हुद्याचीं कामें अशीं असतात कीं मेहनतीचें मान मुक्रर करितां येण्यासारखें नसतें ह्मणून पगाराची रकमही ठरवितां येत नाहीं. पण ज्याची ह्मणून मुक्ररता करितां येते त्याबद्दल पगाराचें देखील मान कमी अधिक असलें पाहिजे. मग तो पाद्री असो किंवा शाळामास्तर असो किंवा कोणी का इतर सार्वजनिक श्रमकार असो. फौजदार, न्यायाधीश, शिपाईप्यादे, चाकरमाणसें आणि अशाच प्रकारचे दुसरे लोक ह्यांना दरमहाचे पगार असावेत, पण ज्या कामाचें प्रत्येक व्यक्तीसंबंधानें हित ठरवितां येईल त्या कामाबद्दल हिताच्या मानानें बदला दिला पाहिजे, ह्यामुळें तें काम करणारास अधिकाधिक मेहनत करण्यास उत्तेजन येईल; आणि ज्यांसाठीं तो काम करतो ते त्याच्या मेहनतीपासून जितका अधिक फायदा मिळवेल तितका घेण्यासाठीं झटतील. ह्मणून तुह्मी कृपाकरून माझे विचार तुमच्या सोबत्यांना कळवाल का?'

नंतर परस्परांनीं एकमेकांचे आभार मानिल्यावर ते तिघेजण चालते झाले व पाद्री आपल्या बायकोकडे वळून बोलणार तों तिच्या मालांवर त्यानें आसवें पाहिलीं. अजूनही ती चांगली बरी झाली

नव्हती, अंगांत अशक्तता होतीच ह्मणून आपल्या नवऱ्याला मिळालेला मान पाहून वृत्ति स्वाधीन न राहतां तिला गहिंवर आला. तिचें लक्ष दुसरीकडे लाविल्यास हल्लींची क्षुब्ध वृत्ति शांत होईल असें समजून तो तिला ह्मणाला 'पाहिलेंसना, आपले हे लोक एकंदर व्यवस्था होऊन कोठेंही अन्याय होऊं नये ह्मणून एकत्र जमून विचार करूं लागले. तर आपल्या वसाहतींत अलीकडे सुधारणा होत असल्याशिवाय कां असली गोष्ट घडून आली असती?'

**कप्तान** ह्मणाला 'ह्यांत काय संशय. ह्याप्रमाणें आपल्याकडे निरोप पाठविण्यास मंडळींनीं आपल्या वतीनें कांहीं लोक धाडावे ह्यावरूनच आपली चढती कळा आहे हें सिद्ध होतें.'

# भाग ८.

## छान संध्याकाळ.

**फेब्रुवारी** महिन्याच्या ऐन सुरवातीस एके दिवशीं संध्याकाळीं आपल्या वसाहतीच्या मंडळींनीं एक अपूर्व देखावा पाहिला. त्या प्रदेशांत ह्या दिवसांत उन्हाळा अगदीं संपून जाऊन पावसाळयाच्या सुरवातीचीं चिन्हें असावयाचीं, परंतु ह्या दिवशीं आकाश अगदीं निरभ्र असल्यानें सूर्य क्षितिजाखालीं जाईपावेतों चोहोंकडे चांगला लख्ख उजेड होता व एकंदरींत सर्व मंडळी मोठ्या आनंदानें होती. फळें गोळा करण्यासाठीं मुलें झाडांवर चढत होतीं, त्यांनीं प्रथम तो विलक्षण देखावा पाहिला. त्यांनीं पाहिलें मात्र; लागलींच झटकन झाडांवरून आपल्या जागा सोडून तीं भरभर खालीं उतरलीं, आणि घरीं जातां जातां आपली बातमी मोठमोठ्यानें ओरडून सांगत तीं पळत गेलीं. त्यामुळें थोड्याच अवकाशांत सारी मंडळी झोंपड्यांबाहेर निघून नवीन कोण येत आहे तें पाहण्यासाठीं चालती झाली, तों त्यांनीं आठ बैल लाविले आहेत असा एक सामानानें भरलेला गाडा लांबून येतांना पाहिला.

तिकडल्या प्रांतांत चार जाडयांची जोत लहानच समजतात, कारण गाडयांना कधीं कधीं १२ किंवा १६ देखील बैल जोडतात. ह्या गाडयांत काय असेल व तो कोणाचा असेल ह्याविषयीं मंडळींना थोडा-वेळ पावेतों विचार पडला, कारण कधीं कधीं नवीन वसाहत करूं इच्छिणाऱ्यांच्या लहान लहान टोळ्या किंवा केपटौनहून प्रवासास निघा-लेली मंडळी वाटेनें ह्या खेडेगांवीं येऊन थोडावेळ मुक्काम करीत असत. अशा मंडळीचें होईल तितकें आदरातिथ्य आमच्या लोकांना करावें लागे. पण हल्लीं त्यांच्याकडून मुळीं देखील आदरातिथ्य होण्यासारखें नव्हतें, कारण त्यामुळें एकतर ह्यांनाच गैरसोय झाली असती, आणि पाहुण्यांस लागणाऱ्या पुष्कळ गोष्टी ह्यांच्या हातांत नव्हत्या ह्मणून ह्यांना साहजीक काळजी लागली. परंतु मंडळीपैकीं जे तरुण होते त्यांची नजर चांगली असल्यामुळें त्यांनीं पाहिलें कीं आपण ज्याला केपटौनला निरोप देऊन पाठविलें होतें तो आपला मित्र **गण्या** हा त्या बैलांचें जोत हाकीत आहे. मंडळी दररोज **गणूची** आठवण करीत असत, परंतु हा इतक्या लौकर परत येईल असें त्यांच्या ध्यानींमनींही नव्हतें. गाडा जसजसा जवळ येऊं लागला तसतसा तो **गणूच** आहे अशी त्यांची खात्री झाली. दुसरा कसा का गाडीवान असेना, त्याच्यापेक्षां ह्याची आसूड कडकावण्याची तऱ्हाच कांहीं निराळी होती, ह्मणून नुसत्या आसू-डाच्या आवाजावरून हा **गण्या** आहे असें त्यांनीं ओळखिलें. **कप्तानानें** आपली टोपी काढून आपल्या डोक्यावर उंच धरून गरगर फिरविली आणि “ हुर्रे ” हुर्रे ” ह्मणून ओरडून आनंदाचा एकच गजर केला. वसाहतींतील थोर पुरुष व मुलें त्यांनींही त्याप्रमाणेंच गजर केला. बाया-माणसांनीं आपल्या तान्ह्या मुलांना हातांनीं उंच उचलून गाडा दाखविला, आणि लहान लहान मुलें आपल्या आयांच्या कपड्यांना बिलगून उगा-च ओरडून गोंगाट करूं लागलीं. हा सर्व गोंगाट ऐकून बैलही झराझर पाय उचलूं लागले, आणि गाडयावर पुढल्या भागीं **गणू** उभा राहून

संध्याकाळचें उन डोळ्यावर येऊन डोळे दिपत होते त्यासाठीं एका हातानें आपली टोपी डोळ्यापुढें आडवी धरून मंडळींत कोण कोण उभें आहे, आणि आपली म्हातारी आई आली आहे कीं नाहीं हें पाहूं लागला. कप्तानाच्या जवळ ती म्हातारी उभी आहे असें पाहिल्याबरोबर त्यानें देखील आनंदाची मोठी आरोळी दिली. तिला पाहतांच त्याच्या जिवावरची काळजीची धोंड नाहींशी झाली. ज्या दिवशीं तो मंडळींना सोडून निघाला होता त्या दिवशीं मंडळींना राहण्यास निवाऱ्याची जागा किंवा हत्यारें हें कांहीं देखील नव्हतें, आणि खाण्याचीही सामुग्री कायती त्या दिवसापुरतीच होती. आपल्या मागें त्यांचें कसें काय चाललें आहे ह्याची यत्किंचितही बातमी त्याला मिळत नसे. वास्तविक पाहतां त्याला येथली खबर लागणें हें दुरापास्त होतें. म्हणून आपल्या वसाहतीचे लोक कोणत्या स्थितींत आपल्या दृष्टीस पडतील ह्याजविषयीं परत येतांना वाटेनें त्याच्या मनांत हजारदां निरनिराळ्या कल्पना आल्या. कधीं कधीं त्याला वाटे कीं, ज्यांच्या अंगीं लांब जाण्याची शक्ति असेल ते सर्व ही जागा सोडून लांब दूरच्या खेड्यापाड्यांत आसरा मिळण्यासाठीं गेले असतील, आणि येथें कायतीं म्हातारींकोतारीं बायकामुलें अनाथपंगू अशीं माणसें राहिलीं असतील. कधीं कधीं त्याला अशी भीति वाटे कीं, न जाणों अन्नाच्या दुष्काळामुळें बहुतेक नाहींसे झाले असावे, आणि बाकीचे हिंस्र पशूंच्या भक्षस्थानीं पडले असतील, किंवा यदाकदाचित् त्यांच्या तडाक्यांतून वांचले असल्यास, पशूंपेक्षांही क्रूर अशा जंगली मनुष्यांच्या तावडींत सांपडले असतील; त्यामुळें ही जागा अगदीं ओसाड झालेली अशी आपल्या पहाण्यांत येईल. अशा कल्पना त्याच्या मनांत घोळत असतांना त्याला वाटे कीं आपली आई बिचारी किती म्हातारी, तिच्या अंगांत मुळीं देखील त्राण नाहीं, तर अशा संकटाचे प्रसंगीं जे साऱ्यांना हाल सारखेच सोसावे लागणार त्यांत ती कसली वांचते, आणि ती कसची पुनः आपल्या दृष्टीस पडते. ह्यामुळें त्याचें अंतःकरण अगदीं

भडभडून जाई, पण जातेवेळीं 'तुझ्या आईला मी जीवापलीकडे संभाळीन' असें कप्तानानें त्याला आश्वासन दिलें होतें, त्यामुळें त्याला थोडा-बहुत धीर येई, तथापि ती पुनः आपल्यास जीवंत भेटेल असा त्याला पक्का भरंवसा कांहीं केल्या येईना. परंतु आतां जेव्हां प्रत्यक्ष डोळ्यानें तिला पाहिलें आणि जमलेल्या सर्व मंडळीच्या चेहऱ्यावर टवटवी व आनंद दिसला, तेव्हां त्याचें अंतःकरण आनंदानें अगदीं उचंबळून गेलें.

आपली आई आणि कप्तान ह्यांना मागें टाकून जी मंडळी पुढें आली होती त्यांना हातांनीं सारून तो पुढें लौकर लौकर चालला आणि मोठ्यानें ह्मणाला ' ईश्वर तुम्हां सर्वांना सुखी करो, तुमचें भलें करो, धन्य आहे मी कीं त्याच्या कृपेमुळें मला सर्वांची भेट आज होत आहे.'

आईला पहिल्या प्रथम भेटण्याविषयीं त्याची उत्कंठा पाहून पुष्कळ जण म्हणाले ' त्याला अडवूं नका, त्याला मुकाट्यानें जाऊंद्या, मग तो आपलाच आहे; ' असें म्हणून ते बैलांना थोपटून पाहूं लागले, आणि ' गाडा चांगला केला आहे ' ' बैलही चांगले आहेत, ' असें आपसाआपसांत बोलूं लागले. इतक्या वेळांत गण्या आपल्या आईजवळ जाऊन तिच्या गळ्याला मिठी मारून कडकडून भेटला आणि तिनें त्याच्या तोंडाकडे नीट न्याहाळून पाहून त्यावरून हात फिरवून त्याच्या कपाळाचा मुका घेतला आणि त्याला आशिर्वाद दिला. आईची भेट झाल्यावर तो बाकीच्या मंडळीशीं विचारपूस करूं लागला.

पाद्रीबोवाला तो हळूंच विचारूं लागला ' पण मला पहिल्यानें कृपा करून सांगा, सारी मंडळी खुशाल आहेतना? मंडळीचे पुष्कळच हाल झाले असतील, त्यांतून सारे सुखरूप पार पडलेना? '

त्यानें उत्तर दिलें ' एकाशिवाय बाकी सारेजण आनंदांत आहेत बरें. आपला सटवाजी कायतो गमावला. काय सांगावें, मुलगा मोठा उपयोगी पडत असे. पण आलें देवाजीच्या मना तेथें कोणाचें चालेना. '

सटवाजीच्या बापाला भेटावें ह्मणून गणू त्याला इकडेतिकडे पाहूं

लागला, तों तो बैलांजवळ उभा राहून त्यांना थोपटून थिपटून त्यांच्याशीं सलोखा करीत आहे, असें त्यानें पाहिलें. वास्तविक त्याला जें रडूं आलें तें आवरेना ह्मणून तो तसा बैलाजवळ उभा होता. गणू लागलाच त्याजवळ गेला व त्याचा हात मुकाट्यानें धरून त्यानें दाबला, आणि नंतर कांहीं वेळपावेतों उदासीन होऊन तो स्तब्ध उभा राहिला. त्याला आणखी कांहीं विचारावें किंवा आपली हकीकत सांगावी असें **गणूला** वाटेचना.

कांहीं वेळानें त्यानें मंडळीला विचारिलें 'असो, झाल्या गोष्टीला इलाज नाहीं, पण मला पहिल्यानें हें सांगा, तुह्मी राहतां कोठें आणि खाण्यापिण्याची तजवीज तुह्मीं कशी काय केली ?'

**कप्तानानें** उत्तर दिलें 'पुढें चलशील तर खरा, ह्मणजे सर्व कांहीं दिसेल.' असें ह्मणून ते सर्वजण चालूं लागले आणि जवळच एक टेंकडी होती, तिच्या पायथ्याखालून वळसा देऊन गेले, तोंच असा देखावा दिसला कीं, तो पाहून **गणूला** मोठाच चमत्कार वाटला. पायथ्याजवळच्या उतारावर हिरवेंचार गवत उगवलें होतें. (ह्या प्रांतीं ऊन्हाळ्यांतच असें हिरवेंचार गवत उगवतें). त्यापैकीं थोड्याशा भागाला ओबड धोबडसें कुंपण घालून त्यांत दोन मोठीं हरणें व हरणांचीं लहान लहान तीन पोरें सोडलेलीं होतीं, तीं आंत स्वच्छंदपणानें चरत होतीं. दुसऱ्या एका वाडींत घोडी व तिचें शिंगरूं अशीं चरत होतीं. पायथ्यापासून थोड्या अंतरावर लहानसा ओढा होता. त्याचें पाणी अगदीं स्वच्छ असून झुळझुळ वाहत होतें, त्याचा मंद आवाज कानाला फार मधुर लागे. ओढा उतरून जाण्यासाठीं एका मोठ्या झाडाचें खोड आडवें टाकिलें होतें, त्याचा पुढें असलेली मंडळी पुलाप्रमाणें उपयोग करीत होती. ओढ्याच्या पलीकडच्या बाजूला बऱ्याच अंतरावर मोठी झाडी होती. त्या झाडीला नवीन पालवी नुकतीच येऊन गेल्यामुळें त्यांत गहिऱ्या हिरव्या रंगापासून तों अगदीं पोपटासारखा हिरवा रंग निरनिराळ्या

झाडांचा फारच मजेदार दिसे. गर्हिऱ्या पानांत मधून मधून सोन्याच्या बुटकुल्यासारखीं केशरीधमक अशीं नारिंगें झळकत होतीं, आणि एका झाडाच्या खांदीवरून दुसऱ्या झाडाच्या खांदीवर असे द्राक्षाचे वेल पडद्यासारखे लागून पसरले होते. झाडीच्या अगदीं तोंडाशीं ओक आणि चेस्नट ह्या झाडांच्या छायेखालीं त्या झाडांचाच खांबासारखा उपयोग करून मंडळींच्या झोंपड्या बांधलेल्या दिसत होत्या. झोंपड्यांच्या भिंतींना मातीचा गिलावा व वर छप्परही ओबडधोबड असें असल्यामुळें त्या रानटी लोकांच्याच झोंपड्या असतील असें वाटण्यासारखें होतें, परंतु त्यांचा विस्तार व त्यांच्या आजूबाजूला ज्या कांहीं गोष्टी नजरेस पडत होत्या, त्या पाहतां त्या झोंपड्या रानटी लोकांच्या नाहींत अशी पाहाणाराची खात्री होई. एका झोंपडीजवळ छोट्याशा छपराखालीं अडोशाला एक दगडाचें जातें होतें. एका चेसनटखालीं काम करण्यासाटीं ओबडधोबडशी एक घडवंची होती. गाडा येण्यापूर्वी निरनिराळीं कामें करण्यांत मंडळी गुंतली होती, त्यांचीं वेडींवांकडीं हत्यारें होतीं तीं त्या घडवंचीवर नीट मांडून ठेविलेलीं होतीं. देवडीजवळ चटया करण्याचें सामान पडलेलें होतें, आणि ओढ्याच्या कांठावर मासे पकडण्याचीं जाळीं टाकिलेलीं होतीं. आणि ह्या सर्वांवर स्वच्छ नीळेंभोर असें आकाश चांदवा दिल्याप्रमाणें शोभत होतें, कारण पाठीमागें उंच काळे पर्वत व पुढें ती झाडी अशी होती. असा हा अप्रतिम देखावा अगदीं अरसिक असा मनुष्य देखील क्षणभर पहात उभा राहता.

सूर्य अगदीं क्षितीजाला जाऊन पोहोंचला त्यामुळें पृथ्वीला आलिंगन देणारे त्याचे कर त्या जलप्रवाहांत चकाकत आहेत असें पाहून **कप्तान** ह्मणाला—रात्र पडण्यापूर्वी आमचें गांव तुला पहायाला मिळत आहे, हें एक भाग्यच समजलं पाहिजे. कारण अशी मजा कदाचित सकाळीं दिसतीना.

**गणू** आश्चर्यानें थक्क होऊन कांहीं वेळ स्तब्ध राहून ह्मणाला—आणि

हेंच कां आपलें गांव ? पांच महिन्यापूर्वी मी गेलों तेव्हां जी अगदीं ओसाड व जळून खाक झालेली जागा होती तेथेंच कां हा गांव दिसतो आहे ? तुह्माला कोणी तरी मदत केली असावी, कारण केवळ तुमच्या स्वतःच्याच श्रमानें तुह्माला एवढें कांहीं करितां आलें नसतें.

**कप्तान**—सृष्ट पदार्थांचेच कायतें आह्माला साह्य होतें किंवा असें तरी कशाला ह्मणूं ? ज्या जगन्नियंत्यानें ते पदार्थ निर्माण केले तोच आह्माला पदार्थांच्या मिषानें साह्यकारी झाला. बाकीचें सर्व आमच्या मेहनतीचें फळ. सुव्यवस्थित श्रमानें आह्मांला सर्व करितां आलें.

**गणू**—हा मोठाच चमत्कार ह्मटला पाहिजे. शेतें नांगरलीं तीं—

**कप्तान**—तीं तरी नुसत्या एकेक व्यक्तीच्या श्रमानें. लहानसेंच शेत नांगरावयाचें असलें, ह्मणजे एकामागून एक अशीं निरनिराळीं कामें लागोपाठ करावीं लागतात, कारण एकाचवेळीं तीं सर्व सुरू ठेवण्यापासून भागत नाहीं, त्यामुळें आमचें हें शेत नागरतांना श्रमाचें एकीकरण करितां आलें नाहीं.

**गणू**—ह्या झोंपड्या आणि हीं मडकींगाडगीं ?

**कप्तान**—आमच्या ऐपतीच्या मानानें जितका ह्मणून श्रमविभाग करवला तितका करून त्यानें हीं सर्व झालीं आहेत.

**गणू**—तर मग हें सर्व करायला मोठ्या शहाणपणानें श्रमाची व्यवस्था लावावी लागली असेल, आणि मंडळींनीं ही कष्टी मेहनत केली असेल.

**पाद्री**बोवा थोडेंसें हंसून ह्मणाले—ही तर गोष्ट खरीच.कारण उत्पादक श्रमकाराप्रमाणेंच अनुत्पादक श्रमकारासंबंधींही सुदैवानें आम्हाला बोलायला ह्मणून यत्किंचितही जागा नव्हती.

**गणू**—आणि सर्वांना पुष्कळ खायाला मिळत होतें का ?

**पाद्री**—भरपूर होतें, कारण जितक्यांची वास्तवीकच जरूर होती तितकेच कायते आमच्यामध्यें अनुत्पादक श्रमकार होते, आणि तान्ह्या मलांखेरीज कोणी देखील रिकामटेकडा ह्मणून नव्हता.

गणू हंसून ह्मणाला—तर माझ्या येण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें असें दिसतें, कारण तुम्हाला कशाची म्हणून गरज आहे असें नाहीं.

कप्तानानें उत्तर दिलें—श्रमाच्या कमतरतेमुळें कित्येक गोष्टींसंबंधीं आम्ही किती मागसलेले आहों हें तुझ्या लक्षांत आलें, म्हणजे तूं असें म्हणणार नाहींस, समजलास.

गणू—तर मग श्रमाची पूर्तता ती माझ्या हातून होईल ह्याचा बहुतेक वानवाच दिसतो. कारण माझे कायते दोन हात ह्यांनीं जेवढें होईल तेवढ्यापुरती माझी मदत होईल. आणि होय, शिवाय हे बैल आहेतच. पण ह्यापलीकडे म्हणाल तर कांहीं नाहीं हो.

कप्तान—असें कां? ह्याशिवाय पुष्कळ मदत होईल आणि तिची तरी योग्यता तुझ्या सारखीच आहे. हा गाडाच घेईनास. नुसत्या हातांनीं किंवा बुरडी पाट्यासारख्या ज्या कांहीं भिकार युक्त्या आम्ही काढल्या होत्या त्यांनीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं सामानसुमान नेऊं ह्मटलें तर किती मेहनत लागेल. आमच्या साऱ्या मंडळींना जें नेण्याला आठवडेनआठवडे किंवा महिने दोन महिने लागावयाचे तेंच ह्या गाड्यानें थोड्या वेळांत होऊन आमचे तितके श्रम वांचतील. कापणीच्या वेळीं जर हा गाडा आमच्यापाशीं असता, तर आमचे कितीतरी श्रम वांचले असते. दाणा मुक्कामावर पोंचविण्यासाठीं ताटांचें भारे बांधून किंवा तट्यावर घालून किंवा जे थोडे थैले आमच्याजवळ होते त्यांत भरून नेतांना सकाळपासून संध्याकाळपावेतों एकसारखें किती तरी दिवस आह्मांस राबावें लागलें. तें सर्व धान्य ह्या गाड्यानें एका दिवसांत आह्माला नेतां आलें असतें, आणि त्या कामीं जे आमचे बाकीचे श्रम खर्च झाले त्यांचा अन्य कामीं उपयोग करितां आला असता.

पाद्री—पाणचक्कीचें सामान तुह्मी आणिलें असेल, नाहीं का? कारण त्या ओढ्याला पलीकडे एकदम उतार आहे त्यामुळें तेथें पाण्याला

चांगला ओढ आहे; त्याचा कांहींच उपयोग होऊं नये हें कांहीं बरोबर नाहीं.

**गणू**—आपल्या येथें लांकूड मिळतें त्यांतून जितकें ह्मणून करितां येईल त्याशिवाय बाकीचें सर्व मीं आणिलें आहे. ह्या गाड्यावर लांकडी काम भरून आणिलें असतें तर वेडेपणाच होता, कारण आपल्या आसपास किती तरी उत्तम प्रकारचें लांकूड आहे. ह्मणून मी जरूर तीं हत्यारें कायतीं आणिलीं आहेत.

**कप्तान**—तेवढ्यानेंच आपले पुष्कळ श्रम वांचतील. हल्लींच आपल्याला तीन जातीं सारखीं धान्य दळायला लागतात, इतकें करून ही दररोजच्या खपापुरतें सुद्धां पीठ दळून होत नाहीं. आपली पाणचक्की एकदां तयार झाली ह्मणजे सारी बेगमी एका आठवड्यांत दळून तयार होईल, आणि त्या चक्कीकडे एक माणुस असला ह्मणजे झालें.

**गणू**—प्रत्येक जिन्नस आणूं म्हटलें तर एका गाड्यानें काय पार येणार असें मला वाटलें, ह्मणून मीं यंत्रें किंवा तशाच मासल्याचें सामान आणण्याच्या भानगडींत मुळीं देखील न पडतां हरएक प्रकारचीं हत्यारें मात्र रग्गड आणिलीं आहेत. मीं असा विचार केला कीं, यंत्रांनीं हत्यारें होतील ही तर लांबचीच गोष्ट, पण त्यापेक्षां हत्यारें असलीं तर यंत्रें मात्र वाटेल तशीं लौकर करितां येतील.

**कप्तान**—तुझें ह्मणणें शब्दशः खरें आहे. ह्मणजे तूं केलेंस काय कीं, साधीं यंत्रें आणिलीस. त्यांपासून बिकट यंत्रें सहजीं तयार करितां येतील, कारण बिकट आणि साधीं हीं दोन्हीं यंत्रें आहेत आणि दोन्हीं देखील हत्यारें आहेत, ह्मणजे हत्यारें हीं साधीं यंत्रें आणि ज्याला आपण यंत्र ह्मणून ह्मणतो तें बिकट हत्यार, समजलास. ह्याचेंच मी एक उदाहरण देतों. लोहाराच्या भट्टीचे निरनिराळे भाग एकत्र करून त्यांची भट्टी तयार करण्याचीं सर्व कांहीं साधनें तूं आणिलीं आहेस. ती भट्टीच तयार झाली ह्मणजें तींच हत्यारें तींत दुरुस्त होतील व निरा-

ळीं देखील हत्यारें आपल्याला करितां येतील. पण नामदार गव्हर्नर-साहेब काय ह्मणत होते? आपल्या लोकांच्या नांवावर ह्या सर्व जिनसा उधार देण्याला ते कबूल तरी होते का?

गणू—ह्या सामानाच्या बदल्यांत आपण काय काय जिनसा पाठवूं शकूं हें जेव्हां त्यांनीं ऐकिलें तेव्हां त्यांनीं लागलाच सामान देण्याविषयीं हुकूम केला. शिवाय मीं त्यांना सांगितलें कीं 'आह्मी प्रामाणिक लोक आहों. जी आपण मदत घाल त्याचा बदला फेडल्याशिवाय आह्मी होतां होईल तों राहणार नाहीं.' घाला पडण्यापूर्वी आपली कशी भरभराट होती तें ऐकून ते ह्मणाले 'कांहीं चिंता नाहीं, ह्या जिनसा मी तुमच्यावर पूर्णपणें विश्वास ठेवून कर्जाऊ म्हणून देत आहें. मात्र तुमच्या कल्याणाचीच एक गोष्ट सांगतो, ती नीट ध्यानांत धरा. ह्या उपरांत तरी तुम्ही जास्त सावधगिरीनें राहत जा, ह्मणजे असा एकाएकीं घाला येऊन समूळ नाश होणार नाहीं.'

कप्तान—गणू, ह्या गोष्टीचा तर पहिल्यानें विचार करून तावडतोब नीट बंदोबस्त केला पाहिजे.

गणू—बरें आहे, साहेब त्यासाठींच तर मीं बंदुका, दारू, तलवारी अशीं हत्यारें आणिलीं आहेत. शिवाय एकंदर त्यांच्या जिनसा आपण घेऊन आपल्या त्यांना देतांना फारशी अडचण पडूं नये ह्मणून मी त्यांच्यांशीं व्यवस्था देखील ठरवून आलों आहें. नामदारसाहेब ह्मणत होते कीं 'तुह्मी व तुमच्या सारख्याच ज्या वसाहती फार लांबीच्या पल्लयावर आहेत त्यांना केपटौनपावेतों आपला माल पाठवावा लागल्यानें निष्कारण त्रास होईल व त्यापासून किफायतही होणार नाहीं. ह्मणून मी तुमच्या वसातीं जवळ जो नजीकचा समुद्र किनारा असेल त्याच्या आसपास जागा ठरवून त्या ठिकाणीं तारूं पाठवीत जाईन. तुह्मी आणि तुमच्या दक्षिणेस जो डोंगराळ प्रदेश आहे त्याच्या आसपासच्या वसाहतींनीं आपला फळ-

मेवा, धान्य, कातडीं, शहामृगाचीं पिसें आणि जो कांहीं दुसरा माल उत्पन्न होत असेल तो तेथें आणून द्यावा, आणि त्याचे किंमतींत दारू, लोखंड, आणि ज्या जिनसा तुह्माला स्वतः करितां येण्यासारख्या नाहींत अशा तयार जिनसा तुह्मी घ्याव्यात.' ही व्यवस्था ठीक झाली कीं नाहीं? ह्यानें इतकी चांगली सोय होईल कीं, मला वाटतें आपण व आसपासच्या वसाहतींचे लोक असे मिळून ठरलेल्या जागीं आपला माल पोहोंचविण्यासाठीं जो थोडाबहुत खर्च लागेल तो सारा सोसूं. बरें ही गोष्ट झाली, पण माझा शब्द नामदारसाहेबांपाशीं गुंतला आहे, तर मला नाहीं वाटत, आपले लोक त्या कर्जाची फेड केल्याशिवाय राहतील व मला खालीं पहायाला लावतील. मात्र चोर लुटारू लोकांना पुनः आपल्याजवळ येऊं देतां उपयोगी नाहीं.

ह्या दिवसांत ओढ्याला पाणी थोडेंच होतें, म्हणून गाडी जाण्याला चांगला उतार मिळाला. गाडा पलीकडच्या बाजूला पोहोंचला नाहीं तोंच सामान सोडून पहावें म्हणून प्रत्येक जण घाई करूं लागला. परंतु 'उद्यां सकाळीं सामान काढूं; त्यापूर्वीं कांहीं सोडावयाचें नाहीं,' अशी कप्तानानें सक्त मनाई केली, त्यामुळें मंडळी गुपचीप राहिली. गणूच्या देखरेखीखालीं सर्व सामान काढलें पाहिजे होतें, आणि तो तर अगदीं थकूनभागून आला होता, ह्मणून त्याला रात्रभर विश्रांति घेऊं दिली. गाड्याचे बैल सोडल्यावर ज्यांना ह्मणून सामान पहाण्याची अतिशय उत्कंठा होती, ते बिचारे गाड्याचे आजूबाजूनें चामड्याच्या वेष्टणांतून हळूच चाचपून किंवा न्याहाळून पहाण्याचा यत्न करीत होते. गाड्यांत पुष्कळ गठ्ठे आहेत असें दिसे, त्यावरून त्यांत पुष्कळ मजेदार जिनसा असाव्यात असें त्यांना वाटलें, परंतु गठ्ठे असे चांगले नीट बांधले होते कीं, मधून मधून करवताचें पान किंवा नांगराच्या फाळाचें टोंक किंवा एखाद्या बंदुकीचा दस्ता कायतो त्यांच्या हाताला लागे; ह्यामुळें त्या सर्वांची त्यावेळीं निराशा झाली. नंतर त्यांपैकीं एकानें कप्तानाला म्हटलें 'पण कांहो साहेब, ह्या आपल्या नवीन मालावर

रात्रीस पहारा असावयाचा कीं नाहीं? कारण हल्लीं ही आपली मोठी संपत्तिच म्हटली पाहिजे.'

कप्तानानें उत्तर दिलें 'ह्यावर तर अगोदर पहारा ठेवावयाचा. इतक्यांतच जंगली लोक दुसरा घाला घालतील असें तूर्त मला दिसत नाहीं हें खरें, पण जितकी ह्मणून खबरदारी घ्यावी तितकी थोडीच.'

आनंदानें सुचविलें 'खरें ह्मटलें तर जे रखवालीस बसतील त्यांजवळ बंदुका दिल्या पाहिजेत, आणि जर बंदुका देण्याच्या असतील तर मी पहाऱ्यावर राहण्यास तयार आहें ह्मणून समजाच. कारण बंदुकीचा कसा उपयोग करावा हें मला ठाऊक आहे.

ही गोष्ट साऱ्यांना रुचली ह्मणून कप्तानाच्या हुकुमानें गणू गाड्यांतील सामानांतून दोन बंदुका व दारूचें पीप काढण्याच्या खटपटीस लागला. कप्तानानें आनंदाला शाबासकी दिली, पण मंडळीपैकींच एकजण हळूच जवळच्याला ह्मणाला 'कांरे आनंदाला हा बंदुकीचा पोक अनावर आहे असें दिसतें, नाहीं तर हे राजश्री सुखाची झोंप आणि ऐपआराम टाकून उगाच रात्रीचे थंडींत कुडकुडायला कोठून तयार व्हावयाचे व जीवाला यातायात करून घ्यावयाचे!

गणू गाड्यांतून बंदुका व दारू काढीत असतां आनंदा त्याच्याशीं मोठ्या उत्सुकतेनें कांहीं तरी बोलत आहे असें दिसलें, पण कांहीं वेळ असें बोलल्यावर गणू मोठ्यानें खदखद हंसला त्याबरोबर ते राजश्री रागारागानें निघून चालते झाले. हा कां रागावला हें समजण्यासाठीं कप्तानानें विचारिलें 'गणू असें झालें तरी काय, हा असा कां गेला?'

गणूनें उत्तर दिलें—कांहीं नाहीं साहेब. आनंदराव मला ह्मणूं लागला कीं, तुमच्या परवानगीशिवाय मी त्याला आतांच्या आतां एक वस्त्रा व साबूची वडी काढून द्यावी. तो ह्मणे कीं, हजामत वाढल्यानें मला कससच वाटतं, हजामत झाल्याखेरीज मला चैन पडत नाहीं. पहिल्या भेटीला मी त्याच्याशीं बोलणार होतों, पण तो दूर दूर कां करीत होता तें

मला आतां समजलें, त्याच्या मनांत मी त्याजवळ गेलों म्हणजे जवळ कोणी नसला कीं पहिल्यानें वस्तऱ्याची व साबूची चौकसी करावी.

**कप्तान**—दाढी वाढली ह्मणून त्याला कां लाज वाटावी? कारण आह्मा सर्वांचीच त्याप्रमाणें हजामत वाढली आहे. आज बरोबर पांच महिने झाले तेव्हांपासून कोणीं ह्मणून वस्तरा पाहिला नाहीं.

**गणू**—पण साहेब त्यांतून मौज ती सांगायाची आहेच. कारण मीं कांहीं वस्तरा आणिला नाहीं, हें मी त्याला सांगितलें मात्र; लागलीच राजश्री एकदम रागावले. वस्तरा आणिला नाहीं ह्याचें मला खरोखरी वाईट वाटतें; पण नेहमीं मी दर आठवड्याला हजामत करवितों त्यामुळें थोर लोकांना दररोज हजामत करण्याचें काय महत्व वाटतें त्याची माझ्या मनांत कल्पना देखील आली नाहीं, ह्मणून ही चूक झाली.

**कप्तान**—एकंदरीनें सांगितलेल्या जिनसांपैकीं पुष्कळ तूं आठवणीनें आणिल्या आहेस असें जर दिसून येईल, तर एक दोन जिनसा आणायाचें अजी विसरून गेलास ह्याबद्दल आम्ही तुला दोष देणार नाहीं बरें!

**गणू**—साहेब, तुह्मांला माहीत आहेच कीं, मजजवळ सामानाची यादी नव्हती; कारण मुळीं यादी करायला कागदच नव्हता. ह्मणून अगदीं थेट जाऊन पोंचेपर्यंत वाटेनें जें जें आणायला सांगितलें होतें त्याची पुनः पुनःघोकणी चालवली होती, व काय आणिलें पाहिजे त्याबद्दल मी मनांत वारंवार विचार करीत होतों. सरतेशेवटीं मला वाटलें कीं, जवळ कागद, शाई व पेन नसलीं ह्मणून काय झालें; एखादा स्लेट पाटीचा तुकडा मिळाला तरीही आपलें काम होईल. त्याप्रमाणें एक तसा तुकडाही मिळाला.

**कप्तान**—मला वाटतें, वाटेनें आतां जातां तुला एखादा रस्त्यावर पडलेला मिळाला असेल.

**गणू**—होय, एक चपटा व दुसरा आणीदार असे दोन तुकडे सांप·

इले. मग मीं केलें काय कीं, जातां जातां जें जें आपल्याला हवें ह्मणून आठवण होई तें लागलेंच चटकन त्यावर टिपून ठेवी. पण चमत्कार हा कीं, मला एकदां देखील त्या वस्तऱ्याची कशी ती आठवण झाली नाहीं. परंतु मी पुष्कळ कातऱ्या आणल्या आहेत आणि जर बायांनीं एखादी थोड्या वेळा पुरती देण्याचें कबूल केलें, तर आनंदरावानें वाटेल तर आपले हनवटीचे केश थोडथोडे कातरून समाधान मानावें.

इकडे आनंदाच्या हातीं बंदूक पडल्यावर ती त्यानें नीट तपासून पाहिली व चांगली उत्तम असल्याची त्याची खात्री झाल्यावर त्यानें ती भरली, तेव्हां कायतो त्याचा राग नाहींसा होऊन त्याची तब्यत नेहमीप्रमाणें खुप झाली. मग छाती व मान वर काढून एखाद्या संत्र्याप्रमाणें मोठ्या ऐटीनें बंदूक नीट धरून तो गाड्याजवळ पाहरा करूं लागला. संत्र्यानें आपलें काम कसें करावें हें ज्यांना ह्मणून शिकावयाचें होतें त्यांना त्याची पाहरा करण्याची ऐट व तऱ्हा पाहून सहज येण्यासारखें होतें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं लहानलहान मुलें जमून त्याच्यासमोर त्याच्यासारखेंच मोठ्या ऐटीनें चालून वेडावण दाखवित होतीं तें त्यानें पाहिलें; तरी त्याचे त्याला कांहीं देखील वाटलें नाहीं. परंतु जेव्हां का त्या मुलांपैकीं एकानें आपल्या हनवटीला अशा खुबीनें हात लाविला कीं, त्यामुळें पाहणाराचें लक्ष निःसंशय हनवटीकडे जावेंच, तेव्हां मात्र ह्या राजश्रींना मुलें आपल्या दाढीला उद्देशून थट्टा करितात असें वाटून बराच राग आला. पण हीं द्वाड कारटीं आपल्या दाढीला हंसतात किंवा आपण ती काढून टाकण्याविषयीं कालरात्रीं बोललों त्याला हंसतात, हें त्याला कांहींच ठरवितां येईना, म्हणून तो तसाच मनांतल्या मनांत चुरमुरे खात बसला.

# भाग ९

## अर्जित काळाचीं चिन्हें.

मागील भागांत सांगितलेल्या दिवसानंतर दुसऱ्या दिवशीं उजाडलें नाहीं तोंच बहुतेक मंडळी जागी झाली. थोर माणसांपेक्षां अगोदर मुलांनींच उठण्याची फार वाई केली. आदल्या दिवशीं संध्याकाळची वेळ रमणीय होती, त्यावरून बहुतेक दुसऱ्या दिवशीं सकाळ छान मजेची जाईल असें मंडळींनीं अनुमान केलें होतें. त्याप्रमाणें ह्या दिवशीं सकाळीं फारच मनोहर शोभा चोंहोंकडे पसरली होती. एक, आदल्या दिवशीं **गणू** अतिशय उपयोगी असा माल घेऊन आल्याचा आनंद, दुसरें सकाळची ती मजेची वेळ, त्यामुळें साऱ्यांना तो दिवस सणाप्रमाणें वाटला. अगदीं पहाटेस सारीं मुलें उठून नेहमीच्या पोर स्वभावाला अनुसरून जणू काय आज मोठा उत्सवच आहे असें समजून चोहोंकडे कांहीं तरी गमत करावी म्हणून आपसांत बेत करूं लागलीं. नंतर आपल्यापेक्षां थोर वयाचे दोन तीन मुलगे बरोबर घेऊन ते सारे झाडींत अशोकाचा पाला व डाहाळ्या आणण्यासाठीं गेले. कांहीं पाला व डाहाळ्या त्यांनीं आपल्या झोंपड्यांच्या दारांवर टांगल्या व ज्या गाड्यांत सर्वांचा अगदीं जीव का प्राण गुंतून राहिला होता त्या गाड्यांच्या अमोलिक सामानावर त्या डाहाळ्यांचें जणूं मखरच घातलें. नंतर एका हातांत डाहाळ्या घेऊन दुसऱ्या हातानें आपल्या टोप्या उडवीत गातगात सारीं मुलें नीट व्यवस्थेनें एकामागून एक अशीं साऱ्या वसाहतीभर हिंडलीं. ही गडबड कशाची आहे, म्हणून पाहण्यासाठीं **कप्तान** आपल्या झोंपडीच्या दाराबाहेर आला. त्याला पाहतांच त्या मुलांनीं 'हुर्रे' हुर्रे' म्हणून तीनदां आनंदाचा गजर केला, आणि जेथें **गणू** राहत होता त्या ठिकाणीं आल्यावर तर त्यांनीं तीनदां सोडून नऊदां असा गजर केला असता, परंतु त्यांना पाहतांच **गणूची** आई दारांत

उभी होती तिनें ' ओरडूं नका ' म्हणून बोटानें खुणविलें. दाराशीं इतका जरी गलबा होत होता तरी तिचा मुलगा कांहीं जागा झाला नाहीं, कारण तो प्रवासाच्या दगदगीनें अतिशय थकून गाढ झोंपीं गेला होता. त्याची झोंप मोडूं नये म्हणून तिनें त्या मुलांना दटावलें. गाड्यांतलें सामान केव्हां सोडून आपल्याला पहायाला मिळेल असें त्या मुलांना झालें होतें, तरीही ज्यानें इतकी यातायात सोसली त्याच्या झोंपेचा बिघाड करूं नये असें त्यांना वाटून ते मुकाट्यानें पुढें चालते झाले; आणि दुपारपावेतों आजचा मोठा समारंभ सुरू झाला नाहीं तरी देखील आपण गलबला करून त्याची झोंप म्हणून मोडावयाची नाहीं असा त्यांनीं निश्चय केला.

ह्याप्रमाणें मुलें गुंतलीं असतां थोर थोर पुरुष जमून तो समारंभ कोणत्या प्रकारें उत्तम सिद्धीस जाईल ह्याचा आपआपसांत विचार करीत होते. ते विचार करीत होते हेंही योग्यच होतें, कारण मोठमोठ्या समाजांत ज्या प्रसंगासाठीं खिडक्यांतून दिवेबत्तीची रोषनाई करितात व चव्हाट्यावर मोठमोठ्या आगट्या पेटवितात त्यापेक्षांही ह्या लहानशा समाजांत जें पूर्वीं नुसत्या साध्या श्रमावर अवलंबून राहावें लागत होतें तें हल्लीं हत्यारें आल्यानें सुकर झाल्यामुळें जास्त आनंदाचा उत्सव करण्याचा प्रसंग होता. एखादा मोठा जय मिळाल्याबद्दल जो उत्सव होतो त्यांत पुष्कळांना वाईट वाटण्यासारखें बरेंच असतें. आप्त व मित्र गेल्यानें कित्येक दुःख करीत असतात, आणि लढाईमुळें कोट्यावधी लोकांना दुःखें भोगावीं लागतात त्याबद्दलही कित्येक हळहळत असतात, आणि ज्या धर्मांत शांति प्रधान आहे त्या धर्माच्या अनुयायांनीं लढाईसारख्या क्रूर चाली आपआपसांत चालू ठेवाव्या व तिच्या घातुक परिणामापासून आनंद मानावा ह्याविषयीं तर कित्येक पुण्यात्म्यांना लज्जा वाटून ते उद्विग्न होतात. परंतु हा प्रसंग असा होता कीं, जो एकाला आनंद तोच साऱ्यांना; आणि त्या समाजाला जी प्राप्ति झाली

होती तिजमुळें असा आनंद होणें हें योग्यच होतें. गणूनें एक गाडा भरून लांकडी व लोखंडी सामान आणिलें खरें, परंतु त्यामुळें ह्या मंडळीला संपत्तीचीं पुष्कळ साधनें एकदम प्राप्त झालीं, तितकीं कांहीं ह्यांच्याच पैकीं एकाला आपल्या राहत्या घरांतच एखादी सोन्याची खाण सांपडूनही मिळालीं नसतीं. ह्या मंडळींत श्रमाचीच काय ती कमतरता होती, ह्मणून ज्यामुळें श्रम कमी करावे लागून सुलभ होतील त्यासारखें मोल्यवान असें कांहींच झालें नसतें. ह्या गोष्टीचें महत्व थोर वयाचीं माणसें पूर्णपणें समजत होतीं, परंतु मुलांनीं देखील आपआपल्या पोरबुद्धीप्रमाणें त्याजविषयीं अटकळ केली. 'माझ्या हातीं जर एखादा नांगर सापडेल तर मी राजासारखा होईन, कारण आउताखेरीज शेतीभातीचें काबाड करण्यापेक्षां रोटी न मिळाली तरी बेहेत्तर' असें आपला बाप वारंवार ह्मणत असे तें एका मुलानें ऐकिलें होतें. आपल्या लहान लहान बहीणभावंडांचे कपडे फाटून गेलेले पाहून आपली आई नेहमीं कष्टी होत असे व ह्मणे 'काय करावें. ही मुलांचीं फाटकीं चिरगुटें ठिगळेंबिगळें लावून चांगलीं धड करीन म्हटलें तर जवळ कांहीं नाहीं. मग नवीनांची तर गोष्ट लांबच,' हें दुसऱ्याला ठाऊक होतें. झोंपड्यांच्या भींती व छपरें भक्कम नाहींत असें पाहून कप्तान वारंवार मान हलवून मनांत चिंतातूर असे हें तिसऱ्या एकानें पाहिलें होतें. ह्मणून त्या मुलांना देखील उन्हाळ्यांत वादळ झाल्यास किंवा हिंवाळ्यांत बर्फ पडूं लागल्यास ह्या झोंपड्यांत राहिल्यानें आपली धडगत नाहीं अशी भीति वाटत होती. परंतु गणूनें आपले हे सर्व हाल व भीति नाहींशी करण्याचे उपाय आणिले आहेत असें त्या मुलांना वाटलें. 'बाबानें आतां नांगर हाकून आनंदानें शेती करावी, आईनें गात गात आमचे फाटके कपडे शिवावे, आणि कारे आतां वाटेल तसें कां वादळ होईना किंवा वाटेल तितका कां हिंवाळ्यांत सोसाट्याचा वारा सुटेना अंगावर झोंपड्या पडतील ह्मणून आपल्याला कांहीं येथून जायला नको,

असें नाहीं तुला वाटत ' असें तीं आपआपसांत बोलूं लागलीं. वास्तविक पहातां हा आनंदाचाच दिवस होता. कांहीं वेळानें गणू उठून एकदांचा बाहेर आला आणि जमलेल्या साऱ्या मंडळींना इतक्या वेळ तिष्ठत ठेविल्याबद्दल त्यांची माफी मागून तो चोहोंकडे मोठ्या आनंदानें पाहूं लागला. त्याच्या तोंडावरच्या टवटवीवरून त्याचा सर्व शीण नाहींसा झाला व त्याच्या हंसतमुखावरून इतरांपेक्षां किंबहुना जास्त असा आनंद आजच्या प्रसंगानें त्याला झाला आहे असें दिसलें.

सर्व मंडळी जमली असें पाहून गाडा झाडांच्या छायेखालीं ओढून आणिला; कारण ह्या ठिकाणीं जागा ऐसपैस असून साऱ्यांना एथून काय काय होईल तें ऊन न लागतां लख्ख दिसण्यासारखें होतें, त्यांतून गाड्यांतील सामानावर सर्वांचा सारखाच हक्क असल्यामुळें सर्वांना आपला माल काय काय आहे हें सारखेंच कळावें अशी कप्तानाचीच मुळीं इच्छा होती. ह्मणून त्यानें त्या जागीं सर्वांना जमविलें. पहिल्या प्रथम ह्यातार्‍या माणसांना झाडाखालीं रांगेनें बसविलें, त्यांच्या मागें थोर वयाचीं माणसें मुलें ओळीनें वर्तुळाकार उभीं केलीं. मधोमध गाडा होता त्याजवळ गणू, कप्तान व दोघेतिघेजण दुसरे सामान बाहेर काढावयाला उभे होते. त्यांपासून किंचित दूर व साऱ्या मंडळींच्या पुढें असा आनंदा हा मोठेपणाचा डौल आणून उभा होता. नंतर सामान गाड्यांतून काढण्याची सुरुवात झाली. मोठमोठ्या जिनसा काढून मंडळींना दाखवून कप्तानानें नेमून दिलेल्या जागीं त्या नेऊन ठेवीपावेतों आनंदा मुकाट्यानें उभा राहून बेपरवाईनें पाहत होता. पण जेव्हां का सुतारकामाचीं लहान लहान हत्यारें, औषधें, लोंकरी व कापडी सामान, सुया, लोखंडी सामान इत्यादिकांचे लहान लहान गठ्ठे निघूं लागले तेव्हां तो पुढें सरसावून कप्तानाला ह्मणूं लागला. ' साहेब, आतां आपले लोकांना सुधारलेली स्थिति प्राप्त झाली आहे, त्याअर्थीं मी माझा पूर्वीचा धंदा पुनः करूं लागावें

हेंच योग्य दिसतें, कारण तोच धंदा चालविण्याला मी लायक आहें. ह्मणून ह्या साऱ्या जिनसा माझ्या हवालीं कराव्या, ह्मणजे मी पूर्ववत् त्या गिऱ्हाईकांना किरकोळ विकीन.'

ह्या मागणीचा कप्तानाला एकपरी चमत्कार वाटून थोडीशी मौजही वाटली. त्यानें विचारिलें 'अहो साहेब, ह्या जिनसा आपल्याला कां ह्मणून मंडळींनीं द्याव्या हें एकवेळ सांगाल का?'

आपल्या डगल्याच्या खिशांतून सोन्याच्या नाण्यांची एक बरीच जडशी थैली काढून ती कप्तानांना दाखवून तो ह्मणाला 'कां ह्मणून ह्मणजे, मी जर एखाद्या चांगल्या गृहस्थाप्रमाणें हे पैसे देऊन विकत घेतों तर मला ह्या जिनसा घ्यायाला हक्क पोंचत नाहीं कीं काय? ज्या-वेळीं आपल्या सर्वांजवळ विकत घ्यायाला अगर द्यायाला ह्मणून कांहींच नव्हतें त्यावेळीं मी हा माझ्या पैशाचा हक्क सांगत बसलों नाहीं, परंतु हल्लीं आपण रानटी अवस्थेंतून निघत चाललों आहों ह्मणून ज्यानें त्यानें आपआपली पूर्वीची स्थिति पत्करावी हें चांगलें.'

**कप्तान**—अहो साहेब, आपल्यावर नुकतेंच संकट येऊन गेलें आहे, त्यामुळें दुसरें जरी कांहीं नाहीं ह्मटलें तरी एवढें आम्हाला कळू लागलें आहे कीं, प्रत्येकाचा दरजा ओळखण्याला निराळीच कसोटी आहे. हें तुह्मी विसरलांत कसें त्याचेंच मला नवल वाटतें. हल्लीं आपल्या समा-जांत इतरांच्या मानानें ज्याच्या श्रमाची जशी उपयोगिता तसा त्याचा दरजा लागतो, समजलांत. आणि तुमच्याप्रमाणें आगींतून पैशाची थैली वाचविली नसली ह्मणून काय झालें, पुष्कळ जणांनीं तुमच्यापेक्षां आप-ल्या कृतींनीं जास्त हक्क संपादन केला आहे. हल्लीं आमच्यांत कांहीं असे आहेत कीं, ज्यावेळीं तुह्मी आपली पैशाची थैली आगींतून वाचविण्याच्या खटपटींत होतां त्याच वेळीं त्यांनीं तान्हीं तान्हीं मुलें आ-पल्या जीवावर आगींतून वांचविलीं. समाजाला हें कृत्य तुमच्यापेक्षां जास्त उपयोगीं नाहीं असें तुमच्यानें ह्मणवेल काय? बरें तेंही एका बाजूलाच

असो. मी असें तुम्हाला विचारतों की, ह्या सामानाच्या बदल्यांत तुह्मी आपलें सोनें देणार तें कोणाला?

**आनंदा**—तुमच्याच हातीं सर्व सत्ता आहे म्हणून तुम्हालाच गव्हर्नर ह्या नात्यानें.

**कप्तान**—ह्या मालावर माझी कांहीं स्वतःची मालकी नाहीं. माझ्या हातांत तो सोंपला आहे तेवढ्या पुरता मी जिम्मेदार आहें. जर तुमच्या मनांत स्वतःच्या पैशानें व्यापार करावा असें असेल तर जेथें पैशाची किंमत असेल अशा समाजांत तुह्मी जावें. कांहीं काळपावेतों येथें पैशाला किंमत येईल असें मला दिसत नाहीं, समजलां.

पैशाला आणि त्यांतून सोन्याच्या नाण्याला किंमत असूं शकणार नाहीं हें बोलणें चमत्कारिक वाटून मंडळी एकमेकांकडे आश्चर्य भरित मुद्रेनें पाहूं लागली. असें पाहून कप्तान पुढें ह्मणाला—तर साहेब, तूर्त आपलें सोनें आपल्याजवळच राहूंद्या व तें नीट जपून ठेवा हें माझें सांगणें आहे, कारण आपल्या समाजांत असा काळ येईलच कीं, जेव्हां सोन्यारुप्यांचीं नाणीं आपल्यांत खेळूं लागतील. पण तसा काळ येण्याला आपल्याला प्रथम पुष्कळ गोष्टी कराव्या लागतील. देवघेवीची रीतसर पद्धत सूरू होण्यापूर्वी माल पुष्कळ उत्पन्न झाला पाहिजे. पुष्कळ माल झाल्यावर पहिल्यांदा जिनसाजिनसांचीच देवघेव सूरू होईल, कारण कांहीं वेळपावेतों पैशानें देवघेव करण्याचें आपल्यास सोईवार होणार नाहीं. बरें जेव्हां पैशानें देवघेव करण्याचें प्रचारांत येईल, तेव्हां तुमच्या ह्या पिशवींत जी तुटपुंजी रक्कम आहे तेवढ्यानें भागण्यासारखें नाहीं.

**आनंदा** त्रासून ह्मणाला—तर मग **कप्तान** साहेब, मीं करावें काय? हें सामान आल्यापासून मला काय फायदा झाला?

**कप्तान**—अहो तुमची मेहनत हलकी होईल हें कांहीं कमी झालें का? अजूनपर्यंत येथील प्रत्येक पदार्थ विकत घेण्याचें असल्यास त्याचें मोल श्रम हें होय.

हें ऐकून आनंदा अगदीं खट्टू झाला. त्याला तेथें आणखी उभें रहावें असें देखील वाटेना, ह्मणून तो एकटाच तेथून लोकांची नजर चुकवून चालता झाला. त्यांतून आपल्याजवळ द्रव्य आहे हें दुसऱ्यांना कळूं दिलें त्याबद्दलही त्याला वाईट वाटलें; आणि स्वतःच्या हातांनीं श्रम करण्याच्या दगदगीपेक्षां स्वतःचें दुकान चालविणें हें किती प्रतिष्ठितपणाचें काम आहे परंतु तें तुर्त आपल्या कपाळीं नाहीं ह्मणून तो मनांतल्या मनांत जळफळूं लागला. तो गेला तरी त्याकडे कोणीं पाहिलें नाहीं आणि पैशापेक्षां जास्त चांगल्या अशा जिनसा डोळ्यापुढें असतां कोणाला देखील त्याची पैशाची थैली आपल्याजवळ असावी असें वाटलें नाहीं.

ह्याप्रमाणें कांहीं गठ्ठे काढल्यावर, एक गठ्ठा निघाला. त्यावर पाद्रीबोवांचें नांव होतें. त्या गठ्ठ्यांतील जिनसा पाहून जमलेल्या मंडळींच्या डोळ्यांना अतिशय पाणी आलें. त्यांच्यावर घाला पडल्या दिवसानंतर हा काळ पावेतों ह्याप्रमाणें त्यांचें मन कधींही भडभडून आलें नाहीं. केपटौनच्या गव्हर्नरच्या धर्मोपदेशकानें गणूच्या तोंडून घाल्याची एकंदर हकीकत ऐकिली होती, त्यांत मंडळीजवळचें एकूण एक पुस्तकही इतर सामानाबरोबर नाहींसें झालें हेंही त्याला समजलें, ह्मणून अशा स्थितींत ह्या लोकांना ज्या पुस्तकांचा फार उपयोग होईल अशीं पुस्तकें त्यानें पुष्कळ पाठविलीं. घाल्यानंतर पहिल्या रविवारीं सर्व लोक नेहमीप्रमाणें एकत्र जमले होते त्यावेळीं मंडळीच्या मनावर उपदेश ठसेल अशीं जितकीं धर्मपुस्तकांतील वाक्यें त्याला आठवत होतीं तितकीं उपदेश करतांना त्यानें स्मरणानें ह्मणून दाखविलीं. जे उपदेश ऐकायाला आले होते त्या लोकांना साधारणतः ह्याच्या इतका धर्मपुस्तकांतील भाग ध्यानांत राहण्या जोगता नव्हता ही जरी गोष्ट खरी आहे, तथापि बैबलांतील महत्वाच्या भागाची रचना व अर्थ ह्यासंबंधीं आपली किती तुटक व कोती समजूत आहे हें त्या दिवशीं पाद्र्याचें पाठांतर पाहून त्यांना कळून आलें व त्यामुळें त्यांना स्वाभाविक लाजही वाटली. दुःखें येऊन

कोसळलीं नव्हतीं तोंपर्यंत ज्याची त्यांना खरी किंमत कळली नव्हती त्याचीच त्या आपदावस्थेंत गरज आहे असें त्यांना स्वतःलाच वाटूं लागलें. तशांतून तो **पाद्री** धर्मसंबंधीं त्यांची गरज भागविण्यास हमेष तयार असे. ह्या दोन गोष्टींमुळें झालें काय कीं, त्यांच्याजवळ जर **बैबल** असतें तर ज्याविषयीं विचार करावयाचें त्यांनीं दिनावधीवर टाकिलें असतें त्याच्याचविषयीं तें ह्यावेळीं त्याजवळून माहिती घेऊं लागले, आणि जेव्हां घरोघर **बैबल** होतें तेव्हां जी माहिती होती त्यापेक्षांही पुष्कळ पटीनें जास्त माहिती ह्या वेळीं बरेच मैलपर्यंत आसपास **बैबल** नांवाला ही मिळण्याजोगें नव्हतें अशावेळीं पुष्कळांना सहज झाली हा एक चमत्कार ह्मणावयाचा. ह्या कामीं त्यांना **आना**बाईची पुष्कळ मदत होत असे. **बैबलां**तील कित्येक भाग तर तिला नवऱ्यापेक्षांही चांगले पाठ होते. आपली दृष्टि मंदावत जाईल असें वाटून जें पुनः आपल्याला वाचतां येणार नाहीं तें तोंडपाठ करण्याचें तिनें आरंभिलें आणि तिला ह्या कामीं बरेंच यशही आलें. दररोज संध्याकाळीं कामधंदा आटोपल्यावर देवडीवर तिच्याभोंवती बरीच मंडळी जमे. मग तिनें त्यांना **बैबलां**तील एखादें गीत, किंवा दृष्टांतरूप कथा, किंवा कांहीं दुसरा भाग ह्मणून दाखवावा, तो ऐकिल्यावर मंडळी विचार करीत व शांत मनानें निजावयास जात. **केपटौन**च्या धर्मोपदेशकानें त्यांना जी तेव्हां आतां अमूल्य भेट पाठविली होती तिचें त्यांना महत्व एकदम समजून आलें. ह्या गठ्ठ्यांत **बैबलां**च्या कांहीं संपूर्ण प्रती, कांहीं **बैबलां**तील दोन्ही करारांच्या प्रती आणि ह्या लोकांवर नुकताच प्रसंग कोसळला असल्यामुळें ह्यांच्या मनावर जो ठसा उमटला असेल त्याला बळकटी आणणारीं अशींच दुसरीं धर्मविषयक पुस्तकेंही पुष्कळ होतीं.

**विलायते**हून व **हिंदुस्थानां**तून ताजीं वर्तमानपत्रें आलीं होतीं त्यांचेंही एक पुडकें त्याच गृहस्थानें मोठ्या दूरदर्शीपणानें पाठविलें असें ह्मटलें पाहिजे. आतां तीं वर्तमानपत्रें फार दिवसांचीं जुनीं अशीं झालीं होतीं,

तरी ह्या वसाहतींतील अगदीं र ट फ करून वाचणारा देखील मोठ्या उत्सुकतेनें हीं जुनीं वर्तमानपत्रें मूळ नांवापासून तों शेंवटच्या दीड वर्षाहून जास्त जुन्या अशा जाहिरातीपावेतों सर्व वाचून टाकूं लागला. इतकी वाचण्याची हौस व उत्सुकता किंबहुना विलायतेंतील मोठ्या मुत्सद्याला किंवा सट्टाकरणाऱ्या व्यापाऱ्याला देखील सकाळची न्याहारी करतांना अगदीं ओल्या घडीचें ताजें वर्तमानपत्र उघडतांना वाटत नसेल. हीं वर्तमानपत्रें दृष्टीस पडल्याबरोबर सारी मंडळी बाकीच्या सर्व कांहीं गोष्टी विसरून गेली. आपल्या देशाच्या बातमी पुढें, रोजच्याप्रमाणें आजही थोडीबहुत मेहनत केली पाहिजे, आज नेहमीच्यापेक्षां अगदीं भिन्न असा कोण आनंदाचा दिवस आहे, नवीन काय काय संपत्ति आपल्याला आज मिळाली आहे, ह्या साऱ्या गोष्टी त्यांना कःपदार्थ वाटूं लागल्या. फार तर काय पण पाद्रीबोवाशीं अदबीनें वागण्याचें, तें देखील विसरून गेले; कारण प्रत्येक अंकांतील ताजी ताजी बातमी पाद्रीबोवा उडत उडत पाहत असतां कांहीं लोक त्यांच्या मागें जमून किंबहूना त्यांच्या अंगावर रेलून तींच पत्रें वाचीत होते. त्यांच्या ह्या उतावळेपणाचा त्याला किंचितही राग न येतां जो जो अंक तो पाहून टांकी तो तो हंसत जवळच्यांच्या स्वाधीन करी. शेवटीं आपण जवळ असल्यास मंडळींना संकोच वाटून ह्या पत्रांपासून जितका आनंद घेतां यावा तितका घेतां येणार नाहीं व एकमेकांशीं मोकळ्या मनानें बोलणार नाहींत असें वाटून आपल्या बायकोला बरोबर घेऊन तो फिरावयाला गेला.

त्यानें जें पत्रांतून थोडेंबहुत वाचलें होतें त्यामुळें आपल्या देशाचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले, परंतु थोड्याच वेळानें ज्या समाजांत आपल्यास दिवस काढावयाचे आहेत त्याजबद्दल पूर्ववत् त्याला कळकळ वाटूं लागली; ह्मणून सर्वांची स्थिति लौकरच सुधरेल अशी त्यानें आपली व आपल्या बायकोची समजूत केली. अशी आशा

उत्पन्न होण्याचीं कारणेंही त्यानें तिला सांगितलीं. तो ह्मणाला— गडे तूंच पहा. त्या ओढ्याचे धोतावर आपली पाणचक्की होईल. त्या अडोशाच्या जागेंत लांकडें करवतण्याचा कारखाना करूं. कुंपणाच्या मागें आपली भट्टी होईल. पलीकडे बैलांसाठीं गोठे बांधूं. डोंगरावरून गाई व मेंढ्या येतील तर त्यांचे बदल्यांत द्यायला आपल्याजवळ कांहीं नसेल व हिवाळ्यांत त्यांना कोंडून ठेवण्यासाठीं गोठाही वेळेवर होणार नाहीं अशी मला भीति वाटत होती, पण हल्लीं श्रम वाचविण्याचीं इतकीं साधनें आपल्याला मिळालीं आहेत कीं, आतां कशाचीही भीति बाळगण्याचें कारण नाहीं. तेव्हां झपाट्यानें आपण पुढें सर्वप्रकारें सरसावूं असें मला खरोखर वाटतें.

**आना**—मला जें विचारायाचें होतें त्याचीच मला ह्यानें बरी आठवण झाली. आपल्याप्रारखें जिथें ह्मणून श्रम वाचविण्याचाच मुख्य उद्देश असतो तिथें यंत्रें किती उपयोगी होतात हें मी समजते, आणि त्याप्रमाणेंच आपल्या मंडळींपैकीं अगदीं अडाण्याला देखील असेंच वाटेल. पण हल्लीं हिंदुस्थानाप्रमाणें जिथें श्रमालाच पुरतेपणीं काम नसतें तिथें यंत्रांचा अतिशय उपयोग करूं नये, ह्मणून जे ह्मणतात त्यांचें ह्मणणें चुकीचें आहे कीं काय हें मला नीटसें कळत नाहीं.

तिच्या नवऱ्यानें उत्तर दिलें—माझ्यामतें तर ते निव्वळ चुकतात, कारण सुधारणेच्या शिखराला जाऊन पोंहोचेपर्यंत मनुष्याला हमेष कांहींना कांहीं तरी करावयाचें असणारच, आणि असें जें कर्त्तव्य असणार त्यासाठीं जितकी शक्ति मोकळी होईल तितकें इष्टच आहे. जोंपर्यंत कला आणि शास्त्रें ह्यांचा कळस झाला नाहीं, जोंपर्यंत नैसर्गिक शक्तींच्या प्रभावाचा अंत लागला नाहीं आणि मनुष्याला सृष्ट पदार्थांचे उपयोग करण्याच्या साधनांची सीमा समजली नाहीं, तोंपर्यंत मानवी श्रमाचा जितका म्हणून पुरवठा असेल तितका पाहिजेच आहे आणि त्या श्रमाची होतां होईल तों बचत करणें हें आपलें कर्त्तव्यच आहे.

त्याची बायको म्हणाली- मला आठवतें परवां काय कप्तान म्हणत होते तें. काय म्हणे ' मनुष्य हें एक यंत्र आहे आणि श्रमही त्या यंत्राची शक्ति आहे ' त्यावरून मला आतां स्पष्ट कळूं लागलें आहे कीं, त्या शक्तीचा बनेल तोंपर्यंत जितका काटकसरीनें व्यय होईल तितका मनुष्याच्या फायद्यावरच पडेल. ही गोष्ट खरी आहे असें जरी मला वाटतें, तरीही जेथें ह्मणून हवे तितके श्रमकार मिळूं शकतात तेथें यंत्रांचा पाय शिरल्यापासून दुःखें कां ओढवतात हें मला कळत नाहीं.

तिच्या नवऱ्यानें उत्तर दिलें—यंत्रांमुळें संकटें येत नाहींत असें मी कांहीं ह्मणत नाहीं; पण तीं फार वेळ टिकत नाहींत व त्यांचा परिणाम सार्वत्रिक नसतो. याच्या उलट मात्र यंत्रापासून जे फायदे होतात ते चिरकाली व सार्वत्रिक असतात. जेव्हां छापण्याची कला नुकतीच प्रचारांत आली तेव्हां ग्रंथांच्या प्रती करणारे लेखकांना आपल्याला खायाला मिळणार नाहीं, आपला धंदा बुडाला अशी किती भीति वाटत होती, हें नाहीं का तुला वाचलेलें आठवंत?

ती ह्मणाली—होय आठवतें तर, पण जेथें पूर्वी एखादा लेखक ग्रंथांच्या नकला करून आपलें पोट भरीत असे तेथेंच हल्लीं हजारों लोक ह्या छापण्याच्या कलेमुळें आपला चरितार्थ चालवीत आहेत. ह्याप्रमाणेंच सुताच्या यंत्रांचीही गोष्ट आहे. जेथें एखादाच सूत कांतून आपला उदरनिर्वाह करी, तेथेंच हल्लीं सूत काढण्याचीं यंत्रें निघाल्यापासून शेंकडों लोक त्यांवर पोट चालवीत आहेत, इतकेंच नव्हे तर पूर्वीपेक्षां हजारोंपट जास्त काम होतें.

**पाद्री**—एखाद्या गोष्टींत असा जर चांगला परिणाम आपल्या दृष्टीस पडला, तर मीं मघा सांगितलेलें तत्वही चांगलेंच आहे असें होतें. आणि जर दुसऱ्या एखाद्या गोष्टींत परिणाम चांगला होत नाहीं असें भासेल, तर मूळ तत्वांतच चुकी असेल असें मानण्यापेक्षां कांहीं तरी अडचणी त्या सुपरिणामाला अडथळे आणतात हेंच मानणें जास्त सयु-

क्तिक होईल, व कारण पाहूं जातांही हाच तर्क खरा होईल. कित्येक राजकर्त्यांच्या राजपद्धतीची दिशाच चुकलेली असल्यास किंवा समाजाच्या निरनिराळ्या अवयवांत ऐक्यभाव नसल्यास असे अडथळे उत्पन्न होतात. जर बहुतेक सर्व मनुष्यजातीच्या गरजा व इच्छा अझूनपर्यंत तृप्त झाल्या नाहींत,तर एका कामांत लागणारे श्रमाची कोणत्याही कारणामुळें कितीही बचत झाल्यास तिचा दुसऱ्या कामांत विनियोग सहज होईल. असा विनियोग सहजासहजीं होत नाहीं. ह्याचा दोष समाजाच्या घटनेकडे आहे, ह्मणून श्रमाच्या शक्तीला मर्यादा ठरवून आणि वर सांगितलेल्या तत्वाला गुंडाळून ठेवून आपण यंत्रापासून होणाऱ्या अल्पकाली दुःखांचा परिहार करण्यास कधींही झटूं नये.

त्याच्या बायकोनें विचारिलें—एकूण जर सर्व जगभर श्रमाच्या गतीला कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तर चोहोंकडे यंत्रकलेचा प्रसार होऊन तिचा कळस होईल, आणि त्यापासून मनुष्य जातीचें यत्किंचितही नुकसान होणार नाहीं, असें आपलें ह्मणणें आहे कीं काय ?

तो ह्मणाला—हें तर माझें ठाम मत आहे. शिवाय मी असेंही ह्मणतों कीं, जर एकाच देशांत कायती यंत्रांचा उपयोग करण्याची मनाई होईल तर मात्र त्याच ठिकाणीं त्यापासून लोकांना अतिशय हाल सोसावे लागतील. पण वस्तुतः तसें होऊं शकत नाहीं. तसेंच ज्याअर्थी जगांत चोहोंकडे एकदम यंत्रांत सुधारणा करण्याचें कोणाच्याही हातून बंद होण्यासारखें नाहीं, त्याअर्थीं एकेच ठिकाणीं बंदी केल्यानें नुकसान मात्र होतें. ज्या ठिकाणीं ह्मणून अशी बंदी करितात तो देश एकंदर चढाओढींत मागसतो आणि त्या देशांत उत्पन्न होत असलेले पदार्थ व तयार केलेला माल ह्यांचा खप होईनासा होऊन त्याला सहजीं नुकसान लागून त्याची धूळधाण होते, कारण तेच पदार्थ व तोच माल यंत्रांच्या साहायानें इतर ठिकाणाहून स्वस्त दरानें मिळूं शकतो.

त्याची बायको ह्मणाली—तर मग जेणेंकरून ह्मणून उद्योगाचे मार्ग

वाढतील तितकें अगोदर अवश्य केलें पाहिजे; आणि उद्योगाच्या गतीला जितके अडथळे असतील तितके काढून टाकिले पाहिजेत.

**पाद्री**—असें केलें पाहिजे. ज्यांच्या हातीं राजसत्ता आहे त्यांनीं त्यासंबंधीं लोकांना वाटेल तसें करूं दिल्यानें राज्यांत उद्योगाचे मार्ग वाढतील. आणि तुझ्यामाझ्यासारख्या अनधिकारी लोकांनीं ह्यासंबंधीं खरें तत्व काय आहे ह्याचाच कायतो विचार करून खऱ्या मताचाच स्वीकार करावा, आणि आपले विचार चुकीचे नाहींत अशी आपली खात्री झाली ह्मणजे त्यांचा चोहोंकडे प्रसार करावा. ह्याप्रमाणें आपण केलें तर लोकमताची जी प्रचंड शक्ति आहे तिला आपण थोडीशी भर घातल्यासारखें होईल.

त्याची बायको ह्मणाली—मला तर वाटतें कीं इथें यंत्रांचा उपयोग करावा ह्मणून आपल्याला सांगण्याची पाळी फार दिवसांनीं आली तर येईल. उत्पादक शक्तीची विपुलता आहे अशी कुरकूर आपण आहों तोंपर्यंत ऐकूं येईल कीं नाहीं ह्याचा बहुतक वानवाच दिसतो.

**पाद्री**— आपल्याला साधारण ऐपत आली ह्मणजे माझ्या मनांत एकदां आपण **विलायतेस** जाऊन यावें असें आलें आहे. **विलायतेस** गेलों ह्मणजे आपल्या **यॉर्क** प्रांतांतल्या व आसपासच्या मंडळींनीं सुधारलेल्या यंत्रांचा उपयोग केला त्याजपासून त्यांना फायदा किंवा तोटा झाला हें सहज दिसेल. जर तेथें कांहीं व्यापार आहे असें दिसेल तर त्याचें कारण सुधारलेल्या यंत्रांचा उपयोग. कारण जर त्यांनीं तीं उपयोगांत आणिलीं नसतीं तर दुसऱ्या ज्या ठिकाणीं माल तयार होतो त्यांच्याशीं त्यांना टक्कर मारवतीना.

त्याची बायको ह्मणाली— वाडवडील जो व्यापार करीत आहेत तो त्यांना एकंदरींत बरा वाटतो असें दिसतें. बाजारांत मालाची रेलचेल झाल्यामुळें कधीं कधीं व्यापार मंदावतो, अशा वेळीं त्यांना व त्यांच्या माणसांना थोडेबहुत नुकसान सोसावें लागलें असेल, आणि साऱ्यांनाच

असें मधून मधून नुकसान व्हावयाचेंच. पण इतकीं जीं वर्षें त्यांनीं व्यापारांत घालविलीं त्यांत हळुहळू यंत्रें प्रचारांत येऊन त्यांत कसकशा सुधारणा होत गेल्या व त्यामुळें व्यापार कसा हळुहळू एकसारखा वाढतच गेला हें त्यांनीं सारें पाहिलें आहे. ह्या आपल्या लोकांना देखील संख्येच्या मानानें धाकट्या प्रमाणावर असाच अनुभव यावा हेंच कायतें माझ्या मनांत आहे.

**पाद्री**—आपल्यास नातू होईपर्यंत जर आपण येथें जगलों वाचलों तर कदाचित आपण आपल्याच अनुभवाच्या चार गोष्टी आपण त्यांना सांगूं. त्या पलीकडल्या टेकाडावर एका सुरेख दगडाचे बंगल्यांत एका खिडकीशीं तूं चांगली प्रतिष्ठीत अशी म्हातारी होऊन आपल्या नातवाशीं बोलत बसली आहेस अशी कल्पना आज करूं या. नातवाला तूं सांगत आहेसः—बाळ, त्या तिथं तो चामडीं रंगविण्याचा कारखाना आहेना तिथंच आमची मंडळी जमून दगडाच्या कपारींनीं मांसाचे तुकडे करून ज़मिनींत खड्डा करून त्यांत तें भाजून खात होती हें मला पक्कें आठवत आहे. आतां पहा त्याच ठिकाणीं काय कातड्याचा कारखाना चालला आहे, त्यामुळें निदान १०० लोकांचें तरी पोट भरत आहे. पलीकडं जिथं तीं मळणीचीं यंत्रें आहेतना तिथंच आमचीं माणसं हातांत वडगे घेऊन कशींतरीं कणसांतून धान्य काढीत होतीं, तें धड आमच्या मंडळींना पुरत देखील नव्हतें, आतां पहा त्या यंत्रांतून हजारों लोकांना पुरे इतकें धान्य मळून निघत आहे. ती पलीकडे गिरण्यांची रांग कशी लागली आहे, आतां तिथं रंगाचें लांकूड तयार होऊन त्याचे भारेचेभारे पूर्वेकडे व पश्चिमेकडे रवाना होत आहेत. त्याच जागीं आमच्यापैकींच कांहींजण रात्रीं आगट्या पेटविण्यासाठीं सर्पण गोळा करून ठेवीत असत. आणि त्यांच्या मागें टोपल्या व चटया विणण्याचा जो कारखाना आहे त्यांत हल्लीं आपल्या १५० लोकांना काम मिळत आहे. त्याच ठिकाणीं बजी लहानपणीं जमिनीवर बसून डाहाळ्यांनीं टोपलीचा खोका करीत होती.

ह्या इकडल्या बाजूला विटांच्या व कुंभारकामाच्या कारखान्यांनीं जी तीन चार बिघे जमीन अडली आहे त्या जागीं आमच्या कुंभारानें पहिला मातीचा थाळ केला. त्या वेळीं यंत्रांची कांहीं मदत नव्हती, ह्मणून तो वाकडातिकडा आणि ओबडधोबड असाच झाला होता; पण हल्लीं पहा यंत्रामुळें कसें नांव घेण्यासारखें सर्वप्रकारचें कुंभारकाम निघतें. आजूबाजूला शंभर मैलांच्या आंत एखाद्या घरांत आपल्या ह्या कारखान्यांतील निळ्या किंवा पांढऱ्या चहादान्या, पेले, बशा, किंवा जेवणाच्या पिंवळ्या बशा किंवा निदान उदी रंगाच्या थाळा हल्लीं नाहींत असें घर सापडावयाचेंच नाहीं.'

त्याची बायको हंसत हंसत म्हणाली—'आपलं हें भाकीत खरं झालं तर एखादा नातू कुंभारकाम करूं लागेल, मग संभाळा.

तो ह्मणाला—कदाचित् करूं लागेल, ह्मणून काय झालें; पण जर तो त्या कामांत शिरला, तर स्वतःच्या व समाजाच्या कल्याणासाठीं ह्मणून आपलें कर्तव्यच समजून त्यानें त्या धंद्यांत ज्या ज्या नवीन यांत्रिक सुधारणा होतील त्या त्या लागलीच सुरू करण्याची खबरदारी घेतली पाहिजे, समजलीस.

असें बोलणें होत आहे तों त्यांनीं समोरून **नागू** येत आहे असें पाहिलें. ती जवळ आल्यावर लाजत लाजत म्हणाली 'बाई, मला तुमच्याशीं कनई एकांतांत बोलायाचं आहे, आतां वेळ असल्यास बोलेन.' हें ऐकून **पाद्री** लागलाच तेथून चालता झाला. तो गेला असें पाहून **नागू** म्हणाली 'आमचे ते कनई **कप्तान**साहेबांजवळ लग्नाविषयीं बोलायला गेले आहेत. ह्मणून म्हटलं तुह्माला विचारावं कीं आतां साऱ्या मंडळीची जी स्थिति आहे अशा वेळीं लग्न लावल्यानें कांहीं वावगें तर होणार नाहींना. जेव्हां सगळंच डळमळीत होतें आणि इथंच राहायचं किंवा येथून जायचं हें कोणालाच सांगतां येण्यासारखें नव्हतें तेव्हां आह्मी ह्याविषयीं मुद्दाम गोष्ट काढली नाहीं. पण आतां

जी मदत पाहिजे होती ती आली आहे आणि साऱ्यांचा विचार इथेंच राहावें असा आहे, ह्मणून त्यांचें ह्मणणें असें पडतें कीं, आतां वेळ लावूं नये. आणि त्यांचा तर एकसारखा हेका आहे कीं, घरचें सुख मिळाल्यास आपण दोघेजण एकमेकाला मदत करून जास्त काम उरकूं, त्यानें एकंदर साऱ्यांना नफाच होईल.'

**आना** म्हणाली ' **राघूचा** हेका ह्मण किंवा वाटेल तें म्हण, पण मी तुला सांगते कीं, तो कांहीं खोटें सांगत नाहीं. तशांतून तुह्मी दोघेजण स्वतःच्या कष्टानें आपला चरितार्थ चालवूं शकाल, आणि त्यापासून आपल्या ह्या समाजाला यत्किंचित्‌ही भार सोसावा लागणार नाहीं, तर तुह्मी लग्न करूं नका असें कोणालाही म्हणण्याचा अधिकार नाहीं. आमच्या **विलायतेंत** काय, **हिंदुस्थानांत** काय पुष्कळ लग्नें अशीं होतात कीं, त्यांमुळें दुसऱ्यावर भार पडतो; पण आपल्या वसाहतीच्या ह्या बाल्यावस्थेंत प्रत्येकाला पुरून उरे इतकें काम आहे. ह्मणून तुम्हीं दोघांनीं मिळून सुखानें कां राहूं नये हें मला समजत नाहीं. आणखी जर कांहीं तुझ्या मनांत असेल, तर मी त्यांना तुझ्यासमक्ष विचारतें, ह्मणजे तरी तुझी खात्री होईल. कारण त्यांचें ही ह्मणणें माझ्याप्रमाणेंच पडेल असें मला पक्कें वाटतें.'

असें ह्मणून तिनें आपल्या नवऱ्याला हांक मारिली. तो जवळच होता, ह्मणून हांक ऐकूं जातांच तो पुढें आला. त्याला एकंदर हकीकत समजली तेव्हां तोही किंचित हंसून म्हणाला ' हात् तिच्या, मग एवढेंचना, **नागू** तुम्ही दिवस ठरवा ह्मणजे त्या दिवशीं मी तुमचें लग्न लावून एकदां तुझे दोहोंचे चार हात करून टाकतों ह्मणजे झालेंना. आतां एवढें बरें आहे कीं, पूर्वीचा **डच** लोकांचा कायदा हल्लीं प्रचारांत नाहीं; नाहीं तर तुम्हाला लग्न लावायला **केपटौन**ला जावें लागलें असतें. त्यामुळें पैशापरी पैसे व वेळ खर्च होऊन तुह्माला प्रवासाची भारी दगदग सोसावी लागली असती, आणि सगळ्यांनाच त्यापासून त्रास झाला असता.'

आनाबाईनें ह्मटल्याप्रमाणें सर्वांनाच ही गोष्ट पसंत पडली. कप्तानानें त्यांच्या लग्नाला अनुमोदन दिलें, इतकेंच नाहीं तर आपल्या घराचा पाया घालण्यापूर्वी पहिल्यानें राघूसाठीं झोंपडी तयार झाली पाहिजे असा हुकूम दिला. कप्तानाप्रमाणेंच सर्वांची त्यांच्यावर मर्जी होती, ह्मणून वसाहतींत ज्या जिनसा पहिल्यानें हत्यारांनीं तयार करण्यांत आल्या त्या साऱ्या ह्यांना देण्यांत आल्या, आणि त्यांनींही स्वतःच्या मेहनतीनें ह्यांचा बदला फेडला. नारायणानें पहिल्यानें ज्या विटा केल्या त्या त्यांच्या झोंपडीच्या भींतीकडे लाविल्या, आणि त्यानें चाकावर केलेलें कुंभारकाम पहिल्यानें ह्यांच्याच घरांतील फळ्यांवर सुरेख मांडण्यांत आलें. गणू हा सुतार काम करूं लागला होता, तो व लिंबाजी ह्या दोघांनीं मिळून राघूला शेतीचीं सर्व आऊतें तयार करून दिलीं. इतर माणसांनीं फावल्या वेळीं त्यांच्या शेताला व झोंपडीसभोंवतीं कुंपणें घालून दिलीं; आणि बजी व तिच्या संवगड्यांनीं आसपास जीं फळ व फुलझाडें होतीं तीं आणून त्याच्या बागेंत लाविलीं. परश्यानें कातडीं दिलीं तीं गवाजीनें कमावून त्यांच्या खुर्च्यांच्या बैठका व बिछाना, उशा वगैरे जिनसा केल्या. नागूचा मेव्हणा यल्लापा आणि आनंदा ह्या दोघांनीं चित्रविचित्र रंगाचे सुरेख किडे मारून व सुंदर पिसाऱ्यांचे पक्षी मारून त्यांत पेंढा भरून ते त्याच्या दिवाणखान्यावजा एका खोलींत नीट लावून ठेविले. हा सारा थाटमाट पाहून नागूला लाज वाटून ती ह्मणाली ‘ हे ऐषआरामाचे पदार्थ मला कशाला हवे? माझ्यापेक्षां ज्यांची वास्तविक किती योग्यता आहे त्यांना धड सुखाचे देखील पदार्थ नाहींत, आणि मला हा डामडौल.’ पाद्री जवळच उभा होता, तो तिला ह्मणाला ‘ बये, डामडौल ह्मणून ह्यांचा निषेध करूं नये, कारण ह्यांमुळें दोष ठेवतां येणार नाहीं अशी चांगल्या गोष्टीविषयीं आवड व तुमचें बरें व्हावें ही इच्छा मंडळींत आहे हें व्यक्त होतें. ज्यांना सार्व-

ज्यांनीं कल्याण व्हावें असें वाटतें त्यांना ह्या गोष्टीपासून आनंदच होईल. त्यानेंही तिला मधमाशांचीं पोळीं दिलीं; तीं व त्यांची बैठक सुरेख केलेलीं होतीं. त्याच्या बायकोनें सुवासिक वनस्पती व फुलझाडें नीट ओळीनें पायऱ्या पायऱ्यावर मांडून त्यांचेवर लागूनच ती पोळ्यांची बैठक ठेविली होती. तें पाहून नागूनें मनांतल्यामनांत निश्चय केला कीं, लग्न लागण्यापूर्वीं जो मध होइल त्याचा शिसा भरून पहिल्यानें पाद्रीबोवांकडे पाठवावयाचा.

ह्या वसाहतींत नंतर जो पहिला रविवार आला त्या दिवशीं राघूचें लग्न होतें, ह्मणून साऱ्यांनीं तो सणाप्रमाणें पाळला. ईश्वराच्या कृपेनें ह्या लहानशा समाजांत काय काय घडून आलें, व पुढेंही त्यांच्या कल्याणार्थ काय काय होण्याचा संभव दिसत होता, ह्याज विषयींविचार करण्याचें ज्यांच्या ह्मणून मनांत आलें,त्यांना खरोखरी तो दिवस मोठ्या आनंदाचा वाटला.

त्या दिवशीं कप्तान ज्याला त्याला ह्मणें 'असेंच आणखी कांहीं काळपावेतों आपण जुटीनें राहावें आणि नेहमीं उद्योग करीत असावें. आपल्या दुर्दैवानें कदाचित् जर कोणी गुन्हा करून आपल्याला काळोखी आणील, तर सर्वांनीं मिळून एकदिलानें त्याला थारा ह्मणून देऊं नये. कोणाचे हातून चुकून आगाळिक घडली किंवा एखादें वेडेपणाचें कृत्य झालें, तर त्याबद्दल आपण कानाडोळा करावा, शहाण्याला मान द्यावा; चांगल्या मार्गानें जो वागेल त्याविषयीं पूज्यबुद्धि असावी. इतकें जर आपण करीत असलों, तर जें जें आपल्या कल्याणाचें आहे ह्मणून त्या जगन्नियंत्याला वाटेल, तें तें सारें त्याच्या दयेनें प्राप्त होऊन आपल्याला सुख होईल. ईश्वरानें प्रत्येकांच्या हातीं सुखी होण्याचें ठेविलें आहे, हें जसें व्यक्तीसंबंधीं खरें आहे, त्याप्रमाणेंच समाजांसही तें लागू पडतें कीं नाहीं हें आपण पाहूं या.'

# कथा २ री—दरी व डोंगर.

# प्रस्तावना.

मिस हारियेट मार्टिनो हिनें अर्थशास्त्रावर ज्या गोष्टी लिहिल्या आहेत, त्यांपैकीं ही दुसरी गोष्ट होय. मूळांत या गोष्टीचें नांव The Hill and the Valley आहे, त्या आधारानें मराठी वाचकांस कंटाळवाणें होऊं नये, ह्मणून पात्रांच्या नांवांत व स्थळांत फेरफार करून हीं गोष्ट पारशी पेहरावानें सादर करीत आहें. कल्पनेला काय अशक्य आहे ?

## ह्या पुस्तकांत ज्या तत्वांचें विवेचन झालें आहे त्यांचा सारांश.

अधिक उत्पन्न करण्याच्या कामीं लावण्याच्या उद्देशानें जो ( संपत्तीचा अंश ) उत्पन्न केला जातो, त्यास भांडवल ह्मणतात.

भांडवलाचें उत्पत्तिस्थान श्रम हा होय, व काटकसर ही भांडवलाचा आधार होय.

भांडवल तीन प्रकाराचें.

( १ ) श्रमाचीं हत्यारें व यंत्रें.

( २ ) ज्यांवर श्रम करावयाचे ते शुद्ध अगर मिश्र पदार्थ.

( ३ ) श्रमकार किंवा कामकरी मंडळीची उपजीविका.

ह्या तीन विभागांपैकीं पहिल्या भागांत स्थायी ह्मणजे अविनाशी भांडवल येतें. दुसऱ्या व तिसऱ्या भागांत पुनरुत्पादक ह्मणजे विनाशी भांडवल येतें.

ज्याअर्थी श्रमापासून भांडवल होतें, त्याअर्थी ज्यामुळें श्रमाची बचत तें सारें भांडवलाची वाढ करण्यास कारणीभूत होतें.

यंत्रामुळें श्रमाची बचत होते, ह्मणून तीं भांडवलाची वाढ करण्यास कारणीभूत होतात.

भांडवलाची वाढ झाल्यानें श्रमाचा खप वाढतो.

यंत्रामुळें भांडवलाची वाढ झाल्यानें श्रमाचाही खप वाढतो.

ह्मणजे भांडवल स्थायी [ अविनाशी ] असो, किंवा पुनरुत्पादक ( विनाशी ) असो, त्याच्या मानानें उत्पादक धंदे कमी अधिक होतात.

उत्पादन करणाराचे दोन वर्ग; श्रमकार [ कामकरी ] व भांडवलवाले. ह्या दोन्ही वर्गांचें हिताहित भिन्न नसतें; ह्मणजे भांडवल सांठत जाण्यावर उभय वर्गांची भरभराट अवलंबून असते.

# कथा २.

## दरी व डोंगर.

### भाग १.

### प्रत्येकाची लहर.

थोड्या वर्षांपूर्वी धारवाड जिल्ह्याच्या अगदीं दक्षिणेस सह्याद्रीजवळ एका ओसाड जागेंत डोंगरावर एक झोपडी होती. ही झोपडी फारच थोड्यांना माहीत होती; इतकेंच नाहीं, तर ज्यांना ह्मणून ह्या झोपडींत राहणाऱ्या माणसांची चौकशी करावीशी वाटे, त्यांना एकदां त्यांची माहिती मिळाली, ह्मणजे तिकडे जाण्याचा बहुधा ते कंटाळाच करीत. दिसण्यांत ही झोपडी मोठी चांगली होती असें नाहीं; ह्मणून तिकडे फारच थोड्यांचें लक्ष जात असे. शिवाय तिला जी वाट जात होती, तीही इतकी बिकट व अडचणीची होती कीं, अगदीं काम पडल्याशिवाय कोणी देखील सहसा तिकडे जाण्याचें करीत नसे. डोंगराच्या कडेकडेनें एक अरुंद पायवाट जात होती, आणि झोपडीपासून बऱ्याच अंतरावर खालून वर जाण्यासाठीं ओबडधोबड पायऱ्या होत्या. तशांतून त्या पायऱ्या मजबूत बांधून काढल्या नव्हत्या. फक्त वेडेवांकडे दगड कसेतरी डोंगराच्या दरडीवर जमवून पायऱ्यांसारखी जाण्यायेण्याला वाट केली होती. परंतु ते दगड जागोजाग हलत होते, ह्मणून जातांयेतांना एकाद्या अनवाकब मनुष्याला पडण्याची भीति वाटे. ह्याप्रमाणें डळमळीत वाटेनें वर गेल्यावर एकदाचें फाटक लागें. तें बरेच उंच असल्यामुळें त्यावरून चढून जातां येण्यासारखें नव्हतें; आणि तें आंतून दोऱ्यांनीं मजबूत आंवळून बांधलेलें असें, ह्मणून सहज उघडतां येण्यासारखेंही नव्हतें. इतक्या अडचणी सोसून एकदाचें आंत गेलें, ह्मणजे पुढें थेट झोपडीच्या दाराशीं जातां येई. दाराजवळ एक बांक पडलेलें असें; त्यावर एकादें वर्तमानपत्र किंवा तमाखूची नळी पडली असली, ह्मणजे झोपडीचा मालक बाहेर

जवळच कोठेंतरी हवा खात फिरत असेल असें समजावें, आणि जर एकाद्या वेळीं त्यावर मोडक्या टोपलींत लोंकर असेल, तर घरकाम करणारी बाई ही तेथेंच कांहींतरी कशीदा काढीत बसली आहे असें दिसे. ह्या दारा-मवळच्या जागेइतकी दुसरी कोणतीही जागा निवांत नव्हती, कारण हिच्या आजूबाजूला बाग असून फळझाडें व इतरही झाडें पुष्कळ होतीं, आणि समोरच्या फाटकाला लागून दोन्ही बाजूला त्रिधारी निवडुंगाचें दाट कुंपण होतें.

ह्या जागेचा मालक **आदरजी** नांवाचा एकुणैशी–ऐंशी वर्षांचा चांगला धट्टाकट्टा म्हातारा पारशी होता. **माणेक**बाई नांवाची एक साधारण उतार वयाची बाई ह्याच्या घरचें पाहत असे. ह्या म्हाताऱ्या-प्रमाणें तीही दिसण्यांत मोठी पोक्त असून तिची वागण्याची तऱ्हाही त्याप्रमाणेंच जुन्या पद्धतीची होती. त्यांच्या ओळखीचे लोक त्यांना मोठे तऱ्हेवाईक समजत; कारण हे नुसते परक्यांशींच तुटकपणानें वागत नसत, तर एकमेकांशीं देखील ह्यांचा बहुतेक नेहमींच अबोला आहे असें दिसे. जेवणाच्या वेळेखेरीज ते कधींही एका खोलींत बसत नसत. **माणेक** आंत कामकाज करीत नसली, तर **आदरजी** झोपडीच्या बाहेर येऊन बसत नसे; आणि तो बागेंत गुंतला आहे असें पाहूनच ती आपली लोंकरीची टोपली बाहेर उन्हांत घेऊन बसत असे. ह्यांजकडे एकच मनुष्य जातयेत असे; त्यामुळें हे घरीं कसे वागतात हें पहा-यला त्यालाच कायतें मिळे. त्याच्या सांगण्यावरून **आदरजी** हा सकाळीं न्याहारीचे वेळीं वर्तमानपत्र वाची, दुपारीं जेवणाचे वेळीं स्वतः शीं विचार करीत मुकाट्यानें खाई, आणि रात्रीं जेवतांना पत्र वाचीत असे. हें ऐकून **माणेक**बाई आपली भापाच अजीबात विसरून कशी गेली नाहीं, ह्याचेंच साऱ्यांना नवल वाटे. त्यांतून तिचा एक पोपट होता, तो देखील तिला दुसऱ्याच्या येथें द्यावा लागला होता; कारण पाळीव पक्षी, तशींच कुत्रीं मांजरें ह्यांचा **आदरजी**ला मनापासून कंटाळा असे.

ह्यामुळें तिला बोलायचालायला पोपट देखील राहिला नाहीं. ह्या जागेंत जी शांतता होती, तिचा भंग **माणेकबाईच्या** बोलण्यानें जरी सहसा होत नसे, तरी येथें नेहमीं हवा तितका मधुर आवाज ऐकूं येत असे. आजूबाजूंच्या फळझाडांत मधुर आवाजाचे पुष्कळ पक्षी असत, त्यांचे कोमलस्वर पढपढ पंची करणाऱ्या पोपटापेक्षां कानाला फारच गोड लागत. तशांतून कधीं कधीं **आदरजी** हा अलगुजही वाजवीत असे, आणि आपण लहान असतां आईनें जवळ घेऊन जीं गाणीं शिकविलीं तींच कधींमधीं अलगुजांतून म्हटलेलीं ऐकून **माणेकबाईचा** वेळ मोठ्या आनंदानें निघून जाई. अलगुजाचे स्वर व पक्ष्यांचे चिल् चिल् आवाज ह्यांप्रमाणेंच आणखी कांहीं आवाज मधुर होते. पाणी काढण्यासाठीं **आदरजी** विहिरींत डोल सोडी, तेव्हां लोखंडाच्या साखळीचा खणखणाट, गवतावरून रुळ जातांना सरसर, आणि अगदीं पहाटेस कोयत्याला धार लावतांना घस् घस् हे आवाजही तिला फार आवडत. नेहमीं लागणाऱ्या किराण्या जिनसा व दुसरें सामान घेण्यासाठीं **माणेकबाईला** जवळच्या गांवीं जावें लागे, त्या वेळीं काय ती तिला बोलण्याची जरूर पडे, व दुसऱ्या लोकांनाही तिच्याशीं बोलावें लागे. बाजारांत जाण्याचे असे प्रसंग जरी तिला क्वचित्च येत, तरीही ह्या थोड्याशा संवयीमुळें ती भाषा विसरून जाऊन मुक्यासारखी झाली नाहीं.

ह्या मुक्कामापासून तें गांव २ कोश होतें. तेथें तिला वर्षांतून दोन वेळां कायतें जावें लागे. ज्या सामानाचा खप असल्यामुळें जरूर लागे, तें धन्याच्या सांगण्यावरून ती पुष्कळसें सांठवून ठेवी, ह्मणून तिला अधिक वेळां जावें लागत नसे. सहा महिनेपावेतों टिकूं शकणार नाहीं, अशा जिनसेची आपल्याला ‘ जरूर ’ आहे, असें तो कधींही ह्मणूं देत नसे. त्यांना जें खायाला लागे, त्याची अशी व्यवस्था केली होती. रोट्या भाजणें, दहीं घुसळणें, कोंबड्या, बदकें वगैरे पक्षी वाढवून त्यांना हलाल करणें, हीं सारीं कामें तो घरींच करून घेत असे; कारण रोटीशिवाय

किंवा दुसरा कोणीही माल विकणारा ह्मणून आपल्या घराजवळ देखील येऊं नये, असा त्याचा दृढ निश्चय होता. त्याच्या बागेंतून त्याला हवा इतका फळमेवा व भाज्या मिळत. एका गोष्टीविषयीं मात्र त्याला बाहेर जावें लागे. पण तिच्यासाठींच ह्मणजे तो मुद्दाम जात असे असें नव्हतें. रविवारीं सकाळीं सहल करून परत येतांना तो नेमानें आपल्या ओळखीच्या गृहस्थाच्या घरावरून येई. तेथें आदल्या दिवशीं मास विकत घेऊन ठेवलेलें असें, तें हा घेऊन घरीं जाई. कधींकधीं तो मासे धरून आणी. ह्याप्रमाणें आपल्या खाण्यांत तो इच्छेनुरूप हवा तितका फेरबदल करी. त्याचा एक मित्र त्याला कधींमधीं जाऊन भेटे. त्याला तो ह्मणे 'माझ्यापेक्षां एकाद्या राजाला तरी काय चांगलें खायाला मिळत असेल तें सांगाना? मला सकाळींच चांगलें ताजें ऊन धारींचें दूध, दुपारीं बटाटे, वाटाणे, कोबी व त्या बरोबर मासे, मांस किंवा एकाद दुसरी कोंबडी, आणि रात्रीच्या वेळीं चांगली उकळलेली ऊन ऊन अशी कणेरी असें खायाला असतें. मग उगाच बोलायाचें कां ह्मणून?'

कपड्यालत्त्याविषयीं देखील त्याचा ह्याप्रमाणेंच साधेपणा होता. त्याचा तो मोठ्या पिंवळ्या बटणांचा कोट, ती मश्रूची आखूड विजार, तें ठिपक्याठिपक्यांचें पागोटें, आणि तो अणकुचीदार लांबलचक जोडा हीं किती वर्षांची तरी जुनीं होतीं. हे कपडे तो कायते फक्त रविवारींच घालीत असे, ह्मणून ते इतकीं वर्षें टिकले. बाजार मंदावलेला असे अशा वेळीं वर्षांतून एकदां माणेकबाई आपल्या विजारीसाठीं कापड खरेदी करी, त्याच वेळीं ती त्याच्या पेहरणांचें, व चादरी वगैरेसाठीं लागणारें कापड, आणि काम करतांना घालण्याच्या कोटाचें कापडही घेऊन ठेवी. त्याला पुष्कळ जोडे लागत, पण तो कांहीं स्वतः चांभाराशीं फारसें दळणवळण ठेवीत नसे. वर्षांतून दोनदां तो आपले फाटके जोडे तिच्या बरोबर गांवांत पाठवून देई, आणि तिच्याच बरोबर नवीन जोडे आयते तयार होऊन चांभाराकडून येत असत. आदरजी आणि त्याचें

घरकाम करणारी बाई ज्याप्रमाणें वसतीपासून दूर एकांतांत राहत, त्याप्रमाणें कोणी राहिल्यास लोकांचा सहजीं असा कांहीं समज व्हावयाचाच कीं, 'जवळ शेजारीपाजारी असल्यास कांहीं तरी गुप्त गोष्ट उघडकीस येईल, अशी ह्यांना धास्ती असते ह्मणून हे लांब रहातात एऱ्हवीं चांगली भर वस्ती सोडून कोण आपला एकलकोंड्यासारखा लांब राहील?' आदरजी मोठा कवडीचुंबक आहे, तेव्हां साहजिकच त्यानें पुष्कळ द्रव्य कोठें तरी लपवून ठेविलें असेल, त्याचा कोणाला सुगावा लागूं नये ह्मणून हा असा एकीकडे राहतो, असें त्याच्या ओळखीच्यांना वाटे. 'परंतु पहा बोवा, एकादे दिवशीं ह्यातारेबुवा आणि माणेकबाई ह्यांचे गळे कोणी तरी कापून सारें घेऊन गेला, असें आपण ऐकूं बरें' ह्याप्रमाणें ते वारंवार आपापसांत ह्मणत. हा त्यांचा तर्क कांहीं अंशीं वास्तविक होता, व कांहींसा खोटाही होता. आदरजी ह्याजवळ बराच पैसा होता हें खरें होतें, आणि तो राहत होता त्यावरून त्याचें संरक्षण होण्यासारखें नव्हतें असें सहज वाटे; ह्मणून जरी त्याला चोरांनीं यदा कदाचित् जिवंत सोडलें असतें, तरीही त्याच्या एथें चोरी होण्याचा संभव होता हेंही खरें. परंतु तो कांहीं कृपण नव्हता. पूर्व वयांत तो मुंबई येथें व्यापार करीत होता, त्या वेळीं त्याच्या भागीदारांच्या लबाडीमुळें त्याला व्यापारांत पुष्कळ तोटा आला. त्यावरून त्याला एकदम व्यापाराच्या खटपटीचा मनापासून तिटकारा येऊन त्यानें अतःपर व्यापारधंदाच करावयाचा नाहीं असा निश्चय केला; व जवळ जी कांहीं मालमत्ता होती ती चटसारी विकून रोख पैसा केला आणि हें आडवळणीच्या जागीं खोंपट खरेदी करून लगतची दोन बिघे जमीनही घेतली व एका भक्कमशा पेटींत दोनशें मोहरा ठेवून ती आपल्या उशाशीं ठेविली. ह्याप्रमाणें पैसा पेटींत व्यर्थ पडूं दिल्यानें नुकसान होतें, असें त्याच्या मित्रांनीं पुष्कळदां सांगितलें; ह्यापासून कदाचित जिवाला धोकाही बसेल असेंही पर्यायानें सुचविलें; फार तर काय पण आपल्या नवऱ्याला ही

रक्कम माफक व्याजानें द्यावी, अशी देखील प्रत्यक्ष त्याच्या एकुलत्या एका मुलीनें वारंवार विनवणी केली, परंतु त्यानें कांहीं आपला हेका सोडीला नाहीं, व पेटींतून पैसा बाहेर काढला नाहीं. तो साऱ्यांना ह्मणे ' हं आतां पुरें झालें. एकदां बस खाल्ली तेवढी पुरे. आतां ह्मणून कोणी लाडें लाडें येईना, मी कांहीं एक छदाम देखील हातांतून जाऊं देणार नाहीं, समजलांत. मी एकदांचा निश्चय करून चुकलों आहे कीं, माझ्यामागें माझ्या **शिरीनला** २०० मोहरा ठेवायाच्या. फार कशाला, पण प्रत्यक्ष तिच्या नवऱ्याला देखील ह्या रकमेपैकीं एक पै देखील कमी करितां येऊं नये, ह्मणून मी जिवंत आहे तोंपावेतों ती रक्कम कांहीं त्याच्या हातांत लागूं देणार नाहीं. पण मला प्रत्येक वेळां चोरांची ती भीति कां ह्मणून दाखवितां? एक वेळ मी तुह्माला सांगतों. दुसऱ्या माणसांसारखें मलाही नेम धरून पिस्तुल मारतां येतें, आणि असे चोर चोर ते किती येतील? त्या सर्वांना मी पुरून उरेन, व **माणेकबाई** आणि ही पैशाची पेटी ह्यांना काडीमात्र देखील धक्का लागूं देणार नाहीं; असा मी खंबीर आहे, हें पक्कें ध्यानांत ठेवा. मग माझ्या केशाला बोट लावण्याची त्या भामट्यांची मगदूर ती काय?' त्यानें असें म्हटलें ह्मणजे मंडळींना वाटावें कीं, हा मोठा लोभी आहे, ह्याच्या हातून कसचा पैसा सुटतो. परंतु खर्च करण्यांत जी काटकसर सहज करितां आली असती, तशी काटकसर ह्मणावी तर तो कधींही करीत नसे. त्याच्या बागेपैकीं अर्धीं अधिक फळें व भाज्या वाळून नासून जात; परंतु तो तीं विकील किंवा जमिनीपैकीं कांहीं भाग खंडानें लावून देईल, तर त्याचें नांव नको. बरें ह्यापेक्षांही मोठा चमत्कार ह्मटला, तर दररोज सकाळीं **जामीजमशीद** वर्तमानपत्र गांवच्या टपाल हफिसांतून आणण्याकरितां त्यानें एका मुलाला पगार देऊन ठेविलें होतें; परंतु तें पत्र वरती न पोंचवितां त्या मुलाला पायऱ्यांच्या पायथ्याशीं ठेवायास सांगून परत जातांना मुलाची पाट वळली कीं, हे राजश्री तें वर आणण्यासाठीं खालीं

उतरून जात. तो कवडीचुंबक असता, तर त्यानें असें केलें नसतें. त्याच्या नांवावर एका व्यापारांत कांहीं ठेव पूर्वींपासून त्याच्या आप्तां-पैकीं कोणींशी ठेविली होती; तिचें दर वर्षाला कांहीं ठरीव उत्पन्न येई, त्यांतून झोपडीची डागडुजी कपडेलत्ते वगैरेचा खर्च होऊन कांहीं शिल्लक राही. अकस्मात कांहीं खर्चास लागल्यास असावें, ह्मणून त्या शिलकेपैकीं ८।१० रुपयांपावेतों रक्कम माणेकबाईच्या स्वाधीन करून बाकीची सर्व रक्कम पहिल्याच आदितवारीं सहलीस गेला असतां जें भिकार भेटे त्यास देऊन टाकी.

पावसाळ्यांत एके दिवशीं सकाळीं छान लख्ख ऊन पडलें आहेसें पाहून आदरजी हा नेहमीप्रमाणें झोपडीं बाहेर आला; परंतु देवडींत ऊन आल्यामुळें उकाडा होऊं लागला ह्मणून, तेथें न बसतां बागेच्या पलीकडल्या बाजूला वेलांच्या मंडपाखालीं फुलांचा मधुर वास घेत वर्तमानपत्र वाचीत बसला. तो बाहेर आला तेव्हां नेहमीप्रमाणें माणेक ही आंत कामकाजांत गुंतलेली होती; ह्मणून पत्र वाचून झाल्यावर मासे धरण्याचा गळ वगैरे घेण्यासाठीं झोपडींत परत जाऊं लागला, तों ती चांगली साडी नेसून डोक्याला चांगला पांढरा शुभ्र रुमाल केशावर बांधून बाहेर जायाला तयार झाली आहे असें त्यानें पाहिलें. आपल्या एका हातांत टोपली अडकवून त्यांत एक धुतलेला रुमाल ती ठेवीत होती, आणि तिची अगदीं निघण्याची तयारी होती, असें पाहून तो ह्मणाला—काय ग माणेक, आज पहिली तारीख कीं काय?

हा प्रश्न ऐकून आपल्या धन्याच्या बुद्धीला वयपरत्वें भ्रंश तर झाला नाहीं, अशी शंका येऊन ती म्हणाली—साहेब, आज आपल्याला असें झालें तरी काय? आज पहिली तारीख हें विसरलांत तरी कसें? तें पलीकडे भींतीवर डोळ्यापुढेंच पंचांग आहे, आणि हातांत हीं ताजें वर्तमानपत्र आहे,असें असून तारखेचा बाई कसा भ्रम पडला कोण जाणें!

**आदरजी**—कायती एका तारखेचीच चूक झाली. माझ्या

मनांत आज मासे धरायाला जावयाचें होतें; ह्मणून सहज वाटलें कीं, आज मागल्या महिन्याची शेवटली तारीख असावी. बागेंत काम करीन ह्मटलें, तर बराच उष्मा होत आहे. तशांतून पलीकडच्या तळ्यांत उत्तम शिकार मिळण्याला आज फारच नामी दिवस आहे, ह्मणून ह्मटलें जावें. आजच्यासारखा उद्यां उकाडा होणार नाहीं; ह्मणून तूं उद्यां गेलीस तर चालतांना त्रासही होणार नाहीं. तेव्हां मला वाटतें कीं, आज तूं घरींच रहावेंस आणि मला मासे मारण्यासाठीं जाऊं द्यावें.

हें ऐकून तर तिला फारच आश्चर्य वाटलें. ती ह्मणाली—साहेब, पूर्वीं कधींही मीं असें तुमच्या तोंडांतून निघालेलें ऐकिलें नाहीं. तुमच्या एथें राहिल्यापासून आज थोडीं का वर्षें झालीं, पण कधीं तरी पहिल्या तारखेला माझें जाणें चुकलें का? मग आजच असें का? आणि गांवचे लोक तरी काय समजतील? ते ह्मणतील कीं, ह्या महिन्याच्या पहिल्या दिवशीं ती आली नाहीं; ह्याचें कारण दुसरें कांहीं नाहीं, बिचाऱ्या त्या दोघांना कोणीं तरी मारून टाकिलें असावें. असें समजून आपल्या शोधासाठीं ते इकडे येतील अशी माझी खात्री आहे. बरें ते आल्यावर ह्मणजे मी त्यांना सांगावें कीं, कांहीं नाहीं, साहेबांच्या मनांत मासे धरायला जाण्याची लहर आली ह्मणून मी आलें नाहीं, हें चांगलें का? आणि असा चांगला पोषाख करून घरीं उगीच माशा मारीत बसायाचें मला कधींही ठाऊक नाहीं. पण साहेब, तुमच्या मनांतच मला मोडा घालावयाचें आलें आहे, तर तुमच्या मर्जीप्रमाणेंच कां होईना?

सहा महिन्यांपूर्वीं माणेकबाई गांवांत गेली होती, तेव्हांपासून हा काळ पावेतों इतकें लांब लचक बोलण्याचा तिला कधींही प्रसंग आला नव्हता; ह्मणून दम घेण्यासाठीं ती थोडा वेळ थांबली. 'काय करावें, शिकारीसाठीं अशी छान वेळ पुनः यायची नाहीं' असें कांहीं तिचा धनी पुटपुटला, तें कानावर येतांच तिनें पुनः बोलण्याची सुरुवात केली बरें, तळ्यावर जावयाचेंच असेल तर ह्मणजे मला घरीं राहिलें

पाहिजे असें नाहीं. बाहेर जाल, तेव्हां दाराला कुलूप लावून किल्ली देवडीवरच्या त्या कोनाड्यांत लपवून ठेवा, ह्मणजे तुमच्या पूर्वीं जरी मी घरीं आलें तरीही ती मला सांपडेल. ही युक्ति माझ्या आजीनें मला शिकविली. माझी आजी जेव्हां कनई बाहेर जाई आणि मला एकटीला घरीं करमेनासें होई, तेव्हां ती ह्मणे ' बाळे, तूं शाहणी आहेस तर तुझे आजोबा सांगतात त्याप्रमाणें राखण अस, पण जर तुला बाहेर जावेंसेंच वाटलें, तर कनई कुलूप लावून किल्ली दारावर आढ्यांत ठेवून मग जात जा ' ह्याप्रमाणें मी पुष्कदां कुलूप लावून बाहेर गेलें. सरतेशेवटीं एके दिवशीं आजोबा नेहमींपेक्षां लौकर घरीं आले, तेव्हां त्यांना ही युक्ति कळली आणि मग—

**आदरजी**—आणि **माणेक** कोणा एकाद्याला आपली ही युक्ति कळेल, आणि परत आल्यावर पेटी गेली, असें जर दिसेल तर काय ह्मणशील? चल जा तर आपल्या कामाला. आज तुला आल्यावर मासे मात्र मिळायाचे नाहींत, समजलीस.

हें ऐकून **माणेकनें** हंसून मान हलविली, आणि ती कामाला चालती झाली.

ती दिसेनाशी झाल्यावर त्या म्हाताऱ्याला चैन पडेना व कांहीं सुचेना. आपल्या मनाविरुद्ध बोललेलें किंवा इच्छेविरुद्ध वागलेलें त्याला कधींही खपत नसे, आणि दररोज न्याहारी होण्यापूर्वीं जें कांहीं ठरवून ठेवीत असें तें सर्व त्याच दिवशीं तो पार पाडीत असे. ह्यापूर्वीं माशाची शिकार एकदां मनांत ठरविली कीं, ती हटकून केल्याखेरीज तो राहिला नाहीं. ह्मणून तो त्रासानें झोपडींत ह्या खोलींतून त्या खोलींत असा बराच वेळ फिरला. बिछाने घालून तयार होते, आणि जी ती वस्तु नीट टापटिपीनें साफ करून ठेविलेली असून कोठेंही दोष काढण्यासारखें कांहींही दिसलें नाहीं; म्हणून तर तो फारच त्रासून गेला. कारण एकादा दोष काढण्यासारखें कांहीं दिसलें असतें, म्हणजे तिजवर रागा-

वेळेत संपलें असत, व त्यामुळें साहजिकच मनाला समाधान वाटलें असतें. असें कटाळल्यावर तो बाहेर बागेंत हळूहळू हिंडूं लागला. कांहीं कांहीं कोमेजलेलीं फुलें कापून ज्या फांद्या भारानें वांकल्या होत्या, त्या नीट बांधून टाकिल्या आणि मनांत म्हणूं लागला ' ह्यावेळीं संध्याकाळ असती तरी बरें झालें असतें, म्हणजे हीं जीं कांहीं फुलझाडें सुकलेलीं दिसतात, त्यांना पाणी तरी दिलें असतें. कपाळावर ' घाम आला होता तो पुसून तो म्हणाला ' बरें उकाडा तरी किती होत आहे? अशा वेळीं माणसानें काम तरी कसें करावें? मग तो आपल्या दुर्बिणींतून गांवाकडे पाहूं लागला. परंतु क्षितिजाजवळ धुकें असल्यामुळें माणूस किंवा कांहीं त्याला दिसेना. त्याप्रमाणें कांहीं केल्यानें वेळ जाईना, असें पाहून त्याला आळसानें जांभई आली, तों त्यानें विचार केला ' आज माणेक गेली आहे, तर आपल्याला संध्याकाळीं जेवायाला नेहमीपेक्षां दोन तास उशीर होईल; म्हणून तिनें सांगितल्याप्रमाणें कुलूप लावून तळ्यावर गेल्यास काय चिंता आहे ' हा बेत त्याला आवडून त्यानें दाराला कुलूप लाविलें, व किल्ली सांगितलेल्या ठिकाणीं देवडीवर लपवून ठेविली, आणि झोपडीसभोंवती बाहेरून हिंडून खिडक्या नीट लाविलेल्या आहेत असें पाहिलें. ह्याप्रमाणें बंदोबस्त करून पुढल्या कुंपणाचें फाटक नेहमीपेक्षां दुप्पट आवळून बांधून माशांचा गळ वगैरे सामान खांद्यावर टाकून तो चालूं लागला. खालीं दरींत उतरतांना मध्यें दोन तिनदां त्यानें वळून पाहिलें, परंतु वाटेंत झोपडीपावेतों वर त्याला कोणीही दिसलें नाहीं. खालीं रस्त्यावर घोडा किंवा गाडी जात असल्याचा आवाज मुळीं देखील ऐकूं येत नव्हता. ओढ्याचें पाणी खडकाळ जमिनीच्या गोट्यांतून खळखळ करीत जात असतां तें स्वच्छ व थंड आहे असें वाटत होतें त्यामुळें वरच्या बाजूला ओढ्याचा जो डोहो होता तेथें त्याला केव्हां जाऊन पोंचेन असें झालें, कारण त्या ठिकाणीं चांगली गर्द छाया असून मासेही पुष्कळ

सांपडत. एकदां मनांत आल्याप्रमाणें तो बाहेर पडला, त्याबरोबर इतका जरी उष्मा होत होता, तरीही त्याला बिलकुल उष्मा वाटला नाहीं. उलट, त्याच्या अर्ध्या वयाचा माणूस जर चालला असता, तर त्याची देखील वाहवाच झाली असती, अशा झपाट्यानें तो तोंडानें शीळ घालीत त्या डोहाकडे जाऊं लागला. टेंकडीच्या माथ्यावर जातांच त्यानें एकदां पुनः वळून आपल्या दुर्बीणींतून घराकडे पाहिलें ह्यापुढें तो खालीं उतरला असता, तर त्याला आपली झोपडी दिसण्यासारखी नव्हती. परंतु आपल्या कोंबड्या निवांतपणें घराजवळ दाणें टिपून खात आहेत, त्यामुळें सामसूम आहे असें पाहून त्याला फार समाधान वाटलें; कारण जर जवळपास कोणा माणसाच्या पायाची चाहूल लागली असती, तर कोंबड्या मुकाट्यानें खात्याना.

त्या डोहावर झाडांची सावली पडल्यामुळें डोळ्याला त्रास न होतां उलट तेथें चांगला गारवा असल्यामुळें ती जागा चांगली रमणीय वाटत होती. तशांतून मासेही पुष्कळ असल्यामुळें मनांत धारल्याप्रमाणें थोडक्याच वेळांत चांगली उत्तम शिकार साधली; तेव्हां वेळही बराच उरला आहे असें पाहून त्यानें तेथेंच तळ्याच्या कांठीं थंडगार जागेंत पडून थोडीशी डुलकी घेतली. जागा झाल्यावर त्याला चांगली हुशारी वाटली; तेव्हां त्यानें विचार केला ' सकाळीं मी मुळीं देखील घरांतून हललों नाहीं असें माणेकला वाटत असेल, ह्मणून ती येण्यापूर्वी मी मासे तयार करून ठेवीन; ह्मणजे तिला अचंबा वाटल्यावाचून राहणार नाहीं.' असें मनांत आणून माणेकबाई परत येण्यापूर्वी आपण घरीं लौकर पोंचावें, ह्या इराद्यानें तो उठला. टेकडीच्या माथ्यावरून त्यानें पुनः दुर्बिनींतून आपल्या घराकडे पाहिलें, तों त्याच्या नजरेस जें पडलें तें पाहून त्याच्या तोंडाचें पाणी पळालें. 'आपल्या परसांत कोंबड्यांमागें एक कुत्रा लागला आहे. त्यामुळें त्या भिऊन इकडून तिकडे फडफड करीत उडत आहेत. त्या कुत्र्याला एका माणसानें बोलावल्यामुळें त्यानें कोंबड्यांच्या पाठीस

लागण्याचें सोडून दिलें; परंतु तो माणूस मात्र घराभोंवती फिरून एकादी खिडकी किंवा दरवाजा उघडण्यासाठीं बाहेरून धक्के देत आहे ' असें त्यानें पाहिलें. हें पाहून आदरजीनें आपल्या जवळची माशांची टोपली वगैरे चट सारें टाकून तोंडाजवळ हात नेऊन मोठ्यानें 'कोण आहे' ह्मणून आरोळी दिली. परंतु हा त्याचा वेडेपणा होता, कारण ऐन मध्यरात्रीस जेव्हां चोहोंकडे अगदीं सामसूम असतें, अशा वेळींही इतक्या लांबून कोणाही माणसाची आरोळी ऐकूं गेली नसती. आपलें ओरडणें व्यर्थ आहे, असें आदरजीला लागलेंच कळून आलें; ह्मणून 'आज हा काय मीं गाढवपणा केला? घरीं रहायचें टाकून देऊन येथें कशाला मी तडफडलों? ' असें स्वतःशींच चरफडत चरफडत खालीं टाकिलेली टोपली वगैरे सारें सामान घाबऱ्या घाबऱ्या घेऊन त्या उभ्या उडचणीच्या वाटेनें ह्मातारपणीं करवेल तितक्या उतावळीनें व घाईघाईनें तो पळत सुटला. ह्याप्रमाणें तो जात असतां मध्यंतरी त्याला तो मनुष्य व त्याचा कुत्रा असे हळू हळू पायऱ्या उतरून जात आहेत असें दिसलें; परंतु त्याच ठिकाणीं स्वतः जाऊन पोंचल्यावर पाहतो, तों तेथें कोणी नसून जातेवेळीं ज्याप्रमाणें चोहोंकडे सामसूम होती, त्याचप्रमाणें आतांही आहे असें त्याचा नजरेस पडलें. त्या माणसाचा पाठलाग करावा, किंवा घरीं जाऊन काय नुकसान झालें हें पहावें, ह्मणून, थोडा वेळ घुटमळत तेथें उभा होता, तों त्यानें माणेकबाई खालून येत आहे असें पाहिलें. ती हळू हळू पायऱ्या चढून मोठ्या कष्टानें जवळ येऊन पोंहचत होती, तसा त्यानें तिला एकसारखा बोलण्याचा सपाटा चालविला. तो ह्मणाला ' वः तूंच नाहीं का सकाळीं मला सांगत होतीस, बाहेर जावयाचेंच असेल तर दाराला कुलूप लावून किल्ली कोनाड्यांत ठेवा. फार चांगला तुझा उपदेश. तो मला चांगला भोंवला, समजलीस. कुठें मला अवदसा आठवली कीं, तुझें ऐकिलें आणि आज सारे पैसे गमावून बसलों. माझे पैसे गेले ते तुझ्या पायीं गेले, समजलीस. ' हें ऐकून

माणेकबाई भीतीनें अगदीं गांगरून गेली, परंतु आपल्याला उगाच दोष दिला असें वाटून तिच्यानें उगी राहवेना. ती ह्मणाली ' साहेब, हें आपलें चांगलें. कोणीं कांहीं सांगितलें, तर त्याला हंसावें हें वाईट तर खरेंच; परंतु त्याच्या सांगण्याप्रमाणें वागावें आणि मग कांहीं झालें ह्मणजे सांगणारालाच दोष देत बसावें, याला काय ह्मणावें ? माझें ह्मणणें असें कीं, पहिल्यानें माझ्या युक्तीला तुह्मी हंसायाचें नव्हतें. बरें मला वेड्यांत काढलें तें काढलें, पण स्वतः तरी आपल्या विचारानें चालायाचें होतें. तुह्मी मासे धरायाला जाणार, असें जर मला पूर्वीच कळलें असतें, तर हे मासे मीं तरी आणिले नसते, आणि ज्याचा खप नाहीं तें विकत घेण्यांत उगांच तुमचे पैसे तरी खर्च झाले नसते. '

' घरीं राहिल्यानें माझ्या आवडीचे मासे मला मिळणार नाहींत, ह्मणून हिनें मला गोड वाटावें ह्या हेतूनें मोठ्या कळकळीनें माझ्यासाठीं मुद्दाम मासे विकत आणिले ' हें मनांत येऊन आपण उगांच इजवर रागावलों असें आदरजीला वाटलें. ह्मणून तो झोंपडीपर्यंत अगदीं मुकाट्यानें गेला; आणि माणेकबाईच्या हाताला कांपरे सुटल्यामुळें तिच्यानें कुंपणाच्या फाटकाची रशी सोडवेना, तेव्हां तें स्वतः उघडून झोंपडीच्या दारापावेतों तिच्या सामानाची जड टोपली तो आंत घेऊन गेला. कुलुपाची किल्ली ठिकाणींच होती, त्याचप्रमाणें पैशाची पेटीही जागच्या जागींच होती, आणि झोंपडीच्या आंत सर्व कांहीं व्यवस्थित होतें. बाहेरही साऱ्या कोंबड्या जिवंत असून फुलझाडांचे ताटवे शाबूत होते. मात्र वेलांच्या मांडवांत एका बाकावर वर्तमानपत्रें ठेविलेलीं होतीं, तीं तेथून उचलून पलीकडल्या बाकावर ठेविलीं होतीं, असें दिसत होतें.

ह्याप्रमाणें कांहीं देखील गेलें नाहीं, असें पाहून माणेकबाई ह्मणाली- साहेब, तुह्मी उगीचच्या उगीच बरेंच घायकूत आणतां. कांहीं नाहीं. मला वाटतें हारमसजी नेहमीप्रमाणें अलगुज वाजवायला आले असतील नी काय. एवढा कोण दिवसाढवळ्या चोरी करायला येईल ?

**आदरजी**–अग पण ते नेहमीं संध्याकाळीं येतात, आणि त्यांतून त्यांच्यापाशीं कुत्रा कोठें आहे ?

**माणेकबाई**–कुत्रा त्यांनीं हल्लीं बाळगला असेल. तें कांहीं नाहीं. पण त्यांच्याशिवाय नाहीं तर कोण हीं वर्तमानपत्रें वाचणार ? जो येथें आला होता तो बराच वेळ तुमची वाट पहात बसला होता असें दिसतें; तर मग **हारमसजी**शिवाय कोण वाट पाहत बसला असेल ? बरें ते आले नसले, तर पैसे मागण्यासाठीं मुंबईहून जांवईबुवा पुनः आले नसतील ह्मणून कशावरून ?

त्या ह्मातार्‍यानें हिमटें तोंड करून थोडेंसें हंसत ह्मटलें–मला निरोप सांगितल्याशिवाय तो तसाच परत गेला नसता. तशांतून तुला तो वाटेंत भेटला असता.

**माणेकबाई**–साहेब, ह्यानें मला बरी आठवण झाली. खालीं त्या पली-कडल्या झाडींत मीं एक गृहस्थ खरोखरी पाहिला. त्याचा कुत्रा जवळच्या झुडुपांत कांहीं हुंगीत मागें राहिला होता, त्याला त्यानें शीळ घातली हें देखील मला आठवतें. तो गृहस्थही दिसण्यांत तरतरीत व आनंदी होता. त्यांतून तो पारशी होता. आणि जेव्हां बरें का, मीं त्याला नीटसें पाहवें, ह्मणून पुनः मान वळविली, तेव्हां मी कोणीकडे चाललें आहें, हें तो पाहत होता असें दिसलें.

**आदरजी**.–काय ह्मणतेस, तो गृहस्थ होता? तर मग **होमी-(हारमसजी)** खेरीज मला भेटायाला ह्मणून येणारा असा हा पहिलाच गृहस्थ होय. बरें पण **माणेक**, तूं ती गृहस्थ ह्मणून कोणाला ह्मणतेस ?

**माणेकबाई**–गृहस्थ ह्मणजे? हें काय विचारणें? कां बरें, अमका गृहस्थ आहे हें नाहीं का कळत ? गृहस्थ ह्मणजे माणसासारखा–एखाद्या सारखा–ह्मणजे गृहस्थासारखाच नाहीं का ?

**आदरजी** ( हंसत )–वः फार छान ! पण सांग पाहूं. मला तूं गृहस्थ ह्मणशील का ?

माणेकबाई—म्हटलें ह्मणजे, चरितार्थ चालण्यासाठीं तुमचा कोणावरही भार पडत नाहीं, त्या अर्थी—

आदरजी—छेः छेः मी तें नाहीं विचारीत. माझ्याकडे नीट पहा आणि सांग पाहूं, मी गृहस्थासारखा दिसतों का?

माणेकबाई गुटमळत गुटमळत ह्मणाली—साहेब, ह्मणजे असें पहा. गृहस्थ लोक बहुतकरून असला कोट घालीत नाहींत असें वाटतें, पण आदितवारीं मी कोटाला ब्रश मारून ठेवतें, आणि गांवांत जाण्यापूर्वी सारा पोषाख होतो, तेव्हां वरीक छान गृहस्थासारखे दिसतां. त्या गृहस्थाचा वरीक पोषाख थोडासा निराळ्या तऱ्हेचा होता.

आदरजी—होय असेल निराळी तऱ्हा—पण मला खास वाटतें कीं, माझा जो कपड्यांचा उत्तम जोड आहे तो माझ्या जन्माला पुरेल. कारण माझ्या पसंतीप्रमाणें चांगलें टिकाऊ असें वास्कुटाला कापड घेईन म्हटलें, तर फार कशाला पण येथून वीस कोसाच्या आंतही एखाद्या गांवच्या दुकानांत तें मिळणार नाहीं, समजलीस. त्याचप्रमाणें माझ्या कोटाला चांगलीं माणसाच्या हातांत येतील अशीं बटनें मला हवींशीं वाटतात, पण हल्लीं तीं तकलुबी पैसारखीं लहान लहान बटनें येतात त्यांनीं का माझें समाधान होणार?

माणेकबाई झोपडींत जात जात ह्मणाली—खरेंच, ते गृहस्थ हे मासे खाण्यासाठीं जेवणाच्या वेळपावेतों राहिले असते, तर बरें झालें असतें; कारण आपल्याला पुरून उरतील इतके हे मासे आहेत, आणि पांच चार दिवसांनीं तर ते बिघडतील.

ह्यानंतर चांगला एक आठवडाभर खपापेक्षां मासेच जास्त आणिले, असें माणेकबाईला एकसारखें वाटत होतें. कोणाला आवडेल अशी भेट देण्याचा तिला मनापासून आनंद असे; परंतु उगांच पैसे खर्चून जिन्नस घरच्या घरीं नासून जावा, हें तिला बिलकूल रुचत नसे.

ह्या दिवशीं बोलून बोलून दोघांना इतका कंटाळा आला होता कीं,

रात्र पडण्यापूर्वींच त्यांना अतिशय थकल्यासारखें वाटूं लागलें; फार तर काय, पण बरेच दिवसपावेतों त्यांनीं पुनः बहुतेक तोंड उघडलें नाहीं. आणि भीति वाटण्याजोगेंही कांहीं झालें नाहीं, ह्मणून बोलण्याचा प्रसंगही पडला नाहीं.

परंतु एके दिवशीं अगदीं सकाळींच खालच्या रस्त्यावरून गाडीच्या चाकांचा आवाज ऐकूं येऊं लागला. असा आवाज फारच क्वचित् प्रसंगीं ऐकूं येई; कारण जरी तो रस्ता चांगला होता व आगगाडी होण्यापूर्वी ह्या रस्त्यावर भारी रहदारी असे, तरीही हल्लीं एकाद दुसऱ्या प्रवाशा-खेरीज बहुशः फारसें कोणी इकडून जातांना दिसत नसे.

आदरजी आणि माणेकबाई ह्या दोघांनाही तो आवाज ऐकून आश्चर्य तर वाटलेंच; पण गाड्यांवरून बांधकामाचें सामान व त्यां-बरोबर सुतार, गवंडी व मजूर येत आहेत, आणि आपल्या झोपडीच्या थेट समोरच टेकडीच्या पायथ्याला सपाट जागेवर ते गाडे व लोक थांबत आहेत, असें जेव्हां का त्यांनीं पाहिलें तेव्हां तर त्यांना मोठाच चमत्कार वाटला. हें सारें नीट न्याहाळून पाहिलें, तेव्हां कायतें तेथल्या जागेवर अंतरा अंतरानें मेखा पूर्वींच्याच मारिलेल्या आहेत, असें आदरजीच्या नजरेस आलें. आणखी काय काय होतें तें पहावें, ह्मणून बाहेर येऊन त्या दिवशीं साऱ्या दिवसभर तो हळहळत व कांहीं-एक काम न करितां रिकामपणानें तिकडे लक्षपूर्वक बघत बसला. ज्या जागीं आजपर्यंत हिरवीचार झाडी व झुडपांचें रान होतें, तेथेंच कांहीं कारखाना उभा होत असावा, असें मजूर लोक कामाला लागले होते त्यावरून सहज दिसून आलें.

दुसऱ्या दिवशीं तर साराच खुलासा झाला. संध्याकाळीं बागेतील झाडांसाठीं तो ह्मातारा पाणी काढीत असतां, दोन गृहस्थ परसाच्या फाटकाजवळ आले आहेत, असें त्यानें पाहिलें. त्यांपैकीं एक होरमसजी होता, ह्मणन लागलाच तो आपलें काम टाकून त्यांना सामोरा गेला.

हारमसजी ह्मणाला–मी आज अलगुज कांहीं आणिला नाहीं. ह्यावेळीं मी निराळ्याच कामासाठीं आलों आहें. आपल्या परिचयाचा लाभ व्हावा, अशी ह्या गृहस्थांची फार इच्छा आहे, ह्मणून आपली ओळख करून देण्यासाठीं मी ह्यांस आणिलें आहें. ह्यांचें नांव बमनजी वाडियाशेट. हे लौकरच आपल्या शेजारीं रहावयास येणार आहेत.

माणेकबाईनें ज्या गृहस्थाला झाडींत पाहिलें होतें, तोच हा वाडिया. त्यानें आपल्याविषयीं माहिती सांगितली. तो ह्मणाला–एक नवीन लोखंडाचा कारखाना निघणार आहे, त्यांत मी एक भागीदार आहें. मी हल्लीं येथून थोड्याशा अंतरावर रहात आहें, तरीहां ह्या कामामुळें मला आपल्या घरापासून एका हाकेच्या आंतच दररोज असावें लागणार, ह्मणून आतांपासूनच आपल्याशीं शेजारधर्मानें राहावें असें माझ्या मनांत आलें. आणि ह्या हेतूनेंच मी एका आठवड्यापूर्वीं आपली भेट घेण्यासाठीं येथें आलों होतों; परंतु घरांत कोणी नसल्यामुळें त्यावेळींच भेटीचा योग घडून आला नाहीं, त्यामुळें दिलगिरी वाटते.

हारमसजी–हे जेव्हां मला सांगूं लागले कीं, ' कोणी तरी आतां येईल मग येईल असें करीत करीत बागेतल्या मांडवांत मी वर्तमानपत्रें वाचींत तासभर वाट पहात होतों,' तेव्हां मला पहिल्यांदा खरेंच वाटेना. एकाच वेळीं तुह्मी व माणेकबाई अशीं दोघेजण बाहेर गेल्याचें मला कधीं आठवत नाहीं. पण हें असें झालें तरी कसें?

आदरजीनें त्या दिवसाची सारी हकीकत सांगितल्यावर वाडियानें ' बाग फार छान आहे व घरही चांगल्याच ठिकाणीं आहे' अशी बरीच प्रशंसा केली, त्यामुळें त्याला मनापासून समाधान वाटलें. आपल्या एकल्ली राहणीसंबंधानें कोणी कांहीं उद्देशून बोललें कीं, आदरजीला बोलण्याची उकळी आलीच.

तो ह्मणाला–शेटजी, बागाइती जमिनींतून जें उत्पन्न होतें, त्यापेक्षांही जास्त मोल्यवान असें ह्या जमिनीच्या तुकड्यापासून मला मिळालें

आहे. ह्या जमिनीमुळेंच माझी ही निकोप प्रकृति आहे बरें. ह्या माझ्या हातांनीं मीं जमीन खोदून तींत बीं पेरिलें व उत्पन्न झालेलें काढिलें आहे, तर माझ्या मेहनतीचीं हीं सारीं फळें पहा. हा मी आज ७९ वर्षांचा आहे खरा, पण अंगांत चाळिशीची तर शक्ति व धमक आहे. येथें आल्या दिवसापासून मी एक चिमूटभर देखील औषधी चूर्ण घेतलें नाहीं, एकही गोष्ट हवी असें मला वाटलें नाहीं; कारण माझ्या स्वतःच्या हातांनीं जी गरज भागविली जाणार नाहीं, अशा फारच थोड्या गोष्टींची मी गरज ठेवितों. इतर लोक माझ्या राहणींत व्यत्यय आणीत नाहींत, तोंपर्यंत ते कसे जरी वागले, तरी त्यांच्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं, व त्यांचे दोषही मी काढीत बसत नाहीं. त्यांनीं खुशाल हवें तर शहरांत राहून गुदमारा करून एकमेकांना मारून टाकावें, आणि व्यापारांत पैसे घालून मनाची शांति गमवावी. मी देखील ह्याप्रमाणेंच पूर्वी अनुभव घेऊन चुकलों आहें, आणि ह्मणून तर लोक अशाच खटपटींत पडतात ह्याचें मला आश्चर्य वाटत नाहीं. परंतु ह्या खटपटींचा थोडक्यांतच पुष्कळ अनुभव येऊन माझी तृप्ति झाली, आणि फारच लौकर मला ही अशी विश्रांतीची निवांत जागा सांपडली, त्याबद्दल मी ईश्वराचा खरोखर फार आभारी आहें.

**वाडिया**—शेटजी, आपल्या पुरताच ह्याप्रमाणें विचार करितां हें बरोबर आहे. कारण जोंपर्यंत मनुष्यांच्या भिन्न प्रकृति आहेत, व त्यांस निरनिराळ्या स्थितींत राहावें लागत आहे, तोंपर्यंत ह्मणजे सार्‍यांना आपल्या मार्गानेंच सुख होईल असें नाहीं. प्रत्येकजणास अशी जागा घेण्याचें सामर्थ्य आहे असें जरी घटकाभर धरून चाललों, तरीही ज्यांचा स्वभाव मंडळींतला आहे किंवा जगांत उत्कर्ष व्हावा अशी ज्यांची इच्छा आहे, किंवा मुलाबाळांच्या विद्याभ्यासासाठीं व आपल्यामागून कुटुंबाच्या चरितार्थासाठीं कांहीं तरी सोय ज्यांस करावी लागत आहे, अशा लोकांस आपली राहाणी मुळींच उपयोगी पडावयाची नाहीं.

असे राहिल्यानें आपण काळ सुखांत घालवितां, हें ऐकून मला आनंद होतो; त्याचप्रमाणें दुसरेही निराळ्या प्रकारानें सुखांत आयुष्य घालवितात, त्याविषयीं आपलें कांहीं ह्मणणें नाहीं, हें ऐकूनही मला बरें वाटलें.

आदरजी—शेटजी, मी असें ह्मणालों कीं, जोंपर्यंत ते माझ्या वाटेस जाणार नाहींत, तोंपर्यंत माझेंही त्यांच्याविषयीं कांहीं ह्मणणें नाहीं. खालीं जें कांहीं तुह्मीं चालविलें आहे, तें पाहून मला बरें वाटणार नाहीं, हें मी स्वतः होऊन सांगतों; आणि फार कशाला, मला पुढें देखील कधींही त्यापासून आनंद होणार नाहीं. आह्मी जे ओसाड ठिकाणीं राहतों, त्यांना देखील निवांतपणें राहूं देऊं नये, हा मोठा त्रास आहे. ह्या पलीकडल्या रानांतील पक्ष्यांना तेथून लांब कोठें तरी जावें लागेल; ओढ्यांचें पाणी बिघडल्यानें मासे देखील जेथल्या तेथें मरतील; आणि ज्या ठिकाणीं चांगलें गर्द रान पाहून मला आनंद होत असे, त्याच ठिकाणीं विटांच्या भींती व धुराचा लोळ, हें मला पहावें लागणार. खरोखरी म्हणाल, तर हा सुळसुळाट आहे, असें वाटतें. शेटजी, स्वतः तुम्हाला माझें बोलणें लागावें, अशी मनापासून माझी इच्छा नाहीं; पण हें तर मी स्पष्टपणें सांगतों कीं, दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं हा तुमचा खटाटोप तुह्मीं आरंभिला असता, तर मला खरोखर आनंद झाला असता.

वाडिया—आह्मीं आरंभिलेलें काम आपल्याला इतकें त्रासदायक होत आहे, ह्याविषयीं मला वाईट वाटतें; परंतु जेथें हल्लीं कायतें जंगली पक्षी आणि मासे आहेत, तेथेंच जेव्हां शेंकडो प्राणी सुखानें राहत आहेत असें पहाल, तेव्हां हे सारे फेरफारच आपल्या अंगवळणी पडतील.

आदरजी—शेटजी, ही गोष्ट कालत्रयीं होणार नाहीं. जेथें सृष्टि-सौंदर्याचा बिघाड होण्यासारखा नसून शांतताप्रिय अशा गरीब लोकांना उपसर्ग लागण्याची भीति नसेल, तशा ठिकाणीं तुमच्या मजुरांची धाड खुशाल जाईना. ते गेल्यापासून आनंद होईल, अशी जागा ह्या विस्तीर्ण पृथ्वीतलावर पुष्कळ पडलेली आहे.

ह्मातान्याच्याविरुद्ध बोलून त्याला जास्त खवळवूं नये, ह्मणून हारमसजीनें आपल्या बोटानें त्या परकी गृहस्थाच्या कोंपराला हळूच ढंवचून खूण केली; ह्मणून वाडियानें तो विषय सोडून देऊन निराळ्याच गोष्टींविषयीं बोलणें चालविलें. तो म्हणाला 'ह्या बागेंतील फुलें व हीं झाडें फारच छान आहेत. अशीं फारच थोड्या ठिकाणीं माझ्या पहाण्यांत आलीं. ह्या फळझाडांना फळेंही पुष्कळ येतील, असें दिसतें.' वास्तविक पहातां, ही त्याची तोंड देखली तारीफ नव्हती; त्याचें ह्मणणें अक्षरशः खरें होतें. त्या ह्मातान्याची मात्र ह्या बोलण्यानें त्या परकी गृहस्थावर मर्जी बहाल झाली. ते दोघेजण परत जाऊं लागले, तेव्हां आदरजी उसासा टाकून ह्मणाला—आमच्या शेजारीं जर राहायला आलांच, तर माझ्या येथेंही येत जा. घर आपलेंच आहे.

टेकडीवरून खालीं उतरत असतां, हारमसजीनें आपल्या सोबत्याला विचारिलें—आमच्या ह्या ह्मातारबोवाविषयीं तुह्माला काय वाटतें बरें?

तो म्हणाला—ह्या वयाचा असा धट्टाकट्टा म्हातारा पाहूनच आनंद होतो. त्याच्या इतक्या उतारवयांत आपलें आयुष्य ह्याच्यासारखें आनंदानें घालविणारे फारच विरळा आढळावयाचे. परंतु ह्याची राहाणी पुष्कळांना आवडूं लागणें मात्र मुळींच इष्ट नाहीं.

हारमसजीनें उत्तर दिलें—ह्यांत काय संशय? आपल्या इच्छेनुरूप वाटेल त्या प्रकारानें राहण्याची ऐपत एकाददुसऱ्याचीच असते, ह्मणून बरें. परंतु जरका आपल्या होतकरू ज्वान लोकांनीं ह्या म्हाताऱ्याप्रमाणेंच समाजासाठीं कांहींही केलें नाहीं, तर जगांत काय काय होईल, ह्याची मला कांहींच कल्पना होत नाहीं. एका माणसाला साधारणपणें कांहीं कामासाठीं जितकी जागा लागण्यासारखी आहे, त्यापेक्षांही जास्त जागा कमी उपयोगी अशा कामाला त्यानें अडविली आहे. त्याच्या बागेंत खाण्याचे पदार्थ दरसाल किती तरी निष्कारण नासून जातात, हें पाहून मला मनापासून वाईट वाटतें. आतां माझीही पक्की

खात्री आहे कीं, हजारों माणसांना त्या पदार्थांची ददात आहे. असें त्या म्हाताऱ्याला कळेल, तर त्यांनाही आपल्या बागेच्या उत्पन्नाचा फायदा व्हावा, म्हणून निर्जन ठिकाणीं राहण्याचें सोडून देऊन मनाची शांतिही गमविण्यास तो तयार होईल.

**वाडिया**—वस्तींत राहिल्यानें जे फायदे आहेत, तें अशा म्हाताऱ्याला अंतरावे, ही खरोखरी दुःखाची गोष्ट आहे. ह्याच्या ह्या स्थितीचें अनुकरण झाल्यास तरुण लोक अज्ञान दशेंत राहतील, व वृद्ध कांहीं तरी चमत्कारिक समजुतींचाच हेका धरून बसतील.

**हारमसजी**—तो एककल्ली आहे, हें तर उघड दिसतेंच; परंतु त्याच्या विक्षिप्तपणाकडे आपण फारसें लक्ष देऊं नये.

त्याचा मित्र म्हणाला—तिकडे मी लक्ष देत नाहीं; इतकेंच नव्हें, तर अशा उतारवयांत ज्या प्रकारचा स्वभाव बहुतकरून आपल्या पहाण्यांत येतो, त्याच्या अगदीं विरुद्ध ह्या म्हाताऱ्याचा उद्योगीपणा, तरतरी व आनंदी वृत्ति हीं पाहून त्याची तारीफ करावी तितकी थोडीच. तुमच्या मित्राच्या आयुष्यांतील कांहीं प्रसंगांमुळें त्याचे असे विलक्षण ग्रह झाले आहेत, हें खरें आहे; तथापि जे केवळ स्वतःसाठींच आपलें आयुष्य घालवितात ते, मनुष्यानें जगांत राहिले पाहिजे, त्या रीतीनें वागत नाहींत, ही देखील गोष्ट कांहीं खोटी नाहीं.

---

# भाग २.

## थेंबें थेंबें तळें सांचें.

**वाडियाच्या** अश्रांत मेहनतीनें व उत्तम देखरेखीमुळें लोखंडाचा कारखाना उभारण्याचें काम झपाट्यानें चाललें. सुरुवातीला त्या कारखान्याला लहानच स्वरूप दिलें होतें. प्रथमतः कायती एक भट्टी होती. कारखान्यानजीक वाडियासाठीं एक बंगली बांधली होती. मजूर लोकां-

साठींही आसपास पुष्कळ झोपड्या केल्या होत्या. ह्यामुळें ती जागा एकाद्या खेडेंगांवासारखीच दिसूं लागली. थोड्याच दिवसांनीं वाडिया हा लग्न करणार आहे, व आपल्या बायकोसुद्धां नवीन घरांत रहावयास येणार आहे, अशी लोकांत अफवा उठली. ' दुसराही कोणी भागिदार येथें रहावयास येईल, तर ही जागा मोठी नामी होऊन भरभराटीस येईल ' असेंही लोक बोलूं लागले. नवीन कोणी रहायाला येणार, हें ऐकिलें कीं, आमचे आदरजी ह्यातारबोवा कायते मनांतले मनांत कष्टी होत; बाकी जितक्या लोकांना तेथें कामाची सवड होण्यासारखी होती, तितके लोक जर येऊन राहूं लागतील, तर सर्वतोपरी नफाच होईल, असें प्रत्येकाला वाटत असें.

ह्या कारखान्याचे पुष्कळ भागीदार होते, पण सर्वांचीं नांवें कांहीं मंडळीच्या नांवांत नव्हतीं. सर्व भागीदारांत नवरोजी लीमजी हा श्रीमंत होता. हा मुंबईच्या नामदार गव्हर्नरसाहेबांच्या कायदेकौन्सिलचा सभासद होता; व तो मुंबईत राहत असे. कारखान्याचीं कामें चालविण्यासाठीं त्यानें पुष्कळ पैसा आगाऊ दिला होता; परंतु हिशेब तयार झाले, ह्मणजे आयता नफा घ्यावा, व कधींमधीं कागदपत्रांवर सह्या कराव्या, ह्यापलीकडे त्यानें स्वतःला ह्या धंद्यासंबंधीं कांहीं त्रास पडूं दिला नाहीं. कावसजी नांवाचा एक दुसरा भागीदार होता. हाही श्रीमंत होता. ह्या धंद्याच्या भांडवलापैकीं एक तृतीयांश भांडवल कावसजी ह्यानेंच दिलें होतें; व तो लीमजीपेक्षां ह्या कारखान्यांत एकंदरीनें जास्त लक्ष घालीत असे. कारखाना कसा काय चालला आहे, हें पहाण्यासाठीं तो मधून मधून धारवाडाहून येत असे; परंतु तो आला ह्मणजे प्रत्येक गोष्टींत दोष काढीत बसे, वाडिया हा कारखान्यांतील कामासंबंधीं जे हुकूम देई ते सारे फिरवून टाकी, आणि सर्व जणांना करवेल तितकें नाराज करून ' मी पुनः लौकरच पहायाला येईन, बरें ह्मा ' असें सांगून स्वारी एकदांची परत जाई. एके वेळीं काम पाहून

त्याला थोडेसें बरें वाटलें, तेव्हां आपल्या मुलानें कामकाजांत वाकब होऊन कांहीं दिवसांनीं थोडाबहुत धंदा पाहूं लागावें ह्मणून त्यानें मुलाला पाठविलें. तिसरा भागीदार **बरजोरजी** ह्याला पुष्कळ मुलगे होते. आपल्या मुलांनीं लोखंडाचा कारखाना कसा चालवावा हें शिकून तयार व्हावें, असें त्याच्या मनांत होतें; ह्मणून बायकोमुलांसुद्धां कारखान्याजवळच येऊन रहावें व कच्चें काम चालवावें असा त्यानें बेत केला. हा त्याचा बेत **वाडियाला** फार आवडला; कारण **वाडिया** हा वयानें लहान होता व त्याला कामकाजाचा विशेष अनुभव नव्हता, तशांतून हल्लीं त्याजवर कारखान्याची जबाबदारी येऊन पडली होती, ती त्याला फार आहे असें वाटत होतें. **बरजोरजीच्या** लायकीविषयीं सर्व प्रकारें त्याची पूज्यबुद्धि होती; ह्मणून त्याला वाटूं लागलें कीं, माझी स्वतःची मेहनत व हौस ह्यांना **बरजोरजीचा** अनुभव व हुशारी ह्या दोन गोष्टींची जर भर पडेल, तर आपल्या कारखान्याची खरोखर भरभराट होईल. **बरजोरजीची** मंडळी येण्याला बराच अवकाश होता, ह्मणून त्याला वाईट वाटलें; परंतु त्यांच्या येण्यापूर्वीं सर्व कांहीं व्यवस्थितपणें लावून त्यांच्या सोयी वगैरे करून घेण्याला त्याला वेळ मिळाला.

सर्व भागीदारांमध्यें **वाडियाची** पुंजी फारच थोडी होती; परंतु तो ह्या कारखान्यांत आपला सर्व वेळ व श्रम घालविणार, ह्मणून त्याच्या हिश्शाला बराच भाग होता. त्याच्या पणजाच्या अंगावर संसार येऊन पडला होता, तेव्हां त्यापाशीं एक रुपया देखील नव्हता. त्याचा पणजा बिचारा **ठाण्यास** एक साधारणसा सुतार होता; त्यास चार मुलें होतीं; परंतु आपल्या मेहनतीनें व हुशारीनें तो बरेंच मिळवी; त्यामुळें आपल्या कुटुंबाला खायालाप्यायाला व कपडेलत्ते इतकें घेऊन तो थोडासा पैसा बाचवीत ही असे. तेव्हां त्यानें विचार केला कीं, कुटुंबाचा चरितार्थ चालवून जी शिल्लक राहते, तिचा उपयोग, आपण ज्या धंद्यांत पडलों आहों, तोच धंदा आपल्या मुलांनीं करूं लागण्याकडे करावा, किंवा त्या पैशांनीं देतां

येईल, असें शिक्षण मुलांना द्यावें. आपल्याजवळ थोडासा पैसा शिल्लक आहे; ह्मणून आपल्या मुलांसाठीं किंवा स्वतःसाठीं कांहीं चैनीचे पदार्थ विकत घेण्यांत तो उधळून टाकावा, असें एकाद्या वेडच्या पीराप्रमाणें त्याला वाटत नसे. त्यानें तर उत्तम मार्ग काढिला. आपल्याला ह्मातारपणीं किंवा दुखणेंबाहाणें आल्यास ददात पडूं नये, ह्मणून पुरेशी रक्कम त्यानें प्रथम व्याजीं लाविली, आणि मुलांना साधारण प्रतीचें शिक्षण देण्यांत बाकीची रक्कम लाविली; त्यामुळें आपल्यापेक्षां वरच्या प्रतीचा धंदा करण्याची त्याच्या मुलांना योग्यता आली. त्याचा थोरला मुलगा एका कापडकऱ्याजवळ काम शिकण्यास कांहीं मुदतीपर्यंत राहिला; नंतर त्याच्या दुकानीं त्या मुलानें कांहीं पाती ठेविली. आणि मरतेवेळीं मुलास ह्मणजे आपले **वाडियाशेट** ह्यांच्या तीर्थरूपांस थोडेंसें भांडवल राखून ठेविलें होतें तें दिलें. त्या भांडवलावर **वाडिया**-च्या बापानें स्वतःचेंच दुकान काढिलें, आणि व्यापारांत चांगली किफायत झाल्यामुळें तो भरभराटीस आला. आपल्या **वाडियास** त्यामुळें बरीच मोठी रक्कम आयती मिळाली. वर सांगितल्याप्रमाणें हा पैसा **वाडियानें** लोखंडाचे कारखान्यांत घातला, कारण ह्या धंद्यांत विशेष नफा मिळण्याचा संभव होता.

आपली पुंजी कशा प्रकारें आपल्यास मिळाली, हें **वाडिया** कधींही विसरला नाहीं. तो आपला मित्र **बरजोरजी** याला नेहमीं ह्मणे ‘ अहो आमची पुंजी श्रमानें गोळा झाली, आणि काटकसरीनें वाढत गेली. ह्मणून ह्यानंतर जर भांडवल वाढावें, अशी माझी इच्छा असेल, तर त्याच उपायांनीं तें वाढविलें पाहिजे. ह्यासाठीं मी स्वतः श्रम घेण्यास मागें हटत नाहीं, व भांडवल जास्त व्हावें, ह्मणून उत्पन्नापेक्षां कमी खर्च करण्याकडे दुर्लक्ष करीत नाहीं’.

ज्यावेळीं त्यानें लोखंडाचा कारखाना उभारिला, त्यावेळीं आपलें किंवा आपल्या भागीदारांचें सर्व भांडवल त्यानें पैशाच्या रूपानें त्यांत

घातलें नाहीं. त्यांचें भांडवल तीन प्रकारचें होतें. ( १ ) श्रमाचीं हत्यारें व यंत्रें; ( २ ) ज्यांवर श्रम करावयाचे ते पदार्थ; (३) आणि श्रमकार ह्मणजे मजूर यांची उपजीविका, अर्थात् उपजीविकेस लागणाऱ्या जिनसा मजुरांस विकत घेतां याव्या ह्मणून जो पैसा लागणार तो. पहिल्या प्रकारांत भट्टी, धातु शुद्ध करण्याची जागा, साळ व गिरणी, आणि प्रत्येक ठिकाणीं लागणारीं यंत्रें व श्रमकारांचीं आऊतें ह्यांचा समावेश होतो. ह्या सर्वांना ' श्रमाची साधनें ' ह्मटलें असतां चालेल. दुसऱ्या प्रकारांत, कारखान्यासाठीं जी जमीन विकत घेतली, त्यांत सांपडणारें कच्चें लोखंड, कोळसा व चुनखडी, ह्यांची गणना होते. आणि तिसऱ्या प्रकारांत मजुरांचा रोजमुरा येतो. लोकांना मजुरीबद्दल अन्नवस्त्र व रहाण्यासाठीं जागा हीं दिल्यानें, किंवा ह्या आवश्यक गोष्टी खरेदी करितां याव्या, ह्मणून रोजमुरा दिल्यानें, भांडवलाच्या ह्या तिसऱ्या प्रकारांत कांहीं भिन्नता होते असें नाहीं. मजुरी पैशाच्या रूपानें दिली जाते, ही गोष्ट उभयपक्षासही सोयीची आहे; आणि जास्त रोजमुरा मिळून रहाण्यास जागा नाहीं, त्यापेक्षां कमी रोजमुरा व रहाण्यास झोपडी हीं असणेंही कित्येक वेळां लोकांस आवडतें, हें खरें आहे. ह्यासंबंधीं कसाही प्रकारें निश्चित झालें असतें, तरी वाडिया शेटजींना हें तर पक्कें वाटत होतें कीं, आपल्या भांडवलांचीं तीन स्वरूपें आहेतः—( १ ) श्रमाचीं हत्यारें व यंत्रें, ( २ ) ज्यांवर श्रम करावयाचे ते पदार्थ, ( ३ ) आणि मजुरांची उपजीविका. ह्या तीन प्रकारांपैकीं एकानें, दोहोंनीं, अगर तीनही रूपांनीं भांडवल असूं शकतें, हें मागें सांगितलेंच आहे; परंतु ह्या तीन प्रकारांखेरीज इतर कोणत्याही रूपानें तें असूं शकणार नाहीं, हें मात्र निर्विवाद आहे.

वाडिया हा कारखान्याच्या सर्व जागेभर हिंडून पाही, तेव्हां त्याला साहजिक असा आनंद होई कीं, हें भांडवल लाविल्यानें सुमारें २०० लोकांना उपजीविकेचें साधन झालें आहे. ह्याचप्रमाणें त्या लोकांच्या

श्रमामुळें जें लोखंड उत्पन्न होईल, त्यानें तर जेथें ह्मणून तें जाईल अशा लांबच्या प्रदेशांतील देखील हजारों लोकांच्या सोई लागून त्यांना सुख होईल; हेंही त्याच्या लक्षांत येऊन त्याला एकप्रकारचें समाधान वाटे. त्याचा मित्र **हारमसजी** एकदां कारखाना पहावयास गेला होता; त्यावेळीं त्यानें पूर्वी कारखाना पाहिला होता त्यापेक्षां आतां नवीन काय काय झालें हें सांगून कारखाना दाखवीत असतां **वाडियानें** त्याजपाशीं असाच उद्गार काढिला. तेव्हां **हारमसजी** म्हणाला—हें तर खरेंच, कारण भांडवल पेटींत घालून राखून ठेवण्यापेक्षां तें अशा कामीं लागलेलें बरें. तुमच्या ह्या कारखान्यांत त्या समोरच्या डोंगरावरील आपल्या ह्मातारबोवांनीं दोनशें मोहरा घालाव्या, असें मला फार फार वाटतें. असें केल्यानें जी उत्पन्नाची प्राप्ति होईल तिजमुळें साहजिकच त्यांच्या मुलीला आनंद होईल, भांडवलांत भर पडली ह्मणून तुह्मालाही बरें वाटेल, लोकांच्या उपयोगासाठीं एकंदरीनें जास्त लोखंड तयार होईल, आणि येथें जास्त मजुरांचीही सोय होईल.

**वाडिया**—दोनशें मोहरांपासून हे फायदे कांहीं अंशीं तरी खचीत मिळतील; आणि दोनशें गोट्यांप्रमाणें त्या पडूं देण्यापेक्षां त्या वावरून अगदीं कमींत कमी फायदा झाला तरी बरें, असें मला वाटतें. मुद्दलाचा अशा प्रकारें तोटा व्हावा, ही चूक आपल्या ओळखीच्या श्रीमंत लोकांपैकीं कोणीही करणार नाहीं; कारण भांडवलाचा असा उपयोग झाल्यानें समाज अस्तित्वांत राहूं शकतो.

त्यांच्या पाठीमागून एक आवाज आला—अहो शेटजी, आपल्यासारखे आणखी किती भांडवलवाले असतील, ह्मणून आपल्याला वाटतें ?

हें कोण बोलला हें पाहण्यासाठीं **वाडियानें** मागें वळून पाहिलें, तों दिसण्यांत विचित्र असा एक माणूस आपल्या अगदीं पाठीशीं उभा आहे, असें त्यास दिसलें. ह्या माणसाला पुष्कळ वेळां पाहिलें आहे, अशी त्याला लागलीच आठवण झाली. तो माणूस सुमारें तीस वर्षांचा असून

चांगला धट्टाकट्टा होता. त्याचें शरीर निकोप असून त्याचा चेहरा आनंदी होता; परंतु त्याची स्थिति मोठी कंगाल होती, असें दिसत होतें. त्याच्या धोतराला सतरा जागीं ठिगळें होतीं, आणि त्याच्या पेहरणाच्या तर लक्तरच्या झाल्या होत्या. डोक्यास फाटकी टोपी होती; बाकी पायांत जोडा नव्हता, किंवा अंगावर दुसरें कांहीं एक नव्हतें. कारखान्याच्या आसपास तो पुष्कळ दिवसांपासून गमत होता. कधीं कधीं त्यानें जवळच्या डोंगरावर बसून मजूर लोक काय काम करितात, हें तास तास पहात असावें; आणि नंतर खालीं उतरून त्यांच्याशीं बोलत बसावें, परंतु मुकादमानें त्यास लावून द्यावें.

**वाडिया**—बाबा, तूं कोण आहेस?

तो माणूस ह्मणाला—मला **पांडोबा** ह्मणा ह्मणजे झालें. हें नांव किंवा दुसरें कोणतेंही नांव असलें तरी सारखेंच. मी काय करीत असतों, हें जाणण्याची इच्छा असेल, तर कोणता धंदा करावा, ह्याचाच मी विचार करीत आहें; आणि येथें मी कशासाठीं आलों हें जर विचाराल, तर माझें उत्तर हें कीं, माझ्या जोगतें काम मिळवावें ह्मणून.

**वाडिया**—असें का? तर मग मला तुझा उपयोग होईलच, अशी तुला फारशी खात्री दिसते. पण बाबा, तुला एक सांगून ठेवितों; आह्मी येथें रिकामटेकडे व आळशी अशा लोकांना फिरकूं देत नाहीं, समजलास.

**पांडोबा**—तुमच्या येथें अतिशय मेहनती असा मजूर दाखवा, त्याच्यापेक्षां अधिक काम करण्याचें माझ्याकडे लागलें.

**वाडिया**—कसलें काम?

**पांडोबा**—कोणतेंच काम येत नाहीं, असें कबूल करणेंही परिणामीं चांगलें नसतें; ह्मणून आज सकाळीं मी येथें येऊन तपास करूं लागलों कीं, कोणत्या कामाला चांगली मजुरी मिळते. आतां एवढेंच सांगायाचें कीं, असें जें बिकट काम असेल तें करण्यास मी तयार आहें. परंतु एवढी मोठी उडी न मारतां, मीं प्रथम हलक्या कामापासून सुरुवात

करावी हें बरें; ह्मणून मी पिकांव घेऊन बोगद्याकडे लागूं का? हें नवीन काम मला कसें काय पटतें, तें उद्यां मी आपल्याला कळवीन. तर आतां, शेटजी, मी रजा घेतों. सलाम.

**वाडिया**—भल्या माणसा, जरासा थांब. पूर्वी तूं कशा प्रकारें दिवस घालविलेस, तें सांगशील तर बरें होईल. एवढी स्वतःची खातरी करण्याचा दम तुला कोठून आला, हें मला समजलें पाहिजे. तूं मजूर नसुन भिकारी आहेस, असें मला वाटत होतें. परंतु तें असो. तुला ह्या इकडे काम मिळण्यास अडचण पडणार नाहीं, आणि येथें कमींत कमी जी मजूरी दिली जाते, तिच्यांत तुला हल्लींपेक्षां चांगलीं वस्त्रें घेतां येतील, बरें.

**पांडोबा**—शेटजी, आपण ह्मणतां तें सर्वांशीं खरें आहे. गेल्या सहा महिन्यांत हाताचे श्रम ह्मणाल, तर माझ्याकडून झाले नाहींत; मी स्वस्थ आळशासारखा बसून होतों. परंतु तो सर्व काळ मीं पाहत व विचार करीत घालविला. आणि ह्या कामीं शेजाऱ्यापाजाऱ्यांची मला पुष्कळ मदत झाली; कारण मला भूक लागली, असें मीं ह्मणण्याचा अवकाश कीं, त्यांनीं माझ्या खाण्याची तरतूद ठेवावी.

**वाडिया**—पण बाबा, सहा महिन्यांपूर्वी तरी काय करीत होतास?

**पांडोबा**—तें मी तूर्त सांगणार नाहीं; कारण भिकारी किंवा मजूर ह्यांच्यासारखें माझें बोलणें चालणें मुळींच नाहीं, असें आपल्यालाही वाटेल; आणि ह्याचें कारण शोधून काढण्याची मौज आपल्याला वाटू द्यावी, असें माझ्या मनांत आहे. हल्लीं मी कसा आहें एवढें आपल्यास समजलें कीं पुरें आहे. काम करण्याला माझे हात खंबीर आहेत, व नेटानें काम करीन असा मी निश्चयी आहे.

**वाडिया**—येथें जर तुला आमचें काम करणेंच असेल, तर मुकादमाच्या देखरेखीखालीं तुला काम करावें लागेल. आणि तुझी आळ्यता पाहतां मला नाहीं वाटत कीं, तुला हें रुचेल.

**पांडोबा**—मुकादम उभा राहून पाहीना बिचारा. मला त्याचें काय? त्यानें माझ्या कामांत व्यत्यय केला नाहीं, ह्मणजे पुरे. लुच्च्या माणसांना आपल्यावर देखरेख नसावी असें वाटतें; आणि मी तर बोलून चालून स्पष्टवक्ता आहे.

**वाडिया**—स्वतःविषयीं जें सांगितलेंस तें खरें असल्यास, तूं भिक्षा मागत रहावें, ही खरोखरी दुःखाची गोष्ट आहे. मी मुकादमाला आतां बोलावून तुला काम देण्याला सांगतों.

**पांडोबा**—आपला परिचय होतांना मीं पहिल्यानें प्रश्न विचारिला होता, त्याचें उत्तर देण्याला कांहीं हरकतीसारखें वाटत नसेल, तर तें मला आपण द्यावें. आपणच पहा कीं, मी आपल्या किती प्रश्नांचे जबाब दिले; त्यांतून बागद्याकडील मजूर लोक खाण्यासाठीं नुकतेच सुटले आहेत; आणि मला ही खायला कांहीं नसल्यामुळें हा जेवणाचा एक तास कंटाळवाणा जाईल, तो तरी तसा जाणार नाहीं.

हें भाषण ऐकून इतर मंडळी लागलीच चालती झाली असती; परंतु **हारमसजी** व **वाडिया** ह्या उभयतांना **पांडोबाच्या** विक्षिप्तपणाचें नवल वाटून ते तसेच उभे राहिले. **पांडोबाचें** बोलणें खडखडीत होतें, तरीही कोणाचा अपमान व्हावा असें तें नव्हतें. शिवाय त्याच्या हल्लींच्या स्थितीपेक्षां तो पूर्वीं चांगल्या स्थितींत असावा, असें त्याच्या भाषेच्या सरणीवरून दिसत होतें.

**वाडिया** हंसत ह्मणाला—खायाला मिळावें, ह्मणून जें पर्यायानें तूं सुचविलेंस, तें पूर्वींच्या याचकाच्या नात्यानें, किंवा आतांच्या नवीन धंद्यानें? ह्मणजे असें कीं, याचकवृत्तीनें तूं खायला मागतोस, किंवा अगाऊ रोजमुरा मिळावा, ह्या रूपानें मागतोस?

**पांडोबा**—शेटजी, ह्या दोन्ही गोष्टी खऱ्या नाहींत. पूर्वीं संध्याकाळ होईपर्यंत मी लाजेकाजेनें खात नसे, आणि आतां निदान सचोटी दाखविण्यासाठीं तरी तितका वेळ थांबण्याला मला कांहीं अवघड वाटत

नाहीं. सायंकाळपर्यंत काम करून मी माझें जेवण निःसंशय काढीन; आणि तुह्मीं काम देण्याचें कबूल केलें, तेव्हांपासून मीं भीक मागण्याचें थांबिलेंच. आतां मी कोणापुढेंही भाकरीच्या तुकड्यासाठीं तोंड पसरणार नाहीं.

तरीही पांडोबानें उपाशीं पोटीं कामास लागावें, हें वाडिया शेटास न रुचून त्यानें बालाप्पा नांवाच्या आपल्या माणसास बोलाविलें. बालाप्पा दगडी कोळसा शुद्ध करण्याच्या कामाकडे होता. त्यास वाडियानें विचारिलें—ह्या वेळेपुरती ह्या माणसाच्या पोटापाण्याची व्यवस्था झाली, तर पहा. संध्याकाळीं तो ह्या वेळेचे पैसे चुकवील; आणि जर तो न देईल तर मला सांग, ह्मणजे मी स्वतः पैसे देईन.

बालाप्पाजवळ कांहीं डाळेंचुरमुरें व केळीं होतीं, तीं पांडोबानें घेऊन वाडिया शेट समोरच खाल्लीं; आणि नंतर जवळच्या ओढ्यांत जाऊन पाणी पिऊन परत आल्यावर तो ह्मणाला—शेटजी, माफ करा; पण भूक लागली, ह्मणजे तेथें अदब वगैरे चटसारी जाते. असो, मघां मीं विचारिलें होतें कीं, आपल्याखेरीज येथें भांडवलवाले आणखी कोण आहेत? ह्याबद्दल मला कृपा करून सांगाल का?

वाडिया—मला वाटतें, येथें कारखान्यांत जितके ह्मणून काम करितात, तितके सारे; पण तूं मात्र कदाचित नसशील. तेच आणखी सहा तास लोटल्यावर तूं देखील होशील.

पांडोबा किंचित हंसून ह्मणाला—हें तरी भांडवलाचा अर्थ करण्यावर अवलंबून राहील. आपलें असें ह्मणणें आहे काय कीं, भांडवल ह्मणजे जास्त उत्पन्न व्हावें ह्या हेतूनें जें उत्पन्न केलें जातें, किंवा एकाच्या ऐवजीं दुसऱ्याचा मोबदला करितां येईल, अशा उत्पन्न केलेल्या गोष्टी. ह्या दोन्ही अर्थांत फार तफावत आहे?

कारमसजी मध्येंच म्हणाला--तफावत तर खराच. तो पलड्या मुकादम पहा. तो भांडवलवाला आहे; कारण त्यानें पैसे वांचवून ती पली-

कडे झोपडी बांधिली आहे. तिचें त्याला सालिना २५ रुपये भाडें येतें. परंतु बालाप्पा हा भांडवलवाला आहे कीं काय? त्याजवळही कांहीं मालमत्ता आहे. त्याचीं कांहीं भांडीं आहेत, खाट आहे, बिछाना आहे. परंतु ह्या मालमत्तेपासून आणखी जास्त कांहीं उत्पन्न त्यास होत नाहीं, ह्मणून त्याच्या मालमत्तेला भांडवल ह्मणतां येईल काय?

**वाडिया**—एका अर्थानें ह्मणतांही येईल; कारण तीं भांडींकुंडीं विकून रुपये येतील, ते उत्पन्न होईल अशा रीतीनें कारणीं लावितां येतील. भांडींकुंडीं डागडागिने ह्यांत पैसा लावणं, हा भांडवल कारणीं लावण्याचा एक मार्ग आहे, तो फायदेशीर नाहीं हेंही खरें आहे. परंतु आपल्या येथें सारेजण भांडवलवाले आहेत असें मीं म्हटलें, ह्याचा अर्थ एवढाच कीं, स्वतःला अगदीं अवश्य तेवढा खर्च करून कांहीं तरी बचत पाडतां येईल अशी प्रत्येकाला प्राप्ति आहे. आणि सध्यां आपल्या धंद्याला तेजी असल्यामुळें असा प्रकार असेल, असें मला वाटतें. पांडोबाची गोष्ट राहूं द्या, परंतु आतांच्या वेळची खाण्याची ददात मिटवून आणखी पुढल्या वेळेसाठीं खाण्याची सामुग्री घेण्या इतकी ऐपत प्रत्येकाजवळ आहे. मग ती रक्कम ४ आणे असो, किंवा पन्नास रुपये असो; ज्या वेळीं ती मिळाली त्या वेळीं ती भांडवलाच्या रूपाची होती. त्या रकमेंतून भांडींकुंडीं घेतलीं असलीं तरी चिंता नाहीं, कारण तीं पुनः विकतां येतील; व अशी रक्कम व्याजीं लावितां येईल, किंवा दुसऱ्या प्रकारांनीं तिजपासून उत्पन्न करितां येईल.

**हारमसजी**—परंतु आणखी जास्त उत्पन्न व्हावें ह्या हेतूनेंच जेवढें उत्पन्न केलें जातें तेवढें भांडवल आहे, असें म्हटल्यासही, तुमच्या तीनशें लोकांपैकीं कांहीं जण तरी ह्या अर्थानें भांडवलवाले असतील असें वाटतें.

**वाडिया**—कांहीं का, पुष्कळ आहेत. आणि असे लोकच खरोखर समाजाचे हितकर्ते होत, असें मी समजतों. परंतु असेही कित्येक आहेत कीं, त्यांना रहायला कशीबशी झोपडी व हांथरापांघरायला कांहीं

कापडचोपड असलें ह्मणजे पुरे; मग ते जें कांहीं मिळवितात तें मिळालें कीं, लागलाच उडविण्याचा त्यांचा झपाटा असतो. अशा उडविण्यानें त्यांस कशाही प्रकारची जास्त प्राप्ति होत नाहीं, व तशी व्हावी अशी त्यांची इच्छाही नसते. समाजावर कधीं तरी अशा लोकांचा भार पडतोच.

**पांडोबानें** मोठा उसासा टाकिला; त्यामुळें त्या दोघां गृहस्थांचें लक्ष त्याकडे जाऊन त्यांनीं पाहिलें, तों त्याची मुद्रा पराकाष्ठेची खिन्न दिसली. आपली खिन्नता ते पाहत आहेत, हें त्याच्या लक्षांत येतांच त्यानें दुःखाचा वेग गिळून आपल्यास कांहीं वाटलें नाहीं असें दाखवीत पुनः म्हटलें–मीं असें ह्मणतांना ऐकिलें आहे कीं, गाजत्या पावसाच्या सरींत वृक्षवेली ह्या वाढत असल्याचें दिसून येईल; त्याचप्रमाणें उन्हाळ्यांत एका उभ्या दिवसांत तान्ह्या मुलाची किती वाढ झाली हें सूर्य नारायण पाहूं शकतो; परंतु ह्या दोन्ही गोष्टींपेक्षां भांडवलाची वाढ ही सहज कळून येण्यासारखी आहे. येथल्याप्रमाणें साधनें वगैरे नसावींत आणि तशा स्थितींत लोखंडाचा कारखाना निघालेला मीं पहावा, असें माझ्या मनांत फार आहे. असा कारखाना काढणारांपाशीं फक्त स्वतःची अंगमेहनत व बुद्धि ह्यांखेरीज दुसरें कांहीं एक नसावें. तशा ठिकाणीं भांडवलाच्या प्रारंभापासून तें तरतुदीनें कसकसें वाढत जाईल, व शेवटीं आपल्या हल्लींच्या भांडवलाप्रमाणें अगदीं पूर्णावस्थेस कसें जाऊन पोहोंचेल हें क्रमाक्रमानें नीट पहातां येईल.

**वाडिया–पांडोबा**, ह्याविषयीं तुझी कल्पना एकवार मला कळूं दे.

**पांडोबा**–मला वाटतें, पहिल्या प्रथम असें होईल कीं, कच्च्या धातूचा गोळा विस्तवाचे आंचींत वितळून पुनः कठीण झाल्याचें एकाद्या कल्पक मनुष्याच्या पाहण्यांत येईल. ह्यावरून त्यास असें सुचेल कीं, लांकडापेक्षां अशा धातूचीं हत्यारें चांगलीं होतील. नंतर तो कठीण झालेला गोळा घेऊन त्यास विस्तवाची आंच देऊन चांगला तापल्यावर त्यास दगडानें

ठोकील, किंवा वाकवील किंवा खांचे पाडील, किंवा त्यास वेडीवांकडी धार देईल. अशा रीतीनें शेजाऱ्यापाजाऱ्यांपेक्षां त्याजवळ चांगलीं हत्यारें झाल्यानें त्याच्यासारखीं हत्यारें आपल्याजवळ असावीं, ह्मणून दुसरे-ही यत्न करतील. परंतु त्यांना जर त्याच्यासारखा कच्चा लोखंडाचा गोळा आयता सांपडला नाहीं, तर तो त्यांच्यासाठीं जमिनींतून आपल्यां हत्यारांनीं खणून तसे गोळे काढून देईल,

**वाडिया**—मग पांडोबा, त्याचीं तीं हत्यारें हेंच त्याचें भांडवल होईल.

**पांडोबा**—ह्यांत काय संशय. त्याच्या श्रमानें तीं हत्यारें झालीं तीं त्याचें भांडवल असून त्या भांडवलापासून त्यास जास्त उत्पन्न करितां येईल. ह्याप्रमाणें शेजाऱ्यापाजाऱ्यांस त्यानें लोखंड काढून दिलें, ह्मणजे ज्या जिनसा ते देऊं शकतील त्या लोखंडाच्या बदल्यांत ते साहजिकच देतील; आणि नंतर सारे-जण मिळून हत्यारें करावयास लागतील. थोड्या काळानें असें कळून येईल कीं, श्रम विभागल्यानें त्यांचें काम लौकर व चांगलें होईल. ह्मणून एक जण आग चांगली राखण्याकडे लागेल, दुसरा धातूचा रस खळग्यांत बरोबर जाऊन पडतो कीं नाहीं हें पाहील, तिसरा धातु निवून कठीण होण्यापूर्वीं ठोकून तिच्या पातळ किंवा जाड कांबी करील, चवथा त्यांना खांचा पाडून करवतें करील, किंवा पांचवा कोणी तरी त्यांना धार देऊन कुऱ्हाडी घडील.

**वाडिया**—अगदीं बरोबर, पण ज्याप्रमाणें भांडवला पूर्वी श्रम असलेच पाहिजेत, त्याचप्रमाणें श्रमविभाग होण्यापूर्वीं भांडवल असलेंच पाहिजे.

**पांडोबा**—हें तर खरेंच. कच्चें लोखंड नसतें, तर श्रमांचा विभाग करण्याला त्यांच्यापाशीं कांहीं असतेंना; आणि त्या कल्पक माणसाचें लोखंडी हत्यार हें जसें त्याचें भांडवल होतें, त्याचप्रमाणें त्या लोकांना कच्चें लोखंड हें भांडवल होय. जितकीं अधिक हत्यारें ते करतील तितकें जास्त कच्चें लोखंड त्यांना पैदा करितां येईल.

**वाडिया**—तर मग श्रमविभागानें भांडवल वाढण्याला मदत होते.

**पांडोबा**—ह्यांत तर हीच मजा आहे. दोन्ही एकमेकांवर अवलंबून असतात. श्रमामुळें भांडवल होतें, भांडवलानें श्रमविभाग करावा लागतो, आणि श्रमविभागानें भांडवल वाढतें. बरें ते असो. आपण बोलत होतां, ते लोक हत्यारें करूं लागतील, आणि प्रत्येकाजवळ तशीं हत्यारें होईपर्यंत, हत्यारांत व लोखंडाच्या जातींत दिवसेंदिवस ते सुधारणा करीत जातील. अखेर तशीं हत्यारें एकूणएकाजवळ झालीं, ह्मणजे जवळच्या देशाशीं ते देवघेव करूं लागतील, आणि आपण तयार केलेला माल, ह्मणजे हत्यारें, देऊन त्याच्या मोबदल्यांत त्या देशांत उत्पन्न झालेले वाटेल ते पदार्थ घेतील. त्यांच्या मालांत जशी सुधारणा होत जाईल, तशी त्यांना जास्त संपत्ति मिळेल; त्याचप्रमाणें त्यांना जास्त संपत्ति मिळूं लागली कीं, त्यांचा मालही सुधारत जाईल. श्रम कमी पडण्यासाठीं ते नवीन युक्त्या काढतील. ते यंत्रें काढतील, त्या यंत्रांनीं त्यांच्या हातांपेक्षां चांगलें काम होऊं लागेल; आणि शेवटीं आपण येथें पाहत आहों, त्याप्रमाणें त्यांचा लोखंडाचा कारखाना अस्तित्वांत येईल. असा कारखाना ह्मणजे एकसारखी कामाची घडामोड चाललेली असावयाची. ज्या यंत्रांचे श्रम मनुष्याला प्रथम करावे लागत होते, तीं यंत्रें त्या कारखान्यांत मनुष्य चालवितो, आपल्या इच्छेप्रमाणें पृथ्वी आप अग्नि व वायु ह्यांचा उपयोग आपल्या कामाकडे करितो, आणि जेथें पूर्वीं भांडवलाच्या अभावीं माणसें अंगावर कातडीं पांघरून उघड्या जमिनीवर निजत, व आपले भक्ष्य अणकूचीदार गारगोट्यांनीं कापून खात, तेथेंच शंभर सव्वाशें कुटुंबें आनंदानें घरांत राहून त्यांस खाण्यापिण्याची ददात पडत नाहीं. माझ्या समजुतीप्रमाणें भांडवलाचा वास्तविक इतिहास असा आहे, आणि तो मीं आपल्याला कळविला आहे. आतां कामावर जाण्याची वेळ झाली आहे, तर तिकडे जातों. शेटजी, सलाम.

**वाडिया**—**पांडोबा,** मला तुझा मोठा चमत्कार वाटतो. संपत्तीचें स्वरूप असें चांगलें तुला माहीत असून तूं असा कंगाल का?

जातां जातां पुनः वळून **पांडोबा** ह्मणाला—अगदीं रस्त्यावरचा भिकारी असला व त्याच्या डोक्यावर घालायला त्यापाशीं कांहीं देखील नसलें, तरी त्यास ' राजमुकुट ' ह्याचा अर्थ कळत नाहीं असें आपल्याला वाटतें कीं काय? काछ्याच्या दुकानाजवळ भुकेलेलीं मुलें उभीं असतात, त्यांना कोबी ह्मणजे सफरजंग नव्हे, हें समजतें बरें का. मग माझ्या अंगावर फाटक्या लक्तऱ्या असल्या, ह्मणून संपत्तीविषयीं मला बोलतां येऊं नये कीं काय? माझे हात रिकामे होते, त्याप्रमाणें माझें डोकें स्वस्थ नव्हतें, हें मी मघाशींच सांगितलें आहे. एखादा मेंढ्यांचा कळप दिवसभर चरतो व रात्रीं कोंडवाड्यांत कोंडला जातो. हें जसें एखादें चुकलेलें मेंढरूं टांचून पहात असतें, त्याप्रमाणें मी त्या पलीकडच्या कड्यावर आठवडेच्या आठवडे बसून, लाखों लोक कामांत कसे अगदीं गढून जात असत, तें पहात असें. काट्यांनीं अंगावरची लोंकर गमवून, परंतु स्वच्छंदपणानें वागल्यास चरायला किती मिळतें, ह्याचा चांगला अनुभव आल्यानें शहाणें होऊन चुकलेलें मेंढरूं परत कळपांत येतें, तद्वतच इतरांच्या संपत्तिरूप नकाशाचें मनन करून अंगभर लक्तऱ्या असल्या, तरी मींही संपत्तिमान् होण्याला उत्तम मार्ग कोणता, हें शोधून काढिलें आहे.

शेवटले शब्द बोलतांना त्यानें आपले हात पुढें केले; त्यावरून त्यानें असें दर्शविलें कीं, माझे हात हेच माझ्या संपत्तीचें साधन होत. नंतर जरासा लवून सलाम करून तो बोगद्याकडे आपलें नेमिलेलें काम करण्यासाठीं गेला. तो गेल्यावर **हारमसजी** व **वाडिया** ह्या उभयतांसही त्याजविषयीं नवल वाटून त्याची माहिती मिळविण्याविषयीं त्यांस साहजिक जिज्ञासा झाली.

---

## भाग ३.

### लहरीमुळें तोटा.

वाडिया लग्न करणार आहे, अशी अफवा उठली होती, ती खरी

होती. कांहीं दिवसांनीं तो दिसेना, तेव्हां त्याच्या नोकरानें लोकांस सांगावें कीं, शेटजी कांहीं कामासाठीं मुंबईस गेले आहेत. परंतु त्यावरून लोकांनीं सहज तर्क बांधिला कीं, तो एकटा परत येणार नाहीं. वाडियाच्या घरांतहीं कोच खुर्च्या वगैरे चांगलें सामान लावून तें सुरेख तयार केलें होतें, आणि घरापुढच्या बागेंतही बायमाणसांना फिरण्यासारख्या सोयी केल्या होत्या. तसेंच तबेल्यांत तट्टांची जोड व तांगा दिसूं लागला. ही तांग्याची चैन वाडियानें स्वतःसाठीं ह्मणून कधींही केली नव्हती.

एके रविवारीं प्रातःकाळीं हा तांगा जोडून वाडियाच्या दाराशीं उभा आहे, असें मंळीच्या नजरेस पडतांच त्यांना किंचित आश्चर्य वाटून आनंदही झाला. वाडिया मुंबईहून अदल्या रात्रीं परत घरीं आला, हें त्याच्या नोकराखेरीज कोणालाही माहीत नव्हतें. परंतु दाराशीं तांगा पहातांच मंडळींना सहज आठवण झाली कीं, आदल्या रात्रीं वाड़ियाचा नोकर घरांतील जागा व सामान वगैरे झाडून पुसून मोठ्या काळजीनें साफसूफ करीत होता. तांग्याभोंवतीं लोकांची दाटी होत आहे तों वाडिया आपली पत्नी गुलबाई हिचा हात धरून तांग्यांत बसण्यासाठीं बाहेर आला. गुलबाई अगदीं तरुण असून तिच्या एकंदर बांध्यावरून ती सुरेख असावी असें मंडळींना वाटलें; परंतु तिनें आपली मान खालीं घातल्यामुळें तिचा चेहरा त्यांच्या नजरेस पडला नाहीं. जमलेले लोक उभयतांना सलाम करीत होते, परंतु तिनें वर बघून त्यांचे सलाम घेतले देखील नाहींत. वाडियानें मात्र जवळच्या दोघां तिघांना 'कसें काय आहे' ह्मणून विचारून इतरांचे हंसत हंसत सलाम घेतले, व उशीर केल्यास ऊन होईल ह्मणून त्यानें लागलाच तांगा हांकला.

रस्त्यांतील वळणानें तांगा लोकांच्या रहदारीपासून आड गेल्यावर, गुलबाई एकदांची मान वर करून आजूबाजूला पाहूं लागली; तेव्हां तिचा नवरा दरी, डोंगर व झाडी ह्यांची शोभा तिला दाखवूं लागला. अशा प्रकारचीं रमणीय स्थानें पहाण्याची तिला फार आवड असे. ह्या तिच्या

गुणामुळें तिच्या कित्येक कोत्या समजुतीं आपण काढून टाकूं असें वाडियाला वाटत होतें. आपल्या योग्यतेच्या मंडळींत ती फार मनमिळाऊ असे; परंतु अशा लोकांतच तिचा बहुतेक काळ गेला असल्यामुळें वरच्या किंवा खालच्या पायरीच्या लोकांत मिसळण्याचा प्रसंग आल्यास ती भांबावून व त्रासून जात असे. माहेरीं असतांना तिच्या शेजारीं गरीब लोक असत, ते हिचा सुंदर पोषाख व रहाण्याचा डामडौल पहात; आणि हिचा तर स्वभाव असा कीं, त्यांच्याकडे हिनें ढुंकून पाहूं नये, मग त्यांशीं एकादा शब्द बोलण्याची तर गोष्ट लांब राहिली. ह्मणून जरी ती सढळ हातांनीं त्यांना धर्म करी, तरीही त्यांचा लोभ कांहीं तिच्यावर जडला नाहीं. परंतु ती गर्विष्ठ नव्हती, फक्त लाजाळू होती. हा तिचा स्वभाव तिच्या नवऱ्याला ठाऊक होता. त्याचा स्वभाव असा होता कीं, ज्यांच्या ज्यांच्याशीं ह्मणून वागण्याचा प्रसंग येईल त्यांशीं चांगल्या प्रकारें वागावें, ह्मणजे त्यांनीं आपल्याविषयीं वाईट ग्रह करूं नये, हें त्यास आवडे; व त्याप्रमाणें श्रीमंत असो अगर गरीब असो, त्यांच्याविषयीं त्यास चांगल्या प्रकारें माहिती असे. आपल्या मताला आपल्या बायकोचें मन वळवून तिला सर्वांशीं हळू हळू दळणवळण ठेवण्याची संवय लावून द्यावी, असें त्यांच्या मनांत होते. तिच्या लाजाळू व भितऱ्या स्वभावानें लोकांपेक्षां तिलाच अधिक त्रास होत असे; तें सारें घालविण्याचा त्याचा इरादा होता. गांव कशा चांगल्या जागीं वसलें आहे, वगैरे मोठ्या उत्सुकतेनें मान बाहेर काढून आपल्या नवऱ्याला ती बोलत होती; इतक्यांत त्यानें गाडी थांबवून रस्त्यावरून कोण जात होता, त्याला गांठून त्याशीं बोलण्याची सुरुवात केली. लागलेंच गुलबाईनें आपलें तोंड खालीं घालून दुसऱ्या बाजूस वळविलें; आणि ' हे माझे मित्र व शेजारी आदरजीशेट बरें का ' असें वाडियानें तिला सांगून त्याची ओळख करून दिली, तरी तिनें मुळीं देखील धीर धरून आनंद झाल्यासारखें दाखविलें नाहीं, कीं एक शब्द देखील

शिष्टसांप्रदायाप्रमाणें बोलली नाहीं. तिच्या नवऱ्यानें मात्र तिच्या तर्फे आदरजीला सांगितलें. ' उद्यां आह्मी आपल्या घरीं येऊं बरें. ' गुलबाईची वागणूक दुर्लक्ष्यपणाची दिसल्यावरून आदरजीनेंही फारसें न बोलतां केवळ शिष्टाचाराकरितां ह्मटलें 'बाई, वाटेंत प्रवासाची दगदग तर आपल्याला पडली नाहींना ? बरें आतां आपल्याला उशीर होईल, ह्मणून मी उगाच थांबवीत नाहीं; येतों साहेबजी. ' असें ह्मणून तो आपल्या मार्गानें चालता झाला. परंतु कर्मधर्मसंयोगानें असें झालें कीं, हे उभयतां फिरून गांवाच्या आमराईंत जाऊन थोडा वेळ विश्रांतीसाठीं ह्मणून एका खोंडावर बसतात, तों आदरजीही नेहमींप्रमाणें तेथें जाऊन पोंचला. तेथें दुसरी जागा बसण्याजोगी नव्हती, आणि हे ज्या झाडाखालीं बसले होते, तेथें एके बाजूस बसण्याचा आदरजीचा परिपाठ होता. तेव्हां ह्मातान्याला तकलीफ होऊं नये, ह्मणून वाडियानें त्याला जवळ बसविलें, त्यामुळें साहजिकच गुलबाईच्या शेजारीं त्याला मुकाट्यानें बसावें लागलें. परंतु त्याच्याशीं काय बोलावें किंवा त्याला वेड्यांत काढावें हेंच विचारीला उमजेना. त्यांतून ह्मातारबोवांनीं बसण्यापूर्वी चांगलीं दोन मिनिटें उभें राहून इकडे तिकडे शांतपणानें पाहून आपल्या ओळखीच्या एकादोघांला मोठ्यानें ओरडून कुशलक्षेम विचारिलें; तेव्हां अगोदर वयातीत आणि त्यांत लांब ऐकूं जाण्यासाठीं ओरडून बोलणें, त्यामुळें तर तिला कसेंसेंच वाटलें. त्याचा आवाज फुटून वयपरत्वें घोगरा झाला होता, परंतु इतक्या वयांतही तो केवढा मोठा आहे, हें पाहून ती चकित झाली. नंतर वरच्या वर खिशांतील तांबडा रेशमी रुमाल काढून कपाळावरचा व तोंडावरचा त्यानें घाम पुसला. ही त्याची वागणूक, व त्याच्या पायांतील तो भताडा जोडा, आणि पारशांच्या जुन्या तऱ्हेचा अंगावरील पोषाख, हें एकंदर पाहून तिला मोठें नवल वाटलें. शेंवटीं ती कंटाळून गेली आहे असें पाहून वाडिया परत जाण्यासाठीं गाडींत बसला, तेव्हां कायतो तिचा जीव खालीं बसला.

तांगा चालू झाल्यावर ती ह्मणाली—त्या आपल्या आदरजींनी एवढ्या मोठ्यानें घसा फोडून बोलूं नये, असें कोणी त्यांस सुचवील, तर फार बरें होईल.

**वाडिया**—ज्यांना त्याच्या बोलण्याची सवय झाली आहे, त्यांना त्यापासून कांहीं देखील त्रास होत नाहीं. मला वाटत. तुला आज कंटाळवाणें झालें आहे. त्याच्या ओरडण्याविषयीं मीं तुला पूर्वींच सुचवून ठेविलें असतें ह्मणजे तुला इतकें त्रासदायक झालें नसतें. परंतु तो अलगुज वाजवीत असतो, तें ऐकिलेंस ह्मणजे त्याच्या कर्कश आवाजाला तूं खात्रीनें दोष देणार नाहींस.

**गुलबाई**—ऐशीं वर्षांच्या ह्मातान्याला अलगुज वाजविण्याइतका दम छाटता यावा, हा मोठाच चमत्कार ह्मटला पाहिजे.

**वाडिया**—उद्यां आपण त्यांच्या येथें गेलों, ह्मणजे तूंच पाहशील कीं, त्याची प्रत्येक गोष्ट चमत्कार मानण्यासारखी आहे.

**गुलबाई**—जायचेंच, मग उद्यां तरी का? जितकें लौकर जाण्याचें होईल, त्याला माझी कांहीं ना नाहीं हो. झाल्यास आज सायंकाळींच जाऊं या.

**वाडिया**—तो आज अगदीं रात्र पडेपर्यंत घरीं असावयाचा नाहीं. त्यांतून त्याच्या घरचा दररोजचा क्रम कसा आहे, हें उद्यां गेल्यानें तुला कळून येणार आहे. आज आदितवारचा सुटीचा दिवस आहे, आणि तो आठवड्यांतून एवढी सुटी पाळतो. ह्मणून त्याची आजची पोषाखाची टापटीप पाहून त्याचा नेहमींचा अवतार तुझ्या लक्षांत येणार नाहीं.

**गुलबाई**—आजच ते इतर कोणाहीसारखे नाहींत असें मला वाटतें, मग ह्याहून आणखी उद्यां समक्ष भेटी अंतीं काय दिसेल, ह्याची बाई मला कल्पना देखील होत नाहीं. तें कांहींका असेना; पण बाई त्यांच्या चेहऱ्याकडे एकदांचें धीर धरून पाहिलें, तर त्यांची आनंदवृत्ति असावी असें मला वाटतें.

वाडिया–तुला त्या म्हाताऱ्याचा चेहरा आवडेल, असें मला वाटलेंच होतें.

गुलबाई–पण आज ते दुपारानंतर काय करीत असतील बरें ?

वाडिया–' आपल्या इच्छेनुरूप ईश्वराच्या कृती पाहून आनंद मानीत बसतों ' हेच त्याचे स्वतःचे शब्द आहेत. प्रातःकाळीं इतर लोकांप्रमाणें तो सहल करीत आमराईंत जाऊन मंडळींत थोडासा मिसळतो, आणि समाजाशीं एवढाच प्रत्यक्ष संबंध त्यानें कायतो अद्याप ठेविला आहे. पाऊस नसेल तर दुपारनंतर त्या पलीकडल्या डोंगरावर चढून अगदीं शिखरावर जातो; बरोबर सूक्ष्मदर्शक यंत्र व दुर्बीणही घेतो, आणि तेथें एखाद्या झाडाच्या छायेखालीं बसून जमिनीवरील लहानसान किडे, गवताचे तुरें व पानें येणेंप्रमाणें सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहतो. त्याचा कंटाळा आला, म्हणजे दुर्बिणीनें आसमंतांतील प्रदेश पहात बसतो, व मधून मधून ईश्वराच्या महिम्याचीं **कबीर, नरसी मेहता** ह्यांचीं पदें प्रेमानें म्हणतो.

गुलबाई–एकूण माणूस मोठा छान आहे. तर मग उद्यां खास जावयाचेंच बरें का ? त्यांना कंटाळा न येईल, तर बाई अशा माणसांच्या येथें वारंवार जावें.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ते उभयतां **आदरजीच्या** घरीं गेले. त्यावेळीं तो बागेंत काम करीत होता. परंतु त्याचा एकंदर अवतार असा होता कीं, तो अशा सुरेख जागेचा मालक आहे असें कोणास देखील वाटलें नसतें; उलट तो अगदीं गरीब मजूर आहे, असें वाटतें. डोक्याला ऊन लागूं नये, म्हणून टोपीवरून त्यानें एक खादीचा रुमाल गुंडाळला होता. त्याच्या अंगांत डगला होता, त्यावर माती पडून तो मळून गेला होता. **गुलबाई** व **चमनजी** हे आले असें पाहून, त्यानें हातांतील काम ठेवून ' यावें, यावें ' असें म्हणून त्यांचें स्वागत केलें. **माणेकबाई** ही कांहीं पुढें आली नाहीं, कारण ती म्हणे ' बोलावलें कीं, यजमानापुढें जायाला रगड वेळ असतो; मग उगाच लुब्रेपणा पाहिजे तो कशाला ?'

डोंगर चढल्यानें गुलबाईस थकवा आला नव्हता; त्यांतून झातारबुवांना इतर ठिकाणापेक्षां बागेंत असल्यानें बरें वाटतें असें तिच्या लक्षांत आलें; ह्मणून तिनें ह्मटलें ' शेटजी ह्या बागेची रचना आपण कशी केली आहे, व तिची मशागत आपण कशी ठेवितां, हें मला सांगाल काय ?' आदरजीनें लागलेंच बागभर हिंडून कोठें काय आहे तें सर्व दाखविलें. इतर बाग तिच्या पाहण्यांत होते, त्यांसारखा कांहीं हा बाग नव्हता; कारण ह्या बागेंत जंगलाचा देखावा होता, त्यांत लागवड ही फारशी नव्हती व बऱ्याच भागांत पुष्कळ नासधूळ होत होती. त्या बागेचे तीन स्वतंत्र भाग होते. एक अर्धामुर्धा फळबाग होता. त्यांत पुष्कळ फळझाडें व इतर झाडेंही होतीं. मधून मधून जमिनीवर निळंबीचीं फुलें मजेदार दिसत होतीं, आणि ठिकठिकाणच्या वाटांवर हरळी लावून दोन्ही बाजूंस फळझाडें होतीं त्यांची गर्द छाया पडलेली होती. दुसरा भाग मळ्यासारखा होता; त्यांत बटाटे, कांदे, कोबी व इतर भाज्या लाविल्या होत्या. तिसरा भाग मात्र खरोखरी बागेसारखा रमणीय व बायामाणसांस फिरण्यासवरण्याला चांगला असा होता. इतर भागांपेक्षां त्याची मशागत विशेष घेतली जात असे असें दिसे; आणि झाताऱ्यालाही ह्या बाजूच्या बागेबद्दल मोठा अभिमान असे. हा भाग दक्षिणेकडे थोडा उतरत गेला होता, परंतु बागेभोंवती निवडुंगाचें असें दाट व उंच कुंपण होतें कीं, पायाच्या आंगठ्यावर उभे राहूनही आंतील भाग दिसण्यासारखा नव्हता, व आंत जाण्याची वाटही सहसा सांपडण्यासारखी नव्हती. बागेंत शिरतांना एका बाजूस हरळीचा वाफा होता त्याच्या मधोमध विहीर होती; ही जागा फारच रमणीय होती. दक्षिणेकडील उतारावर करवंदाचे व फालशाचे तक्के असून तक्क्यासभोंवती मोगरा, गुलाब वगैरे फुलझाडें होतीं.

आदरजी ह्या भागांतून जात असतां ह्मणाला—फळबागेंतील गवतावरून जाण्यापेक्षां ह्या वाटांवर चांगली वाळू पसरली असल्यानें तेथें

आपल्यासारख्या सुकुमार स्त्रियांना चालण्याला बरें तर खरें; पण फळबागेंत गवत फार उगवलें, तें एक वेळ मला कापून काढिलें पाहिजे.

गुलबाई.—तुह्मी कोणाला देखील मदत देऊं देत नाहीं, त्यामुळें कोणतें काम प्रथम करूं लागावें, ह्याविषयीं तुह्मी कधीं कधीं बुचककळ्यांत पडत असाल, नाहीं बरें?

आदरजी—बाई, तुह्मी ह्मणतां तसेंच मला होतें, ह्मणजे जसें एकाद्या थोरल्या बायकोला काय करूं आणि काय न करूं असें होतें, तशीच माझी गत होते. परंतु आवडत्या कामांपैकींच एखादें पसंत करण्याचें असतें, म्हणून फारसें नुकसान नाहीं. ह्यापेक्षां त्रासदायक विवंचनांचा व्याप मनुष्याच्या पाठीस नसता, तर खरोखर हें जगत् फार सुखी असतें.

गुलबाई—जशी आपल्यास सहज मदत मिळण्यासारखी आहे, तशी थोरल्या बाईला मिळण्याची सवड असल्यास ती घेतल्यावांचून राहणार नाहीं. तिनें एकीला झाडांच्या वेड्या वांकड्या फांद्या सारख्या खुरपून साफ करायला सांगितल्या असत्या. दुसरीला खालीं पडलेला वाळलेला पाला काढून टाकण्यास लाविलें असतें; आणि तिसरीला लहान रोपांना पाणी पाजण्यास सांगून, स्वतः गुलाब, मोतिया वगैरे फुलांच्या ताटव्यांत काम केलें असतें.

आदरजी—लोक श्रम एकत्र करूं लागल्यानें जी नुकसान होते ती जर तिला समजूं लागेल, तर ती कधींही अशी मदत घेणार नाहीं. प्रत्येकाचें हिताहित निरनिराळें राखिल्यानें समाजांत शांतता व प्रामाणिकपणा राहूं शकतो. ( वाडियाकडे वळून ) शेटजी, काय सांगूं? माझी जेव्हां जेव्हां म्हणून तुमच्या कारखान्याकडे नजर जाते, तेव्हां तेव्हां मी मनाशीं असें म्हणतों कीं, देवा, मी आहें, त्याच ठिकाणीं जन्मभर राहीन, फक्त मला ह्या झोंपडीपैकीं एक खोली व हल्लींच्या बागेच्या दशांश जमीन इतकी असली म्हणजे पुरे; मग मला तुमच्यासारखें

रंग दिलेलें सुरेख घर नको, किंवा हाताखालीं तीनशें मजूर लोक नकोत.

हें ऐकून वाडियाचा किंचित हंसला, व बोलण्याचा ओघ फिरवावा असें त्याच्या मनांत आलें; कारण आदरजीच्या मनापासून एकांतवासाची आवड, त्याशीं समाजापासून काय काय फायदे होतात ह्याचा वादविवाद करून कांहीं अर्थ नव्हता हें तो जाणून होता. परंतु त्याच्या बायकोची जिज्ञासा आणि त्या ह्यातार्‍याला अशा विषयाची आवड, ह्या दोहोंमुळें पुनः लागलेंच त्यांचें बोलणें त्या विषयाकडे वळलें.

गुलबाई—आमच्या त्या कारखान्यांत असें काय आढळून आलें कीं, त्यामुळें ह्मणजे तुह्माला अगदीं मनापासून तिटकारा यावा, हें तरी मला सांगाल का?

ह्यापेक्षां आवडीचा असा प्रश्न त्याला कधींही झाला नसता, ह्मणून तो हौसेनें सांगूं लागला—गुलबाई, तुह्मीच पहा कीं, लोखंडाच्या कारखान्याचा तो घाणेरडा व ओंगळवाणा धूर, ती झोंपड्यांची रांग, ते कोळपलेले कोळशांचे ढीग, आणि एकंदर कारखान्याचा देखावा, ह्यापेक्षां ह्या जागेचें पूर्वीं जें सृष्टिसौंदर्य होतें तें उगाच नष्ट करून टाकल्यानें नुकसान झालें, असें जो म्हणून रसिक आहे त्यास वाटल्याखेरीज राहील काय?

गुलबाईस हें म्हणणें सर्वांशीं मान्य झालें नाहीं. ती म्हणाली—कारखान्यानें नैसर्गिक सृष्टीची नासधूस झाली असा आपला भावार्थ आहे, परंतु ही नासधूस ह्मणतां येत नाहीं, आतांही गोष्ट खरी आहे कीं, कोळपलेल्या कोळशांच्या ढिगापेक्षां इतक्या लांबून तेथील पूर्वींची राई फार मजेदार दिसली असती; त्याचप्रमाणें धुराच्या लोटापेक्षां डोंगरावरून पाणी पडत असतें तो देखावाही अधिक रमणीय. परंतु अशा कारखान्यांतही एका प्रकारचें सौंदर्य असतें आणि मी म्हणते त्याची खात्री ही तुम्हाला होईल; मात्र तुम्हीं एकदां आमच्या बरोबर खालीं येऊन सर्व कारखाना नीट पाहिला पाहिजे. अशा कारखान्यांत पहिल्या प्रथम यंत्रें चालतात, त्यांचा एक

मजा पहाण्यासारखी असते. माणसें युक्तिप्रयुक्तींनीं नैसर्गिक शक्ति आपल्या कबजांत आणून त्यांचा उपयोग आपल्या कामीं कसा करितात, हें पाहिल्यानें देखील एकप्रकारें आनंद वाटून अभिमान उत्पन्न होतो. वायु व अग्नि ह्यांच्या सहाय्यानें भट्टींत लोखंडावर अशा प्रकारें परिणाम घडवायाचा कीं, त्यामुळें लोखंडाचा शुद्ध रस खालीं सांच्यांत जाऊन पडतो; तसेंच वाफ लावून लोखंडासारखा पदार्थ रुळाखालीं त्यावयाचा आणि जणू हें लोखंड नसून कुंभारमातीच आहे त्याप्रमाणें तें तेथें दाबून व त्यास वाटेल तसा आकार देऊन लांकडाप्रमाणें पाहिजे तसे तुकडे पाडावयाचे, ह्या कृतींत ही रसिकता कोणास दिसणार नाहीं?

आदरजीनें मान हलवून म्हटलें—बाई, तुम्ही किती कां म्हणाना? पण हा सारा कृत्रिम खेळ आहे, आणि असल्या कृत्रिम गोष्टी आपल्याला बोवा आवडत नाहींत. मला एवढें कबूल आहे कीं, ह्या कृतींत मनुष्य व नैसर्गिक शक्ति ह्या उभयतांचें कार्य सारखें आहे. परंतु हें लक्षांत ठेविलेंच पाहिजे कीं, त्या नैसर्गिक शक्तींचा दुसरा परिणाम तितका हितावह नाहीं. तो परिणाम मनुष्यांच्या मनावर होतो. तो असा कीं, माणसें लोभी, कपटी, व मत्सरी होतात.

गुलबाई—मी यथांशीं बोललें त्यापेक्षांही चांगली अशी मजा ह्या कारखान्यासंबंधीं मला सांगायाची आहेच. ती ही कीं, पुष्कळ जणांना भरपूर काम असून ते स्वतःसाठीं व एकमेकांसाठीं सुखोपभोगाच्या गोष्टी प्राप्त करून घेतात. ह्याहून अधिक समाधान मानण्यासारखें दुसरें कांहीं देखील नाहीं असें मला खास वाटतें. स्वतःला घाम सोशिल्याखेरीज जर पैका मिळूं लागेल, तर लोक अधिक लोभी होतील; परंतु तेंच जर त्यांना जशी गरज पडेल त्याप्रमाणें ते पैसा श्रमानें मिळवूं लागतील, तर तितका अनिष्ट प्रकार घडणार नाहीं. कारण श्रम करून पैसे मिळवितांना जो उत्साह असतो, तो सर्व अनायासें द्रव्य मिळूं लागल्यास साहजिक पैशावरच लोलुप होऊन बसेल. जेथें प्रत्येकाला नेमि-

लेलें काम आहे, व कामाच्या मानानें योग्य मोबदला मिळत आहे, तेथें कपटी किंवा मत्सरी होण्याला विशेष कांहीं सवड असते, असें निदान मला तरी ठाऊक नाहीं. पण त्या उलट मात्र प्रकार होतो, असें मला वाटतें.

**आदरजी**—व्यापारधंद्यांतील लबाड्या मी पाहून पाहून थकलों आहें, म्हणून मला नका उगीच सांगत बसूं.

**वाडिया**—तुमचें तसें मत होण्याला तशींच कांहीं कारणें आहेत, हें मला ठाऊक आहे; परंतु अशा प्रकारें उद्योगधंद्यांत सर्व ठिकाणीं लबाड्या होतात असें मात्र त्यावरून होत नाहीं. जगाला कंटाळून एकांतवासासाठीं तुम्हाला असें रमणीय स्थान मिळालें आहे, त्याप्रमाणें म्हणजे प्रत्यकाला तशा प्रसगीं असें स्थान हटकून मिळेलच,हें अनुमान खरें ठरणार नाहीं. तसेंच तुमच्या स्वतःच्या उदाहरणावरून सर्व धंद्यांत लबाड्या होतात, हेंही अनुमान चुकीचें होईल. परंतु ती म्हणत होतों त्यापेक्षां आणखी मला हें सांगावयाचें आहे कीं, यांत्रिक युक्त्यांत जी गम्मत आहे तशाच प्रकारची मौज, समाजरचना व समाजाचा व्यापार हीं लक्ष पूर्वक पाहिल्यानें दिसून येईल.

**आदरजी**—ह्मणजे तुह्मी मालक आहां, आणि तुमच्या ताब्यांत गुलामांच्या टोळ्या आहेत, त्या पाहण्याची तुह्माला हौस आहे.

ह्मातार्‍याचें हें बोलणें लागण्यासारखें होतें, तरी तिकडे दुर्लक्ष करून **वाडिया** सौम्यपणानें ह्मणाला—असेंच कांहीं ह्मणतां येत नाहीं. आमच्या येथें कोणत्याही प्रकारची गुलामगिरी किंवा लोकांवर जुलूम नाहीं, निदान असल्याचें मला माहीत नाहीं. मालक व नोकर उभयतां परस्परांस कामीं पडावें, अशा समजुतीवर व्यवहार करीत असतात, आणि त्यांनीं आरंभिलेल्या कार्यास यश येण्यासाठीं उभयतांनींही सारखेंच झटलें पाहिजे.

**आदरजी**—आतां एक तुमच्या धंद्याला तेजी आहे, ह्मणून तुह्मी

ह्मणतां असें असेल. त्यांतून मजूरी मिळणें कठीण झालें आहे व तुह्मी लोकांना चांगली मजुरी देतां. परंतु ह्याप्रमाणें तुमचे लोक नेहमींच संतुष्ट राहतील असें मात्र समजूं नका. कारण जेव्हां व्यापार मंदावेल व तुह्माला मजूरांचे दर उतरावे लागतील, तेव्हां आपण गुलाम आहों असें त्या लोकांना चटकन कळून येईल.

वाडियानें उत्तर दिलें—असें कधींही होणार नाहीं; कारण धनी व गुलाम ह्या उभयतांचें हित एक होऊं शकत नाहीं. तशी गोष्ट भांडवलवाला व स्वतंत्र श्रमकार अथवा मजूर ह्यांची नाहीं. आपला धनी भांडवलाचा विनियोग फायदेशीर करितो कीं नाहीं, ह्याची गुलामाला दिक्कत नसते, परंतु भांडवल कुजूं न देतां अधिक फायदेशीर रीतीनें उपयोगांत आणणें ह्या गोष्टींत स्वतंत्र मजूर व त्याचा धनी ह्या उभयतांचें एक लक्ष असतें. आमचा धंदा जितका फायदेशीर करवेल, तितका करण्यांत आमचें व आमच्या लोकांचें सारखें हित आहे. जितकें काम कारखान्यांतून निघेळ तितकें काढणें, काम अधिक निघण्यासाठीं यंत्रांत दिवसेंदिवस सुधारणा करण्याचा यत्न करणें, श्रम होतां होईल तों फुकट न जाण्यासाठीं श्रमविभाग चांगल्या धोरणावर करणें, आणि लोखंड तयार करतांना होणाऱ्या सर्व क्रिया उत्तरोत्तर सुधारणें, ह्या सर्व बाबींतही त्यांचें व आमचें एकच मत होईल. ह्मणून आमच्या लोकांपैकीं ज्यांना ह्मणून स्वहित समजतें, ते सर्व आपलें काम व कौशल्य सुधारतात; परंतु तेच जर गुलामगिरींत असते तर त्यांचें हिताहित त्यांच्या स्वतःच्या उद्योगावर अवलंबून राहतें ना, आणि त्यामुळें ते साहजिकच आळशी व निष्काळजी बनले असते. अशा स्थितींत मात्र जसा तुह्माला आमचा कारखाना पाहून कंटाळा उत्पन्न होतो, तसाच मला देखील आला असता. पण मला वाटतें तशा स्थितींत आमच्याही हा कारखानाच अस्तित्वांत आला नसता.

आदमजी—माझें पुष्कळ शेट्यांशी बोलणें झालें आहे. त्यांच्या

गिरण्या आहेतच,परंतु तुमच्यासारखें त्यांनी कधीं देखील मला तर सांगितलें नाहीं कीं, आह्मी व आमचे लोक ह्यांच्यां हितांत भिन्नत्व नाहीं.

**वाडिया**—ह्याचेंच तर मला नवल वाटतें, कारण ही गोष्ट अगदीं उघड समजण्यासारखी आहे. कोणताही माल उत्पन्न करतांना किती प्रकारचे लोक लागतात, ह्मणून तुह्माला वाटतें?

**आदरजीनें**—हंसून स्वतःकडेच बोट दाखविलें. आणि नंतर किंचित गर्वानें तो इकडे तिकडे पाहूं लागला.

**वाडिया** ह्मणाला—हं, तुमची गोष्ट राहूं द्या. श्रमकार व भांडवलवाला हीं दोन्हीं नातीं तुमच्यांत आहेत. पण तुमच्यासारखा प्रकार क्वचित्च आढळतो, ही समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे, असें मी ह्मणतों.

**आदरजी**—असें तुह्मी कां ह्मणतां?

**वाडिया**—कारण आजपर्यंत सार्‍यांनींच जर तुमचा कित्ता उचलला असता, तर कोणत्याच प्रकारचा कारखाना अगर धंदा किंवा हा लोखंडाचा कारखाना हें कांहीं एक निघालें नसतें, आणि हल्लींच्या मानानें लोकांची रहाणी अगदीं जंगली असती. आयुष्याचा उपभोग घेण्याकरितां फारच थोडे निपजले असते. तुह्मा स्वतःलाच किती तरी आपदा पडली असती? तुमच्यापाशीं खोरें नसतें, किंवा कोयता नसता, विहिरींतून पाणी काढायाला डोल नसता, डोलाला दोर किंवा साखळदंड नसता, जामेजमशीद पत्र नसतें कीं कांहीं नसतें. भांडवलवाले व श्रमकार ह्यांच्या सहकार्यानें जर तुह्मास हीं व दुसरीं अशींच कित्येक सुखें मिळतात, तर अशा सहकार्याला तुच्छ लेखणें हें चांगलें काय?

**आदरजी**—अरें, तुह्मी ह्मणतां तसें कां होईना? पण कोणताही माल उत्पन्न करणारांचे किती वर्ग असतात, ह्मणून तुह्माला वाटतें?

**वाडिया**—माल तयार करणारांचे मीं सांगितलेले दोनच वर्ग आहेत. माल तयार करतांना त्या दोघांचीही सारखीच आवश्यकता असल्यानें त्या प्रत्येकाची दुसर्‍याच्या मानानें काय योग्यता आहे असा प्रश्न कधींही बरोबर नाहीं.

गुलबाई—मला वाटतें भांडवलापेक्षां श्रमाची योग्यता अधिक आहे, कारण पहिल्या प्रथम श्रमाचा उपयोग झाला असेल. श्रमानेंच पहिला माल मिळाला असेल व श्रमानेंच पहिलें यंत्र झालें असेल.

वाडिया—असें तर खरेंच. श्रमामुळेंच भांडवलाची उत्पत्ति; परंतु श्रमालाही भांडवलाची मदत होते, व भांडवलामुळें त्याची शक्ति वाढते, ती इतकी कीं, श्रमामुळें काय काय व किती किती उत्पन्न होईल ह्याची कांहीं अटकळ देखील करितां येत नाहीं. ज्याप्रमाणें आह्मांला आमच्या लोकांच्या श्रमाखेरीज लोखंडाचा व्यापार चालवितां येणार नाहीं, त्याचप्रमाणें त्यांनाही कारखान्यांतील यंत्रें, भट्टी, साळी ह्यांच्या सहाय्याखेरीज लोखंडाच्या कांबीचे भारे दूर देशीं पाठवितां येणार नाहींत.

गुलबाई—तर मग जितपत भांडवल मौल्यवान असेल तशा मानानें अधिक माल तयार होईल. यंत्रें जितकीं उत्तम असतील तितकें श्रमकारांना बरेंच. परंतु असा कांहीं सगळ्यांचा ग्रह नाहीं.

वाडिया—कारण जे यंत्राचा उपयोग करूं नये ह्मणून ह्मणतात, त्यांना यंत्रांचें खरें स्वरूप अथवा खरें कार्य कळत नाहीं. यंत्रानें पुष्कळ लोकांचें काम होतें, किंवा एका मनुष्याला जें काम करण्याला पुष्कळ काळ लागेल तें काम त्यानें थोड्या वेळांत होतें; ह्मणजे अर्थ इतकाच कीं, यंत्र हें सांठवून ठेविलेले श्रम होय.. मनुष्यांचे श्रम लावून शिवाय यंत्र चालू करून अतिशायितच उत्पन्न होतें; ह्याप्रमाणें भांडवलवाल्याला जास्त नफा होऊं लागला, ह्मणजे तो अधिक अधिक नफा मिळविण्यासाठीं अधिक अधिक श्रम लावितो, आणि त्यामुळें साहजिकच उत्तरोत्तर सुधारणा होत जाते.

आदरजी—ह्याला देखील कांहीं अडचणी आहेतच. जास्त माल झाल्यास खपही मंदावेल, हें विसरूं नका, बरें का?

वाडिया—हा अनिष्ट प्रकार फार वेळ टिकत नाहीं. कारण बाजा-

रांत माल पुष्कळ झाला, ह्मणजे त्या मालाचा भाव उतरतो. आणि बाजारभाव उतरला कीं, तो माल पूर्वी ज्यांनीं घेतला नसेल तेही घेऊं लागतात. ह्याप्रमाणें त्या मालाला तेजी येते. ह्याचें एक उदाहरण घेऊं. असें पहा कीं, छापण्याची व कागद तयार करण्याची ह्या कला आज माहीत नसत्या, तर वर्तमानपत्रें असतींना; बरें जर कागदाचीं व छापण्याचीं यंत्रें अपूर्ण दशेंत असतीं. तर श्रीमंतांखेरीज इतरांना वर्तमानपत्रें घेतां आलीं नसतीं; कारण तीं तितकीं महाग विकलीं जातीं. परंतु त्या दोन्ही कलांमुळें उत्पन्न होणारे माल पुष्कळच आहेत, ह्मणजे साहजिकच ते स्वस्त आहेत, त्यामुळें साधारण प्रतींच्या लोकांच्या हातींही आपण वर्तमानपत्रें पहातों. वर्तमानपत्रें उत्पन्न होण्यास टपालखर्च कोणत्याही प्रकारें कारणीभूत नाहीं हें खरें, तथापि तोच जर *टपालखर्च किंचित कमी होईल तर खेड्यापाड्यांत देखील पुष्कळ घरीं वर्तमानपत्रें दृष्टीस पडतील. ह्यावरून छापखान्याचे मालक व छापखान्यांत काम करणारे मजूर लोक ह्या दोघांचेही सामान्य लोकांवर सारखेच उपकार आहेत. छापखानेवाल्यांच्या भांडवलामुळें छापखान्यांत मजूर लोक काम करितात, आणि मजुरांच्या श्रमामुळें छापखानेवाल्यांचे छापखाने चालू राहतात, ह्यांत दोघेही एकमेकांवर अवलंबून आहेतच. ह्मणजे श्रम व भांडवल ह्यांच्या सहकार्यानें सर्वांस फायदा होतो.

**आदरजी**–परवां माझ्या हातून एक गोष्ट होत होती. ती झाली असती, तर तुमच्या ह्या विचारांचेंच अनुकरण मीं केलें, असें तुम्हांला वाटलें असतें. ह्या डोंगरावर एक मनुष्य रिकामा भटकत असतांना पाहिला.–

**वाडिया**–त्याचें नांव **पांडोबा** कीं काय ?

**आदरजी**–मीं नांव नाहीं विचारिलें; परंतु तो भिकाऱ्यासारखा होता.

---

* आनंदाची गोष्ट ही कीं, **वाडियां**च्या ह्या सुचनेचा विचार **हिंदुस्तान** सरकारानें पुढें थोड्याच दिवसांनीं केला.

त्याच्या अंगावर चिंध्या होत्या; आणि तो प्रहरनूप्रहर खालीं आपल्या कारखान्यांत काय होतें हें पहात बसे. तेव्हां मला असें खास वाटूं लागलें कीं, तुमच्या कारखान्याविषयीं त्याचें देखील मत माझ्यासारखेंच आहे. ह्मणून त्याचें बरें करावें, असें माझ्या मनांत फार येऊं लागलें.

**वाडिया**—तो श्रम करीत नसे, व जवळ भांडवलही नव्हतें, ह्मणून कां तो तुम्हाला आवडूं लागला?

**आदरजी** हंसत म्हणाला—असेंच कांहीं ह्मणतां येत नाहीं, कारण गरिबांनीं भिक्षा पत्करावी हें मला खपत नाहीं. माझ्या बागेंत त्यानें मदत देऊं लागावें,ह्मणून मी त्याला बोलणार होतों,तों त्याला तुमच्या पोळ्यांत एक कोंपरा मिळाला असें मला समजलें. तेव्हां मला फार वाईट वाटलें.

**वाडिया**—तें कां ह्मणून? मधमाशांच्या नरासारखा फुकटखाऊपणा टाकून देऊन तो मधमाशीप्रमाणें श्रम करूं लागला म्हणून, किंवा बागेची मशागत ठेवण्याचें सारें तुमच्यावर टाकन दिलें म्हणून?

**आदरजी**—माझ्या कामापुरते माझे हात पूर्वी देखील खंबीर होते, व हल्लीं देखील आहेत. त्याची काळजी नको. मला वाईट तें असें वाटलें कीं, त्यानें आपलें स्वातंत्र्य गमाविलें, आणि त्याचा तर हाच गुण मला फार आवडत असे.

**वाडिया**—पण त्याच्या लकतऱ्या जाऊन अंगावर चांगले कपडे आले, वरती आकाश व खालीं जमीन त्याऐवजीं त्याच्या देहाला चांगलें लहानसें घर रहायाला मिळालें, आणि फावल्या वेळीं त्याच्या ईच्छेनुरूप आवडता ग्रंथ किंवा आवडत्या फुलझाडांचे कुंडे त्याला मिळून त्याच्या पोकाम व्यत्यय न आला, म्हणजे तर तुम्हाला त्याविषयीं वाईट वाटणार नाहींना? एकंदरींत पांडोबा मोठा विलक्षण मनुष्य आहे. मी म्हणतों त्याप्रमाणें तो लौकरच सुखासमाधानांत दिवस काढील; अशी त्याला स्थिति येईल, कारण तो मनापासून व मेहनत घेऊन काम करीत असतो. आणि मला तर वाटतें कीं, तुमच्यापेक्षां त्याची स्वतंत्रतेविषयीं कल्पना फार निराळी आहे.

आपली स्वातंत्र्याची आवड कशा प्रकारची आहे, ह्याचें खरें स्वरूप गुलबाईस करून यावें ह्मणून आदरजी तिला व तिच्या नवऱ्याला घरांत घेऊन गेला. आपली स्वतःची बरदास्त आपण कशा प्रकारें ठेवितों, आपलीं कामें आपण कशीं करतों, व फावल्या वेळीं काम काढून अगर करमणूक करून कशी घेतों, हें सर्व त्यानें तिला नीट समजावून सांगितलें. मासे धरायाचें जाळें, बंदूक, अलगुज वगैरे त्याच्या जिनसांची तिनें बरीच स्तुति केली, परंतु तेवढ्यानें ह्यातार्‍याची शांति होईना. आपल्या रहाणी सारखी सुरक्षित रहाणी नाहीं, व तींतच खरी शांति व समाधान आहे हें तिनें कबूल करावें, असें ह्यातार्‍याच्या मनांत होतें. जिच्या नवऱ्याचे व्यासंग निराळ्या प्रकारचे होते, अशा तरुण स्त्रियेनें ही गोष्ट सहसा कबूल केली नसती, व तिनें कबूल करावी अशी इच्छा करणें ही जरा अविचाराचें होतें. ह्या संबंधांत तिला त्याचें मन राखतां येईना. इतक्यांत माणकबाई तेथें आली, तेव्हां गुलबाईला चुकल्या-चुकल्यासारखें वाटूं लागलें; परंतु आपला लाजाळूपणा विसरण्याचा निश्चय करून ती माणकबाईशी गोड वाटेल असें बोलूं लागली. कांहीं वेळानें उशीर झाला असें पाहून उभयतां निरोप घेऊन परत घरीं गेले. जातांना त्या दोघांनींही अगदीं मनापासून म्हटलें 'शेटजी आतां आह्मी येतों; परंतु आमची ही फार फार इच्छा आहे कीं, आपल्या रहाणीच्या क्रमांत कधीं ह्मणून विघ्न येऊं नये, किंवा तिच्या शांतपणांत भंग होऊं नये. हें बोलतांना पुढें लौकरच काय होणार होतें, त्याची त्यांना कल्पना देखील नव्हती; फार तर काय, पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं हीं नवराबायको आपल्या घरीं बसून न्याहारी करीत असतां ह्यातार्‍याच्या आवडत्या मताविषयीं बोलत होतीं, त्या वेळीं त्याचा निर्धास्तपणा समूळ नाहींसा होण्यासारखें थोड्या वेळेपूर्वीं झालें होतें, हें देखील त्यांना माहीत नव्हतें.

भेटायाला आलेली मंडळी अगदीं तिनी सांजेस निघाली.

आदरजी त्यांना बाहेर पायऱ्यापर्यंत पोंचविण्यास गेला, आणि ते डोंगरावरून वळणें घेऊन खालीं पायथ्याला जाऊन पोंचेपर्यंत तो त्यांना पहात तेथें उभा राहिला. ते दिसेनासे झाल्यावर त्याला आठवण झाली कीं, कांहीं आवडत्या रोपांना पाणी देण्याचें राहिलें आहे; ह्मणून तो लागलाच त्या कामाला लागला. पाणी देणें झाल्यावर त्यानें डोल ठिकाणीं ठेविला, व खोरें, कोयता वगैरे आऊतें जेथल्या तेथें ठेविलीं. नंतर फाटक लाविलें आहे असें पाहून तो त्यावर टेकून उभा राहिला, आणि अगदीं काळोख होईपर्यंत जवळच्या ओढ्याचा खळखळ आवाज ऐकत व आकाशाचा रंग पालटत जाऊन तें कसें दिसेनासें होतें तें पहात तो तेथेंच होता. थोड्या वेळेपूर्वीं बोलणें झालें होतें, त्याच स्वरूपाचे त्याच्या मनांत ह्यावेळीं विचार घोळत होते. तो असा विचार करूं लागला, ‘ संपत्ति सांठविण्यापेक्षां ईश्वरी सृष्टीचें अवलोकन करणें व तिजविषयीं प्रीति धरणें हें विशेष आनंददायी आहे. ही गोष्ट तर निर्विवाद आहे, परंतु मला जो तो उठल्या बसल्या विचारितो कीं, तुमच्या मोहरांचा तुह्माला उपयोग काय? ह्या प्रश्नाची वाट काय? माझ्या साध्या गरजा भागविण्या इतकें मला ईश्वरानें दिलें आहे, त्याबद्दल मी त्याचा आभारी आहें; परंतु त्या संपत्तीचा मला उपयोग नाहीं. तिचा उपयोग मीं दुसऱ्यांच्या कल्याणासाठीं केल्यास काय वावगें आहे? त्यांतून संपत्तीची मूळ किंमत कमी न होतां तिचा उपयोग करितां येईल; ह्मणजे असें कीं, ती गुप्तपणें राखून न ठेवितां व्याज उत्पन्न होईल अशा रीतीनें बाहेर काढितां येईल. अशा मार्गानें तिचा उपयोग होतो, तर मग काय चिंता आहे? बरें, किती गरीब लोकांना ददात असते? अशा स्थितींत पैसा सांठवून ठेवावा, हें तरी मला योग्य आहे काय? किती लोक आपलें भांडवल फायदेशीर रीतीनें कामीं लावितात, तर मग असें कांहीं भांडवल उगाच पडून रहावें हें तरी बरें काय?’ जगन्नियंत्याचे मनुष्यावर किती उपकार आहेत, त्यांचें मनन

करून तद्वत् अनुकरण करावें हेंच धर्माचें मुख्य अंग समजलें पाहिजे, आणि असें अनुकरण करण्याचा यत्न करणें ह्यानें धार्मिक बुद्धि व्यक्त होते; म्हणून वर सांगितलेले **आदरजीचे** विचार त्याच्या धार्मिकपणा-चेच द्योतक आहेत.

काळोख पडून दिसेनासें झालें तेव्हां **आदरजी** घरांत गेला. परंतु त्याचें मन ह्या विचारांत इतकें गढून गेलें होतें कीं, त्याचें लक्ष नेहमीं-प्रमाणें **जामीजमशीद** वाचण्याकडे लागेना. तेव्हां तो शतपावली करूं लागला, नंतर कांहीं वेळ त्यानें अलगुज वाजविला, मग घड्याळाला किल्ली दिली, शेवटीं भेटायाला मंडळी आली होती त्यामुळें फार दगदग पडून थकून गेलों असेन, असें वाटून तो बिछान्यावर पडला. परंतु त्याचा डोळा लागलाच लागला नाहीं. **माणकबाई** कशीदा काढीत एकटी बसली असतां कांहीं गाणी स्वतःशींच गुणगुणत असे; त्याप्रमाणें एव्हां ती गुणगुणत होती; नंतर दारें व खिडक्या लाविलेल्या आहेत किंवा कसें हें तिनें पाहिलें, आणि मग दिवे मालवून ती आपल्या खोलींत गेली व तेथें नेहमींप्रमाणें तिनें दाराला आंतून अडसर घातला. ही सर्व हालचाल तो ऐकत होता. ह्या झोंपडीच्या मालकाला आपल्या सुरक्षितपणाची मोठी घमेंड होती, तरी देखील ज्याप्रमाणें मुंबईच्या एखाद्या धनाढ्य व्यापाऱ्याला आपल्या मालमत्तेचा बंदोबस्त ठेवावा लागत असे त्याप्रमाणें यालाही बंदोबस्त करावा लागे. मात्र ह्या बंदोबस्ताची आवश्यकता नव्हती असें नाहीं.

नंतर सुमारें तीन तासांनीं, **आदरजीला** गाढ झोंप लागली होती, अशा वेळीं त्याला वाईट स्वप्न पडूं लागलें. त्यांत त्याला चमत्कारिक आवाज ऐकूं येऊं लागले, व ते लोखंडाच्या कारखान्यांतील पंपांचे आहेत असें त्याला भासलें. नंतर भट्टींतून गरम वारा न येतां थंडगार वाऱ्याचा सोसाटा आपल्या अंगाला लागत आहे, असें त्याला वाटलें. हें स्वप्न किती वेळ तरी चाललें आहे असा त्याला भास होत होता, परंतु वास्त-

विक पहातां ह्या सर्व कल्पना त्याच्या डोक्यांत थोड्या पळांतच येऊन गेल्या. शेवटीं त्याच्या खोलींतील जाळीच्या खिडकीचा करकर आवाज व खिडकी उघडल्यानें अंगावर आलेला थंडगार वारा ह्यामुळें तो खडखडीत जागा झाला. तो चट्कन उठला व पहातो तों एकजण खिडकींतून आंत येण्याच्या झोंकानें डोकावत आहे असें दिसलें. तेव्हां लागलेंच जवळ घडवंचीवर पिस्तुल ठेवीत असे तें घेऊन त्यानें झाडलें.त्याबरोबर चोर मागें सरला, परंतु त्याला दुखापत झाली नाहीं असें दिसलें-कारण कांहीं वेळ बाहेर कुजबुज झाल्यावर पुनः एकजण जाळीजवळ आला व त्याच्या मागें कांहींजण फिरत होते.

आदरजी मोठ्यानें ओरडून म्हणाला ' हरामखोरांनो खिडकीशीं या तर खरे, ह्मणजे प्राणास मुकलांच ह्मणून समजा. मजपाशीं पिस्तुल बंदुका भरलेल्या आहेत, तेव्हां खिडकींत डोकवाल तर तुमचें पाप तुमच्या माथीं. '

त्यानें पुनः पिस्तुल उडविला, परंतु त्या पूर्वींच एकक्षण जाळीजवळून तो चोर दूर झाला होता ह्मणून बचावला. थोडा वेळ चाहूल घेऊन आदरजीला वाटलें कीं,दुसऱ्या मार्गानें आंत येण्यासाठीं चोरटे मागल्या बाजूस गेले असावे. ह्मणून त्यानें कशीबशी खिडकी लावून तिच्या आड आंतल्या बाजूनें घडवंची लावून ठेविली,हेतु इतकाच कीं, जर चोरटे पुनः त्याच खिडकीशीं आले तर उघडतांना आवाज झाल्यानें आपल्यास कळावें. नंतर तो माणेकबाईच्या खोलीशीं जाऊन दार खडखडवूं लागला. परंतु इतके धक्के देण्याचें कारण नव्हतें, कारण ती जागी होऊन 'काय झालें' ह्मणून विचारीत होतीच.

आदरजी—माणेक, कांहीं नाहीं चोरटे आले आहेत, परंतु त्यांचा शिरकाव कांहीं घरांत झाला नाहीं. तर लौकर लौकर एकदां दिवा लाव.

तिनें लागलाच दिवा लाविला, तेव्हां धन्याप्रमाणें तिलाही धैर्य आहे असें दिसून आलें. तो पिस्तुल भरीत असतां हातांत लोखंडी

कळशा घेऊन तो ती न भीतां गरगर फिरवूं लागली. पडून पडून चाहूल घेऊन तीं दोघेजण इतका गोंगाट करीत कीं, घरांत दोनच लोक आहेत हें चोरांना पुरतें माहीत नसतें, तर निदान सहाजण तरी घरांत असावे असें त्यांना वाटलें असतें. चोरटे घराभोंवती पाळतीवर आहेत, कीं पळून गेले, हें समजणेंच दुरापास्त होतें, कारण उजडेपर्यंत एकसारखीं दारं व खिडक्या ह्यांचा खडखडाट चालला होता. परंतु तो माणसांनीं धक्के दिल्यानें होत होता, किंवा वाऱ्याच्या सोसाट्यानें होत होता, हें मात्र उमगलें नाहीं. आंतील दोघेजण राखणीवर बसून वारंवार ' पहा, खबरदार ' असें ह्मणत, आणि सकाळ होईपर्यंत प्रत्येक खिडकीं व दार ह्याजवळ जाऊन येत. फार तर काय थोडेसें दिसूं लागल्यावर स्वतःच्याच सावल्या पाहून ते प्रथम साहजिकच दचकले.

सूर्योदय झाल्यावर ते धीर धरून बाहेर गेले, व पाहूं लागले तों झोंपडीभोंवतीं चोहोंकडे पावलांच्या खुणा आहेत. परंतु कोठेंही रक्ताचे डाग नाहींत, हें पाहून आह्दरजीला बरें वाटलें, कारण त्याला फिर्यादी अर्यादीचा मनापासून कंटाळा असे. 'चोरटे घरावर आले होते, ही गोष्ट पट्कर्णी न झाल्यास बरें; मग त्यांना शिक्षा झाली नाहीं, ह्मणून मला दुःख वाटणार नाहीं ' असें तो ह्मणाला.

न्याहारी होत असतांना तो विचार करीत बसला आहे, असें पाहून माणेकबाईनें हळूच विचारिलें ' मग पुढें कसें काय करायाचें मनांत आहे ?'

त्यानें उत्तर दिलें ' मीं तर निश्चय केला आहे आणि माझा निश्चय ढळणार नाहीं. जें कांहीं झालें आहे, त्याजबद्दल एक अवाक्षर देखील आपण कोणापाशीं बोलयाचे नाहींत.'

असे होईल हें ती जाणून होतीच, ह्मणून तिनें रुकार दाखविण्यासाठीं मान हलविली.

' बरें माणेक तुला पिस्तुल मारतां येईल का ?

'मी बाई कधीं पिस्तुल धरिलें नाहीं; पण त्याची ती काय बिशाद, एकदोनदां पाहीन, तर येईल.'

'बरें तर, मग तूं मजजवळच अस. पण माझ्या अटी तुला कबूल असल्या पाहिजेत. रात्रीं काय झालें, हें आपण लोकांना सांगत बसलों, तर आपल्यावर दरवडा घालावा असें दुसऱ्यांनाहीं वाटूं लागेल. मज-पाशीं मोहोरांची पेटी आहे असें तर चौघांत झालें आहे, ह्मणून आतां ती पेटी येथून हलकून उपयोग नाहीं. त्या पेटीसाठींच तें चोरटे आले असावे. ह्मणून आपण असें करूं या कीं, आपण पाळीपाळीनें राखण बसत जाऊं. रात्र पडली कीं, एकानें निजावें व दुसऱ्यानें पाहरा करावा, आणि मध्यरात्र झाल्यावर दुसऱ्यानें निजून पहिल्यानें सकाळपर्यंत पाहरा करावा. तर माणेक, तूं राहतेस कां जातेस तें सांग.'

'विचार करून थोडचा वेळानें मी सांगतें' असें ती ह्मणाली, व ती गोष्ट आदरजीला ही रुचली. दुपारीं जेवणाचे वेळीं 'मी राहते' असें तिनें कबूल केलें. असें धाडस थोडचाच बायांनीं केलें असतें. तिला थोडी बहुत भीती वाटत होती. परंतु ती आदरजीची लांबची नातेवाईक होती. तिचे आईबाप सुरतेस गरीब स्थितींत होते, व ती लहान असतांच ते निवर्तले होते. ती अगदीं पोरकी झाली, अशा स्थितींत आदरजीनें तिला लहानाचें मोठें केलें, व तिच्या योग्य असा वर पाहून त्याशीं तिचें लग्न लाविलें. परंतु कर्मगति गहन आहे. जी जन्मतःच फूट-क्या कपाळाची, तिचें नशीब पुढें तरी कसचें घड निघतें? लग्नानंतर थोड्या वर्षांनीं तिचा नवरा एकाएकीं मरण पावला, व ती संसाराला आंचवली; तेव्हां तिला पुनः आदरजीनें आपल्या येथें आणून ठेविलें. तो तिला नेहमीं ह्मणे ' माणेक तुला येथें कंटाळा आला असेल, तर तूं शिरीनकडे जा. माझी कांहीं काळजी करूं नको.' परंतु माणेकबाई असा विचार करी 'आदरजी ह्मातारा झाला आहे. त्यानें माझा सर्वस्वीं संभाळ केला आहे, तरी त्याचें काय ऐकतां? त्याला सोडून गेल्यास

त्याचे हाल होतील.' असा तिचा ओढा साहजिक त्याकडे होता. दरवडा आला ही गोष्ट छपवून ठेवण्याचें कठीण तर होतें; परंतु 'आपण बरेच महिने घराबाहेर पडलों नाहीं, ह्मणजे कोणाशीं गांठच पडणार नाहीं; मग अनायासें तेरी बी चुप और मेरी बी चुप. पण चोरट्यांशीं जर कां पुनः गांठ पडली, तर मात्र कठीण' असा तिनें विचार केला.

'ह्या धाड्यामुळें आदरजीच्या मनांत पुनः विचार घोळूं लागले कीं, आपण अशा मोहरा ठेवितों, त्यामुळें एकादे वेळीं दुसरेच कोणी त्यांचा अपहार करतील, व आपण त्यांना सर्वस्वीं मुकूं; त्यापेक्षां त्यांच्या मूळ किंमतींत किंचितही कमीपणा न होतां, त्या जर वावरल्या तर काय वाईट?'

---

# भाग ४.

## भरभराट.

ह्यानंतर कांहीं दिवस लोखंडाचा व्यापार वाढत गेला. पुढें पुढें तर तो इतका वाढला कीं, वाडियाला अतोनात काम पडूं लागलें व तें त्याला झेपेना देखील. ह्याबद्दल त्यानें पुष्कळदां बरजोरजी शेटास लिहिलें; तेव्हां बरजोरजीनें आपला कारभार घाईघाईनें आटोपून सकुटुंब वाडियाच्या शेजारीं जाऊन रहावें, असा विचार केला. बरजोरजी आटपाआटप करीत असतां आपल्या ओळखीपाळखीच्या मंडळींना ह्मणे:' जेव्हां कारखान्यांत एकच भट्टी चालू होती, तेव्हां आमच्या तरुण भागीदारांना पुरून उरेल इतकें काम पडे; आणि आतां तर चार भट्ट्या चालवाव्या लागतात, व लोखंडाचा खप इतका झपाट्यानें होत आहे कीं, मागण्या येतात त्या सर्व, अतिशय काळजी घेतली तरीही, पुऱ्या पाडल्या जात नाहींत. अशा स्थितींत एकट्यांवरच भार टाकणें रास्त नाहीं.' पूर्वी कारखान्यांत तीनशें मजूर होते, आणि हल्लीं त्याऐवजीं ११०० वर मजुरांची संख्या वाढली. दररोज जास्त भांडवल

येऊं लागलें. आणि तेंही पुष्कळच असें असे. जो तो ह्या व्यापारांत भांडवल घालूं लागला, हें स्वाभाविकच होतें, कारण त्या वेळीं लोखंडाच्या व्यापाराला तेजी होती, त्यामुळें नफा चांगला व तावडतोब मिळत असे. नवीन आगगाड्या होत होत्या, त्या कामीं देशी लोखंड भारी लागे. असा किफायतशीर धंदा पाहिल्यावर कांहींकांनीं आपले तेलाचे, कापसाचे वगैरे कारखाने ह्मणावे तसे चांगले चालत नाहींत, असें पाहून मोडून टाकिले, व आपलें भांडवल लोखंडाच्या व्यापारांत घातलें. फार काय, पण कित्येक गरीब शेतकरी आपल्या जमिनी विकून लोखंडाच्या, कारखान्यांत मजूरी चांगली मिळते, ह्मणून त्या प्रांतीं बायकामुलांसह चालते झाले. मुंबई, पुणें वगैरे शहरांतील कित्येक श्रीमंत लोकांनीं कापसाच्या गिरण्यांचे शेअर, लोननोटी यांचें चांगलें व्याज येत नाहीं, ह्मणून त्या भराभर विकल्या व ह्या धंद्यांत भरपूर व्याज मोठ्या आनंदानें कारखानदार देतात, ह्मणून ते आपला पैसा त्यांत घालूं लागले. कित्येक बाया बापड्या देखील व्यांकेंतील लहानसान ठेवी काढून आपल्या ओळखीच्या एकाद्या लोखंडाच्या व्यापाऱ्यामार्फत तो पैसा व्याजीं लावीत, आणि आपल्याला पूर्वीपेक्षां जास्त उत्पन्न होऊं लागेल, ह्मणून आनंद मानीत. परंतु एकाच दिशेला हा सर्व भांडवलाचा ओघ जात आहे, ह्याचा परिणाम चांगला होणार नाहीं, असें कित्येक अनुभवी लोक मात्र उघड बोलूं लागले. ते ह्मणत 'ह्याचे हल्लींचे परिणाम समाधान मानण्यासारखे आहेत हें खरें; परंतु दूरवर विचार करितां, दूध पाहिलें पण बडगा पाहिला नाहीं, अशी स्थिति दिसते.' त्या प्रांतीं चांगल्या जागा पाहून ह्या कारखान्यासारखे आणखी कांहीं कारखाने इतर लोकांनीं काढिले; आणि जो प्रदेश पूर्वीं डोंगराळ व ओसाड होता, तेथेंच पुष्कळ ठिकाणीं धूर निघूं लागला; मजूर लोकांना चांगली मजुरी मिळूं लागली, ह्मणून प्रत्यहीं त्यांच्या झोंपड्या वाढत जाऊं लागल्या; आणि मालकांप्रमाणेंच कामकरी लोकांचीही

भरभराट एकंदरींची झाली आहे, असें वाटूं लागलें. परंतु ह्या सर्व कारखान्यांतून इतकें लोखंड निघे कीं, पूर्वीप्रमाणेंच खप जारी राहील हें बहुतेक संभवनीय नव्हतें. बैलगाड्यांवरून, आगगाड्यांच्या वागणींतून जें लोखंड प्रत्यहीं येथून जाई, तें पाहिलें ह्मणजे इतक्या लोखंडाचा खप कोठें व कसा होतो, ह्याचेंच नवल वाटलें असतें. परंतु मागण्या वरचेवर येत असत, व जवळ माल शिल्लक राहत नव्हता, त्यामुळें पुढेंही अशीच स्थिति राहील, अशी कारखानेवाल्यांस मोठी उमेद होती. त्यांना कित्येकांनीं बजावूनही सांगितलें कीं "बाजारांत माल पडून व्यापार मंदावेल बरें," तरीही त्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देतां, त्यांनीं बिनधास्तपणें माल काढण्याचा व कारखानें वाढविण्याचा सपाटा चालविला.

कित्येक कारखानदारांपेक्षां वाडिया व त्याची भागीदार मंडळी ही शहाणी होती. कदाचित् हा व्यापार बसेल, तर किती रकम अविनाशी भांडवलांत गुंतवावी, हें धोरण त्यांनीं लक्षांत ठेविलें होतें; कारण घडामोडीच्या वेळीं अविनाशी भांडवल एकदम काढतां येत नाहीं, किंवा त्याचें रूपांतर करितां येत नाहीं.

अविनाशी किंवा स्थायी भांडवल ह्मणजे हत्यारें, यंत्रें, कारखान्याच्या इमारती व वखारी आणि जमीन, ह्यांत घातलेली रकम. आपली संपत्ति वाढविण्याचा जो कोणी यत्न करितो, त्याच्या मालमत्तेंत अविनाशी भांडवल असलेंच पाहिजे. धान्य पिकविण्यासाठीं शेतकऱ्यापाशीं जमीनच असली ह्मणजे पुरें असें नाहीं, तर जमीन तयार करण्यासाठीं नांगर व कुळव, धान्याची कांपणी करण्यासाठीं कोयत्या, धान्य नेण्यासाठीं गाडे, तें सांठविण्यासाठीं कोठारें, वगैरे असल्यास आपल्या मालाचा त्याला भरपूर नफा काढतां येईल. आपलें भांडवल स्थायी करून तो संपत्ति वाढवितो; तरी पण विनाशी किंवा फिरतें किंवा चल भांडवलाप्रमाणें त्याचीं आउतें, जनावरें व कोठारें यांपासून त्याला

फायदा होत नाहीं. विनाशी किंवा फिरतें भांडवल, ह्मणजे अधिक उत्पन्न व्हावें ह्याच प्रत्यक्ष हेतूनें जी संपत्ति लाविली जाते, तें; जसें शेतकऱ्यानें पेरणीसाठीं घेतलेलें बीं, गड्यांची मजुरी. परंतु ' विनाशी ' किंवा ' फिरतें ' ह्या शब्दांत पुढच्या उत्पन्नाविषयीं कांहीं निर्देश नाहीं ह्मणून त्याऐवजीं ' पुनरुत्पादक ' हा शब्द योजिल्यास बरें असें वाटतें. ह्मणजे असें कीं, गिरणीवाल्याचें कच्चें रेशीम व कापूस, शेतकऱ्याचें बीं किंवा विकावयास राखिलेल्या शेळ्या मेंढ्या, लोखंडाच्या कारखानेवाल्याचा कोळसा व अशुद्ध लोखंड, आणि ह्या तीनही प्रकारच्या लोकांकडून गडीमाणसांस मजुरीच्या रूपानें दिलेलें धनधान्य, हीं सर्व पुनरुत्पादक भांडवलें होत, कारण त्यांपासून जें उत्पादनाचें कार्य तें झालें, ह्मणजे मालकास नफा आणून तें पुनः त्याजपाशीं परत येतें. ह्यावरून विनाशी ह्मणजे पुनरुत्पादक भांडवलाच्या मानानें अविनाशी ह्मणजे स्थायी भांडवल जितकें कमी असेल तितका, वेळ फिरल्यास, धंद्याला धोका कमी. फळविक्या काछ्यासारख्याचें अविनाशी भांडवल, आंब्यांचीं अढी घालण्यासाठीं जागा, फळें ठेविण्यासाठीं हारे, टोपल्या वगैरे, तीं नेण्याआणण्यासाठीं फार झालें तर एखादा बैलाचा छकडा ह्या स्वरूपाचें असतें. ह्मणून व्यापार बसल्यास रेशमी व सुताच्या गिरवाल्यांपेक्षां काछ्याची संपत्ति निरुपयोगी अशा रूपानें कमी अडकलेली असते; कारण गिरणीवाल्यांच्या गिरण्या, वाफेचें इंजीन व कापड काढण्यासाठीं लागणारीं यंत्रें, वखारी यांत पुष्कळ रक्कम अडलेली असते. दोन्ही प्रकारच्या व्यापाऱ्यांजवळ पुष्कळ माल पडलेला राहील. फळविक्याजवळ नाना जातीचीं पुष्कळ फळें असतील आणि गिरणीवाल्याजवळ कच्चें रेशीम व कापूस किंवा तयार झालेलें सूत व कापड असेल.बाजारांत खप होईनासा झाल्यास दोघेही आपल्या ह्या पुनरुत्पादक ह्मणजे विनाशी भांडवलापासून पुनः उत्पन्न होत नाहीं ह्मणून कुरकुर करतील, परंतु अशा वेळीं ज्याचें भांडवल अविनाशी ह्मणून अतिशय गुंतून राहिलें

असेल, त्याची अधिक दुर्दशा उडावयाचीच. वरील व्यापाऱ्यांपेक्षां लहानसें उदाहरण घेऊं या. व्यापार बसल्यास सुतारापेक्षां बुरुडाला कमी धोका असतो. सुताराजवळ त्याचीं हत्यारें, काम करण्याची व माल ठेवण्याची जागा, हें अविनाशी भांडवल असून लांकूड, खिळे वगैरे पुनरुत्पादक भांडवल असणार. परंतु बुरुडाला लहानसें झोंपडें, एक ठोकळा व एक सुरा एवढें अविनाशी भांडवल पुरें होतें, व त्याचें पुनरुत्पादक भांडवल ह्मणजे बांबू. ह्यावरून जर पेटचा, खुर्च्या ह्या सुतारी लांकडीकामाचा आणि टोपल्या ह्या बुरुडकामाचा खप होईनासा झाला, तर बुरुडापेक्षां सुतारापाशीं निरुपयोगी असें बरेंच भांडवल पडलें राहील.

लोखंडाच्या कारखान्याला तर फार मोठें अविनाशी भांडवल जरूर लागतें, आणि तेंही अशा रूपाचें असतें कीं, व्यापार बसल्यास त्याचा अन्य प्रकारें बहुशा उपयोग होत नाहीं. ज्यांचा बाजारांत खप आहे असे कांहीं पदार्थ जमिनीची लागवड करून उत्पन्न करितां येतात. वखारी, गाडे व बैल ह्यांचाही पुष्कळ प्रकारें उपयोग करितां येतो. परंतु ज्या कामासाठीं भट्ट्या व साळी बांधिलेल्या असतात, त्याखेरीज त्यांचा दुसरा उपयोग होऊं शकत नाहीं. ह्मणून अशा कामीं भांडवल घालतांना बरेंच जोखीम असतें; तेव्हां विचारी माणसांनीं अडाखा बांधतांना फार काळजीनें अजमास करावा; आणि व्यापाराला चांगली तेजी असली, तरी विचार केल्याखेरीज कारखाने वाढवीत सुटूं नये, हेंच योग्य आहे. **वाडिया** व त्याचे भागीदार हे ह्याप्रमाणें धोरणी होते. परंतु त्यांच्या आसपासच्या इतर कारखानेवाल्यांना व्यापाराची हल्लीं चांगली भरभराट आहे, ह्मणून हुरूप येऊन ते भराभर कारखाने वाढवून टोलेजंग इमारती बांधूं लागले; जणूं काय जगांतील सर्व लोकांना हमेष लोखंड पुरविण्याचा मक्ताच त्यांना मिळाला होता. **वाडियाच्या** मंडळीनें मागें सांगितल्याप्रमाणें तीन भट्ट्या जास्त वाढवून एकंदर चार भट्ट्या केल्या, त्यापेक्षां जास्त भट्ट्या करणें हें त्यांना उचित दिसलें

नाहीं; परंतु त्या भट्टया बांधतांना देखील मंडळीनें फार विचारानें व काटकसरीनें खर्च केला. कांहीं कारखानेवाल्यांनीं आपल्या राहत्या बंगल्याप्रमाणें कारखाने देखील पाण्यासारखा पैसा खर्च करून भपकेदार व नमुनेवाईक बांधिले होते; त्यांना ही काटकसर पाहून हंसूं येई.

आपण काय काय जास्त वाढविलें आहे. तें आपला भागीदार केव्हां येऊन पाहील व पसंत करील, असें वाडियाला झालें होतें. ही त्याची इच्छा एकदांची पूर्ण झाली. एके दिवशीं त्याला पत्र आलें, त्यांत बरजोरजी, आपली बायको, दोन मुलगे, तीन मुली आणि आया ह्यांसह बुधवारीं रात्रीं १०–११ वाजेपर्यंत येतील, असें लिहिलें होतें. हे दिवस उन्हाळा संपून पावसाळा लागण्याचे होते, ह्मणून बुधवारीं तर रात्र पडण्यापूर्वींच आकाशांत अभ्रें आल्यामुळें पुरा काळोख पडून बरात्र वेळ झाला तरी मंडळी येण्याचा कांहींच मागमूस लागेना. बरजोरजीचा बटलर त्या दिवशीं सकाळीं आला होता, तो मात्र वरचेवर आकाशाकडे, रस्त्याकडे व घड्याळाकडे पाही; परंतु गाड्यांचा कांहींच पत्ता नसल्यामुळें आपण तयार केलेला खाना थंडगार होऊन जाईल, ह्मणून त्याला वाईट वाटूं लागलें. तितक्यांत वारा सोसाट्यानें वाहूं लागला, व मधून मधून मेघांचा गडगडाट होऊन विजा लवूं लागल्या, तेव्हां मात्र त्याला मंडळीविषयीं व त्यांतून मुलांबाळांविषयीं फारच धास्ती वाटूं लागली; कारण प्रदेश पडला डोंगराळ व त्यांत लोखंडाचा भाग पुष्कळ, ह्मणून वीज पडण्याचा संभव फार. गुलबाईनें मंडळी आली कीं नाहीं, ह्मणून ५।६ दां शोधासाठीं गडी पाठविला. कांहीं मुलें जमून मंडळीच्या गाड्या पाहण्यासाठीं रस्त्यावर उभीं होतीं, परंतु पावसाचें आडंबर पाहून व नऊ वाजून गेले ह्मणून त्यांस आईबापांनीं घरीं निजण्यासाठीं करा-फर ओढून नेलें. शेवटीं मुकादमानें लोकांस सांगितलें 'बरजोरजी शेट आज रात्रीं अशा तुफानांत येत नाहींत.' आणि मंडळींनीं रात्रीं येऊं नये असें लोकांनाही वाटूं लागलें; कारण डोंगरावर झाडी पुष्कळ असून

रस्तेंही बिकट होते, अशा मार्गांनीं दिवसाउजेडींच प्रवास करणें सोयीचें होतें. परंतु इकडे सारेजण अशी काळजी करीत असतां **वरजोरजी** मंडळीसह झपाट्यानें मार्ग क्रमीत होता. शेवटला टप्पा तर गाडीवाल्यांना व घोड्यांना फारच त्रासदायक गेला, आणि गाड्यांत बसलेल्या मंडळींनाही आपण घरीं केव्हां जाऊन पोंहोचूं असें झालें. वारा इतका जोरानें वाहत होता कीं, आपलें पागोटेंच गाडीवानाला सांवरतां सांवरतां पुरें झालें. डब्यांचीं दारें नीट लावून घेतलीं होतीं, तरी पण लहान लहान फटींतून वारा सूं सूं करीत येऊन मुलांना लागे. तशांत गडगडाट व विजा ह्यांनीं तर **वरजोरजी**ची तीन वर्षांची लहान मुलगी दचकून रडूं लागे, व भीतीनें ती बापाच्या कोटांत आपलें तोंड खुपसून बसे. तिच्यापेक्षां थोरली मुलगी आयाजवळ होती, ती देखील आयाला तशीच चिकटून बसली. मुलांनाही भीती वाटून, हा काळोख नसता तर बरें झालें असतें; असें वाटूं लागले; कारण डब्यांचे दिवे वाऱ्यापुढें कांहीं केल्या राहीनात. **वरजोरजी** व मुलींची आया **सीता** हीं गोष्टी सांगून त्यांना भीती न वाटावी, म्हणून आपल्याकडून यत्न करीत; परंतु गाड्या किंचित थांबल्या कीं, एखादा लहानसा आवाज हळच निघे ' बाबा ? अजून किती लांब जायचें आहे ' ' आज रात्रीं तरी आई, आपण घरीं जाऊन पोंहोचूं का? ' ' आया, घरीं किती वाजतां जाऊं? '

**फ्रामरोझ** म्हणाला ' काय अंधार पडला आहे ? डोळ्यांत बोट घातलें तरी दिसायाचें नाहीं. दोहों बाजूला डोंगर आहेत. किंवा काळें-भोर आकाश आहे, हें [illegible] समजत नाहीं. [illegible] म्हणजे [illegible]. "

[illegible] म्हणाला ' तें आकाशच आहे, आतां डोंगर संपले असें वाटतें. त्या बाजूला पहा, मोठा आगीच्या लोळासारख्या उजेड दिसतो. मला वाटतें लोखंडाच्या भट्यांचा तो प्रकाश असावा. पहा पहा, तो कसा जास्त होत चालला आहे. '

त्यांचा बाप म्हणाला ' वः आतां मात्र थोड्याच वेळानें आपल्याला उजेडच उजेड मिळेल. मला वाटलें होतें, कीं उशीर लागेल, पण आपण लौकर येऊन पोंचलों. त्या टेंकडीच्या पलीकडून तो उजेड येत आहे, म्हणून तिला वळसा देऊन आपण गेलों कीं, भट्ट्या पेटल्या आहेत त्या आपण पाहूं. '

एक दोन पळांत गाड्या डोंगराला वळसा देऊन गेल्या, त्याबरोबर भूक तहान व भीती हीं चट सारी विसरून मुलें हुशार होऊन समोरील देखावा पाहूं लागली. वारा किंचित पडला कीं, चमत्कारिक आवाज ऐकूं येई. मोठ्या सोसाट्यानें वारा सुटला असतां जसा आवाज होतो त्याप्रमाणें तो आवाज होता. हा आवाज भट्ट्यांच्या वाऱ्यानें होत आहे' असें त्यांच्या बापानें सांगितलें. त्याचप्रमाणें साळ व गिरणी यांच्या यंत्रांचे सुरसुर व घरघर असे आवाज ऐकूं येत होतेच. एक प्रकारच्या धमाम्याच्या खालच्या बाजूला सारख्या जमिनीवर ही साळ व गिरणी होती. धमाम्याच्या पुढच्या अंगाला दगडांनीं चिणून काढिलें होतें, आणि वर लोखंडाचे दगड मारण्यासाठीं आबे होते; त्यांत लोखंड मारलें गेलें, म्हणजे तें भट्टीच्या वरच्या भोंकांतून आंत घालण्यांत येई. त्याच धमाम्यावर दगडी कोळसा शुद्ध करण्यासाठीं लांबच्या लांब चर होता, त्यांत कोळसा उघड्यावर जळत होता, त्यांतून मधून मधून आगीचा लोळ निघे, किंवा ज्वाळा अगदीं लुकलुकीत होऊन दिसेनाशी होई; आणि पांढरें व लाल आगिवळे निघून उंच जात; अथवा वारा वाहूं लागे किंवा पडे तसतसा कोळशांचा भडका होई, किंवा आग दिसेनाशी होई. तेथेंच काम करणाऱ्या लोकांच्या काळ्या कुळकुळीत आकृत्या हातांत लांब लोखंडी दांते घेऊन फिरवीत आहेत असें दिसत होतें. मधून मधून लाल धुराच्या लोटांत त्या अंधुकशा दिसत, आणि ज्वाळेचा लोळ चांगला असला म्हणजे त्या स्पष्ट दिसून येत. येथून कांहीं अंतरावर टुकटुक करणाऱ्या दिव्यांची रांग होती; परंतु भट्ट्यांकडे,

पाहिल्यावर डोळे दिपून गेल्यानें त्या दिव्यांचा उजेड स्पष्ट दिसण्यासारखा नव्हता. हे दिवे कामकरी लोकांच्या झोंपड्यांतले होते. त्यांच्याही पलीकडे बऱ्याच उंचीवर एकच दिव्याचा उजेड दिसत होता, त्यावरून तो उजेड एकाद्या टेंकडीवरील घरांतून येत आहे, अशी कल्पना होई. तो उजेड पाहून मुलांनीं मोठ्या उत्सुकतेनें विचारिलें "बाबा, बाबा, तो दिवा आपल्या घरांतला आहे काय ?' त्यांनीं उत्तर दिलें 'नाहीं, तो **बमनजी वाडियांच्या** बंगल्यांतील आहे. आपला बंगला येथून जवळच आहे.' ह्याप्रमाणें ते दुसऱ्या रस्त्यानें अगदीं काळोखांत कांहीं लांब गेल्यावर त्यांना फाटक उघडल्याचा आवाज ऐकू आला, आणि गाड्या वाळू पसरलेल्या वाटेवरून जात आहेत असें चाकांच्या चरचर आवाजावरून त्यांना कळून आलें. शेंवटीं बंगल्याच्या पुढल्या दरवाज्याशीं दोन्हीं गाड्या जाऊन पोंचल्या, तों दिवाणखान्याचा दरवाजा उघडून मंडळीना घेण्यासाठीं बटलर पुढें आला.

आंत गेल्यावर वाटेंत दगदग पडली ती सारी विसरून जाऊन मुलांना स्वस्थपणा वाटून झोंप येऊं लागली; तेव्हां त्यांना खाऊं घालून आणि मोठ्या माणसांचें जेवण आटोपून मंडळी बिछान्यावर पडली न पडली तोंच सर्व झोंपीं गेले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं **वाडिया** नास्ता करून **बरजोरजीला** भेटून 'कारखाना पाहण्यासाठीं चला' ह्मणून ह्मणूं लागला. त्यानें आपल्या बायकोचा निरोपही कळविला कीं, 'दुपार उलटल्यावर मी आपल्या मंडळींना भेटण्यासाठीं येईन.' त्याप्रमाणें **वाडिया** व **बरजोरजी** असे उभयतां कारखाना पाहण्यासाठीं गेल्यावर गुबगुबीत दोन तट्टांची छोटीशी गाडी दरवाज्यापाशीं उभी राहिली, तींत **गुलबाई** सुरेख पोशाख करून आली होती. **गुलबाईच्या** अतिशय लाजाळूपणाचा परिणाम **बरजोरजीच्या** मुलींवरही झाला; कारण त्या वयानें लहान होत्या, आणि अशा वयात परकी लोकांशीं बहुशः मुली लाजतच असतात. **बरजोरजीची** बायको

बचुबाई ह्यला मात्र सारा वेळ बोलावे लागलें, कारण गुलबाईनें तुटक तुटक घुटमळत बोलावें व तेंही विचारल्याखेरीज बोलूं नये. तिनें बचुबाईला सांगितलें ' येथें आदरजी शेटखेरीज दुसरे कोणी लहान थोर आपण पाहिले नाहींत. समोरच्या कारखान्यांत माल तयार होत आहे. पण आपल्याला त्याचें कांहींच वाटत नाहीं ...............'डोंगराचा हिरवाचार प्रदेश व झाडी हीं मात्र तिला आवडत, आणि कार्येंत त्यांसंबंधीं ती दोनचार वाक्यें बोलली. बचुबाईची गोष्ट तशी नव्हती. कारखान्यावर ११०० लोक लागले आहेत, त्यांची वरची स्थिति कशी आहे, ते कोण कोणत्या जातीचे कोठले राहणार आहेत, कारखाना कसा चालला आहे, येथें पारशी कुटुंबें किती आहेत, ह्या सर्व गोष्टींविषयीं माहिती असावी असें तिला वाटे; परंतु ज्या बाईचा बराच काळ ह्या ठिकाणीं गेला, त्या ला विचारतां त्यांसंबंधीं कांहींच माहिती मिळेना, तेव्हां तिजवर अवलंबून न राहतां आपणच सर्व शोध काढला पाहिजे, असा तिनें विचार केला.

शेवटीं घरीं परत जाण्यासाठीं उठून गुलबाई निरोप घेऊं लागली, तों बरजोरजी व वाडिया हे परत आले. त्यांचा उद्देश असा होता कीं, दिवस बराच आहे व ऊनही लागत नाहीं, तर सर्वांनीं मिळून कारखाना व मजूर लोकांच्या लायनी वगैरे हिंडून पहाव्या, आणि ज्या ठिकाणीं व ज्या लोकांत दिवस काढावयाचे त्यांची माहिती करून घ्यावी. ही गोष्ट गुलबाईच्या मनाला आली नाहीं, ह्मणून ती मागें घेऊं लागली, परंतु तिचा नवरा ह्मणाला ' गुल, तूं असें काय करतेस? ज्या वेळीं येथें कोणी बायकोमनुष्य नव्हतें, त्या वेळीं तूं हिंडली संवरली नाहींस तें ठीकच आहे. परंतु आतां बचुबाई आहेत. त्यांबरोबर तुला यावयाला कांहीं देखील चिंता नाहीं. बचुबाईही, ह्मणाली ' गुलबाई, हें हो काय? आह्मी येथें आलों तर असें मागें मागें कां घेतां? येथ काय आहे, काय नाहीं हें पाहणें मला बाई फार आवडतें. ह्मणून आतां नाट लावूं नका.

चलां आमच्याबरोबर. ' असें ह्मटल्यावर गुलबाईला मुकाट्यानें कबूल करावें लागलें. तेव्हां सारी मंडळी पायींच कारखान्याकडे गेली. गुलबाईची गाडी मात्र वाडियानें बंगल्यावर परत पाठवून ती दोन तासांनीं परत आणण्यासाठीं गाडीवानास सांगितलें.

धमाम्यावरील भट्यांत लोखंडाचा दगड ह्मणजे बीड कसें मारलें जातें तें वाडियानें मंडळीस स्पष्ट करून सांगितलें. भट्यांत माती व इतर अशुद्ध द्रव्यांपासून बीड शुद्ध होऊन नंतर तें शुद्ध केलेला दगडी कोळसा व चुनखडी यांसह भट्टींत वरून घालतात, आणि तेथें तें मिश्रण जळत असतें; दगडी कोळसा जाळण्यासाठीं असतो, आणि चुनखडी बिडांतील इतर द्रव्यांशीं संयुक्त होण्यासाठीं असते, ह्मणजे शुद्ध लोखंड निघतें; हें सारें त्यानें मंडळीला सांगितलें. भट्टीच्या वरच्या तोंडाशीं एकजण उभा असून तो धमाम्यावरून जें मिश्रण येई तें आंत ढकलीत आहे असें त्यांनीं पाहिलें. भट्टीच्या खालच्या बाजूला भट्टीवाला आपला जीव कीं प्राण आपल्या कामावर आवलंबून आहे, अशा एकाग्रतेनें जळका कोळसा खालीं पडत असे तो पहात, आणि त्या मानानें भट्टीवर वाऱ्याचा जोर कमी जास्त करीत उभा होता, हें हि मंडळींनीं पाहिलें. परंतु जवळ कोणी थोर लोक उभे आहेत, हें जणूं काय खात्रींतच नाहीं, असें दाखवीत त्यानें वर पाहिलें नाहीं, किंवा ओळख पटल्याचें चेहऱ्यावर दर्शविलें नाहीं, किंवा तो एक शब्दहि बोलला नाहीं.

बचुबाई नवऱ्याला ह्मणाली—तो माणूस पहा, आपल्या कामांत किती गढून गेला आहे. काय हो त्याचें काम इतक्या महत्वाचें आहे कीं काय?

बरजोरजी—अतिशयच महत्वाचें आहे. त्या भट्टींतून जितकें लोखंड निघतें त्याचा चांगलेवाईटपणा त्या माणसाचे काळजी घेण्यावर अवलंबून आहे. पुष्कळ वेळां असें होतें कीं, त्याला कळत नाहीं किंवा त्याचा उपाय चालत नाहीं, अशा प्रकारें भट्टी बिघडून लोखंडाचा नाश होतो; हें जरी खरें आहे, तथापि तो डोळ्यांत तेल घालून पहात न बसेल, तर भट्टी अगदीं अवश्य बिघडली ह्मणून समजावें.

बचुबाई—न जाणो आपली भट्टी बिघडेल ह्या भीतीनें तो इतका

लक्षपूर्वक काम करीत आहे, किंवा भट्टींतून माल तयार होईल त्या मानानें त्याचा रोजमुरा कमी अधिक होईल ह्या आशेनें तो इतकी काळजी घेत आहे.

**बरजोरजी**—आह्माला असें अनुभवांतीं कळून आलें आहे कीं, चुनखडी फोडतात, जे दगडी कोळसा शुद्ध करितात, जे लोखंडाचा दगड जाळून मारतात, आणि जे भट्टींत मिश्रण टाकून तीं तयार करितात, त्या सर्वांना जितक्या खंडी लोखंड तयार होईल त्या मानानें मजुरी दिल्यास उभयपक्षीं फायदा असतो. तो असा कीं, ते सारे जण एकमेकास मदत करितात, आणि भट्टी न बिघडावी ह्मणून सर्वक्रिया व्यवस्थेशीर होतात, त्यामुळें आमचा व त्यांचा सहजीं फायदा होतोच.

**बचुबाई**—वरती धमाम्यावर काम करीत आहेत, त्यांच्या हलगर्जीपणानें त्या मनुष्यास तोशीस लागेल, तर बाई मला देखील वाईट वाटेल. कारण त्याच्या इतक्या दक्षतेनें कोणी दुसरा काम करीत नाहीं असें वाटतें.

**वाडिया** जवळच होता, त्याला हें बोलणें ऐकूं जाऊन तो म्हणाला—खरोखर तो मोठा विलक्षण मनुष्य आहे. तो अशी अश्रांत मेहनत घेतो व इतक्या काटकसरीनें वागतो कीं, असें वागण्यांत त्याचा काय हेतु असावा हेंच मला कळत नाहीं. थोड्याच महिन्यापूर्वी तो प्रथम अगदीं हलकें काम करीत होता, परंतु तेथून स्वतःच्या मेहनतीनें हळू हळू वाढतां वाढतां तो ह्या स्थितीस येऊन पोंचला आहे. प्रथम तो बागदा खोदण्याकडे लागला, त्यावेळीं तो अगदीं कंगाल होता, आणि आजही तो भिकाऱ्याप्रमाणेंच कंगाल दिसतो; परंतु आमच्या लोकांत आज त्याच्या इतकें कोणी काम करीत नाहीं, व अर्थात् त्याचा इतका पैसाही कोणी राखून ठेवीत नाहीं.

**बरजोरजी**—मला तरी हेंच नवल वाटतें कीं, तो असा भिकाऱ्यासारखा पेहराव कां करितो.

**वाडिया**—मीं काल त्याला सांगितलें कीं ' **पांडोबा**, तुह्मी आता

कपड्यालत्याची दैना करूं नये. तुम्हाला हल्लीं बरीच प्राप्ति आहे, आणि तींतून काय थोडीशी रक्कम दररोजच्या निर्वाहासाठीं व खोलीच्या भाड्याकडे खर्च होत असेल, ती आटून बाकीची सर्व रक्कम तुह्मी सरकारी सेव्हिंग बँकेंत ठेवीत आहां. तर अशी कंगालवृत्ति टाकून द्या. लोकांत आतां बरें दिसत नाहीं.'

बचुबाई—त्याला बायकामुलें, आईबाप किंवा दुसरे आप्तसंबंधी ह्यांचा खर्च चालवावा लागत नाहीं की काय?

वाडिया—छे: तें कांहीं नाहीं. कारण ह्या जगांत त्याला कोणी मित्र किंवा आप्त ह्मणून असल्याचें दिसत नाहीं. फार तर काय पण येथें तरी मी व मुकादम ह्याखेरीज तो इतरांशीं बोलत देखील नाहीं.

बचुबाई—बरें पण तुमच्याशीं तरी त्याचें बोलणेंचालणें कितपत असतें.

वाडिया—जितक्यास तितकें, परंतु त्याला व मला वेळ असतो अशा वेळींच मी बहुशः त्याच्याशीं बोलतों. त्याच्याशीं बोलतांना नेहमीं मला आनंद असतो. कारण तो चांगला सुशिक्षित असून एखाद्या कुलीन गृहस्थाप्रमाणें त्याची भाषा शुद्ध व रीतिभाती संभावित अशा आहेत.

बचुबाई—मोठाच चमत्कार ह्मणायाचा, पण तो कोठून व कशामुळें येथें आला, हें कांहीं कळलें का?

वाडिया—तें कांहीं एक मला ठाऊक नाहीं; फक्त तो अलौकिक बुद्धिमान असून कवडीचुंबक आहे, एवढें कायतें माहीत झालें आहे. अलौकिक बुद्धिमत्ता व कृपणता हे दोनही गुण सहसा एकत्र आढळत नाहींत; परंतु पांडोबाचें सारेंच विलक्षण. आपण कोण व कोणीकडले ह्याविषयीं तो चकार शब्दसुद्धां काढीत नाहीं इतकेंच नाहीं, तर मागमूसदेखील लागूं देत नाहीं. त्यामुळें त्याजविषयीं खरी माहिती असावी असें मला फार फार वाटूं लागतें. मीं देखील खरा प्रकार शोधून काढ-

ण्यासाठीं बरीच खटपट केली असती; परंतु आपली गुप्त गोष्ट दुसऱ्यास कळूं न देण्याचा प्रत्येकाला हक्क आहे, ह्मणून तसल्या भानगडींत पडलों नाहीं. तो मोठा मेहनती व प्रामाणिक नोकर आहे, आणि त्याचा माझा संबंध नाहीं तरी एवढ्यापुरताच आहे.

हें सारें ऐकून बचुबाईनें भीत भीत पांडोबाला एक प्रश्न विचारिला; परंतु तो भट्टी उघडून लोखंडाचा रस सोडणार होता, आणि हें काम फार महत्वाचें असल्यानें कामाच्या गडबडींत त्यानें तिला कांहींच उत्तर दिलें नाहीं.

हें दुर्लक्ष पाहून बचुबाईला चमत्कारिक वाटलें, परंतु वाडियानें तिलाच ऐकूं जाईल अशा बेतानें म्हटलें-बचुबाई एकादे दिवशीं काम आटोपल्यावर मी त्याला तुमच्या बंगल्यावर घेऊन येईन, मग तुह्मी त्याला वाटेल तितकें विचारा. एकाद्या आदितवारीं तो सहज सहल करीत असतां किंवा कधींमधीं आह्माला त्याचें काम दुसऱ्याला सांगून त्याला मोकळें ठेवावें लागतें, अशा दिवशीं तो रिकामा असतां तो हल्लींपेक्षां कांहीं तरी बोलेल चालेल. अमकें माणूस बोलण्यायोग्य आहे असें त्याला वाटलें, तेव्हां तो चांगला चारचौघासारखा बोलत असतो. आतांपारखें लोकांत अगदीं वागण्यासवरण्याचें माहीत नाहीं, अशी तेव्हां कांहीं त्याची वागणूक नसते.

बचुबाई (हंसत)-अशा थोर व पराक्रमी पुरुषास आपण सारे तुच्छ वाटत असूं.

वाडिया-असें कां ह्मणून? त्याचें मौन दळविण्याचें मजकडे लागलें.

तेथून मंडळी लोखंड शुद्ध करण्याच्या जागीं गेली; येथें ओतीव लोखंडाच्या ढाळक्या शुद्ध करीत. एकेक ढाळकी अधमणापासून तीन मणापर्यंत होती. नंतर ते साळ व गिरणी पहावयास गेले; येथें ढाळक्यांच्या कांबी होत असत. शुद्ध करण्याचे जागीं लोक ढाळक्या घेऊन त्या सांच्यांतून ठकलून ठकलून कशा शुद्ध करितात हें त्यांनीं

पाहिलें. तेथेंच तोलाट बसून त्यांचें काम मधून मधून तपासून पाही, व ढाळक्यांचा हिशेब ठेवी. साळीजवळ कांहीं लोक होते, ते ह्या ओतीव ढाळक्यांवर आणखी निराळी शुद्ध करण्याची क्रिया करून घडीव लोखंड करीत; आणि कांहीं लोक त्या घडीव लोखंडाच्या गोळ्यावर घण मारून त्यांचे लांबोडे तुकडे करीत. हे तुकडे एकजण रुळाखालीं घाली, ते दुसऱ्या बाजूस दुसरा मनुष्य उभा राहून काढून घेई, आणि आपल्या समोरील पहिल्या इसमास देई. तो ते तुकडे पहिल्यापेक्षां लहान रुळाखालीं घालून वरसारखीच कृति करीत करीत शेवटीं ते तुकडे विवक्षित लांबीरुंदीचे होईपर्यंत उतरत्या प्रमाणांच्या रुळाखालीं, दाबून काढी. अशा कांबी झाल्यावर कांहींजण त्या ऊन असतांच सरळ करीत आणि त्यांवर कारखान्याचा शिक्का ठोकीत. त्या तयार झालेल्या कांबी कांहींजण तोलून व तपासून ठेवीत. शिवाय ह्या सर्व लोकांवर देखरेख ठेवणारे मुकादम व कारकून ही मंडळी सर्व व्यवस्था नीट होत असल्याचें पहात होतीच. माल किती व कसा तयार होत होता, तो तयार होतांना श्रम वांचविण्यासाठीं व मदत होण्यासाठीं यंत्रांचा केल्या होत्या त्यांत जी चतुराई होती, आणि एकंद कारखाना किती अवाढव्य प्रमाणावर होता, तें सारें पाहून मुलांना [illegible] त्यांच्याप्रमाणेच आश्चर्य [illegible]

[illegible]—ह्यावर किती तरी पैसा लाविला असेल?

बचुबाई—आणि त्या पैशानें किती तरी श्रम कामीं लागले आहेत!

बाडिया—हें तर खरेंच, परंतु अकराशें लोक कामावर लागले आहेत ह्यांत काहीं मोठें नाहीं, तर इतकें भांडवल लाविल्यानें काय निष्पन्न होतें हें पाहण्याचीच मौज आहे.

बचुबाई—अकराशें लोकांच्या श्रमाविषयींच मीं ह्मटलें असें नाहीं, परंतु सर्व प्रकारच्या श्रमाबद्दल माझें ह्मणणें होतें. त्यांत सांठविलेले

असहीं येतात; जें फक्त माणसांच्या हातांनीं होण्यासारखें नसतें, तें ह्या असामळें होतें. ते मांडविलेले श्रम [illegible] ह्मणाल, तर कानच्या, रूळ आणि यंत्राचे इतर [illegible] ह्या [illegible] नाहीं किंवा लांकूड ह्यासारखें त्यावर [illegible] रितीं येतें. पण काय [illegible] यंत्रांचा उपयोग करीत आहां, ह्मणून येथें लोकांची कुरकुर तर नाहींना हीं कामें तर अशीं आहेत कीं, माणसाच्या हातांनींच करूं ह्मटल्यास होण्यासारखीं नाहींत.

वाडिया—हल्लीं कांहीं कुरकुर नाहीं, कारण लोखंडाच्या व्यापाराला तेजी आहे, व लोकांना मजुरीही चांगली मिळत आहे. त्यामुळें मालक व कामकरी ह्या साऱ्यांचें लक्ष यंत्रांनीं व लोकांनीं जितकें लोखंड तयार होईल तितकें काढण्याकडे आहे. परंतु हाच जर काल बदलला, तर मात्र कठीण जाईल. मग कमी यंत्रें व जास्त लोक लावून काम करण्याच्या नाना युक्त्या जो तो सांगत बसेल. रूळाखालीं सारख्या मापीच्या कांबी करणें व त्या तोडणें किंवा कांपणें ह्याला लोखंड व लांकूड अर्थात् यंत्रें अवश्य लागणार, ह्मणजे नुसत्या मनुष्याच्या हाताच्या शक्तीनें हें काम होण्यासारखें नाहीं. परंतु चुनखडी तयार करणें, लोखंडाचा दगड फोडून त्याच्या राशी करणें व त्या जाळून मारणें, आणि दुसऱ्या अशाच कृति ह्याही यंत्रांनीं होऊं शकतील, आणि ह्याप्रमाणें भांडवलाचा उपयोग आह्मीं करूं लागल्यास लागलीच गवगवा होईल असें वाटतें. पण अशा यंत्रांनीं परिणामीं सर्वांस फायदा होईल, हें खरें आहे.

बचुबाई—ह्यांत काय संशय? लोखंड तयार करण्याच्या संबंधांत वेळोवेळीं ज्या सुधारणा झाल्या आहेत, त्यामुळें तर एवढा मोठा कारखाना हल्लींसारखा भरभराटींत येऊं शकला. जसजसा काळ लोटत जाईल तसतशा अधिक सुधारणा होत जाऊन ह्याहीपेक्षां ह्या कारखान्यांची भरभराट होईल.

वाडिया—आणि खरोखरी ह्मणाल, तर अशा सुधारणा झाल्या

[stamp]

पाहिजेत; कारण इतर कामाच्या कारखान्याप्रमाणें लोखंडाचा कारखाना हिंदुस्थानांत साधारणपणें पूर्ण दशेत येण्यास आपल्यास अजून पुष्कळ गोष्टी शिकल्या पाहिजेत. रेशमाचे व सुती कापडाचे कारखाने लोखंडाच्या कारखान्याइतके बिकट व जोखिमीचे नाहींत, ह्मणून त्यांत पुष्कळच सुधारणा झाली आहे. तर फ्रामरोझ, तूं हें सर्व पाहून विचार करीत अस, आणि काळ बदलल्यास काय काय सुधारणा व फेरफार करणें जरूर आहे त्याची कांहीं तरी शकल शोधून काढ. कारण हल्लींसारखी भरभराट नेहमींच राहील असें नाहीं.

फ्रामरोझ—ते पहा, कोळपलेल्या कोळशांचे ढीग पडले आहेत. त्यांचा कांहींच उपयोग न झाल्यास नुकसान आहे. तो पहा पलीकडला ढीग लहानशा टेकडीसारखाच आहे. भट्टींतून जळून जो कचरा पडावयाचा तो इतका पुष्कळ कां असावा? ह्याचा कांहींच कां उपयोग होणार नाहीं?

वाडिया—हाच प्रश्न मीं मनाशीं निदान शंभरदां तरी विचारिला असेल. आणि पुढेंमागें लोखंडाचा खप मंदावेल, त्यावेळीं ह्या प्रश्नाचा विचार करून कांहीं तरी तोड काढण्याचा माझा विचार आहे. हल्लीं आमचें सारें लक्ष नेहमीच्या रीतीनें गिऱ्हाईकांच्या मागण्या पुऱ्या पाडण्याकडे लागलें आहे, नवीन नवीन प्रयोग करून अनुभव घेण्याला आह्माला सध्यां वेळ नाहीं. त्यातून काटकसर काढण्यासाठीं नवीन युक्त्या शोधीत बसण्याची ही तूर्त आह्मांस जरूर नाहीं. काळ बदलला ह्मणजे हेंच आह्मांस अवश्य पहावें लागेल.

बचुबाई—अशा वेळीं इतक्या लोकांचें तुह्मी करणार तरी काय? त्या पलीकडल्या झोंपड्यांच्या रांगा पाहिल्या व त्यापुढें किती तरी मुलें हल्लीं खेळत आहेत हें दिसलें, ह्मणजे अशी लोकसंख्या वाढत आहे त्या सर्वांचा चरितार्थ नेहमीं कसा चालेल, ह्याचें मला गूढ पडतें.

वाडिया—मी माझ्याकडून एवढें करितों कीं, चांगली मजुरी मिळ-

णाऱ्या लोकांनीं बनेल तेथपर्यंत कांहींतरी भांडवल राखून ठेवावें, असें मी पदोपदीं सर्वांना सुचवीत असतों. कारण वाईट दिवस आल्यास त्या भांडवलाचा उपयोग होईल. ज्या मिळकतीनें थोडे दिवसच गुजारा होऊं शकतो तिचाच विनियोग जर योग्य प्रकारें केला, तर पुष्कळ वर्षें तिच्यामुळें चरितार्थ करितां येईल. हें तत्व लोकांच्या मनावर बिंबत नाहीं, ह्याचें मला वाईट वाटतें. मी पुष्कळ प्रकारें सांगून पाहिलें, पण त्यांना तें खरेंच वाटत नाहीं. माझें त्यांना सांगणें ह्मणून इतकेंच कीं, त्यांनीं आपली व आपल्या बायकामुलांची खाण्यापिण्याची, कपड्यालत्त्याची व रहाण्याची तरतूद लावून मजुरीपैकीं जी बचत राहील ती व्याजीं लावावी, किंवा तिचा अन्य प्रकारें फायदेशीर विनियोग करावा, ह्मणजे हें हल्लींचें काम प्रसंगीं त्याजकडून काढण्यांत आल्यास, त्यांना त्या बचतींतून नवीन धंदा करितां यावा. कांहींजणांना ही सल्ला रुचली नाहीं, व कित्येकांना रुचली. कोणीकोणीं आपली शिल्लक [illegible] सेव्हिंगबँकेंत ठेविली आहे; पैसा राखून ठे[illegible] आहे. कांहींकांनीं आपल्या बचतींतून [illegible] पाडिली आहेत, व तीं त्यांचीं बायकामुलें चालवीत आहेत. हाही मार्ग चांगला आहे. कित्येकांनी आपल्या रुपयांच्या पुरचुंड्या बांधून त्या मडक्यागाडग्यांत किंवा फडताळांत लपवून ठेविल्या आहेत, व कांहींनीं आपल्या बायकापोरांना डागदागिने केले आहेत; हाही मार्ग एकप्रकारें सुरक्षित आहे, परंतु ज्यामुळें नफा झाला असता त्याप्रमाणें कांहीं हा मार्ग चांगला नाहीं. पुष्कळ लोकांनीं पैसा मिळाला तसा उडविला; आणि हा मार्ग तर सर्वांत वाईट. कांहींना मोठमोठीं मुलें आहेत, त्यांना निरनिराळीं कामें शिकायास त्यांनीं घातलें; हेतु इतकाच कीं, आमचा लोखंडाचा व्यापार बसल्यास कुटुंबांतील मंडळींस उपजीविकेचें कांहीं तरी साधन असावें; शिलकेचा विनियोग करण्या संबंधानें ह्यासारखा तर दुसरा मार्गच नाहीं. कारण तीं मुलें आपल्या उद्योगानें

खर्च केलेल्या रकमेचा बदला अवश्य फेडितील. ज्या वेळीं वास्तविक बदल्याची जरूर असणार, त्याचवेळीं तो मिळत असल्यामुळें ह्याहून दुसरा मार्ग चांगला नाहीं. त्यांतून असा पैसा कामीं लावल्याचा तात्कालिकही एक फायदा आहेच, आणि त्याची किंमत पैशाच्या रूपानें होणें शक्य नसल्यानें त्याची वास्तविक योग्यता कमी आहे, असें समजण्याचें नाहीं. तो हा कीं, कुटुंबाच्या चरितार्थाचीं सर्वच साधनें एकदम नाहींशीं होणार नाहींत, आणि जर कुटुंबांतील कांहीं जण घरीं रिकामे बसले, तर त्यांना मदत देण्याजोगी दुसऱ्यांची स्थिति असेल ह्या विचारांनीं मनास शांति मिळेल.

हें सर्व ऐकून मजूर लोकांच्या घरची स्थिति कशी आहे, व प्रत्येक कुटुंबांतील मुलांमाणसांची ओळख असावी, असें बचुबाईला फार वाटूं लागलें. ह्मणून ' परत जातांना आपण त्या झोंपड्यांवरून बंगल्यावर जाऊं ' असें तिनें सुचविलें. त्यावरून सर्व मंडळी तिकडे वळली. बचुबाई सर्व प्रकारच्या लोकांशीं लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांशीं मोकळ्या मनानें व ममताळूपणानें कशी वागत आहे, तें पाहून गुलबाईला आपल्या स्वतःविषयीं लाज वाटूं लागली. दोघीजणींत विशेष इतकेंच होतें कीं, आपल्या दरज्याच्या लोकांखेरीज इतर प्रकारच्या लोकांच्या रीतिभाती व संवयी ह्याविषयीं गुलबाई अजाण होती, पण बचुबाई सर्व प्रकारच्या लोकांत वागली असल्यानें त्या लोकांच्या सर्व गोष्टींविषयीं तिला माहिती झाली होती. दोघीजणी मनाच्या उदार व मायाळू होत्या, परंतु लोभ दाखविण्याचा प्रत्येकीचा प्रकार मात्र भिन्न होता. आपला शेजारी अगदीं पेंचांत व आपदेंत आहे असें गुलबाईनें पाहिलें असतें, तर खरोखरी तिनें आपली सर्व पुंजी देखील त्याला वाचविण्यासाठीं दिली असती; परंतु हल्लीं तिच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना दुदात नव्हती, त्यामुळें आपला लोभ त्यांना कसा प्रदर्शित करावा, हेंच तिला गूढ पडलें होतें. बचुबाईची तशी गोष्ट नव्हती, शेजाऱ्यापाजाऱ्यांचा

लोभ संपादन करण्याच्या खटपटींत न पडतां ती फक्त त्यांची विचारपूस करी, त्यामुळें साहजिक ते तिच्यावर लोभ ठेवीत. अशी विचारपूस करीत असतां गरीब लोकांविषयीं जी मनांत कळकळ वागत असे, त्या कळकळीखेरीज दुसरा कांहीं स्वार्थपर हेतु विचारीच्या स्वप्नींहि नसे.

**पांडोबा** जीवापाड कष्ट करितो, असें **वाडियाला** वाटत होतें; ह्मणून त्यांच्या स्थितीविषयीं व प्रकृतीविषयीं तो रहात होता त्या झोपडीच्या मालकापाशीं तपास करण्याचें त्याच्या मनांत आलें. **पांडोबा जानबा ढवळे** ह्याच्या येथें एक खोली भाड्यानें घेऊन रहात होता. तेथें **वाडियानें** मंडळीला नेलें. **जानबा** कोठें बाहेर गेला होता. परंतु त्याची बायको **जानकू** ही घरांत सैंपाक करीत होती, आणि तिचीं दोन लहान मुलें तिजजवळ खेळत होतीं. मंडळी आली असें पाहून हातचें काम टाकून ती त्यांच्यासाठीं कांबळें पसरूं लागली. परंतु **बचुबाईनें** तिला आग्रहपूर्वक नको ह्मणून सांगितल्यावर ती उभ्या उभ्याच मंडळीशीं अदबीनें बोलूं लागली. **पांडोबा** पूर्वीसारखा सशक्त नाहीं व अलीकडे अलीकडे तर तो रोड होत चालला, असें वाडियाप्रमाणें तिला देखील वाटत होतें. ती ह्मणाली "पण बाई, त्याचें मला नवल वाटत नाहीं, कारण ते किती तरी थोडें जेवतात, व झोंप तरी किती थोडी घेतात! त्यांना पैशाची फारच हांव आहे. त्यांच्यासारखा लोभी व स्वतःच्या खाण्यापिण्याचे हाल करणारा बाई माझ्या पाहण्यांत नाहीं. मला कांहीं ह्या त्यांच्या वागणुकीशीं करावयाचें नाहीं. कारण लोकांना त्यांचा यत्किंचितहि त्रास ह्मणून नसतो. दरमहाचे दरमहा पहिल्या तारिखेस ते भाडें देतात. कोणाजवळून कांहीं उसनें मागत नाहींत, हें सारें खरें, पण इतकी ऊर फुटेपर्यंत मेहनत करून जिवाला कांहीं देखील सुख लावून घेत नाहींत, ह्याचेंच मला वाईट वाटतें. उन्हाळा असो, हिंवाळा असो, कीं पावसाळा असो, ते बिचारे दररोज पहांटे चार वाजतां उठावयाचे. उठून स्नानसंध्या पांच वाजे-

पर्यंत आटोपून नंतर कामावर जाईपर्यंत कपडे शिवीत बसतात. ह्याचप्रमाणें संध्याकाळीं दीड तासांत भाकरी भाजून त्यावेळीं पोटभर खातात, व दुपारीं आदल्या रात्रीच्या शिळ्या दशम्यांचा फराळ करितात. संध्याकाळीं जेवण झाल्यावर पुनः दिव्याशीं कपडे शिवीत डोळे फोडीत बसतात, किंवा सुतारकाम करीत असतात. तें रात्रीं चांगल्या अकरा वाजेपर्यंत. नंतर ते कपडे, त्या पेट्या, घडवंच्या लोकांना विकावयाच्या; यांत त्यांना काय सुख असल तें असो. बाकी कधीं मंडळींत बसले, कीं हंसले, कीं खेळत बसले, त्याचें नांव नको.'

**पांडोबाला** इतके धंदे येत असतील याची वाडियाला कल्पना देखील नव्हती, ह्मणून त्याला **जानकूचें** बोलणें ऐकून साहजिक चमत्कार वाटला, व त्याप्रमाणें त्यानें बोलूनही दाखविलें.

**जानकू** ह्मणाली ' चमत्कार तर खराच.त्यांची अशी कांहीं मीं मजा पाहिली आहे कीं,कांहीं का काम असेना,त्यांत पैसा मिळण्याची लालूच असली तर त्यांना तें आलेंच ह्मणून ह्मणा.ते कामावर जाऊं लागल्यानंतर पहिल्यांदा जी रोजी त्यांच्या हातीं पडली त्यापैकीं अर्धीअधिक खर्चून त्यांनीं एक ल्हानसें शिवण्याचें यंत्र घेतलें, आणि फावल्या वेळीं येथल्या व इतर कारखान्याच्या लोकांचे ते कपडे शिवीत बसत. इतकें काम त्यांना पडत असे, तरी त्यांची कुरकूर होतीच कीं, मला पुरें इतकें काम नाहीं. तेव्हां ते एके शनिवारीं रात्रीचे निघून **धारवाडास** गेले व तेथून आपल्या पाठीवर त्यांनीं सुतारकामाचीं हत्यारें आणिलीं. आतां तोच उद्योग झपाट्यानें चालला आहे. फार तर काय, पण ते पेट्या, पंचपाळीं, लाटणीं, घडवंच्या **धारवाडास** देखील मधून मधून विकावयाला धाडतात. त्यांत त्याना बरीच किफायत होते. इतकें मिळूनहि ते फाटके कपडे व ती देना कांहीं त्यांना सुटत नाहीं. त्यांची नजर इतकी बारीक आहे कीं, शिवणकामाला दिव्याचा जास्त उजेड लागतो व सुतारकामाला कमी लागतो, तर होतां होईल तों असें सुतारकाम खोलीचें दार उघडें

ठेवून आमच्या दिव्याच्या उजेडांत करितात. आणि शिवणकाम करतांना निरुपायानेंच कायती ते एखादी पणती लावितात. असा तर त्यांचा क्रम आहे. पण बाई इतका पैसा जमवून तो कां बरोबर येणार आहे?

नंतर जानकूनें मंडळीला पांडोबाची खोली उघडून दाखविली. खोलींत मधोमध लांकडी फडेकार घालून एका भागांत त्याचीं पांघरुणें व कोंपऱ्याशीं चुल होती. ही जागा चांगली सारवलेली व साफ असून पांघरुणें वगैरे सर्व नीट चीजवस्त जेथल्या तेथें लावून ठेविली होती. या आंतल्या अंगाला तो सैपाक करी व येथेंच रात्रीचा निजे. पुढल्या भागांत शिवण्याचें यंत्र व सुतारकामाचीं हत्यारें लावून ठेविलीं होतीं. ही जागा सुद्धां झाडून साफ असून येथें तो फावल्या वेळीं काम करीत बसे. एकंदर त्याची टापटीप सुरेख होती. तो नेहमीं ह्मणे कीं स्वच्छता असल्यास एक प्रकारें बरीच कसर निघते.

• आंतल्या बाजूला भिंतीला टांगून एक सुरेख तसबीर होती. ती पाहून वाडिपाला आश्चर्य वाटलें. तसबिरीवर मलमलीचें कापड सोडलेलें होतें. तें वर करून मंडळीनीं पाहिलें तों तसबिरीला चौकट नव्हती पण ती चांगली रंगवलेली होती. एक सुरेख मुलगा उत्तम पोषाक केलेला असा बागेंत पतंग उडवीत आहे, जवळ एक कुत्रा त्या मुलाचे चेहऱ्याकडे पाहत आहे आणि पाठीमागें बागेच्या झाडींतून छानदार बंगला दिसत आहे, अशी ती तसबीर होती.

जानकू ह्मणाली—पांडोबांनीं ही तसबीर आणिली, तेव्हां तिला छान चौकट होती. ते नेहमीं त्या तसबिरीकडे पुष्कळ वेळपावेतों टक लावून पहात बसत. असें होतां होतां काय बाई त्यांच्या मनांत आलें कोण जाणें, त्यांनीं ती चौकट काढिली, आणि परवां ती जत्रा भरली होती कीं नाहीं, त्यावेळीं गुरें विकायाला ह्मणून गेले, तेव्हां त्यांनीं ती विकून टाकिली.

**वचु**—त्यांचीं गुरें, आणि तीं त्यांनीं कोणीकडून आणिलीं?

**जानकू**—हाच तर त्यांचा चमत्कार आहे. स्वतः ब्राह्मण ह्मणून गाई विकावयाच्या नाहींत, तरी पण घोडे किंवा ह्मशी किंवा शेळ्या मेंढ्या ह्यांचा व्यापार करण्यास काय चिंता आहे असें ते ह्मणतात. ह्या कामीं त्यांची नजरहि चांगली दिसते. कारण एकादुसरें जनावर घेऊन त्याची चांगली तरतूद ठेवितात, आणि तें चांगलें तयार झालयावर विकून टाकितात. आतां त्या पलीकडल्या वाड्यांत जाऊन पहाल, तर त्यांचीं ६।७ गुरें चरत आहेत. पण ह्या कामीं त्यांचा किती शोध व बारीक नजर असते? त्या बाकावर ते काम करीत बसतात, तेव्हां कधीं कधीं खडू घेऊन मार आंकडे चितरीत बसतात. काय ह्मणे हिशेब करितों. ह्मणजे पाहतात कीं जनावरामागें खरीदी, खादाई, याचा खर्च काय पडला व आतां विकल्यास किती नफा सुटेल. ह्याप्रमाणें ते हिशेब करीत बसले, ह्मणजे त्यांतच गुंग होऊन जातात. हल्लीं तरी त्यांची हींच स्थिति आहे. त्यावरून वाटतें कीं, जनावरांचा पुनः कांहीं तरी सट्टा करणार.

**वचु**—पण कांहो, ते बोलून चालून व शेजारपाजाराला बरे आहेत का?

**जानकू**—त्यांना कसलेंहि व्यसन नाहीं व त्यांची प्रत्येक गोष्ट अगदीं ठरलेली आहे, त्यामुळें असा भाडेकरी फारच चांगला. परंतु कधीं कांहीं बोलत बसले का मुलांकडे पाहून हंसले, तर त्याच्या नांवानें रामा गोविंदा. त्यांच्यांत असली माणुसकी तर नाहींच ह्मणा. पण थोडें असें कांहीं असतें, तर मला बाई फार आवडलें असतें. शेजाऱ्यापाजाऱ्यांची तर त्यांना बिलकूल परवा नाहीं. लोक त्यांना कंजूष ह्मणून हंसोत, किंवा त्यांजवळ कोणी कांहीं रक्कम उसनी मागायला आल्यास स्वतः त्यांना हंसावें, पण दोन्हीकडे त्यांचें लक्ष ह्मणून नाहीं. वास्तविक पाहतां त्यांच्याविषयीं ज्यांना ह्मणून थोडीबहुत कळकळ आहे, त्यांना

त्यांजबद्दल जितकें समाधान वाटत असेल, तितकेंच वाईट पण वाटत असेल. कारण असें पहा कीं, पूर्वीं ते अगदीं कंगाल होते ते आज-चांगला पैसा मिळवीत चालले, ही समाधानाची गोष्ट तर खरीच; परंतु मिळविलेल्या पैशाचा उपभोग साधारण चारचौघांप्रमाणें शहाणपणानें घ्यावा, तसें न करितां पूर्वींसारखेच भिकारी आहों असें समजून जर ते कवडी कवडी करीत स्वतः आपदा सोशितील तर वाईटही साहजिकपणें वाटेलच. पण बाई त्यांचा पैसा ते मिळवितात, ते त्याची वाटेल त्याप्रमाणें विल्हेवाट लाविण्यास मुखत्यार आहेत. जसें आमच्या घरच्या खर्चासंबंधानें लोकांनीं चर्चा करणें रास्त नाहीं, त्याचप्रमाणें मला तरी **पांडोबांच्या** खर्चवेंचाची चर्चा करण्याचा काय अधिकार आहे ? मात्र फरक इतकाच आहे कीं, आमची चर्चा झालेली मला साफ खपणार नाहीं, पण **पांडोबांचें** असें आहे, कोणी चर्चा करो, त्यांना माझ्यासारखें वाईट वाटणार नाहीं.

**जानकू** शेंवटीं शेंवटीं इतकी ठासून कां बोलली ह्याचें मंडळीला नवल वाटलें, ह्मणून त्यांचा भ्रम दूर करण्यासाठीं **वाडिया** ह्मणाला— **जानकूबाई**, तुह्मी असें रागावूं नका! त्यांत काय आहे. लोकांच्या तोंडाला कां कुठें हात देववतो ? ( मंडळीकडे वळून ) ह्मणजे तें असें आहे कीं, **जानबांनीं** आपलीं सारीं मुलें आमच्या कारखान्यांत लाविलीं नाहींत, ह्मणून कित्येक लोक त्यांचा उपहास करितात. कारण हल्लींच्या स्थितींत तीं मुलें कारखान्यांत काम करूं लागतील, तर **जानबा** बराच सधन होईल असें त्यांचें ह्मणणें आहे. परंतु **जानबाचा** विचार दूरवर आहे. कारण प्रसंगीं साऱ्यांनीं एकदम घरीं बसण्याची पाळी येण्यापेक्षां एका मुलाला त्यानें **धारवाडास** सुतारकाम शिकण्यास ठेविलें आहे, आणि दुसऱ्यास तेथेंच रेल्वे वर्कशापमध्यें लोहाराचे कामासाठीं ह्मणून ठेविलें आहे, आणि कायतो एकच मुलगा आपल्या कारखान्यांत काम करीत आहे. आतां शेजारीपाजारी काय ह्मणतात कीं, ' **जानबाप्रमाणें** आमच्या मुलांचा खर्च

आमच्या डोक्यावर नाहीं' त्यांतून आमचीं मुलें लोखंडाच्या कारखान्यांत लागल्यानें जानबापेक्षां आमची उपज सहजीं जास्त होत आहे. पण इतकी अक्कल जानबाला असेल तर ना सगळ्या गोष्टी. आतां पहा तर खरें, थोड्या दिवसांत सुतारकाम व लोहारकाम शिकत आहेत, तीं मुलें जानबा परत आणतो कीं नाहीं, आणि कारखान्यांत एकाला रूळाजवळ व दुसऱ्याला कांबीकडे कामावर लावितो कीं नाहीं.' असें लोक बोलूं लागले ह्मणजे या बाईला साहजिक राग येतो.

बरजोरजी—बाई माझें तुह्मी ऐका, तुह्मी आपला निश्चय सोडूं नका. आतां जर तुह्माला यापासून पाश्चत्ताप होण्यासारखें वाटत नाहीं, तर मी खरोखरी सांगतों तुम्हाला पुढं त्याबद्दल पश्चात्ताप ह्मणून खात्रीनें होणार नाहीं. कारण आमच्या कारखान्याला ह्याहून चांगले दिवस येतील असा संभव कमीच. उलट होण्याचा मात्र संभव जास्त.

इकडे बोलणें चाललें असतां गुलबाई जानकूच्या दोन मुलांशीं खेळत होती, कारण तिला मुलांची प्रीति वाटत नव्हती. जानकूचा धाकटा मुलगा तिच्या साडीच्या घोळांत आपलें तोंड लपवीत मधून मधून तिच्याकडे हळूच चोरून पाही, व तिची नजरानजर झाली कीं, पुनः तोंड लपवी. त्याची वडील बहीण ६ वर्षांची होती ती सांगत होती 'मी आईला झाडलोट करूं लागते व परकर स्वतः नेसतें. कधींमधीं कनई मी त्या पांडोबांना रात्रींच्या वेळीं सुईंत दोरा ओवून देते.' हें तिचें बोलणें ऐकत व धाकट्या मुलाशीं खेळत गुलबाई हंसत होती; परंतु जानकू वळून पाहूं लागतांच तिनें आपला चेहरा इतका गंभीर केला कीं, मुलांनीं ह्या थोर बाईला विशेष सलगी करून त्रास दिला, असें वाटून जानकू मुलांना रागें भरली. त्याबरोबर तीं घाबरून जाऊन लपून बसलीं. हा सर्व समजफेर होता; परंतु ह्यांत जानकूकडे दोष नव्हता, कारण गुलबाईनें गंभीरमुद्रा धारण केली व मुलांतर्फे कांहीं देखील म्हटलें नाहीं, ह्यावरून तिला मुलांनीं सलगी केलेली आवडते, असें जानकूस वाटण्यास कांहीं कारण नव्हतें.

# भाग ५.

## भरभराटीचा कसा उपयोग करावा.

उन्हाळा बराच गेल्यावर दर रविवारीं **आदरजी** राईंत फिरावयास येत नाहीं असें पुष्कळांच्या नजरेस पडलें. तो हयात व चांगला असल्याचें पुष्कळांनीं पाहिलें होतें, ह्मणून त्याच्याविषयीं धास्ती नव्हती; परंतु हा राईंत कां येत नाहीं, ह्याचें कारण समजण्याची **वाडियाला** फार चुटपुट लागली. तेव्हां **हारमसजी** हा मधून मधून भेटत असे, त्याला त्यानें एकें दिवशीं गांठून विचारिलेंच.

**हारमसजीनें** उत्तर दिलें—आतां तो तर मोठा साधु बनला आहे. त्यानें मला परवां सांगितलें कीं, दिवसांतून सहा कलाक आपण ईश्वरभजनांत व धर्मसंबंधीं पुस्तकें वाचण्यांत घालवितों. हें तो करितो तरी केव्हां, ह्याचेंच मला नवल वाटतें. कारण त्याची बाग तर नेहमींप्रमाणें चांगली टवटवीत व स्वच्छ दिसते, आणि आह्मी पूर्वीप्रमाणेंच अलगुज वाजवीत व बोलत बसत असतों. आतांशा तो मला संध्याकाळीं लौकर जाऊं देतों, हें मात्र खरें. मी कधीं कधीं त्याला ह्मणतों कीं ' पहा बरें मी एकादे दिवशीं मध्यरात्रीं ऐन बारा वाजतां खिडकीशीं डोकावून पाहीन पुस्तकें वाचतां, कां भजन करितां तें?'

**वाडिया**—**हारमसजी** शेट, संभाळा बरें, एकादे वेळीं खिडकीशीं गेलां तर चोर समजून तो गोळी घालायास चुकणार नाहीं. पण कांहो वाचणें व भजन ह्यामुळें राईंत कां त्यानें येऊं नये? उलट मला वाटतें कीं, कंटाळा येऊन मनुष्याला विश्रांति घ्यावीशी वाटावी.

**हारमसजी**—तो ह्मणतो, ' राईंत जाऊन बसण्यापेक्षां तितका वेळ चांगल्या कामीं लाविलेला बरा.' तो साधुसंतांचीं बरींच उदाहरणें सांगतो, आणि ह्मणतो ' ज्याप्रमाणें त्यांनीं कांहीं वेळ तरी लोककल्याणाकडे व आत्मोन्नतीकडे लाविला, त्याप्रमाणें कांहीं तरी आपल्या हातून घडलें

बरें. आत्मशुद्धि होण्यासाठीं भजन व वाचन सुरू आहेत, पण लोक-कल्याणाचा प्रसंग हल्लीं येत चालला आहे, तो दवडावा असें मला वाटत नाहीं.' तुह्माला ठाऊक आहेच कीं, दोन महिन्यापासून ख्रिस्ती पाद्र्याप्रमाणें उपदेश करण्याचें कांहीं लोकांनीं आरंभिलें आहे. येथून एका कोशावर मैदान आहे, तेथें आसपासच्या कारखान्यांतील लोकांना दर रविवारीं प्रातःकाळीं मद्यपाननिषेध, मितव्यय, ईश्वरभक्ति इत्यादि विषयांवर ते सांगत असतात. त्या मंडळींत **आदरजी** हा असतो. इतर दिवशीं लोक कामावर असतात, ह्मणून मंडळी रविवारच्या दिवशीं जमते.

**वाडिया**—मला वाटतें, **आदरजी**ला हें माहीत नाहीं कीं, सांगण्यापेक्षां करण्यानें लोकांच्या मनावर ठसा बसतो. त्या उपदेशक मंडळींपैकीं बरेच जण स्वतः मद्यपान करून सभेस जातात व तेथें मद्यपाननिषेधपर बोलतात. फार कशाला, परवां तो **धारवाडांतील विजय** पत्राचा मालक आला होता. तो त्या सभेला गेला, व मद्यपाननिषेधपर बोलतां बोलतां मध्येंच त्याची झोकांडी जाऊन तो खालीं पडला. त्यावेळीं त्याच्या तोंडाला घाण येत होती, परंतु जवळची मंडळी लोकांत हंशा होईल या भीतीनें सांगूं लागली 'रावसाहेबांना उन्हामुळें भोंवळ आली आहे.' तेथें **जानबा ढवळे** होता, त्यानें मला हा सारा फार्स सांगितला. पण तें असो. आपला **आदरजी** निर्व्यसनी असून लोकांचें बरें व्हावें ह्मणून त्याची मनापासून इच्छा आहे. मला एवढेंच वाईट वाटतें कीं, तो अशा मंडळींना मिळाला आहे. पण कांहो, त्या मंडळींत कित्येक लोक बोलतात एक व करतात एक, असें त्याच्या लक्षांत कधींच वागत नाहीं, कीं काय?

**हारमसजी**—त्याच्या सारें लक्षांत आहे, पण तो ह्मणतो 'चांगली गोष्ट कोठून कां येईना, तिच्या येण्याच्या द्वाराची अगर मार्गाचा चिकित्सा न करितां चांगला भाग तेवढा घ्यावा.' सोनें गटारांत असो अथ-

वा राजाच्या भांडारांत असो, उभय ठिकाणीं त्याच्या सोनेपणांत कांहीं भिन्नता आहे कीं काय ? त्याप्रमाणें सद्बोधाची गोष्ट होय. चोर, चहाड, शिनळ असले, तरी ते आपल्या आवडत्या पोरांबाळांस चोरी चहाडी शिनळकी करूं नये म्हणूनच सांगतात, ह्यावरून 'चोरी करूं नये, 'चहाडी करूं नये,' 'शिनळकी करूं नये' ह्या निषेधपर उपदेशाची वास्तविक योग्यता कमी झाली कीं काय ? त्यांतून चोरचहाडशिनळांमारखे देखील, आपल्या कृत्या अनुकरणीय नाहींत, हें आपल्या आवडत्या मुलांबाळांना उपदेशद्वारा दाखवितात; त्यावरून त्यांनींसुद्धां सदाचरणाविषयीं पूज्यबुद्धि व्यक्त केली असेंच होतें.

**वाडिया**—पण हीं त्याचीं मतें त्या मंडळींना तरी रुचतात का ?

**हारमसजी**— त्यांच्यांत म्हणजे सारेच लबाड आहेत असें नाहीं; पुष्कळ चांगले आहेतच. त्यांना **आदरजी**विषयीं पूज्यबुद्धि आहे. ते कोणाची मुरवत ठेविणारे नाहींत, आणि ह्याचाहि स्वभाव तसाच आहे. त्यामुळें आपल्या मंडळींत ह्याच्यासारखा वृद्ध व पूज्य गृहस्थ आला आहे याचा त्यांना अभिमान वाटून ते नेहमीं त्याच्या वयाला मान देऊन प्रत्येक सभेच्या वेळीं चांगल्या सावलीच्या ठिकाणीं उपदेशकाच्या जवळच त्याला जागा देतात, आणि इतका मान मिळाल्यामुळें साहजिकच त्याला समाधान वाटतें व वारंवार तो तेथें जातो.

**वाडिया**—तुमच्या बोलण्यावरून तुह्मी कधीं कधीं ह्या सभांना जातां असें वाटतें.

**हारमसजी**—होय, मी तर जातोंच. आणि मला असेंहि वाटतें कीं, तुह्मी एक दोन रविवारीं आलां, तर गरीब व हलके मानिलेल्या लोकांत कशी चळवळ सुरू आहे, हें तरी निदान तुह्माला कळून येईल.

हें इतकें बोलणें होत आहे, तों **वाडिया**ची गाडी अकस्मात त्याच रस्त्यानें येत आहे असें त्यांनीं पाहिलें. **गुलबाई** राईंत जाण्यासाठीं निघाली होती. तिच्या मनांत नवऱ्याला बरोबर न्यावें असें होतें. पण इतक्यां-

त आदरजी मोठ्या घाईनें त्याच रस्त्यानें सभेला जाण्यासाठीं येत होता. तो जवळ येतांच वाडिया हारमसजीला ह्मणाला ' गुलला एकटें बाहेर जाणें आवडत नाहीं, आणि तुह्मीं तर मला सभेविषयीं जें सांगितलें, त्यानें मला तेथें आतांच जावें असें वाटूं लागलें आहे. तर असें करा, तिला घेऊन राईंत जा; आणि मी जातों आदरजीबरोबर सभेला. '

हारमसजीच्या मनांतून सभेला जाण्याचें होतें; परंतु गुलबाईचा एकलकोंडा व भित्रा स्वभाव त्याला ठाऊक होता, त्यांतून आदरजी घाईनें ह्मणाला ' साहेब, चला तुमच्यापैकीं कोण येतें तें. तुमच्या बोलण्यानें माझी सभा मात्र चुकेल. ' तेव्हां गुलबाई व वाडिया ह्या उभयतांचें मन राखण्यासाठीं हारमसजी तिच्याबरोबर गाडींत गेला, आणि वाडिया आदरजीबरोबर चालता झाला. मोठ्या रस्त्याला येथून मळलेली परंतु खडकाळ अशी वाट फुटली होती, त्यावरून त्या ह्मातान्या आदरजीच्या झपाटयाच्या चालीबरोबर वाडियाचें देखील पाऊल टिकेना.

त्यांना बराच उशीर झाला होता. सभेस सुरवात होण्यापूर्वीं जमलेले लोक इतके एकाग्र व स्थीर होते कीं, इतके लोक जमले असतील, अशी तेथें जाऊन पोंचण्यापूर्वीं वाडियाला कल्पना देखील झाली नसती. वळसा घेऊन गेल्यावर दोन टेंकडयाच्या मधल्या लहानशा पटांगणांत सात आठशें लोक जमले आहेत, असें त्याच्या नजरेस एकदम पडून त्याला आश्चर्य वाटलें. हे लोक जमिनीवर रांगेनें व्यवस्थेशीर बसले होते; कांहीं उनाड पोरें टेंकडयावरील करवंदीच्या झाडींत लपंडाव खेळत होतीं, आणि पहायाला आलेले कांहीं रिकामटेकडे लोक ह्या लोकांच्या आजूबाजूला हळू हळू हिंडत होते. परंतु बाकी सर्वत्र शांत होतें. एकंदर झोंकावरून मुद्दाम आदरजीकरितां सभेस सुरुवात न करितां मंडळी वाट पहात होती असें दिसलें; कारण आदरजी व वाडिया हे येऊन आपल्या जागीं बसल्याबरोबर सभेस सुरुवात कर-

ण्यासाठीं चळवळ सुरू झाली. त्याच्याकरितां जागा मुद्दाम र... ठेविली होती, असें दिसलें. टेंकडयाला लागून एक मोठें पिंपळाचें झाड होतें, त्याच्या खालीं दोन देवदारी खोके ठेवून त्यांच्या मागें कांहींजण कुजबुज करीत होते; ते सभेचे चालक व व्यवस्थापक होत. त्यांच्यापैकीं एकजण खोक्यामागें उभा राहून बोलूं लागला.

तो म्हणाला--माझ्या मित्रांनो, आज जे आपल्यास चार हिताच्या गोष्टी सांगणार होते, त्यांच्या प्रकृतीला बरें नसल्यानें ते येऊं शकत नाहींत. त्यांचें काम करण्याचें माझ्यासारख्या अल्पमतीवर येऊन पडलें आहे. आजपर्यंत मजकडे ह्या सभेसंबंधीं इतर किरकोळ कामें करण्याचें असे, परंतु आतां अशा महत्वाच्या कामीं माझी योजना झाली आहे, तिला यश देणें हें ईश्वराधीन आहे. कोणाच्याही तोंडांतून चांगल्या गोष्टी निघाल्यास त्या मान्य होतात हें उघड आहे; आणि ह्मणूनच, आपण सर्व येथें जमलों आहों त्यांनीं तसेंच परत जाऊंनये, ह्या हेतूनें मी आतां येथें बोलण्याचें कबूल केलें आहे.

**आदरजीनें** **वाडियास** हळूंच सांगितलें–ह्या मनुष्याचें बोलणें मीं पूर्वीं एक दोनदां ऐकिलें आहे, त्यावरून पाहतां उपदेशक किंवा वक्ते ह्मणून नांवाजलेल्या पुष्कळ लोकांपेक्षां ह्याचें बोलणें लोकादरास जास्त पात्र होईल असें मला वाटतें. हा सभेचा चिटणीस आहे. मीं मागें त्याचें बोलणें ऐकिलें आहे, ह्मणून आतां पुनः मला त्याचें भाषण ऐकण्याची संधि आली आहे हें पाहून मला साहजिक आनंद होत आहे.

परंतु बोलणारा इसम **पांडोबा** आहे, हें पाहून **वाडिया** इतका थक्क झाला कीं, त्याच्यानें **आदरजीस** एक शब्द देखील उत्तरादाखल बोलवेना.

बोलणारा **पांडोबाच** अशी पक्की खात्री झाल्यावर पुढें अचंबा वाटण्यासारखें कांहीं घडलें नाहीं; कारण **वाडियाला** **पांडोबाची** जी माहिती होती तेवढ्यावरून तो बोलेल तें चांगलें बोलेल असें त्याला पूर्ते-

पणीं वाटूं लागलें. आणि वास्तविकच तसा प्रकार आला. पांडोबा कोणता विषय घेऊन बोलणार, त्याच्याबद्दल मात्र वाडियाला बराच संशय होता. त्याला असें वाटलें कीं, पांडोबानें जगाची क्षणभंगुरता हा विषय घ्यावा, म्हणजे त्यास अतितृष्णा निरर्थक आहे असें कळून येईल. पण पांडोबानें तो विषय न घेतां 'चोरी करूं नये' ह्यावर बोलण्याचें आरंभिलें; आणि एकपरी हा त्याच्या शहाणपणाच होता, कारण ह्या विषयावर स्पष्टपणें बोलल्यानें त्याला पुढें मागें अडण्याचा रस्ता नव्हतें.

परंतु पांडोबानें विषय सांगितला मात्र, त्याबरोबर लोकांस चमत्कारिक वाटेल, अशा रीतीनें आदरजीनें आचरण केलें. पहिलें वाक्य ऐकतांच तो चपापला, आणि कांहीं वेळ अगदीं एकाग्रतेनें त्याचें भाषण ऐकूं लागला. परंतु चोराचें कुकर्म जरी मनुष्यांनीं पाहिलें नसलें, किंवा त्याविषयीं कोणास देखील यत्किंचितहि संशय नसला, तरी त्याचें मन त्याला किती खात असतें, ह्याचें वर्णन पांडोबा करीत असतां आदरजी जागेवरून उठला व त्याच्या शेजारीं जाऊन उभा राहिला; आणि तेथून डोळे उन्हानें दिपूं नयेत, म्हणून डोळ्यांवर हात आडवा धरून तो इकडून तिकडे जमलेल्या मंडळीच्या चेहऱ्यांकडे न्याहाळून पाहूं लागला. पांडोबाला देखील ह्याचा चमत्कार वाटून तो बोलतांना कांहीं वेळ थांबला सुद्धां. वाडियाप्रमाणें त्यालाहि वाटलें कीं, ह्मताऱ्याला ही एक लहर आली असावी. पण ही कांहीं लहर नव्हती. पांडोबानें जो विषय अकस्मात घेतला त्यामुळें आदरजीच्या मनाची संशयनिवृत्ति होऊन तें स्थीर झालें, ही एक समाधानाची गोष्ट झाली. त्याच्या मनाची पक्की खात्री झाली कीं, सभेला दर रविवारीं जी मंडळी येते त्यांपैकीं कोणी आपल्या घरावर त्या रात्रीं दरवडा घालण्यास आला नव्हता. लोखंडाच्या कारखान्यासंबंधीं प्रत्येक बाबत व इसम ह्मविषयीं त्याचें मन शुद्ध नव्हतें, तरी चोर आले ते कारखान्याकडील

नव्हते असा त्याचा पहिल्यापासून ग्रह होता; आणि कारखान्याच्या लोकांपेक्षां इतर कांहींजणांस आपली संपत्ति किती आहे व ती कशी लपवून ठेविली आहे, ह्याची माहिती जास्त असावी असेंहि त्यास वाटत होतेंच.

सभा आटोपल्यावर व मंडळी परत घरोघर जाऊं लागली ह्मणजे **पांडोबा** काय करील, हें पाहण्याची **वाडियाला** उत्कंठा होती. बोलणें झाल्यावर **पांडोबा** छातीवर हात आडवे धरून कोणाशीं कांहीं देखील न बोलतां किंवा समराम न करितां झाडाच्या बुंधाशीं मुकाट्यानें उभा राहिला. आणि टेंकडीपलीकडे मंडळीच्या टोळ्या होऊन घरचा रस्ता धरीत तें पाहत होता. शेवटली टोळी टेंकडीआड गेल्यानें दिसेनाशी झाल्याव**र वाडिया व आदरजी पांडोबा**जवळ गेले, व त्यांनीं त्याच्या बोलण्याची वाहवा करून विचारिलें ‘ आतां परत घरीं जाणार ना? ” त्यानें ‘ होय ’ ह्मटल्यावरून त्याजबरोबर ते दोघे जणहि परत निघाले.

**वाडिया पांडोबा**ला ह्मणाला—तुह्मी बहुशः क्वचितच बोलतां, त्यावरून मला वाटतें, तुह्मी फार विचार करीत असतां. आणि खरोखर ह्मणाल, तर आपण ज्या समाजांत आहों त्याविषयीं विचार करण्यासारखें असें विचारी मनुष्याला पुष्कळच आहे.

**पांडोबा**—होय, असें तर खरेंच. पण समाज ही एक वस्तु आहे, आणि सर्व मनुष्यें मिळून समाज ह्मणून कांहीं आहे, असें आपण समजतों; तत्राप मनुष्या मनुष्यांमध्यें तरी प्रत्येकाचे स्वार्थ किती भिन्न भिन्न असतात. फार तर काय, पण एकाच उद्योगांत दोन माणसांचेंहि मन सहसा रिझत नाहीं; आणि त्यामुळेंच मनुष्यांच्या अंतःकरणाचा अंत लागणें कठीण झालें आहे. आजच्या माझ्या व्याख्यानाचेंच उदाहरण घेऊं. श्रोतृसमाजापैकीं फार तर दोघांतिघांचेंच लक्ष्य त्या विषयाकडे वेधलें असेल; परंतु त्या विषयाशीं आपला कांहीं अर्थाअर्थीं संबंध नाहीं, असें कित्येकांना बरें वाटलें असेल? तुह्मी स्वतः किंवा हे **आदरजी**

शेट, किंवा तुमच्यासारखेच जे खरोखरी प्रामाणिक आहेत, किंवा ज्यांस चोरी करण्याचा मोह पडण्यासारखी वस्तुस्थिति नाहीं, अशा लोकांस ह्या विषयाचा काय उपयोग अथवा त्यांचें लक्ष्य त्यांत कसें लागावें, हें सांगा बरें ?

**वाडिया**—त्या विषयांत निदान **आदरजी** शेटांचें लक्ष्य फार गढलें होतें असें वाटतें.

**पांडोबा**—तें मिळून प्रेक्षक ह्या नात्यानें पाहण्यापुरतेंच. व्याख्यान ऐकून लोकांवर कसा काय परिणाम होतो हें कायतें ते पाहत होते; आणि ही गोष्ट स्वतःवर परिणाम होण्यापेक्षां फार निराळी आहे. मला सुद्धां त्यांची उत्सुकता पाहून नवल वाटलें.

असें ह्मणून **पांडोबा** व **वाडिया** **आदरजी**कडे साकूतमुद्रेनें पाहूं लागले; परंतु तो कांहींच उत्तर न देतां फक्त गालांतल्या गालांत हसून स्तब्ध राहिला. तेव्हां **पांडोबा** पुनः बोलूं लागला—ज्या इतर गोष्टींचे परिणाम आपल्यावर घडत आहेत, ते उपदेशानें टळतील असें असल्यास आपल्यापैकीं प्रत्येकाला आठवड्यांतून दररोज एक एक व्याख्यान लागूं लागेल असें मला वाटतें. माझ्या घरचा मालक **जानबा** घ्या ना. त्याचा इष्ट हेतु ह्मटला, ह्मणजे आपलें मुलगे जगांत चांगल्या धंद्याला लागावे, हा होय. त्याच्या बायकोचें पहाल, तर तिचें सारें लक्ष नवऱ्याला यत्किंचितहि त्रास पडूं नये, व लहान मुलांना चांगलें खाऊं पिऊं घालून संभाळून लहानाचें मोठें करावें, ह्याकडे आहे.

**वाडिया**—बरें, तुह्मी त्यांना कशाप्रकारचा उपदेश कराल ?

**पांडोबा**—मी त्यांना एवढेंच सांगेन—आणि त्याप्रमाणें त्यांच्या मनांत हि वागत आहे असें मला वाटतें—कीं, ज्यांचीं अंतःकरणें शुद्ध आहेत तेच खरोखरी धन्य होत. जर कांहीं मार्ग शुद्ध असेल, तर वास्तविक त्यांचाच मार्ग शुद्ध आहे, ह्यांत तिलप्राय देखील संदेह नाहीं. आणि जर ह्या जगांत कोणी लोक धन्य असतील, तर खरोखरी आज ते धन्य

आहेत; कारण त्यांचे मुलगे होतकरू असून चांगल्या स्वभावाचे आहेत, आणि घरांत समाधान व प्रेम नांदत आहे. त्यांच्याच शेजारीं दगडो-बाचें बिऱ्हाड आहे. त्यांचें सुखसमाधान निराळ्या प्रकारचें आहे. संध्याकाळ झाली कीं, त्याला व त्याच्या बायकोला प्रत्येकीं एकेक ग्लास भरून दारू पाहिजे, आणि सणवार असला कीं, पी पी पिऊन बेशुद्ध होऊन पडलें पाहिजे. अशांना मी निराळ्या प्रकारचा उपदेश करीन. समाजाच्या कल्याणासाठीं आपलें भांडवल न लावितां अशा प्रकारें दुरुपयोग करून आपले शेजारीपाजारी दारू पीत नाहींत त्यांची त्यांनीं टवाळी करावी, व कित्येकांना दारू पिण्याची चटक लावावी, त्यापेक्षां त्यांच्या हातून असला अनिष्ट प्रकार घडूं नये, ह्मणून दोघां-नाहि मी एथून साफ धक्के मारून हांकून लावीन. दारूंत व जुगारांत जो त्यांचा पैसा खर्च झाला, त्यानें एक लहानसें दुकान चांगलें उभें झालें असतें.

**आदरजीनें** विचारिलें—आणि **पांडोबा**, मला कोणत्या प्रकारचा उपदेश कराल बरें? माझा सारा स्वार्थ कशांत आहे?

**पांडोबा**—तुमचा सारा स्वार्थ तुमच्यांतच आहे, ह्मणजे एक प्रकारें आपल्याखेरीज दुसरें कांहींच तुह्माला दिसत नाहीं. तेव्हां तुह्माला चांगलें कडकच सांगावें लागेल. पण तुमचा स्वभाव निरुपद्रवी आहे, ह्मणून त्याबद्दल मी टीका करीत नाहीं. एका गोष्टींत मात्र तुह्मी समाजाचे मोठे अपराधी आहां, त्याविषयीं मात्र बोललें पाहिजे.

**आदरजी**—मी एकटा एकलकोंड्यासारखा राहतो, हा दोष कीं काय?

**पांडोबा**—तुह्मी वाटेल तसें कां राहाना? तो कांहीं दोष मी फारसा गणीत नाहीं; परंतु समाजापासून फायदे मात्र घेतां, आणि त्याबदल्यांत समाजाबद्दल कांहीं करावयाचें नाहीं, ह्याविषयीं तुह्मी काय ह्मणतां? इतरांच्या भांडवलाचा व श्रमाचा लाभ तुह्मी घेतां. कांग्रा दरींतील चहा व निलगिरीकडील काफी तुह्मी पीतां; शेंकडों लोकांची बुद्धि व अंगमेहनत खर्च होऊन वर्तमानपत्र निघतें तें तुह्मी वाचतां; तुह्मी—

आदरजी ( मध्येंच )— पण ह्या सान्यांचे मी पैसे देतों, फुकट तर घेत नाहींना ?

पांडोबा—तुह्मी पैसे देतां, ह्यांत नवल तें कोणतें ? कारण पैसे न दिल्यास ह्या जिनसा तुह्माला मिळणार नाहींत. परंतु समाजाचे उपयोगी पडण्याचें पदोपदीं तुमच्या हातीं असून टाळतां येईल तितकें टाळतांच. तशी कोणतीहि गोष्ट तुह्मी समाजाकरितां ह्मणून केली नाहीं. समाजांतील प्रत्येकानें उत्पन्न करणाराच्या एका वर्गांत तरी अवश्य असावें, म्हणजे त्यानें भांडवल द्यावें किंवा स्वतः श्रमकार व्हावें. हें होऊं न शकल्यास, निदान पक्षीं अनुत्पादक परंतु उपयोगी असे श्रम करून उत्पादनास उत्तेजन द्यावें. मालकाच्या भांडवलास जसा श्रमकार भर घालतो, तसे तुह्मी नाहीं. त्याप्रमाणें श्रमकाराच्या मदतीनें भांडवलवाला समाजाची ऐपत वाढवितो, तसें तुह्मी करीत नाहीं; किंवा एकादा कल्पक व विद्वान मनुष्य समाजाची स्थिति सुधारून नवीन सुखाच्या व चैनीच्या पदार्थांचा खप सुरू करितो, तसेहि तुह्मी नाहीं. ह्यापेक्षां धारवाडांत किंवा येथेंच तुह्मी डाक्तर होऊन राहिलां असता, किंवा आमच्या कारखान्यांत भागीदार असतां, किंवा फार तर काय, पण निदान अगदीं कमी मजुरीवर कारखान्यांत काम करीत असतां, तरी तुम्ही समाजाला जास्त उपयोगी झालां असता ?

आदरजी—ती एक वाण्याची * गोष्ट सांगतात, तशाच प्रकारचा दाखला तुह्मी मला देत आहां—काय ह्मणे, एक होता शेटिया. त्याला होतीं तीन मुलें. मुलें व्यवहाराला कशीं आहेत, हें पाहण्यासाठीं त्यानें थोरल्याजवळ ९०० रुपये, मधल्याजवळ ३०० रुपये, आणि धाकट्याजवळ २०० रुपये असे दिले, व स्वतः देशांतरीं गेला. पुढें तो ठर-

---

* नवा करार, मात्थीचें शुभवर्तमान, अध्याय २५ ओंव्या १४ ते ३०, येथेंहि अशाच मासल्याची गोष्ट आहे.

लेल्या मुदतीप्रमाणें एक वर्षानें परत आला; तेव्हां त्यांजपाशीं तो हिशेब मागूं लागला. आणि मग, मधल्यानें व धाकट्यानें आपल्या रुपयांवर व्यापार करून जास्त रक्कम केली होती, त्यासह त्यांनीं हिशेब दिला; परंतु थोरले दादा ह्मणूं लागले ' बाबा, तुह्मी मोठे कंजुष आहां, हें मला माहीत होतेंच. तुह्मी एक पै खर्चायाला देणार नाहीं, ते मला पांचशें रुपये दिलेत, त्याच वेळेस मला वाटलें कीं, हे रुपये मला पचणार नाहींत, तुह्मी केव्हां तरी मागाल. म्हणून त्यांचा तोडा मी मागल्या परसांत पुरून जशाचा तसा ठेविला आहे. तो पहा.' तेव्हां बाप हळहळत म्हणाला ' माझीं धाकटीं मुलें कर्तीं आहेत. ह्या थोरल्याला अक्कल नाहीं. परंतु ज्यानें मिळवावें त्यानें खावें असा जगाचा नियम आहे, म्हणून याला मी आतां घराबाहेर घालवून देतों. '

**पांडोबा**—वः तुम्ही तर अक्षरशः गोष्ट सांगितली. मी तीच सांगणार होतों; पण तिजवरून मी काय उद्देशानें बोलत होतों तें लक्षांत आलें असेलच. त्या वाण्याचा थोरला मुलगा मोठा हौसी व चैनी असेल; किंवा तो ज्योतिषी, गवई, किंवा राज्यनीतिनिपुण असेल; किंवा तुमच्यासारखी त्याला बागबगीच्याची आवड असेल, तत्राप त्यानें आपल्यास दिलेला पैसा लपवून ठेविला, त्यामुळें तो निरुपयोगी होता असेंच समजलें पाहिजे. मग त्यानें तो पैसा जमिनींत पुरून ठेविलेला असो, किंवा उशाशीं पेटींत घातलेला असो.

हें बोलणें ऐकून **आदरजी** भांबावल्यासारखा झाला, तें पाहून **वाडि-यानें** बोलणें फिरवून **पांडोबाला** म्हटलें—बरें **पांडोबा**, तुह्मी मला कशा प्रकारचा उपदेश कराल?

**पांडोबा** निर्भीडपणें बोलत होता खरा, परंतु बोलतांना त्याची वृत्ति इतकी सालसपणाची होती कीं, ऐकणाराला सहसा राग आला नसता. तो ह्मणाला—पुष्कळ लोकांइतके दोष कांहीं तुमच्यांत मला दिसत नाहींत. तुमचें कुटुंब हेंच तुह्माला जगांतलें आदिकर्तव्य वाटत आहे. वास्तविक

ह्मणाल, तर हें कांहीं गैर नाहीं. त्यांच्यानंतर आपल्या जवळच्या लोकांची भरभराट व्हावी, त्यांनीं सुखा समाधानांत असावें, इकडे तुमचें लक्ष आहे. हें दुसरें कर्तव्य तुह्माला चांगलें कळतें इतकेंच नाहीं, पण तें पार पाडण्याचें देखील तुम्हाला चांगलें साधलें आहे.

वाडिया—आणि पहिल्याची ही गोष्ट नव्हे की काय?

पांडोबा—मला वाटतें कीं, अनुत्पादक प्रकारच्या गोष्टींत कमी खर्च करावा, असें तुह्माला पुढें मागें वाटूं लागेल. तुह्मी चांगले व्यवहारज्ञ व विचारवान आहां, ह्मणून अस्थिर भांडवलाचें सारें उत्पन्न अनुत्पादक गोष्टींत घालविणार नाहीं, ही माझी पक्की खात्री आहे. परंतु हल्लींपेक्षां रेशमी साड्या, फितव्या, बूट, आया, घोडेवाले, तट्टें, ह्यांवर कमी खर्च झालेला बरा असें वाटतें.

वाडिया—माझें भांडवल मीं स्वकष्टानें कामीं लाविलें आहे, तर त्या माझ्या मेहनतीनें भांडवलाचें जें उत्पन्न होईल तें स्वतः माझ्यासाठीं व माझ्या बायकोसाठीं थोडेंबहुत ऐषआरामाचे पदार्थ घेण्यांत खर्च करण्यास काय हरकत आहे! आणि त्याप्रमाणें खर्च करण्यास सध्यां मला ऐपतही आहे.

पांडोबा—हरकत तर नाहींच; परंतु प्रश्न एवढाच कीं, कोठपर्यंत खर्च करण्याचा? भांडवल वाटेल तितकें व वाटेल तशा प्रमाणानें वाढवून तुह्मी समाजाचें हित करूं शकाल हें संभवनीय वाटत असेल, तर बेलाशक आपलें बाकीचें सारें उत्पन्न स्वतःची व कुटुंबाची हौस पुरविण्याकडे लावावें, त्याविषयीं माझें कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु जर का वाईट दिवस आले, व जास्त भांडवल लावूनही कमी उत्पन्न होऊं लागलें, तर मात्र पायीं चालणें व स्वत केश विंचरून बुचडा घालणें हें आपल्या कुटुंबाला कठीण जाईल. तेंच गाडींतून हिंडण्याची किंवा आयाकडून बुचडा घालण्याची संवय तुह्मी लाविली नाहीं, तर कांहीं वाटणार नाहीं.

बायकांच्या चट्टीपट्टीविषयीं हें वाणियाशाई बोलणें ऐकून वाडियाला

किंचित हंसूं आलें. त्याला राग आला नाहीं, असें पाहून पांडोबा पुनः बोलूं लागला—तेंच बरजोरजी शेटजींच्या घराकडे पहा. त्यांनीं मधलाच आणि वास्तविक योग्य असा मार्ग पत्करिला आहे. त्यांचीं मुलें काम शिकण्याला येतात, तीं कशा प्रकारें शिकतात हें पाहून मला तर वाटूं लागलें आहे कीं, पहिल्यापासून कोणतेंहि काम अगदीं लक्ष घालून करण्याचें त्यांना वळणच लागलेलें आहे. त्याचप्रमाणें बचुबाई आपल्या मुली घेऊन साध्या कपड्यानिशीं, थंडी असो, गरमी असो, पायींच बाहेर जातात, व परत येतात. त्यांना गरिबांचा दुवा मिळाला नाहीं असें कधींहि घडलें नाहीं. त्या कांहीं लगेच उचलून देतात असें नाहीं, आणि ईश्वरकृपेनें अशी भिक्षा मागण्याची येथें कोणालाही जरूर नाहीं. त्यांतून कोणी हात पसरलाच तरी बचुबाईना हें पुरतें ठाऊक आहे कीं, धर्मार्थ एकदम पैसा उचलून भिकेकऱ्याला देणें ह्यांत त्याचें खरोखर कल्याण नसतें. परंतु लोकांचा लोभ जडावा अशा रीतीनें त्या वागतात; घरचा खर्च व्यवस्थेशीर कसा आटपावा हें त्या लोकांना दाखवितात; शेजाऱ्यापाजाऱ्यांत उगाच दुही असते, ती मोडून त्यांचा सलोखा करवितात; आणि योग्य मार्गानें उत्तेजन देऊन पुष्कळांना जास्त उद्योग करण्यास लावितात. श्रीमंतांनीं गरीबांना अशाच प्रकारची मदत दिली पाहिजे. त्याचप्रमाणें बरजोरजींना खर्चहिं अगदीं व्यवस्थेशीर आहे. त्याचा पश्चात्ताप त्यांना कधींही होणार नाहीं. मी परवां त्यांच्या दिवाणखान्यांत गेलों होतों. तेथें पाहून मला त्यांच्या सुखसाहित्याची कल्पना झाली.

**वाडिया**—तुम्हीं काय काय पाहिलें?

**पांडोबा**—त्यांच्या येथील खुर्च्या टेबलें वगैरे सारें सामान उपयोगी व सोयीचें होतें. त्यांच्या येथील बायकांचे पोषाख सुरेख असून प्रतिष्ठित होते. ह्यापेक्षां त्यांच्या येथील पुस्तकें, वाद्यें, तसबिरी ह्या पाहून तर मला जास्त नवल वाटलें.

वाडिया—तर मग सर्वच चैनीचे पदार्थावर तुमचा कटाक्ष नाहीं!

पांडोबा—असें कसें होईल? ज्यामुळें जास्त ज्ञान मिळून रमितां येईल, अशा गोष्टी ज्यांना ऐपत असेल त्यांनीं खुशाल घ्याव्या. अशा कामीं झालेला खर्च खरोखरी अतिशय उत्पादक असतो. बरजोरजीनीं ग्रंथसंग्रह करण्यांत जो पैसा खर्च केला आहे, त्याचा बदला त्याना चांगलाच मिळेल, कारण त्यांचे मुलगे तीं पुस्तकें वाचून जें ज्ञान व हुशारी संपादन करतील तें सर्व ते समाजाच्या कामीं लावतील. त्याच्या प्रमाणें मुलींच्या कलाकुसरीमुळें त्यांच्या घरच्या मंडळीस आनंद होईल, इतकेंच नाहीं, तर खरोखर नीट विचार करून पाहतां त्यामुळें उत्पादनाचें कामींहि फार मदत होईल. ऑर्गीन लोखंडाप्रमाणें हार्मो-नियमसारखीं वाद्यें देखील भांडवल व श्रम ह्यामुळेंच तयार होतात.

वाडिया हंसत ह्मणाला—जर तुमच्या वर्णनाच्या शैलीवरून लग्न कराल, तर बायकोवर अगदीं तल्लीन व्हाल असें दिसतें. काय ह्मणे बायकांच्या सुगरणपणामुळें व कलाकुसरीनें नवऱ्यास व आप्तसंबंधींस जास्त उत्पन्न करण्याची धमक येईल. परंतु ह्या सर्व गोष्टी येथें ठीक आहेत. जर कां कर्मधर्मसंयोगानें तुम्ही मोठ्या पदाला जाऊन पोंचला आणि तेथें अशा प्रकारें वाद करीत बसला, तर लोक तुह्माला खरोखर काय ह्मणतील?

पांडोबा मोठा उसासा टाकून ह्मणाला—जर जास्त लोक माझ्या-प्रमाणें वाद करतील, तर निःसंशय समाजाचें हितच होईल. आपलें वैभव कशानें नष्ट झालें, ह्याचा विचार मोठे लोक जसा करितात, त्याचप्रमाणें त्यांनीं वैभव असतांना विचार केल्यास, खरोखर थोर नीच ह्यांच्या पायऱ्या शुद्ध पायावर लागतील, एकाद्या महालाच्या पायऱ्यांवर गरीब लोक उपाशी मरत असलेले दृष्टीस पडणार नाहींत, आणि अतिश्रीमान लोक उधळपट्टी करणार नाहींत, तसेंच अतिदारिद्री लोक पशुवत् धुमाळी करणार नाहींत. समाजांतील उच्च व नीच वर्गांतील अंतर कमी

होऊन उभय वर्ग जितके जवळ येतील, तितके उभय वर्गांचे दोष व आततायीपणा नाहींसे होतील. जर थोर लोक जास्त विचारी होतील आणि गरीब लोक दूरवर दृष्टि देतील, तर उभयतांसहि योग्य अशी सुखें व सोयी अनायासें मिळतील. थोराला आपल्या घरीं विद्वान व गमती मंडळी बोलावून मनोरंजन करितां येईल, आणि गरिबाला दिवसाचा कामधंदा आटोपल्यावर एखादें वर्तमानपत्र किंवा अलगुज घेऊन कामाचा शीण घालवितां येईल. इतकेंच नाहीं तर आपल्या झोंपडीपुढें गुलाबाचीं कलमें व जाईजुईचीं रोपें लावून तो मनाला आनंद देऊं शकेल. बरें आतां मी एकाच्या ऐवजीं पांच व्याख्यानें दिलीं, तर तुम्हांलाहि कंटाळा आला असेल म्हणून जातों, साहेबजी.

वाडिया—पांडोबा, जरा थांबा, आतां आमची पाळी आहे. तुम्हाला असें वाटतें कां, कीं तुम्हाला म्हणजे उपदेशाची गरजच नाहीं.

पांडोबा—गरज नाहीं असें कसें होईल? मला बोध पाहिजे व तो मिळतहि आहे. माझ्या भाग्याचें मनन हाच उत्तम बोध होय.

वाडिया—तुमच्या भाग्याला दोष देण्यासारखें कांहीं मला दिसत नाहीं, परंतु तुमच्या दुःखाचें तुम्ही स्वतःच कारण आहां. विश्रांति थोडी घ्यावयाची आणि श्रम पुष्कळ वेळ करावयाचे, खाणें पिणें, वस्त्रप्रावरण ह्या संबंधीं हाल, एकलकोंडेपणा आणि काळजी, हीं दुःखें कांहीं लहानसान नाहींत. पण तीं सारीं आपखुषीनें पत्करलेलीं आहेत.

पांडोबा—मीं स्वत पत्करलीं आहेत, म्हणून त्यांना दुःखें म्हणतां येत नाहीं. माझा मोठा इष्ट हेतु तडीस नेण्याचीं तीं साधनें होत; आणि तो हेतु कोणता म्हणाल, तर संपत्ति.

ह्याप्रमाणें **पांडोबानें** उघडपणें कबूल केल्याचें **आदरजी** व **वाडिया** ह्यांस नवल वाटलें. म्हणून त्यांनीं उत्सुकतेनें विचारिलें—ह्याचा अर्थ काय? असें वागणें योग्य काय? तर मग तुमच्या हल्लींच्या स्थितींत दुःखें तरी कोणतीं?

पांडोबानें संथपणानें उत्तर दिलें—एकेक प्रश्न येऊं द्या, त्याचा मी जबाब देईन. माझें ह्मणणें इतकेंच कीं, हा कालपर्यंत माझ्या आयुष्याच्या चांगलेवाईटपणाचा संबंध संपत्तीशीं आहे. बरें, माझी प्रकृति अशी आहे कीं, मीं एकाच हेतुमागें एकाग्रतेनें लागावें. तर मग संपत्ति मिळविण्याकडे माझें सारें लक्ष लागावें हें साहजिकच आहे. मी ह्मणतोंच कीं, मी कृपण आहे ह्मणून.

वाडिया—परंतु आपण कृपण आहों, हें ह्मणतांना तुह्माला वाईट वाटत नाहीं, ह्यावरून कृपणपणा दोष नसून तो अंगीं लावून घेण्यास तशींच कांहीं योग्य कारणें असलीं पाहिजेत.

पांडोबा--एकादा दारुड्या आपल्या दुर्गुणाविषयीं कारणें देतो, परंतु त्याला शेवटीं तो दुर्गुण ह्मणून कबूल करावें लागतेंच. त्याप्रमाणें मी माझ्या धनलोभाचीं कारणें देत नाहीं. मीं जर सारें सांगत बसलों, तर तुह्मी देखील माझ्या ह्या वर्तनाविषयीं फारशी कडक टीका करणार नाहींत. परंतु तितकी सुद्धां सवलत मी स्वतः घेऊं इच्छित नाहीं. मला समजूं लागल्यानंतर मी प्रथम जो मार्ग स्वीकारिला तोच वाईट होता. तो उद्दिष्ट मार्ग मला सोडावा लागला, आणि आतांचा तरी उद्देश पहिल्यासारखाच वाईट आहे. त्यांतही माझी निराशा होणार किंवा मी कृतकृत्य होईन तें एक ईश्वर जाणे. तसेंच ह्या वेळीं माझा हेतु फसल्यास मला दुसरा तरी मार्ग पत्करण्याची शक्ति राहते कीं नाहीं- तेंही परमेश्वरास माहीत. तूर्त माझ्या दुःखद स्थितीमुळें मला बरीच नशीयत पोंचली आहे. ह्या नशीयतीचा कांहींच उपयोग होणार नाहीं असें नाहीं. तुह्मी विचारतां हीं दुःखें कोणतीं म्हणून? दमून भागून आल्यावर रात्रीं अर्ध्या पोटीं थंडींत कुडकुडत पडावें, रात्रींच्यारात्रीं झोंप म्हणून घेऊं नये, जें कांहीं थोडेंबहुत मिळवून ठेविलें आहे, तें बुडेल किंवा नाहींसें होईल अशाविषयीं नाना प्रकारचे दुष्ट विचार रात्रभर मनांत घोळत असावे, एकादा चांगला सट्टा गेला असें वाटलें म्हणजे पैसे करण्याची कशी छान संधि

दवडली असें वारंवार मनांत हळहळत स्वतःला दोष देत बसावें, इतर कांहीं गोष्टींचा कधींमधीं मनाशीं विचार करीत असतां वारंवार रुपये आणे पै ह्यांचे विचार मध्येंच येऊन जिवाला त्रास व्हावा—हीं कांहीं लहानसान दुःखें आहेत? पूर्वीं मला कशाचीहि तमा ह्मणून नव्हती. त्या वेळीं ओढ्याच्या कडेशीं बसून पाणी खळखळ वाहत जाई तें मी ऐकत बसे. थंडीच्या दिवसांत भर दुपारीं निळ्या थोर आकाशांत घारी उडत घिरट्या घालीत तें पाही, उन्हाळ्यांत संध्याकाळीं सहल करी—ह्या सर्व गोष्टींची मला मौज वाटे. हल्लीं माझी तशी वृत्ति नाहीं. त्याप्रमाणें मी वागूं लागलों, तर लागलाच हा विचार येतो कीं, वेळ फुकट जातो ह्या गोष्टींनीं आपल्याला पैसा थोडकाच मिळणार आहे. मनांत ईश्वराची प्रार्थना करूं ह्मणेन तर ऐहिक स्वार्थ आणि परमार्थ हे कोणासही एकाच वेळीं साधत नाहींत हा विचार येऊन मन उदासीन होतें. हें कांहीं दुःख नव्हे काय? **लोभमूलानिपापानि** ही जी भगवदुक्ति आहे ती मनन करून व ह्या सृष्टिसौंदर्यांत ईश्वर जो प्रतिबिंबित आहे तो पाहून मनाला बोध होतोच, त्यापेक्षां जास्त कांहीं तुह्मी उपदेश करूं शकाल काय?

बराच वेळपावेतों कोणी देखील बोलला नाहीं; कारण ह्या आत्मनिंदेनें **पांडोबाचें** मन इतकें दुःखी झालेंसें दिसत होतें कीं, त्याला उत्तर देण्याला **आदरजी** किंवा **वाडिया** ह्या दोघांचेंही मन होईना. शेवटीं उभयतांची रजा घेण्याच्या उद्देशानें तो एकदम थांबून म्हणाला—**आदरजी शेट**, माझ्या वर्तनक्रमाला मीं एवढा वेळ दोष दिला, त्यावरून असें समजूं नका कीं, तुमच्या वागण्याची मीं टिका केली तिजकडे तुह्मी दुर्लक्ष करावें. माझें स्वतःचें मी किती जरी नुकसान करीत असलों, तरी माझ्या हातून कोणत्या तरी प्रकारें समाजाची सेवा घडत आहे. लोकांनीं मात्र उदाहरण घ्यावें अशा मासल्याची ती सेवा नाहीं हें मीं कबूल करितों. त्या दृष्टीनें पाहिलें तर माझें वर्तन इतरांस नशियती दाखल होईल. माझ्या सारख्या अभिमानी पुरुषास हा लीनतेचा विचार

किती दुःसह असेल . ह्याची तुह्मीच कल्पना करा. तुमच्याप्रमाणें मी सुद्धां प्रत्येक गोष्ट चोख व्यवहारानें पैसे देऊन कमवितों, परंतु इतकेंच करून मी धन्यता मानीत नाहीं, तर इतर लोकांसाठीं मी संपत्ति जतन करून ठेवितों. हल्लींच माझ्या संपत्तीचा त्यांना फायदा होऊं लागला आहे; कारण ती मीं कामीं लाविली आहे. मी मेल्यानंतरहि तिचा त्यांना फायदा मिळेल. परंतु ईश्वराजवळ माझें एवढेंच मागणें आहे कीं, संपत्तीमुळें मी जसा कष्टी आहे, त्याप्रमाणें कोणीहि कष्टी न होवो, ह्मणजे झालें.

**वाडिया** गंभीरपणानें म्हणाला—तुह्मी मनुष्यासारखे मनुष्य असून असे बंधनांत कां राहतां? मी असली गुलामगिरी एक घटकाभर देखील पत्करली नसती. काळजी करण्याची संवय लागली आहे, तर ती सोडून द्या, आणि दयाळू ईश्वरानें जी ऐपत दिली आहे तिचा उपभोग घ्या. तुमचे वडील जिवंत असतांना त्यांनीं तुमच्याकडे पाहून हंसावें ह्यांतच तुह्मांला परमानंद व्हावा, तुमच्या मातुश्रीचा स्वर कानीं पडला कीं, स्वर्गींच्या गायनाचीहि तुच्छता वाटावी, आणि हल्लीं धनाचा जो लोभ जडला आहे त्याहूनहि अधिक लोभ तुह्मी सारख्या सारख्या वयाच्या खेळगड्यांवर करावा—त्या काळाचें मनन करा. प्रौढ बुद्धीच्या माणसाची समज ठेवून मुलासारखें प्रेमळ हृदय करा. तर मग खात्रीनें मनाची शांती राहून बाहेरहि तुह्मी व्यग्र असणार नाहीं. हें माझें तुह्मांला मनापासून सांगणें आहे.

**पांडोबानें** कांहींएक जबाब दिला नाहीं. परंतु गहिंवरून गेल्यानें चेहऱ्यावर फेरफार होऊं लागले, ते **वाडिया** व **आदरजी** ह्यांच्या नजरेस पडूं नयेत, ह्मणून त्यानें तोंड फिरविलें, व मोठमोठ्या ढांगा टाकीत डोंगराचा कणा ओलांडून तो दृष्टीआड गेला.

---

# भाग ६.

## संकटें.

हल्लींप्रमाणें भरभराट सदोदित राहणार नाहीं ह्मणून वाडियाला हमेश धास्ती होतीच, त्याप्रमाणें कांहीं वर्षांनीं काळ फिरला. मागील भागांत सांगितल्या वेळीं लोखंडाचा जो भाव होता, तो तीन वर्षांनीं पुरा निमेनिम उतरला. ह्या मंदीचीं कारणें सहज समजण्याजोगीं होतीं. एक तर परकी देशाहून अधिक लोखंड येऊन ते कमी किंमतीला जाऊं लागलें, दुसरें आगगाडीकडे लोखंडाचा खप होण्याचें बंद पडलें, तिसरें हिंदुस्तानांतील सर्व प्रकारच्या कारखान्यांना तेजी नव्हती. वास्तविक लोखंडाचा खप हिंदुस्तानांत जितका होण्याचा, त्यापेक्षां जास्त लोखंड तयार करण्याकडे भांडवल व श्रम ह्यांचा विनियोग होऊं लागल्यामुळें बाजारांत माल पडून राहिला. ही बाजाराची मंदी फार वेळ टिकणारी नाहीं असें कित्येकांना वाटलें; परंतु इंग्लंडसारख्या परकी देशांतून स्वस्त लोखंड येऊं लागल्यानें आणि हिंदुस्तानांतहि एक दोन ठिकाणीं लोखंडाचे नवीन कारखाने निघाल्यानें धारवाडाकडील लोखंडाचा खप पूर्ववत् राहण्याचा संभव दिसत नव्हता. त्यांतून धारवाडाकडील लोखंड खपाच्या जागीं नेण्यास आगगाडीभाडें वगैरे खर्च जरव बसे, आणि विलायतेसारख्या देशाहून येणारें लोखंड जलमार्गानें कमी खर्चांत येई; त्यामुळें तर आपल्या कारखानेवाल्यांची दशाच होती.

ह्या कारखान्याची कांहीं वर्षें भरभराट होती, ती वरील कारणांमुळें पुनः आपल्या लोकांच्या कपाळीं दिसण्याची आशा मुळीं देखील उरली नाहीं. वेळोवेळीं नफा कमी कमी करीत जाण्याची पाळी भागीदार मंडळींना येई, त्यावेळीं ती मोठी कष्टी होई. आपला धंदा परकी देशांतील व ह्या देशांतील इतर कारखानदारांनीं बळकाविला, ह्मणून त्यांना कारखान्यांतील कोत्या समजुतीच्या लोकांनीं नानाप्रकारें जळफळत शिव्या

द्याव्या. परंतु ते ह्या गोष्टीचा विचार करीत नसत कीं, पृथ्वीवर ठिकठिकाणीं ईश्वरानें खनिज संपत्ति निर्माण करून ठेविली आहे, तर मग समाजाचें हित साधेल त्या प्रकारें त्या त्या ठिकाणचे लोकांनीं ती संपत्ति कामीं लावण्याचा सारखाच हक्क आहे. सर्वांच्या आटोक्यांत जे सृष्ट पदार्थ आहेत, त्यांचा उपयोग स्वतः करूं नये, किंवा दुसऱ्यांनीं करूं नये, ह्मणून आशा धरावी, हें कांहीं माणसांचें कर्तव्य नाहीं. उलट त्यांनीं असें करावें कीं, जितक्या जास्त लोकांना एकाद्या गोष्टीचा फायदा घेतां येईल तशा प्रकारें मेहनतीनें व चातुर्यानें कलाकौशल्य वाढवावें; ह्मणजे असें कीं, तयार होणारा माल जितका स्वस्त व उत्तम करवेल तितका करावा. माल अधिकाधिक चांगला व स्वस्त तयार करीत जावा, ह्मणजे त्याचा खप कायम राहतो. माल उत्पन्न करणारे लोकांत चढाओढ मागेंहि होती व पुढेंहि असणार, आणि तशी असणें अवश्यहि आहे; त्या चढाओढींत मागें न पडावें, ह्मणून मालाचा अधिक सार्वत्रिक उपयोग करविण्याकडे झटलें पाहिजे. ह्मणून वाडियाच्या लोकांनीं दुसऱ्या कारखानदारांच्या नांवांनीं खडे फोडण्यापेक्षां आपल्याच कारखान्यांतील माल इतर ठिकाणापेक्षां चांगल्या जातीच्या काढण्यासाठीं कांहीं युक्ति शोधून आपल्या धन्यास मदत करण्याची होती, ह्मणजे आपोआप त्यांना चढाओढींत डोकें वर ठेवितां आलें असतें; आणि चढाओढ तर त्यांच्या कपाळीं कधीं काळीं लागलेली होतीच.

कारखान्याच्या स्थितीविषयीं भागीदार मंडळी वारंवार काळजीपूर्वक विचार करी. प्रत्येकजण स्वतःशींच विचार करून पाही, नंतर सर्व जमून वाटाघाट करीत, आणि वाटाघाटींत जें कांहीं ठरलें जाई, त्यानें मालक व कामकरी ह्या सर्वांचें हित वाढावें. ह्मणून ते फार काळजी घेत. माल उत्पन्न करण्याच्या कामीं जे पक्ष कारणीभूत असतात, त्या दोघांचें हिताहित परस्परांशीं विरुद्ध असतें, ह्या वेडगळ समजुतीला आधार ह्मणून नाहीं, हें ते पूर्णपणें समजून होते. ह्मणून आपण वाटाघाट करून जें ठरवूं

त्यांचीं कारणें आपल्या लोकांनीं समजून घ्यावीं असें त्यांना फार वाटे; आणि ह्मणूनच कामकरी लोकांपैकीं कोणीं सरळपणानें कांहीं शंका विचारिली किंवा गाऱ्हाणें आणिलें, तर ते त्याशीं बोलण्यास हमेष तयार असत. व्यापाराची तेजी व मंदी कशी होते, ह्याविषयीं कामकऱ्यापैकीं कांहींकांनीं स्वतः वाचून माहिती मिळविली होती, त्यांना हल्लींची उतरती कळा पाहून विस्मय न होतां वाईट वाटचें; कित्येकांना शंका होत्या त्यांचें निरसन त्यांनीं मालक मंडळीस विचारून करून घेतलें. परंतु पुष्कळ अडाणी लोकांची समजूत अशी होती कीं, मालकांची स्थिति कशी जरी खालावली, तरी आपलें ह्मणून उत्पन्न कमी होऊं नये. ह्मणून मजुरीचा दर कमी करण्याचें नांव काढलें कीं, जणूं मालक मंडळी आपल्यास अन्यायानें वागवीत आहे असें वाटून ह्या खुळ्या लोकांनीं एकच ओरड करावी. भागीदार मंडळी शहाणी व दयाळू होती, परंतु ती करते काय ? स्वतःला झीज सोसावी लागून वरती लोकांनीं असा गिल्ला करावा, हें त्यांना मोठें जड जाई. त्यांचें ह्मणणें काय आहे, हें कुरकुर करणाऱ्यांनीं संथपणानें ऐकून घेतलें असतें, तर त्यांनीं देखील अशा लोकांचीं गाऱ्हाणीं लक्षपूर्वक ऐकून घेतलीं असतीं. पण त्या खुळ्या लोकांना मंडळीचें काय ह्मणणें आहे, तें ऐकण्याची इच्छा नव्हती. तें त्यांनीं ऐकून घेतलें असतें, तर कारखान्याची हल्लीं स्थिति अशी कां झाली, हें त्यांना सहज समजून आलें असतें.

ह्या लोखंडाच्या कारखान्यांत जें भांडवल लाविलें होतें, तें तीन प्रकारचें होतें ह्मणून मागें सांगितलेंच आहे. ( १ ) श्रमाचीं हत्यारें व यंत्रें; ( २ ) ज्यांवर श्रम करावयाचे ते पदार्थ; आणि ( ३ ) श्रमकार ह्मणजे कामकरी लोकांची मजुरी, ह्मणजे त्यांची उपजीविका. ह्या प्रकारांपैकीं पहिल्या प्रकारांत कारखान्याची इमारत व इतर बांधकामें, यंत्रें आणि हत्यारें यांचा समावेश होतो, आणि ह्या सर्वांची गणना अविनाशी अथवा स्थायी भांडवल ह्मणून होते. दुसऱ्या व तिसऱ्या प्रकारांत

तयार होणारे मालास लागणारे खनिज पदार्थ आणि तो माल तयार करणारे कामकरी लोक यांची मजुरी हीं येतात, आणि ह्यांसच ह्या कारखान्याचें विनाशी किंवा पुनरुत्पादक भांडवल ह्मणून समजलें पाहिजे. शुद्ध अविनाशी भांडवलापासून कांहीं नफा निघाला नाहीं, पुनरुत्पादक भांडवलांतून नफा काढतां यावा असें होतें. ह्मणजे भट्ट्या व वाफेचें इंजीन ह्यांनीं स्वतः कांहीं पैसा आणिला नाहीं; परंतु कच्च लोखंड, बाजारांत विकलें जाईल, अशाप्रकारें तयार करावें, ह्मणून त्यांची आवश्यकता होती. ज्यावेळीं तयार झालेल्या लोखंडाच्या कांबींना भाव चांगला येई, त्यावेळीं कारखान्यांतील अविनाशी भांडवलांत जो पैसा घातला होता, व अशुद्ध लोखंड आणि मजुरी ह्यांत जो पैसा खर्च झाला होता, त्या एकंदर रकमेचें व्याज सुटून शिवाय पुष्कळ जास्त रक्कम नफा ह्मणून मंडळीला मिळत असे, हा नफा त्या मंडळीचें उत्पन्न ह्मणून मोडला जाई, आणि ह्यांतून स्वतःच्या चरितार्थाचा खर्च भागवून जी बचत राही ती भांडवलांत घालण्यांत येई; त्यामुळें त्यांना जास्त मजूर लावितां येत, ह्मणजे जास्त लोखंड तयार करितां येई, आणि तेणेंकरून आपलें उत्पन्न व अर्थात् आपलें भांडवल पुनः वाढवितां येई. हें सर्व सुरळीत चाललें असतें, परकी कारखानदारांची चढाओढ नसती, व एकसारखा खप वाढत्या प्रमाणावर असता, तर भागीदार मंडळीची संपत्ति आणि कारखान्याची भरभराट, हीं एकसारखी वाढतच गेलीं असतीं, हें उघड आहे; परंतु त्याप्रमाणें झालें नाहीं, ह्मणून भांडवलाचा विनियोग अन्यप्रकारें करणें जरूर होतें.

उत्पन्न अथवा उपज अथवा जमा दोन प्रकारची असते, असें ह्मणण्याचा साधारणतः प्रचार आहे. वर जो भांडवलाचा नफा ह्मणून सांगितला तो नक्त अथवा निव्वळ जमा होय. आणि भांडवलवाल्याला जें एकंदर उत्पन्न मिळतें त्यास भर जमा ह्मणतात; ह्मणजे भरजमेंत पुनः उत्पन्न केलेलें ( पुनरुत्पादित ) भांडवल व नफा ह्यांच्या समावेश होतो, आणि नक्त जमेंतफक्त नफ्याचाच अंतर्भाव होतो.

लोखंडाचा भाव उतरला तेव्हां पूर्वीपेक्षां साहजिकच भरजमा कमी आली; आणि तींतून भांडवल पुरें केल्यावर नेहमींपेक्षां लहान अशी रक्कम नक्तजमा ह्मणून राहिली. तें पाहून शहाण्या विचारी माणसांप्रमाणें भागीदार मंडळींनीं आपल्या रहाणीचा खर्च त्या मानानें कमी केला. **बरजोरजीनें** दोन नोकर कमी केले आणि त्या वर्षी मुलांना नेहमींप्रमाणें **मुंबईस** पाठविलें नाहीं. त्याला पुस्तकें घेण्याचा नाद असे, पण तशीं पुस्तकें किंवा दुसरे चैनीचे पदार्थही त्यानें फारसे घेतले नाहींत. **बाडियानें** गाडीला फांटा दिला, व **गुलबाईनें** एक आया ठेविली होती ती काढून ती आपल्या केशाचा स्वतःच बुचडा घालूं लागली. **पांडोबानें** तरी असेंच सांगितलें असतें. ह्या काटकसरीनें भागीदारांचा इच्छित हेतु सर्वथैव पार पडला नाहीं. कारखाना सुरू केल्यापासून कायतें ह्याचवेळीं त्यांना कळून आलें कीं, वर्ष अखेरीस भांडवलांत भर पडण्याची ती मुळीं देखील पडली नाहीं. पुढल्या वर्षी त्यांनीं मागच्या पेक्षांहि खर्च कमी केला. परंतु नक्तजमेंतूनहि त्यांचा घरचा खर्च पुरा होऊं शकला नाहीं, तेव्हां घरच्या व कारखान्याच्या खर्चांत आणखी काय काय छाटाछाट करण्यासारखी आहे ह्याचा विचार करणें त्यांना भाग पडलें. ते जाणून होते कीं, ‘सर्वांच्या हिशासाठीं भांडवलाला हात न लावितां तें जशाच्या तसें कायम ठेविलें पाहिजे, हा हेतु प्रत्येकानें लक्षांत वागवावा, कारण कमी भांडवल लावावें, तर कमी श्रमकार कामावर लागतील, आणि बाजारांत कमी लोखंड जाईल. त्यामुळें साहजिक दरवर्षास भर व नक्तजमा हळूहळू कमी होत जाऊन अगदीं नाहींशी होईल.’

आपलें अविनाशी भांडवल जशाच्या तसें कायम ठेविलें पाहिजे हें ते पूर्णपणीं समजून होतेच. त्यांत कांहीं फेरफार होण्याचा असेल, तर त्यांत भर घालून तें वाढविण्याच्या रूपानें तो फेरफार हमेष असला पाहिजे. ह्याचा अर्थ असा घेण्याचा नाहीं कीं, जास्त भट्ट्या बांधून अविनाशी भांडवल वाढविण्याचें, तर ज्या श्रमाला मजुरी पडते त्याऐवजीं यंत्रें, ह्मणजे

सांठविलेले किंवा संचित श्रम, हीं लावून तें वाढविण्याचें. पण मजुरीचे दर कमी केल्याखेरीज हें साधण्यासारखें नव्हतें. ह्मणून कोणताहि फेरफार करूं ह्मटलें, तर तो विनाशी अथवा पुनरुत्पादक भांडवलांतच होण्यासारखा होता. कच्चें लोखंड मारून तयार करण्याच्या कृतींत कांहीं काटकसर होण्यासारखी असल्यास पहावी, या उद्देशानें भागीदार मंडळीनें कृतीच्या प्रत्येक भागाविषयीं लक्ष लावून विचार केला. ह्यावरून असें निष्पन्न झालें कीं, धातूच्या पहिल्या गाळणींत तूर्त कांहीं फेरफार होण्यासारखा नाहीं, पण साळींत व लोखंड शुद्ध करतांना कोळंजलेला कोळसा पुष्कळ निघे, त्यांत एक प्रकारची माती मिळवून त्या मिश्रणांतून हलक्या जातीचें लोखंड तयार करितां येईल. कित्येक कामाला असलें लोखंड चांगलें खपेल असा अजमास होता, ह्मणून अनुभवासाठीं त्यांनीं त्याप्रमाणें कांहीं लोखंड तयार केलें. परंतु ह्यामुळें फ्रामरोज व जहांगीर ह्यांच्या आशानुरूप कांहीं यश आलें नाहीं. ह्या दोघांनीं ह्याविषयीं पुष्कळ मेहनत घेऊन लक्षपूर्वक विचार केला होता. कोळंजलेल्या कोळशाचे ढीगाचे ढीग दिसण्यांत वाईट दिसतात, तर ते ह्या कामीं उपयोगीं पडून पार नाहींसे होतील, असें त्यांना फार वाटत होतें. पण तशा प्रकारचा सर्व कोळसा उपयोगांत न येतां घडींव लोखंड करतांना साळींत व शुद्ध होण्याचा जागीं जो कोळसा निघे तेवढयाचाच कायतो उपयोग होऊं शकला, त्यामुळें ह्यांची इच्छा सफळ झाली नाहीं.

ही एक कसर निघाली, पण पुढें आणखी काय केलें पाहिजे, हा विचार मंडळीला पडलाच. तेव्हां मजुरीच्या रूपानें पुनरुत्पादक भांडवलांत जी रक्कम लागे, ती कमी करावी असें ठरलें, व त्याप्रमाणें अंमलांत आलें. पहिल्यांदा मजुरी कमी करण्यांत आली, तेव्हां लोकांनीं मुकाटयानें ऐकिलें; दुसऱ्या वेळीं मूर्ख लोक कुरकुर करूं लागले, आणि कित्येक दूरदर्शी व विचारी लोकांस भीति व दुःख वाटूं लागलें; तिसऱ्या

वेळीं तर दंगा करण्याच्या धमक्या उघड येऊं लागल्या. अशा कमी 'मजुरीवर काम करण्याचें कित्येकांनीं नाकारिलें. कारखान्याच्या मालकांनीं त्यांना नीट समजावून सांगितलें ' बाबांनो, तुमचें नुकसान होतें हें खरें, पण आमचें भांडवल जशाच्या तसें कायम राहून मुद्दमालाला हात घालण्याचा प्रसंग येणार नाहीं, तोंपर्यंत बाजारांत आपल्या कारखान्याचा माल गेला पाहिजे. नाहीं तर पत जाईल. करितां कारखाना तर चालू ठेवून, विकवेल तितकें स्वस्त विकून काढवेल तितकें लोखंड काढलें पाहिजे. ह्यासाठीं आह्माला निरुपायानें कमी मजुरी द्यावी लागत आहे. तुह्मीच सांगाना, तुह्माला नाखूप करून आह्माला फायदा होईल, का? हें ऐकून ते लोक पुनः मुकाट्यानें कामावर आले. परंतु ही शांतता फार वेळ टिकली नाहीं.

बाजारात लोखंडाचा भाव एकसारखा उतरतच चालला; त्यामुळें तें तयार करण्याच्या कामीं होणारा खर्च आणखी कमी करण्याचा प्रसंग आला. कांहीं कांहीं कामें हातांनीं होत होतीं, तीं यांत्रिक युक्त्यांनीं केल्यास स्वस्त पडतील असें अनुभवांतीं कळून आलें; ह्मणून कांहीं यंत्रें आणून कित्येक मुलें व माणसें ह्यांना काढून टाकिलें. त्यामुळें बरीच ओरड झाली, परंतु त्याला उपाय नव्हता. कारखान्यानें भांडवल जशाच्या तसें राखण्याला दुसरा मार्ग नव्हता, आणि त्या भांडवलावर तर मालक व कामकरी हे उभयतां सारखेच अवलंबून होते. आतां हें खरें आहे कीं, निरुद्योगी व अशक्त असेच लोक कढण्यांत आले. त्यांचे शेजारीपाजारी व कारखान्याचे मालक ह्या सर्वांना असें वाटलें कीं, हे काढलेले लोक काम मिळेल अशा ठिकाणीं चालते होतील, व येथें सर्वांना सुखासमाधानांत राहूं देतील. परंतु ते लोक त्या ठिकाणींच आपली पुंजी संपेपर्यंत ठाणें देऊन राहिले, आणि इतर लोकांस सांगत ' हा वेड्यांनो, ' तुह्मी कामावर जातां कशाला? सांगा त्या मगरूर पारशांना कीं, आम्हांला जास्त मजुरी मिळाल्याखेरीज आह्मी साफ काम करीत नाहीं. ते पारसुटले मोठे

गोडबोले आहेत; पण याद ठेवा, ते महा काफर व लबाड आहेत. आणि तीं त्यांनीं यंत्रें हो कशाला आणिलीं? तुह्मीच ह्मणतां कीं, कारखानेवाले दयाळू आहेत. मग यंत्रें आणून आमच्या पोटावर पाय कां दिला? अहो त्यांच्या बोलण्यावर कशाला जातां? आज आमची जी गत तीच उद्यां तुमची ह्मणून समजा. अहो हे पारशी ह्मणजे कामापुरते मामा. ह्यांचा कोणीं देखील विश्वास धरूं नये, समजलां.' अशा प्रकारचीं बोलणीं ऐकून सर्व समंजस लोकांना फार त्रास होई. काढलेल्यांपैकीं कांहींजण काम मिळण्यासाठीं इतर ठिकाणीं गेले, पण ते वरचेवर परत येऊन लोकांना चिथवून देत. अगोदर लोक बिचारे गरिबीमुळें व काळजी कर करून कष्टी होत, त्यांत ह्या लोकांचीं बोलणीं; मग काय, त्यांचा जीव अगदीं त्रासून जाई. बटवड्याच्या दिवशीं तर हे नादान लोक कचेरीच्या दाराशीं उभे राहत, आणि लोक मजुरी घेण्यासाठीं आंत जाऊं लागले, किंवा मजुरी घेऊन परत येऊं लागले कीं, ह्यांनीं त्यांस हिणवीत असावें, 'अहाहा, किती मजुरी मिळते ही? कारखानेवाल्यांचा मोठा उपकारच ह्मणायाचा कीं, पोटभर देखील अन्न घेतां येणार नाहीं, अशी मोठी रकम ते तुह्माला देतात.' एवढ्यानेंही ते लोक चिडले नाहींत, तर मग त्यांनीं ह्मणावें 'हो खरेंच, ह्या बिचाऱ्यांचा तरी काय दोष? पडले बिचारे भोळे, ह्मणून ठेवतात त्या पारसुटल्यांवर विश्वास. पण ते कसे कावळे आहेत, पहा. तुह्माला त्यांचा कावा समजेल, तरच सगळ्या गोष्टी. आतां पहा, ह्यापूर्वीं इतकीं यंत्रें नव्हतीं, त्या वेळीं आपण कसे सारेजण आनंदांत होतों. पण नाहीं, त्यांना नाहीं हें देखवूं शकलें. जें काम इतका वेळ आपण हातांनीं करीत होतों, तें देखील करण्यासाठीं त्यांनीं लोखंड व लांकूड लाविलें. असा तर त्यांचा घाट; आणि ते गोड बोलून तुमच्या डोळ्यांत धूळ टाकतात व पोटांत कांटे ढकलतात.' पण ह्या वाक्पांडित्याला कांहीं शहाणे लोक फसत नसत. ते साफ उत्तर देत 'बाबांनो, उगाच तुह्मी आमचें मन बिघडवूं नका. आह्मी कां

घोळ्यांनीं दुध पीतों, कीं आम्हाला समजत नाहीं, ह्मणून तुह्मी अशी चतुराई चालविली आहे. अहो हल्लीं काळ बदलला. गोष्ट खरी; पण त्याचें कारण कांहीं नवीन यंत्रें नव्हते, तर त्यामुळें नवीन यंत्रें आपल्या कारखानेवाल्यांना लावावीं लागलीं. तीन वर्षांपूर्वीं आपण सारे आनंदांत होतों, हेंहि खरें; पण हें लक्षांत ठेवा कीं, त्याच वेळीं जर हीं यंत्रें कारखानेवाल्यांनीं आणिलीं असतीं, तर आज ह्याहूनहि आपली स्थिति चांगली असती, परंतु बरेच जण मूर्ख असत, व कित्येक इतके निरुत्साह झाले होते कीं, अशी कांहीं ओरड करण्याला सबब सांपडली कीं पुरे, ते त्याचाच खल करीत बसत. अशा लोकांना त्या रिकामटेकड्या लोकांचें बोलणें खरें वाटून त्यांच्या मनाचा साहजिक असा कल होई कीं, साऱ्या कारखानेवाल्यांनीं मिळून आपल्यावर जुलूम चालविला आहे.

शेवटीं एके दिवशीं दुर्दैवानें असें झालें कीं, नवीन यंत्रांच्या एका भागाकडे एक मुलगा काम करीत असे, तो गाफल राहिल्यानें त्याच्या कपाळावर यंत्राचा दांडा आदळून जागच्या जागीं ठार झाला. ह्या अपघाताबद्दल जुन्या यंत्राला दोष देणें जितकें शहाणपणाचें झालें असतें, तितकेंच नवीन यंत्रालाही दोष देणें शहाणपणाचें होतें. जर भट्टींत बीड घालणारानें स्वतः होऊन आगींत उडी घेतली असती, किंवा भट्टीवाल्यानें मुशींतून रस सांच्यांत सोडतांना वाटेंत उभें राहून स्वतःला भाजून घेतलें असतें, किंवा रुळाखालीं घडींव लोखंडाचें तुकडे दाबीत असतां आपला हात तेथें कोणी घालून हातांचा चेंदामेंदा करून घेतला असता, तर लोकांनीं ज्यांच्या त्यांच्या निष्काळजीपणाबद्दल ज्यांचा त्यांनां दोष दिला असता. त्याचप्रमाणें ह्या वेळींहि वास्तविक पाहिलें, तर असेंच होणें रीतीचें होतें. परंतु आतां नवीन यंत्रांवर सारा दोष येऊन पडला, आणि हा अपघात होतांना जे लोक जवळपास होते, त्यांनीं तर इतर नाराज मंडळीचें मन बिघडविण्याची आयती संधि साधली. एकंदरींत तो प्रसंग वाईट होता.

लोक एकदम ओरडले, त्याबरोबर मुकादम त्या जागीं आला, आणि पहातो तों मुलगा ठार मरून पडला आहे, व त्याच्या भोंवती चार पांच लोक जमले आहेत. त्या मुलाच्या मस्तकाची कवटी फुटून त्याचा चेहरा छिन्नभिन्न झाला होता, त्यामुळें पाहणाराला साहजिक भीति वाटून शहारे येत. एक मुसलमान मजूर रागाच्या भरांत मोठ-मोठ्यानें ओरडूं लागला. तो म्हणाला ' काय चमत्कार आहे? गरिबांच्या जीवावर हे मोठे पारशी शेटये मजा मारतात. त्यांची लहर लागेल, त्याप्रमाणें आपले जीव घेण्याचें त्यांना पोरखेळाप्रमाणें वाटावें कीं काय? त्यांच्या समोर उभें राहून काम तर केलें पाहिजे, शिवाय ज्या यंत्रांपुढें आपला उपाय चालत नाहीं, त्यांनीं जखमी होऊन जीवा-सही मुकलें पाहिजे. हा कां जुलूम ह्मणावा, कीं ही इंग्रज सरकारच्या न्यायी अंमलांतील गुलामगिरी ह्मणावी? अरेरेरे काय करावें?'

जवळ एक शांत व दिसण्यांत दूरदर्शी असा माणूस उभा होता, तो त्या मुसलमानाचा आवेश घालविण्याचा यत्न करीत होता. पण त्याचा परिणाम आगीवर तेल ओतल्याप्रमाणें मात्र झाला. तो ह्मणाला ' भाई ज्यांना कांहीं खायला कां प्यायला लागत नाहीं, जे कधीं मजुरी मागत नाहींत किंवा ओरड करीत नाहींत, असे मुके मनाजोगें काम करणारे गुलाम मिळाल्यावर आपल्या कारखानेवाल्यांना आनंद कां होऊं नये! आपण त्यांच्या कानाशीं हाकाटी करितों कीं, आह्मी व आमचीं बायकामुलें ह्याचें पोट चाललें पाहिजे, तर त्यांना साहजिकच आपला कंटाळा आला आहे. लोखंड व लांकूड हीं कांहीं अशी कुरकुर करीत नाहींत, तर आपल्या ऐवजीं तीं त्यांना आवडूं लागावीं, ह्यांत नवल तें कोणतें?'

तो मुसलमान त्या मुलाकडे बोट दाखवून म्हणाला ' होय तीं बोलत नाहींत, आणि मेलेला माणुसहि सांगायाला परत येत नाहीं. पण पक्की खात्री असूं द्या कीं, पांच दहा कोसांच्या आंत कारखानेवाल्यां-

ह्यॉ जुलुमानें गांजिलेल्या साऱ्या मंडळींला त्वेष येईल, अशाच प्रकारें ह्या मुलाचें प्रेत न बोलेल, तर माझें नांवच इस्मायल नाहीं ह्मणून समजा. मी त्याला पाठीवर टाकून एका कारखान्यांतून दुसऱ्या कारखान्यांत घेऊन जाईन, आणि ज्यांना ज्यांना ह्मणून ह्या कारखानेवाल्यांच्या फाचांतून मुक्त होण्याचें असेल ते सारे ह्याला मूठमाती देण्यासाठीं माझ्या पाठोपाठ येतील, समजलां.'

दुसरा मजूर शांततेनें ह्मणाला. पण तुह्मी कारखानेंवाल्यांची नालस्ती कशी कराल ? ते उलट असें ह्मणतील कीं " लोखंडानें हाडांचा चुराडा व्हावा, हा लोखंडाचा धर्मच आहे. त्यांत आमच्याकडे काय दोष !" भाई ते तुह्माला असें सांगतील "हा मुलगा बेकार असता, तर हा प्रकार घडला नसता." आणि त्यांची इच्छा पण अशीच आहे कीं, आपण साऱ्यांनीं घरीं बसावें. तें असेंहि पण ह्मणतील कीं, हा मुलगा मुकाट्यानें आमच्याकडे कामावर न येतां जर स्वतःचें पोट भरण्याची ऐपत जवळ नसल्यानें दारोदार तुकड्यासाठीं हिंडत असता, तर ......'

इतक्यांत एक रडवा स्वर ऐकूं आला ' अरे माझ्या मुला, अरे माझ्या छाडक्या, अहो, मला माझा मुलगा दाखवा. मी त्याला पाहीन. त्याचा जीव कोणीं घेतला तें मला सांगा. मी त्या चांडाळाचा सूड घेईन, अहो मला माझ्या मुलाकडे जाऊं द्या. तुह्मी असें निर्दय होऊं नका. मला कां धरितां ? अहो मी तुमच्या पायां पडते. मला अडवूं नका. मी तुह्मां साऱ्यांचा सूड घेईन. हा मांगानो, माझा बाळ कीं हो मारिला. त्या बिचाऱ्यानें तुमचा काय अपराध केला होता?'

हें बोलणें त्या मुलाच्या दुर्दैवी आईचें होतें. ती बिचारी घरीं काम करीत होती, तेथें तिला कोणीं मुलगा मेल्याचें सांगितलें. तें ऐकतांच ती रडत ओरडत एकसारखी धांवतच आली. मुलगा कसा मेला हें मात्र तिला ठाऊक नव्हतें. परंतु कोणीं तरी त्याला मारिलें असावें, अशी तिच्या मनाची पक्की समजूत झाली होती; त्यामुळें तिनें मुलाचें

प्रेत पाहिलें, तरी तिचा ग्रह तसाच राहून ती एकसारखी किंकाळ्या फोडीत सूड घेण्याविषयीं बोलूं लागली.

तो शांत माणूस ह्मणाला—बाई, पण सूड घेणें का सोपें आहे? हें यंत्र मोडून त्याचे तुकडे तुकडे केले, तरी त्याला का दुःख वाटणार आहे? ह्मणून यंत्र मोडून कांहीं अर्थ नाहीं; बरें तूं ह्मणशील कीं, ज्यांनीं हें यंत्र आणून कारखान्यांत उभें केलें. त्यांवर सूड उगवावा ह्मणून. तर बाई, हा केवळ वेडेपणाचा विचार आहे. कारण ते मोठे लोक पडले. त्यांवर आपल्या सारख्यांच्या हातून कसा सूड घेतां येईल?

तो तापट मुसलमान ह्मणाला— मोठे असले, ह्मणून काय झालें! चांगला सूड घेतां येईल. त्यांचा कारखाना मोडून तोडून टाकिला, तर आपल्या हक्कहलालीची आपण मजुरी घेतली इतकेंच होईल. आणि असा आपला हक्क आपण घेतला, ह्मणजे आपल्या मगरूर मालकांना मिरच्या लागणार नाहींत काय? समजा कीं त्यांना त्याचें वाईट वाटलें नाहीं तरी त्यांनीं आपला हक्क दिला, इतकें तरी होईल कीं नाहीं. ( बिचारी म्हातारी मुलाच्या अंगावर अंग टाकून ओकसाबोकसी रडत होती, तिजकडे वळून ) बाई, आतां रडून काय उपयोग? तुझें तूं आपलें घेऊन जा. तुझा मुलगा चांगला सशक्त व जिवंत पुष्कळ वर्षें असता, त्याच्या ऐवजीं निर्जीव मातीच्या ढेपेसारखा त्याचा मुडदा घेऊन जा. त्याचे डोळे जिवंतपणीं किती उत्सुकतेनें व प्रेमानें तुजकडे बघत असत, ते पहा, आतां कसे निस्तेज व भयंकर झाले आहेत? ते आतां झांकून टाक, त्याचा हात आता धरूं नकोस. तूं थकून तुझे हात चालेनातसे झाले, ह्मणजे त्या त्याच्या हातांनीं तुला खायाला भाकर आणून द्यायची, त्या हातांनीं तुला बिछाना घालून द्यायचा, आणि तूं त्याला दुवा देण्यासाठीं आपले हात कायते वर करायचे. अहो, तुह्मी असे वेड्यासारखे उभे राहून पाहतां काय? त्याच्या तोंडावर पांघरूण घाला. नाहीं तर हल्लींची त्याची छिन्नभिन्न व भयंकर मुद्रा पाहून त्याची आई त्याचें जिवं-

तपगीनें हंसतमुख विलक्ल जाईल, आणि तिच्या नजरेसमोर, परेपर्यंत रात्रंदिवस ही भयंकर मुद्रा राहील. हेंहि एक बरेंच आहे कीं, तो हल्लीं हंसत नाहीं. नाहीं तर म्हातारीच्या मनांत सूड घेण्याचा विचार टिकणार नाहीं.

त्या प्रेताभोंवतीं कराच घोळका झाला होता. त्या घोळक्यांत बाहेरच्या अंगास जी मंडळी होती, त्यांतून एक मोठ्या आवाजानें बोलला 'सूड घेण्याविषयीं कोण छाती करून बोलत आहे? कोणावर तुह्मी सूड घेणार तें सांगा पाहूं ?' हे शब्द **पांडोबाचे** होते. तो नुकताच आला होता, तों त्याच्या कानीं **इस्मायलाचे** शेवटले शब्द पडले. त्यावरून त्यानें मुकादमापेक्षा जास्त हिय्याकरून वरप्रमाणें दरडाविलें.

त्या मुलाची आई ताठ उभी राहून मोठ्यानें ओरडली 'कोण ह्मणजे मी. मला सूड पाहिजे.' तिचे केश सुटून खांद्यावर विसकळून पडले होते. तिनें मुठी आवळून रागानें डोळे वटारिले होते. ह्याप्रमाणें तिची एकंदर मुद्रा अक्राळ विक्राळ होती.

**पांडोबा** तिजकडे मंडळींतून जातां जातां सौम्यतेनें ह्मणाला—बाई तुह्मी कां होतां ? मला वाटलें, दुसऱ्या कोणाचा आवाज होता. ( तिचा हात हळूच धरून तो तिला घेऊन जाऊं लागला ). बाई, आतां येथें बसून कांहीं अर्थ नाहीं. तर तुह्मी मजबरोबर चला. मी तुह्माला तुमच्या घरीं घेऊन जातों. तो मागून येईल. ( परंतु ती प्रेताला धरण्यासाठीं जात आहे असें पाहून ) मंडळी त्याला घरीं आणतील, 'आणि तेथें तुह्माला थोडेसें बरें वाटेल.

त्या म्हातारीला पुनः दुःखाचा उमाळा येऊन ती ह्मणाली—बरें वाटेल; हो हो फार बरें वाटेल. रात्रीं किंवा दिवसां मला बोलायला मुलगा राहिला नाहीं, तर कां बरें बरें वाटणार नाहीं!

तापट मुसलमान ह्मणाला—भाई तिला बरें वाटायला नको, की मनाला स्वस्थता वाटायला नको, तिला सूड हवा; आणि जो शब्द मघाशीं ऐकिला तो माझाच समजला.

**पांडोबा** गंभीरपणानें ह्मणाला—तर मग तुह्मी काय ह्मणतां, ह्याचें तुह्माला भान नव्हतें,

मुसलमान ह्मणाला—तुह्मीहि माझ्यासारखेंच ह्मटलें पाहिजे. तुह्मी आमच्यांत मिळाले पाहिजे, नाहीं तर तुमची हड्डी नरम होईल.

**पांडोबा** ह्मणाला—मी साफ ह्मणणार नाहीं, कारण कोणाचें नुकसान झाल्याचें माझ्या माहितींत नाहीं.

परंतु **पांडोबा**च्यानें पुढें बोलवेना, कारण लोकांनीं एकच गोंगाट केला. ते ह्मणूं लागले—वः काय ह्मणे कोणाचें नुकसान झालें नाहीं. ह्या प्रमाणें सृष्टिक्रमाविरुद्ध आपघात होऊन त्या गरीब रांडकीचा पोरगा त्या कारखान्यांत मारला जावा, हें कांहींच कां त्या बिचारीचें नुकसान नाहीं. कारखान्याच्या मालकांनीं हातांत सुरी घेऊन त्या मुलाचा गळा त्यां ह्मातारी समोर समजा कापला असतां, तर जितकें तिचें नुकसान होऊन शोक झाला असतां तितकेंच हल्लींच्या आपघातानेंहि तिला झालें आहे.

हें बोलणें ऐकून तापट **इस्मायल**ला अधिकच त्वेश चढला. तो लागलाच **पांडोबा**च्या अंगावर गेला व त्यास पाडूं लागला. परंतु **पांडोबा** शांत असल्यानें त्याची बाजू सरस होती; शिवाय तो मोठा शक्तिवान होता. मुसलमानाला त्यानें अंगावर येऊं दिलें आणि नंतर पेंच करूच त्याला धाडकन भुईवर पाडलें. त्या मुलाच्या आईनें आपल्या घरीं शोक करीत बसण्याचें सोडून ह्या तंट्याला मदत द्यावी हें दिसायाला किती तरी वाईट होतें! **इस्मायल** खालीं पडला, त्याला ती उठवूं लागली, व त्याला मारामारी करण्याला पुनः हुरूप यावा ह्मणून बोलत होती. त्यावेळीं तिच्या चेहऱ्यावर राग व तिरस्कार किती तरी दिसत होता! आपल्या अंगावर विनाकारण चालून आला त्यामुळें **पांडोबा**लाहि राग येत होता, परंतु त्याची नजर त्या ह्मातारीकडे जातांच त्याच्या डोळ्यास पाणी आलें.

हें इकडे चाललें होतें इतक्यांत घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं

आला आणि लागलाच वाडिया आला. तो बरेच तास कारखान्यांत नव्हता, पण त्याला ही बातमी लागताच तो तडक घोड्यावरून आला. इतका वेळ मुकादमाची शुद्धी व चलनवलन गेल्यासारखें झालें होतें; पण वाडियाला पाहतांच तो शुद्धीवर आल्यासारखा झाला. त्यानें वाडियाला रस्ता करून दिला. अशा वेळीं असा प्रकार व्हावा हें पाहून वाडियाला किती वाईट वाटत होतें तें त्याच्या चेहऱ्यावरूनच दिसत होतें. तो घोड्यावरून न उतरतां पांडोबा व इस्मायल ह्यांच्या दरम्यान तसाच गेला, व दोघांनींहि निरनिराळ्या वाटांनीं एकदम निघून जावें असें निक्षून सांगितलें. जमलेल्या मंडळींसहि त्यानें तेथून हांकून लाविलें, म्हातारीस मुकादमाच्या स्वाधीन केलें, व प्रेताची पुढील व्यवस्था लोकांकडून लाविली.

अपघात झाल्याची बातमी गुलबाईच्या कानावर उडत उडत आली परंतु नंतर जो वर सांगितलेला प्रकार झाला होता तो तिला ठाऊक झाला नाहीं म्हणून ती अर्ध्या तासाच्या आंत त्या म्हातारीच्या घरीं जाऊन तिला उगाच शेजारीपाजारी येऊन त्रास न देतील अशी खबरदारी घेऊं लागली. आणि तिचें समाधान करूं लागली परंतु हें तिचें करणें कित्येक नाराज झालेल्या मंडळीस आवडलें नाहीं आणि जेव्हां कां त्या म्हातारीचा पूर्वीचा रोष जाऊन तिच्या विचारांत फरक पडत चालला आणि ती आपल्या मुलाच्या मरणाबद्दल शांतपणें बोलूं लागली व गुलबाई सारख्या थोर बाईनें येऊन आपलें समाधान केल्याबद्दल ती कृतज्ञतापूर्वक बोलूं चालूं लागली, तेव्हां तर त्या कुटिल मंडळीच्या पायाची आग मस्तकाला गेली. त्यानीं त्या म्हातारीला लख्ख सांगितलें ' बाई, ती बया पारसुटली आली होती, ती कशाला कांहीं समजलांत का? तुम्ही पडल्या भोळ्या. तुम्हाला या कावळ्यांचे कावे कोठून समजणार? तिनें जी इतकी साखर पसरली त्याचा हेतु इतकाच कीं, तुम्ही सूड घेण्याचें सोडून द्यावे ' त्यांपैकीं एक दीर्घ शहाणा म्हणाला ' अहो आपण ओरड केल्याचा परिणाम कांहींच नाहीं, असें

समजूं नका. आतां पहा आपण थोडीशी कुई केली, त्यासरशीं अशा छानदार पोषाख केलेली व नखरेबाज पारशीण पायींच तडफडत आपल्यासारख्या गरीब मजुराच्या झोंपडींत कशी झकत आली, आणि कांबळ्या वर येऊन कशी फतकल मारून बसली? जशी कांहीं अगदीं बाळपणापासून झोंपडींत बिचारी वाढली होती. तुह्मीच सांगा, हा कांहीं लहान सान फायदा आहे.' दुसरा विचारूं लागला 'पण बाई, तुम्हाला तिनें असा कसचा कानमंत्र केला कीं, त्यामुळें नवीन यंत्राविषयीं तुमच्या मनांत कांहीं देखील पाप आलें नाहीं ?'

ह्मातारीनें उत्तर दिलें 'बाबांनो, इतर थोर बाया आपल्यासारख्यांच्या घरीं येऊन बोलतात चालतात, त्यांचें मी उदाहरण सांगत नाहीं; पण गुलबाई देखील ह्मापूर्वी कधीं आपल्या येथें आल्या नाहींत, असें थोडेंच आहे? त्या बाईविषयीं एवढा तरी मला अनुभव आहे कीं, त्या मोठ्या मायाळू आहेत. आतां इतकें खरें आहे कीं, प्रसंगाखेरीज त्यांचा मायाळूपणा लोकांना कळून येत नाहीं. इतर वेळीं त्या गर्विष्ठ आहेत असें भासतें. त्यांनीं आतां नवीन यंत्राबद्दल चकार शब्द देखील मजपाशीं काढला नाहीं. मला वाटतें, त्या बिचाऱ्यांना या यंत्राविषयीं कांहीं देखील माहीत नाहीं. आणि हेंहि खरेंच आहे कीं, त्यांचे यजमान त्यांना कशाला कारखान्यांतील इत्थंभूत वर्तमान सांगत बसतील? आतां बाबांनो, तुह्माला असें वाटूं देऊं नका कीं, मी ह्मणजे हें नुकसान कधीं विसरेन, किंवा त्याची कधीं क्षमा करीन? त्याचें नांव नको, पण त्याचें प्रायश्चित्त कारखानेवाले भागीदार मंडळीला भोगायाला लाविलें पाहिजे. त्यांच्या बायकामुलांना त्याजबद्दल कां ह्मणून त्रास पोंचावा? निदान मी तरी ह्मा बाईंना माझ्या तोंडानें ह्माविषयीं एक अक्षर देखील बोलणार नाहीं.'

एक जण ह्मणाला 'अहो पाहिला, हा पारशिणीचा कावा ?'

दुसरा ह्मणाला 'अहो तिनें गोडगोड बोलून तुह्माला भुरळ किहो घातली?'

तिसरा ह्मणाला ' पण बाई, तुह्मी कशा अशा तिच्या मानभावीपणाला फसलां !'

त्या म्हातारीचा स्वभाव मूळचाच चंचल होता, आणि हल्लीं तर तिजवर असा दुर्धर प्रसंग आल्यानें ती अधिक हलक व क्षीण झाली होती. अशा वेळीं वरील बोलण्यांनीं तिच्या विचारांत साहजिक चलबिचल होऊन, शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या अगदीं मनाप्रमाणें तिच्याहि मनांत गुलबाई-विषयीं पाप आलें.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं गुलबाई न्याहारी करून म्हातारीच्या भेटीस जाऊं लागली, त्या वेळीं झोंपड्यांतून मुलें बाहेर तिच्या वाटेवर येऊन तिजकडे टौकारून पाहूं लागलीं, आणि मुलांच्या आया दारांत उभ्या राहून तुच्छ मुद्रेनें तिजकडे बघूं लागल्या. हा सर्व प्रकार पाहून तिला चमत्कारिक वाटलें, ह्मणून ती तशीच झपाट्यानें म्हातारीच्या झोंपडीकडे गेली. परंतु म्हातारीनें झोंपडीचें दार आंतून लावून घेतलें होतें. गुलबाई दार उघडण्यासाठीं थाप देऊं लागली, तेव्हां खिडकी उघडून एकानें उद्धटपणें जबाब दिला ' तुह्मी कशाला येथें आलां ? तुमचा सुळसुळाट म्हातारीला नको आहे, तर आल्या वाटेनें परत जा कशा. '

गुलबाई ह्मणाली.—बरें तर, माझी कांहीं हरकत नाहीं. पण दार उघडून मुलाच्या दिवसपाण्यासंबंधानें माझा निरोप ऐकून घेऊन त्या म्हातारीला तरी कळवा. '

हें बोलणें म्हातारीला कळविण्यासाठीं तो माणूस खिडकीजवळून आंत गेला. लागलीच, आंतील लोक नको नको म्हणत असतांहि ती म्हातारी चवताळून खिडकीपाशीं आली, आणि एकाद्या कृत्येप्रमाणें तिनें तोंडाचा पट्टा सुरू केला. दिसण्यांतहि ती कृत्येप्रमाणेंच होती. ती हातवारे करीत ह्मणाली ' अग जाग भावनी, मोठी आली आहे शिष्टाई करायला. पण माझ्या वाटेस जाऊं नकोस, समजलीस. नाहीं तर जळ जाईल. ज्यांनीं माझ्या पोराचा जीव घेतला, त्यांनी

त्याच्या दिवसपाण्याची पंचाईत ती कशाला हवी ? आल्या वाटेनें जा-तेस कीं नाहीं, कां दाखवूं तमाशा? मोठी आली आहे, वोहचकपणा करायचा.' असें बोलून तिनें एकसारखा अपशब्दांचा भडिमार चालविला. दोन बाजारबसव्या भांडूं लागल्या असतां जो शिव्याचा वर्षाव होतो, तद्वत् त्या म्हातारीचें तोंड सुटलें. गुलबाईला अशी भाषा ऐकण्याचा प्रसंग कधींहि नसल्यानें, भोंवळ येऊन मट्कन भुईवर बसते कीं काय अशी तिची अवस्था झाली. तिचा गडी कांहीं कामासाठीं मागें राहिला होता, तो इतक्यांत काम आटोपून आला. हा प्रकार पहातांच त्याच्या अंगाची लाही लाही झाली. त्याची मुद्रा रागानें इतकी बदलून गेली कीं, आतां ह्यानें कोणावर हात टाकिल्यास परिणाम चांगला होणार नाहीं, असें मनांत आणून ती चटकन शुद्धीवर आली. ती एकदां कां कर्तव्याला लागली, म्हणजे तिच्यासारखी समजूतदार व धीराची कोणी नसे. ह्या प्रसंगीं काय केलें पाहिजे त्याचा तत्काळ मनाशीं शहानिशा करून, तिनें आपल्या गड्याला चीप बसण्याची इशारत केली, आणि 'कोणी कांहीं जरी बडबडला, तरी उत्तर म्हणून देऊं नकोस' असें त्यास निक्षून सांगितलें. नंतर खिडकीच्या चिरणी-पाशीं उभें राहून तिनें कागदाच्या चिटोऱ्यावर पेनसलीनें कांहीं खर-डून ती चिठ्ठी **बरजोरजी**ला नेऊन देण्याविषयीं गड्याला सांगितलें. वाटेंत आपले यजमान जरी भेटले, तरी त्यांना म्हणून हल्लींच्या प्रसंगाचा यत्किंचित ही सुगावा लागूं देण्याचा नाहीं, अशी तिनें त्यास जातांना ताकीद केली.

गुलबाईसभोंवती हळू हळू बायकामुलें जमूं लागलीं. तीं पाहून तो गडी म्हणाला 'बाईसाहेब, तुम्हाला ह्या हरामखोरांच्या कंपूंत ठेवून मला जातां येत नाहीं.'

तिनें उत्तर दिलें 'बाबा त्यांना हरामखोर म्हणून म्हणूं नकोस, किंवा भय वाटण्यासारखें कांहीं आपल्यास वाटत आहे, असेंहि त्यांच्या नज-

रेस येऊं देऊं नकोस. मात्र पळत जा, व मी त्या पलीकडल्या झाडाखालीं आहे. तेथें चटकन ये, समजलास.

तिनें चिठ्ठींत इतकेंच लिहिलें होतं कीं ' आमच्या यजमानांना कांहीं देखील न कळवितां तुह्मी इकडे एकदम निघून या, आणि येथें थोडासा गैरसमज झाला आहे तो दूर करा. ' ती चिठ्ठी लहान होती, हें साऱ्यांनीं पाहिलें होतेंच; ह्मणून जसा का गडी चिठ्ठी घेऊन दृष्टीआड झाला, तसा शिव्यांचा वर्षाव कडाक्यानें होऊं लागला. हा सारा मारा सहन करणें कठीण तर होतेंच; परंतु गुलबाईनें विचार केला कीं, आतां जर आपण पाय मागें घ्यावा, तर ह्या लोकांत आपली नाचक्की होईल, इतकेंच नव्हे तर आपल्या नवऱ्याचें वजन चटसारें नाहींसें होईल. तिला असेंही वाटलें कीं, ' मी नेहमीं ह्या लोकांशीं तुटक रीतीनें वागते; त्यांच्यांशीं मिळून वागत नाहीं, त्यामुळें हें सारें मला आतां भोगावें लागत आहे. तर आतां कचरून उपयोगी नाहीं. हें प्रायश्चित्त मुकाट्यानें सोशिलें पाहिजे. ' ह्मणून ती झाडाजवळ लोकांच्या घोळक्यांतून गेली, व सावलींत खालीं बसली. तिला उभें राहण्याची मुळीं देखील ताकद नव्हती, ह्मणून ती ह्या वेळीं बसली, हें एक पक्षीं बरेंच झालें. बरजोरजी शेटांना घेऊन गडी आतां येईल मग येईल, अशी वाट पहात ती तेथें बसली होती; आणि ते येतात कीं नाहीं हें पहाण्यासाठीं मागें वळून पहावें, असें तिला वारंवार वाटे. पण लोकांना आपण फिकीरींत आहों हें दिसूं नये, ह्या विचारानेंच ती आपली उत्कंठा दाबून टाकी.

शेवटीं कांहीं वेळानें बरजोरजी धापा टाकीत आला. त्याच्या पाठोपाठ गडीहि घामानें नितळत येऊन पोंचला. बरजोरजीनें लागलेंच विचारिलें ' कां गुलबाई, हें आहे तरी काय? हे लोक फाटून त्यांनीं तुह्माला यत्किंचित धक्का लाविला कीं काय ? '

गुलबाईनें उत्तर दिलें ' तसें कांहीं नाहीं. त्यांनीं माझी उगाच तोंडानें

मात्र कुचाळी केली.. पण त्यामुळें माझें काय ह्मणणें आहे, हें मात्र सांगायाला मला झालें नाहीं. ह्यांनीं माझें ह्मणणें कां ऐकूं नये, त्याचें कारण मला समजलें पाहिजे, आणि तेवढ्यासाठींच मीं तुह्माला बोलावणें पाठविलें. मीं तुह्मालाच मुद्दाम बोलाविलें. कारण त्यांचें येणें जर झालें असतें, तर न जाणों एकादे वेळेस रागाच्या भरांत हातून भलतेंच झालें असत.'

इतका उशीर कां लागला तें गड्यानें सांगितलें. तो ह्मणाला '**बरजोरजी** शेट ह्या वेळीं हर्फासांत असावयाचे, पण ते तेथें नव्हते. **वाडियाजी** होते, पण त्यांना कांहीं कळूं नये, ह्मणून मला बरीच शिताफी करावी लागली. मी मुकाट्यानें कांहीं एक न बोलतां **बरजोर्जीं**च्या शोधासाठीं पुढें चालता झालों. शेवटीं मला अशी भीति पडली कीं, मी इकडे किती तरी तास **बरजोरर्जीं**ना पाहत हिंडत आहे, आणि मी नसल्या वेळीं आपलें काय झालें असेल.

लोक हल्लीं कां बिथरले आहेत व त्यांचीं गाऱ्हाणीं काय आहेत, हें **गुलबाई**पेक्षां **बरजोरजी**स माहीत होतें. ह्यांतून अशा वेळीं मोठ्या आवाजाची जरूर होती. **बरजोरजी**चा आवाज चांगला दांडगा होता; ह्मणून एकंदर भानगड काय आहे, ह्याचा त्यानें लागलाच पुरा पत्ता काढिला.

पूर्वीं **गुलबाई**नें कित्येक वेळां ह्या मंडळींत येऊन मेहरबानी दाखविली, त्याहून हल्लींच्या वेळीं ती कांहीं निराळ्या हेतूनें आली असावी, असा जो लोकांचा गैरसमज झाला होता, त्याचा वेडेपणा **बरजोरजी**नें प्रथम त्यांच्या पदरांत घातला. नंतर त्यांच्या अडदांड वर्तणुकीबद्दल व कृतघ्नपणाबद्दल त्यानें त्यांचा चांगलाच समाचार घेतला; तेव्हां **गुलबाई**नें त्यांच्याविषयीं रदबदली केली. तिचें बोलणें ऐकण्यासाठीं **बरजोरजी** स्तब्ध राहिला, तेव्हां सारेजण गप्प उभे होते; कांहीं देखील गलबला नव्हता. ती ह्मणाली 'शेटसाहेब, ह्या बिचाऱ्यांना उगाच दोष लावूं नका. ह्यांचें ह्यांनाच वाईट वाटूं लागेल, अशी माझी खात्री आहे, तर त्यापेक्षां तुमच्या बोलण्यानें त्यांना जास्त वाटूं लागावें, अशी माझी

बिल्कूल इच्छा नाहीं. बाबांनो, मी जी येथें कधींमधीं येतें त्याचा उद्देश असा नाहीं कीं, तुम्ही मला कृतज्ञता दाखवावी. मला असला मोठेपणा कशाला पाहिजे, व मी तुमची कृतज्ञता संपादन करण्यासारखें कारि-तें तरी काय? मी ह्मीं येथें आहे तो एवढ्यासाठींच कीं, कित्येक प्रसंगीं कांहींहि दिलें तरी मनाचें समाधान होत नाहीं; तेंच दोन गोड शब्द खऱ्या कळकळीनें बोलले, तर समाधान होतें. हल्लींचा ह्मातारी-वरचा प्रसंग असा आहे, ह्मणून मी काल आज येत आहें. तुमच्या शेजारीं मी राहत आहें, ह्मणून असा लोभ ठेवावासा वाटतो; मी लोभ करूंनये अशी तुमची इच्छा असेल, तर मी लोभ दाखविण्यास येणार नाहीं. परंतु जोंपर्यंत तशी इच्छा स्पष्टपणें मला दिसून आली नाहीं, तोंपर्यंत तुमच्यापैकीं कांहींकांचा माझ्या हेतूविषयीं गैरसमज झाला, तरी मी येण्याचें टाकीन असें समजूं नका. तथापि आजच्यासारखा प्रकार कोणासही झाल्यास तो ह्मणजे पुनः तशी पूजा करून घेण्यास येईल असें नाहीं, आणि त्याबद्दल त्यास कोणीहि दोष देणार नाहीं. ह्मणून मलाहि असें वाटूं लागलें आहे कीं, मी तुमच्या मंडळींत यावें अशी इच्छा स्पष्ट दिसल्याखेरीज मी इकडे पाऊल करूं नये. तुमच्या व माझ्या बोलण्याचा-लण्याचा शेवटलाच प्रसंग आहे असें झालें, तरी तुमच्याच इच्छेनें हें घडून येत आहे, ह्यांत मजकडे बोल नाहीं, एवढें तरी निदान तुह्माला वाटो ह्मणजे झालें. आतां मला इतकेंच सांगावयाचें आहे. तुह्माला वाटेल तर विश्वास ठेवा, किंवा ठेवूं नका; पण काल मी आले होते, तेव्हां मला तो मुलगा कशानें मेला हें ठाऊक नव्हतें. मी देखील नवीन यंत्राविषयीं चकार शब्द बोललें नाहीं. कारण तुम्ही लोक त्याविषयीं इतके रागव-लेले आहां व त्याचे विचार रात्रंदिवस तुमच्या मनांत घोळत आहेत, ह्याची मला कांहीं देखील कल्पना नव्हती. आतां मला तुमचें मन समजलें आहे, तर मी त्याविषयीं वाटेल तितकें बोलत बसेन.’

आपण पुनः बोलाविल्याखेरीज येणार नाहीं वगैरे जेव्हां मंडळीनें

ऐकिलें, तेव्हांच ते शुद्धीवर आल्यासारखे झाले; ह्मणून गुलबाईच्या पुढील भाषणावर त्यांचा साहजिक विश्वास बसला. शेवटीं गुलबाई व बरजोरजी परत जाऊं लागले, तेव्हां साऱ्यांची पूर्वीची दांड वृत्ति जाऊन ते त्यांशीं फारच अदबीनें वागले. एकानें झोंपडींत जाऊन गुलबाईस पाणी प्यायला आणून दिलें. तिनें तें त्याजपासून हंसतमुखानें घतलें, व अतिशय तहान लागली होती ह्मणून तें ती मोठ्या आनंदानें प्याली. ह्मातारीनें दार उघडून तिला आंत येण्याची तसदी घेण्याविषयीं फार काकुळतीनें निरोप पाठविले. पण गुलबाईनें आतां निदान येतां येत नाहीं असें सांगून पाठविलें. शिकारी जसा आपले कुत्रे शिकारींतून परत बोलावितो, त्याप्रमाणें बायांनीं आपलीं मुलें गुलबाईच्या पाठीस पाठविलेलीं परत बोलाविलीं. सारांश बरजोरजी व गडी ह्यांजबरोबर तिला परत जाण्याला कोणत्याहि प्रकारें अडथळा राहिला नव्हता. बरजोरजीनें तिला घरीं नेऊन पोंहचविली, तेव्हां ती अगदीं गळून गेल्यासारखी झाली. घरीं गेल्यावर तिनें अकांड तांडव करून किंवा झालेला प्रकार घरच्या मंडळींना सांगून घायकूत आणिलें नाहीं; पण ती आपल्या खोलींत एकांत जाऊन बसली, तेव्हा लोकांचा मूर्खपणा व कोत्या समजुती ह्यांचा विचार करून, आणि असल्या लोकांच्या नशिबीं आतां पुढें सुख नाहीं हें लक्षांत येऊन, तिला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. त्याचप्रमाणें आज हा प्रकार झाला, पुढें काय होईल नकळे, अशी तिला भीति वाटूं लागली. ह्या दोन्ही विचारांनीं ती बिचारी स्वतःशींच ढसढसा रडली.

# भाग ७.

## बेदिली.

यंत्रांत सुधारणा झाली, त्यामुळें कारखान्याला पडता काळ आला, अशी वेडी समजूत सर्वत्र झाली होती; परंतु त्या पडत्या काळाचा परिणाम ती यांत्रिक सुधारणा आहे, किंवा तिजमुळें पडता काळ जाऊन पूर्ववत् चांगले दिवस येतील, असा विचार सहसा कोणाचे लक्षांत येईना. वरप्रमाणें लोकाचा चुकीचा ग्रह झाल्यामुळें कांहींकांना जरी खरा प्रकार समजत होता, व भागीदार मंडळींहि मधून मधून लोकांना नीट समजावून सांगत, तरी त्याचा फारसा उपयोग होईना. दर घटकेला बेदिली वाढत चालली. परकी देशांतील व ह्या देशांतील प्रतिस्पर्धी कारखान्यावर किंवा इंग्रज सरकारावर, किंवा पूर्ववत् गिऱ्हाइकें लोखंडाला चांगली किंमत देत नाहींत ह्मणून त्यावर कामकरी लोक तोंडसुख घेऊन पूर्वी राग काढीत असत; परंतु हल्लीं हा सर्व भडिमार नवीन यंत्रें व ज्यांनीं तीं कारखान्यांत आणून लाविलीं ते कारखानेवाले अशा उभयतांवर होऊं लागला. **वाडिया** किंवा **बरजोरजी** हे सहज हिंडत फिरत असताहि त्याच्या कानांवर लोकांची कुसफुस येऊं लागली. **बरजोरजींच्या** मुलांना तर वारंवार मनोनिग्रह करावा लागून राग आवरावा लागे. बायांनीं नेहमींच्या जागीं फिरण्याचें सोडून देऊन निवांत जागा फिरण्यासाठीं काढिली; कारण लोकांची कुरकुर ऐकून त्यांना वाईट वाटे, व कित्येक अडदांड मंडळीच्या धमक्या कानांवर येऊन त्यांना साहजिक भीति वाटे.

**गुलबाईवरचा** प्रसंग टळल्यानंतर आठ दिवसांनीं **वाडिया** सकाळीं न्याहारी करून उठला, तों **आदरजी** बंगल्याशीं येत आहे असें त्यानें पाहिलें.

ह्मातारा आंत आल्यावर हातमिळाफ करून **वाडिया** ह्मणाला-

तुह्मी आलां, तें हल्लींच्या काळाला अनुलक्षून असावें असें वाटतें. बरें, ह्या सूचनेचा अर्थ काय करायाचा?

ह्मातारा ह्मणाला—माझें सगळें ऐकल्यावर जशी बुद्धि धांवेल तसा

**वाडिया** साशंक मुद्रेनें **आदरजी**कडे पाहूं लागला. त्याचा हेतु इतकाच होता कीं, ह्याविषयीं एकांतीं बोलावें, ह्मणजे **गुलबाईस** निष्कारण धास्ती वाटणार नाहीं. **आदरजी** त्याचा अभिप्राय समजून ह्मणाला—**गुलबाई**, मर्जी असल्यास येथेंच बसा. बायका भित्र्या असतात ह्मणून ह्मणतात, पण कित्येक वेळां त्या तशा नसतात. मात्र एवढेंच कीं, त्यांना नीट वागवावें, व काय होणार आहे तें त्यांना अगोदर कळलेलें असावें. अनिष्ट प्रसंग गुदरण्याचा आहे, अशी धास्ती राहून तो प्रसंग कशा स्वरूपाचा आहे हें ज्यांना ठाऊक पडत नांहीं, त्यांना धैर्य नसणें त्यांत कांहीं मोठें नाहीं. ह्मणून बाई, तुह्मीं येथेंच बसा, आणि मी सांगतों तें ऐकून स्वतःशींच विचार करा. मी बोलूं लागण्यापूर्वींच मात्र घाबरूं नका. कारण विशेष सांगण्यासारखें नव्हतें, ह्मणून माझी मलाच लाज वाटूं लागेल असें वाटतें.

**आदरजी** पहिल्यांदा बोलूं लागला, त्या वेळीं **गुलबाई** भ्याली तर खरीच; परंतु शेंवटल्या वाक्यानें तिला धीर आला. **वाडिया** मात्र तिजकडे साचिंत पहात होता, ह्मणून त्याजकडे पाहून ती किंचीत हंसली. तेव्हां त्याची काळजी दूर झाली, व तीही तेथेंच खुर्चीवर **आदरजी**ची हकीगत ऐकण्याम बसली.

**आदरजी** सांगूं लागला—परवांच्या दिवशीं संध्याकाळीं मी कामकाज आटोपून बागेंत हिंडत होतों; तेव्हां आमच्या घरापासून बऱ्याच अंतरावर खालीं एक शेत आहेना, तेथें पुष्कळ मंडळी जा ये करीत आहेत असें माझ्या नजरेस पडलें. हे लोक कां जमले आहेत, त्याचा तर्क मला होईना; ह्मणून मी **माणेकबाई**ला बोलवून दाखविलें. परंतु ती कसली शाहणी? तिनें रस्त्यांत पूर्वीं कधीं कोल्हाट्यांचा खेळ पाहिला

असेल, तेव्हां ती ह्मणाली ' तेथें काय असणार आहे ? असेल एकादा खेळ आणि जमली असेल मंडळी तो पहावयाला.' हिची कल्पना चालत नाहीं असें पाहून मीं तिला आंतून माझी दुर्बीन आणावयाला सांगितलें. तिनें लागलीच दुर्बीन आणायाचें टाकून स्वतःच ती खिडकीशी दुर्बिनींतून पहात बसली, आणि नंतर मजकडे दुर्बीन आणून ह्मणाली ' अहो मी ह्मटलें होतें तसेंच आहे. तेथें कोल्हाटयांचे खेळाप्रमाणें बांबू उभे असून वर दोरीहि लावलेली आहे, तें मीं सारें दुर्बिनींतून पाहिलें. दुर्बिनींतून भलताच देखावा नजरेस पडण्याची मला तिच्यासारखी संवय नाहीं. ह्मणून तिच्या हातची दुर्बीन मी घेऊन पाहूं लागलों, तों लोक एकत्र जमून एक जण किंचित ऊंच जागीं होता व तो कांहीं तरी लोकांना सांगत आहे असें माझ्या नजरेस पडलें. तेव्हां मी तिकडे जाण्याचा बेत केला. कारण एक तर तेथें काय चाललें आहे तें कळावें ही मला इच्छा होती; शिवाय शेजारच्या कारखान्याच्या व्यवस्थेविषयीं कांहीं तरी ओरड ऐकूं येईल असा माझा तर्क होता. लोकांनीं कारखान्याविषयीं ओरड करावी व ती मीं ऐकावी ह्याची मला हौस आहे. मी आहें दयाळू, पण ही ओरड झाल्यानें माझा जो कारखान्याविषयीं वाईट ग्रह पहिल्यापासून झाला आहे, तो खरा आहे अशी माझी खात्री होते. तुह्मी व **गुल-बाई** अशीं उभयतां माझे मित्र खरें; पण माझे ग्रह चुकीचे नाहींत असें समजल्यानें मलाहि एकपरी बरें वाटतें.

आपल्या कारखान्याचें **आदरजी** किती हित चिंतितो हें ऐकून **गुल-बाई** व **वाडिया** हे एकमेकांकडे पाहून गालांतल्या गालांत हसूं लागले.

**आदरजी** ह्मणाला—मग मी तेथें गेलों, पण शेंवटलें भाषण अगदीं संपत आलें होतें. तें ऐकून मी एकंदर सार काढलें कीं, कारखानेवाले कामकरी लोकांना नाराज ठेवण्यासारखीं वागणूक करितात, तर त्यांनीं लोकांच्या ह्मणण्याप्रमाणें वागावें ह्मणून काय काय ऊपाय योजावे ह्याचा विचार करण्यासाठीं ते लोक जमले होते. शेंवटीं त्यांनीं असें ठरविलें

कीं, नवीन यंत्रें आणिल्यानें जे मानवीश्रम वाचले, ते पुर्ववत् माणसांकडून घ्यावे, अशी मागणी करण्यासाठीं कांहीं जणांना कारखानेवाल्यांकडे पाठवावें; कारखान्याचे मालकमंडळीचा झोक कसा काय आहे, तें ताडण्यासाठीं फक्त भट्टी चालविण्याला अवश्य इतक्या [illegible] खेरीज बाकी साऱ्यांनीं त्या मेलेल्या मुलाच्या तेराव्या दि[illegible] णावळीला जाण्याची परवानगी मागावी; त्या दोन्हि [illegible] कारखानेवाल्यांनीं कबूल केल्या नाहींत, तर लोकांनीं स्वतः होऊन कामावर न जातां दिवसपाण्याला जावें, आणि जेवणावळ आटपतांच साऱ्यांनीं त्याच बैठकीस पुनः कारखानेवाल्यांविषयीं विचार करावा. हा शेंवटला ठराव साऱ्या लोकांना अतिशय आवडला, असें एकंदर त्यांच्या वर्तणुकीवरून मला वाटलें.

हें शेंवटलें वाक्य ऐकून **वाडियाला** खास वाटूं लागलें कीं, आतां हयगय करितां उपयोगी नाहीं; ही धुंडाई फार वाढूं देतां कामा नये; त्याचा वेळींच बीमोड केला पाहिजे, नाहींपेक्षां जड जाईल.

**वाडिया** याप्रमाणें विचार करीत असतां **आदरजी** ह्मणूं लागला— तुह्माला ठाऊक आहेच कीं, हा तुमचा लोखंडी कारखाना व तत्संबंधीं सर्व कांहीं ( ह्मणजे सर्व जण नाहीं हो ) यांचा मला मनापासून तिटकारा आहे. परंतु तो कारखाना लोकांनीं पाडून टाकण्यापेक्षां तुह्मींच स्वतः होऊन तो सोडून द्यावा असें मला फार वाटतें. ह्मणून तुमची परवानगी असेल, तर मी **धारवाडास** जाऊन येथील स्थिति तेथें पोलीस अंमलदारांना कळवून तुमच्या बचावासाठीं कांहीं शिपायांना पाठविण्यास सांगतों. तुह्मी ह्मणजे हीं कसलीं नवीन आणिलेलीं यंत्रें टाकून द्याल, असें मला वाटत नाहीं.

**वाडिया** निश्चयानें ह्मणाला—त्याची तर आशाच नको. नवीन यंत्रें आह्मीं टाकिलीं कीं, आज जे शेंकडों लोक आमच्यावर अवलंबून आहेत, त्यांच्या तोंडच्या भाकरीच आह्मीं काढून घेतल्या असें होईल. त्या यं-

त्यांमुळें आमचा कारखाना कोठें रुटु खुटू चालला आहे. नफ्याचें तर नांव नकोच. कारखाना कसा बसा चालण्यासाठीं काटकसर केली पाहिजे, आणि काटकसर करण्याचे जे उपाय आम्ही योजितों ते आम्हाला सोडावे लागले, म्हणजे कारखाना बंद केला पाहिजे, व इतक्या लोकांना घालवून दिलें पाहिजे. त्यांजकडील पुढारी कोण येत आहेत, तें आतां येऊं द्या. मी त्यांना नाहीं तरी हेंच सांगणार.

वाडियाचें म्हणणें खोडून टाकतां येण्याजोगें नव्हतें, म्हणून आदरजीनें फक्त मान हलवून आपलें समाधान करून घेतलें. नंतर तो म्हणाला—बरें तुम्ही आतां करणार काय?

वाडिया—दोन्ही मागण्या साफ नाकारणार; मात्र नाकारण्याचीं कारणें मी त्यांना नीट समजावून सांगेन. ह्या कामीं माझे भागीदार बरजोरजी शेट ह्यांचेंहि मत माझ्यासारखेंच पडेल, असें मला वाटतें. तुमचें म्हणणें पोलिसाला जाऊन वर्दी द्यावी. तर ह्याविषयीं मी तुम्हाला एक दोन तासांत बरजोरजीशेटांचा सल्ला घेऊन कळवितों. तुम्ही इतक्या मेहरबानीनें धारवाडास जाण्याचें पत्करितां, त्याअर्थी आम्हांवर खरोखर तुमचे उपकार आहेत. बरजोरजी ह्या गोष्टीला खास अनुमोदन देतील, परंतु त्यांची प्रत्यक्ष सल्ला घेतल्याखेरीज अशा महत्वाच्या कामीं मला कांहीं करितां येत नाहीं. म्हणून मी तुम्हाकडे मनुष्य पाठवीन. परंतु तुम्ही असाल कोठें?

आदरजी—मी घरींच माझ्या बागेंत असेन. पण मनुष्य पाठवाल, तो मात्र विचारानें पाठवा. काल मला कांहीं लोकांनीं त्या शेतांत पाहिलें आहे, आणि जर तुमच्याकडून कोणी थेट मजकडेसच आला, तर त्यांना संशय येईल. मी आतां जो आलों, तो सुद्धां लांबच्या आडवळणाच्या वाटेनें आलों; म्हणजे वाटेंत कोणीं मला येतांना पाहूं नये, हा हेतु होता. मी परत नाहींतरी तसाच जाणार आहें.

गुलबाई—पण आतां जातां तरी कशाला? येथें तुम्हाला कोणी देखील पाहायला येणार नाहीं, तर येथेंच कां राहत नाहीं?

आदरजी—धारवाडास जाण्याचें ठरल्यास घरून मला एक मजल कमी पडेल म्हणून. माझ्या फाटकानेंहि मला गुपचुप निघतां येईल. बरें तें असो, पण तुम्ही जो मनुष्य पाठवाल, त्यानें माणेकबाई किंवा रस्त्यांत कोणी भेटेल त्याजपाशीं वटवट करितां उपयोगी नाहीं. कोणी जवळ नसलें, म्हणजे माणेक चिप असते, पण हल्लींच्या गडबडींत कोण येऊन तिला भेटेल ह्याचा कांहीं नेम नाहीं.

नंतर निरोप कोणाबरोबर पाठवावा हा विचार पडला. कोणी बाई मनुष्य गेल्यास संशय येणार नाहीं, असें वाटून गुलबाईनें स्वतः जाण्याचें पत्करिलें; परंतु तिनें त्या दिवशीं घराबाहेर मुळीं देखील पडूं नये, असें तिच्या नवऱ्याचें म्हणणें पडलें.

शेवटीं आदरजीनें विचारिलें—मग संकेताची खूण कां करूं नये? पांढरा रुमाल कांहीं सांगणार नाहीं, आणि बागेच्या कुंपणापाशीं उभें राहून दुर्बिनींतून मला तुमच्या खिडक्या साफ दिसतात. तर तुम्ही खिडकींतून रुमालाचें निशाण फडकवा, म्हणजे मी समजेन.

ही गोष्ट साऱ्यांना पसंत पडली. शेवटीं असें ठरलें कीं, लोक मागण्या करण्यास येतील त्यांचा एकंदर कल तीन वाजेपर्यंत समजून येईल, म्हणून बरोबर तीन वाजतां आदरजीनें निशाणाची वाट पहावी. जर पांढरा रुमाल दृष्टीस पडला तर भीतीचें कारण नाहीं, असें समजून त्यानें घरींच असावें; तांबडा रुमाल दृष्टीस पडला, तर त्यानें पोलिसास जाऊन हकीकत कळवावी, व कारखान्याच्या बचावासाठीं किती पोलीस पाठविलें पाहिजे, ह्याचा पोलीस अधिकाऱ्यांनींच विचार करून ठरवावें. कारखान्याच्या तर्फे बोलण्यास आदरजीला मुखत्यारी दिली असल्या-बद्दल लेख वाडियानें त्याला लिहून दिला; व आदरजी चालता झाला. मग धीर न सोडण्याबद्दल बायकोला आश्वासन देऊन वाडियाहि कामावर गेला. तिघाहि जण आपापल्या कामांत गुंतलीं असतां त्यांच्या मनांत हे विचार घोळत होते ' निरनिराळया एकेक व्यक्तींनीं परस्प-

रांच्या व सर्वांच्या कल्याणासाठीं झटण्याचें सोडून अज्ञानानें किंवा बंद नाहींसा झाल्यानें त्या एकमेकां विरुद्ध होतात, आणि एकी करून समाजाची ऐपत सुधारण्याचें टाकून तीच ऐपत भांडणाचे पायीं धुळीस मिळवितात.'

कामकरी लोकांकडील निरोप मंडळी आतां घेऊन येतील मग घेऊन येतील, अशा आशेवर दुपार होईपर्यंत **वाडिया** व **बरजोरजी** कारखान्यांत वाट पहात होते. परंतु कोणीच आलें नाहीं. नेहमींपेक्षां कांहीं निराळे विचार लोकांनीं योजिले आहेत, असें वाटण्याला कांहींच कारण नव्हतें. जो तो आपापल्या कामावर नेहमींप्रमाणें होता. म्हणून दोन वाजले असें पाहून बायकोला धीर द्यावा व तिला खिडकींत पांढरें निशाण लावण्यास सांगावें, ह्या हेतूनें **वाडिया** घराकडे परतला. नाराज झालेल्या लोकांनीं आपला बेत कां सोडून दिला, ह्याविषयीं तर्क करीत बसण्यांत कांहीं अर्थ नव्हता; इतकें मात्र खरें होतें कीं, पोलिसाची मदत मागण्याला कांहीं कारण उरलें नाहीं. ह्यामुळें **गुलबाईचा** जीव खालीं पडला. तिनें तरातरा माडीवर जाऊन खिडकींत निशाण लाविलें. तिकडे लांब डोंगरावर, **आदरजी** नेहमींचें काम टाकून दर मिनिटाला दुर्बिनींतून पहात आहे, तर आज ह्याला झालें तरी काय, असा **माणेकबाईला** चमत्कार वाटत होता. पण शेवटीं त्यानेंहि बराच वेळ हळू हळू शीळ वाजवून दुर्बीन एके बाजूस ठेविली व पाहण्याचेंही सोडून दिलें. त्यानें काय पाहिलें हें विचारावें, असें तिला अगदीं वाटलें होतें. परंतु मनाच्या उकळीपेक्षां संवयीचा जोर जास्त असल्यानें ती स्तब्ध राहिली.

**वाडिया** पुनः कारखान्यांत गेला, तेव्हां आपण जवळ येतोंसें पाहून **पांडोबा** आपल्याकडे बघत आहे असें त्यास दिसलें. **पांडोबा** भट्टीवर असे. त्याचा नेहमींचा क्रम ह्मणजे एकाद्या ज्योतिष्याला नवीन तारा सांपडून जसा तो त्याजकडेसच एकाग्रतेनें पहात असतो,

तसें ह्यानें एकचित्तानें भट्टीकडे सारखें लक्ष लावून असावें. वाडिया जवळ आला असें पाहून त्यानें त्याकडे साकुत मुद्रेनें बघितलें. वाडीया लागलीच उभा राहिला; परंतु बरीच मंडळी जवळ होती; ह्मणून त्याला उघड विचारतां संवरतां येईना; तरीहि तो ह्मणाला पांडोबा, मला तुम्ही सांगा बरें—पण छेः तुम्ही कामांत असतां कांहीं विचारण्याचा उपयोग नाहीं. अशा वेळीं तर तुह्माला कोणीं देखील अडथळा केलेला खपत नाहीं.

पांडोबानें पुनः एक वेळ नजरेनें जल्द खुणवून ह्मटलें—भर दिवसां मी कामावर असतां मला विचारावें हेंच मला आवडतें. घरीं गेल्यावर दुसऱ्या दिवसपर्यंत कांहीं देखील भगभग पाठीशीं नाहीं अशा निवांतपणीं रात्रीं स्वस्थ असतांना मला नाहीं त्रास दिलेला खपत.

'हं, हं, असें काय? आतां मी समजलों' असें वाडिया स्वतःशींच पुटपुटला व नंतर मोठ्यानें बोलला—पण मला कांहीं तुमच्या ह्या भट्टीच्या कामासंबंधानें विचारण्याचें नाहीं. मला तुमच्या इतर व्यवसायांविषयीं पुसतपास करावयाचा आहे. रात्रीचा मी तुमच्या तिकडे आलों, तर दार लावून मला उत्तर न देतां परत घालवाल कीं काय?

पांडोबा.—साहेब, असें कांहीं नाहीं कोणीं सरळ विचारिलें, तर त्याचा जबाब सरळ दिलाच पाहिजे. तसा जबाब लोकाचाराप्रमाणें मी देईनच; परंतु जबाब दिल्यानंतर जर वायफळ बोलत बसाल, तर मात्र मला सांगावें लागेल कीं, ही बोलत बसण्याची वेळ नाहीं, ह्मणून साहेब, आतां यावें, सलाम.

वाडिया.—आणि मला जें पाहिजे तें सारें कळल्याखेरीज जर मी जाणार नाहीं, तर जानबा व त्यांच्या मुलांना बोलावून मला धक्के मारून बाहेर घालवाल कीं काय?

पांडोबा.—पहिल्यानेंच इतकी शोभा करणार नाहीं. परंतु जायला सांगितलें ह्मणून रागवाल, तर मात्र पुनः तुह्माला रागाच्या भरांत जवळ

न येऊं देण्याविषयीं मी खबरदारी घेईन. माझ्या सुतारकामाच्या एका-च्या हत्याराला तुह्मीं बोट लाविलें कीं, मी ज्ञानबाच्या मंडळीला बोलावून तुमचीं बोटें ठेंचायाला सांगेन, व 'खबरदार हात लावाल तर' असें मी तुह्माला ह्मणेन. तर साहेब माझ्या येथें कसा पाहुणचार होईल तें ध्यानांत ठेवा ह्मणजे झालें.

**वाडिया**.—तुह्मी मोठे चमत्कारिक दिसतां; पण तुमच्याशीं कसें वागावें, हें मला तुह्मी सांगून टेविलें तें बरें झालें.

जवळ एक मजूर होता तो ह्मणाला—**पांडोबा** थोडेसे अदबशीर वागतील तर बरें होईल. जर आमच्यापैकीं एकानें आपल्यासारख्या गृहस्थांस **पांडोबा**प्रमाणें धमकाविलें असतें, तर केवढा गवगवा झाला असता?

**वाडिया**.—**पांडोबा**विक्षिप्त आहे, आणि लोकांनीं विक्षिप्त ह्मटल्याची त्याला परवा नाहीं. पण आमचें काम तो चांगलें करतो, आणि आपल्या स्वतःच्या हिताप्रमाणें तो आमचें हित काळजीपूर्वक पाहत असतो. एवढी आमची तो अदब ठेवितो ती पुरे. खडखडीत बोलणें व चांगलें करणें हीं मला पाहिजेत; पण गोड बोलणें व वाईट कृति हीं मला नकोत.

दुसरा एक मजूर ह्मणाला—बरें कृति व बोलणें हीं दोन्ही वाईट असल्यास तुह्मी काय ह्मणाल? हल्लीं त्याचाच पर्वकाळ आहे असें दिसतें.

**वाडिया**.—असा प्रकार कोणींहि सहन करूंनये. निदान येथें तरी तो सहन केला जाणार नाहीं.

पहिल्या मजुरानें हळूच दुसऱ्याला कोपरानें डंचिलें, तेव्हां तो मुकाट्यानें राहिला.

नंतर **वाडिया बरजोरजी**कडे गेला, व उभयतांनीं विचार करून असें ठरविलें कीं, **पांडोबा**च्या बोलण्यावरून त्या मुलाच्या दिवसासाठीं कारखान्यांतील मजूर लोक उद्यांची रजा दांडगाईनें मागण्याकरितां कदाचित आज रात्रीं येतील. मुलाचा दिवस झाल्यावर दंगा करण्याचें

ठरलें होतें, ह्मणून त्यापूर्वीं लोक दंगा करतील असा बहुतेक संभव नव्हता; तेव्हां त्यांची ही रजेची वेडेपणाची मागणी कबूल करूं नये असा उभयतांनीं विचार ठरविला.

त्या दिवशीं दोघांनींहि रात्र पडली नाहीं तोंच आपआपल्या बंगल्याच्या कंपौंडाचीं फाटकें नीट लावून बंगल्याचीं दारेंहि आंतून चांगलीं लावून घेतलीं. कदाचित लोक दांडगाई करतील; ह्याविषयीं बायांनाहि पूर्वींच सूचवून ठेविलें होतें. बायांच्या धैर्याची दोघांनाहि खात्री होती. तितक्यांत बायांना माहीत नसतां एकदम दंगा झाल्यास त्या घाबरून जातील, आणि घरांतहि कल्होळ व बाहेर लोकांचा दंगा, यामुळें एकच गोंधळ उडेल, असा त्यांनीं विचार केला.

नेहमींप्रमाणें त्या रात्रींहि वाडिया गुलबाईला वर्तमानपत्र वाचून दाखवित होता; पण तिचें लक्ष ऐकण्याकडे नसून भटकत होतें. त्याचप्रमाणें बरजोरजीच्या मुली पियानोवर पाठ केल्याप्रमाणें गात होत्या; त्यांचेंहि मन नेहमींप्रमाणें गाण्यांत नव्हतें. मधून मधून वाचणें किंवा गाणें थांबलें कीं, लोकांची आरडाओरड किंवा दणदण पाय हापटणें हीं ऐकूं येतात कीं काय, हें त्या कान देऊन ऐकत. फार तर काय, पण मुलींचें गाणें संपलें, तेव्हां बरजोरजी खिडकी उघडून बाहेर पाहूं लागला, व त्यानें मुलांना गलबा करूं नका ह्मणून सांगितलें. चंद्रोदय झाला नव्हता. जो कांहीं थोडा उजेड दिसत होता, तो खालच्या भट्टयांचा होता; तेथून आकाशांत आगीचा तांबूस लोळ जातांना दृष्टीस पडे. कारखान्याचा घरघर व सूं सूं आवाज लांबून ऐकूं येत होता; त्याशिवाय दुसरा कसचाहि आवाज ऐकूं येत नव्हता. ह्या वेळीं बरेंच उकडत होतें, ह्मणून खिडकीशीं कांहींजण धुराच्या लोळांतून पलीकडील तारे दिसतात कीं नाहीं तें पहात व मधून मधून बोलत उभे होते. उद्यां ह्याच वेळेपर्यंत काय होईल कोण जाणे असा विचार बाकीचे करीत होते, आणि लहान मुलें अगदीं गप्प बसलीं होतीं. आईबापांनीं आपल्यास निजायाला धाडण्याचें विसरून जावें ह्मणजे काय होतें तें पहावयास मिळेल, असें त्यांच्या मनांतून होतें.

**फ्रामरोझ** मध्येंच ह्मणाला—चाचा, चाचा, त्या तेथें कोपऱ्यांत कुंपणावरून कोणी उडी मारून आला, तो मीं पाहिला.

खालीं झुडपांत फांद्या मोडल्याचा व पाचोळ्यावरून चालल्याचा आवाज साऱ्यांच्या कानीं आला.

**बरजोरजीनें** दरडावून विचारिलें—कोण आहे तें?

**जानबा** हलक्या आवाजानें ह्मणाला—साहेब, माझें ऐका. आपण ही खिडकी लावून घ्यावी हें बरें. ते जवळच आहेत. त्या कोपऱ्यावरून ते वळतील, तेव्हां त्यांना बंगल्यांतला दिवा दिसूं नये. मी पळत पुढें आलों; **पांडोबा** दुसऱ्या मंडळीबरोबर **वाडियांच्या** बंगल्यावर गेला आहे. मी गेलों आहे हें त्यांच्या लक्षांत येण्यापूर्वीं मला घाई करून त्यांच्यांत जाऊन मिसळलें पाहिजे. तुह्मी बंदोबस्तानें आहां, हें पहाण्यासाठींच मी मुद्दाम आलों.

खिडकी लावतां लावतां **बरजोरजीनें** विचारिलें—आज रात्रीसच ते दंगा करतील कीं काय?

**जानबानें** उत्तर दिलें—तुह्मी नीट सरळ बोलाल व कचरणार नाहीं, तर कांहीं आज भीति नाहीं. पण उद्यांचें मात्र मला सांगतां येत नाहीं.

असें बोलून **जानबा** पळत गेला व पुनः कुंपणावरून उडी मारून मागच्या मंडळींत जाऊन मिसळला. इतक्यांत मंडळीच्या पुढल्या भागास ज्या मशाली होत्या त्यांचा उजेड **बरजोरजीच्या** वरच्या मंडळीस दिसूं लागला.

**बरजोरजी** ह्मणाला—हं चला. तुह्मी सारेजण वरती माडीवर या कसे पाहूं. खिडकीशीं मी, **फ्रामरोझ** व **जहांगीर** ह्याखेरीज कोणी राहूं नका. आज कांहीं दंग्याची भीति नाहीं, ह्मणून तुह्मीं एकिलेंच आहे, तर उगाच भिऊं नका. आतां चला तर.

बाया व मुलें माडीवर जाऊन पोंहचलीं न पोंचलीं, इतक्यांत पुढल्या दाराला जोरानें धक्के दिल्याचा व कडी खडखड वाजविल्याचा आवाज ऐकूं आला.

बरजोरजीनें माडीवरच्या खिडकीचें एक दार उघडून विचारिलें ' काय आहे? '

खालीं मंडळी उभी होती त्यांपैकीं एक जण ह्मणाला— पहिल्यानें आह्माला तुह्मीं कबूल केलें पाहिजे तें हें कीं, नवीन यंत्रें आणिल्यानें इतके लोक बेकार झाले आहेत, तर तीं यंत्रें काढून टाकिलीं पाहिजेत, व पुनः सार्‍यांच्या संमतिशिवाय त्यांचा उपयोग होऊं नये.

बरजोरजी—वाः फारच योग्य मागणी! ह्यासंबंधी आमचाहि विचार तुमच्यासारखाच होण्याला ह्या एका लहानशा रात्रींत बोलून पुरें होणार नाहीं. त्याला बराच काळ पाहिजे.

पहिला ह्मणाला—होय किंवा नाहीं, हा एक जबाब द्या.

त्याच्या जवळचा एकजण ह्मणाला—त्यांना शर्ती सांगा ह्मणजे झालें. दोन्ही प्रकारांनीं काय काय होईल, तें त्यांस कळवा.

बरजोरजी—मला तुमच्या शर्ती नकोत. शर्ती घालण्याचा तुह्माला अधिकार नाहीं, व त्या मी ऐकतहि नाहीं. मी व माझे भागीदार असे जोंपर्यंत भागींत आहोंत, तोंपर्यंत आमच्या व्यापारधंद्याची व्यवस्था आह्मीच करूं, समजलां. तर आतां शर्तींचें नांव देखील काढूं नका.

पहिला पुनः बोलला—तर मग आह्मांला होय किंवा नाहीं हा एक जबाब सांगा? तुह्मी यंत्रें काढून टाकणार किंवा नाहीं?

बरजोरजी—मी साफ काढून टाकणार नाहीं. आतां तुह्माला मिळाला जबाब. पण त्यांचीं कारणें काय आहेत तीं समजण्याची जर तुह्माला इच्छा असेल, तर योग्य वेळीं व योग्य रीतीनें तुह्मी विचारा; तुह्माला तीं जरूर कळवीन.

**वरजोरजीनें**—कारणें सांगेन असें ह्मणतांच खालच्या मंडळींची कुर-कूर सुरू झाली; परंतु त्यांच्यापैकीं एकजण इकडून तिकडे मधून आ ये करीत होता, तो त्यांना दुसरी मागणी करायाला सांगूं लागला. तो जानवा होता. ही बोलाचाली लौकर आटोपावी व मंडळींनीं बरोबर चालतें व्हावें असा त्याचा उद्देश होता.

पहिला म्हणाला—साहेब, तुमचा जबाब घेतला आहे.

मंडळींतून दुसरा एक खोल आवाजानें म्हणाला—तो कधींहि विसरला जाणार नाहीं.

पहिला म्हणाला—आणि आतां आमचें दुसरें मागणें आहे. उद्यां त्या मुलाचा दिवस आहे, तर कारखान्यांतील साऱ्या लोकांना तिकडे जाण्याची परवानगी असावी. ते परवां कामावर येतील. भट्टया चालविण्याला जे थोडे लोक अवश्य लागतील, ते मात्र उद्यां कामावर येतील.

**वरजोरजी**—बाकीच्यांना रजा कां असावी?

पहिला म्हणाला—तो मुलगा ज्यामुळें मरण पावला, त्याविषयीं तिटकारा दाखविण्यासाठीं.

**वरजोरजी**—माझे भागीदार वाडिया शेट व मी असे तुमची मागणी कबूल करूं, असें तुह्माला कशावरून वाटलें?

पहिला—तुह्माला आमची मागणी रुचेल असें तर वाटलेंच नाहीं. पण तुह्मी जर रजा दिली नाहीं, तर आह्मी स्वतः होऊन रजा घेऊं ह्मटल्यास काय अडचण आहे.

वरजोरजी—माझा जबाब ऐका, आणि तुह्माला वाटेल त्याप्रमाणें उद्यांच्या दिवस करा. मुलाच्या जातीगोताचे जे कारखान्यांत पांचसहा लोक आहेत, त्यांना मुलाच्या दिवसाला जाण्याची परवानगी आहे, आणि त्या मुलाच्या आईचेंहि ह्मणणें असेंच आहे. पण जें काम करण्याचें कबूल केलें आहे तें टाकून जर कोणी जाईन ह्मणून ह्मणेल, तर त्याला माझी साफ परवानगी मिळणार नाहीं. असे जे कोणी जातील ते आपआपलेच कारखाना सोडून जातील.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

एकजण उद्धटपणें ह्मणाला—साहेब समजा कीं, आह्मीच तुह्माला कारखाना सोडायाला लाविला तर?

**बरजोरजी**—तुह्मी आपले श्रम कारखान्यांतून काढून घेतले ह्मणजे कारखाना बसलाच. परंतु त्या पलीकडच्या भट्या बंद पडल्या कीं, त्याच दिवशीं तुमचा नाश झाला ह्मणून समजां. आह्मीं स्वतः होऊन आपला कारखाना बंद करून आपल्या गांवीं चालतें व्हावें, किंवा आमच्या भांडवलावर ज्यांची उपजीविका अवलंबून आहे त्यांच्या हुकमतींत राहून मोठ्या भरभराटीचा कारखाना चालवावा, ह्या दोन प्रसंगापैकीं आह्माला पहिलाच मार्ग पत्करणें बरें वाटतें. मात्र तुह्मीं तो प्रसंग आणिला पाहिजे.

शेंवटलीं वाक्यें ऐकून पुनः मंडळी कुरकूर करूं लागली. 'तुमच्या भांडवलाचें काय होतें तें आतां आह्मीं पहातों ना' तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणीं तुमच्या भांडवलाला हात लाविला कीं, तुह्माला भीति वाटूं लागते, तर, तें भांडवल आमच्या काय उपयोगीं?' 'आह्मी आमचे श्रम घेऊन जाऊं, मग तुमचें भांडवल तुमच्या फार कामीं पडेल!'

**बरजोरजी**—आमच्या भांडवलाखेरीज तुमचे श्रम तुम्हाला जितके कामीं पडतील तितकेच! त्याहून एक रती जास्त ना कमी, भांडवल व श्रम हीं दोन्ही अलग पडून सर्वांचा नाश व्हावा अशी कांहीं आमची इच्छा नाहीं, समजलां. उद्यां जर तुह्मीं काम करण्याचें टाकिलें, तर आमचा कारखाना बसला. थोडासा धीर धरून आपल्या बोलीप्रमाणें तुम्ही आपल्या वांट्याचें कराल, तर साऱ्यांना चांगले दिवस दिसतील. ह्याचा विचार तुम्ही स्वतःच करा.

त्यानें खिडकी लावून घेतली. खालीं लोकांचा घोळका जमला होता, त्यांनीं नानाप्रकारचे आवाज काढावे, आणि पुढाऱ्यांनीं कांहीं वेडेवांकडे विचार बोलून दाखविले कीं, त्यांस मोठमोठ्यानें ओरडून आपली संमति दाखवावी. असा बराच वेळ त्रास दिल्यानंतर ते तेथून परोबर चालते

झालें. मध्यरात्रीच्या सुमारास चंद्रप्रकाशांत त्या कंपौंडांत अगदीं सामसूम झाली, जणूं कांहीं तेथें कोणीच येऊन गेलें नाहीं.

**वाडिया**च्या येथेंही बहुतेक अशाच मासल्याचा एकंदर रंग उडाला व शेवटहि तसाच झाला. परंतु सारे लोक निवून गेले असें पाहून त्यानें **आदरजी**कडे ताबडतोब खबर देण्याचा विचार केला; कारण जर दुसऱ्या दिवशीं लोक मुलाच्या दिवसपाण्याला जाऊन नंतर मगरमस्त होऊन येतील, तर पोलिसची मदत अवश्य पाहिजे होती.

**वाडिया**ला झोप येईना; ह्मणून चांदणें चांगलें पडलें आहे, अशा वेळीं चालण्याची मजा आहे, त्यांतून आपण स्वतःच जाऊन निरोप कळविल्यास कोणत्याहि प्रकारें घोटाळा होणार नाहीं, असा त्यानें विचार केला; आणि चोंहोंकडे निजानीज व सामसूम झालीसें पाहून तो निघाला. जातांना त्यानें **गुलबाई**स इतकेंच सांगितलें कीं, मी दोन तासांनीं येतों. त्याचा विचार असा होता कीं, परत आल्यावर **आदरजी** पोलिसची मदत मागण्यास गेला आहे असें तिला सांगावें; प्रथम तिला कांहीं कळूं देऊं नये.

**आदरजी**च्या बागेच्या फाटकाला पायऱ्या जात होत्या त्यांच्या पायथ्याशीं तो जाऊन पोंचला; त्या वेळीं बाराचा अंमल होता. तेथून तो वर जसजसा चढूं लागला तसतसा **आदरजी**चा कुत्रा गुरगुरूं लागला व भुंकूं लागला, आणि हा वर जाऊन पोंहचतो न पोंहचतो तों अंगावर उडी टाकण्याच्या ऐन बेतांत होता.

'**मोत्या, मोत्या,** ' असा बाहेरून **वाडिया**चा व आंतून **आदरजी**चा ह्याप्रमाणें दोन्ही आवाज एकदम झाले. **मोत्या वाडियां**चा स्वर ओळखत असे; पण **वाडिया**च्या अंगांत थंडी न लागावी ह्मणून पायघोळ कोट होता, त्यामुळें हा गृहस्थ **वाडिया**च असेल अशी कुत्र्याची खात्री होईना. **वाडिया**च्या सभोंवती तो उड्या मारीत, व बागडत गुरगुरत होता, आणि ह्यांतारबोवांनींहि खिडकीची एक फळी उघडून

एक पिस्तूल काढून चंद्रप्रकाशांत चकाकत असें बाहेर धरिलें. आदरजी म्हणाला 'कोण आहे तें? येथून चालता हो, नाहीं तर गोळी घालीन'. परंतु 'तुमचा मित्र वाडिया, याजवर गोळी घालण्याची घाई करूं नका' असे शब्द कानीं पडतांच तर त्याला पूर्वीपेक्षां फारच भीति वाटली. वाडिया इतक्या अपरात्रीं कां आला तें कळावें, म्हणून त्यान घाबऱ्या घाबऱ्या दार उघडून त्याला आंत घेतलें.

आंत गेल्यावर वाडियाला समजलें कीं, आपण ह्यातारबोवांच्या झोंपेचा कांहीं बिघाड केला नाहीं. कारण आंत दिवा जळत असून टेबलावर पुस्तक उघडें पडलें होतें, जवळ आदरजीचा चष्मा व पिस्तुल पडलीं असून स्वतः आदरजीहि नेहमींप्रमाणें पोषाख चढवून होता. हें पाहून त्याला थोडेंसें नवल वाटलें. इतकी रात्र होईपर्यंत कां जागत होतां ह्मणून विचारणार, इतक्यांत डोक्यास कानटोपी घातलेली अशी माणकशाई खोलींत डोकावून पाहूं लागली.

'माणक, कोणी चोरबीर आले नाहींत' हे आदरजीचे शब्द कानीं पडताच ती चालती झाली. 'इतक्या रात्रीं वाडिया कां आले हें समजण्याची आपल्यास काय जरूर पडली आहे' असा तिनें विचार केला. तिला ह्याविषयीं कळूं नये असा आदरजीचाहि विचार होता. काय करावयाचें हें ठरल्यावर तो तिच्या खोलीच्या दारावर थाप मारून एवढेंच म्हणाला 'माणक, मी आतांच बाहेर जात आहे. उद्यां दुपारपर्यंत जेवणाला न आलों तरी घाबरूं नकोस. मोत्या चांगली राखण करील व तुला सोबत राहील'

नंतर तो धारवाडास पोलीस अंमलदारास खबर देण्यास चालता झाला. इकडे वाडियाहि परत बंगल्याकडे जाऊं लागला. खालीं सारी सामसूम आहे कीं नाहीं, झोपड्यांतील चमकणारे दिवे नेहमींप्रमाणें अद्याप कसे गेले नाहींत, व ते एकामागून एक कसे दिसत नाहींसे होत आहेत, हें पाहत तो डोंगरावरून उतरतांना मधून मधून उभा राहिला.

# भाग. ८

## दंगा.

दुसऱ्या दिवशीं उजाडलें नाहीं तोंच एकजण जानबाच्या येथें येऊन सांगूं लागला ' म्हातारीच्या येथें आतां जमून दिवसपाणी करण्यासाठीं जागा ठरली आहे, तेथें साऱ्यांनीं जावें. मात्र आठ वाजण्याची वेळ चुकूं नये असें हात जोडून सांगणें आहे. '

पांडोबानें विचारिलें ' ह्या आमंत्रणाचा अर्थ काय ? कारण येथून कोणी देखील यावयाचें नाहीं.

तो म्हणाला ' ह्याचें मला वाईट वाटतें. मला घरोघर जाऊन आमंत्रण करायला सांगितलें आहे; आणि मला वाटतें कीं, बहुतेक सारे जाणार आहेत. ' असें म्हणून तो पुढल्या घरीं गेला.

पांडोबा, म्हणाला 'तर जानबा आपण कामावर जितके लौकर जाऊं तितके चांगलें. अशा वेळीं उदाहरण घातल्याचा बराच उपयोग होईल.

पांडोबा जानबा व दुसरें कांहींजण असे नेहमींपेक्षां लौकर कामावर गेले. त्यांचा हेतु इतकाच कीं, दुसऱ्यांना वळण लागावें. पुष्कळ जण घरींच राहिले, आणि म्हातारीच्या घराहून मंडळी निघाली ती दिसेनाशी होईपर्यंत ते घराबाहेर पडले नाहींत. तेव्हां तरी जणूं कांहीं भीत भीत किंवा लाजत लाजत ते मुकाट्यानें छपून कामावर आले. परंतु मंडळीचा मोठा जमाव दिवसपाण्यासाठीं म्हणून मागें सांगितलेल्या सभेच्या ( टेंकडांच्या मधल्या ) जागीं गेला. ती मंडळी चार चार पांच पांच जण असे एकमेकाचे हात धरून आजूबाजूला न पहातां व वाटेनें कांहीं देखील न बोलतां उदासीनपणें ठरल्यामार्गी चालती झाली.

बरजोरजीनें विचार केला कीं, ज्या ब्राह्मणानें मुलाच्या दहाव्या दिवशीं क्रिया केली, त्यानेंच कारखान्यांतील एकंदर लोकांस गुदस्तसालीं श्रावण महिन्यांत पोथी वांचून दाखविली होती. म्हणून त्याच्याठायीं लोकांची आदरबुद्धि असावी, करितां त्यानें अशा वेळीं जेवणावळीस लोक जमले असतां त्यांस नीट समजाऊन सांगितल्यास कांहीं चांगला परिणाम होईल. त्यावरून त्यानें त्या ब्राह्मणाकडे आपल्या

मनुष्याबरोबर एकंदर हकीगत सांगून पाठविली. परंतु तो ब्राह्मण भितरा असून वयानें लहान होता. अशा प्रसंगीं काय करावें ह्याचेंच त्याला मोठें गूढ पडलें. त्याला एकीकडे आड व दुसरीकडे विहीर असें झालें. कारखान्यांतील लोकांच्या मर्जीविरुद्ध सल्ला सांगावी तर प्राप्ति जाईल ही भीति. बरें बरजोरजींचें न ऐकावें तर ते पडले कारखान्याचे मालक, स्वतःचें वजन खर्चून आपल्याला कदाचित येथून हांकून लावतील. अशी दोन्हीकडून त्याला भीति होती, ह्मणून त्यानें तिसराच पंथ काढला. त्यानें केलें काय कीं, उभयपक्षांस वाईट वाटूं नये ह्मणून कोणासहि न कळवितां तो एकदम निराळ्याच ठिकाणीं चालता झाला. आपण अमक्या ठिकाणीं गेलों आहों हेंहि त्यानें घरीं सांगून ठेविलें नाहीं. हें त्यानें फारच गैर केलें, कारण त्याला शिधा दिल्याखेरीज मंडळी जेवायला बसेना. सारेजण त्याची वाट पहात राहिले. अगोदर मंडळी रागावलेली, त्यांत जेवणाला उशीर व उपाध्येबोवांचा पत्ता नाहीं; तितक्यांत कांहींजण त्याला वरून बोलावून आणण्याला गेले होते ते परत येऊन सांगूं लागले कीं, बामनाचा थांग नाहीं. तेव्हां तर मंडळी अगदीं चवताळून गेली. त्यांचा एकदम असा ग्रह झाला कीं, 'आमच्या पोटांत लौकर अन्न जाऊं नये, ह्मणून त्या पारश्यांनीं हा डाव केला व ब्राह्मणाला पळवून आह्माला तोंडघशीं पाडलें. बरें काय चिंता आहे ह्याचेंहि उट्टें काढूं. परंतु त्यांना रागाच्या भरांत हें सुचलें नाहीं कीं, एकदांची जितकी लौकर जेवणावळ आटोपेल तितकें कारखानेवाल्यांना बरें होतें. लोकांची गैरसमज नाहींशी न होण्याला मुलाचें मरण व त्याचें दिवसपाणी ह्याच गोष्टी विशेष कारणीभूत होत्या; त्यांचा लोकांना जितका लौकर विसर पडेल तितकें कारखानेवाल्यांना इष्टच होतें. शेवटीं उपाध्येबोवा येत नाहींत, असें पाहून मंडळीनें त्याच्या नांवाचा शिधा काढून ठेवून जेवणखाण आटोपिलें.

तिकडे हा प्रकार चालला असतां गुलबाई बंगल्याच्या माडीवर खिडकीपाशीं बसून बाहेर सारखी पहात होती. लांबून रस्त्यावर धुर-

ळ्याचे लोट उडत आहेत असें तिला पदोपदीं वाटे. समोरच्या डोंगराच्या कण्यापलीकडून किंचित आवाज आला कीं, तिला पुष्कळ वेळां कांप देखील सुटला. मोठ्या रस्त्याकडे तिचें सर्व लक्ष गुंतून राहिलें होतें; तिची सारी भीति जेवणाखालीं मंडळी गेली होती त्या वाटेवर होती. कारखाना काय, पण प्रत्यक्ष आपला नवरा सुरक्षित राहतो कीं नाहीं, हें सारें पोलीस किंवा दंगेखोर यांपैकीं कोण अगोदर येऊन पोंचतो, त्यावर अवलंबून होतें. पण हा संशय फार वेळ टिकला नाहीं.

समोरच्या डोंगराच्या कण्यावरून त्या लोकांचा घोळका नीट व्यवस्थितपणें न निघतां कसा तरी घोटाळ्यानें निघाला. कित्येकांच्या हातांत बडगे होते. ते ते गरगर फिरवीत व जणूं काय दारू प्यालेल्याप्रमाणें मोठमोठ्यानें ओरडत व एकमेकांवर पडतझडत असे आले. सर्वांच्या पुढें एक अक्राळविक्राळ माणूस होतें. ज्या मुलाचें दिवसपाणी झालें, त्याची ती आई होती. तिच्या त्या भयंकर आरोळ्या ऐकून व लोकांनीं सूड उगविण्याचें स्थान जो कारखाना तो हातांनीं दाखवीत असतां तिचे ते हातवारे पाहून त्यावेळीं तिचा सर्व प्रकारें बंध सुटला होता, इतकेंच नाहीं तर सारे लोकहि तिच्यासारखेच बेबंद झाले होते असें दिसलें.

डोंगराच्या पायथ्याशीं येतांच जणूं कोणीं पुढाऱ्यानें सांगावें त्याप्रमाणें ते सारेजण एकदम थांबले. नंतर घाईघाईनें नीट जमवाजमाव होऊन ते मुकाट्यानें चालूं लागले; पण ते झपाट्यानें येत होते. कारखान्याच्या इमारतीवर त्यांचा रोख होता, कारण तेथें येतांच त्यांनीं इमारतीला प्रथम घेरून टाकिलें. कारखान्यांत जे थोडे लोक काम करीत होते त्यांना मागच्या दारांनीं पळतां पळतां पुरें झालें. पुढचीं दारें फोडून मंडळी धडाक्यानें आंत शिरली, व हातास लागेल तीं यंत्रें वगैरे चटसारें मोडून त्यांनीं सारी जागा मोडक्या सामानानें अडवून टाकिली. त्यानंतर ते दुसऱ्या व तिसऱ्या इमारतींत गेले, तेव्हां एकाएकी ‘ आग लागली ’

ह्मणून ओरड झाली. मग काय, पुढारी मंडळी घाबऱ्या घाबऱ्या बाहेर येऊन पाहूं लागली, तों खरोखरी ज्या हफीसांत कारखान्याचें दप्तर राहत असे व जेथें कामकरी लोकांचा पगार वाटला जात असे, तेथील दारें व खिडक्या यांतून धुराचा लोळ निघत आहे, असें त्यांच्या नजरेस पडलें. तेव्हां अशा आगीच्या नासधुसीमुळें एकंदर लोखंडाचा कारखाना व तत्संबंधीं सर्व कांहीं ह्यांचा अगदीं फडशा पडेल, असें दंगखोरांपैकीं अगदीं मूर्ख अशा लोकांसहि वाटूं लागलें. ज्यानें आग लाविली त्याच्या नांवानें साऱ्यांनीं लाखोली वाहिली, परंतु नुसत्या शिव्या देण्याचा काय उपयोग असें मनांत आणून आग विझवून कांहीं महत्वाचे कागद हातीं लागल्यास पहावें, ह्मणून ते त्या खटपटीस लागले. परंतु हफीसाच्या दरवाज्याशीं ती ह्मातारी बेफाम होऊन हातांत कोलीत फिरवीत व आग लाविल्याबद्दल फुशारकी मारीत उभी आहे असें त्यांनीं पाहिलें. पण हे तिचे पूर्वीचे साथीदार तिजजवळून जातांना तिजकडे रागानें पहात व शिव्या देत आग विझविण्याला चालते झाले.

पुष्कळ जण ह्मणूं लागले 'अहो तिला धरा, पकडून चांगली बांधून ठेवा, नाहीं तर ती आपल्या साऱ्यांचा नाश करील.' परंतु तिला पकडणें सोपें नव्हतें. शेवटीं कांहींकांनीं मोठ्या प्रयासानें तिला बांधून तिच्या घरीं नेलें, व तिला आंत कोंडून ठेविलें.

दंगखोरांपैकीं कांहीं जण पांडोबा, व खुद्द कारखान्याचे पारशी मालक असे मिळून आग विझविण्याला लागले. बाकीची दंगखोर मंडळी यंत्रें मोडून तोडून टाकण्याकडे गुंतली होतीच; त्यांना ह्मणण्यासारखा अडथळा झाला नाहीं. कांहीं थोडे लोक कामावर आले होते, त्यांनीं किंचित् टिकाव धरिला, परंतु त्यांनाहि दंगखोरांपुढें पळ काढावा लागला. पुढाऱ्यांच्या मनांत फक्त यंत्रावर सूड घेण्याचा होता, पण एकदां सूड घेण्याची सुरुवात झाली ह्मणजे कोठपर्यंत मजल जाईल हें सांगतां येत नसतें. आग लागलेली पाहूनच कित्येक बदमाषांना अधिक चेव आला;

त्यामुळें पुष्कळ चोऱ्या व बरीच मारहाण देखील झाली. वास्तविक पाहता यंत्रांशीं त्यांचा कांहीं देखील संबंध नव्हता.

कारखान्यांतील यंत्रें वगैरे मालसामानाचा बचाव करण्यासाठीं पांडोबानें शिकस्त केली. आग विझवायाला बरेच लोक लागले आहेत असें पाहून तो दुसऱ्या एका इमारतीकडे वळला. येथें भारी किंमतीचें यंत्रावें सामान पुष्कळ होतें; त्याचा बचाव न केल्यास दंगेखोरांच्या हातीं लागून जबर नुकसान होणार होतें. त्या जागीं तो पळत गेला व त्यानें पाहिलें तों सारी सामसूम होती, कारण दंगेखोर अद्याप तेथें येऊन पोंचले नव्हते. त्यानें आंत जाऊन दार आंतून लावून घेतलें, व खिडकींतून लोकांना सहज येतां येऊं नये, ह्मणून तेथें तो अडगळ सांठवून ठेवूं लागला. त्यानें त्याप्रकारें अर्धामुर्धा बंदोबस्त केला न केला, इतक्यांत मंडळी येऊन पोंचली. दार लाविलेलें पाहून त्यांनीं खिडकीचा मार्ग धरिला व ती जबरदस्तीनें उघडलीहि. परंतु पांडोबानें लागलीच हातांत एक मोठी पहार घेऊन तेथें उभें राहून सर्वांना धमकी दिली ' बच्च्याराम, माझ्या तडाक्यांत तर या, ह्मणजे टाळकीं फुटलींच ह्मणून समजा. मंडळी खालीं होती व तो वरच्या जागीं होता, ह्मणून त्याची एकाकी सरसी होती; तेव्हां मंडळी क्षणभर चपापून मागें सरली. कांहीं जणांचें ह्मणणें असें पडलें कीं, दरवाजा फोडून आंत जावें; परंतु आंत प्रथम जे शिरतील त्यांना कापळमोक्ष करण्यासाठीं कितीजण पाहरी घेऊन आहेत कोण जाणे असा त्यांना धाक पडला. तेव्हां 'धूर देवून त्यांना पिटाळा' अशी साऱ्यांनीं ओरड केली, व त्याप्रमाणें लागलीच ५।६ टेंभे आंत टाकिलेहि. दोन्हीं पायांच्या आटोक्यांत जितके आले तितक्यांवर पाय दाबून पांडोबानें दोन तीन टेंभे विझविले. परंतु एका टेंभ्यामुळें कांहीं हलक्या लांकडांनीं पेट घेतला; तो पायानें विझविण्याकडे पांडोबाचें लक्ष गुंतलें आहे, असें पाहून खालच्या दोघांतिघांनीं चटकन खिडकींत उडी मारून त्याच्या हातांतून पहार हिसकावून बाहेर टाकून दिली.

तरीहि पांडोबानें प्रसंगावधान ढळूं दिलें नाहीं. दोन्ही हातांत खालीं पडलेले जळते टेंभे घेऊन त्यानें त्या लोकांच्या तोंडांशी खुपसले. तेव्हां त्यांनाहि अशा प्रकारची सलामी न रुचून खालीं स्वस्थानीं चटकन उडी घ्यावी लागली. ' धूर देवून पिटाळून लावण्याची आतां माझी पाळी आहे ' असें तो ह्मणाला; परंतु हा शेंवटचा बचाव झाला. जे तिथे उडी मारून खिडकींत आले होते, त्यांना कळून आलें कीं, ह्या जागीं बचाव करण्यास पांडोबाशिवाय दुसरा कोणी देखील नाहीं. ह्मणून त्यांनीं खिडकीबाहेरून आंत शिरण्याची उगाच हूल दाखवून त्याचें लक्ष्य आपल्याकडे गुंतविलें. इतक्यांत कांहींकांनीं बाहेरून दरवाजा फोडून आंत प्रवेश केला. त्याबरोबर आंत साऱ्या जागेभर बाहेरची मंडळी घुसून गेली. त्या जागीं अर्धी अधिक नासधूस झाल्यावर मंडळीचा गलबा व पाडापाडीचा आवाज ह्यांतूनहि एक आनंददायक आवाज ऐकूं येत आहे असें पांडोबाला वाटलें. तो आवाज पोलीस स्वारांच्या घोड्यांच्या टापांचा होता. लागलीच थोडक्याच मिनिटांनीं आगीच्या लाल प्रकाशांत पोलीसच्या नागव्या तलवारीहि चमकूं लागल्या. त्यांनीं धरणांव घेऊन इमारतीला घेरा दिला. पांडोबा हा पूर्वीप्रमाणेंच खिडकीवर पाय सोडून बसला होता, त्याला त्यांनीं प्रथम कैद केलें; परंतु त्याला हंसूं येऊं लागलें, कारण आपण लौकरच सुटूं अशी त्याची खात्री होती. तरीहि दंगेखोरांपैकींच कांहींकांनीं पांडोबाकडे कांहीं गुन्हा नसल्याचें मोठ्या उत्सुकतेनें सांगितलें, व त्याची सुटका करण्याविषयीं ते स्वतः होऊन पोलिसाची विनवणी करूं लागले, तें पाहून त्याला गहिंवर आला. शेंवटीं वाडिया येऊन पोंचल्यावर त्यानें पांडोबाची सुटका केली. परंतु त्या इमारतींत जे सांपडले त्यांपैकीं कोणांचा अपराध विशेष होता हें सांगण्याचें काम पांडोबाला मोठ्या दुःखानें पत्करावें लागलें. आपण सांगत आहों तें आपलें कर्तव्यच आहे ह्मणून डगमगतां कामा नये असा त्यानें विचार केला. ह्मणून प्रथम खिडकी

फोडली कोणीं, आंत टेंभे टाकिले कोणीं व दरवाजा कोणीं फोडला ते लोक त्यानें दाखवून दिले.

ह्या वेळीं पाडापाडी व नासधूस बंद पडली खरी; पण ती आणखी कांहीं वेळ चालली असती, तरी ह्मणजे एकंदर स्थिति अधिक वाईट झाली असती, असें नव्हतें. वाईट होण्याचें होतें तें सारें होऊन चुकलें होतें. पोलीस अंमलदाराशीं **वाडिया व बरजोरजी** उदासीनपणें एकांत करीत बसले. चांगल्या चालीचे कामकरी लोक आपल्या देखत उपजीविकेचें साधन नष्ट झालेलें पाहून मनांत हळहळत होते; पडक्या व जळक्या इमारतींतून हळू हळू धूर निघत होता तो पहात बिचारे छातीवर हात धरून उभे होते. एका रिकाम्या इमारतींत सारे कैदी कोंडून बाहेर जणूं घोड्यांवर कोरींव मूर्ती आहेत, ह्याप्रममाणें पोलीस स्वार निश्चल बसून पाहरा करीत होते. त्या जागीं अगदीं सामसूम होती. **वाडिया व बरजोरजी** ह्यांच्या बंगल्याचे कंपौंडांचे फाटकांशी व आंत बंगल्यापाशीं पोलीस स्वार जावत्यासाठीं होते. त्या स्वारांच्या घोड्यांनीं कांकरीच्या जमिनीवर टाप मारिली कीं, आंत बाया दचकून जात. बुटलेरांची तर त्रेधा उडाली होती; इतर नोकर लोकांना धीर देऊन पोलीसपैकीं मुसलमान वगैरे लोकांसाठीं खाण्याचें तयार करून देण्याचें त्याजकडे होतें. परंतु ह्या सर्वांपेक्षांहि झोंपड्यांतून जे स्वतःशींच दुःख गिळून बसले होते ते बिचारे अधिक दीन व कष्टी होते. 'झोंपड्या पलीकडे तुह्मी जाऊं नका बरें' असें आयांनीं आपल्या लहान लहान मुलांना बजावून सांगितलें होतें; पण मुलांची जात हूड, तीं न कळत पळत येऊन बाहेरची बातमी सांगत; आणि ' आई, आई, पलीकडच्या माळावरून बाबा पहा येत आहे तो ' किंवा ' ताई, जानू आला पहा आतां त्याची काळजी नाहीं ' किंवा ' उम्या शेजारच्या घरीं बातमी सांगत आहे, तो आला ह्मणजे आपल्याला सारें कळेल' अशीं कर्णमधुर वाक्यें ऐकावयास मिळतील ह्या आशेनें, मुलें दुडदुड धांवत आलीं कीं, घोरांत अस-

लेल्या बायकोनें, बहिणीनें किंवा आईनें उत्सुकतेनें मान वर करावी. परंतु 'अमका शेजारी कैद झाला' 'मुलगा कैदेंत जाणार म्हणून शेजारची बयाबाई ओकसाबोकशीं रडत आहे,' 'नवऱ्याची शेवटली भेट होईल तर पहावी म्हणून माई ढवळी पोलीस अंमलदाराकडे गेली आहे, कारण आपल्या नवऱ्यानें प्रथम आग लाविली हें तिला खरें वाटत नाहीं' असें कांहीं मुलांनीं सांगितलें म्हणजे निराश होऊन पुनः त्या बिचाऱ्या बाया माना खालीं घालून खिन्न बसत.

'आईचें रडणें थांबल्या खेरीज मी नाहीं आंत जाणार' असा मुलांनीं वारंवार मनाशीं बेत करावा. परंतु कांहीं नवीन वाईट बातमी समजली कीं, त्यांनीं पुनः आंत जाऊन सांगितल्यावर बायांचें रडणें सुरू व्हावें.

धरलेल्या लोकांस त्याच दिवशीं नेतां येण्यासारखें नव्हतें, म्हणून रात्रीं त्यांना खायाला प्यायाला देऊन पोलीसचे लोक त्यांना निजण्यासाठीं कांबळ्या वाटीत असतां, त्यांचे आप्तसंबंधी बाया बापड्या एकादा शब्द बोलायाला मिळाल्यास पहावें ह्या आशेनें इकडून तिकडे हिंडत होत्या. हा प्रकार पाहून साहजिक वाईट वाटे. पोलीस स्वार पहाऱ्यावर होते, त्यांच्या बायांनीं किती तरी विनवण्या केल्या. त्या काकूळती येऊन म्हणत 'एकवार घोड्यांमधून खिडकीपर्यंत जाऊं द्या, म्हणजे आंत आमचा राम्या, कुशा किंवा गण्या ह्यांना कांहीं पाहिजे कीं काय तें कळेल, किंवा त्यांना कांहीं बोलावयाचें असेल तर ते सांगतील.' स्वार कसचें ऐकतात, त्यांतून त्यांना कायद्याविरुद्ध वागतांहि येत नव्हतें. परंतु रात्र पुष्कळ झाली तेव्हां कायतें अगदीं निराश होऊन बाया घरोघर गेल्या, व उजाडतें केव्हां ह्याची वाट पाहूं लागल्या.

एकदांची सकाळ झाली. हे वसंताचे दिवस असल्यानें सकाळची वेळ हि तशीच छान होती. वाडियानें दिवाणखान्याच्या खिडक्या उघडल्या. रात्रभर तो व बरजोरजी असे उभयतां पुढें काय करावयाचें हें ठरवीत होते. मुंबईस दुसरे भागीदार होते त्यांना त्यांनीं पत्रें लिहिलीं,

त्यात कारखाना एकदम बंद करण्यास काय उपाय योजावे ह्याविषयीं सल्ला विचारिली होती. एकंदर मालमत्तेचें नुकसान झालें तें भरून देण्यासाठीं कायदेशीर इलाज घेतले पाहिजेत, ह्मणून त्यांनीं आपल्या वकिलांनाहि पत्रें पाठविलीं. नुक्ताच अरुणोदय झाला होता त्यामुळें पूर्वेकडील भाग तांबूस झाला होता; झाडांवर दंव पडून त्याचे थेंब चकाकत होते; पक्षी वरटच्यांत जागे होत असतां त्यांचा चिल्बिल् आवाज होत होता; त्यामुळें ही सकाळची वेळ किती रमणीय भासत होती. तिच्या मानानें दिवाणखान्यांतील दिव्यांचा फिकट उजेड व सामसूम ही कितीतरी उदास होती. बाहेरचा तो देखावा पाहून वाडियाच्या खिन्न मनाला एकदम हुशारी वाटूं लागली. परंतु सूर्य उगवला तशा त्याच्या कोमल किरणांत पोलीस स्वारांच्या नागव्या तरवारी चमकूं लागल्या, त्या पाहून त्याची वृत्ति पुनः पराकाष्टेची खिन्न झाली. तो नीट पाहूं लागला, तों भट्या विझून गेल्या आहेत, आणि जेथें नेहमीं कामाची धामधूम असायाची तेथेंच जणूं वाळ्याची सांथ येऊन सामसूम झाली आहे असें दिसलें. तो मोठा धीराचा होता, इतका वेळ त्यानें स्वतः आपला व आपल्या जवळच्या मंडळीचा धीर खचूं दिला नाहीं; परंतु या वेळीं त्याच्या वृत्तींत फेरफार झाले ते त्याला सहन होईनात, आणि त्या भरांत त्याच्या डोळ्यांतून खळकन पाणी आलें. वास्तविक पहातां ह्याबद्दल त्याला लाज वाटण्याचें कारण नव्हतें.

बरजोरजी जवळ येऊन ह्मणाला 'धरलेले लोक पाठविण्याचें तुह्माला वाईट वाटतें. मलाहि तुमच्यासारखेंच खळबळून येत आहे. ह्मणून एकदांचें हें लौकर आटपेल तितकें बरें '

असें ह्मणून दोघेहि बाहेर निघाले, व धरलेल्या लोकांस खायाला प्यायाला देऊन त्यांची निघण्याची तयारी जितकी लौकर होईल तितकी करूं लागले. ह्या वेळीं जितके ह्मणून ह्या जागीं हिंडत फिरत होते, त्यांना पुनः दंगा होईल अशी मुळीं देखील धास्ती वाटत नव्हती. टिखळखोर मंडळी पोलीसच्या पहाऱ्यांत होती; आणि बाहेर जी मंडळी

होती ती ( ह्मणजे ज्यांचें नुकसान झालें ते, व नुकसान करणारे ) दुःखानें व भयानें सारखीच दबून गेली होती.

कारखान्याच्या वड्याळाचे आठ वाजले, तसे ज्या जागीं कैद्यांना अटकेंत ठेविलें होतें तेथें दरवाज्याशीं गाडा येऊन दाखल झाला. त्यावर पोलीस स्वारांचें वगैरे सामान भरण्यांत आलें. हें होत आहे तोंच बाहेरच्या झोंपड्यांतील सारी मंडळी तेथें जमली; परंतु पोलीसच्या स्वारांनीं मध्यें कांहीं जागा मोकळी ठेवून मंडळीला हटवून अर्ध वर्तुळाकार उभें केलें. आंतल्या भागांत पोलीस अंमलदार आणि **बरजोरजी** व **वाडियाशेट** असे उभे राहिले. दरवाज्यांतून एकेक कैदी जसा बाहेर येई, तसें त्याच्याशीं बोलण्याला कोणी आप्तसंबंधी मागूं लागल्यास त्यासहि येथेंच येऊं देत. हा निरोप घेतेवेळीं अति रडारड होई. ती पाहून साऱ्यांना वाईट वाटूं लागलें, ह्मणून पोलीस अंमलदाराला ह्या भेटी लौकर लौकर आटोपाव्या लागल्या. त्यांतून कैदी व त्यांचे आप्तसंबंधी ह्यांनाहि फार दुःख होऊं नये, ह्मणून प्रत्येकानें एकेक वेळ कडकडून भेटावें, बोलत बसूं नये, असा त्यानें हुकूम केला. कित्येकांनीं तर ह्याहिपेक्षां थोडकी भेट घेतली; कारण नवरा किंवा भाऊ कैदेंत पडल्याची लाज वाटून कित्येक बायका व बहिणी अशा संकटांत त्यांना येऊन भेटण्यास किंवा त्यांचा आप्तपणा उघडपणें जगापुढें कबूल करण्यास धजेनात. त्यांनीं येऊन एकवेळ भेटावें ह्मणून बिचाऱ्या कैद्यांनीं पुष्कळ काकुळती केल्या. असा निष्ठुरपणा कोणत्याहि आईकडून कधींहि झाला नसता, कारण आईची मायाच तशी निष्कपट असते. असो, एकवेळ काकुळती करूनहि कोणी येत नाहीं असें पाहिलें, ह्मणजे पुनः चकार शब्दहि न काढतां जो तो मनांतल्या मनांत नाराज होऊन खिन्न वदनानें आपल्या जागीं जाऊन उभा राही.

शेवटीं, सरते शेवटाला कैदी बाहेर आला; तेव्हां पोलीस स्वार कैद्यांच्या मागेंपुढें व आजूबाजूस चौतर्फा उभे राहिले, आणि कैदी व स्वार

कूच करूं लागले. तेव्हां जमलेल्या मंडळींनीं रडून एकच कल्होळ केला. कैदी अगदीं दिसेनातसे होईपर्यंत जो तो त्यांच्या वाटेकडे तोंड फिरवून पाहूं लागला. परंतु ज्या इमारतींत कैद्यांना कोंडून ठेविलें होतें तेथें कांहीं बाया गेल्या, व जमिनीवर अंग टाकून आपली लाज व दुःख लोकांस दृष्टीस न पडेल अशा रीतीनें शोक करूं लागल्या.

हल्लीं एकंदर स्थिति कशी आहे व पुढें काय होण्याचा सुमार आहे. हें जमलेल्या मंडळीस नीट समजावून सांगण्यास ही वेळ उत्तम आहे, असा **बरजोरजी** व **वाडिया** ह्यांचा विचार पडला. **वाडिया** हा साऱ्यांना पहिल्यापासून माहीत होता, ह्मणून त्यानें हें काम पत्करिलें. नंतर **बरजोरजी, फ्रामरोझ, जहांगीर** व **वाडिया** असे जवळच्या एका इमारतींत जाऊन एका खिडकीपाशीं उभे राहिले, आणि **वाडिया** यानें खालीं असलेल्या मंडळीस उद्देशून बोलण्यास सुरवात केली.

आमच्या कारखान्याची हल्लींची स्थिति काय आहे व पुढें काय होईलसें वाटतें, हें आम्ही आतां तुम्हाला समजावून सांगणार, तें कांहीं अंशानें आमच्यासाठीं व बहुतांशानीं तुमच्यासाठीं. कारखाना चालविण्यासंबंधांत आम्ही कोणालाहि जबाबदार नाहीं, असें आम्ही मागेंहि म्हणत आलों व आतांहि म्हणतों. परंतु आतां आमचा लोखंडाचा कारखाना आम्ही बंद कां करितों, हें तुम्ही नीट समजून घ्या. म्हणजे तो बंद केल्याखेरीज आम्हाला गति नाहीं हें तुम्हाला कळेल, आणि इतके मेहनती व व्यवस्थित लोक एका दिवसांत बेकार होऊन बसले त्यांत आमचा कांहीं दोष नाहीं अशी तुमची खात्री होईल. हें सारें आम्ही तुमच्या कल्याणासाठीं सांगत बसतों; कारण दंगा करण्याच्या कामीं तुमच्यापैकीं जे कृतीनें दोषी नाहीत परंतु ज्यांची मति भ्रष्ट झाली होती, त्यांना दंगा करणें हा गुन्हा असून मूर्खपणा आहे हें चांगलें कळावें, असा आमचा हेतु आहे. त्याचप्रमाणें ज्यांचा ह्या दंग्याशीं

कोणत्याहिप्रकारें संबंध नव्हता त्यांनीं, आपल्या मुलांनीं पुढेंमागें आमचा कारखाना ज्यामुळें बसला त्याप्रकारच्या सर्वांस घातुक अशा फंदांत स्वतः पडूं नये, किंवा दुसऱ्यांस पडण्याविषयीं बदसल्ला देऊंनये. ह्यासाठीं त्यांना चांगलें वळण लावावें, अशीहि आमची इच्छा आहे.

'ह्या कारखान्यांतून फायदा करून घेणारे आम्ही मालक भांडवलवाले व तुम्ही कामकरी लोक आपण ज्यावेळीं येथें येऊन राहिलों, त्यावेळीं ह्या आपल्या दोन वर्गांत एका प्रकारचा करार झाला. हा करार लेखी किंवा तोंडी प्रत्यक्ष झाला नव्हता, तरीहि आपणा सर्वांची कृति त्यास अनुसरून होती, ह्मणून त्यास सर्वांची अप्रत्यक्ष संमति होती, असेंच समजलें पाहिजे. आमच्या भांडवलांतून तुमच्या उपजीविकेचें साधन तुम्हाला मिळत असे, त्याच्या बदल्यांत तुह्मी स्वतःचे श्रम आह्माला देत होतां. आह्मीं व आमच्या वाडवडिलांनीं संपत्ति मिळवून ठेविली होती. त्या संपत्तीनें ही कारखान्याची इष्टेट विकत घेतली, भट्ट्या व कारखाना बांधला, रस्ते नवीन केले किंवा दुरुस्त केले, आणि तुमच्या हक्काची मजुरी दिली; ह्याप्रमाणें आमची संपत्ति आह्मीं खर्च केली. ह्या उभयपक्षांच्या संमतीनें उभयपक्षांसहि फायदा होताच त्यामुळें उभय पक्षीं संतोष होता; आणि गैरसमजूत किंवा कांहीं अडचण उत्पन्न न होतां ही संमति पुष्कळ काळ टिकावी अशी उभयपक्षांचीहि इच्छा होती. परंतु जें प्रमाण श्रम व भांडवल ह्यांमध्यें होतें तेंच प्रमाण सदासर्वकाळ राहील असें वचन उभयपक्षांपैकीं कोणीं दिलें नव्हतें, किंवा तसें वचन देणेंहि शक्य नव्हतें; कारण पुढें मागें कोणत्याहिपक्षाचें काय झालें असतें ह्याचा अंदाज होण्यासारखा नव्हता. दुसऱ्या कोणत्याहि धंद्यांत कदाचित श्रमाचा अतिशय खप लागूं लागल्यानें तुह्मीहि जास्त मजुरी मागितली असती, किंवा आह्मी जास्त मजूरी देण्याचें कबूल केलें नसतें, तर तुह्मी आमचा कारखाना सोडून गेलां असतां. किंवा असेंहिपण झालें असतें कीं, लोखंडाचा भाव अतिशय उतरल्यानें आह्मास तुमच्या

मजुरीचा दर कमी करावा लागला असता, किंवा कारखान्यांतील कांहीं काम तुमच्या मदतीखेरीज अन्य उपायांनीं करून घ्यावें लागलें असतें.

ह्मणून तुमचे श्रम व आमचें भांडवल हीं साहचर्यानें किती काळ काम करतील, ह्याविषयीं कांहीं उभयपक्षीं बोलणें झालें नाहीं. आणि असें बोलणें झालें नाहीं हेंही बरेंच झालें; कारण मीं सांगितलेले दोनहि प्रकार पुढें कालांतरानें घडून आले. पहिल्या प्रथम श्रमाचा खप इतका वाढला कीं, तुह्मीं जास्त मजुरी मागितली व ती आम्हीं मोठ्या आनंदानें वाढविलीहि; कारण व्यापाराला तेजी होती, त्यामुळें तितकी जास्त मजुरी देणें वाजवी होतें असें आह्मांसही वाटलें. कांहीं काळानें विरुद्ध प्रकार घडून आला. बाजार मंदवला व भाव उतरला, त्यामुळें आह्मांस पूर्वीसारखी जास्त मजुरी देववेना, तेव्हां तुम्हींहि कमी घेण्याचें कबूल केलें, आणि पुढें जसजसा व्यापार बसत चालला तसतशी मजुरीहि कमी द्यावी लागली. इतका वेळ उभयपक्षांचें एकचित्त होतें. काळ बदलल्याचा परिणाम उभयपक्षांस जाणवला, आणि साऱ्यांचें ह्यांत नुकसान आहे ह्यामुळें त्यांस वाईटहि वाटलें. परंतु कोणासही असें वाटलें नाहीं कीं, हा अनर्थ दुसऱ्या पक्षाच्या हलगरजीपणानें ओढवला आहे, व तो दुसऱ्यास टाळतां आला असतां. शेवटीं दोघांच्याहि कमनशिबानें उभयतांत दुही माजली, आणि ती, नवीन यंत्रें उपयोगांत आणिलीं ह्मणून.'

ह्यावेळीं खालीं जमलेल्या मंडळींत गडबड व कुरकूर सुरू झाली, त्यावरून पुढें त्यांच्या मनांत ऐकावयाचें नव्हतें असें वाटलें. तथापि कांहींकांच्या मनांत **वाडिया** आणखी काय सांगतो हें समजण्याची इच्छा होती, ह्मणून ते गडबड बंद करण्यासाठीं 'चुप रहा, आह्मांला ऐकूं द्या' असें ओरडले, त्याबरोबर गलबा बंद होऊन **वाडियाला** बोलायला मिळालें.

तो पुढें ह्मणाला ' भांडवल व श्रम ह्यांच्या साहचर्याशिवाय नफा

होणार नाहीं, किंवा कोणताही माल जमिनींतून तयार होणार नाहीं, किंवा भट्टींतून अथवा मागावर निवणार नाहीं, किंवा तो माल खुष्की अथवा जलमार्गानें नेतां येणार नाहीं; ह्मणून भांडवल व श्रम हीं निरनिराळीं पाडण्याचा उद्योग करणें ह्मणजे निवळ नुकसान व वेडपणा होय. भांडवल व श्रम हीं ज्या मानानें वाढतील त्यामानानें नफा होतो, तसेंच तीं दोन्हीं जसजशीं वाढत जातील तसतशा प्रमाणानें मनुष्याच्या उपभोगाचे पदार्थ सर्वत्र उपयोगांत येतील व स्वस्त होतील; करितां भांडवल व श्रम ह्यांची झपाट्यानें वाढ होण्यासाठीं प्रत्येकानें त्यांची जितकी बचत होईल तितकी केली पाहिजे. उदाहरणार्थ, शिसमी लांकूड आणून तयार करण्याच्या कामीं जितकें भांडवल व श्रम अधिक लावावें तितके शिसमी पलंग, खुर्च्या, टेबलें हीं स्वस्त होतील आणि ते जिन्नस घरोघर आढळून येतील. त्याचप्रमाणें पूर्वी मलमल फार महाग असे, कारण ढाका वगैरे ठिकाणीं थोडेचजण कायते ती काढीत असत; परंतु हल्लीं चोहोंकडे गिरण्या झाल्यानें मलमलीचें कापड साधारण मध्यम स्थितीच्या सर्व लोकांच्या घरीं झालें आहे. तसेंच जर लोखंडाच्या व्यापारांत घालण्यासाठीं जास्त भांडवल व श्रम वांचविले जातील, तर हल्लींपेक्षांहि तें स्वस्त होऊन त्याचा सर्वत्र उपयोग होईल. परंतु आतां तें स्वस्त झाल्यानें आपलें नुकसान होत आहे, तर त्याचा हल्लींपेक्षांहि सार्वत्रिक प्रचारांत आणण्याचा एकादा उपाय आपण शोधून काढिला पाहिजे, ह्मणजे भाव उतरला आहे त्याचा वचपा पुष्कळ माल तयार झाल्यानें निघून येईल. एकून हें उघड आहे कीं, भांडवल व श्रम ह्यांत जितकी काटकसर होईल तितकी परिणामीं सर्व्यांना हितावह आहे. पण ही बचत व्हावी कशी?

'जो नफा येतो त्यांतून जितका भांडवलांत घालवेल तितका घातल्यानें भांडवल वाढत जातें. वर्ष अखेरीस शंभर रुपयांचें जर सहा रुपये व्याज आलें आणि त्या व्याजांतून फक्त एकच रुपया खर्च करून

बाकीचे पांच रुपये मुद्दलांत घातले. तर दुसऱ्या वर्षाचे अखेरीस १०५ रुपये मुद्दल व व्याजाचे ६ रु.४आ.१० पै मिळून रक्कम एकंदर १११–४–१० होईल. ह्याप्रमाणें बचत केल्यानें भांडवल वाढत जातें; पण अशी बचत करून श्रम वाढत जात नाहींत. श्रमांत सुधारणा करून काटकसर करण्याचे मार्ग निराळे आहेत, आणि दरवर्षी आणखी असे मार्ग शोधून निघत आहेतच. यंत्रानें श्रम वांचतात; ह्मणजे असें कीं, माणसाच्या हातून यंत्रासारखें चांगलें काम होत नाहीं, किंवा इतर सर्व प्रकारानें मनुष्याच्या हातून यंत्रासारखेंच काम होतें पण जास्त वेळ लागतो अथवा जास्त खर्च बसतो, अशा वेळीं मानवीश्रमापेक्षां यंत्रांनीं फायदा होतो. आह्मीं कारखान्यांत नवीन यंत्रें आणिलीं, त्याचें कारण तरी हें होय. त्यामुळें मानवी श्रमापेक्षां खर्चांत व वेळेंत बचत होऊं लागली, भट्टया व रूळ ह्यांनीं मनुष्याच्या हातून न होणारें काम होतें, तशी कांहीं ह्या नवीन यंत्रांची गोष्ट नव्हे; फक्त मानवीश्रमानें आजपर्यंत जें झालें, तें थोडक्या वेळांत व थोडक्या खर्चांत त्या यंत्रांनीं होऊं लागलें. त्यामुळें श्रमाची बचत झाली, आणि श्रमाची बचत जेणेंकरून होईल तें सर्व इष्टच आहे; ह्मणून आमचीं नवीन यंत्रेंहि हितकारक होतीं हें उघड आहे.

'तुमच्या मनांतून मला बोलतांना अडथळा करावा असें दिसतें. तुमचा असें ह्मणण्याचा हेतु दिसतो कीं, तुह्मी भांडवलवाले ह्मणून तुह्माला तीं नवीन यंत्रें हितकारक आहेत; आह्मी पडलों मजूर, आह्मांला तीं हितकर नव्हत. पण मी माझ्या बोलण्याची खात्री करून देतों, मात्र तुह्मी लक्ष देऊन ऐका. चार वर्षांपूर्वीं जी व्यापाराची स्थिति होती तीच स्थिति आतां देखील आम्हीं परत आणूं शकलों असतों, परकी देशांतील लोखंडाचे कारखाने आम्ही भस्म करूं शकलों असतों व आमच्या देशांतील प्रतिस्पर्धी कारखाने जमीनदोस्त करण्याची आमच्या अंगीं शक्ति असती, किंवा पूर्वीप्रमाणें लोखंडाचा खप बाजारांत होईल व वाटेल

तितका भाव केटला जाईल अशी कर्तुमकर्तुम् शक्ति आमच्यांत असती; तर खरोखर नवीन यंत्रें आम्हीं घातलीं किंवा न घातलीं ह्याची तुम्ही बिलकुल परवा केली नसती, कारण सर्वांना पुरें इतकें काम व मजुरी आम्ही देऊं शकलों असतों. आतां तुम्हाला वाईट वाटतें त्याचें कारण इतकेंच कीं, तुमच्यापैकीं कांहीं लोक बेकार झाले आहेत. परंतु त्या नवीन यंत्रांचा तुम्हीं उध्वंस केला त्यामुळें आतां सारेच बेकार होऊन बसले, त्या तुम्हांला तरी त्या यंत्रांमुळें काम मिळत होतें हें लक्षांत ठेवा आमच्या कारखान्यांत जितकीं यंत्रें व मनुष्यें होतीं तितक्या साऱ्यांना पुरें इतकें काम जर असतें, तर तुम्हांला जसा आनंद झाला असता तसाच आम्हांला पण झाला असता. परंतु कारखान्याला पडती कळा लागली त्याला आमचा उपाय नव्हता. आम्हाला कारखान्याची व यंत्रांची दुरुस्ती करावी लागे, अशावेळीं नवीन यंत्र उपयोगांत आणून दोन तृतीयांश लोक कामावर राहूं द्यावे, किंवा तीं यंत्रें न आणतां कारखानाच अजी बंद करून साऱ्या लोकांनाच फांटा द्यावा, हा प्रश्न होता. तेव्हां जुन्या कामकरी मंडळीच्या कुरकुरीकडे लक्ष न देतां त्यांच्यांतच नवीन यंत्रांच्या रूपाचे नवीन कामकरी लावावे, असें केल्यानें साऱ्यांचेंच हित होतें, असें आम्हास वाटलें. गेल्या सहा महिन्यांत जें आम्ही तुम्हांला ठेविलें होतें, तें फक्त नवीन यंत्रांमुळें बचत झाली म्हणून ठेवितां आलें, हें पक्कें लक्षांत ठेवा. आणि आतां साहजिकच तीं यंत्रें नाहींत, म्हणून तुम्हापैकीं कोणालाहि ह्याउपर ठेवितां येत नाहीं.

'तुम्ही कदाचित म्हणाल कीं, ज्यांनीं हें नुकसान केलें त्यांच्या पैशांतून तें भरून काढतां येईल व त्यामुळें पुनः कारखाना दुरुस्त करून पूर्वीप्रमाणें तो चालवितां येईल. ज्या लोकांनीं दंगा केला त्यांच्या इष्टेटींतून नुकसान दिली जाईल हें खरें आहे; परंतु तेवढ्यानें तुमच्यावरच्या संकटाचें परिमार्जन होईल असें वाटत नाहीं. प्रथमतः असें नुकसान भरून भरून तें किती मिळणार, कारण दंग्यामध्यें बहुतेक नंगे व

कनिष्ठ लोकांचाच भरणा फार असायाचा. त्यांतून व्यापाराची हल्लींची स्थिति पहातां निराशा होते. बरें, आम्ही मांडवलवाले व तुम्ही कामकरी ह्या उभयपक्षांमध्यें जो पूर्वींचा करार गृहित मानिलेला होता तो हल्लींच्या दंग्यामुळें अत्यंत बेभरंवसा झाल्यानें पार नाहींसा झाला आहे, तर पुनः त्याअन्वयें वागण्याची दोन्ही पक्षांस कधीं उमेद वाटणार नाहीं. तर मग आम्ही करणार काय हें तुम्हाला गूढ पडलें असेल. माझे भागीदार बरजोरजी शेट खटल्यासह एकदम येथून रवाना होतील. आमची येथील मालमत्ता विकून टाकून कारखाना बंद करण्यासाठीं मी थोड्या लोकांनिशीं येथें राहीन; आणि मग, ह्या जागेंत कोण गडबड होती व लाखों लोकांना अत्यावश्यक व उपयोगी असा माल तयार करण्याचें किती काम चालत होतें तें पार जाऊन परवांपर्यंत हीच जागा ओसाड व भयाण दिसूं लागेल. ह्या कामीं आम्हाला तर असें यश आलें आहे; परंतु ईश्वराजवळ आमचें एवढेंच मागणें आहे कीं, कधीं काळीं तुमच्यापैकीं कोणाचे वंशज पिढ्यान् पिढ्या मिळविलेल्या संपत्तीनें श्रीमान होऊन येथें येऊन पुनः कारखाना काढतील, तर त्यांना आमच्यापेक्षां तरी अधिक यश येवो. ईश्वर करो, आणि त्यांना अशाच लोकांशीं गांठ पडो कीं, जे समाजाचे हक्क व हित ह्यांविषयीं तुमच्यापेक्षां जास्त वाकब असतील आणि जे तुमच्याप्रमाणेंच भरभराटींत आनंदवृत्तीनें राहून मात्र पडत्याकाळीं तुमच्यापेक्षां जास्त समजूतदार व सहनशील असतील.

'आजच्या प्रसंगाची हकीकत समजण्याची त्या वंशजांना इच्छा उत्पन्न होऊन जर ते माहिती मिळवितील, तर खरोखर तुह्मीं जो हा सूड उगविला—कारण तुह्मी ह्या कृत्याला सूड ह्मणतां, असें माझ्या ऐकिवांत आहे—तें खरोखर अधमपणाचें व मूर्खपणाचें कृत्य होय, अशी त्यांची खात्री झाल्यावांचून रहाणार नाहीं. ह्या धुमाकुळींत दोन्हीपक्षांपैकीं तुमच्या मालकांनें नुकसान तुमच्यापेक्षां कमी आहे व तुमच्याइतकेच वि-

शेष गदा येऊन पडली, हें पक्कें लक्षांत ठेवा. आतां हें खरें आहे कीं, आमच्या मनाला त्या मानानें बराच त्रास झाला आहे. पण तुमचें नुकसान कांहीं थोडेंथोडकें नाहीं. तुमचा धंदा गेला. आमचें नुकसान व्हावें ह्मणून जें तुह्मीं केलें तें भरून काढण्यासाठीं तुह्मीं जी रक्कम व्यांकेंत वगैरे ठेविली असेल ती सारी त्या पायीं जाईल. आणि त्यांतूनहि मोठ्या दुःखाची गोष्ट ही कीं, तुमच्या आप्तमित्रांपैकीं पुष्कळांच्या कपाळीं कायद्याअन्वयें शिक्षा व त्यामुळें होणारी बेअब्रू हीं आहेत. समाजांत राहिल्यानें जो सुरक्षितपणा व जे अन्य नानाप्रकारचे फायदे आहेत त्यांचा उपभोग जन्म झाल्या दिवसापासून त्यांनीं घेतला, आणि आतां बेकायदे वागून त्याच हक्काला ते आपखुषीनें मुकले. ह्यांत दुसऱ्या कोणाकडेहि दोष नाहीं. ज्यांचीं त्यांनीं आपल्या कृत्याचीं फळें भोगिलीं पाहिजेतच. आपल्या कृत्यांचे परिणाम फक्त आपल्यासच भोंवत नाहींत, ह्याचें किती दंगेखोरांना वाईट वाटत असेल बरें? किती जणांना असें झालें---पण छेः मी पुढें बोलत नाहीं, कारण तुह्माला हें माझें बोलणें दुःसह होत आहे. दुःखावर डाग देण्याची माझी इच्छा नाहीं. पण तुमच्यापैकीं आपल्या मुलांचे हात धरून येथें बरेच उभे आहेत, आणि तीं मुलेंहि आजचा दुःखकारक प्रसंग पाहून चकित झालीं आहेत. माझें त्या लोकांना एवढेंच हात जोडून सांगणें आहे "बाबांनो आपल्या मुलांना प्रथम ही शिक्षा लावा कीं, तुह्मी कायद्याअन्वयें वागा." आणि आपल्या अनुभवावरून त्यांची अशी खात्री करून द्या कीं, गरीबी कितीही दुःखदायक असली ( व तसल्या भिकार स्थितींत असणें हें जरी वाजवी नसेल ) तरीहि ती पुरवेल; कारण "माझ्यावर जीं तुकड्यासाठीं अवलंबून आहेत त्यांचें व माझें स्वतःचें मीं माझ्या हातानें, नुकसान करून हें संकट ओढवून घेतलें" हा विचार मरेपर्यंत तुह्मापैकीं कित्येकांच्या मनांत घोळल्यावांचून रहाणार नाहीं.

'आता शेवटीं इतकेंच सांगावयाचें आहे कीं, ज्यांनीं आमचें नुकसान

व्हावें म्हणून मनांत दुष्ट विचार आणिले असतील त्यांस आम्ही मना-पासून माफी करितों. हें ऐकून तुमच्यापैकीं कित्येकांना खास बरें वाटेल. आमचेंहि नुकसान झालें आहे, पण तुमची दुःखद स्थिति पाहून आम्ही आमचें दुःख विसरून जातों; व आम्हांस खरोखर तुमच्याविषयीं पराकाष्ठेचें वाईट वाटतें. पण त्याला उपाय नाहीं, म्हणून बाबांनो आमचा हा शेवटचा सलाम.'

जमलेली मंडळी मुकाट्यानें हळू हळू घरोघर गेली. त्या दिवशीं बहुतेक कोणीं बाहेर तोंड म्हणून काढिलें नाहीं.

---

# भाग १०.

## पुनः सामसूम.

माल वगैरे विकून कारखाना मोडून बंद करीपर्यंत जे थोडे लोक वाडियानें ठेविले होते त्यांत **पांडोबाहि** होता. जे लोक कामधंदा मिळावा व पोटभरी व्हावी म्हणून चालते झाले, त्यांत **जानबा** हा आपल्या मुलांबाळांसह प्रथम निघून गेला. **धारवाडांत** त्याचीं मुलें काम शिकत होतीं, तेथें त्यांची सचोटी, उद्योगीपणा व व्यवस्थितपणा ह्या गुणांविषयीं बरीच ख्याति होती; म्हणून **जानबाहि** तेथेंच जाऊन राहिला. त्यानें जी पुंजी जमविली होती तींत बरेच दिवस त्याला कुटुंबाचा खर्च चालवितां आला असता; परंतु त्याच्यासारख्या लायकीच्या मनुष्याला काम मिळण्याला फारसे आयास पडले नाहींत. त्यानें जातांना आपली झोंपडी **पांडोबाच्या** हवालीं केली. **पांडोबाच्या** मनांत तेथून दुसऱ्याजागीं जाण्याचें नव्हतें; कारण त्याचें सुतारकाम व शिवणकाम दुसऱ्या जागीं जाऊन करण्याला त्याला बराच वेळ व मेहनत खर्च करावी लागली असती.

एके दिवशीं तिनीसांजेनंतर तो पेट्या करीत बसला असतां **गुलबाई**

व **वाडिया** हे सहज फिरत फिरत त्याच्या येथें आले. **वाडियाच्या** एका मित्राचें **मुंबईहून** पत्र आलें होतें; त्यांत त्यानें लिहिलें होतें कीं, 'आमच्या गिरणींत मुकादमाचें काम करण्यासाठीं कोणी चांगला हुशार माणूस असेल तर मला कळवा. तुमचा कारखाना बंद झाल्यानें असे बरेच लोक तुमच्या लक्षांत असतील, त्यांतून एकादा निवडा.' दंग्याच्या वेळीं **पांडोबानें** चांगली मदत केली होती, त्यांतून मुकादमाचें काम करण्यास तो सर्वथैव लायक आहे, ह्मणून ही संधि दवडतां कामा नये, असा **वाडियानें** विचार केला. त्याच्या मनांत **पांडोबाचें** ह्याहूनहि कल्याण करण्याचें होतें, परंतु तशी सवड तूर्त नव्हती. तेव्हां त्यानें **पांडोबास** भेटतांच प्रथम ही गोष्ट काढिली.

**पांडोबा** ह्मणाला—शेटसाहेब, तुह्मी मजवर इतका लोभ ठेवितां, त्याबद्दल मी खरोखरी आभारी आहें. पण त्या जागेचा मी इतक्यांतच जबाब सांगत नाहीं. मला एक दोन दिवस विचार करायला पाहिजेत. हल्लींच माझे मनांत दोन विचार घोळत आहेत. माझी पुंजी कांहीं फारशी नाहीं, पण एक वेळ वाटतें **मुंबईस** जाऊन दुकान काढावें, किंवा **पुण्यास** रेशमाचा व्यापार करावा. दोन्हीं ठिकाणांहून माझ्या मित्रांचीं पत्रें आलीं आहेत.

**वाडिया**—हल्लींच्या काळांत एका माणसाला तीन ठिकाणीं कामें सांगून आलीं आहेत, त्यांतून वाटेल तें त्यानें पत्करावें, असा योग क्वचितच यायचा. हें फळ कशाचें बरें?

**पांडोबा** कठोर मुद्रेनें म्हणाला—माझा कृपणपणाविषयीं लौकिक आहे त्याचें. पैसा जवळ असणें, व जो मूळ उद्देश पैसा त्यावर अतिशय आसक्ति, हे दोन गुण कृपणांत असतात; आणि हेच कोणत्याहि धंद्यांत भागी करतांना भागीदारांत असणें जरूर असतात.

**वाडिया** गंभीरपणानें ह्मणाला—ही जी तुह्माला पैशाची हांव सुटली आहे, त्याचें कारण समजेल तर खरोखर मला बरें वाटेल.

कांहीं उत्तर न देतां पांडोबा आंत गेला व तेथून भींतीवर टांगलेलें चित्र त्यानें काढून बाहेर आणिलें. तें दाखवून तो म्हणाला—हें कोण असावें म्हणून तुम्हाला वाटतें ?

वाडिया—मला वाटतें कीं, हें तुमचेंच चित्र असावें. परंतु आतां त्यांत व तुमच्यांत कांहीं देखील साम्यता आढळून येत नाहीं.

काम करून काळे झालेले हात व आपले भिकारी कपडे ह्यांकडे पाहून पांडोबा म्हणाला—त्याचें कांहीं नवल नाहीं. पण चित्र माझें नसून माझ्या एकुलत्या एका वडिल भावाचें आहे. माझ्या विसाव्या वर्षी तो मरण पावला. त्या वेळीं तो एकवीस वर्षांचा होता, आणि त्याकडे सर्व वडिलोपार्जित संपत्ति होती.

वाडिया आश्चर्यानें म्हणाला—मग ती संपत्ति कोठें गेली ?

पांडोबा—त्याला मुलबाळ नव्हतें. बायको होती, तीहि बिचारी दोन महिन्यांच्या आंत त्याच्या मागोमाग गेली. मग सारा कारभार आला मजकडे. ह्या चित्रांत वाडा दिसत आहे तो, आणि दुसऱ्या जमिनी व इतर मिळकत सारी मजकडे आली. परंतु ती सारी मीं ख्यालीखुशालींत उडविली. ती चैनच, मग काय दहा वर्षांत जमीनजुमला डागडागिने चटसारे सावकाराच्या घरीं गहाण पडून व बायको माहेरीं घालवून आम्ही कफल्लक बनलों. आणि अंगावर चिंध्या व जवळ एक दमडी देखील नाहीं, अशा स्थितींत त्या पलीकडच्या डोंगरावर येऊन पुढें काय करावयाचें ह्याचा विचार करीत बसलों, तेव्हां पुढील सर्व विचार ठरवून टाकिला. मी देखील मनांत हेतु योजून आहें. तो हाच कीं, माझी मालमत्ता गहाण पडली ती सोडवावी, बागमळे ह्यांची जी दुर्दशा झाली ते पूर्वीपेक्षांहि चांगले करावे, बायकोची दशादशा केली तिला फुलांत ठेवून पूर्वीच्या दुःखांचा विसर पाडावा.

वाडिया—पण तुमची मालमत्ता परत मिळाली, तर तुम्हाला सुख लागेल असें वाटतें का ? कारण हें सारें होतां होतां किती तरी वर्षे

लागतील. नंतर मुलेंबाळें होण्याची अशा दुरावल्यासारखीच. त्यांतून एकदा कृपणपणाची संवय लागली, म्हणजे ती सुटणें कठीण—तर ही सर्व मालमत्ता कोणी आप्तसंबंधी दत्तक घेऊन त्यास देऊन टाकणार कीं काय?

**पांडोबा**—मला सुख लागणार नाहीं, तसा मी कोणाला दत्तकही घेणार नाहीं. मला कोणी त्या प्रकारचा आप्तसंबंधीहि नाहीं. तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें माझा कृपणपणा माझ्या अंगीं खिळेल आणि मला ऐषआराम करावासा वाटणार नाहीं. मी पैन् पै वांचवीन, चांगलें खाणार देखील नाहीं, घरांतील चटसारें निरुपयोगी व डामडौलाचें विकून टाकीन; पण बायकोला मात्र डागिन्यांनीं मढवून काढीन—तें सुख कायतें मजपासून तिला मिळेल. आणि मालमत्ता सोडविल्याखेरीज तिचें तोंड म्हणून मला पाहायाचें नाहीं.

गुलबाई सौम्यपणें म्हणाली—पण असला हा दुराग्रह कशासाठीं म्हणून? त्या बिचारीनें काय असें पाप केलें? ह्यापेक्षां थोडासा साधेल असा उद्देश धरून असा. तुमची मालमिळकत ज्यांच्या स्वाधीन झाली आहे, त्यांना घेऊं द्या उपभोग; आणि ती सोडविण्यासाठीं जो पैसा मोठ्या कंजूषपणानें जमवून ठेवितां आहां, तो द्या नाद सोडून. तुम्हाला एक लहानसें सत्तेचें घर घेतां येईल व साधारण चरितार्थ चालण्यासारखें उत्पन्न होईल, तेव्हां एकादें गांव पाहून तेथें कुटुंबासह घर करून आनंदांत रहा, आणि मग वाटेल तितकीं पुस्तकें वाचा, ग्रंथ लिहा किंवा म्युनिसिपालिटीचे सभासद होऊन लोककल्याणाचीं कामें करा, किंवा वाटेल तो दुसरा करमणुकीचा उद्योग काढा. म्हणजे आतां जो तुम्हाला पैशाचा हव्यास सुटला आहे तो सुटून त्यामुळें तुमची होत असणारी शरिराची, मनाची व अब्रूची खराबी ती तरी होणार नाहीं.

**वाडिया**—तुम्ही जर असें वागणार नाहीं, तर खरोखर मी ईश्वराजवळ असें मागूं लागेन कीं, ह्या पांडोबाची सारी सांठविलेली पुंजी

चोरी होऊन किंवा व्यापारांत घस लागून पार नाहींशी होवो. आणि वास्तविक जर असा प्रकार घडून येईल, तरच तुमची धडगत लागेल.

आपली पुंजी जाईल ही नुसती कल्पना एकून पांडोबानें रागाच्या भरांत जोरानें मूठ घट्ट आवळून दांत करकरा खाल्ले. गुलबाईला तर त्याच्या रागाचा आवेश पाहून खरोखर भीति वाटली; परंतु तिला बोलावेंसें वाटून ती ह्मणाली—लक्ष्मीच्या चंचलतेचा तुह्माला दोनदां प्रत्यय आला आहे. तुमची संपत्ति चटसारी गेली त्यावेळीं, व हल्लीं आमच्या कारखान्याची भरभराट रसातळास गेली ह्यावेळीं. इतकें असूनहि तुह्मी लक्ष्मीलाच आदिदैवत करूं पहातां, तर खरोखर मला अशी भीति वाटते कीं, ज्या वेळीं तिची मदत तुह्माला अवश्य हवीशी वाटेल त्यावेळीं ती खास दगा दिल्यावांचून राहणार नाहीं. जिच्या प्रीत्यर्थ तुह्मीं अहोरात्र परिश्रम करीत आपलें आयुष्य दवडिलें, तिनें आयत्या वेळीं फसवून तुह्मांस नंगेफकीर करून सोडावें व मरते वेळीं तुमची दैना व्हावी, ह्या गोष्टी किती खेदकारक होतील बरें? ह्याची तुह्मी कल्पना तरी केली काय?

तिचा नवराहि ह्मणाला— पण हेंहि पुरवेल. मात्र असें होऊं नये कीं, ज्यासाठीं एवढा उपद्व्याप केला तें हस्तगत करून जिवंतपणीं दुःख; व मरतांनाहि कपाळीं हाल. पांडोबा तुह्मी आपला कायमचा विचार करा. कारण आतां जर तुह्मी दिशा बदलली नाहीं, तर आह्मीं सांगितलेल्या दोन गोष्टींपैकीं एक गोष्ट खरोखर तुमच्या नशिबीं ठेविलेली आहे.

हें पांडोबाच्यानें नाकबूल करवेना; परंतु त्यामुळें त्यानें आपला क्रम हि बदलण्याचा यत्न करावा तर तोहि केला नाहीं. तो मोठा निश्चयी आहे असें प्रत्येकजण ह्मणे. त्याला जो कांहीं अभिमान वाटत असे, तो आपल्या निश्चयीपणाबद्दल. तत्राप अगदीं महत्वाच्या गोष्टींत, ह्मणजे स्वतःस सुख लावून घेण्याच्या कामीं, तो एकाद्या वेडगळ माणसाप्रमाणें मनाचा कच्चा होता.

त्यानें आपल्या झोंपडीपुढें कांहीं झाडें लाविलीं होतीं; तेथें भर उन्हाळ्यांत एके दिवशीं एक लहान मूल सारा दिवस उन्हांत एक लहान खळगा करीत बसलें होतें. मुलाच्या मनांत त्या खळग्याचें लहानसें डबकें करण्याचें होतें. ह्मणून खळगा करून त्यांत पाणी आणून घालीपर्यंत रात्र झाली, व रात्रभर पाऊस पडल्यानें त्या मुलानें सारे श्रम व्यर्थ गेले. परंतु त्या मुलाची त्या दिवसाची मेहनत पाहून **पांडोबाला** हंसू आलें होतें.

**पांडोबानें** त्या मुलाची मेहनत तुच्छ गणली, तेव्हां त्यानें असा थोडाच विचार केला कीं, त्या रखरखीत व कडक उन्हाळ्याचे दिवसाप्रमाणें आपलेंहि आयुष्य जात आहे. ज्यावेळीं वास्तविक जिवाला सुख लावून घ्यावयाचें, त्यावेळीं भारी मेहनत करून भावी सुखाच्या आशेनें वेळ दवडायाचा, आणि शेंवटीं काळझोंपेनें घेरलें ह्मणजे आपले जन्मभरचे श्रम व्यर्थ गेले असा अनुभव घ्यावयाचा; ह्यापेक्षां वेडेपणा तो कोणता?

*　　　*　　　*

शेंवटीं ह्या प्रांताला अखेरचा सलाम ठोकण्यापूर्वीं **गुलबाई** व **वाडिया** अशीं उभयतां **आदरजीचा** निरोप घेण्यासाठीं त्याच्या येथें गेलीं. नेहमीप्रमाणें म्हातारबोवा बागेंत काम करीत होते.

तो म्हणाला—आतां तुह्मीच शेंवटले, किंवा तुमच्याखेरीज आणखी कोणी जाण्याचे राहिले आहेत?

**वाडिया**—दोन तीन नोकर लोकांखेरीज कोणी नाहीं. आमचें घर अजून विकावयाचें आहे, ह्मणून त्यांतील सामान बंद करून घराला कुलूप लावून ते एक दोन दिवसांत निघतील.

**आदरजी**—तर मग तुमच्या लोकांनीं तें कारखान्यावरचें घड्याळ तूर्त घेऊन जावें; कारण तुमच्या इमारतींची अखेर व्यवस्था लागेपर्यंत त्या घड्याळाच्या घणघण आवाजानें माझें डोकें फिरतें. कोणी ख्रिस्ती

मेला म्हणजे त्यांच्या देवळांत घांट वाजवितात, त्याप्रमाणें आतां मला ह्या घड्याळाचा आवाज वाटूं लागला आहे.

वाडिया—पण तुम्हाला इतक्या लांब घड्याळाचे ठोके ऐकूं येतात कीं काय?

आदरजी—येतात ह्मणजे? ते पहा आतां बारा वाजत आहेत. पुर्वी घड्याळाचे ठोके होत असत, पण त्यावेळीं मला त्यांचा आवाज बरा वाटे; कारण सकाळीं झोंपड्यांतून कामावर जातांना व दुपारीं भाकर खाण्यासाठीं सुट्टी होतांना तेथें लोकांच्या झुंडीच्या झुंडी दृष्टीस पडत. पण आतां त्या ठोक्यामुळें मागील गोष्टींची आठवण मात्र होते. ह्मणून तें आतां काढून टाकिलें तर मला बरें वाटेल.

वाडिया—जे दिवस गेले त्यांत कांहीं चांगलें होतें, व आतां ते दिवस नाहींत, ह्मणून तुह्माला एकंदरीनें वाईट वाटतें तर? तुह्माला असें वाटेल याची मला कल्पना देखील नव्हती.

आदरजी—ह्मणजे असेंच कांहीं केवळ नाहीं. पूर्वी जशी ही दरी होती, त्याप्रमाणें जर ती होईल व तेथें तुमच्या कारखान्याचा मागमूस-हि दिसणार नाहीं, तर मला वाईट वाटणार नाहीं. पण तसें होणें शक्य नाहीं. त्यांतून त्या जागीं कलाकौशल्यानें भरभराट होत असून दर वर्षी जास्त जास्त लोकांचा चरितार्थ आनंदांत होत असे, आणि तेथूनच आतां मनुष्य मात्र जाऊन बाकी मनुष्याची आठवण होणार मात्र सारें आहे. ह्या दोन गोष्टीची साम्यता कशी होईल?

वाडिया—त्यांतून असा फेरफार होण्यास आह्मा माणसांचेंच अज्ञान व मूर्खपणा कारणीभूत झाला आहे, हें लक्षांत आलें ह्मणजे तर अधिक वाईट वाटणार. तुमच्या मनाला बरें वाटावें, ह्मणून खरोखर त्या साऱ्या इमारती पाडून जमीनदोस्त कराव्या व तेथें पूर्ववत हरळी उगूं द्यावी असें मला फार फार वाटतें. परंतु आह्मी नाहीं तर दुसरे कोणी तरी, लोखंडाचा व्यापार पुनः सरसावल्यास, येऊन ह्या इमारतींचा उपयोग

करतील, ह्या आशेनेंच केवळ आह्माला इमारतींचा विध्वंस करितां येत नाहीं.

म्हातारा ह्मणाला—तुह्मी प्रथम येथें आला त्यावेळीं मला बरें वाटलें नाहीं. परंतु असा सुदिन पुनः आल्यास ह्याउपर खरोखर मला फार फार आनंद होईल. आता माझ्या आयुष्याची घडी भरत आली आहे. ती पुनः पंगाळांत टाकण्यास जवळ कोणी जरी नसला तरी पुरवेल, परंतु ऐन घडीभरण्याच्या वेळीं तुह्मी मजजवळ याल, असा सुयोग घडेलसें वाटत नाहीं. पण जाउं द्या, ( हुंदका आलेला गिळून ) त्यांत काय आहे, तुमच्या गुलबाई कोठें आहेत.

वाडिया—ती वाटते माणेकबाईला भेटायाला आंत गेली. आतां आह्मी येतों, लोभ असूं द्या, बरें.

आदरजी—पण थांबा, मला आमच्या गुलबाईला सुंदर फुलांचा एक गुच्छ तयार करून देऊं द्या. खरोखर त्या स्वतःच अत्युत्कृष्ट पुष्पासारख्या आहेत. एके दिवशीं हिंवाळ्यांत वारा कोण वहात होता व थंडी मी ह्मणत होती, अशा वेळीं तुमच्या बंगल्याच्या पुढें एका गरीब बाईची गाय पसवली. त्यावेळीं जवळ कोणी मनुष्य नव्हतें. वाटतें सारे लोक कामाला गेले होते. तेव्हां तुमच्या गुलबाईनें स्वत- येऊन त्या बाईला कालवड धरूं लागण्याला मदत केली, हें सारें मी एथून दुर्बिणींतून पहात होतों. पण मला त्याच वेळीं वाटलें कीं, वाडिया खरो-खरी सुखी आहे. त्याला अशी मायाळू बायको मिळाली आहे. तुह्मी श्रीमंत असा कीं, गरीब असा, वा कोणत्या स्थितींत असाना, गुलबाई ही तुह्माला सुख दिल्यावांचून रहाणार नाहीं; ती असा नामी संसार करील.

इतक्यांत गुलबाई बाहेर आली, तेव्हां साहजिकच म्हाताऱ्याला तिची स्तुति आटोपावी लागली. तिनें आंत जाऊन माणेकबाईला स्वत-काढिलेलें एक चित्र यादगिरीदाखल दिलें. माणेकबाईनें तें मोठ्या

खोलींत लावून ठेविलें. ह्यानंतर इतर कोणत्याहि वस्तुपेक्षा याच चित्रा-
बद्दल आदरजींचें व तिचें हमेश बोलणें होत असे.

आदरजीनें गुलबाईला गुच्छ देऊन तिला हात देऊन गाडींत बस-
विलें. व गाडी चालती झाली. गाडी दिसेनाशी झाली, तरी हा फाटक
दोरीनें आवळीत किती वेळ तरी उभा होता. पुढें तो कांहीं वेळानें
बागेंत फळझाडांकडे चालता झाला, त्यावेळीं तो आपलें डोकें हातांनीं
पुशीत आहे, असें माणकबाईच्या दृष्टीस पडलें.

**समाप्त.**

# शुद्धिपत्र.

छापखाना दुसऱ्या गांवीं व टपालमार्गें व्यवहार या कारणांनीं छापतांन विराम, अनुस्वार इत्यादिकांचीं बरींच अशुद्धें राहिलीं आहेत. त्या सर्वांचें शुद्धिपत्र न देतां फक्त शब्द गाळल्यामुळें किंवा नीट न छापल्यामुळें अर्थबोध होत नसेल, त्यासंबंधीं हें शुद्धिपत्र आहे.

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २ | १९ | अशा | अशा रीतीनें |
| १७ | १५ | मारतील | मारील |
| २२ | १९ | मधाचा | मधाची |
| २४ | २१ | ठेवन | ठेवून |
| २४ | २९ | खोहाराची | लोहाराची |
| ४२ | १९ | पण पण | पण |
| ६० | १० | विशेष | खप विशेष |
| ६३ | ९ | ज्यांचा | त्यांचा |
| ६९ | १ | शिंग | शिंगें |
| ७२ | १९ | अंडीं | अंडीं राहावीं |
| ७९ | ४ | राहिला | उभा राहिला |
| ११२ | ८ | सारजण | सारेजण |
| १२२ | २६ | मलांखेरीज | मुलांखेरीज |
| १२९ | २४ | वसातीं | वसाहती |
| १३७ | १८ | तेव्हां आतां | आतां |
| १३८ | १९ | व | व ते |
| १९२ | १ | बोलली | ती बोलली |
| १९९ | १९ | व्यापरा | व्यापार |

| | | | |
|---|---|---|---|
| २२२ | ५ | घुनखडी | जे घुनखडी |
| २२३ | १५ | सद्दा | सद्दा |
| २३५ | ९ | पाश्चात्ताप | पश्चात्ताप |
| २४९ | १३ | तल्लीळ | तल्लीन |
| २६० | २० | कढण्यांत | काढण्यांत |
| २६६ | ३ | हर | तर |
| २६८ | ९ | निक्षुन | त्यानें निक्षून |
| २६८ | १५ | शेजरी | शेजारी |
| २६८ | १७ | पूर्वीन्या | पूर्वीचा |
| २६९ | १ | अशा | अशी |
| २८१ | २५ | तिवाह | तिघेही |
| २८४ | २१ | डंचिलें | हुंबचिलें |
| २९१ | १९ | कापळमोक्ष | कपाळमोक्ष |

## सांपत्तिक कथावली या पुस्तकास आश्रय देणारांचीं नांवें.

### एकापेक्षां जास्ती प्रतीस आश्रय देणारांचीं नांवें.

| नांवें. | प्रती | नांवें. | प्रती. |
|---|---|---|---|
| श्रीमंत सरकार छत्रपती महाराज, करवीर. | १२ | श्रीमंत हनुमंतराव निंबाळकर सरलष्कर कोल्हापूर | २ |
| श्रीमंत मल्हारराव उर्फ पतंगशाह जव्हार. | ३ | ,, उदाजीराव चव्हाण हिंमतबहादूर कोल्हापूर | २ |
| श्रीमंत बाळासाहेब घोरपडे, इचलकरंजी. | १० | ,, आबाजीराव कृष्णराव पंतप्रतिनिधि कोल्हापूर | ४ |
| ,, बाळासाहेब पटवर्धन कुरुंदवाड. | २ | ,, नारायणराव घोरपडे कोल्हापुर | ३ |
| ,, बापुसाहेब पटवर्धन, कुरुंदवाड. | ५ | ,, रघुपती पंडीत महाराज ,, | २ |
| ,, तात्यासाहेब पटवर्धन. सांगली. | ५ | ,, विद्याशंकर भारतीशंकर ,, | २ |
| ,, बापुसाहेब पटवर्धन, कागल. | ३ | ,, नरसिंव्हराव रामचंद्र घोरपडे बडोदें | २ |
| ,, दत्ताजीराव घाडगे ,, | २ | ,, राजे नवलोजीराव गुजर नागपूर | २ |
| ,, पंत आमात्य साहेब बावडा | ५ | ,, आर. डब्ल्यु. बाळाजी, मुंबई | २ |
| ,, बाबासाहेब घोरपडे मुधोळ. | ५ | रा. ब. वासुदेव महादेव समर्थ, बडोदें | ५ |
| ,, आपासाहेब पटवर्धन जमखिंडी | ३ | रा. रा. नारायण बाळकृष्ण वकील संखेडा | १२ |
| ,, आण्णासाहेब पटवर्धन मिरज | ३ | ,, अनंत कृष्ण ओक, अहमदनगर | २ |
| ,, संताजीराव घोरपडे कापशी | २ | खा. ब. जमशेटजी ए. दलाल बडोदें | २ |
| ,, सुभानराव शिंदे ,, | ३ | | |
| ,, राजेशहाजीराव मालोजीराव भोंसले | २ | | |

### एक एक प्रतीस आश्रय देणारांचीं नांवें.

**अ**

रा. रा. अंताजी गोविंद केळकर
,, अनंत वी. कटक.
,, अनंत महादेव दामले.
,, अनंत त्रिंबक चांदोरकर.
,, अनंत रामचंद्र पंडीत.
,, अनंत कृष्ण परांजपे.
,, अनंत महिपत.
,, अनंत लक्ष्मण सोहनी.

**आ**

रा. सा. आनंदराव गोविंद दिघे.
,, आनंदराव राघोबा हाटालकर.
श्री. आनंदराव राजे पांढरे.
रा. रा. आनंदराव एस दळवी.
,, आनंदराव विनायक कपतान.
,, आनंदराव जी. पालेकर.
,, आनंदराव शामराव वेलकर.
,, आनंदराव दिनानाथ.

,, आनंदराव कृष्णराव आचार्य.
,, आनंदराव गोपिनाथजी.
,, आत्माराम तात्याजी वेडनरे.
श्री. आत्माराम अमृतराव बुट्टी.
,, आप्पासाहेब मोरे.
,, आप्पासाहेब भोसले.
रा. रा. आबाजी नीळकंठ वसईकर.
,, आबाजी सेराळ वकील.
प्रो. आबाजी विष्णु काथवटे
श्री. अमृतराव गाईकजीराव निंबाळकर.
रा. रा. अमृतराव सखाराम वर्णीकर.
,, आर. ए. तर्खड.
श्री. आर. एस. आंबेगांवकर.
रा. ब. आर. व्ही. धामणसकर.
रा. रा. आर. टी. खानापुर.
,, आर. एल. गोखले.
,, आर. एम. भागवत
,, आर. बी. मंत्री
रा. सा. आर. व्ही. महाजनी.
रा. रा. आर. जी. अभ्यंकर.

## ए

रा. रा. एस. घोरपडे.
,, एस. जी. फाळके.
,, एन. के. गाडगीळ.
,, एन. के. आंबेगांवकर.
,, एस. एम. नामजोशी
,, एम. एल. खांडाटे.
,, एस. टी. डोंबे.
,, एम. मोरेश्वर जोशी.
,, एम जे. कोठारे
,, एम. एन. नीसल.
,, एम. पी. ध्रुव.
,, एस. आर. भांडारकर.
,, एन. शावशंकर
,, एस. वी. उपासनी

## क

रा. रा. काशीनाथ केशव खामगांवाले.
,, काशीनाथ जगन्नाथ सोमण.
रा. रा. काशीनाथ नारायण
,, काशीनाथ विष्णु
मेहेरबान काजी आबदुल मिया.
रा. रा. कृष्णाजी रघुनाथ केळकर
,, ,, कृष्णराव पुरशोतम भट
रा. ब. कृष्णराव विनायक सारंगपाणी
,, ,, कृष्णराव महादेव जोगळेकर
रा. रा. कृष्णाजी विठोजी गाळवणकर
,, कृष्णाजी सीताराम रेडकर
,, कृष्णाजी भिकाजी केळकर
,, कृष्णाजी महादेव दातार
,, कृष्णाजी त्रिंबक रानडे
,, कृष्णराव त्रिंबक रानडे
,, कृष्णराव त्रिंबक वकील
,, कृष्णराव जयराम गुप्ते
,, कृष्णराव हरी
,, कृष्णराव महादेव देशपांडे
,, कृष्णराव विष्णु रानडे
,, कृष्णराव पांडुरंग रेळे
,, कृष्णराव बळवंत चितळे
,, के. जी. घोटीकर
रा. ब. के. वी. पंडीत
,, ,, के. बी जाधव
रा. रा. केरो गणेश करणीक
,, केशव दयाराम भट
,, शहा केशवलाल शंकरलाल
,, के. आर. साळुंके
,, केशव विश्वनाथ पटवर्धन
,, केशव गणेश आजरेकर
,, केशव रघुनाथ नातु
,, केशव भिकाजी परचुरे
,, केशव घनशाम
,, केशव गोविंद दामले
,, केशव त्रिंबक जोशी
,, केशव गोपाळ ताम्हणे
कर्नल मेजर के. आर. कीर्तिकर
रा. रा. केशव बळवंत किरकिरे
,, केशव रावजी मनोहर

रा. रा. केशवराव आत्माराम
,, कोंडाजी वर्हारोजी नाईक लासुरे

ख.

श्रीमंत खंडेराव आपासाहेब गायकवाड
रा. रा. खंडेराव हरीश्चंद्र दिघे
,, खंडेराव केशव

ग.

रा. रा. गंगाधर नरसिंह केतकर
,, गंगाधर कृष्ण
,, गंगाधर व्यंकटेश सें. ने. ज. लायब्ररी भुसावळ
,, गंगाधर बाळकृष्ण आधारे
रा. रा. गंगाराम भाऊ मस्के
,, गंगाराम वी. रेळे
रा. ब. गजानन बापुजी कोठारे
रा. रा. गणपतराव गोखले वकील
,, गजानन रघुनाथ दिघे
रा. ब. गणपतराव एस. गायकवाड
रा. रा. गणपतराव सदाशीवराव
,, गणपत परशराम शेट
,, गणपतराव मल्हार
,, गणपत काशीनाथ मदन
,, गणपतराव नारायण लेले.
डॉक्टर गणेश कृष्ण गर्दे
रा. रा. गणेश कृष्ण आगासे
रा. सा. गणेश बळवंत आंबेगांवकर
रा. रा. गणेश रामचंद्र चालकर.
,, गणेश दाजी देसाई
,, गणेश गोपाळ खरे
,, गणेश पांडुरंग वैद्य
रा. सा. गणेश जनार्दन आगासे.
रा. रा. गणेश कृष्ण खापरडे
,, गणेश एन. सहस्त्रबुद्धे.
,, गणेश हरी देशपांडे
रा. रा. गणेश बळवंत चितळे.
मेहरबान गुलाम गुस्तासाहेब.
श्रीमंत गोपाळराव शिवदेव राजेबहादर
रा. रा. गोपाळ विनायक भानप
,, गोपाळ शिवराम
,, गोपाळ नारायण इंद्रे
,, गोपाळ रामचंद्र पितळे
,, गोपाळ नारायण पटेकर
रा. सा. गोविंदराव नारायण दळवी
रा. रा. गोविंद रामचंद्र दाभोळकर.
,, गोविंद बाळकृष्ण रानडे.
,, गोविंद बाबा गुर्जर.
,, गोविंद शिवराम साठे.
,, गोविंद कृष्ण कर्णीक.
,, गोविंदराव महादेव चापेकर.
,, गोविंद महादेव
,, गोविंद विनायक पटवर्धन.
,, गोविंद गणेश गडबोले.
,, गोविंद नरसिंह
,, गोविंद महादेव दीक्षित
,, गोविंदराव आपाजी गुप्ते
,, गोविंद आण्णाजी कामलेकर

च.

श्रीमंत चिंतामण विश्वनाथ नातु
रा. रा. चिंतामण पांडुरंग लाट.
श्रीमंत चिंतामणराव नारायण मुजूमदार.
रा. रा. चिंतामण मोरेश्वर गडकरी.
,, चिंतामण बापुजी
,, चिंतामण कृष्ण.
,, चीमणाजी बाबुराव आर्जुनकर
रा. ब. चुणिलाल माणेकलाल
रा. रा. चुणिलाल बापुजी
रा. सा. चुणिलाल कालाराम

ज.

रा. रा. जगन्नाथ बाळकृष्ण आमृते.
,, जनार्दन भिकाजी खरे
रा. ब. जयसींगराव आंग्रे
रा. रा. जी. आर. किराणे
,, जी. वी. देवल
,, जी. बी. परांजपे
रा. ब. जी. आर. निंबाळकर
रा. रा. जी. एन. देवल

रा. रा. जी. जी. [illegible]
,, जी के आपटे
,, जी एस मुकादम
,, जुगलभाई नारायण
,, जे. के. कानडे

ट

रा. रा. टी. व्हि. ठांकोर

ठ

रा. रा. ठाकोर नरसीदास मेहता

ड

रा. ब. डायाभाई हारजीवनदास
रा. सा. डी. आर. तरखडकर

त

रा. रा. त्रिंवक मोरेश्वर मराठे
,, त्रिंवक हरी आचार्य
,, त्रिंवक आबाजी जोशी
,, त्रिंबक मोहनीराज
,, त्रिंबक मेराळ वकील
,, तुकाराम आबाजी पाटील

द

रा. रा. दत्तात्रय सिताराम घोलकर
,, दत्तात्रय वामन थत्ते
,, दत्तात्रय जयराम देसाई
,, दत्तात्रय गोपाळ शेट
,, दत्तात्रय पांडुरंग निमक
,, दत्तात्रय कृष्ण आंबेकर
,, दत्तात्रय नाना नेरखडी
,, दत्तात्रय कोंडोपंत घाटे
,, दत्तात्रय रंगनाथ पेंडसे
,, दत्तात्रय चिंतामण
,, दाजी गणेश जोशी
रा. सा. दाजी धोंडदेव पाटणकर
रा. रा. दाजी विष्णु केतकर
,, दाजीबा फकीरजी मेस्तरी
,, दामा महादु
,, दादोबा सखाराम
,, दादाभाई मदनराव
,, दादाभाई नारायण धुमे
रा. रा. दामोदर रघुनाथ धुमे
रा. रा. दामोदर दादाजी
,, दामोदर रघुनाथ पाटणकर
,, दामोदर लक्ष्मण देशपांडे
,, दामोदर हरी रानडे
,, दामोदर निळकंठ
,, दामोदर रामचंद्र मुळे
,, द्वारकानाथ गणेश देशमुख
,, द्वारकानाथ सदानंद मानकर
,, द्वारकानाथ रामचंद्र वासूदेव
,, द्वारकानाथ आत्मारामजी धोत्रे
,, दिनकर बल्लाळ परांजपे
,, दिनकर रामचंद्र जोशी
,, दिनानाथ सदानंद
,, दिनकर कृष्णराव देशमुख
,, दिनकर नारायण
सौ. दुर्गाबाई जोशी
रा. रा. दुर्गाराम जगजीवन

ध

रा. रा. धरणीधर बळवंत वाकणकर
,, धोंडुसिंग रामसिंग
,, धोंडो शामराव गरूड

न

रा. रा. नरहर आपाजी
,, नरहर गंगाधर
,, नसरुद्दीन शेख अकबर
,, नानाभाई हरिश्चंद्र
,, नानाभाई बाळकृष्णजी
,, नानाभाई गणपतराव काणविंदे
रा. ब. नारायणभाई दांडेकर
रा. रा. नारायण हरी कापरे
,, नारायण राघवेंद्र धारवाडकर
,, नारायण गणेश आंमडेकर
,, नारायण विनायक साठे
,, नारायण शिवराम गोरे
श्री. रा. नारायण कृष्ण मनसी
रा. सा. नारायण पांडुरंग भांडारकर
रा. रा. नारायण शिवराम गणपत्ये

रा. रा. नारायण भाऊ पडवळ
रा. सा नारायणराव भवानराव पावगी
रा. रा नारायण गोपाळ मालवणकर
,, नारायण बापू खोत
,, नारायण महादेव रावडे
,, नारायण रामचंद्र दांदे
,, नारायण मोरेश्वर ताह्मणे
,, नारायण वेंकट शेट
,, नारायण केशव परांजपे
,, नारायण गोविंद चांदोरकर
,, नारायण विष्णु बापट
,, नारायण बाळाजी आगरकर
,, नारायण केशव
,, नारायण केशव गोळे
,, नारायण चिंतामण भट
,, नारायण रामचंद्र
,, नारायण काशिनाथ दाते
,, नारायण वामन से ने. ज. ला. अकोला.
,, नारायण विश्राम दळवी
,, नारायण आनंदराव
,, नारायण बळवंत मालवणकर
,, नारायण रामचंद्र गडीकर
,, नारो धाकदेव चौघुले
,, निळकंठ विनायक छत्रे
,, निळकंठराव वकील
,, निळकंठ गोपिनाथजी शारंगधर
ने. ज. ला. मिरज
,, ,, फलटण
,, ,, सांवतवाडी
,, ,, कुडाळ
,, ,, रत्नागिरी

## प

रा. रा. पद्मनाथ रावजी दंडे
,, परशुराम भिकाजी वकील
,, परशुराम रघुनाथ मोरमकर
,, परशुराम भिकाजी भाटे
,, परशुराम गोविंद देवधर

रा. सा. प्रल्हाद कृष्ण शहाणे
रा. ब. प्रभाकर विठ्ठल गुप्ते
,, पांडुरंग दाजी अधिकारी
रा. रा. पांडुरंग वेचाजी वड्डुळकर
प्रो. पांडुरंग भिकाजी नाईक
रा. रा. पांडुरंग प्रभु लवले
,, पांडुरंग विठ्ठल सबनीस
,, पांडुरंग रामचंद्र ताह्मणे.
,, पांडुरंग लक्ष्मण ओक
,, पांडुरंग गोविंद
,, पांडुरंग बाबुलजी
,, पांडुरंग बाळकृष्ण चाचर
,, पांडुरंग हरिश्चंद्र मंत्री
श्री. रा. पुरषोत्तम गोविंद रांडे
रा रा. पुरषोत्तम यशवंत वाकणकर
,, पुरषोत्तम दामोदर बर्वे
,, पुरषोत्तम हरी रानडे
रा. सा. पुरषोत्तमराव देशपांडे
रा. रा. पुरषोत्तम भास्कर
,, पुरषोत्तम रामचंद्र पाठारे
,, पुरषोत्तम विनायक आपटे
,, पुस्तक संग्रहालय पेण

## ब.

रा. रा. बजाजी लक्ष्मण दांडे
श्री. रा. बळवंतराव रामचंद्र नातू
रा. ब बळवंतराव नारायण जोशी
रा. रा. बळवंतराव नारायण मोरकर
,, बळवंत भोजराज मोहिते
,, बळवंत कोंडोजी पारख
,, बळवंतराव गोविंद
,, बापूजी रघुनाथ गडकरी
,, बापू सखाराम आठवले
,, बापूभाई दाजीभाई
,, बापूजी भगवंत चित्रे
,, बापूराव घनःशाम पिंपळे
,, बापूराव भिकाजी प्रधान
,, बापू सिताराम कंत्राकटर
,, बाजीराव [illegible]

रा. बाबुराव विठ्ठल फडणीस
,, बाबाजीराव आनाजीराव साळुंके
रा बाबाजी जयराम
रा. बाबुराव काशिनाथ दातार
,, बाबुराव गोविंद मराठे
,, बाबाजी भिमाजी वेलनकर
,, बाबाजी जिवन मेस्तरी
,, बाळकृष्ण विजरंग मुदलीयार
,, बाळकृष्ण भाऊ प्रभुगोडकर
,, बाळकृष्ण रामचंद्र कोतवाल
,, बाळकृष्ण हनमंत
,, बाळकृष्ण बळवंत सुळे
,, बाळकृष्ण पांडुरंग
,, बाळकृष्ण मोरेश्वर गवंडे
,, बाळकृष्ण आर. कोरडे
सौ. बाळकृष्ण गोपाळ कित्र
रा. बाळकृष्ण पांडुरंग पाटील
सौ. बाळकृष्ण वी. मिश्र
रा बाळमुकुंद
,, बाळाजी वामन दाणे
,, बाळाजी रामकृष्ण देशपांडे
,, बाळाजी राजाराम ..वळे
,, बाळाजी गणपतराव धैर्यवान
,, बाळाजी नानाभाई
,, बाळशंकर दलसुकराम भट
ऑ. वी. जा. टिळक
रा. ब. वी. पी. करंदीकर
रा. रा. वी. के. गागनाईक
,, वी. के. देशमुख
,, वी. ज. रत्नपारखी
,, भाऊ बाबाजी मिर्खा
,, भाऊ हरिश्चंद्रजी
,, भाऊराव सखाराम
,, भगवंत मोरेश्वर कुळकर्णी
,, भगवंतराव पांडुरंग
,, भगवंतराव नारायण तळपदे
,, भालचंद्र शंकर देवस्थळे
,, भास्कर हरी केतकर

प्रो. भास्कर रामचंद्र आतरे
श्री. भास्करराव विठ्ठल खाजगीवाले
रा. रा. भास्कर भिकाजी ओझाळे
,, भास्कर सखाराम थत्ते
,, भिकाजी बळवंत कुंटे
,, भिकनराव विठ्ठलराव देशमुख
,, भिवराव रामराव आकबरनीस
,, भिवराव दवलतराव देशमुख
,, भिवराव बळवंत पतकी

म

रा. रा. मल्हार महादेव कुळकर्णी
श्री मल्हारराव खंडेराव चिटणीस
,, मल्हारराव उर्फ बापुसाहेब गायकवाड
रा. रा. महादेव चिंतामण आपटे
,, महादेव परशुराम कामत
,, महादेवशेट गोपाळशेट कुजलकर
मे. महमद करामतखां
रा. रा. महादेव गंगाधर दामले
,, महादेव कृष्ण दामले
,, महादेव कृष्ण पाध्ये
,, मंगेश नारायण
माणकबाई कोठारी
रा. सा. माणकभाई जसभाई
,, मार्तंड केशव आंबेगावकर
,, मार्तंड बापुजी गुप्ते
,, मार्तंड लक्ष्मण हारल
श्री. माधवराव रामचंद्र फडणीस
रा. रा. माधवराव नरसु
,, माधवराव धोंडदेव खरे
,, माधवराव कृष्णराव पवार
,, माधवराव दामोदर
,, माधवराव गोविंद पवार
,, माधवराव रघुनाथ धंड
रा. सा. माधवराव जानोजी पवार
रा. रा. माधवराव सीताराम आटवडेकर
,, माधवराव लक्ष्मण दिघे.
,, माधवराव शंकरराव
श्री. मानाजीराव रांबोजीराव आंग्रे

रा. रा. मारोती हरी
,, मारोती बुकसेलर
श्री. मुगुटराव सिंदे फांकडे
रा. सा. मुकुंदराव अनंत ओवळेकर
रा. रा. मुकुंदराव बाळकृष्ण गुर्जर
रा. ब. मोरो चिंतामण जोशी
रा. रा. मोठाभाई विनायक
,, मोरो विश्वनाथ जोशी
,, मोरेश्वर गणपतराव छावडा

य.

रा. रा. यशवंत बाळकृष्ण लागू
,, यशवंत गोपाळ भिसे
,, यशवंत त्रिंबक चांवळ
,, यशवंत गणपतराव र. घोवा
,, यशवंत खंडेराव टिपणिस
,, यशवंतराव जगन्नाथ जोशी
,, यशवंतराव गणेश केमकर
,, यशवंतराव बजाजी खासीकर

र.

रा. रा. रंगो बळवंत
,, रंगनाथ नरसिंह मुधोळकर
,, रंगराव हरी नाचणे
,, रघुनाथ बळवंत टिपणीस
,, रघुनाथ भिकाजी देसाई
,, रघुनाथ गोपाळ देशपांडे
,, रघुनाथ बाळाजी
,, रघुनाथ एम. फाटक
,, रघुभाई
,, रघुनाथ गणेश मुळे
पंडिता रमाबाई
रा. सा. रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर
शेट रतनसिंग गंभीर मारवाडी
रा. ब राजाराम खंडेराव वैद्य
रा. रा. राजाराम रामचंद्र चिटणीस
,, राजाराम यशवंत
,, राजाराम सिताराम
,, राजाराम माधवराव
,, राजाराम अमृतराव

रा. रा. राजाराम यशवंत
डा. रामकृष्ण गोपाळ भांडारकर
रा. रा. रामकृष्ण पुंजाजी
,, रामकृष्ण खंडेराव गुप्ते
रा. सा. रामचंद्र दिनकर फडके
रा. रा. रामचंद्र हरी शिंदे
,, रामचंद्र कृष्ण सबनीस
,, रामचंद्र घनश्याम सबनीस
,, रामचंद्र विठ्ठल प्रधान
,, रामचंद्र कृष्ण चिटणीस
,, रामचंद्र यशवंत गोडबोले
,, रामचंद्र के. लाड
,, रामचंद्र मार्तंड गुप्ते
,, रामचंद्र गणेश करंदिकर
,, रामचंद्र मार्तंड
श्री. रामचंद्रराव अमृतराव बुटी
रा. रा. रामचंद्र धोंडबा शिंदे
,, रामचंद्र गोविंद दळवी
,, रामचंद्र आबाजी देसाई
,, रामचंद्र विनायक रणजीत
,, रामचंद्र बापुजी प्रधान
,, रामचंद्र बाळकृष्ण
,, रामचंद्र आ. कोपर्डे
रा. सा. रामचंद्र विष्णुदेव
श्री. रा. रामराव कृष्ण विंचुरकर
,, रामराव गंगाधर मराळ
रा. रा. रामराव के. घाटगे
,, रामराव यादवराव जाधव
,, रावजी गंगाधर खोत
,, रावजी लक्ष्मण गोकटे
,, रावजी घनःशाम वकील
,, रावजी काशिनाथ गोखले
,, रामराव आनंदराव
,, रामराव आनंदराव कीर्तिकर
,, रामराव आनंदराव नवलकर
रास्त्याची पेठ लायब्ररी
रा रा रु. गोविंद देवाकर

रा. रा. लक्ष्मणराव रामचंद्र गोलवकर
श्री रा. लक्ष्मणराव कदम
रा. रा. लक्ष्मण विष्णु परुळकर
,, लक्ष्मण दामोदर शुक्ल
,, लक्ष्मण नारायण केतकर
,, लक्ष्मणसिंग
,, लक्ष्मण कृष्णाजी नाटेकर
,, लक्ष्मण जयवंत देशपांडे
,, लक्ष्मण सदाशिव

व.

रा. रा. वृजलाल मुळचंद
,, व्यवस्थापक आर्यशिशुपुस्तकालय
,, व्यंकट आपाजी ओतुरकर
रा. सा. वामनराव खंडेराव वैद्य
रा. रा. वामन गोपाळ देशमुख
,, वामन गणेश विधे
,, वामनराव नारायण नाईक
,, वामनराव गणपतराव
,, वामन विष्णु लेले वकील
,, वामन प्रभाकर साठे
,, वामन आपाजी गुप्ते
,, वामन देवराव देसाई
,, वामन पांडुरंग पाटगांवकर
,, वामन गोविंद देऊसकर
,, वामन गोपाळ जोशी
,, वासुदेव बाळकृष्ण सप्रे
,, वासुदेव कृष्ण
,, वासुदेव गोविंद देवलालीकर
,, वासुदेव नारायण जोग
,, वासुदेव कृष्ण डांगे
,, वासुदेव आवाजी नाझरे
,, वासुदेव गोविंद प्रधान
,, विठ्ठल नारायण पांगरकर
,, विठल गोविंद दोस्ताने
,, विठल फकीर बगलकर
,, विठल हरी वागळे
,, विठल गणेश प्रधान
,, विठल रामचंद्र पुराणीक

रा. रा. विनायक बळवंत शाळीग्राम
,, विनायक काशीराम भागले
,, विनायक बळवंत धामणकर
,, विनायक वासुदेव वर्वे
,, विनायक जनार्दन क्षीरे
,, विनायक वामन पळनीटकर
,, विनायक मोरेश्वर मोघे
,, विनायक दाजी साखरदांडे
,, विनायक मकुंदराव
,, विनायक भास्कर
,, विनायक दामोदर भिडे
,, विनायक नागेश्वर बुन
,, विश्वनाथ हरी
,, विश्वनाथ हरी कुळकर्णी
,, विश्वनाथ नारायण दांडेकर
रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे
रा. रा. विष्णु नारायण श्रोत्री
,, विष्णु अनंत पटवर्धन
,, विष्णु गोविंद चिपळुणकर
,, विष्णु सिताराम. से. ने. ज. लां. श्रीवर्धन
,, विष्णु कृष्ण सबनीस
,, विष्णु विनायक सप्रे
,, विष्णु रामचंद्र गोदबे
,, विष्णु गोपाळ
,, विष्णु बाळकृष्ण
रा. सा. विष्णु मोरेश्वर महाजनी
रा. रा. विष्णु बळवंत गोगटे
,, वैजनाथ रामकृष्ण आठले
रा. सा. व्हि. के. कीर्तिकर
श्री. व्हि. डि. बावडेकर
रा. सा. व्हि. एल. कोठेकर
रा. ब. व्हि. एम. पंडित
रा. रा. व्हि. डि. पाथरे
,, व्हि. एस. अवेकर
रा. सा. व्हि. डि. ढवळे

श.

रा. रा. शंकर वामन आगरकर

श्री. शंकरराव कृष्ण
रा. रा. शंकर गणेश देशपांडे से. ने. ज. ला वर्धा
श्री. रा. शंकर गंगाधर शास्त्री
रा. रा. शंकर दशोबा
,, शंभूराव कृष्ण बापट
,, शंभुराव आर. बापट
श्री. रा. शहाजी शिवाजी भोसले
रा रा. शांताराम विठ्ठल नाडकर्णी
,, शामराव परशुराम प्रधान
,, शामराव व्ही देसाई
,, शामराव राघोबा
,, शिवराम बापुजी परांजपे
,, शिवराम भिकाजी
रा. सा. शिवराम सिताराम बागळे
रा. रा. शिवराम द्वारकानाथ कुळकर्णी
,, श्रीकृष्ण नीळकंठ जोशी
,, श्रीधर बापूजी भिशे
,, श्रीधर दिनकर वकील
,, श्रीधर रामचंद्र पिंपळखरे
,, श्रीपाद ए. छत्रे
,, श्रीकृष्ण गोविंद राऊते
श्री. सयाजी वंमंच कायबरी

स


रा. ब सखाराम बाजी जावडेकर
रा. रा सखाराम आर. बापट
,, सखाराम रघुनाथ शेट नाटेकर
,, सखाराम बाळकृष्ण खोपकर
,, संतुराम सिताराम गडकरी
,, संपतराव पर्वतराव देशमुख
,, सदाशिव रघुनाथ से टेकर
,, सदाशिव प्रभाकर नाटके
,, सदाशिव विश्राम दाभोळकर
,, सदाशिव विश्राम नेरवेकर
,, सदाशिव सखाराम कोर्डे
,, सदाशिव हरी सामंत
,, सदाशिव जयराम से. ने. ज. ला नागपूर

रा. रा. सदाशिव पंढरीनाथ
श्री. सयाजीराव जाधव सरनोबत
,, सर देसाई शिरसिंगीकर
रा रा. साराभाई व्ही. मुजूमदार
श्री. रा. सिताराम नारायण फणसे
रा. रा. सिताराम विनायक टिळु
,, सिताराम रघुनाथ देसाई
,, सिताराम अनंत पाराशर
रा. ब. सिताराम विश्वनाथ पटवर्धन
रा. रा. सिताराम गणजी दातार
,, सिताराम राजाराम जोशी
,, सिताराम दामोदर
,, सिताराम विठ्ठल वकील
,, सिताराम हरी रेगे
,, सिताराम महिपत सोनाळकर
,, सिताराम बाबाजी
,, सुंदराव आर. के.
,, सुभाव पाटणकर
,, सुडकशेट पाथरकर
से. सुलाक ला ठाणे
से. ने ज ला कुरुंदवाड
से ने. ज ला. मालेगांव कॉम्प
से. ने ज ला धुळे
से. ने. ज ला. ए. व्ही. स्कूल मलकापूर
मे. सेख आमिदवकर सेख इस्मायल
रा. रा. सोकर बा. ज

ह

रा. रा. हनमंत रामचंद्र विजापूरकर
रा. सा. हरगनदास द्वारकादास कोठावाला
रा रा. हरजिवन मवतदास शेट
,, हरी रामचंद्र डमरे
,, हरी गणेश करमरकर
,, हरी कृष्ण मारे
,, हरीभाई नारण भाई वणजारा
,, हरी राम मावळंकर
,, हरिश्चंद्र बापट
,, हरिश्चंद्र सखाराम कोठारे

| | |
|---|---|
| रा. रा. हरिश्चंद्र नाना | शेट हिरालाल परशुराम |
| ,, हरीहर विनायक राईरकर | रा. रा. हेडमास्तर ए. व्ही. स्कुल ब्रा. |
| ,, हरेश्वर महादेव जोशी | अकोला |



मराठी ग्रंथ संग्रहालय